टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

पाचगणी : सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतराचा ऐतिहासिक दृष्ट्या चिकित्सक अभ्यास

(इ. स. १८५० ते २००५)

संशोधक

प्रा. प्रतिभा चंद्रशेखर चिकमठ

एल. बी. एस. कॉलेज, सातारा

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शकुंतला चव्हाण

इतिहास विभाग,

जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी

इतिहास विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

जून २०१५

CERTIFICATE

Certified that the work incorporated in the dissertation, **"Panchgani: A Critical Study of Social, Cultural and Economical Changes regarding Historical Aspects" (A. D. 1850 to 2005)** submitted by **Miss Pratibha Chandrashekhar Chikmath** was carried out by the candidate under my supervision. Such material as has been obtained from various sources has been duly acknowledged in the dissertation.

Date :- Research Guide

Place :-

(Dr. Mrs. Shakuntala Chavan)

प्रमाणपत्र

मी, **कु. प्रतिभा चंद्रशेखर चिकमठ** असे प्रमाणित करते की, **''पाचगणी : सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतराचा ऐतिहासिक दृष्ट्या चिकित्सक अभ्यास'' (इ. स. १८५० ते २००५)** हा पीएच. डी. पदवीसाठीचा शोध प्रबंध मी माझ्या मार्गदर्शकांच्या सहकार्याने पूर्ण केला असून या प्रबंधातील माहिती यापूर्वी कोणत्याही विद्यापीठास सादर केलेली नाही. मी हा शोध प्रबंध प्रथमच टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना सादर करीत आहे.

ठिकाण :– सातारा संशोधक विद्यार्थिनी

दिनांक :– / /२०१५

कु. प्रतिभा चंद्रशेखर चिकमठ
सातारा

ऋणनिर्देश

पाचगणी हे एक अनोखे ठिकाण, सर्व जगभर फिरून आलेल्या फिरस्त्याच्या मनातही स्वत:च वेगळ स्थान कायम टिकवणार, कितीदा आल तरी मन तृप्त न होता अधिकच ओढ लावत, पाय स्वत:कडे नकळत वळणारा निसर्ग पाचगणीच्या वाट्याला आला आहे. पाचगणीला सृष्टीकर्त्याने भरभरून सौंदर्य बहाल केले आहे. पाच टेकड्यांमध्ये वसलेल्या या गावावर सरस्वतीचा वरदहस्त, स्वित्झर्लँडच्या पब्लिक स्कूलशी तुलना करणाऱ्या येथील शाळा, स्वत: बदला जग बदलेल असा सुंदर संदेश देणारे एम. आर. ए. सेंटर व इतर अनेक गोष्टींमुळे, निश्चितच पाचगणीचा अभ्यास करणे मला महत्त्वाचे वाटले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी, ''पाचगणी : सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतराचा ऐतिहासिकदृष्ट्या चिकित्सक अभ्यास '' (इ. स. १८५० ते २००५), या विषयावरील शोधप्रबंध तयार करीत असताना मला अनेकांचे सहकार्य व पाठिंबा मिळाला. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक निर्देश करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

प्रस्तुत शोध प्रबंध पुर्णत्वास नेण्यासाठी माझ्या गुरू मार्गदर्शक डॉ. शकुंतला चव्हाण यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. संशोधन कार्यात येणाऱ्या प्रत्येक अडचणीला सामोरे जाण्यासाठी त्यांनी जे बळ दिले व इतिहास संशोधनासाठी केवळ ग्रंथांचा आधार न घेत अस्सल साधनांचा व त्या ठिकाणापर्यंत पोहचण्यासाठी जे मार्गदर्शन केले ते अनमोल आहे. शिवाय त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम, त्यांचा लाभलेला कौटुंबिक जिव्हाळा, प्रेम, आपुलकी हे माझ्यासाठी आयुष्याची पुंजी आहे. मी मन:पूर्वक त्यांच्या ऋणातच राहणे पसंद करते.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील तात्विक व सामाजिक शास्त्रे विभागाचे अधिष्ठाता डॉ. विजय कारेकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सौ. नलिनी वाघमारे तसेच ज्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे इतिहास विभागाचे माजी प्रमुख

मा. प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे, डॉ. पंडीत मॅडम, तसेच विद्यापीठातील पीएच. डी. विभागाच्या सौ. वाते मॅडम, सौ. पेशवे मॅडम, या सर्वांच्याकडून जे सहकार्य मिळाले त्याबद्दल मी या सर्वांची ऋणी आहे.

ज्या संस्थेमुळे आयुष्याला एक वेगळी दिशा मिळाली ती माझी मातृसंस्था श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरचे संस्थापक, संकल्पक शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करून संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांची प्रेरणा, मार्गदर्शन व आपुलकीचा पाठिंबा तसेच त्यांच्या सुविद्य पत्नी मा. प्राचार्या डॉ. शैलजा साळुंखे यांचे मातृतुल्य प्रेम, संस्थेच्या सचिव मा. प्राचार्या सौ. शुभांगीताई गावडे यांचे मार्गदर्शन हे माझ्यासाठी खूप प्रेरणादायी व वंदनीय आहे. त्यांच्याही सदैव मी ऋणातच राहणे पसंत करते.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक, संशोधनासाठी सतत प्रेरणा व वेळोवेळी मार्गदर्शन, आपुलकीचा सल्ला व पूर्ण करण्यासाठी सतत पाठपुरावा करणारे आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ सर व संस्थेचे सहसचिव मा. प्राचार्य डॉ. अशोक करांडे सर यांची मी सदैव ऋणी आहे.

संशोधनाच्या कामामध्ये मला लागेल ती मदत व नैतिक आधार देणारे माझे सहकारी मित्र लाभले त्यामध्ये प्रा. शेखर मोहिते, प्रा. दीपक जाधव, यांनी फोटोग्राफी, प्रत्यक्ष स्थळांना भेटी व इतर माहिती संकलनासाठी त्यांचे खूप मोठे सहकार्य लाभले. पाचगणी ह्या विषयावर संशोधन करण्यासाठी विषय निश्चित केल्यानंतर त्यावर फारशी संदर्भ साधने उपलब्ध नाहीत हे लक्षात आले तेव्हा या शहराची माहिती घेण्याठी प्रत्यक्ष स्थळांना भेटी, जुन्या जाणकार लोकांच्याकडून माहिती उपलब्ध करणे, उपलब्ध परंतु बंदिस्त असणारी साधने शोधून बाहेर काढणे यासाठी माझ्या बरोबरीने ज्यांनी काम केले, प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जुन्या जाणकार लोकांना शोधून काढले व प्रत्येक ठिकाणी पाठच्या भावाप्रमाणे माझ्या सोबत राहिले ते प्रा. राजाराम कांबळे व त्यांच्या पत्नी सौ. कांबळे व प्रत्येक

अडचणीच्या प्रसंगी वडीलकीच्या नात्याने पाठीशी उभे राहाणारे प्रा. सतीश खुटाळे व सौ. भारती खुटाळे, प्रा. अशोक तवर या सर्वांच्या ऋणातच राहणे पसंत करते.

ब्रिटीशकालीन पाचगणीची माहिती उपलब्ध करून देणारे माजी आमदार भि. दा. भिलारे गुरूजी (भिलार), सकाळचे वार्ताहार श्री. सुनिल कांबळे, माजी नगराध्यक्ष नानासाहेब कासुर्डे, गिरिस्थान नगरपालिका कर्मचारी भिलारे, शिवाय विविध व्यवसायाशी निगडीत असणारे व्यक्ती, शाळा, होटेल्स, स्टॉलधारक यासर्वांचे नामनिर्देशन करणे शक्य नाही, त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

पुरातत्व विभाग मुंबई, भांडारकर इन्स्टिटयूट, गोखले इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिक्स पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, वेणुताई चव्हाण कॉलेज कराड या संस्थांनी आपल्या आपल्या ग्रंथालयातील मौल्यवान ग्रंथांचा वापर करण्यास मला परवानगी दिली, त्याबद्दल मी सर्वांची आभारी आहे. माझ्या लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. एल. एम. कुंभार, श्री. दामले, व कार्यालयीन कामात मदत करणारे वैभव सपकाळ, मोहन माने त्यांचीही मी मन:पूर्वक आभारी आहे.

माझ्या शैक्षणिक वाटचालीत मला सातत्याने मार्गदर्शन करणारे माझे माता पिता सौ. शारदा चिकमठ व प्रा. चंद्रशेखर चिकमठ यांनी घेतलेल्या कष्टाची किंमत मी शब्दात व्यक्त करू शकणार नाही व त्यांचे ऋण मी फेडू शकणार नाही. त्यांची मी आजन्म ऋणी आहे. माझ्या बहिणी सौ. सविता सत्यशिल नाईक व सौ. शैलजा आनंद हिरेमठ या दोघींनी मला दिलेली साथ, पाठबळामुळेच मी हे संशोधन पूर्ण करू शकले. माझे भाचे चि. श्रेय, चि. तेजस व चि. सांभवी, लहान असूनही त्यांची लाखमोलाची मदत मिळाली. तसेच्या माझ्या मार्गदर्शक डॉ. सौ. शकुंतला चव्हाण यांचे पती डॉ. प्रकाश चव्हाण, चिरंजीव पद्मराज चव्हाण, त्यांच्या सूनबाई सौ. पुनम चव्हाण यांनी संशोधन कार्यात मला कुटुंबाचा एक घटक बनवुन सर्वतोपरी माझी काळजी घेतली. त्यांचीही मी सदैव ऋणी राहीन. तसेच या

प्रबंधासाठी वेळोवेळी मार्गदर्शन, नवीन कल्पकता व भक्कम पाठबळ देणारे डॉ. मोहन जोशी व त्यांचे कुटुंबीय यांचीही मन:पूर्वक आभारी आहे.

तसेच, प्रबंधाची उत्कृष्ट छपाई करणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंगचे मुकुंद ढवळे व राजू कुलकर्णी यांचीही मन:पूर्वक आभारी आहे. शेवटी या संशोधन कार्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रोत्साहन दिले आणि माझ्यासाठी सुयश चिंतिले, त्या सर्व ज्ञात–अज्ञातांचे मी मन:पूर्वक ऋण व्यक्त करते.

ठिकाण :– सातारा संशोधक विद्यार्थिनी

दिनांक :– / /२०१५

कु. **प्रतिभा चंद्रशेखर चिकमठ**
सातारा

संक्षिप्त शब्दांची यादी

AISGA	:	All India Strawbery Grover Association.
CBSF	:	Central Board for Secondary Education.
ICSF	:	Indian Certificate of Secondary Education.
SSC	:	Secondary School Certification.
NOSF	:	National Open Secondary Education.
MRA	:	Moral Re-Aramament.
I of C	:	Initiative of Change.
INI	:	National Integration for Army.
IRCS	:	Indian Red Cross Society.
MCBS	:	Missionary Congregation of the Blessed Sacrament.
SAI	:	Sports Authority of India.
GCSE	:	General Certificate Secondary Education.
IGCSE	:	International General Certificate of Secondary Education.
STP	:	Sewagw Treatment Plants.
UIDSSMT	:	Urban Infrastructure Development Scheme for Small and Medium Town.
ISO 9001	:	The International Organization for Standardization.

अनुक्रमणिका

- ❖ प्रमाणपत्र i
- ❖ प्रतिज्ञापत्र ii
- ❖ ऋणनिर्देश iii
- ❖ अनुक्रमणिका viii

प्रकरण क्रमांक	प्रकरणाचे नांव	पृष्ठ क्रमांक
पहिले	प्रास्ताविक	१ – ३४
दुसरे	पाचगणी : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती	३५ – ८८
तिसरे	पाचगणी : एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद	८९ – १२५
चौथे	पाचगणी : एक शैक्षणिक केंद्र	१२६ – १९८
पाचवे	पाचगणी : एक आर्थिक क्षेत्र	१९९ – २५२
सहावे	पाचगणी : सांस्कृतिक विकास अ) पर्यटन क्षेत्र ब) बेल एकर सॅनिटोरियम क) नैतिक पुनरुत्थान केंद्र	२५३ – ३१९
सातवे	उपसंहार	३२० – ३३३
	संदर्भ ग्रंथ सूची	३३४ – ३५४
	परिशिष्टे	३५५ – ३६८

प्रकरण १ ले

प्रास्ताविक

प्रकरण १ ले

प्रास्ताविक

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन प्रबंधाचे शिर्षक व प्रयोजन

१.३ संशोधनाचा विषय

१.४ संशोधनाचे महत्त्व

१.५ संशोधनाची व्याप्ती

१.६ संशोधनाची मर्यादा व कालखंड

१.७ संशोधनाची गृहितके

१.८ संशोधनाची उद्दिष्टे

१.९ प्रस्तुत विषयावर यापूर्वी झालेल्या संशोधनांचा आढावा

१.१० सैद्धांतिक पार्श्वभूमी

१.११ संशोधन पद्धती

१.११.१ क्षेत्र अध्ययन पद्धती

१.११.२ मुलाखत पद्धती

१.११.३ सर्वेक्षणात्मक पद्धती

१.११.४ संदर्भ पद्धती

१.११.५ इतर साधने

१.११६ इतर साधने

१.१२ संशोधनाची साधने

१.१३ संशोधनाचा आराखडा (प्रकरण नियोजन)

संदर्भ सूची



पाचगणी : संस्थापक जॉन चेसन (इ. स. १८५४)

प्रकरण १ ले

प्रास्ताविक

१.१ प्रस्तावना :

इतिहासाचे स्वरूप आणि व्याप्ती बहुव्यापक, बहुआयामी, बहुरंगी आहे. आधुनिक काळात केवळ राजकीय घटना म्हणजे इतिहास असे इतिहासाचे मर्यादित स्वरूप न राहता, इतिहासामध्ये विश्वातील घडणाऱ्या सर्व घटनांचा अभ्यास केला जातो. कारण घडणाऱ्या प्रत्येक घटनेला इतिहास हा असतोच म्हणून इतिहास म्हणजे सर्व घडणाऱ्या घटनांचा अभ्यास.[१] भारतासारख्या अतिप्राचीन इतिहास, संस्कृती, परंपरा असणाऱ्या देशात प्रत्येक स्थानाला स्वत:ची एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा व संस्कृती असलेली दिसते. ही परंपरा किंवा स्थानिक संस्कृती ही त्या त्या प्रदेशाची प्राकृतिक रचना, नैसर्गिक सृष्टीसौंदर्य, प्रदेशाची सुगमता, ऐतिहासिक घटक व घटना यावर अवलंबुन असते. याच अनुषंगाने पाचगणीसारख्या छोट्या प्रदेशाला लाभलेली भौगोलिक पार्श्वभूमी, तेथील नैसर्गिक सौंदर्य, हवामान यांचा योग्य उपयोग ब्रिटीशांनी स्वत:च्या निवासस्थानासाठी करून घेतला. त्यामुळे सह्याद्रीच्या पर्वत रांगेवर असणाऱ्या या दुर्गम प्रदेशाला महत्त्व प्राप्त झाले व त्या प्रदेशात स्थानिक व युरोपियन यांच्या प्रयत्नातून एक नवी वसाहत निर्माण झाली व या प्रदेशाला स्वत:ची एक वेगळी परंपरा, संस्कृती व ऐतिहासिक पार्श्वभूमी प्राप्त झाली. याच दृष्टिकोनातून सदर शोध प्रबंधासाठी ब्रिटीशकाळात पश्चिम घाटमाथ्यावर विकसित झालेल्या महाबळेश्वर, पाचगणी या शहरांपैकी ब्रिटीशकालीन शैक्षणिक केंद्र, पर्यटन स्थळ, त्यातून पाचगणी शहराचा सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या घडून आलेला बदल याचा अभ्यास केला आहे.

पाचगणी हे शहर महाराष्ट्र राज्यातील, सातारा जिल्ह्यातील ब्रिटीशकालीन थंड हवेचे ठिकाण असून, जगाची छोटी प्रतिकृती मानली जाते. पाचगणीचा प्रदेश हा दुर्गम, डोंगराळी असला तरी नैसर्गिकदृष्ट्या समृद्ध असणारे हे शहर ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे बनले आहे. पाचगणी शहराला सातारा संस्थानचे वलय, आसपासच्या

प्रदेशात असणाऱ्या लेण्या, किल्ले, मंदिरे, स्मारके, ऐतिहासिक पाऊलखुणा इत्यादीमुळे ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. छत्रपती शिवाजी राजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली, संत रामदास स्वामींसारख्या अनेक संतमहात्म्यांच्या वास्तव्याने पवित्र झालेली, महात्मा ज्योतीबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बापूजी साळुंखे यांसारख्या शैक्षणिक कार्यात मोलाचे योगदान देणारे समाजसुधारक, क्रांतिसिंह नाना पाटील ते यशवंतराव चव्हाणांपर्यंत भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणारे क्रांतिकारक यांचे योगदान सातारा जिल्ह्याला मिळाले.

ब्रिटीशकाळात भारतीय उष्ण हवामानापासून बचाव करण्यासाठी काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी सुखकर अशा पर्वतीय स्थळाचा शोध घेतला. त्यापैकी महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पश्चिम घाटमाथ्यावर असणाऱ्या महाबळेश्वर व पाचगणीचा शोध अनुक्रमे पीटर लॅडविक व जॉन चेसन यांनी घेतला. जॉन चेसनने इ. स. १८५४ मध्ये पाचगणीचा शोध घेऊन प्रथम स्थानिक लोकांच्या मदतीने शेती करण्यास सुरूवात केली.[२] हा प्रदेश लागवडीयोग्य व मानवी वसाहतीला अनुकूल असल्याचे लक्षात आल्यानंतर येथे वसाहत निर्माण केली. या गावाचा विकास होण्यासाठी अवघ्या दोन हजार लोकवस्तीच्या गावाला खास बाब म्हणून 'नगरपालिके'चा दर्जा मिळवून दिला. इ. स. १९१० पासून हे गाव 'Panchgani Hill Stattion Municipal Council' म्हणून ओळखले जाऊ लागले.[३] तेव्हापासून या गिरिस्थान नगरपरिषदेने आपल्या विकास कार्यात गती ठेऊन आज ही नगरपरिषद सातारा जिल्ह्यातील एक श्रीमंत नगरपरिषद म्हणून ओळखली जाते.[४]

मुंबई इलाख्यात असणारी ब्रिटीश मुले भारतातील उष्ण हवामान व साथीच्या रोगाला त्याकाळात मोठ्या प्रमाणात बळी पडत होती. साथीच्या रोगापासून बचाव योग्य हवामानाच्या ठिकाणी शिक्षणाची सोय करण्यासाठी पाचगणी या ठिकाणी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी प्रथम युरोपियन मुलांच्यासाठी शाळा सुरू केल्या. त्यानंतर इतर समाजाच्या शाळा टप्याटप्याने सुरू झाल्या. ब्रिटीश काळात या शाळा केंब्रिज विद्यापीठाशी संलग्न होत्या.[५] आजही या शाळांनी आपला आंतरराष्ट्रीय दर्जा टिकवून ठेवला आहे.

जॉन चेसनने निसर्गत: सुंदर असणाऱ्या पाचगणीच्या भूमीत काही युरोपियन वनस्पती, फळा–फुलांची लागवड केली. त्यापैकी युरोपियन फळ म्हणजे स्ट्रॉबेरी. स्ट्रॉबेरी या पिकाने विशिष्ट चव व रंगामुळे राष्ट्रीय पेटंट मिळवून जागतिक बाजारपेठेत आपले स्थान भक्कम केले आहे. त्यामुळे या भागातील स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे साधन स्ट्रॉबेरीने प्राप्त करून दिले आहे. या फळावर प्रक्रिया करणाऱ्या अनेक उद्योग व्यवसायामुळे स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध झाला. इ. स. १९८० च्या दशकात पर्यटकांची संख्या वाढल्याने हे ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले. पर्यटकांच्या सोयीसुविधांसाठी हॉटेल व्यवसायापासून छोट्या–मोठ्या व्यवसायांची निर्मिती झाली.

पाचगणीला लाभलेले नैसर्गिक सृष्टीसौंदर्य व आल्हाददायक स्वच्छ हवामानामुळे हे शहर आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे बनले. हे हवामान दमेकरी व क्षयरूग्णांसाठी उत्तम असल्याने डॉ. बिलिमोरिया यांनी इ. स. १९१४ मध्ये 'बेल एअर सॅनिटोरियम' ही क्षणरूग्णांसाठी सुरू केलेले आरोग्यधाम वरदान ठरले. तसेच नैतिक व आध्यात्मिक बैठकीसाठी शहरी गोंगाटापासून दूर असणाऱ्या या शहराचा उपयोग आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'Moral Rearmament Center' ची एक भारतातील शाखा येथे सुरू करण्यासाठी करून घेतला आहे. त्यामुळे या दोन संस्थांमुळे पाचगणीच्या विकासात भर पडली आहे.

पाचगणीचा इ. स. १८५० ते इ. स. २००५ हा कालखंड विचारात घेता, त्याचे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील विकास व वाढीचा आलेख उल्लेखनीय ठरतो. पाचगणीचा विस्तार, वाढ व विकासात एकूण दीडशे वर्षांच्या काळात एका लहान गावाचे रूपांतर शहरात होऊन त्याची ख्याती आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविण्यिचे कार्य जॉन चेसनपासून ते आजच्या स्थानिक नेते मंडळींनी केले आहे.

१.२ संशोधन प्रबंधाचे शिर्षक व प्रयोजन :

कोणत्याही प्रदेशाला स्वत:चा इतिहास असतो. एखादे ठिकाण धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यटनाच्या दृष्टीने योग्य ठरते व त्याठिकाणी विकास प्रक्रियेला चालना मिळते व मानवी वसाहतीचे प्रमुख केंद्र बनते. यामागे अनेक कारणे असतात. ही

कारणे शोधणे आणि त्यांचा मानवी जीवनाच्या विकासाशी सांगड घालणे हेच सामाजिक शास्त्राचे उद्दिष्ट आहे. शिवाय संशोधनात्मक अभ्यासातून जी माहिती उपलब्ध होईल तिचा भविष्याच्या विकास प्रक्रियेत 'मार्गदर्शन' म्हणून उपयोग करून घेणे याला फार महत्त्व असते. त्याचदृष्टीने सदरच्या संशोधन प्रबंधासाठी **''पाचगणी : सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतराचा ऐतिहासिकदृष्ट्या चिकित्सक अभ्यास''** हे शिर्षक योजिले आहे. कारण सध्या 'पर्यटन' व 'शैक्षणिक केंद्र' या वैशिष्ट्यामुळे सर्वत्र प्रसिद्ध असणारे पाचगणी हे ठिकाण कसे विकसित होत गेले हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर इ. स. १८५० मध्ये प्रथम जॉन चेसनने या प्रदेशाची पाहणी केली, वसाहत केली त्यानंतर या प्रदेशाच्या आजच्या विकसित स्थितीपर्यंतची प्रक्रिया अव्याहतपणे चालू राहिली आहे. म्हणूनच सदरच्या अभ्यास संशोधनासाठी 'इ. स. १८५० ते इ. स. २००५' हा कालखंड निवडण्यात आला.

१.३ संशोधनाचा विषय / विषयाची निवड :

मानवी जीवनास अनुकूलता असेल अशाच ठिकाणी मानवी वसाहती स्थापन होतात आणि पुढे त्या विकसित होतात. काळानुरूप मानवी वसाहतीच्या विकसनाची कारणे बदलतही गेलेली दिसतात. सदर संशोधनासाठी निवडलेले सुमारे दीडशे वर्षांचा इतिहास असणारे पाचगणी हे ठिकाण सध्या एक प्रमुख पर्यटन, शैक्षणिक केंद्र म्हणून देशामध्ये प्रसिद्धीस येते, याची कारणमिमांसा महत्त्वाची ठरते. जॉन चेसनसारखा एक ब्रिटीश निवृत्त अधिकारी, युरोपियन लोकांच्या निवासासाठी थंड हवामानाच्या पर्वतीय प्रदेशाचा शोध घेऊन त्या प्रदेशाचा मानवी वसाहतीसाठी विकास घडवून आणतो. पुढे त्या प्रदेशाचा विकास व विस्तार आंतरराष्ट्रीय किर्तीचे शहरामध्ये घडून आलेला दिसतो. गेल्या दीडशे वर्षात या शहराचे झपाट्याने घडून आलेला विकास, त्यासाठी ज्या घटकांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे, त्यांची नोंद घेणे आवश्यक ठरते. म्हणूनच इ. स. १८५० पासून क्रमाक्रमाने एखाद्या स्थानाचा विकास–प्रगती कशी होत जाते याचा अभ्यास सदरच्या संशोधन विषयातून किंवा विषयाच्या निवडीतून अधोरेखित केला आहे.

१.४ संशोधनाचे महत्त्व :

मनुष्य हा उत्क्रांतिशील प्राणी आहे. स्वत:च्या व जगाच्या अंतर्बाह्य स्वरूपावर विजय मिळविण्यासाठी त्याची धडपड आदिकाळापासून चालू आहे. वैयक्तिक व सामुहिक जीवन सुखी, प्रगत व समृद्ध होण्यासाठी तो सतत प्रयोगशील व प्रयत्नशील आहे. त्यातूनच त्याने आजवर अनेक क्षेत्रात कल्पनातीत उन्नती साधली आहे. मानवाने आजवर स्वत:वर व भोवतालच्या सृष्टीवर अनेक संस्कार केले आहेत. आपले मन, बुद्धी व आसपासच्या प्रदेशावर संस्कार करून मानवी जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न सदैव केला जात आहे. त्यापैकीच एखाद्या नव्या भूभागाचा शोध लावून त्या प्रदेशावर नव्याने वसाहत निर्माण करणे, शेती, पशुपालन, विविध उद्योग, तंत्रविज्ञान, नगररचना, शासन संस्था इत्यादी घटकांच्या माध्यमातून त्या प्रदेशाचा विकास घडवून आणला जातो व दुर्गम, दुर्लक्षित अशा प्रदेशाला एक विशिष्ट स्थान मिळवून दिले जाते.[६]

असेच विशिष्ट स्थान सातारा जिल्ह्यातील 'महाबळेश्वर व पाचगणी' या सह्याद्रीच्या पर्वतरांगांवरील दुर्गम भागाला प्राप्त झाले आहे. आज पाचगणी हे जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र व महाराष्ट्रातील एक पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला आले आहे. महाबळेश्वरचा शोध पिटर लॉडविकने व पाचगणीचा शोध जॉन चेसनने लावला. पाच टेकड्यांच्यामध्ये असणाऱ्या या प्रदेशाला नाव दिले पाचगणी. पाचगणीचा विकास हा अर्वाचीन असला तरी त्याला प्राचीन इतिहास आहे. याविषयीच्या पाऊलखुणा येथील दंतकथा, सामाजिक–भौगोलिक स्वरूप, किल्ले, शिलालेख, मंदिरे यांच्या इतिहासावरून दिसते.

इ.स.१८५० पूर्वी अतिशय छोट्या आदिवासी, कोळी, धनगर, धावड यांच्या वाड्या–वस्त्यांचा डोंगराळ असणारा हा प्रदेश जॉन चेसन या ब्रिटीश अधिकाऱ्याच्या सौंदर्यदृष्टीला योग्य वाटला, त्यातून वसाहत निर्माण झाली. शेतीचे वेगवेगळे प्रयोग झाले. चहा, कॉफी, सिल्वर ओक यांची लागवड करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मुलांच्यासाठी निवासी शाळांची सुविधा निर्माण करण्यात आली. पाचगणीचा विकास होऊन विविध सोयीसुविधा ब्रिटीश सरकारकडून व्हाव्यात यासाठी जॉन चेसनने ग्रामपंचायत एवढी

लोकसंख्या असणाऱ्या गावाला नगरपालिकेची मान्यता मिळवून आणली. पुढे पाचगणी हिल स्टेशन म्युनिसिपल कौन्सिलने पाचगणीच्या विकासात मोठी भूमिका बजावली. इ. स. १८६० मध्ये मुंबई ईलाख्याचा गव्हर्नर सर ब्राटल फ्रायर याने या शहराला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला व जॉन चेसनची पाचगणीचा सुपरिडेंट व मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करून पाचगणीच्या विकासाला चालना दिली.[७] भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या 'म्युनिसिपल हिल स्टेशन कौन्सिलचे' रूपांतर 'गिरिस्थान नगरपरिषदेत' झाले. पुढे सह्याद्रीच्या पश्चिम घाटाचा प्रदेश हा जागतिक वारसा हक्क World Heritage मध्ये समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे पाचगणीचे पठार हे 'जैव विविधतेचे भांडार' म्हणून प्रसिद्धीस आले आहे. या प्रदेशाला संवेदनाशील प्रदेश (Eco Sensitive Zone) म्हणून घोषित करण्यात आले आहे.[८] त्यामुळे या प्रदेशाचे महत्त्व आणखीनच वाढले आहे. अशा जागतिक वारसा लाभलेल्या प्रदेशाचा त्या प्रदेशात वाढणाऱ्या दुर्मिळ वनस्पती, प्राणी यांचे संगोपन व संवर्धन होण्याच्या दृष्टीने विविध विषयातील संशोधकांनी याचा अभ्यास करून भविष्यातील विकास प्रक्रियेला दिशा देण्याचे प्रयत्न व्हावेत तसेच इतिहास अभ्यासकांच्या दृष्टीने येथील नैसर्गिक घटकांचे जतन करण्यासाठी स्थानिक समाज, पर्यटक व प्रशासनाची भूमिका ठरविणे या दृष्टीने सदरच्या संशोधनाचे महत्त्व मोठे आहे.

१.५ संशोधनाची व्याप्ती :

History as we know it today as a developed branch of learning ..... is a comparatively new thing. It scarcely existed before the 19th century ; वॉल्श यांचे हे विधान काळाच्या ओघात महत्त्वाचे ठरते.[९] 'इतिहास' हा मानवी विचार प्रक्रियेपासूनचा प्राचीनतम विषय असला तरी या विषयात काळानुरूप अनेक बदल होत गेलेले दिसतात. इतिहासकारांचे विविध दृष्टिकोन आणि अभ्यासाचे विषय यांचे स्वरूप सातत्याने बदलत गेल्याचे दिसते. औद्योगिक क्रांती, वाहतूक, दळणवळणांच्या साधनांचा शोध, दोन महायुद्धे, नवीन अज्ञात जगाचा शोध मोहिमा, वैज्ञानिक शोध हे सर्व मानवी इतिहासातील मैलाचे दगड आहेत. या सर्वांमुळे केवळ घटनांचा मागोवा हा इतिहासाचा विषय

न रहाता दीर्घकाळातील घडामोडींचा अभ्यास होऊ लागला. एकोणिसाव्या शतकात इतिहास विषयात मूलगामी बदल होऊन मानवी जीवनाचा व्यापक दृष्टीने विचार होऊ लागला. त्यामुळे राजकीय घटनांबरोर आर्थिक,सामाजिक, सांस्कृतिक घटकही महत्त्वाचे ठरले. विसाव्या शतकात प्रादेशिक इतिहासाच्या अभ्यासाला महत्त्व आले. त्या आधारावर छोटे–छोटे प्रादेशिक भाग निवडून त्यांचा सर्वांगिण अभ्यास होऊ लागला. देशातील विविध गावे–शहरे यांच्या अभ्यासाला महत्त्व आले. त्याचाच एक भाग म्हणून सदरच्या संशोधन अभ्यासासाठी 'पाचगणी' हे शहर निवडून त्या शहराच्या सर्व घटकांचा साकल्याने ऐतिहासिक शोध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे. वास्तविक पाहता हा मोठा व्यापक विषय आहे. पाचगणीच्या इतिहासाचा आढावा घेण्यासाठी व सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १८५० पर्यंत मागे जावे लागते. पाचगणी येथे स्थलांतरित झालेले लोक, त्यांच्या परंपरा, चालीरिती, धर्मश्रद्धा घेऊन आले. त्यानुसार पाचगणी गावाची ठेवण, विचारपद्धती, स्वभाव बनत गेला. त्यामुळे संशोधन अभ्यासाची व्यापकता विस्तारत जाते. हा विस्तार सदरच्या प्रबंधामध्ये सात वेगवेगळ्या प्रकरणामधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारच्या प्रादेशिक इतिहासाचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून होणे हे विषय विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल.

१.६ संशोधनाची मर्यादा व कालखंड :

सामाजिक शास्त्रामधून समाजाच्या विविध घटकांचा अभ्यास करता येत असला तरी पाचगणी शहराच्या स्थापनेपासून आजच्या या शहराच्या आधुनिक रूपापर्यंतचा आढावा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थित्यंतराच्या अनुषंगाने घेणे हा या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. तसेच एखादे शहर किंवा वसाहत विकसित होत जाऊन तिचा विस्तार मानव आपल्या प्रयत्नातून कसा घडून आणतो, हे लक्षात घेणे हे या अभ्यासाचे वैशिष्ट्य आहे.

कोणत्याही ऐतिहासिक विषयावर संशोधन करावयाचे झाल्यास कालखंड निश्चित करून नेमका त्याच काळाचा सर्वांगिण विचार करून संशोधन केले जाते. म्हणजेच कालखंडातील संदर्भाचा उल्लेख संशोधनात असावा हे अपेक्षित आहे. सदरच्या संशोधनात

एकंदरित एकशे पंचावन्न (१५५) वर्षांचा म्हणजे इ. स. १८५० ते २००५ या कालखंडाचा विचार केला आहे.

सुमारे दीडशे वर्षाचा कालावधी हा मोठा प्रदिर्घ कालावधी आहे. त्यासंबंधी प्राप्त होणारी संशोधन मूल्य असणारी कागदपत्रे फारच कमी असतात. शासकीय दप्तरातून बऱ्याचदा उलगडा होऊ शकतो, परंतु त्यांना प्राप्त करणे मोठे अवघड आणि जिकिरीचे असते, या संशोधन विषयीच्या मर्यादा आहेत.

१.७ संशोधनाची गृहितके :

संशोधनातील उद्दिष्टप्राप्तीसाठी आणि संशोधकाला विशिष्ट दिशा दाखविण्याचे काम गृहितकाद्वारे होते. 'सामाजिक संशोधन पद्धती' यातील गृहितकानुसार ''अभ्यास विषयातील घटनेचे संभाव्य म्हणजे गृहित कृत्य म्हणजेच अभ्युपगम होय.'' किंवा ''परिक्षण केल्या जाणाऱ्या विधानास गृहितकृत्य असे म्हणतात.''[१०] या गृहितकाच्या अनुषंगाने संशोधक अभ्यास करताना उद्दिष्टांशी संबंधित काही संभाव्य उत्तरे ठरवितो. संशोधनाच्या अंगी हे उद्दिष्ट परीक्षण करता येते. तेव्हा या विषयाच्या अभ्यासाद्वारे खालील गृहितके निश्चित केली आहेत.

- ★ पाचगणीचा विकास ब्रिटीश काळापासून ते आत्तापर्यंत टप्प्याटप्प्याने होत आला आहे.
- ★ पाचगणीतील सामाजिक स्थिती पाहता हे शहर जगाची छोटी प्रतिकृती म्हणून ओळखले जाते.
- ★ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यामुळे पाचगणीचा विकास घडून आला.
- ★ पाचगणीला पर्यटनाचा दर्जा प्राप्त झाल्याने या शहराची वाढ व विकास घडून आला आहे.
- ★ पाचगणीच्या शैक्षणिक विकासामुळे हे शहर सामाजिक व सांस्कृतिक जागृतीचे प्रभावी साधन ठरते.

★ मोठ्या शहराच्या आर्थिक स्थितीच्या तुलनेने कार्यक्षेत्राने मर्यादित असलेल्या पाचगणीच्या आर्थिक स्थितीचा विचार करता येथील विविध घटकांमुळे हे शहर आर्थिकदृष्ट्या किती उच्च स्तरापर्यंत पोहचू शकते हे प्रकर्षाने जाणवते.

★ पाचगणीतील आरोग्यधाम, नैतिक पुनरूत्थान केंद्र यांच्या विकास कार्याचा सकारात्मक परिणाम समाजावर झाल्याचे दिसून येते.

★ पाचगणी शहरातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक स्थितीमध्ये येथील लोकांनी दिलेल्या योगदानास स्थानिक इतिहासामध्ये महत्त्व प्राप्त झाले आहे.

१.८ संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधन शोध प्रबंधासाठी पाचगणीचा अभ्यास करीत असताना खालील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. दुर्लक्षित राहिलेले घटक प्रकाशात येऊन समाजाला हे शहर सर्वांगिण दृष्टीने परिचित व्हावे हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

२. पाचगणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व सामाजिक स्थितीचा मागोवा घेणे.

३. शहराच्या विकासामध्ये 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद', स्थापने मागच्या प्रेरणेच्या संदर्भाने शहराचा इतिहास अभ्यासणे.

४. विशिष्ट कालखंडात शहरातील नागरिकांना पुरविलेल्या सुविधांचा आढावा घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था लोकाभिमुख करण्यासाठीचे हेतू साध्य झाले किंवा नाही याचा परामर्श घेणे.

५. पाचगणीतील शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविलेल्या शैक्षणिक केंद्रांचा आढावा घेणे.

६. पाचगणी शहराच्या आर्थिक विकासाला कारणीभूत ठरणाऱ्या सर्व घटकांचा सर्वांगिण दृष्टीने पाचगणी शहराचे महत्त्व अभ्यासणे.

७. संपूर्ण भारतात प्रसिद्ध असणाऱ्या महाराष्ट्रातील अनेक पर्यटन केंद्रांपैकी एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र असणारे आपल्या भौगोलिक स्थान वैशिष्ट्ये व नैसर्गिक सृष्टी सौंदर्यामुळे पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त केलेल्या पाचगणी शहराचा विविध अंगांनी महत्त्व विशद करणे.

८. सह्याद्रीच्या पर्वत रांगेतील पश्चिम घाटाचा प्रदेश इकॉलॉजिकली सेन्सेटीव्ह झोन म्हणून घोषित केलेल्या टेबललँड या विस्तीर्ण पठाराचे पर्यावरणाच्या दृष्टीने आढावा घेणे.

९. पाचगणीचा सांस्कृतिक दृष्टिकोनातून शहर विकास व सुधारणासाठी वैद्यकिय क्षेत्रात आणि नैतिक व आध्यात्मिक विचारातून चालणाऱ्या नैतिक पुनरूत्थान केंद्रातील आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील कार्याची नोंद घेणे.

१०. पाचगणीतील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक कार्याच्या दृष्टीने अभ्यास करणे व विकास कार्याच्या परिणामांचा मागोवा घेणे.

१.९ प्रस्तुत विषयांवर यापूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा :

कोणत्याही प्रकारच्या संशोधनाचा प्रारंभ करण्याअगोदर त्या क्षेत्रातील पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास करणे आवश्यक असते. पूर्वी झालेल्या कार्याचे सर्वेक्षण म्हणजेच संशोधन प्रक्रियेतील टप्पा समजला जातो. आज जगात विविध क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती होत आहे. त्या अनुषंगाने देश–विदेशात शिक्षण व सामाजिक संशोधन क्षेत्रात विविध प्रयोग व संशोधन होत असताना सदरच्या संशोधन प्रकल्पासाठी त्यांचा आढावा घेणे संशोधन प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर काही ब्रिटीश अधिकाऱ्यांनी नैसर्गिक सौंदर्य स्थळांचा व थंड हवेच्या ठिकाणांचा शोध घेऊन त्याठिकाणी नव्याने शहरे वसविली व त्याचा पर्यटन, शैक्षणिक, व्यापारी दृष्टीने विकास घडवून आणला. त्यापैकीच महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पर्वतीय प्रदेशावर महाबळेश्वर व पाचगणी ह्या निसर्गरम्य स्थळांचा शोध घेऊन

वसाहत निर्माण केली. मुंबई इलाख्यातील ब्रिटीश गव्हर्नर जनरल व इतर अधिकाऱ्यांसाठी ही शहरे उन्हाळ्यातील विश्रांतीची व राजधानीची ठिकाणे बनली. पुढे भारतातील राजेरजवाडे, जहागिरदार, उद्योगपती व राजकीय व्यक्तींचे विश्रांतीचे ठिकाण बनले. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राचे राज्यपाल व इतर अधिकारी उन्हाळ्यात महाबळेश्वरला मुक्कामाला येऊ लागले. त्यातून विविध राष्ट्रीय पक्षांची शिबीरे, मराठी साहित्य संमेलन यासारख्या मोठ्या कार्यक्रमांचे आयोजनासाठी या शहराची निवड केली जाऊ लागली. इ. स. १९८० च्या दशकापासून संपूर्ण भारतातून लोक पर्यटनासाठी, पश्चिम महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पाचगणी या ठिकाणांची निवड करू लागले. हा परिसर केवळ पर्यटकांसाठी आकर्षित करणारे ठिकाण नाही तर छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी. हिंदवी स्वराज्याच्या विस्तारासाठी प्रथम आदिलशहाच्या ताब्यातील जावळीचे खोरे चंदरराव मोरे यांच्याकडून जिंकून घेऊन कोकणपर्यंत विस्तार केला. स्वराज्यावरील आलेल्या मोठ्या संकटांपैकी एक अफझलखानाच्या रूपाने आलेले संकट याच जावळी खोऱ्यात असणाऱ्या प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवरायांनी मोठ्या युक्तीने निभावून नेले. त्यामुळे इतिहासप्रेमी हा दुर्गम भाग व या भागातील शिवरायांचे अनेक किल्ले यांना भेट देण्यासाठी येत असतात. तसेच सह्याद्रीच्या या पर्वत रांगा वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र व भूगोलतज्ज्ञ, इतिहासकार यांच्यासाठी सतत संशोधनासाठी आव्हानात्मक बनलेल्या आहेत. अशा या प्रदेशावर खूप मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. त्याच दृष्टीने महाबळेश्वर, पाचगणी या शहरांच्या विविध घटकांवर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न अनेक लेखक, संशोधकांनी केलेला आहे.

त्यामध्ये महाबळेश्वर या प्रदेशावर इंग्रजीमधून लिखाण **रावबहादूर डॉ. डी. बी. पारसनीस** यांनी इ. स. १९१६ मध्ये **Mahabaleshwar (1870 to 1926)** या ग्रंथातून केले आहे. यामध्ये त्यांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांचे या भागातील आगमन, सातारचे छत्रपती प्रतापसिंह महाराजांकडून महाबळेश्वरचा प्रदेश मिळविणे त्याबदल्यात खंडाळा हा प्रदेश छत्रपतींना देणे, सातारच्या राजाकडून सातारा–मेढा–महाबळेश्वरचा रस्ता तयार करून घेणे, या शहरात बाजारपेठ वसविण्यासाठी मदत, राजेरजवाडे, संस्थानिकाचे बंगले, त्यांचे

वास्तव्य, पीकपाणी, सुधारणा यावर ऐतिहासिक दृष्टीने प्रकाश टाकला आहे. **डॉ. पुष्पलता पाटील** यांनी भौगोलिक दृष्टीने महाबळेश्वर, पाचगणी पर्यटनासाठी कसे विकसित करता येईल यावर **Geographical Study of Mahabaleshwar Panchgani Region** विषयावर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधातून प्रकाश टाकला आहे. **प्रा. सतीश खुटाळे** यांनी **'पाचगणी शहरातील शैक्षणिक संस्था'** या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना सादर केलेल्या एम. फिल. प्रबंधात पाचगणीतील इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा विकास व महत्त्व याचा आढावा घेतला आहे.

प्रा. पवार आय. पी. यांनी **'पाचगणीचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास'** या शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना सादर केलेल्या एम. फिल. लघु शोध प्रबंधातून पाचगणीच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास या घटकांवर प्रकाश टाकला आहे. कु. रंजना नाईक यांनी **Agriculture in High Elevation Areas – A Case of Mahabaleshwar Tahsil in the Western Ghats** पुणे विद्यापीठास सादर केलेल्या एम. फिल. प्रबंधातून मांडला आहे. **कु. होमकर पद्मश्री प्रशांत** यांनी **'पाचगणी शहरातील इंग्रजी माध्यमातील 'सुवर्ण महोत्सवी विद्यालयाच्या ग्रंथालयांचा अभ्यास'** हा प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम. फिल. साठी सादर केला आहे. त्यातून त्यांनी पाचगणीतील विविध शाळांतील ग्रंथालय व त्यांचे कामकाज यावर दृष्टीक्षेप टाकला आहे. याशिवाय या परिसरात स्ट्रॉबेरी या फळावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगावर प्रोजेक्ट रिपोर्टसही तयार केले आहेत. त्यामध्ये **A Comparative Study and Market Research of Mala's Fruit Products with Mapro and Kissan from Retailers and Consumers, Perspective with Respect to Pune city** हा Project **Mandiwala Abdulgader Abadeali**. या विद्यार्थ्याने M. C. E. Society's Allana Institute of Management Sciences, Camp, Pune येथे आपल्या M. B. A. या डिग्रीसाठी सादर केला आहे. या Project मधून त्यांनी मॅप्रो व किसान या जाम,

जेली तयार करणाऱ्या कंपनीपेक्षा मालाज या कंपनीचे उत्पादन कसे वेगळे आहेत हे मांडले आहे. कांही पाश्चिमात्य लेखकांनी महाबळेश्वर, पाचगणीच्या सृष्टीसौंदर्यावर खुश होऊन लिखाण केले आहे. त्यामध्ये **Perin Bharucha** यांनी **Mahabaleshwar The Club 1881 - 1981** यावर लिखाण केले आहे. त्यांनी युरोपियन लोकांनी महाबळेश्वरमध्ये सुरू केलेले क्लब, त्यामध्ये चालणारे कार्यक्रम, मनोरंजनाची साधने यावर चर्चा केली आहे. **Irina Chelysheva** या रशियन लेखिकेने **The Blue Mountains of Panchgani** या ग्रंथातून पाचगणीचे सृष्टीसौंदर्याचे वर्णन केले आहे. याशिवाय महाबळेश्वर पाचगणीवर अतिशय दुर्मिळ असणारे पुस्तक दत्तात्रय कमलाकर दिक्षीत यांनी 'महाबळेश्वर' या नावाने इ. स. १९०२ मध्ये लिहिले आहे. यामध्ये पाचगणीचा आरोग्यधाम म्हणून ब्रिटीशांनी केलेला विकास याची माहिती आहे.

त्याचप्रमाणे विविध वर्तमानपत्रातील लेख, पर्यटन विषयक निघणारी साप्ताहिके, मासिके, त्यामध्ये योजना, अर्थ–संवाद, लोकराज्य, उद्योजक, साप्ताहिक सकाळ, इत्यादी मधून पाचगणीसंबंधी विविध घटकांवर प्रकाश टाकला आहे. असे असले तरी पाचगणी शहराची ऐतिहासिकता, शहराच्या विकास कार्यात योगदान देणारी पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, इथली सामाजिक रचना, विविध आर्थिक घटक, पर्यटनाच्या दृष्टीने असणारे महत्त्व तसेच आंतरराष्ट्रीय स्थरावर कार्य करणारे नैतिक पुनरूत्थान केंद्र (M. R. A. Center), क्षयरूग्ण व एड्स रूग्णांसाठी असणारे बेल एअर हॉस्पिटल, शहराच्या जडणघडणीत मोठे योगदान देणारे कळंबे महाराज व भिलारे गुरूजी अशा सर्व घटकांचा जवळून व सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा सूक्ष्म प्रकार आहे. त्यातून स्थानिक इतिहासाचा सर्वांगाने अभ्यास होतो. जागतिक व राष्ट्रीय स्तरावर मोठ्या शहरांचा अभ्यास केला जातो. परंतु स्थानिक पातळीवर असणारी छोटी शहरे राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचलेली असतात. याचा संपूर्ण व सर्व दृष्टीने अभ्यास होणे गरजेचे असते.

१.१० सैद्धांतिक पार्श्वभूमी :

पाचगणी हे शहर ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक घटकांमुळे महत्त्पूर्ण आहे. स्थान व अभिक्षेत्रीय अभ्यासाच्या संदर्भाने पर्यटन क्षेत्र म्हणून पाचगणीचा भूगोलतज्ज्ञांनी अभ्यास केला आहे. परंतु इतिहासाच्या अभ्यासकांकडून हे क्षेत्र दुर्लक्षित राहिले आहे. २० व्या शतकात प्रादेशिक इतिहास अभ्यासाबरोबर स्थानिक इतिहासाला महत्त्व प्राप्त झाले. पाचगणी व तेथील परिसराचा विविध दृष्टिकोनातून संशोधनात्मक अभ्यास करून भविष्यात त्याची व्यापक प्रदेशाच्या इतिहासाची तुलना करता येईल, या हेतूने पाचगणी शहराचा विकास व महत्त्व स्पष्ट होते.

ब्रिटीश काळात या शहराचा शोध लागून तेथे गिरिस्थान नगरपालिकेची स्थापना करून त्याचा टप्प्याटप्प्याने विकास व वाढ करण्याचे कार्य ब्रिटीश अधिकारी जॉन चेसन व सर बार्टल फ्रायर यांनी केले. या युरोपियन अधिकाऱ्यांच्या बरोबरीने पारशी समाजातील व्यक्तींचे योगदान मोठे आहे. पाचगणीसारख्या लहान वसाहतीचे रूपांतर शहरामध्ये करण्यामागे नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष सर रेव्हरंट थॉमस रोवन, नानासाहेब कासुर्डे, आजच्या महिला नगराध्यक्ष लक्ष्मीताई कऱ्हाडकर यांसारख्या अशा एकूण ४५ नगराध्यक्षांनी शंभर वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात प्रशासनाबरोबर लोकाभिमुख कार्य करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.[११] पाचगणीतील स्थानिक लोकांपासून ते देशविदेशातील येणाऱ्या लोकांमुळे शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील प्रगतीचा दर्जा जागतिक पातळीपर्यंत पोहचला आहे.

या कार्याचा प्रारंभ जरी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केला असला तरी या भागातील ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे, भि. दा. भिलारे गुरूजी, तसेच वेगवेगळ्या समाजातील व्यक्तींनी उल्लेखनीय कार्य केले. ब्रिटीशकालीन मुंबई इलाख्यातील पहिले व भारतातील दुसरे क्षयरूग्णांसाठी सॅनिटोरियम निर्माण करणारे डॉ. बिलिमोरिया, सामाजिक चळवळीच्या माध्यमातून देशविदेशात शांतता व सलोखा निर्माण करण्यासाठी फ्रँक बुचमन यांनी उभी केलेली नैतिक पुनरूत्थान केंद्राची एक आंतरराष्ट्रीय शाखा पाचगणी येथे निर्माण करणारे राजमोहन गांधी यांचे कार्य पाचगणीच्या विकास कार्यात महत्त्वाचे ठरते. पाचगणी सारख्या

क्षेत्रफळाने व लोकसंख्येने लहान असणाऱ्या वसाहतीची मोठ्या शहरापर्यंत होत जाणारी वाढ अथवा स्थित्यंतरे अभ्यासणे इतर क्षेत्रीय ऐतिहासिक अभ्यासासाठी उद्‌बोधक व उपयुक्त ठरेल. हे या संशोधन अभ्यासाचे संभवनीय उपयुक्तता मुल्य आहे.

१.११ संशोधन पद्धती :

'संशोधन प्रक्रिया' ही अखंडीतपणे चालणारी दीर्घकालीन प्रक्रिया आहे. ऐतिहासिक संशोधनाबाबत तर ही प्रक्रिया अव्याहत चालणारी असते. मानवी जीवनाचा, जीवन पद्धतीचा, सर्वांगिण घडामोडींचा, परिवर्तनांचा, विचार प्रवाहांचा शोध घेणे हे इतिहास संशोधनाचे मुलभूत उद्दिष्ट ठरते.[१२] ''इतिहास हे एक सामाजिक शास्त्र असल्याने सामाजिक शास्त्रात प्रचलित असलेल्या सर्वच संशोधनपद्धती इतिहास संशोधनासही उपयुक्त ठरतात.'' निवडलेल्या संशोधन पद्धतीची निवड ही संशोधनाच्या विषयावर आणि कोणत्या प्रकारची माहिती गोळा करावयाची आहे त्यावर आधारित असते. प्रस्तुत संशोधनात संशोधन विषयाची माहिती संकलित करण्यासाठी पुढील पद्धती वापरल्या आहेत.

१.११.१ क्षेत्र अध्ययन पद्धती :

जीवनाच्या विविध क्षेत्रामध्ये नियोजनाचा अवलंब करावयाचा असेल तर विविध अंगांची वस्तुनिष्ठ माहिती जमविणे आवश्यक असते. त्यातून आर्थिक व सामाजिक क्षेत्रात क्षेत्र अध्ययन पद्धत (फील्ड सर्व्हे) पुढे आलेली आहे.[१३] या क्षेत्र अध्ययन पद्धतीतून विविध सामाजिक, सांस्कृतिक संघटना व लोकांच्या विशिष्ट प्रकारच्या उद्योगधंदे, कृती यांची पाहणी केली जाते. सामाजिक शास्त्रांच्या संशोधन क्षेत्रातील ही एक नवी दिशा व आधुनिक प्रवृत्ती आहे.[१४] इतिहासात पुराणवस्तु खात्यातर्फे निरनिराळ्या ठिकाणी जे उत्खनन चालू असते. ही पद्धत या क्षेत्रातील एक पाहणीचाच उपक्रम असतो.

महाराष्ट्राला लाभलेल्या भौगोलिक वैशिष्ट्यापैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सह्याद्री, सातपुडा यासारख्या पर्वतरांगा. या पर्वत रांगांनी भुगोलाबरोबर इतिहासाही घडविला आहे. त्यापैकीच सह्याद्रीचा पश्चिम घाट हा जैव विविधतेच्या दृष्टीने जसा महत्त्वाचा ठरला आहे तसाच तो प्राचीन लेण्या, मंदिरे, किल्ले, ऐतिहासिक वास्तू व या भागात वसवली

गेलेली शहरे यालाही महत्त्व आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी ही थंड हवेची ठिकाणे म्हणून विकसित झाली. त्यापैकी पाचगणी या शहराचा अभ्यास करीत असताना या परिसरात असणाऱ्या प्राचीन ऐतिहासिक पाऊलखुणा व त्याचबरोबर जॉन चेसनच्या काळात निर्माण झालेल्या वास्तू, सध्या या इमारतीचा उपयोग व इतर माहिती संकलनासाठी क्षेत्र अध्ययन पद्धतीचा उपयोग केला आहे.

सदरच्या संशोधन अभ्यासासाठी जॉन चेसनचे आयुष्य ज्या बंगल्यात गेले ते 'क्लिप्टन हाऊस', त्याचे समाधी स्थळ, त्याच्या काळात निर्माण झालेल्या इमारती, क्लब, शाळा, चर्च या स्थळांना भेटी दिल्या. चेसनच्या काळात पाचगणीचा कारभार पाहण्यासाठी खास बाब म्हणून गिरिस्थान नगरपालिकेचा मिळालेला दर्जा, त्या पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची मूळ इमारत व इ. स. २०११ मध्ये त्याच जागेवर बांधलेली भव्य आधुनिक इमारत या ठिकाणाला भेट देऊन गिरिस्थान नगरपरिषदेचे कार्य व जुने दस्तऐवज अभ्यासता आले व संशोधनासाठी लागणाऱ्या अनेक महत्त्वाच्या पुराव्यांची छाननी करता आली.

पाचगणी हे जागतिक किर्तीचे शैक्षणिक केंद्र म्हणून ब्रिटीश काळापासून नावारूपाला आले. त्या ब्रिटीशकालीन शाळांना भेटी देऊन त्या शाळांचे कामकाज कसे चालते, तेथे असणारी शिस्त, अभ्यासक्रम, राबविले जाणारे उपक्रम, इमारतीची रचना इत्यादी संबंधीची माहिती प्रत्यक्ष भेटीतून संकलित करता आली. तसेच प्रत्यक्ष भेटीतून पब्लिक स्कूलस व इतर सर्वसामान्य शाळा यांचाही तुलनात्मक अभ्यास करता आला.

पाचगणीला लाभलेली नैसर्गिक सौंदर्य, या स्थळाचा पर्यटनासाठी करून घेतलेला उपयोग त्यापैकी आशिया खंडातील दोन नंबरचे पठार म्हणून ओळखले जाणारे टेबललँड व इतर पॉईंटसला भेटी दिल्या. टेबललँडचे प्रत्येक ऋतूत बदलणारे सौंदर्य, या पठारावर उगवल्या जाणाऱ्या दुर्मिळ वनस्पती यांचे प्रत्यक्ष निरीक्षण, सात वर्षांनी उगवणारी कारवीची फुले यांचा अभ्यास वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रा. शेखर मोहिते यांच्या मदतीने करता आले व या पठाराचे जैवविविधतेच्या दृष्टीने असणारे महत्त्व जाणता आले.

पाचगणीच्या आसपास असणार तपनेश्वर, केदारेश्वर, यासारखी मंदिरे, राजपुरी लेण्या, पाचगणीचे ग्रामदैवत असणारे हनुमान मंदिर व घाटजाई मंदिर या स्थळांना भेटी देऊन त्याची ऐतिहासिकता जाणून घेता आली. ब्रिटीशांनी आणलेले स्ट्रॉबेरी फळ, आज या फळाला मिळालेले पेटंट, स्ट्रॉबेरी महोत्सव, या फळावर प्रक्रिया केल्या जाणाऱ्या कंपन्या, त्यांची उत्पादने याची माहिती प्रत्यक्ष भेटीतून संकलित करता आली.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे जावळीच्या भागाचा विकास घडवून आणणारे ह.भ.प. दत्तात्रेय महाराज कळंबे व भि. दा. भिलारे गुरूजी यांच्या वास्तूला भेटी देऊन प्रत्यक्ष या उत्तुंग व्यक्तिमत्त्व असणाऱ्या लोकांशी भेटता आले व त्यांच्याकडून या भागाची, परिसराची माहिती घेता आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी ज्या बाथा हायस्कूलच्या मैदानावर प्रार्थना घेत त्या बाथा हायस्कूलला भेट देऊन महात्मा गांधींच्या दैनंदिन जीवनाबद्दल माहिती जाणुन घेता आली. एकंदरीत पाचगणीतील प्रत्येक वास्तूमध्ये या शहराचा इतिहास दडलेला आहे. क्षेत्रभेटीतून या शहराचा इतिहास उलघडण्याचा प्रयत्न केला आहे.

१.११.२ मुलाखत पद्धती :

संशोधकाने संशोधन प्रक्रियेत मुलाखतीचा वापर करण्यापूर्वी मुलाखतीची उद्दिष्टे, स्वरूप, व्याप्ती यांचा विचार करणे आवश्यक ठरते. मुलाखत पद्धती हा प्रश्नावलीचा दृश्य प्रकार होय. प्रश्नावलीत प्रश्नकर्ता व उत्तरदाता यांचा प्रत्यक्ष संपर्क येतोच असे नाही. पण मुलाखतीत प्रश्नकर्ता व उत्तरदाता समोरासमोर असल्याने अधिक माहिती मिळू शकते.[१५] संशोधन प्रक्रियेत सर्वांगिण घटकांनी माहिती मिळविण्यासाठी संबंधित घटकाचे निकटवर्ती कुटुंबिय, मित्र, व्यवसायिक क्षेत्रातील सहकारी, स्थानिक जाणकार मंडळी, संघटनेचे पदाधिकारी यांच्या मुलाखती आवश्यक ठरतात. त्यामुळे बऱ्याच अंशी वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास मदत होते.[१६] तसेच स्थानिक इतिहासाची माहिती ही साधनांच्या बरोबरीने मुलाखतीतूनही मिळते. कारण समाजातील रूढीपरंपरा, सार्वजनिक उत्सव, चळवळी, संघटना, व्यवसायिक उलाढाल इत्यादी संबंधीची माहिती ही मुलाखती द्वारेच मिळवता येते. म्हणून सदरच्या संशोधन अभ्यासासाठी मुलाखत पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

सदर संशोधनाकरिता पाचगणी या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध लावणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या माहितीपासून या शहराचा विकास घडवून आणणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी, युरोपियन धर्तीवर पब्लिक स्कूल चालू करणाऱ्या मिशनरी, इतर समाजातील कार्यकर्ते, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर हा कालखंड पाहणारे स्वातंत्र्यसेनानी, जावळीसारख्या दुर्गम भागाचा विकास घडवून आणणारे सामाजिक कार्यकर्ते ते शेतीपासून पर्यटन व्यवसायापर्यंतची माहिती ही लिखित स्वरूपापेक्षा मुलाखतीतून सविस्तरपणे मिळत गेली. त्यामध्ये पाचगणीचा संस्थापक जॉन चेसन याने इ. स. १८६० च्या कालखंडात ज्या इमारती बांधल्या त्या इमारतीची माहिती ही या इमारतीचे जे मालक होते त्यांचे वंशज किंवा ज्यांनी ती इमारत विकत घेतली आहेत ते सध्याचे मालक यांच्याकडून ब्रिटीशकालीन किती बंगले आहेत, त्यांची सद्यस्थिती काय आहे हे जाणून घेण्यास विरजी बंगल्याचे मालक श्रीमती सुजी विराणी (मुंबई), कॅसल बंगल्याचे मालक सर प्रभा शंकर पटणी यांचे नातेवाईक वाडीलाल शहा यांच्याकडून गुजराती लोक पाचगणीत कधी आले, त्यांचे व्यवसाय यासंबंधी माहिती मिळाली. चेसनचा बंगला म्हणून ओळखला जाणारा 'क्लीप्टन हाऊस' यासंबंधी न्यू इरा हायस्कूलचे सुपरिडेंट श्री. भगवानराव कासुर्डे, हिंदू हायस्कूल म्हणजेच सध्याचे संजीवन विद्यालयाचे पहिले स्वयंपाकी म्हणून आलेले कन्हय्यालाल पुरोहित यांचे मोठे चिरंजिव वासुदेव पुरोहित यांची मुलाखत या मुलाखतीतून ब्रिटीशकालीन शाळा, या शाळांचे व्यवस्थापन व स्वातंत्र्यपूर्व काळात, स्वातंत्र्य चळवळीतील सर्व बड्या मंडळींनी पाचगणीला दिलेल्या भेटी याचा वृत्तांत समजण्यास मदत झाली. भि. दा. भिलारे गुरूजी ज्यांनी प्रत्यक्ष महात्मा गांधीजींची सेवा केली, पाचगणी येथे गांधीजींच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची माहिती ज्याचे गुरूजी स्वत: साक्षीदार आहेत. शिवाय गांधीजींच्या भेटीसाठी आलेले अनेक मंडळींपैकी, विनोबा भावे, लक्ष्मी पंडित, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान, मौलाना आझाद, सरदार वल्लभभाई पटेल अशा मंडळींनी भिलारे गुरूजींच्या घरी पाहुणचार घेतला होता या संदर्भातील सविस्तर माहिती मिळण्यास मदत झाली.

पाचगणीच्या विकासात ज्या गिरिस्थान नगरपरिषदेचा मोलाचा वाटा आहे त्या नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी सौ. आशा राऊत ते श्री. सचिन चव्हाण यांच्या मुलाखतीतून गिरिस्थान नगरपरिषदेचे कार्य, घडून आलेले बदल व दुर्मिळ दस्तऐवज या संदर्भात मोलाचे मार्गदर्शन झाले. या नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष मा. नानासाहेब कासुर्डे ते सध्याच्या नगराध्यक्षा लक्ष्मीताई कऱ्हाडकर यांच्या मुलाखतीतून नगरपरिषदेचे कामकाज, त्यांनी केलेली विकास कामे, कर वसुली इत्यादीची माहिती मिळाली. बेल एअर हॉस्पिटलचे सध्याचे संचालक फादर टॉमी यांच्या मुलाखतीतून बेल एअर हॉस्पिटलची सेवाभावी वृत्ती, त्यासाठी रेडक्रॉसकडून मिळणारी मदत व समाजातील तळागाळापर्यंत या हॉस्पिटलच्या माध्यमातून पोहचून समाजाला रोगमुक्त करण्याची धडपड याची माहिती मिळाली. आंतरराष्ट्रीय किर्तीचे एम. आर. ए. सेंटरचे ग्रामपरी विभागाच्या संचालिका प्रभा राव, त्यांना मिळालेली प्रेरणा, त्यातून जावलीसारख्या दुर्गम भागातील वाड्यावस्त्यांचा झालेला विकास तसेच दुसऱ्याकडून बदलण्याची अपेक्षा ठेवण्यापेक्षा प्रथम स्वत:मध्ये बदल घडवून आणा जग आपोआप बदलेल हा मौलिक संदेश मिळाला.

स्ट्रॉबेरीसारख्या नाजूक फळाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठे मिळवून देणारे व याचा प्रसार संपूर्ण भारतात व्हावा व त्यातून स्थानिक शेतकऱ्याचा विकास घडून यावा यासाठी झटणारे स्ट्रॉबेरी महोत्सवाचे अध्यक्ष बाळासाहेब भिलारे, मयूर व्होरा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त यांच्या मुलाखती महत्त्वाच्या ठरल्या. याशिवाय शहरातील छोटे–मोठे व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, शिक्षक, विद्यार्थी अशा अनेक लोकांच्या मुलाखती घेतल्या. सदर मुलाखतीमधून मिळालेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

१.११.३ सर्वेक्षणात्मक पद्धती :

इतिहासात मोठ्या प्रमाणात सर्व्हेक्षणात्मक संशोधन पद्धती वापरली जाते. पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र ह्या पद्धतींचा देखील वापर करतात. तसेच प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक या तीनही ऐतिहासिक कालखंडाचा अभ्यास करताना या पद्धतीचा वापर केला जातो.[१७] विविध मानव्यशास्त्राच्या संशोधन कार्यासाठीही या पद्धतीचा वापर उपयुक्त ठरतो.

या पद्धतीने संशोधन विषयाच्या कार्यक्षेत्रातील सामाजिक, आर्थिक अगर राजकीय घडामोडींची व त्यातील परिवर्तनाची माहिती प्रत्यक्ष त्या स्थळांना भेटी देऊन मिळू शकते.[१८] या दृष्टीने प्रादेशिक व स्थानिक इतिहास लेखनासाठी सर्वेक्षणाचा उपयोग होतो.

पाचगणीची ऐतिहासिकता जाणून घेण्यासाठी पाचगणीच्या आसपासचा परिसर, त्यामध्ये महाबळेश्वरचे यादवकालीन महाबली मंदिर, गोडवलीचे तपनेश्वर मंदिर, कमळगड, पांडवगड, नवरानवरीचा डोंगर, राजपुरी लेण्या, एम. आर. ए. सेंटर, ग्रामपरी तर्फे बदल घडवून आणलेली आसपासची गावे, भिलार गाव स्ट्रॉबेरीसाठी प्रसिद्ध असलेले, वाई या स्थळांना भेटी देऊन या प्रदेशाची माहिती व परिसरातील मानव वस्ती यांचा कालखंड अभ्यासता आला.

अगदी अलिकडे म्हणजे इ. स. १९६७ मध्ये उभारण्यात आलेले एशिया प्लाटू, नैतिक पुनरूत्थान केंद्र जे स्थापत्य कलेचा एक अजोड नमुना म्हणून ओळखले जाते. त्या एम. आर. ए. सेंटरची माहिती, त्याची स्थापत्य कला व त्या कलेचा मानवी विकाससाठी केलेला उपयोग, रेन हार्वेस्टिंग ही संकल्पना इ. स. २००० नंतरी आली. परंतु या इमारतीत ती इ. स. १९७७ सालीच अंमलात आणली होती व त्यामाध्यमातून खडकाळ माळरानावर जे नंदनवन फुलविले आहे याची माहिती मिळविता आली.[१९] राजमोहन गांधी यांनी इंग्लंडमध्ये फ्रँक बुचमन यांनी सुरू केलेली नैतिक पुनरूत्थान चळवळ भारतात आणली व ती पाचगणीसारख्या निसर्गरम्य ठिकाणी रूजवली. आज जागतिक स्तरावरील उपक्रम या सेंटरमध्ये चालविले जातात. त्या सेंटरमुळे भारतीय लोकशाही, शांतता, सद्भाव याची माहिती मिळाली. शिवाय आजच्या धकाधकीच्या आयुष्यात तणावमुक्त राहण्यासाठी स्वत:च्या विचारात आणि आचारात बदल केला पाहिजे तरच तणावमुक्त जीवन जगता येईल. यासाठी वर्षभर ज्या कार्यशाळा चालू असतात त्यातून आय. ए. एस. अधिकाऱ्यापासून, व्यवसाय क्षेत्रातील उच्च अधिकारी, विद्यार्थी व सर्वसामान्य शेतकरी, कामगार यांच्या जीवनात घडवून आणलेला बदल पाहता आला. या चळवळीचा मोलाचा संदेश मिळाला तो

'स्वत: बदला, समाज बदलेल, जग बदलेल,' या सर्वेक्षण पद्धतीनुसार संकलित केलेल्या माहितीचे चिकित्सक विश्लेषण करून विषयाची मांडणी केली आहे.

१.११.४ संदर्भ पद्धती :

संशोधन प्रक्रियेत क्षेत्र अध्ययन, मुलाखत व सर्वेक्षण पद्धती महत्त्वाच्या असल्या तरीही संदर्भवाचन आवश्यक असते. त्यासाठी इतिहासाच्या संशोधनाचा नव्याने शोध घेण्याची आवश्यकता नसली तरी संदर्भ साधनांचा पुनर्राभ्यास अपेक्षित असतो. म्हणून पुराभिलेखीय साधनांची विभागणी, अव्वल दर्जाची साधने, दुय्यम दर्जाची साधने, संशोधन पत्रिका व नियतकालिके या स्वरूपात करावे लागते. अव्वल दर्जाच्या साधनांचा शोध घेण्यासाठी निरनिराळे पुरातत्वीय विभाग, विद्यापीठ ग्रंथालये, संशोधन संस्थांची ग्रंथालये, राष्ट्रीय ग्रंथागार उपयुक्त ठरतात.

१.११.५ इतर साधने :

प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्टीने संशोधन असल्याने अभ्यासासाठी विविध प्रकारची साधने उपयुक्त ठरलेली आहेत. प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती व कालखंड लक्षात घेता ऐतिहासिक संशोधनासाठी तत्कालीन कागदपत्रांचा अभ्यास केला आहे. सामाजिक सर्व्हेक्षणात संबंधित व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत. आर्थिक सर्वेक्षणात संबंधित कंपन्या, बँका, व्यावसायिक यांचे वार्षिक अहवाल व ताळेबंद, नगरपालिकेचा जमाखर्च अहवाल यातून माहिती मिळविली आहे. सांस्कृतिक इतिहास संशोधनासाठी विविध संघटनांची स्मरणिका, चरित्रग्रंथ, शाळांची माहितीपत्रके यांचा उपयोग झाला आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संग्रहित करण्यासाठी, ब्रिटीशकालीन कागदपत्रांचा, दस्तऐवजांचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी भेटी देऊन संदर्भ कागदपत्रे, संदर्भ ग्रंथ, मुळ कागदपत्रे, शासकीय अहवाल संकलित केले. सदर संशोधनासाठी पुढील ठिकाणांना भेटी देऊन संदर्भ साधने संकलित केली.

१. मुंबई पुरातत्व विभाग, मुंबई (एलफिस्टन कॉलेज).

२. पुणे पुरातत्व विभाग, पुणे.

३. मुंबई विद्यापीठ ग्रंथालय, मुंबई.

४. मुंबई एशियाटीक सोसायटी लायब्ररी, मुंबई.

५. Maharashtra State Gazetteerers Department, Churchgate.

६. मुंबई मराठी ग्रंथालय, दादर.

७. मुंबई मंत्रालय ग्रंथालय, मुंबई.

८. गोखले इन्स्टिट्यूट, पुणे.

९. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथालय, पुणे.

१०. भांडारकर इन्स्टिट्यूट, ग्रंथालय, पुणे.

११. पुणे इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

१२. पुणे विद्यापीठ ग्रंथालय, पुणे. (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)

१३. शिवाजी विद्यापीठ ग्रंथालय, कोल्हापूर.

१४. महाराष्ट्र राज्य शासकीय मुद्रणालय, पुणे.

१५. सातारा नगर वाचनालय, सातारा.

१६. छत्रपती शिवाजी वस्तु संग्रहालय, सातारा.

१७. पाचगणी विद्यार्थी वाचनालय, पाचगणी.

१८. पाचगणी ब्रिटीश क्लब, पाचगणी.

१९. महाबळेश्वर क्लब, महाबळेश्वर.

२०. एम. आर. ए. सेंटर ग्रंथालय, पाचगणी.

२१. वेणूताई चव्हाण कॉलेज ग्रंथालय, कराड.

२२. जयवंत महाविद्यालय ग्रंथालय, इचलकरंजी.

२३. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कार्यालय, कोल्हापूर.

२४. लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, सातारा

१.१२ संशोधनाची साधने :

''गतकाळातील घटनांचे, वाटचालीचे, समाज जीवनाचे, संस्कृतीचे, कला अभिव्यक्तीचे असंख्य धागे–दोरे, पुरावे याच मातीत रूतून बसलेले असतात. हे पुरावे या भूतकाळाच्या पाऊलखुणा म्हणजेच इतिहासाची साधने होत.''[२०] हे शोध घेण्याचे एकतंत्र आहे, एक पद्धत आहे. काळाच्या पडद्याआड गेलेल्या मानवी जीवनातील घटनांचा व परिवर्तनाचा आलेख ऐतिहासिक लिखाणात आढळतो. असा आलेख तयार करण्यासाठी साधनांची आवश्यकता आहे. संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला आहे.

प्राथमिक साधने :– प्रस्तुत शोध प्रबंधासाठी प्राथमिक साधनांमध्ये अप्रकाशित साधनांमध्ये पाचगणी संदर्भात मुंबई पुरातत्व विभागात बॉम्बे प्रेसिडेन्सीला, महाबळेश्वरच्या अधिकाऱ्यांकडून पाठविलेले अहवाल (Vol. 34, 1862, Public Works Department, Fromthe Revenue Commissioner, Southern Division, W. Hart, To the Secretary to Government, Bombay 24th June 1867), Mahabaleshwar Hill Stataion Municipal Council, Urban Development Plan 1983, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद कार्यालय अप्रकाशित रेकॉर्ड, अहवाल, स्मरणिका, बेल एअर हॉस्पिटल, एम. आर. ए. सेंटर, विविध शाळा, सामाजिक संस्था, शासकीय कार्यालयीन कागदपत्रे व अहवाल, त्यांच्या खाजगी नोंदी, माहिती पुस्तिका, विविध कार्यक्रमांची छायाचित्रे, स्थलदर्शक नकाशे, महाराष्ट्र शासन जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सातारा जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न व खर्च तक्ता, डिबेटस् या प्राथमिक अप्रकाशित व प्रकाशित साधनांचा वापर केला आहे.

दुय्यम साधने :– प्रकाशित दुय्यम साधनांमध्ये डी. बी. पारसनीस , 'महाबळेश्वर' १९१६ साली प्रकाशित झालेला ग्रंथ, जगदीश लांजेकर यांचे 'महाबळेश्वर दर्शन' हा ग्रंथ, 'Mahabaleshwar Club' – Perin Bharucha लिखित ग्रंथ, Irina Chelysheva

यांचे The Blue Mountains of Panchgani हे पुस्तक, दत्तात्रय कमलाकर दिक्षीत यांचे 'महाबळेश्वर' इ. स. १९०२ मध्ये प्रकाशित झालेला ग्रंथ, धर्माधिकारी यांचा 'कर्मयोगी', ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे यांचे चरित्र ग्रंथ, संभाजीराव पाटणे संपादित 'लोकमित्र', भि. दा. भिलारे गुरूजी यांच्या चरित्रावरील ग्रंथ, याशिवाय Gazetteer of the Bombay Presidency (Facsimile Reprocuction), Satara District Volume XIX, Originally Printed in 1885, Maharashtra State Gazetteers, Satara District (Revised Edition)m1963, सातारा जिल्हा गॅझेटियर, मराठी विश्वकोश, भारतीय संस्कृती कोश, भारतीय समाज विज्ञान कोश, सामाजिक ज्ञान कोश, International Encyclopedia of the Social Science, महाराष्ट्र पर्यटन कोश, सांस्कृतिक महाराष्ट्र कोश, उद्योजक, योजना, लोकराज्य, साप्ताहिक सकाळ, पर्यटन, साधना, शिक्षण आणि समाज, शेतकरी मित्र, आरोग्यपत्रिका दीशा इ. मासिके, त्रैमासिके, साप्ताहिके, पाक्षिके तसेच दैनिक वर्तमान पत्रे, मुलाखती व विषयाशी संबंधित अप्रकाशित एम. फिल., पीएच. डी. प्रबंध, प्रोजेक्ट, तसेच विविध संदर्भ ग्रंथांचा, माहिती पत्रके, दरपत्रके, नकाशे इत्यादी साधनांचा आधार प्रस्तुत शोधनिबंधासाठी घेतला आहे.

१.१३ संशोधनाचा आराखडा (प्रकरण नियोजन) :

प्रकाशित, अप्रकाशित प्राथमिक साधने, दुय्यम साधने, मुलाखती, सर्वेक्षण, अप्रकाशित एम. फिल., पीएच. डी. शोध–प्रबंध, प्रोजेक्ट रिपोर्टस्, इंटरनेट याच्या आधारावर सदरचा संशोधन अभ्यास सात प्रकरणात पूर्ण केला आहे. सदर प्रकरणांची विभागणी पुढील प्रमाणे केली आहे.

प्रकरण पहिले : प्रास्ताविक.

प्रकरण दुसरे : पाचगणी : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती.

प्रकरण तिसरे : पाचगणी : एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद.

प्रकरण चौथे : पाचगणी : एक शैक्षणिक केंद्र.

प्रकरण पाचवे : पाचगणी : एक आर्थिक क्षेत्र.

प्रकरण सहावे : पाचगणी : सांस्कृतिक विकास

अ) पर्यटन क्षेत्र

ब) बेल एअर सॅनिटोरियम

क) नैतिक पुनरूत्थान केंद्र (M. R. A.)

ड) सामाजिक मंडळे.

प्रकरण सातवे : उपसंहार

प्रकरण पहिले : प्रास्ताविक.

प्रास्ताविकाच्या पहिल्या प्रकरणामध्ये प्रबंधाचे शिर्षक, विषयाची निवड, विषयाचे महत्त्व, विषयाची व्याप्ती, मर्यादा व कालखंड, गृहितके, उद्दिष्ट्ये, यापूर्वी झालेल्या संशोधनांचा आढावा, सैद्धांतिक पार्श्वभूमी, संशोधन पद्धती, संशोधनाची साधने, प्रकरणांचे नियोजन यांचा उहापोह केला आहे.

प्रकरण दुसरे : पाचगणी : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती.

या दुसऱ्या प्रकरणामध्ये सातारा जिल्ह्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेत पाचगणीचा इतिहास, या शहराचा शोध घेणारा जॉन चेसन व त्याने या डोंगराळ दुर्गम भागाचा टप्प्याटप्प्याने घडवून आणलेला विकास याचा आढावा घेतला आहे. तसेच पाचगणी या नावाची उत्पत्ती कशी झाली, त्यासाठी महाभारतकालीन विराटनगरीचा संदर्भ ते पाच टेकड्यांच्या मध्ये वसलेले गाव या संदर्भातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय ब्रिटीशकालीन दळणवळणाची साधने, महाबळेश्वर, पाचगणीला येणारे मार्ग याचे विवेचन केले आहे. याशिवाय पाचगणीची सामाजिक पार्श्वभूमी मांडताना या भागातील मुळचा समाज, युरोपियनांच्या आगमनानंतर पाचगणीत येऊन स्थायिक झालेला समाज व स्वातंत्र्यानंतरचा समाज याचा आढावा घेतला आहे. पाचगणीत राहणारे विविध जाती–जमातीचे लोक, त्यांचे व्यवसाय, विविध धर्मीय लोक यांचे विश्लेषण केले आहे. पाचगणीतील समाज म्हणजे जगाची छोटी प्रतिकृती समजली जाते. त्यामुळे इथले सण–उत्सवही विविध पद्धतीने साजरे केले जातात. त्यांची कुटुंबपद्धती, घरे, विवाहपद्धती, पोशाख, आहारविहार, धार्मिक प्रथा यासंबंधी

माहिती मुलाखती, प्रत्यक्ष भेट यातून मिळविली. प्रस्तुत प्रकरणात पाचगणीच्या सामाजिकतेला बळकटी आणणारे या भागाचे भाग्यविधाते ह.भ.प. कळंबे महाराज व जावळी खोऱ्याचे नेतृत्व करणारे आमदार भि. दा. भिलारे गुरूजी या दोघांच्या कार्याचा आढावा घेतला आहे. अशा प्रकारे एकंदर पाचगणीचा इतिहास व सामाजिक स्थिती यांचा आढावा घेतला आहे.

प्रकरण तिसरे : पाचगणी : एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद.

सदरच्या प्रकरणामध्ये पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचा अभ्यास करीत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासाचा आढावा व त्याचे टप्पे, गिरिस्थान नगरपालिकेचा इतिहास, खास बाब म्हणून पाचगणीला मिळालेला नगरपालिकेचा दर्जा, त्यातून स्वातंत्र्यपूर्व काळातील नगरपालिकेचा आढावा, स्वातंत्र्योत्तर आढावा, या नगरपरिषदेची निवडणुक वैशिष्ट्ये, प्रशासनाची भाषा, वेगवेगळे प्रशासकीय विभाग यांचा आढावा घेतला आहे. शिवाय या नगरपरिषदेची भव्य व आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशी इमारत, नगराध्यक्षाचा कार्यकाळ, त्यामध्ये पाचगणीचे पहिले नगराध्यक्ष थॉमस रेव्हरंड यांचा नगरपालिकेच्या इतिहासातील प्रदीर्घ काळ, नगराध्यक्ष म्हणून केलेले कामकाज व डॉ. ई. के. मर्चंट हे एका दिवसासाठी नगराध्यक्षपदावर विराजमान होणारे नगराध्यक्ष यावरून नगराध्यक्ष पदाच्या कार्यकालाच्या गंमतीजमती अभ्यासता आल्या. तसेच नगरपालिकेच्या असणाऱ्या विविध समित्या, त्यांचे कार्य याचे विवेचन करताना या नगरपालिकेला, शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ज्या विविध योजना राबवाव्या लागल्या त्यामध्ये लिफ्ट पद्धत त्या योजना महाराष्ट्रातील सर्वात खर्चिक योजना ठरल्या आहेत. त्याचे विवेचन केले आहे. तसेच नगरपालिकेचे उत्पन्न व खर्च यामध्ये नगरपालिकेने शहर विकासासाठी कोणकोणत्या बाबींवर किती प्रमाणात खर्च केला व त्याचा परिणाम अभ्यासण्यासाठी उत्पन्नाची आवक महत्त्वाची ठरते. उत्पन्नाच्या बाबी, जकात, घरपट्टी, प्रवासी कर, व्यावसायिक कर, पर्यटन कर, सरकारी अनुदान या मुख्य व अनुषंगिक उपमुद्द्यांच्या आधारावर मांडली असून खर्चाची बाब स्पष्ट होण्यासाठी सामान्य प्रशासन, रस्ते दुरुस्ती, पाणी पुरवठा विभाग, साफसफाई, दिवाबत्ती इत्यादी मुद्दे योजले

आहेत. या गिरिस्थान नगरपालिकेला मिळणारे उत्पन्न हे जास्त असल्याने ही नगरपालिका सातारा जिल्ह्यातील श्रीमंत नगरपालिका म्हणून ओळखली जाते. याचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात मांडले आहे.

प्रकरण चौथे : पाचगणी : एक शैक्षणिक केंद्र.

या प्रकरणामध्ये 'शिक्षण' ही एक अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षणाचे असणारे महत्त्व व शिक्षणविषयक विविध संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. तसेच ख्रिश्चन मिशनऱ्यांनी सुरू केलेल्या शाळा, वेळोवेळी शैक्षणिक धोरणासंबंधी घेतलेले निर्णय, त्यासाठी नेमलेले आयोग याची थोडक्यात मांडणी केली आहे. त्यानंतर सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक परंपरा, साताराचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे सातारा संस्थानचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी इ. स. १८२९ मध्ये स्वत:च्या 'रंगमहाल' या वाड्यात शाळा सुरू करून प्रथम सर्वसामान्यांसाठी शिक्षणाची सोय केली. त्यानंतर सातारा शहरात सुरू झालेल्या शाळा, त्यांचे महत्त्व, त्यावेळी या शाळांना सनातनी लोकांकडून झालेला विरोध याचा आढावा धेतला आहे. या शैक्षणिक प्रक्रियेमुळे इ. स. १८५५–५६ च्या काळात संपूर्ण जिल्ह्यात सुरू झालेल्या देशी भाषेतील (व्हर्नाक्युलर) शाळांची संख्या, संपूर्ण जिल्ह्यातील शाळेचे व्यवस्थापन ज्या विविध व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली चालत असे.

पाचगणी हे इंग्रजी निवासी शाळांचे आगार म्हणून ओळखले जाते. या शाळांना मिळालेले महत्त्व, त्यासाठी सुरूवातीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केवळ युरोपियन मुलांच्यासाठी सुरू केलेल्या शाळा, त्यानंतर समाजातील श्रीमंत वर्गातील मुलांसाठी या शाळेतून प्रवेश, इ.स. १९३० नंतर इतर समाजातील लोकांनी आपआपल्या समाजातील मुलांसाठी पाचगणीत इंग्रजी माध्यमाच्या सुरू केलेल्या शाळा याची मांडणी केली आहे.

पाचगणी हे इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी प्रसिद्ध असले तरी या शहरात पहिली शाळा ही मराठी माध्यमाची सुरू झाली. इ. स. १८८० मध्ये लोकल बोर्डातर्फे प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली. त्यानंतर इ. स. १८९० मध्ये ख्रिश्चन मिशनरी शाळा सुरू करण्यासाठी आले व इ. स. १८९८ मध्ये प्रथम जनाना बायबल व वैद्यकीय मिशनरी

सोसायटी यांच्या नियंत्रणाखाली 'किमिन्स हायस्कूल' सुरू झाले. पुढे याच शाळेचे १९०२ साली दोन स्वतंत्र शाळा सुरू झाल्या. एक मुलांची व दुसरी मुलींची शाळा. त्यानंतर १८९५ साली सेंट जोसेफ कॉन्व्हेंट गर्लस स्कूल ही रोमन कॅथॉलिक पंथियांनी सुरू केलेली शाळा या तीन शाळा त्या काळातील 'रोल मॉडेल्स' होत्या. या शाळांच्या प्रश्नपत्रिका इंग्लंडवरून बोटीने भारतात येत व उत्तरपत्रिका तपासण्यासाठी इंग्लंडलाच पाठविल्या जात. अशा कडक शिस्तीत चालणाऱ्या या शाळा होत्या. यामुळेच या शाळांची ख्याती सर्वदूर पसरली होती.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केवळ युरोपियन मुलांच्यासाठी शाळा सुरू केल्यानंतर इ. स. १९०८ मध्ये प्रथम पारशी समाजातील मुलांसाठी 'बिलिमोरिया हायस्कूल' सुरू झाले. इ. स. १९२० मध्ये मुस्लिम समाजातील मुलांच्यासाठी अंजुमन-इ-इस्लाम पब्लिक स्कूल सुरू झाले. इ. स. १९२२ मध्ये हिंदू मुलांच्यासाठी हिंदू हायस्कूल सुरू झाले. इ. स. १९२२ साली गुजराती मुलांसाठी बाथा हायस्कूल, १९४५ साली बहाई समाजासाठी न्यू इरा हायस्कूल अशा प्रत्येक समाजाच्या शाळा १९५० सालापर्यंत सुरू झाल्या. आज पाचगणीतील या पब्लिक स्कूल्सची संख्या अडोतीस इतकी आहे. सुरूवातीला या सर्व शाळा 'बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या' नियंत्रणाखाली होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही शाळा केंद्रशासनाशी तर काही शाळा राज्यशासनाशी संलग्न बनल्या आहेत.

आजही या शाळांमध्ये कडक शिस्त, वेळेचे काटेकोर पालन, मुलांचा सर्वांगिण विकास, अत्याधुनिक तंत्राचा वापर, जागतिक दर्जाचे उच्च मुल्य प्रदान करणारे प्रशिक्षण व विविध कलागुणांना वाव, त्याचबरोबर सामाजिकतेची जाणीव निर्माण होण्याठी ग्रामीण जीवनाचा जवळून अभ्यास केला जातो. त्यामुळे या शाळेत शिक्षण घेवून बाहेर पडणारा विद्यार्थी हा देशाच्या उभारणीसाठी मोठे योगदान देऊ शकतो. पाचगणीच्या विविध शाळेतून बाहेर पडलेले काही विद्यार्थी जे आज वेगवेगळ्या उच्च पदावर काम करीत आहेत. ते म्हणजे प्रसिद्ध उद्योगपती अण्णासाहेब कल्याणी, आय.ए.एस. अधिकारी व साहित्यकार विश्वास पाटील, पहिल्या महिला पोलिस अधिकारी किरण बेदी, नामवंत सी. ए. दीपक मुंदडा, सैन्यदलातील कॉम्प्युटर तज्ज्ञ अजिंक्य पायल, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले,

सिनेकलाकार डिंपल कपाडिया, काजोल, असे हजारो विद्यार्थी देशविदेशात विविध पदावर विराजमान झालेले पाहण्यास मिळतात. पाचगणीत असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या, मराठी माध्यमाच्या शाळांपैकी प्रथम स्थापन झालेल्या शाळा, प्रत्येक समाजाची शाळा व अगदी अलिकडे स्थापन झालेल्या काही निवडक शाळांची माहिती विस्तृतपणे मांडली आहे. एकंदर पाचगणी हे भारतातील एक प्रसिद्ध शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. त्याची वैशिष्ट्ये व प्रत्येक शाळांचे असणारे वेगळेपण व त्यांचे योगदान याचा आढावा घेतला आहे.

प्रकरण पाचवे : पाचगणी : 'एक आर्थिक क्षेत्र'.

प्रस्तुत प्रकरणामध्ये इ. स. १८५४ मध्ये जॉन चेसनचे आगमन, शेती उत्पादनाला सुरुवात, युरोपियन स्ट्रॉबेरी फळाची लागवड, इ. स. १९६० नंतर स्ट्रॉबेरी फळाच्या लागवडीला स्थानिक शेतकऱ्यांनी केलेली सुरूवात, त्या फळाला असणारी बाजारपेठ, या पिकाला मिळालेले पेटंट त्यामुळे जागतिक बाजारपेठेत स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला मिळालेले स्थान यातून जावलीसारख्या दुर्गम भागाचा झालेला विकास याचा उहापोह केला आहे. स्थानिक लोकांना जास्तीत जास्त रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी या भागातील नेते भि. दा. भिलारे गुरूजी व बाळासाहेब भिलारे यांनी सुरू केलेला 'स्ट्रॉबेरी महोत्सव' ही संकल्पना यातून कृषी पर्यटनाला मिळालेली चालना यातून इतर शेकडो रोजगाराच्या निर्माण झालेल्या संधी यांचा आढावा घेतला आहे.

स्ट्रॉबेरी हे अत्यंत नाजूक, नाशवंत, अविट गोडीचे फळ, या फळावर प्रक्रिया करून जाम, जेली, सिरप तयार करणाऱ्या कंपन्यांची निर्मिती, त्यामध्ये इ. स. १९५८ मध्ये सुरू झालेली मालाज फ्रुट प्रोडक्टस ही सुरूवातीला केवळ अर्धा टन फळांवर प्रक्रिया करणारी कंपनी आज आपली गुणवत्ता, प्रामाणिकपणा व दर्जा या बळावर दरवर्षी पाचशे टन जाम तयार करते. त्याशिवाय इतर उत्पादने ही वेगळीच. या कंपनीने इ. स. २००६ मध्ये IS – 5861 : 1993 हा राष्ट्रीय दर्जा मिळविला आहे. याच पद्धतीने मॅप्रोज फ्रुट प्रॉडक्टस, मनमा या जॅम, जेली तयार करणाऱ्या कंपन्या, त्यांची विविध उत्पादने, बाजारपेठा, दर्जा, या मालाला असणारी मागणी यातून स्थानिक तरुणांना उपलब्ध झालेला रोजगार व भिलार

सारख्या दुर्गम भागाचा घडून आलेला आर्थिक विकास, समाजाच्या आर्थिक जीवनमानात झालेला बदल याचा आढावा घेतला आहे.

शेतीवर आधारित असणारा दुसरा महत्त्वाचा व्यवसाय रेशीम उद्योग केंद्र. या केंद्राची निर्मिती, त्याचे उत्पादन, त्याचा स्थानिक शेतकऱ्यांना मिळालेला फायदा, या केंद्राचे व्यवस्थापन, या उद्योगला जागतिक बाजारपेठेत असणारे महत्त्व याची माहिती घेतली आहे.

पाचगणीत इतर चालणाऱ्या व्यवसायामध्ये हॉटेल व्यवसाय, या व्यवसायाची सुरूवात, आज या व्यवसायात असणारी विविध प्रकारची हॉटेल्स, त्यातून पर्यटकांची होणारी सोय व या हॉटेल व्यवसायामुळे इतर छोट्या–मोठ्या व्यवसायाची निर्मिती, त्यातून स्थानिक कुशल व अकुशल कामगारांना मिळणाऱ्या रोजगार संधी यांची मांडणी केली आहे.

पाचगणी हे शैक्षणिक व पर्यटन केंद्र असल्याने इथे येणारे पर्यटक, व्यावसायिक, पालक व अन्य लोकांच्या होणाऱ्या आर्थिक उलाढालीसाठी उपलब्ध असणाऱ्या बँका, सहकारी बँका, पतसंस्था यांचा चालणारा व्यवहार, ब्रिटीशकाळातील इ. स. १९३६ साली सुरू झालेली दी पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी ही बँक आजही कार्यरत आहे. या बँकेचा थोडक्यात आढावा, याशिवाय येथे चालणारे अनेक छोटे–मोठे व्यवसाय यामध्ये पर्यटन स्थळ व पर्यटकांना आकर्षित करणारे खाद्यपदार्थ यामध्ये चना उद्योग, चिक्की उद्योग, वेताची काठी उद्योग, टॅक्सी व्यवसाय ते फेरीवाले यांच्या व्यवसायाचा आढावा घेतला आहे. प्रस्तुत प्रकरणातून पाचगणीची होणारी आर्थिक उलाढाल, रोजगार संधी, त्यातून या शहराचा आर्थिक दृष्टीने घडून आलेले बदल याचा उहापोह केला आहे.

प्रकरण सहावे : पाचगणी : सांस्कृतिक विकास.

प्रस्तुत प्रकरणामध्ये पाचगणीचा पर्यटन स्थळ म्हणून झालेला विकास, क्षणरूग्णांसाठी वरदान ठरलेले बेल एअर सॅनिटोरियम, जागतिक शांतता व सलोखा निर्माण करण्यासाठी निर्माण झालेली नैतिक पुनरूत्थान केंद्र व पाचगणीत सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणारी काही मंडळे यांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये ब्रिटीश काळात विकसित झालेले थंड हवेचे ठिकाण आज पश्चिम महाराष्ट्रातील एक नामांकित पर्यटन स्थळ म्हणून

नावारूपाला आहे आहे. पर्यटकांना आकर्षित करणारे नैसर्गिक सौंदर्य, आशिया खंडातील दोन नंबरचे पठार म्हणून ओळखले जाणारे टेबल लँड, इतर पॉईंटस, पाचगणीच्या आसपासच्या परिसरात असणारे किल्ले, लेण्या, मंदिरे, पर्यटनातील नवीन घटक, आज पर्यटनाला 'उद्योग' म्हणून मिळालेले महत्त्व, त्यासाठी शासन व स्थानिक लोकांकडून केले जाणारे प्रयत्न याचा अभ्यास केला आहे. महाबळेश्वर पाचगणी बरोबर 'नवीन महाबळेश्वर' प्रकल्प याचाही आढावा घेतला आहे. पाचगणीच्या सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारी एक सेवाभावी संस्था म्हणजे बेल एअर सॅनिटोरियम, इ. स. १९१४ मध्ये मुंबई इलाख्यातील पहिले सॅनिटोरियम डॉ. रूस्तुमजी बिलिमोरिया यांनी पाचगणीत सुरू केले. त्याचा उद्देश, विस्तार, व्यवस्थापन, विविध विभाग, रूग्णांसाठी उपलब्ध असणाऱ्या सोयीसुविधा, गरीब रूग्णांसाठी दिल्या जाणाऱ्या सवलती, पारशी समाजाकडून मिळालेल्या देणग्या, उपचार पद्धती, याचा अभ्यास करत असताना सद्यस्थिती, एड्स सारख्या रूग्णांवर उपचार करणाऱ्या केंद्राची निर्मिती, सेवाभावी वृत्ती, इंडियन रेडक्रॉस सोसायटीमार्फत याची देखभाल व डॉ. बिलिमोरिया यांनी उभी केलेली ही संस्था, आज या संस्थेचा झालेला विकास व विस्तार याचा आढावा घेतला आहे.

पाचगणीला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देणारी एक संस्था म्हणजे Moral Rearmament Center. या सेंटरची स्थापना, नैतिक पुनरूत्थान चळवळीचा इतिहास, ही चळवळ सुरू करणारे फ्रँक बुचमन, भारतात ही चळवळ रूजविणारे राजमोहन गांधी, संपूर्ण भारतातून हे केंद्र सुरू करण्यासाठी पाचगणीची केलेली निवड, या सेंटरच्या वैशिष्ट्यपूर्ण असणाऱ्या इमारती, या केंद्रातून चालणारे उपक्रम, आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदा, देशो–देशीतील संघर्ष मिटविण्यासाठी केलेले प्रयत्न, त्याच्या बैठका यांच्यावर प्रकाश टाकला आहे.

नैतिक पुनरूत्थान चळवळीचे सर्वात सोपे सूत्र म्हणजे जग बदलण्याची भाषा करताना प्रथम स्वत:मध्ये बदल करा, मग समाज बदलेल. समाज बदलला की जग बदलेल. त्यामुळे कोणत्याही परिवर्तनाची सुरूवात ही स्वत:पासून सुरू करा. हा मोलाचा संदेश इथून दिला जातो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील जगातील युद्धजन्य परिस्थितीतून बाहेर

काढण्यासाठी सुरू केलेली ही चळवळ, आज काळानुसार व परिस्थितीनुसार बदल स्वत:मध्येही केलेला दिसून येतो. त्यामुळे या चळवळीचे आजचे बदलते स्वरूप त्याचे 'पाऊल परिवर्तनाचे', I of C मध्ये झालेले रूपांतर, याच चळवळीची दुसरी शाखा म्हणजे ग्रामपरी योजना, त्याची कार्ये, त्यांची उद्दिष्टे व त्यांनी समाजाला दिलेले योगदान याचा आढावा घेण्यात आला आहे. पाचगणीच्या सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणारे विद्यार्थी ग्रंथालय, पाचगणी क्लब, निर्भिड प्रतिष्ठान मंडळ, जिव्हाळा ज्येष्ठ नागरिक संघ, गणेश मंडळ या विविध मंडळामार्फत चालणारे उपक्रम, सामाजिक कार्य याचा अभ्यास केला आहे. एकंदर प्रस्तुत प्रकरणात पाचगणीच्या सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थांचा सविस्तर अभ्यास केला आहे.

प्रकरण सातवे : उपसंहार.

या सातव्या प्रकरणात एक ते सहा प्रकरणांच्या आधारावर संपूर्ण संशोधन प्रबंधातील अभ्यास घटकांचे साररूप मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये पाचगणीचा शोध, त्याची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी, भौगोलिक घटकांचा या शहराला झालेला फायदा, गिरिस्थान नगरपालिकेतर्फे शहराची झालेली विकासाभिमुख कामे व नगरपालिकेच्या समस्या, शहराच्या विकासातील योगदान, डेहराडूनच्या धर्तीवर ब्रिटीश कालखंडातील सुरू झालेल्या पब्लिक स्कूल्स, या शाळांच्यामुळे पाचगणीच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक घटकांवर झालेले परिणाम, पाचगणीच्या शैक्षणिक गुणवत्तेचा स्थानिक समाज जीवनावर पडलेला प्रभाव, पाचगणीच्या सृष्टीसौंदर्याचा पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात झालेला फायदा, त्यातून स्थानिक व संपूर्ण भागाचा झालेला कायापालट, पर्यटकांच्यामुळे वाढणारे प्रदूषण, निसर्गाची होणारी हानी, स्थानिक संस्कृतीवर होणारे काही दुष्परिणाम, बेल एकर सॅनिटोरियम व एम. आर. ए. सेंटरचे योगदान, या सर्व घटकांचा एकंदर पाचगणीच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या झालेले परिणाम, त्याचे फायदे-तोटे, पाचगणीचे असणारे महत्त्व व वेगळेपण त्याचबरोबर वाढत्या पर्यावरणाच्या ऱ्हासाला व चंगळवादाला वेळीच आवर घालण्याची गरज, नैसर्गिक सृष्टीसौंदर्याने संपन्न असणाऱ्या या प्रदेशाचे जतन करणे यासाठी स्थानिक लोकांच्याबरोबर, व्यवसायिक, उद्योगपती, पर्यटक या सर्वांची जबाबदार महत्त्वाची ठरते, याचा परामर्श घेतला आहे.

संदर्भ सूची :

१. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. क्र.

२. Irina Chelyshera, The Blue Mountain of Panchgani, Nirman Impress Pvt. Ltd., Bombay, 2001. P. no. 24.

३. Panchgani, The Crown Elecxtric, Printing Press, Govt. of Bombay, P. No. 27.

४. दै. सकाळ, १० एप्रिल २०११.

५. सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल, Diamond Jubilee Year १९६५, स्मरणिका.

६. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ७८८.

७. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद सिटी प्लॅन सर्वे रेकॉर्ड २०१०–११.

८. डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००५, पृ. क्र. २३९.

९. डॉ. नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८७, पृ. क्र. ३३.

१०. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, कार्यालयीन अध्यक्षांची नामावली फलक.

११. देव प्रभाकर, इतिहास शास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, २००७, पृ. क्र. १८९.

१२. डॉ. संत दु. का., संशोधन पद्धती, उपरोक्त, पृ. क्र. ३२.

१३. कित्ता.

१४. कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. क्र. ७६.

१५. कित्ता, पृ. क्र. ७७.

१६. डॉ. नाडगोंडे गुरूनाथ, उपरोक्त, पृ. क्र. ५८.

१७. डॉ. कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. क्र. ७४.

१८. नैतिक पुनरूत्थान केंद्र (MRA Center), पाचगणी,माहितीपत्रक २००९–१०.

१९. डॉ. नाडगोंडे गुरूनाथ, उपरोक्त, पृ. क्र. १९६.

प्रकरण २ रे

पाचगणी :

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती

प्रकरण २ रे

पाचगणी : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती

२.१ सातारची ऐतिहासिक पार्श्वभूमी व महाबळेश्वरची वसाहत

२.२ पाचगणीचा शोध

२.२.१ पाचगणीचे भौगोलिक स्थान

२.२.२ पाचगणी नावाची उत्पत्ती

२.२.३ भौगोलिक परिस्थिती

२.२.४ पाचगणीपासून विविध शहरांचे अंतर

२.२.५ हवामान

२.२.६ पाचगणी पठारावरील वनस्पती व प्राणी

२.२.७ पिके, भाजीपाला, फळे

२.२.८ शहराची लोकसंख्या

२.२.९ भाषा

२.२.१० साक्षरता

२.३ सामाजिक स्थिती

२.४ पाचगणीच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्ती

२.४.१ ह. भ. प. दत्त्रात्रेय महाराज कळंबे

२.४.२ भि. दा. भिलारे गुरूजी



सातारा जिल्हा नकाशा (इ. स. १८८५)

सौजन्य : Gazetteer of the Bombay Presidency, (1885) Satara District, Volume XIX

सातारचे शिल्पकार व महाबळेश्वर विकासात योगदान
श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराज (१८१८-१८३९)
सौजन्य : **Mahabaleshwar : TheClub** या पुस्तकातून

सर एच. बॅटल ई. फ्रायर
मुंबई प्रांताचे गव्हर्नर व पाचगणी विकासासाठी योगदान
सौजन्य : **Mahabaleshwar : TheClub (1881-1981)** या पुस्तकातून

प्रकरण २ रे

पाचगणी : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सामाजिक स्थिती

मानव वसाहत निर्मिती प्रक्रियेची सुरूवात ही मानवी स्थैर्य, प्रगती आणि विकासाच्या पायाभरणीने होते. जीवनावश्यक घटकांची अनुकूलता हा महत्त्वाचा निकष, वसाहत, खेडी, छोटी–मोठी शहरे यांच्या वाढीचा वेग लक्षात घेता, प्रत्येक घटकाच्या निर्मितीचा इतिहास हा वेगळेपणाने सामोरे येईल. भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि विस्ताराने मोठ्या असणाऱ्या देशात तर प्रत्येक गाव हे स्वत:ची ऐतिहासिक परंपरा मिरविणारे आणि अभिमान बाळगणारे आहे. त्यापैकी काही ठिकाणे विशिष्ट गुणांमुळे, वैशिष्ट्यामुळे नावारूपाला आलेली आहेत आणि त्याचा अभ्यासही विविध अंगाने झाला आहे. याबाबत काशी, बनारस, दिल्ली, मुंबई, पुणे इ. शहरांचे नामोल्लेख करता येतात. याशिवाय असणारी शहरे की जी त्याच्या आसपासच्या परिसरावर प्रभाव टाकणारी आहेत. तसेच ब्रिटीशकाळात ब्रिटीश अधिकाऱ्यांनी जी पर्वतीय प्रदेशावर, विशेषत: नैसर्गिकदृष्ट्या सुंदर व थंड हवेच्या ठिकाणांचा शोध घेऊन विश्रांतीसाठी व राहाण्यासाठी जी शहरे वसविली ती शहरे पुढे पर्यटन व शैक्षणिक दृष्टीने नावारूपाला आलेली आहेत. अशा शहरांचा अभ्यास प्रादेशिक इतिहास संशोधनात मोलाची भर घालतील.

त्याचबरोबर या प्रदेशातील समाजाची घडण, जीवनप्रणाली, त्यांच्या चालीरिती, रूढीपरंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा, समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्यांचे स्वरूप, निर्वाहाची साधने, उद्योग, करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, विचारप्रणाली, सामाजिक संस्था तसेच सामाजिक स्थित्यंतरे याचा अभ्यासही सामाजिक इतिहासात महत्त्वाचा ठरतो. त्याच दृष्टीने पाचगणी शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.


DHOME-DAM
(KRISHNA RIVER)
SAHYADRI
BOAT CLUB
WONDER
MAHABALESHWAR
SYDNEY POINT
TO WAI, PUE
Moral Rearmament
Training center (MRA)
TO DINDEGHAR
Dawn
Academy
WONDER POINT
PARSI POINT
MAHABALSHWAR
BHILAR WATER FALL
CAVE
TABLE LAND
Post
Office
Police
Station
Bus
Stop
Vidya
Niketan
Panchgani
Club
Dr.Bilmoria
Sani Torium
BHIM CHULA
(DEVILS KITCHEN)
TO AMBRAL
PANCHGANI TOWN MAP
NOTE : THE ABOVE MAP IS A GRAPHICAL REPRESNTATION AND NOT ACCURATE AS PER SCALE
MUMBAI
PRATAPGAD
MAHABALSHWAR
PANCHGANI
WAI
PUNE
MUMBAI
219 Kms.
28 Kms.
18 Kms.
14 Kms.
88 Kms.
170 Kms.

पाचगणी हे एक अनोखे ठिकाण सर्व जगभर फिरून आलेल्या फिरस्त्यांच्या मनातही स्वत:च वेगळे स्थान कायम टिकवणार. इथे कितीदा आले तरी मन तृप्त न होता पुन्हा पुन्हा यावेसे वाटते कारण इथला अनोखा निसर्ग. आकाशाशी स्पर्धा करणारे सिल्वर वृक्ष, सदाहरित फर अशा विविध वृक्षांनी बहरलेले शहर. या शहराला ऐतिहासिक वारसा हा पांडवकालीन मानला जातो. परंतु छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याचा विस्तार याच जावळी खोऱ्यापासून झाल्याने शिवकालीन गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारा प्रदेश म्हणून ओळखला जातो. नैसर्गिक व ऐतिहासिकदृष्ट्या समृद्ध असणाऱ्या प्रदेशाची खरी ओळख झाली ती ब्रिटीश काळात. इ. स. १८२४ मध्ये प्रथम पीटर लॅडविक याने महाबळेश्वरचा शोध लावला व त्यानंतर इ. स. १८५४ मध्ये जॉन चेसन याने पाचगणी हे युरोपियन लोकांना राहाण्यायोग्य ठिकाण असल्याचे निदर्शनास आणले. तेव्हापासून ही दोन शहरे महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणे म्हणून प्रसिद्धीस आली.

पाचगणीत ब्रिटीशांच्या आगमनासोबत या सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात विखुरलेला स्थानिक समाजही एकत्र झाला. वसाहत निर्माण होत असताना इथे शैक्षणिक विकास मोठ्या प्रमाणात घडून आला. प्रत्येक समाजाची शाळा इथे सुरू झाली. त्यामुळे पाचगणी हे शहर साऱ्या जगाची छोटी प्रतिकृती समजली जाऊ लागली. जगातील अनेक जातीजमातीचे लोक इथे राहात असले तरी इथे कधी जातीय तेढ निर्माण झालेली नाही. त्यामुळे सर्वधर्मसमभवाचे पाचगणी हे आदर्श उदाहरण ठरते. या गावची ग्रामदेवता ही श्री घाटजाई, तिच्या उत्सवात सर्वजण सामिल होतात, तेव्हा गावचे गावपण पहायला मिळते. तसेच भारताच्या प्रजासत्ताकदिनी पाच हजारहून अधिक विद्यार्थी एकत्र सहभागी होतात तेव्हा भारतीय एकात्मकता येथे दिसून येते. या शहराच्या विकासात ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे व भि. दा. भिलारे गुरूजी यांचे मोठे योगदान आहे. अशा या शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहणे व सामाजिक स्थितीचा आढावा घेणे प्रादेशिक इतिहासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. पाचगणीचा ऐतिहासिक व सामाजिक दृष्टीने संशोधन करताना जुन्या ऐतिहासिक ग्रंथासोबत, काही पुराणकथा, दंतकथा यांचा आधार, ब्रिटीशकालीन कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी

पुराभिलेखा विभाग, शासकीय कागदपत्रे, याशिवाय समकालीन व्यक्तींचा खाजगी पत्रव्यवहार, साहित्य, मंदिरे, स्थापत्य, मुलाखती इत्यादी संदर्भ साधनांचा उपयोग केला गेला आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील महाबळेश्वर, पाचगणी ही जुळी शहरे सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे म्हणून ओळखली जातात. सातारा जिल्हा हा ब्रिटीशकालीन एक संस्थान म्हणून ओळखला जात असले तरी या सातारा जिल्ह्याला प्राचीन वैभवशाली इतिहास आहे.

२.१ सातारची ऐतिहासिक पार्श्वभूमी :

सातारा ही हिंदवी स्वराज्यची राजधानी, संतमहात्म्यांची भूमी, समाजसुधारकांची कर्मभूमी, क्रांतिकारकांची भूमी त्याचबरोबर राजकीय नेतृत्वाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. सातारा जिल्ह्याला प्राचीन इतिहास आहे. सातारा हा सातवाहन, शक, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार आणि देवगिरीचे यादव या राज्यांचा एक भाग होता. त्यानंतर पुढे बहामनी सत्ता स्थापन झाली.[१]

छत्रपती शिवाजी राजांच्या स्वराज्यात सातारा ठामपणे सामील झाला. छत्रपती शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यावर ओढवलेल्या संकटात सर्व मराठ्यांनी साथ दिली. तेव्हा ताराबाईच्या नेतृत्वाखाली सातारा मराठ्यांच्या हालचालीचे केंद्रस्थान बनले.[२]

सन १७०७ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांनी सातारा ही मराठ्यांची राजधानी बनवली. इ. स. १७०७ ते इ. स. १७४९ या काळात सातारा हे राष्ट्रीय राजकारणाच माहेरघर बनले.[३] राजधानी म्हणून साताराने साम्राज्याचा डामडौल आणि वैभव अनुभवले. इ. स. १८१८ ला मराठी राज्य ब्रिटीशांच्या ताब्यात गेले. तत्पूर्वी सन १८०८ मध्ये सातारा प्रांताचा राजा म्हणून प्रतापसिंह महाराजांना गादीवर बसविले. प्रतापसिंह महाराजांनी साताराला पुन्हा सत्तेचे केंद्र बनविले. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या सहकार्याने साताऱ्याची उभारणी केली. छत्रपती प्रतापसिंहाबद्दल मुंबई प्रांताचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने इ. स. १८२२ साली सातारा भेटीवर आलेले असताना पुढीलप्रमाणे उद्‌गार काढले, "He is the most civilised Maratha I ever met, has his countrty in excellent order, and everything to his roads and aqueducts in a style that would credit a European."[४]

महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण असलेले महाबळेश्वर हे गिरिस्थान म्हणून विकसित करण्याचे श्रेय साताराचा रेसिडेंट कर्नल पी. लॉडविक यांच्याबरोबर सातारच्या प्रतापसिंह महाराजांनाही द्यावे लागते.

सातारा संस्थानचा कारभार ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरू असताना प्रतापसिंह महाराजांनी सत्तेचा उपयोग सामाजिक हितासाठी करून घेतला व अनेक समाज उपयोगी कामे केली. त्यातीलच एक महत्त्वाचे म्हणजे महाबळेश्वरसारखे थंड हवेचे ठिकाण वसविले. सातारा संस्थानसाठी ब्रिटीश रेसिडेंटची नियुक्ती करण्यात आली. इ. स. १८२३ ते इ. स. १८२६ ह्या काळात सातारचे रेसिडेंट असणारे कर्नल जॉन ब्रिग्ज यांनी श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह महाराजांकडून महाबळेश्वरसारख्या निसर्गरम्य परिसराची माहिती ऐकली होती. त्यानुसार या परिसराची पाहणी करण्यासाठी ब्रिटीश सैन्य तुकडीचे प्रमुख मेजर पीटर लॉडविक यांना पाठविले. मेजर लॉडविक व त्यांचे काही सहकारी १ एप्रिल १८२४ ते ३० मे १८२४ पर्यंत महाबळेश्वरच्या परिसरात वास्तव्य करून या भागातील निसर्गसौंदर्य, पर्वतरांगा, हवामान याविषयची माहिती 'बॉम्बे कुरिअर' मध्ये प्रसिद्ध केली.[५] त्यानंतर कर्नल ब्रिग्ज यांनी इ. स. १८२५ मध्ये महाबळेश्वरला भेट दिली.

इ. स. १८२७ च्या नोव्हेंबरमध्ये मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणून सर जॉन माल्कम हजर झाला. एप्रिल १८२७ मध्ये त्याने महाबळेश्वरला भेट दिली. इ. स. १८२८ मध्ये इथे सॅनिटोरियम बांधण्याचा प्रस्ताव सातारच्या राजापुढे मांडला. तसेच महाबळेश्वर या प्रदेशाच्या बदल्यात ब्रिटीशांच्या ताब्यातील खंडाळा हे गाव सातारच्या राजाला देऊन महाबळेश्वर ब्रिटीशांनी आपल्या ताब्यात घेतला आणि महाबळेश्वरमध्ये ब्रिटीशांसाठी नवीन वसाहत निर्माण केली. ह्या वसाहतीला नाव दिले माल्कम पेठ. या वसाहतीमध्ये विल्सन पॉईंट शेजारी गव्हर्नर सर जॉन माल्कम यांच्यासाठी सिंदोला पार्क येथे पहिली इमारत बांधली. आजही हा बंगला उत्कृष्ट अवस्थेत असून सध्या हा बंगला मिरज संस्थानचे श्री. पटवर्धन (थोरली पाती) यांच्या मालकीचा आहे.[६] त्यानंतर या वसाहतीमध्ये दुसरा बंगला प्रतापसिंह महाराजांनी

स्वत:साठी बांधला. हा बंगला होता डेरीयाचा माळ येथे. सध्या तो बंगला अस्तित्वात नाही. या माळावर अठरा होल्सचे गोल्फ कोर्ट आहे.

अशा प्रकारे महाबळेश्वरमध्ये वसाहत वाढत गेली. परंतु माल्कमच्या आधी या परिसराला भेट देणारा युरोपियन अधिकारी होता सर चार्ल्स मॅलेट व त्याच्या सोबत मेजर प्राईस हा होता. सर चार्लस मॅलेट १४ ऑक्टोबर १७९१ या दिवशी पेशवे श्रीमंत सवाई माधवराव यांच्यासोबत क्षेत्र महाबळेश्वर येथे दर बारा वर्षांनी भरणाऱ्या कन्यागत या पर्वासाठी (दर बारा वर्षांनी भागिरथी कृष्णेच्या भेटीला अवतीर्ण होते व अश्विन वद्य तृतीयेला कन्यागत साजरे केले जाते) उपस्थित होता.[७] त्यामुळे महाबळेश्वर भागाला भेट देणारा पहिला युरोपियन हा चार्लस मॅलेट होय. परंतु इ. स. १७९१ ते १८२४ पर्यंत या प्रदेशाकडे ब्रिटीशांनी लक्ष दिले नव्हते. त्यामुळे इ. स. १८२४ मध्ये येणारा पीटर लॅडवीक यालाच महाबळेश्वरचा संस्थापक मानले जाते. त्यानंतर या प्रदेशाला अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यांनी भेट दिली.

या काळात महाबळेश्वरला येण्याचा मार्ग हा मुंबई–बाणकोट समुद्रमार्गे, बाणकोट–महाड सावित्री नदीतून यावे लागे. तेथून नागोठण्यापर्यंत छोट्या नावेने येत. त्यानंतर इंदापूर–दासगाव–महाड–पोलादपूर मार्गे मजल दरमजल करीत विश्रांती घेत कमीत कमी ४८ तास प्रवास करून महाबळेश्वरला पोहचत असे. पुण्यावरून मेढामार्गे घोड्यावरून सहा तासात पोहचता येत असे.[८]

महाबळेश्वरला वसाहत ब्रिटीश राज्यकर्त्यांनी केल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ व्यापारी, पारशी, हिंदू, संस्थानिक, जहागिरदार आले व उच्चभ्रू लोकांसाठी हे थंड हवेचे व विश्रांतीचे ठिकाण बनले. बॉम्बे प्रॉव्हिन्सची उन्हाळी राजधानी बनली. या शहराचा कारभार पाहण्यासाठी इ. स. १८६७ साली गिरिस्थान नगरपालिका स्थापन झाली.

महाबळेश्वर हे इ. स. १८२८ मध्ये ब्रिटीशांनी वसविले असले तरी या प्रदेशाला प्राचीन इतिहास आहे. महाबळेश्वर येथे उगम पावणाऱ्या कृष्णा नदीचा उल्लेख खारवलेच्या हाथीगुंफा शिलालेखात कन्हवेन्ना असा आहे.[९] तर महाबळेश्वरच्या आरण्याला ब्रह्मारण्य असे पुरातन नाव आढळते. यानंतर महाबळेश्वरचा उल्लेख यादव काळापासून मिळतो. क्षेत्र

महाबळेश्वर येथील महादेवाचे मंदिर यादववंशीय राजा सिंघनदेव याने इ. स. १५२५ मध्ये बांधल्याचा उल्लेख आढळतो.[१०] नंतरच्या काळात या मंदिराची दुरुस्ती जावळीचा जहागिरदार चंद्रराव मोरे, छत्रपती शिवाजी महाराज व शाहू महाराज यांनी केली. ६ जानेवारी १६६५ रोजी (पौष वद्य २०, शके १५८६) सूर्यग्रहणाचा योग असताना दानधर्म करण्यासाठी जिजाबाई व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला या मंदिरात करण्यात आली होती.[११] याचा संदर्भ वेगवेगळ्या ऐतिहासिक ग्रंथातून व महाबळेश्वरच्या मंदिरातून मिळतो. छत्रपती शिवाजीराजांच्या नंतरही श्रीमंत सवाई माधवराव यांनी भेट दिल्याचा उल्लेख पेशवे दप्तरातून मिळतो. त्यानंतर आधुनिक काळात ब्रिटीशांनी या निसर्गसौंदर्य प्रदेशाचा वापर स्वत:च्या निवासासाठी करून घेतला. तेव्हापासून हे शहर महाराष्ट्रातील एक थंड हवेचे ठिकाण म्हणून उदयाला आले.

२.२ पाचगणीचा शोध :

महाबळेश्वरला येणारा पहिला युरोपीयन हा पिटर लॉडविक तर पाचगणीला येणारा पहिला युरोपीयन हा जॉन चेसन. जॉन चेसन हा ईस्ट इंडिया कंपनीतील रिटायर्ड वॉरंट ऑफिसर होता. पश्चिम घाट रांगेत ब्रिटीश लोकांच्या वसतीसाठी महाबळेश्वर व्यतिरिक्त नवीन जागा शोधून काढण्याच्या उद्देशाने तो या प्रदेशाची पाहणी करत होता. तसेच युरोपीयन लोकांना राहाण्यासाठी ही जागा कितपत योग्य आहे याची शहानिशा करणे व बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये राहणाऱ्या युरोपीयन मुलांच्यासाठी थंड हवेच्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी योग्य ठिकाणाची पाहणी करणे अशा दुहेरी उद्देशाने हा जॉन चेसन इ. स. १८५० मध्ये प्रथम या प्रदेशाला भेट दिली.[१२] नवीन प्रदेशाचा शोध घेताना पाच टेकड्यांच्यामध्ये वसलले एक सपाटीचा प्रदेश त्याला योग्य वाटला व त्या जागेची वसाहत करण्यासाठी योग्य ठिकाण म्हणून निवड केली व त्यानंतर तो इ. स. १८५४ मध्ये या प्रदेशात वसाहत करण्यासाठी आला. पाच टेकड्यांच्यामध्ये वसलेल्या या प्रदेशाला त्याने नाव दिले पाचगणी. येथे पोहचण्यासाठी त्याला पुणे ते वाठार स्टेशन येथून तो बावधन मार्गे

गोडवली या ठिकाणी आला. गोडवली ते पाचगणी हा केवळ दोन कि. मी. अंतराचा प्रदेश. हा सारा प्रवास चेसन याने घोड्यावरून केला.[१३]

जॉन चेसन इ. स.१८५४ मध्ये जेव्हा पाचगणीत आता तेव्हा त्याच्या सोबत त्याचा एक पारशी मित्र मेहेरवानजी मोठाभाई मिस्त्री हा होता. या दोघांनी मिळून या परिसरात शेती करण्यास सुरुवात केली. या हवामानात कोणत्या पिकांची लागवड करू शकतो याचा प्रयोग त्यांनी केला. त्यामध्ये त्याने फ्रान्समधून पाईन वृक्ष, ऑस्ट्रेलियामधून बटाटा, बोस्टनहून द्राक्षे, आसाममधून चहा आणि उटकमंडहून शिंकोना इ. आणलेल्या झाडांची लागवड केली.

या परिसरात येणाऱ्या पिकांचे निरीक्षण करून त्याने निष्कर्ष काढला की पाचगणीचे हवामान शेतीसाठी (cultivation) व फळांसाठी उपयुक्त आहे. युरोपीयन लोकांच्या आरोग्यासाठी उत्तम आहे. त्यानंतर त्याने इ. स. १८६२ मध्ये युरोपीयन लोकांसाठी रु.२००० खर्च करून पत्र्याच्या छताची सहा घरे बांधली. प्रथम २४ युरोपीयन या प्रदेशात राहाण्यास आले.[१४] त्यानंतर इतर युरोपीयन पाचगणीकडे आकर्षित झाले.

इ. स. १८६३ मध्ये सर ब्रार्टेल फ्रेअर मुंबई प्रांताचा गव्हर्नर, याने जॉन चेसनला पाचगणीचा सुपरिडेंट व मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्त केले. तसेच पाचगणीला त्याने Hill Sanatorium म्हणून घोषीत केले. हा जॉन चेसन न्यू एरा स्कूलच्या आवारामध्ये राहात होता. चेसनचा हा बंगला पाचगणीतील पहिला बंगला होय.[१५] पाचगणीत लोकांची वस्ती वाढू लागली. तेव्हा स्थानिक लोकांच्या मुलांसाठी इ. स. १८८५ साली प्रथम लोकल बोर्डातर्फे प्राथमिक मराठी शाळा सुरू केली. त्यानंतर ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मुलांसाठी, नोकर वर्गाच्या मुलासाठी निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. या शाळा केंब्रीज विद्यापीठ संलग्न ठेवल्या व आंतरराष्ट्रीय किर्तीच्या शाळा कशा राहतील याची काळजी चेसननी घेतली. त्यानंतर पाचगणी शहराला खास बाब म्हणून गिरिस्थान नगरपालिकेचा दर्जा इ. स. १९१० साली देण्यात आला. त्यापूर्वी या शहराचा कारभार महाबळेश्वरच्या शासन नियुक्त अधिकाऱ्यांकडून केला जात होता. पाचगणीचा विकास घडवून आणाणाऱ्या जॉन चेसनचा मृत्यू इ. स. १९२१ मध्ये झाला. त्याचे दफन पाचगणी येथे सेंट पीटर चर्चच्या आवारात करण्यात

आले आहे. अशा प्रकारे नवीन वसाहत निर्माण झालेल्या पाचगणीची भौगोलिक परिस्थिती पुढीलप्रमाणे :

२.२.१ पाचगणीचे भौगोलिक स्थान :

पाचगणी हे शहर १४°५५ उत्तर, ७३°४५ पूर्व रेखांशांवर विस्तारले आहे. हे शहर सातारा जिल्ह्यातील वाई महाबळेश्वर मार्गावर वाईच्या पश्चिमेस १२ कि. मी. सह्याद्रीच्या पूर्व–पश्चिम शृगांच्या वातविमुख उतारावर वसले आहे. येथील भूस्तर रचना दख्खनच्या पठाराप्रमाणे ज्वालामुखी प्रकारची असून जमीन मुख्यत: लोहमिश्रित तांबडी आहे.

येथील किमान व कमाल तापमान अनुक्रमे १६° सें. ग्रे. व ३१.१° सें. ग्रे. असते. वार्षिक सरासरी पर्जन्य १८०.६ सें. मी. असून पार्श्वभागी असणाऱ्या विस्तीर्ण टेबल लँडमुळे पूर्वेकडील वाऱ्यापासून पाचगणीचे रक्षण होते.[१६] या शहराचे क्षेत्रफळ ६.८६ कि. मी. म्हणजे ६८६७.०० हेक्टर क्षेत्र इतके आहे.[१७] या शहराची समुद्रसपाटीपासून उंची १,३४४.४० मी. इतकी आहे. हे शहर महाबळेश्वरपेक्षा ६०.९६ मी. कमी उंचीवर आहे. पाचगणी शहरातील सर्वात उंच ठिकाण टेबल लँडचे पठार आहे. हे आशिया खंडातील दोन नंबरचे पठार म्हणून ओळखले जाते.[१८]

२.२.२ नावाची उत्पत्ती :

पश्चिम महाराष्ट्रातील महाबळेश्वर पाचगणी ही दोन थंड हवेची ठिकाणे म्हणून आज देशभर परिचित आहेत. त्यापैकी महाबळेश्वर या शहराच्या नावाच्या उत्पत्ती संदर्भात अनेक पुरावे १२ व्या, १३ व्या शतकापासून सापडतात. परंतु या महाबळेश्वरपासून अवघ्या १८ कि. मी. अंतरावर असणाऱ्या पाचगणी नावाच्या उत्पत्ती संदर्भातील साधने १९ व्या शतकापासून सापडतात. त्यामुळे पाचगणी हे शहर ब्रिटीशकालीन वसविलेले शहर म्हणूनच ओळखले जाते. असे असले तरी या शहराच्या नावाच्या उत्पत्तीचा संदर्भ पांडवकाल ते येथील भौगोलिक रचनेवरून सापडतात.

पाचगणी हा शब्द संस्कृतमधील दोन शब्दापासून बनला आहे. पाच आणि गणी म्हणजे युद्धातील पाच गण. पाच (पंच) गणांचे (पांडवाच्या सेनानायकाचे) ठिकाण. पंचगणी

पंचांना गणांना समूह. 'पंचगणी' या गावाचे मूळ सापडते ते पंच आणि गणी या रितीने. म्हणजेच पंच या संस्कृत शब्दाचा अर्थ पाच आणि गणी याचा अर्थ सैन्याची छावणी. म्हणून पंचगणी या शब्दाचा स्पष्ट अर्थ पाच योद्धांची छावणी असाच होतो.[१९]

पंचगणी या गावाच्या नावाच्या उत्पत्ती संदर्भात जी दंतकथा सांगितली जाते की ही जागा पाच योद्ध्यांना जहागिरीच्या स्वरुपात देण्यात आली होती. ज्यांनी कुरुक्षेत्राच्या युद्धामध्ये पांडवांच्या खांद्याला खांदा लावून आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली होती. याची साक्ष म्हणून आजही या परिसरात पाच खेडी ज्याच्या नावाचा शेवट गणी असा होतो. ती पाच खेडी म्हणजे – आखेगणी, माडेगणी, पाचगणी, नानगणी इ.[२०]

पाचगणीच्या आसपासच्या प्रदेशातील गावाच्या नावांवरून पाचगणी हे नाव पडले असावे असा तर्क मांडला जातो. पंचगणी – पंच – पाच , गण – योध्दे, पाच योध्दे यांना मिळालेली जहागिरी, दांडेघर – दंडगृह, गुरेघर – गुरगृह, गोडवली – गौड – वली, काटवली – काष्ट – वल्ली, दानवली – दान – वल्ली, नानगणी– न – अन्य – गणी (पराक्रमी योध्दे) त्यांच्यासारखे दुसरे नाही, आखेगणी – अख – गणी, माडेगणी, वाई – विराट नगरी, किचक टेकडी – भिमाने किचकला जेथे मारले ते ठिकाण, मांढरदेव – अज्ञातवासात असताना अर्जुन रोज मांढरदेवीची पूजा करीत असे. नमस्ते सिध्द सेनानी, पांडवगड – जिथे पांडव राहत होते तो गड.[२१]

पाचगणी पठारासारखी इतर चार पठारे आहेत म्हणून पाचगणी असे नाव पडले. ती पठारे पुढीलप्रमाणे – पाचगणीचे पठार (टेबललँड), गोडवली – दांडेघरचे पठार, खिंगरचे पठार, आंब्रळ – राजपूरीचे पठार, भिलारचे पठार.[२२]

ब्रिटीशांनी गावाचा विस्तार करताना आसपासच्या खेड्यांचाही समावेश वसाहतीसाठी केला. त्यावरून या प्रदेशाला पाचगणी हे नाव दिले असावे, ती पाच खेडी म्हणजे गोडवली, दांडेघर, खिंगर, आंब्रळ, तायघाट. या पाच गावाच्यामध्ये असणारे हे गाव म्हणून पाचगणी असे नाव जॉन चेसनने दिले.[२३] म्हणजेच पाचगणी हे नाव – पाच गण, पाच टेकड्या, पाच पठारे व पाच गावे यावरून पाचगणी हे नाव पडले असावे.

२.२.३ भूप्रदेश / भौगोलिक परिस्थिती :

पाचगणी–महाबळेश्वर पठाराच्या चहुबाजूंनी नद्यांची खोरी, उंच डोंगराच्या सुळक्यांचा प्रदेश ही या प्रदेशाची विशेषता आहे. या पठाराच्या पश्चिम व नैऋत्येकडील कोयना नदीचे खोरे आणि उत्तरेकडील कृष्णेचे विशाल खोरे हेही एक वैशिष्ट्य आहे. या दोन विशाल खोऱ्यामुळे या गिरिस्थानाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. टेबल लॅडमुळे पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यापासूनच पाचगणीचे रक्षण होते. पाचगणीच्या या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे इथले वातावरण क्षयरोगी व दमेकऱ्यांसाठी उपयुक्त असल्याने ब्रिटीशांनी हे शहर आरोग्यधाम म्हणून घोषित केले होते.[२४] तसेच मुंबई प्रांतातील आरोग्यासाठी व राहाण्यासाठी तीन नंबरचे शहर म्हणून पाचगणीला मान्यता दिली होती.

पाचगणीच्या डोंगर रांगा या लाव्हा रसापासून तयार झालेल्या काळ्या अग्निजन्य ज्वालामुखी खडकांनी व्यापल्या आहेत. हा खडक थरांच्या स्वरुपात आढळतो. भूशास्त्रीय भाषेत त्यांना डेक्कन ट्रॅप असे म्हणतात. (ट्रॅप म्हणजे पायरी या अर्थाने) या डोंगररांगा अधिक उभट व भक्कम आहेत. याच डोंगर उतारावर इथला शेतकरी कमी कड्याच्या व कमी उताराच्या जमिनीवर हेनीश किंवा इटालियन पद्धतीप्रमाणे आडव्या दगडी भिंती बांधून जमिनीची झीज थांबवून पायऱ्या पायऱ्यांनी मजगी शेती करतो.[२५] पाचगणीच्या भूप्रदेश वैशिष्ट्यामुळे इथले निसर्गसौंदर्य हे ऋतूपरत्वे बदलत असते. येथील सौंदर्य नैऋत्य मान्सून ओसरल्यानंतर म्हणजे सप्टेंबर, आक्टोबर मध्ये सर्वाधिक बहरलेले असते.

२.२.४ पाचगणी पासून विविध शहराचे अंतर :

पाचगणी हे शहर महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहराशी जोडले गेले आहे. तसेच या शहराला वेगवेगळ्या मार्गाने पोहचता येते. आज हे शहर राष्ट्रीय महामार्ग नं. ४ पासून अवघ्या २० कि. मी. अंतरावर आहे. या शहराला सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन हे वाठार रेल्वे स्टेशन आहे. दुसरे जवळचे रेल्वे स्टेशन हे पुणे आहे. जवळचे विमानतळ पुणे व मुंबई आहे. येथून पाचगणीस पोहचू शकतो. पाचगणी व इतर शहराचे अंतर पुढीलप्रमाणे[२६] –

१.	पाचगणी ते पुणे	–	१०० कि. मी.
२.	पाचगणी ते मुंबई	–	२६९ कि. मी. १६७ मैल
३.	पाचगणी ते वाई	–	१२ कि. मी.
४.	पाचगणी ते सातारा	–	४२ कि. मी.
५.	पाचगणी ते महाबळेश्वर	–	१९ कि. मी.
६.	पाचगणी ते वाठार	–	४९ कि. मी.
७.	पाचगणी ते महाडमार्गे मुंबई	–	२६६ कि. मी.
८.	पाचगणी ते हुमगाव मार्गे सातारा	–	५१ कि. मी

आज पाचगणी, महाबळेश्वरला जाण्यासाठी दळणवळणाची चांगली सुविधा आहे. परंतु महाबळेश्वरला जेव्हा प्रथम युरोपीयन आले तो काळ होता इ. स. १८२४ चा. या काळात वाहतुकीसाठी कोणत्याही सुविधा नव्हत्या. हे युरोपीयन प्रथम मुंबई प्रांततून या परिसरात आले, तेव्हा ते मुंबई–पुणे मार्गे सातारा येथून केळघर मार्गे दक्षिण पूर्व मार्गे फिटझरगेराल्ड घाटमार्गाने, त्यानंतर दुसरा मार्ग पुणे सातारा रोडवरील सुरुर फाटा या मार्गाने वाई मार्गे पाचगणीच्या उत्तरेला असणारा खडा चढ चढून महाबळेश्वरला यावे लागे. यावेळी हा सारा प्रवास घोड्यावरून, टांगा, बैलगाडी किंवा पायी करावा लागे.[२७]

२.२.५ पाचगणीचे हवामान :

पाचगणीचे हवामान हे अत्यंत अल्हाददायक, उत्साहवर्धक व थंड असल्याने या शहराला बाराही महिने पर्यटक भेट देत असतात. समुद्रसपाटीपासून जसजसे उंच जावे तसतसे हवा थंड होत जाते. पाचगणी हे शहर समुद्रसपाटीपासून ४,३७२ फूट उंचीवर आहे. या शहराचे हवामान थंड व कोरडे असल्याने हे हवामान अतिशय आरोग्यदायी आहे. पावसाळ्यात व हिवाळ्यात दाट धुके पडत नसल्याने हवेत प्राणवायूचे प्रमाण चांगले राहाते. त्यामुळे हे वातावरण क्षयरोगी व दमेकऱ्यांसाठी फलदायी ठरते. महाबळेश्वर समुद्र सपाटीपासून ४,५७८ फूट उंचीवर आहे. म्हणजेच पाचगणीपेक्षा साधारण २०० फूट अधिक

उंचीवर आहे. या शहरातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६,२२६ मि. मी. असते तर पाचगणीचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान खूपच कमी म्हणजे १,८६५ मि. मी. पडतो..

जी गोष्ट पावसाच्या बाबतीत तीच गोष्ट वार्षिक पर्जन्य दिवसांचीही दिसून येते. वार्षिक पर्जन्य दिवसाची सरासरी संख्या महाबळेश्वरला ११८.७ इतकी तर तेच पाचगणीला फक्त ८८ दिवस पाऊस पडतो.[२८]

पाचगणीचे वार्षिक तपमान :

Climate data for Panchgani

Month	Jan	Feb	Mar	Apr	May	Jun	Jul	Aug	Sep	Oct	Nov	Dec	Year
Average High °C (°F)	23.9 (75)	25.1 (77.2)	28.9 (84)	31.2 (88.2)	31.3 (88.3)	24.2 (75.6)	20.7 (69.3)	20.8 (69.4)	21.3 (70.3)	24.7 (76.5)	23.2 (73.8)	23.1 (73.0)	24.87 (77.76)
Average low °C (°F)	9.2 (48.6)	11.3 (52.3)	18.5 (65.3)	19.4 (66.9)	19.7 (67.5)	17.2 (63)	17.1 (62.8)	16.6 (61.9)	16.4 (61.5)	16.0 (60.8)	13.7 (56.7)	12.0 (55.2)	15.67 (60.21)
Precipitation mm (inches)	5.1 (0.161)	1.3 (0.051)	4.8 (0.189)	25.9 (1.02)	43.9 (1.728)	261.1 (10.28)	697.2 (27.449)	404.1 (15.909)	221.5 (8.72)	(126.7) (4.988)	66.0 (2.598)	8.4 (0.331)	1.865 (73.424)

Source : Government of Maharashtra (http://cultural,maharashtra.gov.in/english/gazetteer/SATARA/gen_climate.html)

पाचगणीच्या हवामानाचा अंदाज महाबळेश्वर येथे असलेल्या वेधशाळेतून आकडेवारी उपलब्ध होते. पाचगणी येथे ३ जानेवारी १९९१ साली बर्फ पडले होते. त्यावेळी या शहराचे तापमान शून्य अंश सेल्सिअस या विक्रमी किमान तापमानाची नोंद झाली होती.[२९]

पाचगणीचे हिवाळ्यातील तपमान १२° सेल्सिअस पर्यंत खाली येते तर उन्हाळ्यात हेच तपमान ३४° सेल्सिअस पर्यंत वर पोहचते. पाचगणीचे हवामान सर्वात सुंदर ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये असते. या काळात संपूर्ण टेबललँड हिमकणांनी आच्छादलेले असते. टेबललँडवरील तलाव पूर्ण भरून वाहत असतात. या काळात वाहणारा वारा या पाण्याच्या प्रवाहाला मागे ढकलत असतो तेव्हा जे सुंदर तुषार उडतात त्याला Fairy Fountains म्हणून ओळखले जाते.[३०]

२.२.६ पाचगणी पठारावरील वनस्पती व प्राणी :

पाचगणी हे पश्चिम घाटाच्या पर्वत रांगेच्या प्रदेशात असल्याने हा भूभाग जैविक संपदेचे भांडार म्हणून ओळखले जाते. पश्चिम घाटाच्या पर्वत रांगेत अनेक दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांचे वास्तव्य आढळते. त्यामुळे हा प्रदेश पर्यावरण व जैवविविधतेच्या दृष्टीने अति

संवेदनशील (इकॉलॉजिकल सेन्सिटिव्ह झोन) मानला जातो. या प्रदेशाचा समावेश जगातील हॉट स्पॉट रिजनमध्येही केला गेला आहे. या पश्चिम घाटात अतिसंवेदनशील, दुर्मिळ, स्थानिक, जैविक संपदेचे आश्रयस्थान (Region of indigenous) व नविन प्रजाती निर्मिती केंद्र (Region of procreation) म्हणून ओळखले जाते.[३१]

सह्याद्रीच्या या पर्वतरांगांवरील पाचगणीच्या पठारावर अनेक अल्पजिवी वनस्पती उगवतात. याशिवाय अनेक दुर्मिळ वनस्पती येथे आहेत. त्यामध्ये दुसऱ्या झाडावर उगवणाऱ्या किटकभक्षी वनस्पतीमध्ये युट्रिक्युलारिया, स्ट्रायट्यूला, जमिनीवर उगवणाऱ्या किटकभक्षी वनस्पतीमध्ये युट्रीक्युलारिया, परपरेसिन्स, निम्फोइडस इंडियम (कुमुदिनी) ड्रासेरा, (दवबिंदू) इ. महाराष्ट्राचे राज्यफुल म्हणून मान्यता असलेले जारूळ (लॅगरप्ट्रोमिया रेजिनी) ही वनस्पती येथे आढळते. या फुलाला ताह्याण किंवा मोठा बोंद्रा म्हणूनही ओळखले जाते. त्याशिवाय बाक्रा (भुई कारवी किंवा टोपली कारवी) ही वनस्पतीही आढळते.

या पठारावर गवताच्या अनेक प्रजाती व कंदवर्गीय वनस्पती आढळतात. त्यामध्ये कुसळी, गवत, कोळम, कळकी, रानतेरडे इ. या वनस्पती पश्चिम घाटात वास्तव्य करणाऱ्या शाकाहारी प्राण्यांचे प्रमुख अन्न आहे. टेबललँडचे पठार हे ९९ एकर परिसरात पसरले आहे. या पठारावर गेल्या चाळीस वर्षात वनस्पतीच्या नव्या बारा प्रजातीचा शोध लागला आहे.[३२]

या भूप्रदेशात जसे दुर्मिळ वनस्पती आढळतात तसेच इथे जंगली श्वापदांचा मोठा वावर आहे. महाराष्ट्राचा राज्यप्राणी म्हणून ओळखला जाणारा शेकरू इ. वन्यप्राण्यांचा वावर आहे. पक्ष्यांच्यामध्येही अनेक प्रजाती येथे आढळतात. त्यामुळे पश्चिम घाटाबरोबर पाचगणीचा प्रदेश हा जीवशास्त्रीय, वनस्पतीशास्त्रीय व भौगोलिक तज्ज्ञांना अभ्यास व संशोधनासाठी आव्हान देणारे पठार आहे.

२.२.७ पाचगणी भागातील पिके, भाजीपाला व फळे :

पाचगणी भागातील जमीन ही डोंगर उतारावरील तांबडी व लोहयुक्त आहे. ही जमीन फळबागांच्या लागवडीसाठी विशेष उपयुक्त आहे. ब्रिटीशांनी वसाहत केली तेव्हा त्यांनी प्रथम चहा, कॉफी, सरताळू, नासपती, बटाटे, ब्लॅकबेरी, विलायती मेंदी, स्विट हेलिओलेप इ. ची

लागवड केली.[३३] परंतु त्याचे उत्पादन योग्य पद्धतीने न आल्याने त्यांनी स्ट्रॉबेरीची लागवड केली. या भागातील मुख्य पीक म्हणजे बटाटा. कंदवर्गामध्ये सुरण, लाल मुळा, रताळी, गाजर इ. पीके तर मळ्यामध्ये स्ट्रॉबेरी, मलबेरी, उजबेरी, रासबेरी इ. लागवड केली जाते. भात, नाचणी, गहू, सावा, वरी व बार्ली हे पीकही घेतले जाते.

इथली माती व हवामान हे वेगवेगळ्या वनस्पती, फळे, भाजीपाला पिकविण्यासाठी अनुकूल आहे. त्यामुळे येथे युरोपीयन फळे, भाज्या व वनस्पतींची लागवड योग्य पद्धतीने झालेली आहे.[३४]

२.२.८ पाचगणी शहराची लोकसंख्या :

सन २०११ च्या जनगणनेनुसार पाचगणी शहराची लोकसंख्या ही १४,८९७ इतकी आहे. परंतु पाचगणीचा शोध लावला त्यावेळी इथली लोकसंख्या अत्यंत विरळ असलेली दिसते. युरोपियनांच्या आगमनानंतर इथली लोकसंख्या हळूहळू वाढू लागली. इ. स. १८८१ साली या शहराची लोकसंख्या होती ६३६ त्यापैकी युरोपीयन लोकांची संख्या होती ८१ स्थानिक लोकसंख्या होती ५५५. इ. स. १८९१ साली यात वाढ होऊन शहराची लोकसंख्या झाली ७९९.[३५] इ. स. १९०१ मध्ये लोकसंख्या १३१२ इतकी होती व इ. स. १९११ मध्ये १०४२ इतकी लोकसंख्या वाढली. यापैकी हिंदू ६३०, ख्रिश्चन २७२, मुस्लीम ९२, पारशी ४२ व ज्यू ६ अशी जातनिहाय लोकसंख्या होती.[३६] इ. स. १९१० ला या शहराला गिरिस्थान नगरपालिकेचा दर्जा मिळाला. त्यानंतर या शहराची लोकसंख्या पुढीलप्रमाणे असलेली दिसून येते.

पाचगणी शहराची लोकसंख्या

साल	लोकसंख्या	वाढ
१९२१	२,४५४	–
१९३१	२,९४५	४९१
१९४१	३,६९१	७४८
१९५१	४,५३८	८४७

१९६१	५,७२५	१,१८७
१९७१	६,९०५	१,१८०
१९८१	८,६३५	१,७३०
१९९१	१०,५६९	१,९३४
२००१	१३,२८०	२,७११
२०११	१४,८९७	१,६१७

(संदर्भ – जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ २०११–१२ सातारा जिल्हा)[३७]

या पद्धतीने शहराची लोकसंख्या इ. स. १९५१ पासून वाढत गेलेली दिसते. त्यामध्ये इ.स. १९६१ मध्ये या शहराला पर्यटनाचा दर्जा मिळाला, त्यामुळे पुढील तीन दशकात लोकसंख्येमध्ये वाढ होत गेली. परंतु २०११ मध्ये सरासरी लोकसंख्येत वाढ होण्याऐवजी घट झालेली दिसते. कारण या शहरातील जागेचे भाव वाढले. श्रीमंत लोकांनी मोठ्या प्रमाणात जागा बळकावल्याने सर्वसामान्य लोकांना इथे जागा घेणे व राहणे परवडणारे राहीले नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या शहराच्या हद्दवाढीला वाव नाही. तीन बाजूंना खोल दऱ्या व एका बाजूला महाबळेश्वरचा विस्तार. शिवाय या शहरातील साक्षरतेचे प्रमाण ८२% असल्याने प्रत्येक कुटुंबात एक किंवा दोन मुले एवढे मर्यादित असल्याचेही लोकसंख्येला स्थिरता प्राप्त झालेली दिसते.

२.२.९ भाषा :

सातारा जिल्ह्यात मराठी ही प्रमुख भाषा असून २००१ च्या जनगणनेनुसार ९४% लोकांची ती मातृभाषा होती.[३८] पाचगणी शहरातील प्रमुख भाषा ही मराठी आहे. या शहरात अनेक धर्माचे, पंथाचे, जातीचे लोक राहातात. त्यामुळे इथे अनेकविध भाषा बोलल्या जातात.

इंग्रजी भाषा बोलणाऱ्यांची संख्या १८% आहे.[३९] ख्रिश्चन लोकांच्या बरोबरीने पाचगणीत आलेले पारशी लोकांची पारशी भाषा ही २% बोलली जाते. इथे इस्लाम धर्मिय लोकही राहातात. त्यांची उर्दू भाषा बोलणाऱ्याची संख्या ७% आहे. गुजराती, मारवाडी याही भाषा बोलल्या जातात. काही प्रमाणात इराकी, अरबी बोलणारे लोकही आहेत.

२.२.१० साक्षरता :

तत्कालिन पाचगणी शहराच्या १९१० च्या जनगणनेनुसार शहरातील व आसपासच्या खेड्यातील पुरुष व महिला यांचे शिक्षणाचे प्रमाण दोन ते तीन टक्के इतके होते. सन १८९० च्या दशकात सुरू झालेल्या लोकल बोर्डाच्या प्राथमिक शाळेत केवळ सात विद्यार्थी शिक्षण घेत होते.[४०] इ. स. १९५० नंतर शहरातील साक्षरतेचे प्रमाण वाढीस लागले. इ. स. २००० पासून पाचगणी शहराच्या साक्षरतेचे प्रमाण हे देशातील साक्षरतेपेक्षा जास्त असल्याचे दिसून येते. सन २०१०–११ च्या जनगणनेनुसार या शहराच्या साक्षरतेचे प्रमाण ८२% इतके आहे. हे साक्षरतेचे प्रमाण देशपातळीपेक्षाही जास्त आहे.[४१] देशपातळीवरील साक्षरतेचे प्रमाण ६५% इतके आहे.

२.३ पाचगणीतील सामाजिक स्थिती :

प्राचीन काळापासून या डोंगर कपारीत राहणारा मुळचा समाज धनगर, धावडशी, कोळी, कुणबी. हा अत्यंत खडतर आयुष्य कंठीत होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटीशांचे लक्ष सह्याद्रीच्या या डोंगरमाथ्याकडे गेले आणि महाबळेश्वर, पाचगणी ही शहरे नव्याने वसविली गेली. ब्रिटीश लोकांना लागणाऱ्या गरजांची पूर्तता करण्यासाठी जॉन चेसनने आसपासच्या परिसरातील स्थानिक लोकांना बोलावून घेतले. त्यामध्ये माळी, शिंपी, धोबी, सुतार व इतर समाजातील लोकही होते. यातूनच पाचगणीचा समाज विस्तारत गेला.

पाचगणीमध्ये स्थानिक समाजाची संख्या मोठी होती. त्यांनी आपली परंपरा टिकवित ब्रिटीश संस्कृतीशी जुळवून घेतले. शाळेच्या निमित्ताने जगभरातील अनेक धर्माच्या लोकही पाचगणीत स्थायिक झाले. पाचगणीच्या सामाजिक व्यवस्थेला इ. स. १९१० मध्ये स्थापन झालेल्या नगरपालिकेने मोठा हातभार लावला. तेव्हापासून पाचगणीचा सामाजिक विकास झपाट्याने घडून आलेला दिसतो.

२.३.१ स्थानिक समाज जीवन :

पाचगणी हे सह्याद्रीच्या पर्वतरागांवरील एक दुर्गम भागातील गाव. त्यामुळे येथील स्थानिक समाज हा डोंगरी, कष्टकरी, श्रमकरी व कोकणी जीवन पद्धतीचा सराव व संस्कार

झालेला शेतकरी कुटूंब, गरीब परिस्थितीत आपले जीवन कंठत होता. मुख्य व्यवसाय शेती, तीही डोंगर उतारवरची. यामध्ये भात, नाचणी, वरी, साळ ही जिरायती पिके घेतली जात होती. याशिवाय वाटाणा, घेवडा, स्ट्रॉबेरी ही काही प्रमाणात पैसे देणारी पिके. शेतीला जोडधंदा म्हणून गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या यांचा कळप पाळत असत.

गायी, म्हशीचे दुधदुभते ब्रिटीश, पारशी या लोकांना घालून स्वत:च्या उदरनिर्वाह करीत असत. या भागातील कुटूंबातील एक तरी माणूस मोलमजूरी व रोजगारासाठी पुणे–मुंबईकडे जात असे. तेथे तो डोक्यावर ओझी वाहणारा माथाडी कामगार, हातगाड्या ओढणारे मजूर, गिरणी कामगार, घरगडी, कापड मार्केट, ड्रायव्हर क्लिनर, लष्करातील शिपाईगीरी ही या भागातील अशिक्षित मराठी माणसांची नोकरीची क्षेत्रे. त्यातून स्वत:चे पोट भरणे व राहिलेले पैसे गावाकडे पाठविले जात होते. असे कष्टमय जीवन लोक जगत होते.

ब्रिटीशकालीन पाचगणी :

ब्रिटीशांनी उन्हाळ्यातील उन्हापासून सुटका करून घेण्यासाठी पर्वतीय प्रदेशावर थंड हवेच्या ठिकाणांचा शोध लावला, शहरे वसविली, त्यापैकी मुंबई इलाख्यातील महाबळेश्वर, पाचगणी ही शहरे होत. उन्हाळ्यात ब्रिटीशा गव्हर्नरचा मुक्काम काही दिवस महाबळेश्वर येथे असे. त्या काळी मुंबई प्रांताचा गव्हर्नर म्हणजे राजाच असे.[४२] कारण संपूर्ण इलाख्याची सत्ता व प्रशासन त्यांच्या हाती असे. याच सत्तेचा व अधिकाराचा वापर करून ब्रिटीशांनी पाचगणी व महाबळेश्वर ही थंड हवेची पर्यटन केंद्र म्हणून विकसीत केली. त्यामुळे या भागात येण्यासाठी रस्ता तयार झाला. तो रस्ता म्हणजे महाबळेश्वर – पाचगणी – पसरणी – घाट – वाई – शिरगाव घाट पुढे वाघोली – वाठार अशा पद्धतीने करण्यात आला.[४३] उन्हाळ्याच्या दिवसात वाठार ते वाई असा पोलीस बंदोबस्त असे. तसेच सशस्त्र पोलीसांचा पहारा रस्त्यावर असे. त्याकाळात गव्हर्नरचा मुक्काम महाबळेश्वरला असे. या काळात गव्हर्नरचा शाही थाट पाहण्यासाठी संपूर्ण गाव रस्त्यावर येत असे. भारतावर परकीय ब्रिटीशांचे राज्य आहे याची फारशी जाणीव नसे. केवळ या गोऱ्या लोकांची सेवाचाकरी करणे हाच धर्म समजला जाई.

पाचगणीत स्वातंत्र्याचे वारे :

पाचगणीत भारतीयांना पारतंत्र्याची जाणीव १९३० नंतर होऊ लागली. शिक्षणामुळे तरुण वर्गात जागृती झाली. सामाजिक मन:स्थिती इंग्रजाविरुद्ध निर्माण होऊ लागली. केसरी, नवाकाळ ही वर्तमानपत्रे शाळेत विद्यार्थ्यांच्या वाचनात येऊ लागली. याच काळात महात्मा फुले यांचे सत्यशोधक चळवळ व स्वातंत्र्य लढ्याचा प्रचार खेड्यापाड्यातून होऊ लागला.

१९४२ साली म. गांधीजींची असहकार चळवळ तर या संपूर्ण भागात पसरली. त्यातून सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटलांच्या पत्री सरकारने तर ब्रिटीशांना सळो की पळो करून सोडले. या पत्री सरकारला मदत करणारे या भागातील नेते म्हणजे वाईचे दे. भ. किसन वीर, सांगलीचे वसंतदादा पाटील (इ. स. १९६० पर्यंत सांगली हा सातारा जिल्ह्यातील भाग होता), यशवंतराव चव्हाण, नागनाथ नायकवडी, बाबूसाहेब लाड, पांडू बोराटे, बापू कचरे ही क्रांतिकारी मंडळी आघाडीवर होती.[४४]

या भूमिगत क्रांतिकारकांना मदत करणारे भिलारचे भि. दा. भिलारे गुरूजी, पाचगणीचे कै. विष्णू मास्तर कुलकर्णी, निगडीकर, कै. बाबुराव घोरपडे ही तरुण मंडळी असत. या तरुणांनी शिक्षकाची नोकरी सोडून स्वातंत्र्यलढ्यात उतरले व या लोकांनी जावळी सारख्या दुर्गम भागातील आदिवासी, डोंगरी, खेडूत लोकांच्यात जागृतीचे कार्य हाती घेतले. असंघटीत शेतकरी, कष्टकरी, अशिक्षित दीन दुबळ्यांना संघटीत केले व भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होऊन मोलाचे सहकार्य केले.

सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारच्या कार्यवाहीमुळे पाचगणी, महाबळेश्वर भागातील ब्रिटीश अधिकारी १९४२ पासूनच मायदेशी परतू लागले. त्यामुळे पाचगणी हे १९४२ सालीच पूर्णत: ब्रिटीशमुक्त शहर बनले होते.[४५] असे असले तरी १९४७ सालापर्यंत ब्रिटीश प्रशासन इथले काम मुंबई इलाख्यातून करत होते. १९५० पासून या शहराचा कारभार हा पूर्णत: सातारा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली पाचगणी गिरिस्थान नगरपालिका पाहू लागली. तेव्हापासून आजतागायत पाचगणीचा सामाजिक दृष्टीने झालेला विकास, लोकसंख्या, कुटुंबपद्धती, सण–उत्सव, रितीरिवाज, जातीजमाती यांचा थोडक्यात आढावा मांडत आहे.

२.३.२ पाचगणीतील जाती–जमाती :

सातारा जिल्ह्याला प्राचीन इतिहास आहे. या भागावर अनेक सत्ता प्रस्थापित झाल्या. मराठ्यांच्या राजधानीचे ठिकाण म्हणूनही या जिल्ह्याला महत्त्व आहे. मराठा कालखंडानंतर ब्रिटीश राजवट निर्माण झाली. या सर्व राजकीय बदलाचा समाजाच्या व्यवस्थेवर फारसा परिणाम झाला नाही. या भागात पूर्वीपासून अनेक जाती जमातीचे लोक राहतात. डोंगर कपारीत राहाणारा इथला समाज हा काटक, कष्टाळू, कठीण प्रसंगांना धैर्याने सामोरे जाणारा होता. आजूबाजूच्या परिसरात राहणारा स्थानिक धनगर, कोळी, धावडशी हा मुळचा समाज इथे होता. पाचगणीत युरोपियनांच्या सेवेसाठी इतर जातीचे लोक येऊन स्थायिक झाले.

१. **मराठा** :– पाचगणीत आज मराठा जातीचे प्रमाण ५०% आहे. हे या भागातील स्थानिक लोक म्हणून ओळखले जातात. त्यांचा पारंपारिक व्यवसाय हा शेती आहे. आज हा समाज पाचगणीच्या राजकारणात आघाडीवर आहे. हा परिसर ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा असल्याने या भागात काही इतिहास प्रसिद्ध घराणी आहेत. त्यामध्ये कासुर्डे, बेलोशे, बिरामणे, शिर्के, भिलारे इ. मराठा जातीत ही क्षत्रिय मराठा, कुणबी व इतर असे प्रकार आहेत.

२. **ब्राह्मण** :– पाचगणीत ब्राह्मण वर्ग अत्यंत कमी आहे. यांची संख्या केवळ ७ ते ८ टक्के आहे. पाचगणीत स्थानिक ब्राह्मणाशिवाय गुजराती ब्राह्मणही आहेत. ते सध्या हॉटेल व्यावसायिक आहेत व संजीवन विद्यालयाचे ट्रस्टी आहेत. स्थानिक ब्राह्मणामध्ये ज्या पोटजाती आहेत त्यापैकी इथे कण्व ब्राह्मण, देशस्थ ब्राह्मण, द्रविड ब्राह्मण राहतात. त्यापैकी द्रविड ब्राह्मण हे शाळेत नोकरीनिमित्त आलेले आहेत. ते मुळचे तमिळ भाषिक आहेत.

३. **धनगर** :– पाचगणीतील मुळचे लोक कोण? याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा जुन्या लोकांच्याकडून असे सांगितले जाते की इथे राहणारा मुळचा समाज हा धनगर होय. छत्रपती शिवरायांच्या सैन्यात त्यांची संख्या मोठी होती. महाबळेश्वर, जावळी व पाटण तालुक्यात या लोकांना म्हसकर या नावाने ओळखले जाते.[४६] त्यांची दैवते म्हणजे खंडोबा, बिरोबा, विठोबा, जनाई, म्हसोबा ही होत. यात्रेच्या वेळी ढोल वाजवत नृत्य करण्यात ते

पारंगत असतात. त्यामुळे घाटजाई देवीच्या यात्रेच्या वेळी जे कर्णढोल वाजविले जातात ते धनगर समाजाचे लोक अग्रभागी असतात. यात्रेत त्यांना मोठा मान असतो.

४. **परीट** :– परीट समाज का पाचगणीत प्रथम आला तो ब्रिटीश व पारशी या लोकांची सेवा करण्यासाठी व आपला व्यवसाय चालविण्यासाठी. त्यामुळे ब्रिटीश काळापासून या लोकांची संख्या मोठी आहे. त्यानंतर पाचगणीत इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा सुरू झाल्या. शाळेतील विद्यार्थ्यांचे कपडे, होस्टेलमधील बेडशीट, ब्लॅकेट व इतर कपडे धुण्यासाठी परीटांचा लॉंड्री व्यवसाय भरभराटीला आला आहे. शिवाय हॉटेल व्यवसाय व श्रीमंत वर्ग यांचेही कपडे धुणे, इस्त्री करणे यामुळे परीट व्यवसायाला मोठी मागणी आहे. त्यामुळे या व्यवसायात इतर काही जातीचे लोक पुढे आलेले दिसतात. आज हा समाज सुशिक्षित व श्रीमंत बनला आहे.

५. **कातकरी** :– हा समाज पाचगणी शिवाय जावळी, महाबळेश्वर व वाई भागात मोठ्या प्रमाणात आहे. हा समाज मुळचा ठाणे व रायगड जिल्ह्यातील. परंतु सह्याद्रीच्या डोंगर माथ्यावर मध, कंदमुळे, फळे गोळा करण्यासाठी म्हणून आले व या डोंगराळ भागात स्थायिक झाले. पाचगणी, महाबळेश्वरच्या जंगलात मध गोळा करून तो विकण्याचा व्यवसाय प्रथम याच समाजाने सुरू केला. शिवाय जंगलातील रानमेवा गोळा करून विकणे, ब्रिटीशांना जंगलातील रस्ते दाखविणे, शिकारीसाठी सोबत करणे यासाठी हा समाज पुढे होता.

६. **कुंभार** :– कुंभार हे बारा बलुतेदारापैकी एक घटक. त्यामुळे प्रत्येक गावात हा समाज आढळतो. भारतीय सण उत्सवात या समाजाला फार महत्त्व आहे. नागपंचमी, बैलपोळा, संक्रांत, दसरा, गौरी गणपती या काळात कुंभारांनी तयार केलेल्या नागोबा, बैल, मडकी, गौरी गणपतीच्या मुर्ती यांना मोठी मागणी असते. त्यामुळे पाचगणीतही कुंभारवाडा आहे.[४७]

७. **कोल्हाटी** :– कोलांटी उडी मारून पोट भरणारे यावरून कोल्हाटी हा शब्द तयार झाला असावा. हे लोक टोळीने राहतात. गावोगावी भटकतात. पाचगणी, महाबळेश्वर व वाईच्या स्टॅण्डवर हा समाज मोठ्या प्रमाणात शिंगांच्या फण्या व लाकडी कलात्मक वस्तू

तयार करून विकतात.[४८] त्यामुळे हा समाज इथे पहायला मिळतो. यांमध्ये अनेक पोटजाती आहेत. जातपंचायती मार्फत तंटे सोडविले जातात. त्यांच्यात शिक्षण फारसे आढळत नाही.

८. **गुरव** :– पाचगणीत गुरवांची दोन तीनच घरे आहेत. ते घाटजाई देवीचे पुजारी आहेत. हे घाटजाई मंदिराची साफसफाई करणे, पूजाअर्चा करणे, काम करतात.

९. **चांभार** :– ह्या लोकांची मुळ वस्ती पसरणी घाटात आहे. त्यांना चर्मकार म्हणूनही ओळखले जाते. पाचगणी, महाबळेश्वरमध्ये या जातीचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत. ब्रिटीश काळात ब्रिटीश अधिकाऱ्यांना सांबराच्या चमड्याचे बूट तयार करून देण्यासाठी हा समाज इथे आला व आज त्यांचा या दोनही शहरात चर्मकार व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. स्थानिक चांभार हे मोची चांभार म्हणून ओळखले जातात. हे लोक मोची जोडे, चपला व इतर चमड्याच्या वस्तू तयार करतात. आज हा समाज पाचगणी, महाबळेश्वरमधील एक श्रीमंत वर्ग म्हणून ओळखला जातो. कारण या शहरात पर्यटकांना आवडतील असे चमड्याचे चप्पल तयार करण्याचे त्यांचे कारखाने आहेत. शिवाय दुकानेही आहेत. पसरणीतील गणू चांभार हा पाचगणी महाबळेश्वरला येणाऱ्या प्रत्येक ब्रिटीश गव्हर्नरला बुट शिवून देत असे. त्याने महाबळेश्वरचा शोध लावणारा माल्कम याला चमड्याचे बूट शिवून दिले होते, त्याबदल्यात त्याला बंदुक व परवाना दिला होता. त्याला ते इतके आवडले होते की तो शेवटपर्यंत पसरणीतून बूट इंग्लंडला मागवत होता. त्यामुळे तर ब्रिटीश अधिकारीही १९४० नंतरही पाचगणी भागातून चमड्याचे बूट लंडनला मागवत होते.[४९]

विविध धर्मीय लोक :– पाचगणीत विविध जाती जमातीचे लोक जसे राहतात तसे इथे इतर धर्मिय लोकही मोठ्या प्रमाणात राहतात. त्यामध्ये ख्रिश्चन, पारशी, बहाई, जैन, मुस्लिम, बौध्द इ. धर्माचे लोकही गुण्यागोविंदाने राहतात.

१. **ख्रिश्चन** :– पाचगणीत आजही ख्रिश्चन समाज मोठ्या प्रमाणात आहे. जॉन चेसनने पाचगणी वसविली. त्यानंतर उन्हाळ्यात महाबळेश्वर पाठोपाठ पाचगणीतही ब्रिटीश अधिकारी कायमस्वरूपी राहण्यासाठी आले. त्यानंतर ख्रिश्चन मिशनरी धर्मप्रसाराबरोबर युरोपियन मुलांच्यासाठी शाळा सुरू करण्यासाठी आले. त्यापैकी आजही काही शाळा या मिशनऱ्यांच्या

देखरेखेखाली चालतात. इंग्रजी माध्यमांच्या काही शाळा ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या असल्याने या शाळेत काम करणारे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळेचे ट्रस्टी हे इथेच राहिले. काही युरोपियन हॉटेल व्यवसायातही होते. त्यातील दोन तीन कुटूंबांनी आपला व्यवसाय पुढे चालू ठेवला. त्यापैकी बॉंबे बेकरी ही इ. स. १९०१ साली सुरू झालेली आजही बेथलेहेम हे ब्रिटीश कुटूंब बेकरी चालविते.[५०]

आज पाचगणीत दोन चर्च आहेत. शिवाय बेल एअर हॉस्पिटल हे आज फादर टॉमी या क्रॉगीगेट ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या हाती आहे. इथे संपूर्ण नर्स स्टाफ हा केरळातून आलेले ख्रिश्चन आहेत. त्यामुळे पाचगणीत हा समाजही मोठ्या प्रमाणात आढळतो. त्यांच्यातही कॅथलिक व प्रोटेस्टंट असे पंथ आहेत.

२. **मुस्लिम/इस्लाम धर्मीय** :– पाचगणीत इस्लाम धर्मीय लोकांची संख्या बऱ्यापैकी आहे. शिवाजी महाराजांच्या काळापासून काही घराणी या परिसरात राहतात. पाचगणीत या लोकांची वस्ती वाढली ती भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर. पाचगणीत आपल्या मुलांसाठीही एक इंग्रजी माध्यमाची शाळा असावी या हेतूने अंजुमन हायस्कूल सुरू केले. त्यानंतर इथे हा समाज स्थायिक झाला. आज हा समाज छोट्या मोठ्या व्यवसायात गुंतला आहे. काही अतिश्रीमंतही आहेत तर काही गरीब कुटूंबेही आहेत.

३. **बौध्द** :– बौध्द समाज हा पाचगणीत सिध्दार्थ नगर, आंबेडकर कॉलनीत मोठ्या संख्येने राहतो. त्यांची संख्या पाचगणीतील लोकसंख्येच्या २२% इतकी आहे. हा समाज मोठ्या प्रमाणात कष्टकरी आहे. या शहरात असणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून साफसफाईची कामे करतात. टेबललॅंडवर घोडागाडीच्या व्यवसायात हा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. पाचगणीत आज हा समाज कष्टकरी समाज म्हणून ओळखला जातो. इंग्रजी माध्यमाच्या शाळा ह्या त्यांचा उदरनिर्वाहाचे साधन आहे.

२.३.३ कुटुंब पद्धती :

विविध नात्यांनी एकत्र येणाऱ्या व्यक्तीच्या संघटनात्मक स्वरूपाला समाज असे म्हणतात. आणि सामाजिक गरजा साध्य करून नियंत्रण करणाऱ्या संस्थांना सामाजिक संस्था

म्हटले जाते. या सामाजिक संस्थेतील एक महत्त्वाची संस्था म्हणजे कुटुंबसंस्था होय. समाजातील नात्यागोत्याच्या व्यवस्थेचा एक घटक म्हणून असलेले कुटूंबाचे स्वरूप निश्चित होत गेले. या कुटूंबाच्या स्वरूपात पुढे काळानुरूप बदल होत गेला आहे. पाचगणीतील कुटूंब पद्धती ही पितृसत्ताक पद्धतीची आहे. कुटूंब संस्थेच्या वर्गीकरणानुसार एकत्र कुटूंब पद्धती आणि विभक्त कुटूंब पद्धती हे दोन प्रकार समाजात पाहवयास मिळतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळात एकत्र कुटूंबपद्धती अस्तित्वात होत्या. परंतु भारतात ब्रिटीशांची राजवट आल्यानंतर सामाजिक जीवनात परिवर्तन सुरू झाले. ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या कुटूंबाची संख्या कमी होऊ लागली. नोकरीनिमित्त शहरात जाऊ लागले. त्यामुळे शहरात पती, पत्नी व त्यांची मुले एवढ्या मर्यादित स्वरूपात कुटूंब झाले. त्यातूनच विभक्त कुटूंब पद्धती रूढ होत गेली. या सर्वांचा परिणाम पाचगणीच्या स्थानिक कुटूंब संख्येवरही झालेला दिसतो. या शहरात १९५० पर्यंत एकत्र कुटूंब पद्धती बऱ्यापैकी पहायला मिळत होती.[५१] पुढे शिक्षण, नोकरी व स्वतंत्रवृत्ती यामुळे विभक्त कुटूंब पद्धतीची संख्या वाढत गेली. असे असले तरी या शहरात आजही चार कुटूंबे ही एकत्र पद्धतीत रहात आहेत. त्यापैकी शाहूनगरमधील कासुर्डे यांच्या कुटूंबात ६२ माणसे एकत्र आहेत तर शिवाजी चौकातील घोणे कुटूंबियांच्या घरात ५८ सदस्य आहेत. याशिवाय काही पारशी कुटूंबेही एकत्र कुटूंबात राहतात. आधुनिक जीवनशैलीमुळे कुटूंब पद्धतीतही बदल झालेला दिसून येतो.

२.३.४ विवाह पद्धती :

हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे विवाह हा एक अत्यंत महत्त्वाचा व पवित्र असा संस्कार मानला जातो. विवाह ही एक सामाजिक महत्त्वाची बाब असल्याने ते सामाजिक नियमांनी आणि संकेतांनी निर्धारित केलेले असतात. स्वातंत्र्यपूर्वकाळात या भागातील मुलामुलींचे विवाह हे लहान वयातच होत असत. तसेच हा विवाह सोहळा तीन–चार दिवस चालत असे. त्यामुळे विवाहामध्ये खूप मोठा खर्च होत असे. शिवाय या भागात विवाह सोहळ्यात देज देण्याचा प्रकार होता.[५२] देज म्हणे नवरी मुलीला नवऱ्याच्या मुलाच्या घरच्यांनी विवाहासाठी लागणारे धान्य, रोकड, पैसे, दागदागिने द्यायाचे. विवाह करताना मुलाच्या वडीलांनी मुलीकडे पाचशे,

सातशे, रुपये रोख द्यावयाचे, लग्नासाठी पाच ते सात मण धान्य, दोन्ही बाजूचा बस्ता, मुलीच्या अंगावर अकरा ते पंधरा पुतळ्यांची माळ घालणे व इतर किरकोळ खर्चही नवऱ्या मुलांकडच्यांना करावे लागे. त्यामुळे गरीब लोकांना मुलाचे लग्न करायचे म्हणजे स्वत:ची जमीन विकावी लागायची किंवा त्यावर सावकारी कर्ज काढून जन्मभर ते फेडत बसावे लागे. सन १९६० मध्ये या प्रथेविरुद्ध आवाज उठवून विवाह पद्धतीत बदल घडवून आणला. तो या भागातील कार्यकर्ते कै. भाऊसो भिलारे, कै. डॉ. सावंत, श्री. दत्तात्रय मा. गावंड,कै. भाऊसो रांजणे, महादेव पारटे यांनी विवाह सोहळा एका दिवसावर आणला. देज प्रकार बंद केला.[५३] असे असले तरी काही जुनी जाणकार मंडळी आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. या शहरात राहणाऱ्या इतर समाजानेही आपल्या वैवाहिक परंपरा टिकवून ठेवल्या आहेत.

२.३.५ घरांची रचना :

सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर असणारी दोन शहरे म्हणजे महाबळेश्वर, पाचगणी. या दोन्ही शहराची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची १,३५० मीटर आहे. त्यामुळे या प्रदेशात पावसाचे प्रमाण जास्त आहे. महाबळेश्वरला तर महाराष्ट्राची चेरापुंजी म्हटले जाते. त्यामुळे या प्रदेशातील घरे ही उतरत्या छप्पराची आहेत. घरे कौलारू व भाजलेल्या विटांची अथवा दगडी भिंतीची आहेत. ब्रिटीशकालीन जी घरे आहेत त्यांची रचना वेगळी आहे. पाचगणीत सर्वात प्रथम जॉन चेसन याने बंगला बांधला. त्याचे नाव क्लिप्टन हाऊस[५४] असे आहे. चेसन बंगल्यांनतर १८६२ साली इतर युरोपियन लोकांनी पक्क्या छताची सहा घरे बांधली. प्रत्येक बंगल्याभोवती एक ते दोन एकर परिसराची जागा आहे व मध्यभागी हे बंगले आहेत. या बंगल्याचे बांधकाम पूर्णत: पक्क्या विटांचे आहे. ही घरे जमिनीपासून उंचीवर आहेत. घराची छते उंच व उतरत्या छप्पराची आहेत. प्रत्येक स्वयंपाकगृहात धुराडी बसवलेली आहेत. तसेच प्रकाश येण्यासाठी छताला झरोका व त्याला रंगीत काच बसवलेली आहे. घराच्या खिडक्याही ब्रिटीश पद्धतीनुसार मोठ्या आहेत. आतील सर्व काम शिसम व सागवानी लाकडाचे आहे. बंगल्याभोवती कुंपण आहे. प्रत्येक बंगल्यात विहीर, टेनिस कोर्ट, व फळझाडांचा बगीचा आहे.

आज या शहरात ब्रिटीशकालीन ७४ बंगले आहेत.[५५] अलिकडे शहरातील लोकवस्ती वाढू लागली आहे. तसेच श्रीमंत लोक गुंतवणूक म्हणूनही मोठमोठे बंगले बांधू लागले आहेत. ही सर्व घरे सिमेंट काँक्रीटची आहेत. मात्र उतरत्या छप्परांचीच आहेत. व सर्व घरे उंच जोत्यावरच बांधली जातात. आज लोकवस्ती दाट झाल्याने घरांना मोकळा परिसर राहिलेला नाही. तसेच पाचगणी शहराच्या विस्तारासाठी जागा नाही.

२.३.६ आहार–विहार :

महाबळेश्वर, पाचगणी ही शहरे दुर्गम भागात असली तरी आधुनिक तंत्रज्ञानामुळे अडचणींवर समाजाने व प्रशासनाने मात केली आहे. पूर्वी डोंगरउतारावरील तुटपुंज्या शेतीवर इथल्या लोकांना जीवन जगावे लागे. या शेतातून येणारे पीक म्हणजे नाचणी, मका, सातू, बटाटा, बहू व हरभरा. त्यामुळे इथल्या लोकांचे आहारही इथे पिकणाऱ्या धान्यावरच ठरलेले असे. स्थानिक लोकांचा आहार हा नाचणी किंवा ज्वारीची भाकरी, बटाटा, वाटाणा यांची आमटी व भात. अलिकडे शेती तंत्रज्ञानात सुधारणा झाली व शेती डोंगर उतारावर असली तरीही या शेतातून स्ट्रॉबेरी व राजमा याचे पीक घेतले जाऊ लागले. त्यामुळे शेतकरी सधन झाला व त्याच्या जीवनशैलीतही बदल झाला.

पोशाख :

पाचगणी ही ब्रिटीशांनी वसविली असल्याने या गावातील स्थानिक लोकांच्या पोशाखावरही युरोपियन लोकांचा प्रभाव पडणे सहाजिक आहे. परंतु पाचगणीतील स्थानिक लोकांनी स्वातंत्र्यापूर्व काळात आपल्या पोशाखात फारसा बदल केलेला नव्हता. त्यांचा पोशाख हा साधे धोतर, सदरा, टोपी, खांद्यावर टॉवेल तर स्त्रियांचा पोशाख हा नऊवारी रंगीत लुगडं, चोळी असे तर लहान मुली परकर, पोलके वापरीत. लहान मुले हाफ पँट व सदरा वापरीत. याशिवाय काही लोक लेंगा, सदरा, पैरण, बाराबंदी, बंडी कुडते, कोपरी, कबजा, अंगरखा, डगला, अचकन हे वापरत.[५६] आज आधुनिक पद्धतीचा पोशाख वापरला जातो.

२.३.७ अलंकार :

भारतीय लोकांना अलंकाराची आवड प्राचीन काळापासून आहे. त्यामुळे पाचगणीतील समाजही पूर्वीपासून पारंपारिक दागिन्यांचा वापर करीत असलेला दिसतो. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रिया गळ्यात सोन्याचे पुतळीहार, बोरमाळ, मणीमंगळसूत्र, ठुशी, लक्ष्मीहार, इ. दागिने वापरीत. सणासुदीला चंद्रहार, चपलाहार, जोंधळी पोत, तांदुळीपोत, बकुळीहार, पोहेहार, मोहनमाळ, सरी, वज्रतिका, तन्मणी, लफ्फा, पोत व पेंडे घालीत. शिवाय नाकात नथ, मुरणी, फुली, मुगवाट (चमकी), कानामध्ये चौकडी, कुड्या, बुगड्या, झुबे घालीत. पायात तोडे, पैंजण, जोडवी, मासोळी हे चांदीचे दागिने असत. पुरुषवर्ग हा भिकबाळी, पोची, गोफ, कंठा, आंगठ्या वापरीत. हे सर्व दागिने सोने, चांदी, हिरे, मोती यापासून बनविलेले असत. गरीब वर्ग हा रूपे, पितळ, तांब्याचे दागिने वापरीत. स्वातंत्र्यानंतर स्त्रिया व पुरुष आधुनिक पद्धतीच्या अलंकारांचा वापर करू लागले आहे.

२.३.८ धार्मिक प्रथा, रूढी परंपरा :

समाजात अलिकडच्या काळात वैज्ञानिक प्रगती, पाश्चिमात्य शिक्षण आणि आधुनिक दृष्टिकोनामुळे पूर्वीच्या रूढी, परंपरा व धार्मिक प्रथामध्ये परिवर्तन झालेले दिसून येते. तरीही धार्मिक संस्कार पूर्णत: नाहीसे होणे शक्य नाही. हिंदू धर्मशास्त्रानुसार १६ नित्य व २४ नैमित्तक संस्कार विहित केलेले आहेत. नित्य संस्कारांपैकी नामकरण, कर्णवेध, उपनयन किंवा मुंज, विवाह आणि अंत्यविधी हे संस्कार परंपरेने चालू आहेत या संस्काराच्या प्रथामध्ये मोठे बदल झाले आहेत. आज पाचगणीत प्रत्येक जाती जमातीमध्ये व धर्माचे लोक आपआपल्या धार्मिक प्रथा परंपरा जोपासत आधुनिकतेचा स्विकार करून आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

२.३.९ सण–उत्सव :

माणसाने सण आणि उत्सवाच्या माध्यमातून ईश्वराशी, सृष्टीशी, आप्तस्वकियांशी, प्रेतित आणि वीरनायकांशी एक मूल्यात्मक नाते रूजविण्याचा प्रयत्न केला आहे. ऋतुपरत्वे होणारे धार्मिक समारंभ, भोजनप्रसंग, उत्सवातील आनंद, करमणूक यातुन मानवी संस्कृती

विस्तारीत गेली आहे. त्यामुळे सणवार म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे तर संस्कृती विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक ठरतो.[५७] भारतामध्ये साजरे केले जाणारे सण उत्सव हे पाचगणीतही साजरे केले जातात. पाचगणी ही जगाची छोटी प्रतिकृती मानली जात असल्याने इथे हिंदू धर्मीय सण उत्सवा बरोबर, अनेक धर्माचे सण–उत्सवही तेवढ्याच उत्साहाने साजरे केले जातात. त्यामुळे पाचगणीतील विविध संस्कृतीची झलक पाहावयास मिळते. त्यातील विविधता अनुभवयास मिळते.

पाचगणीतील स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने डिसेंबर महिना हा खऱ्या अर्थाने अत्यंत उत्साहाचा, आनंदाचा असतो. या महिन्यात येणारा नाताळ हा ख्रिस्ती बांधवांचा सण असला तरी यात संपूर्ण पाचगणी सामील होते. या महिन्यात नाताळच्या सुट्ट्या असल्याने या शहरातील सर्व इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सुट्टी असते. तर पर्यटक इथल्या गुलाबी थंडी अनुभवण्यासाठी येतात. पारशी धर्मिय लोक सर्वात जास्त सण उत्सव साजरा करतात. या धर्मात ऋतुमानानुसार ऐतिहासिक घटनांशी संबंधित व पूर्वजांच्या स्मरणार्थ विविध प्रकारचे सण वर्षभर साजरे करतात. पारशी धर्माचे एकमेव दैवत म्हणजे 'अहुर मज्दा', याला सृष्टीचा निर्माता मानतात. त्याचे आभार मानण्यासाठी गहंबार सण साजरा केला जातो. तसेच पारशी कालगणनेनुसार त्याच्या बाराव्या महिन्यातील पतेती हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. अशा प्रकारे पाचगणीतील विविध जातीधर्माचे लोक आपआपल्या रितीरिवाजानुसार सण समारंभ साजरे करतात. या सण उत्सवामुळे एक आनंदमय वातावरण, स्नेहाचे मैत्रीचे नाते जोडले जाते. तसेच या उत्सवातून संस्कृती व सभ्यता रूजविली जाते.

पाचगणीत सर्व धर्माच्या सणाबरोबर राष्ट्रीय सण २६ जानेवारी हा भव्य दिव्य प्रमाणात साजरा केला जातो. पाचगणीत असणाऱ्या अनेक नामवंत इंग्रजी माध्यमाच्या शाळा, पाचगणी, गिरिस्थान नगरपरिषदेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या ध्वजवंदनाच्या कार्यक्रमात सहभागी होतात. त्यामुळे पंचक्रोशीतील लोकांसाठी हा दिवस अत्यंत अविस्मरणीय असतो.

२.३.१० पाचगणी परिसरातील धार्मिक स्थळे :

पाचगणी परिसरात दांडेघर येथे केदारेश्वर, गोडवली येथे तपनेश्वर, राजपुरी येथील कार्तिक स्वामी, अवकाली येथील कोटेश्वर व पाचगणी येथील चौंडेश्वर ही या परिसरातील शिवलिंगाची स्थळे आहेत. पाचगणीचे ग्रामदैवत श्री घाटजाई व काळुबाई आहेत. यांचा उत्सव दरवर्षी माघ वद्य दासनवमीस असतो. पाचगणीच्या परिसरातील सर्वात पहिली यात्रा ही भिलार येथील भुतेश्वराची असते.[५८] या यात्रेनंतरच सर्व यात्रांना सुरुवात होते. ही यात्रा कार्तिक महिन्यातील तुळशी विवाहाच्या दिवशी दरवर्षी भरवतात.

यानंतर पाचगणीपासून दोन कि. मी. अंतरावर असणाऱ्या दांडेघर येथील केदारेश्वर याची यात्राही मोठी भरते. ही यात्रा कोल्हापूरच्या जोतिबाची यात्रा असते त्याचदिवशी लोकांनी यात्रा भरवली. तेव्हापासून हाच रिवाज सुरू आहे. या यात्रेचे एक वैशिष्ट्य म्हणजे इथे असणाऱ्या एका जुन्या आंब्याच्या झाडाला अश्विन महिन्यातील शेवटच्या आठवड्यात मोहोर येण्यास सुरूवात होते व श्रावण महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पिकलेले आंबे अर्पण केले जातात. आजही यात्रेच्यावेळी आंब्याला मोहोर येतो.[५९] या मंदिराचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे इ. स. १९४४ साली संत गाडगे बाबांनी दांडेघर येथे राष्ट्रीय जत्रा भरविली होती. या यात्रेसाठी ब्रिटीशांनी खूप बंदोबस्त ठेवला होता. या यात्रेवेळी प्रवचने, किर्तन, अन्नदान असे कार्यक्रम ठेवले होते. दांडेघर हे गाव संपूर्ण देवस्थानचे आहे. व्यक्तीशा या जागेचा मालक कोणीही नाही.

पाचगणीचे ग्रामदैवत घाटजाई, काळेश्वर यात्रा :

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ आणि शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या पाचगणी शहरात विविध धर्माचे लोक राहतात. विविध भाषा बोलल्या जातात. या ठिकाणी सर्व धर्मियांची मंदिरे आहेत.पण सर्व पाचगणीकरांची ग्रामदैवत आहे श्री घाटजाई देवी व श्री काळेश्वरी देवी. हे घाटजाईचे मंदिर टेबललँडच्या कुशीत आहे. मंदिराच्या एका बाजूला तपनेश्वर, केदारेश्वर ही तीर्थस्थाने तर दुसऱ्या बाजूला महाबळेश्वर, प्रतापगड ही पर्यटन स्थळे आहेत. त्याच्या मध्यभागी घाटजाईचे वास्तव्य आहे. देवी घाटात बसली म्हणून नाव

घाटजाईदेवी. घाटजाई हे पुरातन देवस्थान असून पाचगणी परिसरात या स्थानाचा नावलौकिक आहे.[६०] हे शिवकालीन मंदिर असून या देवीची मनोभावे पूजा केल्यास भक्तांच्या मनातील इच्छा पूर्ण होते. सुख समाधान लाभते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

मंदिराचा परिसर :

घाटजाई–काळेश्वरी मंदिराबरोबर श्री साई बाबा मंदिर, श्री गणपती मंदिर, राम–सीता–लक्ष्मणाचे मंदिर, गुजराती समाजाचे मंदिर या परिसरात आहे. याच ठिकाणी दिपोत्सव व इतर धार्मिक कार्यक्रम नित्यनियमाने होत असतात. मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक अशा घाटजाई, काळेश्वरीच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्याच्या बाहेर सभामंडप असून मंदिराच्या प्रवेशद्वारावर मध्यभागी दीपमाळ आहे. मंदिर परिसरात विविध प्रकारचे वृक्ष आहेत. मंदिर परिसरत आलेल्या भक्तांना बसण्यासाठी व मुलांना खेळण्यासाठी सुंदर बगीचा आहे व या बगीच्यात विविध प्रकारची फुलझाडे आहेत.

घाटजाईचा कालखंड :

घाटजाई या देवीची स्थापना प्रथम या भागात राहाणाऱ्या धनगर समाजाने केली आहे, असे म्हटले जाते. सह्याद्रीच्या डोंगर रांगांवर शेळ्या मेंढ्या, गुरे–ढोरे चारायला येणाऱ्या गुराख्याला काळी पाषाणाती मुर्ती वडाच्या झाडाखाली सापडली. त्याच मुर्तीची प्रतिष्ठापना सध्याचे मंदिर आहे त्याच जागेत केली. ही मुर्ती घाटाकडे तांड करून असल्याने ती घाटावर येणाऱ्या लोकांचे रक्षण करते म्हणून घाटजाई असे नाव पडले असावे.[६१] पुढे शिवाजी राजांच्या काळात शिवाजी राजे वाईवरून प्रतापगडाकडे जाताना घाटजाईचे दर्शन घेऊन पुढे जात असे म्हटले जाते. परंतु याचा पुरावा सापडत नाही. मात्र या परिसरात गोडवली येथे असणाऱ्या कोटेश्वर मंदिरात शिवाजी महाराज येऊन गेल्याचा उल्लेख त्या मंदिराच्या शिलालेखावर आहे.[६२]

घाटजाई यात्रा :

पाचगणी येथील घाटजाई, काळेश्वरी देवीची यात्रा ही माघ महिन्यातील अष्टमीच्या दिवशी म्हणजे फेब्रुवारी किंवा मार्चमध्ये भरते. ही यात्रा महाबळेश्वर तालुक्यातील सर्व यात्रा

झाल्यावर असते. त्यामुळे भाविकांना ही यात्रा म्हणजे पर्वणीच असते. ही यात्रा तीन दिवस चालते या देवीला गोड नैवेद्य लागतो. येथे कोणत्याही प्रकारची पशुहत्या होत नाही. त्यामुळे हे देवस्थान सर्वधर्मियांसाठीचे श्रद्धास्थान आहे. ही देवी नवसाला पावते असा विश्वास आहे.

यात्रेच्या पहिल्या दिवशी रात्री जागर, देवीचा गोंधळ आणि मध्यरात्रीपासून श्रींची मिरवणूक निघते व पहाटे मंदिरात परत येते. दुसरा दिवस हा यात्रेचा मुख्य दिवस असतो. या दिवशी देवीची पालखी शिवाजी चौकातून निघते. तिथे सकाळी ११ वाजता गोल रिंगण होते. इथेच सुवासिनी देवीला ओवाळतात. ही पालखी ढोल–लेझीमच्या गजरात सायंकाळी कै. देवजी बापू कासुर्डे क्रीडा भूमीवर येते. इथे कर्ण ढोल यांची जुगलबंदी होते. हा सोहळा पाहण्यासाठी संपूर्ण पंचक्रोशीतील लोक जमा होतात. हे दृश्य अत्यंत विलोभनीय व नादमधूर असते. तेथून ही पालखी गाव प्रदक्षिणा करून मंदिरात येते. पाचगणीचा छबिना हा संपूर्ण महाबळेश्वर तालुक्यात प्रसिद्ध आहे. कर्णढोल हे पांडवकालीन परंपरा मानली जाते. त्यामुळे आजही मोठे ढोल व लेझीम यांची मिरवणुकीत स्थान अग्रभागी असते. या ढोलाच्या तालावर नाचणारे हजारो भक्तही बेधुंदपणे देवीच्या नावाने चांगभलं म्हणत नाचत असतात. तिसऱ्या दिवशी भंडारा असतो. या प्रसादाचा आस्वाद घेऊन लोक आपआपल्या घरी परत जातात. घाटजाई यात्रेसाठी महाबळेश्वर तालुक्यातील लोकांबरोबर संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकातूनही लोक येतात. एवढेच नव्हे तर पाचगणीतील पारशी, मुस्लिम, ख्रिश्चन समाजातील परदेशात स्थायिक झालेले लोकही या यात्रेच्या निमित्ताने पाचगणीत येतात. पाचगणी परिसरातील ही महत्त्वाची व मोसमातील शेवटची यात्रा मानली जाते.

पाचगणी हे शहर ब्रिटीश काळापासून नावारूपाला आले असले तरी इथल्या मुळच्या समाजाने आपली संस्कृती, परंपरा आजपर्यंत जोपासली आहे. त्यामुळेच स्थानिक शेतकऱ्यापासून ते युरोपियन अधिकाऱ्यांपर्यंत विविध स्तरातील लोक, गरीब, श्रीमंत, श्रेष्ठ, कनिष्ठ असा कोणताही भेदभाव न करता या शहरात सुखासमाधानाने व शांततेने राहत असलेला दिसतो. इथल्या अनेक संस्कृतीतून एक एकात्मतेची व आदराची अशी संस्कृती निर्माण झाल्याने या शहराचा विकास झपाट्याने झालेला दिसून येतो.

२.४ पाचगणीच्या विकासात योगदान देणाऱ्या व्यक्ती :

२.४.१ ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे :

आपला सांस्कृतिक इतिहास पाहता असे दिसते की अनेक संत व सत्पुरुषांनी आपल्या वास्तव्याने, लोकोत्तर कार्याने व धार्मिक प्रबोधनाने सातारा जिल्ह्याचा लौकीक अजरामर करून ठेवला आहे. त्यापैकीच एक म्हणजे जावलीसारख्या अतिदुर्गम व अतिशय मागासलेल्या भागाचा कायापालट करणारे दत्तात्रेय महाराज कळंबे होत. त्यांनी जावळी तालुक्याचा शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या पारमार्थिक वाटचाल करून या भागाच्या विकासाबरोबर अभंग अशी एकजूट ठेवली.

जीवन वृत्तांत :

स्वातंत्र्यपूर्व काळात औंध संस्थानातील पाचगणी जवळील दांडेघर या गावी राहणाऱ्या कळंबे या एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात दत्तात्रय कळंबे यांचा जन्म इ. स. १९१९ मध्ये झाला.[६३] त्यांच्या वडीलांचे नाव यशवंतराव व आईचे नाव तानुबाई असे होते. या कळंबे कुटूंबाचे मूळ गाव महाबळेश्वर तापोळा रस्त्यावर १२ मैलावरील कळंबे हे होय. कळंबा गावचे रहिवाशी म्हणून कळंबे हे आडनाव रूढ झाले.[६४] पुढे कामानिमित्त हे घराणे मुंबईत स्थायीक झाले. दत्तात्रेय याचे बालपण व शिक्षण मुंबईतच झाले. त्यामुळे त्यांची कर्मभूमी मुंबई हीच बनली. परंतु मुंबईत राहून त्यांनी कार्य केले ते महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील लोकांकरीता. या डोंगरकपारीत राहणाऱ्या गरीब कुटुंबातील मुलांच्या कल्याणासाठीच ते आयुष्यभर झटले. दत्तात्रेय यांना शिक्षणापेक्षा भजन किर्तनाची आवड लागल्याने ते लहानपणीच भजन किर्तनात रंगू लागले. पुढे याच माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केले आहे.

कळंबे महाराजांचे कार्य :

भजनी मंडळातून सामाजिक प्रबोधन :

दत्तुबुवांनी श्री भैरव केदारेश्वर प्रासादिक भजनी मंडळाची स्थापना करून आपल्या भजनी मंडळाच्या ताब्यात २०–२५ साथीदारांना घेतले.[६५] या भजनाच्या माध्यमातून जी

बिदागी मिळत असे ती बिदागी स्वत:साठी न वापरता समाजासाठी खर्च करीत असत. त्यामध्ये प्रथम त्यांनी जमलेल्या या पैशातून त्यांनी प्रथम दांडेघरच्या केदारेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार केला.[६६] गावातील मुलांकरीता सात खणी प्राथमिक शाळेची इमारत बांधली. विठ्ठल मंदिरासमोर घाटवण पायऱ्या बांधल्या. म्हणजेच या भजनाच्या माध्यमातून आपल्या गावाचा कायापालट घडवून आणला.

मंदिराची उभारणी :

दत्तात्रय कळंबे महाराजांनी भजन कीर्तनाबरोबर लोकांना सांस्कृतिक कार्यातही सामावून घेतले. त्यामध्ये काही गावात वारकरी संप्रदायासाठी मंदिर उभारणीचे काम हाती घेतले व पाचगणीच्या मुख्य रस्त्याच्या कडेला सुंदर असे विठ्ठलमंदिर इ. स. १९६४ साली उभारले. इ. स. १९८४ साली कुडाळ खोऱ्यात करहर या मध्यवर्ती ठिकाणी महाराजांनी विठ्ठल मंदिर बांधून भाविकांना पंढरीच्या विठ्ठलाच्या दर्शनाचा लाभ दिला आहे.

दत्तात्रेय महाराजांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान :

दत्तुबुवा गाडगेबाबांच्या बरोबर विदर्भात असताना १९३६ मध्ये तेथे अखिल भारतीय काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू या नेत्यांचे दर्शन दत्तुबुवांना झाले. याच अधिवेशनात राष्ट्रीय विचारांची जाज्वल्य राष्ट्रभक्तीशी प्रत्यक्ष ओळख झाली. तेव्हापासून दत्तुबुवांनी भक्तीसंप्रदायाचा प्रचार करताना राष्ट्रभक्ती व देशसेवेची जाणीव करून देण्याचे ठरविले.[६७] महाराज प्रत्यक्ष देशसेवेच्या कार्यात सहभागी झाले नाहीत. परंतु देशासाठी कार्य करणाऱ्या नेत्यांना, क्रांतिकारकांना त्यांनी वेगवेगळ्या पद्धतीने मदत केली. त्यामध्ये सातारच्या प्रतिसरकारला सर्वोतोपरी मदत केली आहे.

ह. भ. प. दत्तात्रय महाराज कळंबे, जावळी खोऱ्याचे भाग्यविधाते
(जन्म इ. स. १९१९ मृत्यू इ. स. २००३)
सौजन्य : बेलोशे गावातील मंदिरातून.

माजी आमदार भि. दा. भिलारे गुरूजी – सर्वोदय योजनेचे संचालक व स्वातंत्र्यसेनानी

शैक्षणिक कार्य :

शिक्षणामुळे समाज सुसंस्कृत होऊन त्याचा विकास होतो. या विचाराचे दत्तुबुवा असल्याने, त्यांनी आपल्या भजन, कीर्तनाबरोबर सामाजिक, शैक्षणिक कार्याकडेही लक्ष दिले. आपल्या भजनाच्या बिदागीच्या पैशाचा व इतरांकडून मिळविलेल्या आर्थिक मदतीतून अनेक शैक्षणिक इमारतींची उभारणी केली. त्यामध्ये आपल्या दांडेघरच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून गावामध्ये ७ खणी प्राथमिक शाळेची इमारत बांधली.

पाचगणी येथे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले हायस्कूल (इ. स. १९६५) व ज्युनिअर कॉलेजसाठी (इ. स. १९७६) महाराजांनी रजनीकांत मेहता यांच्याकडून त्यांच्या माता कान्ताबेन यांचे नावे देणगी मिळवून दिली. तसेच आज पाचगणीसारख्या ठिकाणी सिनिअर कॉलेज सुरू व्हावे यासाठीही कळंबे महाराजांनी प्रयत्न केले. तसेच इंग्लंड स्थित उद्योगपती मधूभाई मेहता यांच्याकडून पन्नास लाखाची देणगी या कॉलेजच्या इमारतीसाठी मिळवून दिली. १९९८ मध्ये येथे दोन मजली भव्य इमारत, सांस्कृतिक सभागृहाची उभारणी कळंबे महाराजांच्या आशिर्वादाने झालेली दिसून येते. वाई येथील महाविद्यालयासाठी स्वातंत्र्यसेनानी किसन वीर यांचे विनंतीवरून महाराजांनी मुंबईहून २८ हजार रुपये जमवून कॉलेजच्या अडचणीच्यावेळी पाठवून दिले होते.

कळंबे महाराजांनी ज्या प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या इमारती बांधून दिल्या. त्या प्रत्येक शाळेच्या इमारतीचा बांधकामाचा इतिहास वेगवेगळा आहे. त्यासाठी अनेकांचे श्रम, पैसा व कौशल्य वापरण्यात आले. त्यामध्ये महाराजांचे मार्गदर्शन, स्थानिक लोकांचे श्रम व धनिकांच्या देणग्या या त्रिवेणी संगमातून लोकमंगल कार्ये उभी राहिली आहेत. कामे सुरू केल्यापासून पुरी होईपर्यंत महाराज त्या कामात एकरूप होत. पण काम संपल्यावर कोणत्याही शाळेच्या कारभाराशी त्यांनी संबंध ठेवला नाही.[६८]

पतसंस्था व बँकांची निर्मिती :

कळंबे महाराज कीर्तनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या बाहेर परप्रांतात गेलेले असताना तिथे त्या प्रांताचा झालेला आर्थिक विकास पाहिल्यावर आपल्याही भागातील बांधवांचा

आर्थिक विकास व्हावा यासाठी कोणत्या उपाय योजना करता येईल याचा विचार करू लागले व त्यातुनच बचतीचा मार्ग शोधला.

१) जावली सहकारी पतपेढीची स्थापना :

जावली भागातून मुंबईत आलेल्या कामगाराला बचतीची सवय लागावी, त्याच्या छोट्या मोठ्या गरजांसाठी कर्ज काढण्यासाठी सावकारांकडे जावे लागू नये म्हणून कळंबे महाराजांनी केवळ १५ हजार रुपये भागभांडवल गोळा करून जावली सहकारी पतपेढी काढण्याचा निर्णय घेतला व इ. स. १९५५ मध्ये या पतपेढीचे उद्घाटन झाले.[६९] आजही ही पतपेढी सुरू आहे.

२) माथाडी कामगारांसाठी पतपेढ्या काढण्यास प्रोत्साहन :

''आपण प्रतिकूल परिस्थितीमधील तसेच नैसर्गिकरित्या मागास भागातील म्हणून दुर्लक्षलले आहोत.''असे जावली भागाचे वर्णन करताना महाराज म्हणत. जावळीसारख्या दुर्गम भागातून कामासाठी मुंबईत गेलेल्या माथाडी कामगारांना थोड्या भागभांडवलाच्या सहकार्याने पतपेढ्या सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. लोकांना बचतीची सोय व्हावी व आर्थिक गरजाही पूर्ण करता याव्यात या हेतूने प्रथम मेटल बाजार कामगार सहकारी सोसायटी, कापड बाजार सहकारी सोसायटी, वाई तालुका वैभव क्रेडीट सहकारी सोसायटी स्थापन केल्या. या पतपेढ्यांचा अनुभव लक्षात घेऊन सहकारी बँक काढण्याचा कापड बाजार माथाडी कामगारांनी केला व सह्याद्री सहकारी बँक जन्माला आली.[७०] या बँकेचे संस्थापक नामदेवराव कदम हे होते. त्यांनी महाराजांच्या मदतीनेच ही बँक सुरू केली. अशा प्रकारे कळंबे महाराज स्वत:साठी नाही तर कष्टकरी जनतेसाठी सदैव प्रयत्नशील राहीले.

दि जावली सहकारी बँक लिमिटेडची स्थापना :

जावली तालुक्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी प्रथम आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. याच गरजेतून महाराजांनी सहकारी तत्वावर अवघ्या एक महिन्यात बँक सुरू करण्यास लागणारे भागभांडवल जमविण्याचा निश्चय करून एक लाख पंचवीस हजाराचे भागभांडवल जमविले. ही रक्कम कोणत्याही धनिकाकडून गोळा न करता जावली, वाई,

कोरेगांव तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने दिला पाहिजे असा दंडक घालून दिल्याने १० रुपयांपासून २ हजारापर्यंत भागभांडवल सामान्य लोकांनी महाराजांच्याकडे सुपूर्त केले. महाराजांनी त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या मंजूरीने इ. स. १९ जुलै, १९७३ रोजी दि जावली सहकारी बँक लिमिटेडचे रजिस्ट्रेशन केले.[७१]

यासाठी ते सहा महिने अविश्रांत कष्ट करत होते. बँकेची नोंदणी झाली असली तरी जागेचा प्रश्न होता. मुंबईत ताबडतोब जागा मिळणे अवघड होते. पण महाराजांनी सॅम्युल स्ट्रीट,मसजिद बंदर, मांडवी चेंबर्समधील तिसऱ्या मजल्यावर दरमहा १०० रुपये भाड्याने मिळविली. बँकेचे पहिले चेअरमन म्हणून महाराजांची निवड झाली. दि. ७ सप्टेंबर १९७३ रोजी ना. वसंतदादा पाटील व मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांच्या हस्ते जावली बँकेचे उद्घाटन झाले.[७२]

केवळ एक लाख पंचवीस हजार रुपये भागभांडवलावर सुरू केलेल्या या बँकेचे भागभांडवल ६० लाखापर्यंत गेले आहे. १९०० सभासदांचे १०,००० सभासद झाले आहेत. आज जावली बँकेच्या २० शाखा आहेत. ठेवी एक हजार कोटीच्या आहत. सध्या या बँकेचे पितामह भि. दा. भिलारे गुरूजी, अध्यक्ष विजयकुमार भिलारे, उपाध्यक्ष चंद्रकांत गावडे हे काम पाहत आहेत.

माथाडी कामगारांसाठी योगदान :

कळंबे महाराज मुंबईत १९३९ पासून भजन किर्तन करीत होते. महाराजांच्या सानिध्यात येणारे लोक त्यांचे अनुयायी किंवा मित्र बनत. हे सर्व कामगार होते. त्यामुळे त्यांचे प्रश्न हे महाराजांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न होऊन बसले. महाराज दिवसरात्र या कामगारांच्या सानिध्यात असल्याने त्यांच्या विचारातून या श्रमजीवी लोकांना संघटीत करण्याचा विचार पुढे आला. सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोक मुंबईत आल्यानंतर त्यांना ताबडतोब काम मिळण्याचे माध्यम म्हणजे ओझी उचलण्याचे हमाली काम होय. माथ्यावरून ओझी उचलणाऱ्या हमालांना माथाडी म्हणत. मात्र खाजगी ठेकेदार व मुकादम या हमालांची पिळवणूक करीत होते. त्यांनी केलेल्या कामाची मजूरी व्यापाऱ्यांकडून किती घेतली याची

चौकशी करता येत नव्हती. मुकादम देतील ते पैसे मुकाट्याने घ्यावे लागत असे. त्यामुळे कष्ट करणारे कामगार गरीबच राहीले तर मुकादम गब्बर बनले.

अशा या माथाडी कामगारांवरील अन्याय दूर व्हावा, त्यांना सुरक्षितता मिळावी म्हणून महाराजांनी त्यांच्या संघटना बांधण्यास मार्गदर्शन केले. माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन करण्यास जे कार्यकर्ते पुढे आले त्यांना मार्गदर्शन महाराजांनी केले.[७३] महाराज माथाडी कागमार संघटना व महाराष्ट्र शासन यामधील दुवा होऊन राहिले होते. शेवटी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील, किसन वीर, बाळासाहेब देसाई, नरेंद्र तिडके यांचा सक्रिय पाठिंबा व लेबर कमिशनवर टी. आर. भागवत यांचे परिश्रमाने १९६९ साली मुंबई माथाडी कामगार कायदा महाराष्ट्र शासनाने मंजूर केला.[७४] म्हणजेच माथाडी कामगार संघटीत व्हावेत, त्यांची संघटना बांधून त्यांना कायद्याचे संरक्षण मिळावे यासाठी माथाडी कामगार नेते कै. अण्णासाहेब पाटील यांचे नाव असले तरी या सर्वाला राजकीय, सामाजिक पाठबळ देणारे मात्र दत्तात्रय कळंबे महाराज होते.

पाचगणीत राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन :

पाचगणीत राज्यस्तरीय कबड्डी सामने भरविण्यापाठीमागे महाराजांचा एकच उद्देश होता तो म्हणजे पाचगणीच्या आसपास डोंगरी भागात राहाणाऱ्या मुलांमध्ये आवड निर्माण व्हावी व आपली मुलेही बाहेर जाऊन या खेळात प्राविण्य मिळवावे. त्यांचा हा उद्देश आज सफल झाला आहे. पाचगणीची कबड्डी टीम ही राष्ट्रीय स्तरावर पोहचली आहे. पाचगणीत कबड्डीचे सामने भरविण्यासाठी पाचगणी व्यायाम मंडळ हे १९६० साली स्थापन केले. त्या मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणून दत्तात्रेय कळंबे महाराज यांची निवड झाली. ते या पदावर त्यांच्या मृत्यूपर्यंत राहीले. हे कबड्डी सामने भरविण्यासाठी संपूर्ण सहकार्य हे शामराव आपटेकर यांचे असे. ते सातारा जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सरचिटणीस होते. कळंबे महाराज हे आध्यात्मिक गुरू असले तरी त्या पदाचा वापर संपूर्ण समाजासाठी केला. त्यासाठी त्यांनी राजकारण, अर्थकारण, समाजकारणातून जावळी भागातील गोरगरीब जनतेला पुढे आणले. त्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण केला.

दत्तात्रेय महाराज कळंबे यांचा अंतिम कार्यकाल बेलोशी या ठिकाणी :

कळंबे महाराजांनी जन्मल्यापासून आपले सारे आयुष्य मुंबईत व्यतीत केले. परंतु आपली जन्मभूमीचे ऋण फेडण्यास ते विसरले नाहीत. मुंबईत राहून जावलीसारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या गोरगरीब लोकांसाठीच आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. प्रत्येक काम हाती घेतले ते आपल्या परिसरातील समाजसाठी. त्यामुळे मुंबईत राहणारा कष्टकरी हमाल असो, माथाडी कामगार असो, शिक्षण घेण्यासाठी येणारा विद्यार्थी असो किंवा नोकरी शोधण्यास येणारा सुशिक्षित बेकार असो. या सर्वांना आसरा दिला. त्यांच्या आयुष्याला दिशा दिली व पाचगणीच्या आसपासच्या परिसरातील लोकांच्या घराघरात प्रकाश निर्माण केला. अखंड चाळीस वर्षे मुंबईत व्यतीत केल्यानंतर महाराज प्रकृती कारणास्तव १९६० पासून पाचगणीत येऊन राहात असत.

पाचगणीत ते परबती हरी राजपूर यांच्या एका खोलीत राहत. काही काळ अण्णाभाऊ बगाडे यांच्याकडे राहत. तर काही वेळा दांडेघर येथेही मुक्काम असे. बेलोशीत समाज मंदिर बांधल्यानंतर या भागातील लोक महाराजांना या समाज मंदिरात येऊन राहण्याचा आग्रह करीत. महाराज १९८४ साली बेलोशी गावातील समाजमंदीरात राहावयास गेले. त्यामुळे या गावाला एक वेगळी ओळख मिळाली. महाराज जावळी खोऱ्यातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी अखंड कार्य करीत राहिले. आपले कार्य करीत असतानाच बेलोशी येथेच त्यांनी जीवन ज्योत दि. २ जानेवारी २००३ साली अनंतात विलीन झाली. अशा प्रकारे आपले संपूर्ण आयुष्य ज्या मातीत जन्माला आले त्या मातीत विलीन केले.

२.४.२ भि. दा. भिलारे गुरूजींचे योगदान :

व्यक्तिगत जीवन जेव्हा समाजजीवनाचा भाग ठरतो तेव्हा त्या जीवनाला विशेष अर्थ प्राप्त होतो, अशी व्यक्ती म्हणजे भिलारे गुरूजी. भिलारसारख्या दुर्गम खेड्यात जन्माला आलेली एक सर्वसामान्य व्यक्ती जेव्हा समाजासाठी आणि देशासाठी महान कार्य करते तेव्हा त्या व्यक्तिमत्त्वाला आपोआप विशेष अर्थ प्राप्त होतो. भिकू दाजी भिलारे प्रथम शिक्षक,

सर्वोदय योजनेचे संचालक व स्वातंत्र्यचळवळीनंतर काँग्रेस पक्षाचे कार्य करीत असताना जावळी भागातून आमदार म्हणून काम केले.

बालपण व शिक्षण :

भिकू दाजी भिलारे यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९१९ रोजी महाबळेश्वर तालुक्यातील भिलार या गावी झाला.[७५] त्यांचे कुटूंब हे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे कुटूंब होते. भिकूच्या वडीलांचे नाव दाजी आईचे नाव जाईबाई होते. भिलारे यांचे मूळ आडनाव सपकाळ असे होते. परंतु भिलार गावात राहात असल्याने त्या गावाच्या नावावरून भिलारे असे आडनाव पडले. गावात दुसरीपर्यंत शिक्षणाची सोय होती. भिकूला गावच्या शाळेत दुसरी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी पाचगणीला शाळेत घातले. पाचगणीत पाचवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर इयत्ता ६ वी साठी महाबळेश्वरला जावे लागले. याच शाळेत शिकत असताना शाळेतील शिक्षकांनी देशप्रेमाची आवड निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या मनात स्वातंत्र्य चळवळीच्या भावना रूजविल्या. त्यामुळे बालपणीच भिकूच्या मनावर स्वातंत्र्य–चळवळीचे संस्कार झाले. इ. ७ वी ची परीक्षा १९३६ साली दिल्यानंतर शिक्षकाची नोकरी मिळाली. भिकू हा भि. दा. भिलारे गुरूजी बनले.[७६] शिक्षक म्हणून काम करीत असताना समाजातील अनेक अनिष्ट प्रथा मोडण्याचा प्रयत्न केला.

पाचगणीच्या शाळेचा विस्तार :

भिलारे गुरूजी पाचगणीच्या शाळेत शिक्षक म्हणून काम करीत असताना या शाळेत पाचवी पर्यंतच वर्ग भरत होते. पाचवीनंतर या भागातील विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी महाबळेश्वरला जावे लागे. पाचगणीच्या आसपास असणाऱ्या खिंगर, काटवली, आंब्रळ, घोटेघर या गावातील विद्यार्थ्यांनाही पुढील शिक्षण घेता यावे यासाठी पाचगणीत सहावीचा वर्ग सुरू केला. पुढील वर्षी सातवीचा वर्ग सुरू केला व गुरूजींना शिक्षणासाठी झालेला त्रास पुढील विद्यार्थ्यांना होऊ नये व सर्वांना शिक्षण घेता यावे या दृष्टीने शाळेचा विस्तार घडवून आणला. भारत हा ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्यांनी शिक्षकाच्या नोकरीला रामराम ठोकला व लोकशिक्षणाकडे वळले. समाजामध्ये असणारी गरीबी, अशिक्षितपणा,

अनिष्ट चालीरिती दूर करण्यासाठी गुरूजी राष्ट्रसेवादलात भरती झाले. राष्ट्रसेवादलाचे शिक्षण घेऊन गावोगावी राष्ट्रसेवादलाच्या शाखा सुरू केल्या.

ब) म. गांधीजींचे पाचगणी येथे प्राण रक्षण :

पाचगणीचे हवामान आल्हाददायक व आरोग्यदायी असल्याने अनेक राजकीय मंडळी पाचगणीस विश्रांतीसाठी येत असत. त्यामध्ये १९४२ च्या चलेजाव चळवळीनंतर ऑक्टोबर १९४२ साली राष्ट्रपिता महात्मा गांधी, महादेवभाई व कस्तुरबा गांधी यांच्या समवेत पाचगणी येथे विश्रांती घेण्यासाठी आले होते. तेव्हा भिलारे गुरूजी राष्ट्रीय सेवा दलाचे तालुक्याचे प्रमुख म्हणून काम पाहत होते. त्यामुळे म. गांधींना मानवंदना व सूतांजली अर्पण करण्याचा मान मिळाला.[७७] शिवाय म. गांधी जिथे राहात होते तेथील साफसफाई करणे, प्रार्थनेची व्यवस्था करणे इ. कामे गुरूजींना आपल्या कार्यकर्त्यांसोबत करण्याची संधी मिळाली होती. म. गांधी विश्रांतीसाठी पाचगणीत आले असले तरी त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमात कोणताही बदल नव्हता. त्यांच्या नियमाप्रमाणे सायंकाळची प्रार्थना त्यावेळी बाथा हायस्कूलच्या प्रांगणात होत असे.[७८] म. गांधींजींच्यावर चार वेळा प्राणघातक हल्ले जे झाले होते त्यापैकी एक हल्ला पाचगणीत झाला होता. नेहमीप्रमाणे बाथा हायस्कूलच्या मैदानावर सायंकाळच्या प्रार्थनेच्यावेळी सर्वजण जमलेले असताना एक तरुण मुलगा हातात सुरा घेऊन म. गांधीजींच्या अंगावर धावून आला. तेव्हा गांधीजींची सेवा करणारे सेवादलातील कार्यकर्ते त्यांच्या सोबत होते. त्यात भिलारे गुरूजीही होते. त्यांनी प्रसंगावधान राखून त्या तरुणाला अडविले व त्याच्या हातातील सुरा हिसकावून घेतला व त्याला पोलीसांच्या ताब्यात दिला. हा तरुण मारेकरी होता नथूराम गोडसे.[७९] गांधीजींनी तेव्हा त्या नथूराम गोडसेला शिक्षा करण्याऐवजी भेटण्यासाठी बोलविले होते. परंतु तो गांधीजींच्या भेटीस आला नाही. म. गांधीजींच्या प्राण रक्षणाचे फार मोलाचे कार्य गुरूजींच्या हातून घडले होते. यावरून गांधीजींची हत्या ही राजकीय विचारसरणीने झाली नाही तर हा हल्ला धार्मिक व परंपरावादी विचारसरणीने झाला होता, असे सिद्ध होते.

भिलारे गुरूजींचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान :

इ. स. १९४२ साली म. गांधींनी इंग्रजांविरुद्ध शेवटचा लढा पुकारला व क्रांतिकारकांना लढो या मरोचा मंत्र दिला. तेव्हा भिलारे गुरूजी स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या स्वातंत्र्यलढ्यात सातारची भूमिगत चळवळ व प्रतिसरकार क्रियाशील झालेले असताना गुरूजींनी अनेक भूमिगतांना आपल्या गावात आश्रय दिला. पांडुरंग बगाडे याच्या सोबत गोव्याला सायकलवरून दयानंद बांदोडकरांना भेटण्यास गेले व त्यांच्याकडून आर्थिक मदत गुरूजी घेऊन आले.[८०] प्रति सरकारच्या लिंब, गोवे, करंजखोप, पार्ले, कामेरी याठिकाणी होणाऱ्या गुप्त बैठकांना उपस्थित राहणे, तिथल्या कार्यकर्त्यांची कामे करणे इ. या पद्धतीने स्वातंत्र्यासाठी कामे करीत. गुरूजींनी स्वयंसेवकाच्या भूमिकेतून केलले काम म्हणजे स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी तळहातावर शिर घेतले होते अशा थोर क्रांतिकारकांना आपल्या परीने केलेली मदतही खूप मोठी होती. पुढे भिलारे गुरूजींना स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यसैनिकाचे मानधन मिळावे म्हणून इतर कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. परंतु गुरूजींनी ते मानधन मोठ्या मनाने नाकारले.[८१] तसेच स्वातंत्र्य लढ्याच्या काळात त्यांच्या जीवनावर उदात्त मूल्यांचे जे संस्कार झाले ते आयुष्यभर निष्ठेने जपले.

भिलारे गुरूजींचे कार्य :

ग्रामोन्नती संघ :

राष्ट्रसेवादलाचे माध्यमातून काम करीत असताना खेड्यापाड्यात, डोंगरकपारीत राहाणाऱ्या समाजाचा विकास केल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही हे लक्षात घेऊन इ. स. १९४३ सालीच ग्रामोन्नती संघाची स्थापना करण्यात आली.[८२] ग्रामोन्नती संघामार्फत डोंगर–कपारीतील गोरगरीब माणूस आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावा, त्याचे जीवनमान उंचवावे, त्याचा शैक्षणिक, वैचारिक विकास व्हावा या दृष्टीने महाबळेश्वर, जावली, वाई या तालुक्यातील ९२ गावांना एकत्र करून ग्रामोन्नती संघ स्थापन करण्यात आला. या संघामार्फत विविध उपक्रम राबविले जाऊ लागले. समाजातील प्रौढ लोकांना साक्षर करण्यासाठी शाळा, प्रौढ शाळा काढणे, वाचनालय काढणे, बालविवाहाला प्रतिबंध व लग्नातील खर्च कमी करणे, लग्नकार्य हे

तीन दिवसाऐवजी एका दिवसात संपविण्याची प्रथा सुरू केली. या ग्रामोन्नती संघामुळे समाजामध्ये जागृती होऊन बालविवाहाला आळा बसला. हुंडा पद्धत आटोक्यात आली. कमी खर्चात लग्न होऊ लागली. शिक्षणाकडे लोकांचा कल वाढला. त्याचा उपयोग राष्ट्रीय चळवळीसाठी झाला.

सर्वोदय योजनेचे संचालक काळातील कार्य :

सर्वोदय ही एक परंपरागत भारतीय समाजव्यवस्थेची नैतिक तत्वांच्या आधारे अमूलाग्र पुनर्बांधण करण्याची एक विचारप्रणाली होय. सर्वांचे कल्याण, सर्वांचा उदय, असा सर्वोदय शब्दाचा भावार्थ आहे.[८३] सर्वोदय ही कल्पना प्रथम म. गांधींनी आणली. जैन दर्शनातील विचार आणि रस्कीनच्या 'Unto This Last' या पुस्तकावरून गांधीजींना हा विचार सुचला व गांधीजींनी रस्कीनच्या या पुस्तकाचे भाषांतर करून गुजराती भाषेत त्या पुस्तकाला 'सर्वोदय' असे शिर्षक दिले.[८४] तेव्हापासून सर्वोदय योजना ही कल्पना अंमलात आली. सर्वोदय हा विचार ठराविक एका गोष्टीपुरता संकुचित नाही, तर तो राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, उद्योग, रोजगार, व्यवसाय इ. घटकांशी निगडीत आहे. त्यामुळे या सर्वोदयमध्ये सगळे सारखे आहेत. कोणीही उच्च व नीच नाही. सर्वांना विकासाची संधी समान आहे. त्यामुळे सर्वांना सारखे शिक्षण दिले जाईल. अशी प्रचंड व्यापकता या विचाराची आहे.

महाराष्ट्रात सर्वोदय योजनेची सुरूवात (इ. स. १९४७) :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुंबई राज्यातील गोरगरीब जनतेची सेवा करण्याच्या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्यात एक सर्वोदय केंद्र स्थापन करण्याची योजना शासनातर्फे करण्यात आली. त्यानुसार सातारा जिल्ह्यातील सह्याद्रीच्या डोंगर कपारीत राहणाऱ्या गरीब जनतेच्या विकासासाठी महाबळेश्वर येथे एक सर्वोदय केंद्र स्थापन करण्यात आले.[८५]

१९५२ साली बाबासाहेबांना मुंबई असेंब्लीच्या निवडणुकीसाठी तिकीट मिळाले व ते त्या निवडणुकीत निवडून आले. त्यामुळे जावळी तालुकयाची जबाबदारी म्हणजेच सर्वोदय योजनेच्या संचालक पदाची जबाबदारी भिलारे गुरूजींना देण्यात आली. या योजनेत सातारा

जिल्ह्यामधील काही गावे, महाबळेश्वर तालुक्यातील ९० व जावली तालुक्यातील ६० गावांची निवड केली होती.[८६]

सर्वोदय योजनेतून केलेले काम :

महाबळेश्वर भागातील शेतकऱ्याकडे असणारी जमिन ही तुटपुंजी, डोंगर उतारावरची व निसर्गाच्या लहरीवर अवलंबून होती. अशा शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जाऊ लागले. त्यामध्ये वर्षभर पुरेल एवढे धान्य उत्पादनासाठी सुधारीत बियाणे, खते, सुधारीत तंत्रज्ञान यांचा वापर करण्यास प्रवृत्त केले जावू लागले.

पाणी पुरवठा योजना :

सह्याद्रीच्या डोंगररांगेवर २५० ते ३०० इंच पाऊस पडतो परंतु हे पाणी केवळ या भागाला सहा महिने पुरते. पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरून जाते ते पाणी स्थानिक अभियंत्यांच्या मदतीने ह्या झऱ्याच्या उमगस्थानी गॅल्व्हनाईझ पाईप बसविले व ते थेट गावापर्यंत आणले. गावाच्या मध्यभागी एक टाकी बांधली व टाकीला नळ बसविले. अशाप्रकारे खेड्यापाड्यातून पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या महिलांसाठी ही एक आनंददायी योजना ठरली. गावाला स्वच्छ पाणी मिळाले व गावचे आरोग्यही सुधारले.

गाव तिथे शाळा ही योजना :

सर्वोदय योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या ९०–९२ गावांपैकी फक्त तीन गावात शाळा होत्या. त्यापैकी एक लोकल बोर्डाची शाळा व दोन रयत शिक्षण संस्थेच्या होत्या. तेव्हा प्रत्येक खेड्यामधील मुलांना २/३ कि. मी. पेक्षा जास्त चालावे लागू नये म्हणून प्रत्येक गावात शाळा काढली. संचालकांच्या अधिकारात शिक्षकांची नेमणूक केली. शिक्षक नेमताना गावातीलच शिक्षक नेमला. त्यामुळे शेतकऱ्याच्या मुलांना नोकरी मिळाल्याने तो शिक्षक झपाटून कामाला लागला.

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी – कार्य :

जावली तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणून काम करीत असताना गुरूजींना एक मोठी जबाबदारी पार पाडावी लागली होती. ती म्हणजे ३० नोव्हेंबर १९५७ रोजी भारताचे

पंतप्रधान पंडीत नेहरू यांच्या हस्ते प्रतापगडावर छ. शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे अनावरण.[८७] मात्र याला संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या कार्यकर्त्यांचा प्रचंड विरोध होता. कारण पं. नेहरूंनी आपल्या Discovery of India मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल काही वादग्रस्त विधाने केली होती. त्यामुळे हा कार्यक्रम शांततेने पार पाडण्याची जबाबदारी सहाजिकच भिलारे गुरूजी व त्यांच्या कार्यकर्त्यांवर येऊन पडली. तेव्हा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सामान्य कार्यकर्त्यांपासून थोर नेते श्रीपाद डांगे, प्र. के. अत्रे, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे या नेत्यांनी उभ्या महाराष्ट्रातून वाई–जावली खोऱ्यात नेहरूंविरोधी प्रचंड फौज जमविली होती.[८८] परंतु इंग्रजांना पाणी पाजणाऱ्या सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कमिटीने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांना थांगपत्ता लागू न देता नेहरूंना प्रतापगडावर आणले व त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. अशी प्रचंड मोठी जबाबदारी भिलारे गुरूजींनी पार पाडली.

विधानसभा व विधान परिषद सदस्य म्हणून केलेले कार्य :

भिलारे गुरूजींचे समाजकारण व राजकारण काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून घडले. सेवादलापासून स्वातंत्र्य चळवळीमध्ये काम करीत असतानाच गुरूजींच्यावर विविध जबाबदाऱ्या पडल्या. त्यापैकी एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे त्यांना इ. स. १९६२ साली विधान सभेचे जावली मतदार संघाचे आमदार म्हणून निवडून दिले.[८९] आमदार म्हणून काम करीत असताना त्यांच्यावर पहिली मोठी जबाबदारी पडली ती कोयना धरणग्रस्त विस्थापितांचे पुनर्वसन करणे. हे पुनर्वसन कोयना, कांदाटी, सोळशी या भागात करावयाचे होते. मात्र हा भाग अतिशय दुर्गम, दाट जंगल, जाण्यासाठी रस्ते नाहीत, वाहतुकीची सोय नाही. अशा परिस्थितीत गुरूजींनी हा सारा प्रवास पायी केला व या भागातील प्रत्येक गावातील प्रत्येक कुटुंबांपर्यंत पोहचून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व शासनाकडून जमिनी व आर्थिक मदत मिळवून दिली. इ.स. १९६७ च्या कोयना भूकंपात जावळी, पाटण, कोयना या भागातील लोकांचे जे प्रचंड नुकसान झाले होते त्या लोकांचे पुनर्वसन करण्याचे काम गुरूजींनी केले..

पाचगणीच्या पाण्याचा प्रश्न मिटविला :

भिलारे गुरूजी इ. स. १९६२ ला आमदार झाले तेव्हा पाचगणी, महाबळेश्वर या दोन पर्यटन स्थळांना पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. या दोन्ही शहरांना पाणीपुरवठा विहीरीच्या माध्यमातून होत असे. तेव्हा गुरूजींनी आपल्या आमदारकीचे वजन वापरून कृष्णा नदीवर वाईच्या पश्चिमेला लिफ्ट तयार करून चार ठिकाणी पाणी वर उचलून दोन हजार फूट उंचीवर आणले.[९०] ही योजना महाराष्ट्रातील सर्वात खर्चिक योजना होती. गॅलनला चौदा आणे म्हणजे दुधापेक्षा पाणी महाग होते. परंतु हे अत्यंत खर्चिक काम गुरूजींनी शासनाकडून करून घेतले. महाबळेश्वरला वेण्णा लेक बरोबरच बिरवाडीच्या मोठ्या ओढ्याला बंधारा घालून पाणी महाबळेश्वरला चढविले.[९१] अशा प्रकारे या दोन शहरांचा पाण्याचा प्रश्न गुरूजींच्या प्रयत्नामुळे सुटला.

भिलारे गुरूजींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण :

पाचगणी हे ब्रिटीशकालीन आरोग्यधाम असल्याने याठिकाणी अनेक भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील नेते विश्रांतीसाठी येत असत. त्यापैकी पंडीत जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, सरहद्दी गांधी खान अब्दुल गफार खान, मौलाना आझाद, विनोबा भावे इत्यादी मंडळींचा सहवास भिलारे गुरूजींना लाभला व त्यांच्यावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडता. त्यामुळे गुरूजी आजही अत्यंत साधे व नम्र असलेले दिसतात. विनोबा भावेंच्या भूदान चळवळीत स्वत:ची दीडशे एकर जमीन दान करून टाकली. ''जीवनातील पावित्र्य हीच उच्चतम व सत्य अशी कला होय. ज्याचे जीवन सुंदरतम आहे तो श्रेष्ठ प्रतीचा कलावंत होय.' या गांधीजींच्या विचाराला जुळणारे गुरूजींचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी सदैव निरपेक्षपणे समाजाची सेवा केली. नम्रता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा गुण. गुरूजी आज ९० वर्षांचे आहेत तरीही सतत कार्यमग्न आहेत. म्हणजेच सदासर्वदा कार्यरत असणे हा गुरूजींचा बाणा.

सारांश :

सातारा ही मराठ्यांची राजधानी म्हणून संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. याच सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी हे महाराष्ट्राचे काश्मिर म्हणून ओळखले जाते. या दोन शहराची ओळख ही ब्रिटीशकाळात झाली. जॉन चेसन इ. स. १८५४ मध्ये पाचगणी हे शहर वसविले. हळूहळू वसाहत वाढत गेली व या शहराचा विकास घडून आला. या शहराच्या विकासात युरोपियन अधिकाऱ्यांबरोबर इथला स्थानिक समाजाचे योगदानही मोठे आहे. स्थानिक समाजाने युरोपियनांच्या सोबत राहून स्वत:चा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास घडवून आणला. हे करत असताना आपली मूळ संस्कृती, परंपरा याला धक्का लागू दिला नाही. त्यामुळे या शहरात अनेक जाती धर्माचे श्रीमंत, गरीब लोक राहात असले तरी या सर्वांनी आपल्या सामाजिक बांधिलकीची चौकट कधी ओलांडली नाही. या शहरातील सण, उत्सव, परंपरा, कुटुंब व्यवस्था, सामाजिक रूढी ह्या कोणताही संघर्ष न होता जपल्या गेल्या आहेत. या भागातील सर्व समाजाला बांधून ठेवण्याचे कार्य येथील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ह. भ. प. कळंबे महाराज व भि. दा. भिलारे गुरूजी यांचे योगदान मोलाचे आहे.

संदर्भ सूची :

१. गर्गे स. म. (संपा.), सरदेसाई गोविंद सखाराम, मराठी रियासत, खंड – एक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण २०११, पृ. क्र. ३७.

२. कित्ता.

३. साळुंखे गणपत, 'असा घडला सातारा', संजीवन पब्लिकेशन्स, २०१२, पृ. क्र. १४.

४. Kulkarni Sumitra, The Satara Raj, Mittal Publications, New Delhi, 1995, पृ. क्र. २१.

५. Maharashtra State gazetteers, Satara Dist. (Re. Ed.) Volume XIX of The Original Gazet of the Bombay Presidency relating to Satara, 1963, पृ. क्र. १६५.

६. Kulkarni Sumitra, The Satara Raj, उपरोक्त पृ. क्र. २९.

७. मराठी रियासत खंड – सात, पृ. क्र. ३३६.

८. मि. जॉन माल्कम, सिडने ऑस्ट्रेलिया यांच्या नियोजित The Governor of Bombay Presidency Sir John Malkam या पुस्तकातून, (सौजन्य सौ. बोपर्डीकर पुष्पा, महाबळेश्वर यांच्या माहितीवरून)

९. मराठी विश्वकोश खंड – १२, पृ. क्र. १४०४.

१०. कित्ता.

११. कित्ता.

१२. Gazetter of the Bombay Presidency, उपरोक्त, पृ. क्र. ५३१.

१३. कित्ता.

१४. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ५२१.

१५. Gazetter of the Bombay Presidency उपरोक्त.

१६. सातारा जिल्हा गॅझेटिअर.

१७. Panchgani Hill Station Municipal Council modified as per letter No. न. प. क्षेत्र / पाचगणी / १८५८ दि. ८/९/१९९५ of A. D. T. P. Satara.

१८. चिकणे दीपक विठ्ठल, सदाबहार पाचगणी, प्रकृती प्रिंटर्स, सातारा, १९९९, पृ. क्र.२.

१९. Irina Chelysheva : The Blue Mountains of Panchgani, Nirman Impress Pvt. Ltd., Mumbai, 2000, पृ. क्र. ३४.

२०. कित्ता.

२१. Raobahadur Parsnis D. B. : 'Mahableshwar', Lakshmi Art Printing Works, Byculla, 1916, पृ. क्र. ११७

२२. Dixit V. K. (Edit), 'Panchgani', Kamal Printing Press, Pune, पृ. क्र. ६.

२३. http // mr . wikipedia . org / co / index

२४. Public Works Department, Report to Bombay Presidency, Volume No. 34, File No. S. Y. 47 / 1862, Bombay Archaeology Dept.

२५. सातारा जिल्हा गॅझेटियर.

२६. राज्य परिवाहन महामंडळ पाचगणी शाखा माहिती फलक.

२७. Gazetteer of the Bombay Presidency, Satara District, Volume XIX, Originally printed in 1885, Printed at The Govt. Phto-zincographic Press, Pune 1989, पृ. क्र. ५३०.

२८. महाबळेश्वर वेधशाळा रेकॉर्ड.

२९. कित्ता.

३०. कित्ता.

३१. दै. ऐक्य, वर्धापन दिन विशेषांक, लेख दीपक दीक्षीत, पाचगणीतील दुर्मिळ वनस्पती, २१ मार्च २०११,

३२. कित्ता.

३३. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ६२८.

३४. लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), मराठी विश्वकोश खांड – ९, पृ. क्र. ६६७.

३५. Gazetter of the Bombay Presidency, उपरोक्त, पृ. क्र. ५३२.

३६. Panchgani the Crown Electric Printing Works, Fort, Bombay, पृ. क्र. २.

३७. जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ, १९२१ ते २०११, सातारा जिल्हा कार्यालय.

३८. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. २१४.

३९. दै. तरुण भारत, दि. १८/३/२०१३.

४०. पाटणे संभाजीराव, लोकमित्र, देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी गौरव ग्रंथ, सार्थ मुद्रण, सातारा, १९९९.

४१. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शिक्षण विभाग अहवाल २०१०–११.

४२. शिर्के बी. जी., उद्योगपर्व (आत्मचरित्र), राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १८.

४३. कित्ता.

४४. पाटणे संभाजीराव (संपा.), 'लोकमित्र', उपरोक्त.

४५. कित्ता.

४६. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. २२४.

४७. कित्ता.

४८. कित्ता.

४९. शिर्के बी.जी., उद्योगपर्व (आत्मचरित्र), राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. क्र. २०.

५०. मुलाखत, जौन बेथलेहेम, बॉम्बे बेकरी मालक.

५१. मुलाखत, आप्पासाहेब मारुती कासुर्डे, शाहूनगर, पाचगणी, दि. १४ ऑक्टोबर २०११.

५२. पाटणे संभाजीराव, लोकमित्र, उपरोक्त.

५३. कित्ता.

५४. New Era School Prospect 2011-12.

५५. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, बांधकाम विभाग रजिस्टर.

५६. मुलाखत, भाऊसाहेब बिरामणे, पाचगणीतील ज्येष्ठ नागरिक, २० सप्टेंबर २०१३.

५७. भावे वासुदेव कृष्ण, महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९८, पृ. क्र. २८१.

५८. दै. सकाळ, ११ नोव्हेंबर २०१३.

५९. मुलाखत, तात्यासाहेब मालुसरे, १४ नोव्हेंबर २०१२.

६०. मुलाखत, मारुती पुजारी (घाटजाई देवस्थानचे पुजारी), पाचगणी, १४ मार्च २०११.

६१. शिंदे जगन्नाथ (संपा.), 'जिव्हाळा', ज्येष्ठ नागरिक संघ, वार्षिक अंक २०१२–१३.

६२. गोडवली मंदिर शिलालेख.

६३. धर्माधिकारी भा. वि., 'कर्मयोगी महाराज', ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबि जीवन चरित्र, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, पृ. क्र. ४.

६४. कित्ता.

६५. ह. भ. प. आण्णासाहेब भोसले महाराज (संपा.), ओवाळू आरती माझ्या पंढरीनाथा, प्रकाशन वै. ह. भ. प. दत्तात्रय महाराज कळंबे विश्वस्त मंडळ, आळंदी, ता. हवेली, जि. पुणे, मुद्रक मोरया ऑफसेट प्रिंटर्स, रहिमतपूर, २००९, पृ. क्र. ७.

६६. कित्ता.

६७. मुलाखत, ह. भ. प. दत्तात्रेय कळंबे महाराज पाचगणी, दि. ८ मार्च २००९.

६८. धर्माधिकारी भा. वी., कर्मयोगी महाराज, उपरोक्त, पृ. क्र. ३०.

६९. जावली सहकारी पतपेढी, मुंबई, वार्षिक अहवाल, २००७–०८.

७०. सह्याद्री सहकारी बँक, वाशी मुंबई, वार्षिक अहवाल, २००९–१०.

७१. दि जावली सहकारी बँक लि. मुंबई, रौप्य महोत्सवी स्मरणिका अंक.

७२. दि जावली सहकारी बँक लि. मुंबई, शिलालेख.

७३. धर्माधिकारी भा. वी., कर्मयोगी महाराज, उपरोक्त, पृ. क्र. ८६.

७४. 'माथाडी कामगार कायदा १९६९', माथाडी भवन कार्यालय, रजिस्टर.

७५. पाटणे संभाजीराव (संपा.), 'लोकमित्र', देशभक्त भि. दा. भिलारे गुरुजी गौरव ग्रंथ, सार्थ मुद्रण, सातारा १९९९, पृ. क्र. ३३४.

७६. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. एक, रजिस्टर फाईल.

७७. पाटणे संभाजीराव (संपा.), 'लोकमित्र', उपरोक्त, पृ. क्र. ३९४.

७८. बाथा हायस्कूल रेकॉर्ड फाईल १९४५.

७९. मुलाखत, भि. दा. भिलारे गुरूजी, भिलार या गावी दि. १६ जानेवारी २०१०.

८०. पाटणे संभाजीराव (संपा.), लोकमित्र, उपरोक्त, पृ. क्र. ३६२.

८१. कित्ता.

८२. कित्ता, पृ. क्र. १६७.

८३. भंडारी चारूचंद्र, भूदान यज्ञ समग्र दर्शन, परंधाम विद्यापीठ प्रकाशन, वर्धा, १९५६, दुसरी आवृत्ती, पृ. क्र. २६.

८४. मराठी विश्वकोश खंड १८, पृ. क्र. ८२७.

८५. मुलाखत, भि. दा. भिलारे गुरूजी, उपरोक्त.

८६. पाटणे संभाजीराव, 'लोकमित्र', उपरोक्त, पृ. क्र. ३२०.

८७. पाटणे संभाजीराव (संपा.), उपरोक्त, पृ. क्र. २२४.

८८. कित्ता.

८९. मुलाखत, भिलारे गुरूजी, उपरोक्त,

९०. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाणीपुरवठा विभाग, उद्घाटन समारंभ सोहळा कार्यक्रम पत्रिका, १९६४.

९१. पाटणे संभाजीराव, 'लोकमित्र', उपरोक्त.

प्रकरण ३ रे

पाचगणी : एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद

प्रकरण ३ रे

पाचगणी : ''एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद''

३.१ स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास

३.२ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे

- ३.२.१ प्राचीन कालखंड
- ३.२.२ मध्ययुगीन कालखंड
- ३.२.३ आधुनिक कालखंड

३.३ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद इतिहास व स्थापना

- ३.३.१ नगरपरिषदेचे वेगळेपण
- ३.३.२ कामकाजाची भाषा

३.४ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्रशासन

- ३.४.१ मुख्याधिकारी
- ३.४.२ नगराध्यक्ष

३.५ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद इमारतीचे नुतनीकरण

३.६ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद समित्या व त्यांचे कार्य

३.७ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद उत्पन्नाची साधने

३.८ शासकिय अनुदाने व अंशदाने

३.९ गिरिस्थान नगरपरिषद खर्च

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची नूतन इमारत (इ. स. २०१०)

रेव्हरंड थॉमस रोवन
प्रथम नगराध्यक्ष

प्रकरण ३ रे

पाचगणी : एक प्रभावी गिरिस्थान नगरपरिषद

पाचगणी हे त्याच्या भौगोलिक स्थान वैशिष्ट्यांमुळे संपूर्ण भारतात एक थंड हवेचे ठिकाण म्हणून सुप्रसिद्ध आहे. या शहराच्या निसर्गसुंदरतेमुळे त्याला पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झाला आणि जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र म्हणून उदयास आले. अशा या शहराला साधारणत: १६० वर्षांचा इतिहास आहे. इंग्रजांना भारतीय प्राकृतिकतेशी जूळवून घेण्यासाठी विविध सुखकर ठिकाणांची आवश्यकता होती. त्यातून वैविध्यपूर्ण अशा 'निसर्गरम्य स्थळांचा शोध' हा एक महत्त्वाचा भाग बनला होता. त्यातूनच 'जॉन चेसन' याने पाचगणीचा शोध घेऊन त्याचा विकास होण्यासाठी या अवघ्या दोन हजार लोकवस्तीच्या गावाला खास बाब म्हणून नगरपालिकेचा दर्जा इ. स. १९१० साली मिळवून दिला आणि हे गांव Panchgani Hill Station Municipal Council म्हणून ओळखले जाऊ लागले. (पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद) पुढे इ. स. १८७२ मध्ये सातारा शहर रेसिडेंट सर ब्रॉटेल फ्रार याच्या प्रयत्नामुळे महाबळेश्वरबरोबर पाचगणीला पर्यटन स्थळाचा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे पाचगणीला येणाऱ्या युरोपियन लोकांची संख्या वाढली. या अनुषंगाने येथे पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक अशा अनेक सोयीसुविधा निर्माण होऊ लागल्या. या सोयीसुविधांच्या पूर्ततेतील पाचगणीच्या गिरीस्थान नगरपरिषदेचे योगदान मोलाचे आहे. या योगदानाचा विस्तृतपणे आढावा घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

या प्रकरणासाठी संशोधन करीत असताना मुख्यत्वे प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये Maharashtra State Gazetteers, Satara District Revised Edition १९६३ ची मूळ आवृत्ती, दार्शनिक विभाग, मुंबई, सातारा जिल्हा गॅझेटियर १९९९, नगरपरिषद जी. बी. प्रोसिडिंग बुक, A. D. T. P. यांचे नुतनीकरण केलेले पत्र क्र. न. प. क्षेत्र/पाचगणी/१८५८, दि. ७/९/१९९५, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सातारा जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

नगरपालिका रेकॉर्ड, पाचगणी गिरिस्थान व नगरपरिषद वार्षिक लेख्यांचा सारांश, जमा नमुना नं. २८ या साधनांचा आणि नगरपालिका मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक व नगरपरिषद कर्मचारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. शिवाय वर्तमानपत्रातील लेख, संबंधित पुस्तके, संशोधन प्रबंध आणि लेख अशा इतर दुय्यम साधनांच्या आधारे गिरिस्थान नगरपरिषदे विषयीची सर्वांगीण माहिती प्राप्त करून नगरपरिषदेच्या निर्मितीपासून ते सद्यस्थिती बाबतची वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न सदरच्या प्रकरणात केला आहे.

३.१ स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास :

पाचगणी नगरपरिषद ही 'भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था' रचनेचा एक अविभाज्य भाग आहे. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास हा अत्यंत प्राचीन आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे त्याच क्षेत्रात राहणाऱ्या जनतेने निवडून दिलेल्या स्थानिक संस्थेने, स्थानिक कार्याची पाहणी करणे होय. टॉक व्हील या अभ्यासकाच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्थेकडे स्वतंत्र राष्ट्राचा एक घटक म्हणून पहावा लागेल. जरी राष्ट्र स्वतंत्र सरकारची स्थापना करीत असले तरी स्थानिक संस्था किंवा नगरपालिका यातून वगळता येणार नाही. या मताला दुजोरा देताना पी. एन. शर्मा म्हणतात, ''लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर स्थानिक संस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.''[१]

थोडक्यात लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग अधिकाधिक वाढविणे, समाजाच्या अथवा देशाच्या अगदी शेवटच्या स्तरापर्यंत विकास गतिमानतेने पोहोचवायचा असेल तर सर्वसामान्य पातळीवर विकासाचे निकष कोणते असावेत हे स्थानिक लोकांनाच ठरवू देणे, यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था यंत्रणेची निर्मिती करण्यात आली म्हणून लोकशाही विकास प्रक्रियेतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या स्थानिक स्वराज्य संस्था दोन भिन्न सिद्धांत विचारावर अवलंबून असून पहिला म्हणजे, ''कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादा राखून स्थानिक संस्थांना व्यापक अधिकार असावेत जेणेकरून त्या संस्था समाज कल्याणाचे कार्य सुरू करू शकतील.'' आणि दुसरा म्हणजे ''कायद्याने निर्देशित केलेल्या गोष्टीपुरतेच त्या संस्थांनी कार्य करावे.''[२]

३.२ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे :

भारतात 'लोकाभिमुख शासन' ही परंपरा फार मोठी आहे. भारतातील 'स्वयंपूर्ण खेडे' ही संकल्पना प्राचीन आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील 'स्थानिक स्वराज्य संस्था' ही संकल्पना पडताळून पहाताना त्याच्या विकासनाचा विचार प्राचीन, मध्ययुग आणि आधुनिक या कालखंडानुसार करता येतो.

३.२.१ प्राचीन कालखंड :

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास हा प्राचीन आहे. या स्थानिक संस्थांचे पुरावे वेद, पुराणे, उपनिषदे, धर्मग्रंथ, स्मृती, श्रृती, कथा, शास्त्रे यांच्यामधून मिळतात. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात स्थानिक शासनाची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. तसेच नगरांच्या रचना व कार्यासंबंधी सविस्तर माहिती दिली आहे. मौर्यकाळात नगराच्या प्रबंधनासाठी पाच सदस्यांच्या जनसंख्या, वाणिज्य, कर अशा वेगवेगळ्या समित्या होत्या. मॅगेस्थानिसने आपल्या 'इंडिका' या ग्रंथात त्याकालीन स्थानिक शासन व्यवस्थेची माहिती दिली आहे. थोडक्यात स्थानिक पातळीवरील निर्णय व्यवस्था जेवढी प्रभावी त्या प्रमाणात राजाची लोकाभिमुखता अवलंबून होती.

३.२.२ मध्ययुगीन कालखंड :

मध्ययुगात मोगल प्रांताची सरकार (जिल्हा) परगण्यात विभागणी केलेली असून त्यात अनेक खेडी असत. खेड्यांचा कारभार चालविण्यासाठी पाटील किंवा मुकादम, पटवारी, चौधरी हे तीन अधिकारी असत, त्यांना मोठी लोकमान्यता होती. शेरशहा सुरी व सम्राट अकबर याच्या काळात ही स्थानिक प्रशासन व्यवस्था सुदृढ होती.[३] याच काळातील छत्रपती शिवाजी महाराजांनी तर 'रयते'ला प्राधान्य देणारी प्रशासन व्यवस्था अत्यंत कर्तव्यदक्ष व शिस्तबद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न केला हे त्यांच्या अष्टप्रधान मंडळावरून दिसून येते.[४] थोडक्यात मध्ययुगीन कालखंडात प्रशासन व्यवस्थेसाठी प्रांत, परगणा, महल असे विभाग होते. याची सविस्तर माहिती अब्दुल फझल, यदुनाथ सरकार यांच्या लिखाणातून मिळते.

३.२.३ आधुनिक कालखंड :

भारतात जरी प्राचीन काळापासून स्थानिक शासन अस्तित्वात असली तरी स्थानिक शासनाची आज जी संघटना आणि कार्यपद्धती आहे, ती मुख्यत: ब्रिटीश शासनाची देणगी होय.[५] आधुनिक भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रारूप ब्रिटिश कालखंडापासून टप्प्याटप्प्यांनी विकसित होत गेले. प्रथम सन १८६० मध्ये मुंबई प्रांतात विविध समित्यांची स्थापन झाल्यी. सन १८७० मध्ये लॉर्ड मेयोने आर्थिक विकेंद्रीकरणाच्या तत्वाचा विकास करावा असे मत मांडले. पुढे १२ मे १८८२ रोजी लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव मांडला. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा कारभार १९६५ च्या कायद्यानुसार चालतो. भारतातील आधुनिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे अभ्यासकांनी वेगवेगळे टप्पे मांडले आहेत.

I) पहिला टप्पा :– स्थानिक शासनाच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे इ. स. १६८७ ते इ. स. १८८१ या काळात ब्रिटिशांनी स्थानिक शासनाचा उपयोग केंद्रीय आणि प्रांतीय वित्तीय व्यवस्थेच्या सोयीसाठी व साम्राज्यवादी आवश्यकतांच्या पूर्तीसाठी करण्यात आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थेला सुरूवात सर्वप्रथम प्रेसिडेन्सी नगरात म्हणजे भारतातील पहिली नगरपरिषद मद्रास येथे सप्टेंबर १६८७ मध्ये स्थापन झाली.[६] इ. स. १८७० मध्ये लॉर्ड मेयोचा ठराव महत्त्वाचा ठरला. या ठरावाने आर्थिक विकेंद्रीकरण व भारतीयांना प्रशासनात सहभाग करून घेण्यात आले.[७]

II) दुसरा टप्पा

लॉर्ड रिपनचा ठराव :– लॉर्ड मेयो यांचे उत्तराधिकारी म्हणून लॉर्ड रिपन आले ते उदारमतवादी असल्याने त्यांनी जनतेला खुश ठेवण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्थेला प्रोत्साहन दिले. त्यामुळे स्थानिक शासनाच्या इतिहासात लॉर्ड रिपनचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. म्हणून त्यांना 'स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक' असे म्हणतात.[८] रिपनच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेविषयीचा सरकारी प्रस्ताव होय. लॉर्ड रिपनच्या ठरावाने स्थानिक प्रशासनाच्या विकासाचा पाया घातला गेला.

III) तिसरा टप्पा :

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तिसऱ्या टप्प्याला महत्त्वाचे स्थान आहे. कारण तेथूनच घटनात्मक सुधारणेला सुरूवात झाली. इ. स. १९१६ मध्ये लॉर्ड चेम्सफोर्ड गव्हर्नर म्हणून भारतात आले. त्यांनी घटनात्मक विकासाच्या दृष्टीने स्थानिक संस्थांना महत्त्व देण्यासाठी एक प्रस्ताव मंजूर केला. तो प्रस्ताव ब्रिटीश सरकारकडे इ. स. १९१८ मध्ये पोहचला. ब्रिटिश सरकारने इ. स. १९१८ मध्ये आपला ठराव प्रसिद्ध करून विकेंद्रीकरण आयोगाच्या सर्वच शिफारशी मान्य केल्या. तसेच स्थानिक संस्थेवर जास्तीत जास्त स्थानिक प्रतिनिधी आणि लोकांचे नियंत्रण असले पाहिजे आणि त्यांना त्यांच्या कार्यात पूर्ण स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे यालाही मान्यता दिली.

स्वातंत्र्योत्तर विकास वाटचाल :–१५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्यानंतर देशात लोकशाहीच्या सुदृढीकरणाचे जे प्रयत्न झाले, त्यात लोकशाहीचा घटक असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला विशेष प्राधान्य मिळाले.

नगरपालिकांची निर्मिती :– स्थानिक शासन संस्थेचे प्रश्न हे पूर्णपणे स्थानिक असून त्यांची सोडवणूक ही सामाजिक पातळीवर करण्याची गरज असते. स्थानिक पातळीवर कार्य करू शकणाऱ्या आणि कायद्याने ज्यांना वैधता प्राप्त झाली आहे, अशा संस्था दोन प्रकारच्या आहेत. खेड्याचा कारभार करणाऱ्या 'पंचायती' आणि शहरांचा कारभार करणाऱ्या 'नगरपालिका' होत.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास सन १७२६ पासून सुरू होतो. कारण यावर्षी मुंबईला 'मेयर कोर्ट' सुरू झाले व ईस्ट इंडिया कंपनीकडून 'नगर प्रशासनाला' प्रारंभ झाला. सन १८४५ ते १८५० या काळात प्लेग, कॉलरा, मलेरिया या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वाढला आणि या रोगांना आळा घालण्यासाठी स्थानिक यंत्रणा म्हणजे म्युनिसिपालिटी स्थापन करणे गरजेचे ठरले. सन १८५० च्या कायद्याने मुंबई व्यतिरिक्त इतर शहरांसाठी 'टाऊन कमिटी' व 'म्युनिसिपल कमिटी' स्थापन करून त्यांच्याकडे आरोग्य रक्षणाचे कार्य दिले.

सन १८७३ च्या कायद्याने लोकसंख्येनुसार 'नगरपालिका' व 'शहरपालिका' असा फरक करण्यात आला. इ. स. १९०१ मधील 'मुंबई पालिका कायद्याने' नगरपालिकेच्या कार्यास स्वातंत्र्य देण्यात आले. इ. स. १९२९ च्या 'मुंबई शहर पालिका कायद्याने' महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यक्षेत्र वाढले. या कायद्याने सर्व नगरपालिकांची स्वतंत्र नियमावली बनवून नगरपालिकेचे प्रशासन चालविणे शक्य झाले.

सन १९६५ चा महाराष्ट्र नगरपालिका कायदा :– भाषावार प्रांतरचनेच्या निकषाने भारतात विविध राज्ये निर्माण झाली. त्यातच मराठवाडा, विदर्भ, वऱ्हाड यांचेसह महाराष्ट्र राज्य निर्मिती झाली. परंतु सन १९६० ते १९६७ या काळापर्यंत या सर्व प्रांतांमध्ये वेगवेगळे कायदे अस्तित्वात होते. या सर्वांबाबत सुसूत्रता येणेयासाठी रफीक झकेरिया समिती स्थापण्यात आली. १० सप्टेंबर १९६५ पासून रफीक झकेरिया समितीने सुचविलेला कायदा महाराष्ट्र राज्याला लागू केला गेला. या कायद्याला ''१९६५ चा 'महाराष्ट्र नगरपरिषद कायदा' म्हणून ओळखले जाते.''[९] आजचा नगरपरिषदेचा कारभार याच कायद्यानुसार चालतो. पंधरा हजार किंवा अधिक लोकसंख्या असणाऱ्या कोणत्याही ठिकाणी राजपत्राद्वारे नगरपालिकेची स्थापना करण्याचा अधिकार या कायद्याने महाराष्ट्र सरकारला दिला आहे. सध्या त्यात बदल होऊन तो 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५' म्हणून ओळखला जातो.[१०]

नगरपालिकांचे वर्गीकरण :– नगरपालिका वर्गीकरणाबाबत बरीच स्थित्यंतरे झाली. प्रथम वार्षिक उत्पन्नावर, त्यानंतर लोकसंख्येच्या आधारावर नगरपालिकांचा दर्जा ठरू लागला. शिवाय 'नगरपालिका' या शब्दाऐवजी 'नगरपरिषद' हा शब्द वापरला जाऊ लागला.[११]

महाराष्ट्रात पाच लाखाहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणी महानगरपालिका अस्तित्वात आल्या. तर एक लाखाहून कमी लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणी नगरपालिका अस्तित्वात आल्या. आज महाराष्ट्रात २६ महानगरपालिका व ४३३ नगरपालिका असून[१२] त्यांचे वर्गीकरण अ, ब, क वर्गामध्ये करण्यात आले आहे. त्यामध्ये 'अ' वर्गामध्ये किमान लोकसंख्या एक लाखापेक्षा जास्त, 'ब' वर्गामध्ये किमान लोकसंख्या चाळीस हजार व 'क'

वर्गामध्ये किमान लोकसंख्या पंचवीस हजार अशा प्रकारे नगरपालिकेचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

३.३ पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेचा इतिहास व स्थापना :

महाबळेश्वर बरोबर युरोपियन लोकांना राहण्यासाठी दुसऱ्या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध घेत असताना ईस्ट इंडिया कंपनीचा निवृत्त वॉरंट ऑफिसर जॉन चेसन याने पाचगणीचा शोध लावला. इ. स. १८६० मध्ये रुपये बाराशे खर्च करून पक्क्या छताची सहा घरे बांधली व इ. स. १८६२ मध्ये २४ युरोपियन कायम वास्तव्यास आले. चेसन याने इथे शेती करण्यास सुरूवात केली.[१३] या इंग्रजांकडे कामास असणारे लोक आणि स्थानिक नागरिक पाचगणीत येऊन स्थायिक झाले आणि वस्ती वाढत गेली. येथे प्रथम इ. स. १८८० मध्ये मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू झाली. त्यानंतर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी युरोपियन मुलांच्यासाठी निवासी इंग्रजी माध्यमाच्या शाळा (Public Schools) सुरू केल्या. त्यामुळे पाचगणीला स्थानिक प्रशासनासाठी 'गिरिस्थान नगरपालिकेचा दर्जा' मिळावा, यासाठी मुंबई सरकारकडे जॉन चेसन याने अर्ज केला व आग्रह धरला. त्यात त्याला यश आले आणि पाचगणीला १ एप्रिल १९१० रोजी नगरपालिकेचा दर्जा बहाल केला[१४] व ती Panchgani Hill Station Municipal Council म्हणून ओळखली जाऊ लागली. यावेळी पाचगणीची लोकसंख्या फक्त दोन हजार असूनही केवळ एक खास बाब म्हणून पाचगणीला नगरपालिका मंजूर झाली. पाचगणीला गिरिस्थान नगरपालिकेचा दर्जा देऊन जॉन चेसनलाच पाचगणीचे पहिले सुपरिडेंट व न्यायाधीश म्हणून नियुक्त केले.[१५] सन १९१० पूर्वी पाचगणीचा कारभार हा महाबळेश्वरचा सुपरिडेंट पहात होता. शिवाय या नगरपालिकेचे कामकाज पाहण्यासाठी प्रथम आठ सदस्यांचे सल्लागर मंडळ स्थापन केले गेले. याचे अध्यक्ष म्हणून बॉईज हायस्कूलचे मुख्याध्यापक सर रेव्हरंट थॉमस रोवन यांची नियुक्ती झाली. या सदस्यांची नियुक्ती महाबळेश्वरच्या सुपरिडेंटकडून करण्यात आली. यामध्ये पाच लोक हे युरोपियन होते तर तीन सदस्य भारतीय होते.[१६] अशा प्रकारे पाचगणीच्या नगरपालिका कामकाजाला सुरूवात झाली.

१ एप्रिल १९१० रोजी रेव्हरंड थॉमस रोवन यांची नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आणि ते पद त्यांनी सलग नऊ वर्षे, नऊ महिने, एकोणतीस दिवस इतका इतका प्रदिर्घ काळ म्हणजे ३१ मार्च १९१९ पर्यंत सांभाळले.[१७] पुढे इ. स. १९१९ ते इ. स. १९३२ या काळात तत्कालीन 'बॉईज हायस्कूल' आणि सध्याचे 'सेंट पीटर्स हायस्कूल' चे मुख्याध्यापक नगरपालिकेच्या अध्यक्षपदावर राहिले. नगरपालिकेवर प्रशासनाची नेमणूक सरकार मार्फत होत असे; सल्लागार मंडळावर ब्रिटीशांचे वर्चस्व होते. त्यात कांही पारशी लोकांचा सहभाग होता.

इ. स. १९३२ नंतर नगरपालिकेचा अध्यक्ष निवडीची प्रक्रिया सुरू झाली आणि २६ जुलै १९३२ रोजी डॉ. एम. व्ही. वकील हे पाचगणीचे अध्यक्ष झाले. त्यानंतर एच. डी. कोटणीस, एस. एम. बाथा, बी. जे एस. जहीना, बीजली खान नबाब, पी. एस. इरानी या अध्यक्षांनी नगरपालिकेचा कारभार व्यवस्थितपणे सांभाळला.[१८]

भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाही व्यवस्था अधिक सुदृढ होत जाऊन नोव्हेंबर १९५६ मध्ये संपूर्ण लोकशाही पद्धतीवर आधारित निवडणूक होऊन 'लोकनियुक्त मंडळ' १३ डिसेंबर १९५७ मध्ये नगरपालिका क्षेत्रात कार्यरत झाले. त्यानंतर शहराची लोकसंख्या वाढत गेली. वॉर्डाची संख्या वाढली, नगरसेवकांची संख्या वाढत गेली. इ. स. १९६५ च्या 'नगरपालिका कायद्याने' पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेस 'क' वर्ग दर्जा मिळाला. सध्या नगरपालिकेचे क्षेत्रफळ १,५७३ एकर आहे. तर सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या सुमारे चौदा हजार आहे. साक्षरतेचे प्रमाण ८५% आहे. इ. स. १९१४ मध्ये सुरू झालेले क्षयरोग उपचारातील प्रसिद्ध बेल एअर हॉस्पीटल, इ. स. १९६५ मधील नैतिक पुनरूत्थान केंद्र (एम. आर. ए. सेंटर), ३८ इंग्रजी माध्यमाच्या शाळा हे या शहराचे वैशिष्ट्य आहे. येथील स्ट्रॉबेरीला मिळालेला जागतिक दर्जा, त्यावर प्रक्रिया उद्योगांचे जाळे, पर्यटन व्यवसायासाठीचा सेवा उद्योग, आणि या सर्वांना पायाभूत सेवा देणारी नगरपालिका यामुळे ही नगरपालिका सातारा जिल्ह्यातील एक श्रीमंत नगरपालिका म्हणून ओळखली जाते.[१९]

३.३.१ पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेचे वेगळेपण :

पाचगणी नगरपालिकेत एक नगराध्यक्ष दीर्घकाळ पदावर कार्यरत होता तर एक नगराध्यक्ष केवळ एका दिवसासाठी पदावर विराजमान झाला होता. पहिले अध्यक्ष रेव्हरंड थॉमस रोवन सुमारे दहा वर्षे तर डॉ. ई. के. मर्चंट ६ एप्रिल १९६० या एका दिवसासाठी अध्यक्ष होते.[२०] पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेवर स्थापनेपासून सुमारे शंभर वर्षाच्या काळात सात वेळा नगरपालिकेचा कारभार शासनाच्या हाती गेला आहे.[२१] पाचगणी गिरिस्थान नगरपालिका कारभारात इ. स. १९६९ पर्यंत महिलांचा सहभाग नव्हता. २६ जुलै १९६९ साली श्रीमती कांचनमाला देसाई या पहिल्या नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या.[२२] रफिक झाकरिया समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार इ. स. १९६५ नंतर 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद' हा शब्द रूढ झाला.[२३] 'महाराष्ट्र नगरपालिका कायदा १९६५' चा अस्तित्वात आल्यानंतर नव्या कायद्याच्या माध्यमातून संपूर्ण लोकशाही मार्गाने निवडून आलेले पहिले अध्यक्ष बनण्याचा मान एल. आर. बगाडे यांना मिळाला.[२४] म्युनिसिपल कौन्सिल मध्येही लोकसंख्येनुसार वाढ होत गेली (तक्ता – १). १९१० साली ८ सभासदांचे मंडळ होते. १९५१ साली १४ सभासद निवडले जावू लागले. १९९१ साली १५ सभासद व अगदी अलिकडे २०११ च्या निवडणुकीत १७ सभासद निवडले गेले. ही सदस्य संख्याच शहराचे धोरण निश्चित करते.

तक्ता – १

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचे वार्ड व नगरसेवक संख्या

साल	वार्ड	नगरसेवक संख्या	
१९१०	००	०८	सरकारतर्फे
१९५१	०४	१४ १३	एक जागा सरकारतर्फे जागेवर निवडणुका
१९६६	०४	१४	संपूर्ण निवडणुकीद्वारे
१९८०	०४	१५	संपूर्ण निवडणुकीद्वारे
२००१	०४	१७	संपूर्ण निवडणुकीद्वारे
२०११	०५	१७	संपूर्ण निवडणुकीद्वारे

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद रेकॉर्ड)

३.३.३ नगरपालिकेच्या कामकाजाची भाषा :

कोणत्याही नगरपालिकेच्या प्रशासनाची भाषा ही तेथील स्थानिक लोकांच्या भाषेवर अवलंबून असते. परंतु पाचगणीतील प्रशासकीय भाषेचे खास वैशिष्ट्य म्हणजे तेथील सर्व प्रशासन ब्रिटिशांच्या नेतृत्वाखाली असल्यामुळे नगरपालिकेच्या कामकाजावर इंग्रजी भाषेचा प्रभाव पडणे सहाजिक होते. त्यामुळे ब्रिटीश काळात या नगरपालिकेची प्रशासनाची भाषा ही इंग्रजी बनली. सन १९४२ मध्ये राष्ट्रीय आंदोलनाची तीव्रता वाढली त्यामुळे पाचगणी, महाबळेश्वर मधील इंग्रज अधिकारी हळूहळू मायदेशी परतू लागते व प्रशासन स्थानिक लोकांच्या हाती आले. इ. स. १९७४ नंतर नगरपालिकेची प्रशासनाची भाषा ही स्थानिक मराठी भाषेतून चालू लागली. तेव्हापासून ते आजतागायत प्रशासनाची भाषा मराठीतून चालते. परंतु पाचगणीला भेट देणाऱ्या देशविदेशातील लोकांची संख्या जास्त असल्याने प्रशासनात इंग्रजी भाषेचा वापर केला जातो.[२५]

३.४ नगरपालिका प्रशासन :

प्रशासन हा कोणत्याही संस्थेचा महत्त्वाचा घटक असतो. डॉ. शांताराम गोयल यांच्या Principle of Public Administration या पुस्तकामध्ये प्रशासनाचा अर्थ असा दिला आहे की, Administration means ad + ministrate, 'Administration' हा मूळ शब्द लॅटीन आहे. याचा अर्थ आहे सेवा करणे, काळजी घेणे असा होतो.[२६] थोडक्यात 'प्रशासन' म्हणजे 'व्यवस्थापन' होय. एल. डी. व्हाईट यांच्या मते, प्रशासन म्हणजे लोकांचे दिग्दर्शन, समन्वय आणि नियंत्रण की ज्यातून आपले ध्येय साध्य होईल म्हणजेच आपल्या विकासासाठी आपणच प्रयत्न करणे हे प्रशासनात महत्त्वाचे मानले जाते.[२७]

नगरपालिका प्रशासन हा शहर विकासातील प्रभावी घटक असल्याने त्याच्यावर निश्चित जबाबदाऱ्या सोपवून त्याची पूर्तता केली जाते. शहराच्या हद्दीतील रस्त्यांची बांधणी व त्याची देखभाल करणे, रस्त्याच्या दिवाबत्तीची सोय करणे, स्वच्छता राखणे, शहरातील केरकचरा उचलणे व त्याची व्यवस्था लावणे, प्राथमिक शिक्षण, स्वच्छ पाणी, क्रीडांगणे, ग्रंथालये याची उपलब्धता करून देणे ही कामे करीत असताना लोकप्रतिनिधी व

नगरपालिकेचे कर्मचारी यांचा समन्वय आणि कार्यतत्परता महत्त्वाची असते. म्हणूनच स्थानिक लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक व शारीरिक विकासाची गुरूकिल्ली म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. पाचगणी येथील स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम पुढील प्रमाणे चालते.

३.४.१ मुख्याधिकारी (Chief Officer) :

मुख्याधिकारी हा नगरपालिका प्रशासनाचा प्रमुख असतो. हा प्रशासकीय प्रमुख या नात्याने नगरपालिका कर्मचाऱ्यावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवत असतो. नगरपरिषदेचा स्वतंत्र सेवक वर्ग असला तरी सरकार व नगरपालिका यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून हा 'चीफ ऑफिसर' काम करीत असतो. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या स्थापनेपासून महाबळेश्वरचा कारकून हे काम पहात असे. त्याची नियुक्ती ब्रिटिश सरकारकडूनच केली जात असे. त्यानंतर १ मे १९७४ पासून 'कॉमन केडर' करण्यात येवून 'मुख्याधिकारी' असे नगरपालिका सेवक प्रमुखाला संबोधण्यात येऊ लागले व त्याची नेमणूक शासनामार्फत होऊ लागली. 'क' वर्ग नगरपरिषदेच्या सी. ओ. ची निवड विभागीय निवड मंडळाकडून होत असते. हा शासनाचा पूर्ण वेळ सेवक असतो. नगरपरिषदेच्या क्षेत्रातील विकास कामे, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, कर वसुली, पाणीपुरवठा अशा कामाची जबाबदारी त्यांच्याकडे असते.[२८]

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या शताब्दी वर्षात नगरपालिकेचे सी. ओ. राजेंद्र वसंत चव्हाण यांच्या कारकिर्दीत चुनामातीच्या भिंतीवर कौलारू छत असणारी छोटी जुनी इमारत पाडण्यात आली व त्याठिकाणी एक भव्य अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त, पर्यटकांना आकर्षित करणारी आंतरराष्ट्रीय दर्जाची नवी इमारत उभारली गेली. या इमारतीमुळे नगरपरिषदेला एक वेगळे वैभव प्राप्त झाले आहे.[२९] इ. स. २०११ मध्ये सौ. आशा राऊत या पाचगणी नगरपरिषदेच्या सी. ओ. पदावर विराजमान झाल्यानंतर त्यांनीही वैशिष्ट्यपूर्ण विशेष अनुदान योजनेतून पाचगणीच्या विकासासाठी दहा कोटी रुपये मिळविले व शहरातील पर्यटन स्थळांचा विकास घडवून आणला. त्यामुळे या नगरपरिषदेच्या विकासात लोकनियुक्त प्रतिनिधी बरोबर प्रशासकीय अधिकाऱ्याचा सहभागही उल्लेखनिय आहे..

३.४.२ नगराध्यक्ष :

नगर परिषदेच्या राजकीय कार्यकारी प्रमुखाला अध्यक्ष किंवा नगराध्यक्ष म्हणतात. नगराध्यक्ष हा शहराचा प्रथम नागरिक असतो. इ. स. १९६५ च्या अधिनियमानुसार प्रत्येक नगरपरिषदेसाठी एक नगराध्यक्ष असतो.[३०] या नगराध्यक्षाची निवड डिसेंबर २००१ च्या अध्यादेशानुसार प्रत्यक्ष प्रौढ मतदान पद्धतीने केली जाते. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेवर नियुक्त झालेल्या अथवा निवडून आलेल्या प्रत्येक अध्यक्षांनी आपली एक वेगळी छाप आपल्या कार्यकर्तृत्वाने निर्माण केली आहे. सुरुवातीच्या काळात शासनाकडून प्रशासनाला स्थैर्य मिळवून देणे महत्त्वाचे होते. त्यासाठी प्रत्येकाचे कार्य मोलाचे ठरले.

सन १९८५ ते १९९१ या काळात असणारे नगराध्यक्ष श्री. नानासाहेब कासुर्डे यांनी आपल्या कारकिर्दीत पाचगणीतील सर्व पर्यटन स्थळांचा विकास केला. सहा कोटी रुपये खर्च करून भव्य शॉपिंग सेंटर उभे करून नगरपालिकेला उत्पन्नाचे साधन मिळवून दिले.[३१] त्यानंतर सन २००६ मध्ये निवडून आलेले तरुण नगराध्यक्ष श्री. शेखर कासुर्डे यांच्या कारकिर्दीत नगरपालिकेच्या जुन्या इमारतीच्या जागी नवी भव्य इमारत उभारली गेली. या इमारतीच्या उभारणीसाठी सर्व आजी माजी नगरसेवकांचीही मोठी मदत झाली.[३२] त्यानंतर कांचनमाला कऱ्हाडकर यांच्या काळात अंडर ग्राऊंड ड्रेनेज सिस्टीम, सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते असे विविध विकासाची कामे पार पाडली आहेत. यातून मुख्याधिकारी राजेंद्र चव्हाण आणि नगराध्यक्ष शेखर कासुर्डे यांच्यातील सौहार्द संबंध लक्षात येतात..

३.५ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद इमारत :

पाचगणीला नगरपालिकेचा दर्जा मिळाल्यानंतर त्यांच्या कामकाजाला सुरूवात एका ब्रिटीश पद्धतीच्या जुन्या बंगल्यात झाली. ही इमारत जॉन चेसन याने बांधली होती. नगरपालिकेची ही जुनी इमारत पाचगणीच्या मध्यवर्ती ठिकाणी होती ती चुना मातीच्या भिंती व उतरत्या कौलारू छप्पराची होती. याच इमारतीमधून इ. स. १९१० ते इ. स. २००६ पर्यंत कामकाज चालले. इ. स. २००६ साली ही इमारत पाडून त्याच ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. ही नवीन इमारत इ. स. २००९ मध्ये बांधून पूर्ण झाली.

नूतन इमारतीचा उद्‌घाटन समारंभ :– नूतन इमारतीचे बांधकाम मे २००९ साली पूर्ण झाले व ही इमारत नगरपरिषदेच्या ताब्यात ८ जून २००९ रोजी देण्यात आली. तत्पूर्वी ७ जून २००९ रोजी या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला. या समारंभासाठी जावली मतदार संघाचे आमदार मा. शशिकांत शिंदे, ऊर्जामंत्री मा. ना. सुनील तटकरे, या भागाचे भाग्यविधाते भि. दा. भिलारे गुरुजी व इतर मान्यवर उपस्थित होते.[३३]

इमारतीची रचना :– नगरपरिषदेची नवी इमारत अंर्तबाह्य अतिशय देखणी व स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना असून या नवीन प्रशासकीय इमारतीत अनेक विभाग आहेत. त्यामध्ये शहराचा प्रथम नागरीक असणाऱ्या नगराध्यक्षांची केबिन अत्यंत अलिशान व अद्यावत स्वरूपाची आहे. या केबिनमध्ये संपूर्ण शहराची तात्काळ माहिती उपलब्ध व्हावी अशी यंत्रणा बसविली आहे. शिवाय एकावेळी शंभर लोक बसू शकतील अशी बैठक व्यवस्थाही आहे. यानंतर दुसरा महत्त्वाचा घटक मुख्याधिकारी (सी. ओ.) यांचीही केबिन अत्यंत अद्यावत स्वरूपाची आहे. या केबिनच्या समोर सर्व प्रशासकीय सेवकांचे स्वतंत्र विभाग इंटरनेटच्या माध्यमातून जोडले गेले आहेत. तसेच शहरातील नागरिकांला त्याच्या कामास विलंब लागणार नाही, त्याचे काम सहजतेने होऊ शकेल अशी यंत्रणा उभी केली आहे. याच इमारतीमध्ये १५० लोक बसू शकतील असे शानदार सभागृह, नगरसेवक सभासदांसाठी अद्यावत मिटींग हॉल, गेस्ट रूम अशा सुविधांनीयुक्त ही इमारत आहे. या इमारतीचे बांधकाम ईगल कन्स्ट्रक्शनचे श्री. महेश गरवालिया, फलटण यांनी केले आहे.[३४] या इमारतीच्या बांधकामासाठी एकत्र खर्च एक कोटी चाळीस लाख रुपये झाला आहे.[३५] हा खर्च नगरपालिकेला खास बाब म्हणून जो निधी उपलब्ध झाला त्यातून करण्यात आला आहे.

३.६ नगरपरिषदेच्या समित्या :

'समिती व्यवस्था' हा आधुनिक लोकशाही शासनाची एक विशेषत: आहे. कोणताही महत्त्वाचा प्रश्न एका व्यक्तीच्या निर्णयावर न सोडविता काही व्यक्तींच्या सामूहिक निर्णयावर सोडविणे आज अधिक सुरक्षित समजले जाते. याच दृष्टीने नगरपालिकांना कायद्याने स्थायी समिती तसेच अन्य समित्यांची स्थापना करण्याची परवानगी देण्यात आली आहे. पाचगणी

गिरिस्थान नगरपरिषद ही 'क' वर्ग नगरपरिषद असून त्याच्या कामकाजासाठी पुढील काही समित्या स्थापन केल्या आहेत. त्यामध्ये स्थायी समिती व महिला व बालकल्याण समिती नियुक्त करणे आवश्यक असते.

३.६.१ स्थायी समिती :

ही नगरपरिषदेतील सर्वात महत्त्वाची समिती असून नगरपरिषदेचा अध्यक्ष हा या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. सर्व विषय समित्यांचे सभापती हे स्थायी समितीचे सभासद असतात. नगरपरिषदेचे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे कार्य स्थायी समितीचे असते. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचे स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून सन २०११ च्या निवडीनुसार विद्यमान अध्यक्षा सौ. कांचनमाला कऱ्हाडकर या आहेत. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या स्थायी समिती मार्फत जे महत्त्वाचे विकास प्रकल्प तयार करण्यात आले ते म्हणजे –

सर्वात खर्चिक प्रकल्प म्हणजे पाणीपुरवठा प्रकल्प होय. पाचगणीचा पहिला पाणीपुरवठा सन १९६२ पासून सुरु झाला. त्यामध्ये वाईच्या कृष्णा नदीतून पाणी वर पाचगणीला चार टप्प्यात चढवून आणले जाते. ही पहिली योजना ३५ वर्षासाठी होती. त्यानंतर धोम धरणातून पाणी पुरवठा लिफ्ट पद्धतीने १९९८ पर्यत केला जात होता. ही योजना खर्चिक असल्याने सन २००० पासून महाबळेश्वरच्या वेण्णा धरणातून १८ कि. मी. पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा करण्याचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. पाचगणीतील पर्यटन स्थळांचे सुशोभिकरण, रस्ते, शासकीय इमारती बांधण्यात आल्या. पाचगणीमध्ये प्रथम Drainage and Sewerage System ब्रिटिश काळातच राबविली गेली. नुकतेच 'अंडर ग्राऊंड ड्रेनेज' सिस्टीमसाठी १५९.८ लाख रुपये खर्च करून, भूयारी गटारयोजना, ड्रेनेज सिस्टीम, दलित वस्ती सुधारणा इ. प्रकल्प हाती घेतले व पूर्ण केले. स्थायी समिती १००% लोकांना वीज कनेक्शन देण्यात यशस्वी झाली आहे. पाचगणी हे शहर Eco Sensitive Zone मध्ये असल्याने या शहराच्या सुशोभिकरणासाठी व पर्यावरण संतुलन करण्यासाठी Sewages Treatment Plants लागू करण्यात आले व त्यानुसार येथील पर्यटन स्थळे,

गार्डन यांच्या सुशोभिकरणासाठी शासनाने साडे चार कोटी रुपये मजूर केले आहेत. त्यानुसार टेबललँडच्या पायथ्याशी हजारो वृक्ष लावले आहेत. बागेत अत्याधुनिक खेळणी बसविली आहेत. त्यामध्ये घसरगुंडी, मेरी–गो–राऊंड, लाईटवर चालणारी मिनी ट्रेन व इतर खेळणी बसविली आहेत.[३६]

३.६.२ महिला व बालकल्याण समिती :

शहरातील महिलांचे आरोग्य, त्यांची आर्थिक स्थिती व सामाजिक स्थिती चांगली असणे ही काळाची गरज आहे. त्यादृष्टीने नगरपरिषदेच्या 'महिला व बालकल्याण समितीमार्फत' विविध योजना अंमलात आणल्या जातात. त्यामध्ये शासनाच्या ज्या योजना आहेत त्याची अंमलबजावणी केली जाते. महिला सबलीकरणासाठी काही उपक्रम राबविणे, आरोग्यविषयक जनजागृती, स्त्रीभ्रूणहत्या यापासून परावृत्त करणे. पाचगणी या शहरातील स्थानिक नागरिक हे डोंगरउतारावर, वाड्यावस्त्यावर राहातात. हा स्थानिक समाज अत्यंत गरीब आहे. अशा या गरीब कुटुंबातील महिला सक्षम करण्याचे काम हा विभाग करतो. ही समिती दरवर्षी नगरपरिषद क्षेत्रातील दहा गरीब होतकरू महिलांना शिलाई मशिनचे वाटप करते. सध्या पाचगणी शहरातील ८०% महिला साक्षर आहेत. व ७८% महिला आत्मनिर्भर आहेत. शिवाय एकही कुपोषित किंवा साथीच्या रोगाने लहान बालक दगावत नाही.[३७] यातून या समितीच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

३.६.३ सार्वजनिक बांधकाम समिती :

नगरपरिषदेच्या या महत्त्वाच्या विभागातर्फे शहरातील रस्त्यांची बांधणी, देखभाल, सुव्यवस्था पाहाणे, शहर परिसरात असणाऱ्या बागा, उद्याने आणि थोर व्यक्तींच्या पुतळ्यांची देखभाल करणे, तसेच येथे येणाऱ्या पर्यटकांसाठी सरकारी व खाजगी निवास व्यवस्थेवर लक्ष ठेवणे अशी कामे करावी लागतात.

- **सार्वजनिक रस्ता :**

पाचगणीची जमीन ही चढउताराची आहे. इथे दरवर्षी १,८६५ मि. मी. पाऊस पडतो. त्यामुळे मृदास्खलन ही नित्य बाब आहे. शिवाय पाचगणीला भेट देणाऱ्या लाखो पर्यटकांच्या

वाहतुकीमुळे रस्ते सातत्याने खराब होतात. त्यांची सतत डागडूजी करणे हे नगरपालिकेच्या दृष्टीने अत्यंत खर्चिक बाब आहे. शहरातील रस्ते बांधकामाला सन १९५१ मध्येच सुरूवात झाली. याकाळात नगरपालिकेने आठ मैल सहा फर्लांग रस्ता तयार करून घेतला.[३८] सन १९६८ मध्ये 'टार रोड' तयार केले. त्याच्या देखभालीचा खर्चही मोठा असल्याने त्याची देखभाल दरवर्षी करावी लागतेच. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधण्याचे काम सन २००१ पासून हाती घेतले व २००६ सालापर्यंत पूर्ण झाले. त्यासाठी चार करोड रूपये खर्च झाला.[३९] याशिवाय डोंगरउतारावरील पाणी रस्त्यावर न येता बंदिस्त गटाराद्वारे सोडण्याची व्यवस्था केली आहे. पाचगणी नगरपालिकेने युरोपियन लोकांच्या सोयीसाठी इ. स. १९१८ साली मार्केट निर्माण केले. या मार्केटमध्ये आसपासच्या खेड्यातील शेतकरी व सौदागर भाजीपाला व इतर वस्तू विक्रीसाठी येत. इ. स. १९५६ साली नगरपालिकेने भाजी विक्रेत्यांना बसण्यासाठी भाजी मंडई बांधून घेतली. या भाजी मंडईच्या बांधकाम सुधारणांसाठी १९६० साली शहरातील प्रसिद्ध डॉ. सावंत बी. डी. यांनी २५ हजार रुपये देणगी दिली.[४०]

➢ **नगरपरिषद शाळा :**

पाचगणी हे आज जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. याठिकाणी सर्वात प्रथम इ. स. १८८४ साली जिल्हा लोकल बोर्डाची मराठी शाळा सुरू झाली. आज या शाळाचे दोन शाळांमध्ये रूपांतर झाले आहे. त्याला गिरिस्थान नगरपरिषद मुलांची शाळा क्रमांक १ आणि गिरिस्थान नगरपरिषद मुलींची शाळा क्रमांक २ असे म्हटले जाते. या दोन्ही शाळांची देखभाल नगरपालिका करते. इ. स. १९५६ साली मुलांच्या शाळेची इमारत बांधली. त्यात आठ खोल्या आहेत. इ. स. १९८६ साली मुलींची भव्य दोन मजली शाळा बांधली. याचा संपूर्ण खर्च नगरपालिकेने केला.[४१]

नगरपरिषदेच्या इमारती :

पाचगणी नगरपालिकेच्या अनेक इमारती आहेत. त्यामध्ये पाचगणी नगरपालिका इमारत, आंतरराष्ट्रीय दर्जाचे गेस्ट हाऊस, नगर वाचनालय, समाजमंदिर, एम. टी. डी. सी.

हॉटेल, स्थानिक व्यावसायिकांसाठी वाई पाचगणी रोडवर भव्य तीन मजली शॉपिंग सेंटर आहे. त्यापासून नगरपालिकेला दरवर्षी भाडेतत्वावर १ कोटी १० लाख रूपये उत्पन्न मिळते.

➢ **पर्यटक निवास व्यवस्था :**

पाचगणीतील पब्लिक स्कूल आणि पर्यटकांमुळे वर्षभर लोकांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. दिवसाला सरासरी एक हजार ते अठराशे लोक या शहरात थांबतात. तेव्हा या लोकांच्या निवास व्यवस्थेसाठी शासकीय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या हॉटेलची सोय आहे. शिवाय २० स्टार दर्जाची हॉटेल्स आणि इतर १२ हॉटेल्स मिळून एकूण ३२ हॉटेल्समध्ये राहण्याची सोय असून यामध्ये साधारणत: १२०० लोकांची सोय होते.[४१] याशिवाय खाजगी बंगले, धर्मशाळा येथेही लोक राहतात. नगरपालिकेला या वाढीव लोकांच्या सुरक्षा, शांतता व त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी सदैव तत्पर रहावे लागते.

३.६.४ वैद्यकीय व पाणीपुरवठा समिती :

पाचगणीचे हवामान अत्यंत आल्हाददायक असल्यामुळे ब्रिटीशकाळात एक Hill Station म्हणून ते नावारूपाला आले. आरोग्यासाठी विशेषत: दमा रूग्णांसाठी उपयुक्त वातावरणामुळे येथे इ. स. १९१४ साली डॉ. बिलिमोरिया यांनी 'बेल एअर' हे 'सॅनिटोरियम' सुरू केले. पुढे इ. स. १९३२ साली नगरपालिकेने सरकारी रूग्णालय सुरू केले.[४३]

सरकारी रूग्णालयासाठी अहमदाबादचे व्यापारी शेठ शांतीलाल मंगलदास यांनी 'सतीश कुंज' नावचा आपला बंगला देणगी म्हणून दिला. तसेच या हॉस्पिटलमध्ये जनरल वॉर्डसाठी २८ बेड्सची सोय केली.[४४] त्यातील बारा बेडस् प्रसुतीगृहासाठी उपलब्ध असून हा विभाग 'मातोश्री मनीबेन मंगलदास मेटरनिटी होम' म्हणून ओळखला जातो. सध्या हे शासकीय रूग्णालय शासकीय अनुदानावर नगरपालिकेतर्फे चालविले जाते. या विभागातर्फे शहरातील नागरिकांची व येणाऱ्या पर्यटकांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते.

३.६.४.१ पाणीपुरवठा विभाग :– पाचगणी शहर हे समुद्रसपाटीपासून ४२४२ फूट उंचीवर आहे. या शहरासाठी विहीर के एकमेव जलस्त्रोत आहे. गावात पूर्वी अनेक ठिकाणी खाजगी व सार्वजनिक विहीरी खोदल्या गेल्या व दगडी बांधकाम करून त्या विहीरींचा वापर शहरातील

नागरिकांसाठी केला जाऊ लागला. त्यामध्ये शहरातील सर्वात मोठी विहीर म्हणजे 'सईची विहीर' त्यालाच 'गाव विहीर' म्हणून ओळखतात. त्यानंतर 'फेस्ताची विहीर', 'मुलींच्या शाळेची विहीर', 'इतरलाज विहीर', 'जानकर विहीर', 'मनी पटेल विहीर', 'जैन विहीर', 'बोधे विहीर' अशा अनेक विहीरी आजही सुस्थितीत पहायला मिळतात.[४५] या विहीरीतील पाणी पाईपलाईनद्वारे ब्रिटिश व पारशी लोकांच्या बंगल्यांना पुरविले जात होते. शहराची लोकसंख्या आणि विस्तार जास्त वाढत गेला त्याप्रमाणात पाणीपुरवठण्यासाठी काळानुरूप काही विशिष्ट योजना अंमलात आणणे क्रमप्राप्त ठरल्यामुळे 'नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाने' काही योजना राबविल्या.

पाचगणीला पहिली पाणीपुरवठा योजना तयार होऊन नदीचे पाणी इ. स. १९६८ पासून मिळू लागले. हे पाणी वाई कृष्णा नदीतून चार टप्प्यात लिफ्टने चढवून वर आणावे लागले.[४६] ही योजना 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग सातारा' यांचेमार्फत सुरू करण्यात आली. ही योजना वीस वर्षाच्या कालावधीसाठी होती. या योजनेचे वैशिष्ट्य ही महाराष्ट्रातील सर्वाधिक खर्चिक व अवघड योजना होती. कारण कृष्णेचे पाणी ४३७८ फूट उंचीपर्यंत दहा कि. मी. अंतर वरच्या बाजूस चार टप्प्यामध्ये चढवावे लागले. या योजनेसाठी इ. स. १९६० साली १ कोटी ६८ लाख रुपये खर्च आला होता.[४७] ही योजना इ. स. १९९८ साली बंद करण्यात आली. वाई जवळच्या धोम गावामध्ये कृष्णा नदीवर इ. स. १९७६ मध्ये धोम धरण बांधले गेले. या धोम धरणातून पाचगणीला पाणीपुरवठा इ. स. १९९९ पासून करण्यास सुरूवात केली.[४८] धोम धरणातून पाणी वर खेचून घेऊन टँकमध्ये साठवून ते पाणी शहराला पुरविले जात असे. हा पाणीपुरवठा शहराच्या लोकसंख्येच्या प्रमाणात व्यक्तिगणिक शंभर लिटर इतका होता. मात्र ही योजना फारच खर्चिक असल्याने इ. स. २००८ मध्ये बंद केली गेली. पाचगणीला महाबळेश्वरच्या वेण्णा धरणातून १६ कि. मी. पाईप लाईन करून शहराला पाणी पुरवठा करण्याची योजना २००५–०६ मध्ये आखण्यात आली.[६९] महाबळेश्वर ते पाचगणी पाईपलाईन टाकून पाणी आणणे ही बाबही खर्चिक होती. त्यासाठी नगरपरिषदेला १.५ कोटी रुपये खर्च करावा लागणार होता. मात्र लोकप्रतिनिधींनी १०% लोकवर्गणी द्वारे जमा केली आणि उरलेली रक्कम सहा टप्प्यात शासनाला देण्याचे मान्य करून ही योजना सन

२००८ मध्ये सुरू करण्यात आली.[४९] परंतु 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेला' ही योजना राबविता न आल्याने 'जीवन प्राधिकरण सातारा विभाग' सध्या ही योजना राबविते.

३.६.५ शिक्षण समिती :

पाचगणी शहराला 'इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे माहेरघर' म्हणून ओळख असली तरी ब्रिटिश काळात इ. स. १८८० मध्ये प्रथम मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू झाली. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेकडे दोन प्राथमिक मराठी शाळांची जबाबदारी आहे. नगरपरिषदेची शिक्षण समिती शिक्षण विकासासाठी विविध उपक्रम राबविते. एकही मुल प्राथमिक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून विकलांग मुलांच्या घरी जाऊन त्यांना शिकविले जाते. महाराष्ट्र शासनाच्या बरोबरीने शालेय पोषण आहारात ही नगरपरिषद आपला पन्नास टक्के वाटा उचलते व संपूर्ण महाराष्ट्रात उत्कृष्ट पोषण आहार देणारी नगरपरिषद म्हणून प्रशस्तीपत्र ही पटकाविले आहे.[५०] पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण समितीने काळानुरूप पाऊले उचलून आपल्या मराठी माध्यमातील शाळांमध्ये 'सेमी इंग्लिश' ची शिक्षण पद्धती अंगीकारली असून त्यासाठी न्यू ईरा इंग्लिश स्कूल आणि मुकूल माधव फाऊंडेशन, पुणे या संस्थांची मदत घेतली आहे.[५१] पाचगणी गिरिस्थान नगरपरिरषदेच्या शाळेत पाचवी ते सातवीच्या विद्यार्थिनींना मोफत शिलाई मशीन क्लासचे प्रशिक्षण दिले जाते.[५२] विशेष बाब म्हणजे सातारा जिल्ह्यातील ही एकमेव नगरपरिषद आहे की, जी शिलाई मशीन प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देऊन भविष्यात स्वत:च्या रोजगार निर्माण करण्याची संधी उपलब्ध करून देते. थोडक्यात नगरपरिषदेच्या शिक्षण समितीने आपल्या कार्यातून शैक्षणिक क्षेत्रात या शहराला सदैव आघाडीवर ठेवले आहे. देशातील साक्षरतेचा दर ६५% असताना पाचगणीत ८६% साक्षरता आहे. त्यामध्ये ७८% पुरुष तर ६५% महिला साक्षर आहेत.[५३]

३.६.६ नियोजन विकास समिती :

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेतील 'नियोजन विकास समिती' ही सुरूवातीपासून अस्तित्वात होती. इ. स. १९५० पूर्वी त्याला 'Town Planning Committee' असे नाव होते.[५४] पाचगणी शहर हे भौगोलिकदृष्ट्या पर्वतीय प्रदेशावर वसले असल्याने या शहराला इतर शहराप्रमाणे हद्दीवाढीला वाव नाही. पाचगणीला केवळ ६.८६ कि. मी. म्हणजे ६८६

हेक्टर जागा उपलब्ध आहे.[५५] आधुनिकीकरणामुळे पाचगणी शहराचा विस्तार झपाट्याने होत आहे. शहर विकासाचे ध्येय ठेऊनच महाराष्ट्र शासनानेही Town Planning and Valuation Department हा विभाग सुरू केला. सन १९६५ च्या नगरपालिका कायद्याने पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेनेही शहराच्या विकासासाठी व नियोजनासाठी 'नियोजन विकास समितीची' स्थापना केली आहे. सध्या शहराला उपलब्ध जमिनीचे भूउपयोजन असे आहे की ४०.९% भूभाग लोकसंख्येसाठी वापरला आहे. त्यामध्ये ३४.११% भूभाग हा निवासासाठी, ६.१८% भूभाग हा हॉटेल्स, रेस्टॉरंट व बोर्डिंगसाठी वापरला आहे. निसर्गसौंदर्याला बाधा येऊ नये यासाठी व्यापार व उद्योगधंद्यासाठी केवळ १.५% जागा दिली गेली आहे.[५६] पाचगणीत एकूण निवासासाठी उपयोगात आणलेल्या भूभागापैकी स्थानिक रहिवाशांपेक्षा येथे असणाऱ्या शाळांनी जास्त जागा व्यापली आहे.

विशेष बाब म्हणजे २६ एप्रिल १९८३ रोजीच्या शहर विकास योजनेंतर्गत महाबळेश्वर पाचगणी विभागाला महाबळेश्वर तहसील विभागात येणाऱ्या बोंडारवाडी, भूतेघर, दानवली, तळोशी, उंबरी या परिसराचाही विकास करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये पर्यावरण संरक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामध्ये पाचगणी नगरपरिषदेने ६.१६ चौरस किलोमीटर व गावठाण ०.९५ चौरस किलोमीटर परिसर विकसित करण्याचे आदेश दिले आहेत.[५४] या समितीला वाढत्या लोकवस्तीला पर्यायी जागा उपलब्ध करून देणे अवघड झाले आहे.

३.६.७ शहर स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समिती :

शहर स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य या परस्परावलंबी बाबी आहेत. शिवाय तो नगरपरिषदेच्या मुख्य कर्तव्याचा भाग आहे. त्यासाठी 'शहर स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समिती' कार्यरत आहेत. पाचगणी नगरपरिषद आपल्या समितीद्वारे शहर स्वच्छतेसाठी मुख्यत: रस्ता, सार्वजनिक शौचालये, गटार सफाई, कचऱ्याची वेळोवेळी वहातूक, डी. डी. टी. व इतर जंतुनाशक औषधांची फवारणी करून साथीच्या रोगांना रोखणे आणि आकस्मिक उद्‌भवणाऱ्या रोगराई व अस्वच्छतेपासून शहराचे रक्षण करण्याचे काम करते.

नगरपरिषदेचा आरोग्य विभागही नेहमी सतर्क असतो. पाचगणीची हवा स्वच्छ व अल्हाददायक असल्याने रोगजंतूंचा प्रादुर्भाव इथे फारसा होत नाही. या शहराला साथीच्या रोगाने कधी भेडसावले नाही, असे असले तरी या शहरात बाहेरून येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. 'बेल एअर सॅनिटोरीअम' मध्ये संपूर्ण देशभरातून क्षयरूग्ण येत असतात. त्यामुळे त्यांचा प्रादुर्भाव होणार नाही याची विशेष काळजी सदर समितीस घ्यावी लागते. थोडक्यात पाचगणीचे नागरिक, येथे शिकणारे विद्यार्थी, येणारे पर्यटक व पालक या सर्वांच्या आरोग्याची जबाबदारीची जाणीव या समितीला ठेवावी लागते.

३.७ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद उत्पन्नाची साधने :

कोणत्याही सार्वजनिक संस्थेची आर्थिक परिस्थिती कशी आहे? त्यावरच तिचा आणि तिच्यावर आधारित घटकांचा विकास अवलंबून असतो. नगरपरिषदांचा मर्यादित विस्तार आणि अधिकार लक्षात घेता त्यांना मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचे सातत्याने व्यस्त प्रमाण आढळून येते. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची स्थितीसुद्धा यापेक्षा वेगळी नाही. विकासासाठी भांडवल आणि भांडवलासाठी विकास या चक्रात अडकलेल्या या संस्थांची आर्थिक उलाढाल अभ्यासणे या संस्थांच्या विकास प्रक्रियेला चालना देऊ शकते. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची स्थापनेपासूनची आर्थिक परिस्थिती कशी होती व सध्याची आर्थिक स्थिती कशी आहे, हे नगरपरिषदेच्या वार्षिक अंदाजपत्रकाद्वारे स्पष्ट होते.

पाचगणी गिरिस्थानचे इ. स. १९१० पूर्वीचे उत्पन्न :– इ. स. १९१० च्या अगोदर म्हणजे नगरपालिकेचा दर्जा मिळण्यापूर्वी सातारा संस्थानचा सुपरिडेंट सर ब्राटल फ्रायर याने इ. स. १८७० साली पाचगणीला पर्यटन स्थळाचा दर्जा दिला. तेव्हापासून पाचगणीचा कारभार हा 'स्टेशन फंड' ह्या स्टेशनच्या अधिक्षकांच्या नियंत्रणाखाली सुरू झाला. या स्टेशन फंडातून पाचगणीला इ. स. १८७५–७६ मध्ये ८६० रुपये, इ. स. १८८३–८४ मध्ये ३,३७४ रुपये फंड मिळाला व खर्च १,९५१ करण्यात आला होता.[५८]

इ. स. १९१० नंतरचे उत्पन्न :– पाचगणीला खास बाब म्हणून १ एप्रिल १९१० रोजी नगरपालिकेचा दर्जा मिळून खर्चासाठी स्थानिक कर गोळा करण्याची परवानगी दिली गेली.

त्यानुसार इ. स. १९१२–१३ साली कराचे रूपाने मिळालेले उत्पन्न ९,००० रुपये इतके होते व खर्च ७,६३० रुपये करण्यात आला. त्यामध्ये दिवाबत्तीची सोय, ड्रेनेज सिस्टीम, शहराची स्वच्छता या गोष्टीला प्राधान्य दिले जात होते.[५९] थोडक्यात त्या काळात स्थानिक नागरिकांकडून मिळणारे उत्पन्न व शासनाकडून मिळणारे अनुदान ही उत्पन्नाची साधने होती. कर रूपाने मिळणारी रक्कम 'वाई सब ट्रेझरीमध्ये' भरली जात असे.

इ. स. १९५० नंतरचे उत्पन्न :– इ. स. १९१० ते १९५० पर्यंत पाचगणी नगरपालिकेचे स्वरूप अत्यंत मर्यादित होते. इ. स. १९४२ नंतर पागचणीत स्थायिक असणारे ब्रिटिश अधिकारी मायदेशी परतू लागले व नगरपालिकेचा कारभार खऱ्या अर्थाने स्थानिक लोकांच्या हातात आला. नगरपालिकेच्या आर्थिक सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. जकात उत्पन्नाबाबत इ. स. १९५० मध्ये निर्णय झाला आणि प्रत्यक्ष जकात वसुली इ. स. १९५१ पासून सुरू झाली.

सन १९५७ मध्ये पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेला पुढील रूपाने उत्पन्न मिळत होते :

Consolidated Tax (Property Tax), Octroi (जकात), Visitors Tax (प्रवास कर), Animal and Vehicle Tax (पाळीव प्राणी व वाहनावरील कर), Special Sanitary Cess, Hotel Tax (हॉटेल कर), Theatre Tax (करमणूक कर), Rent from Municipal Properties and Lands (नगरपालिका इमारत व खुली जागा भाडे), Dispensary Fees (आरोग्य कर), Notice of Warrant Fees (नोटीस व वॉरंट कर), Government and District Local Board Grands (शासन व जिल्हा लोकल बोर्डकडून मिळणारे) सन १९५१ साली वरील सर्व कराच्या माध्यमातून नगरपालिका एकूण १,०६,४२० रुपये मिळाले होते.[६०] सन १९५८–५९ साली उत्पन्न १,५२,८१९ व खर्च १,२२,६०५ रुपये झाला.

सन १९८० नंतरचे नगरपालिकेचे उत्पन्न :– भारतातील पर्यटन व्यवसायाला खऱ्या अर्थाने चालना इ. स. १९८० नंतर मिळाली. भारतीय नागरिकही एखाद्या स्थळाला केवळ मौज म्हणून भेट देण्यासाठी खास वेळ काढून जाण्याची मानसिकता तयार होऊ लागली.

महाबळेश्वर, पाचगणी ही पश्चिम महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणे म्हणून ब्रिटिश काळापासूनच परिचित असली तरी येथे येणारा स्थानिक पर्यटक कमी होता. इ. स. १९८० नंतर संपूर्ण महाराष्ट्र, गुजरात व इतर प्रदेशातून पाचगणी, महाबळेश्वरच्या निसर्गरम्य ठिकाणाच आकर्षण वाढल्याने भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली. त्यामुळे पर्यटकांच्या माध्यमातून मिळणारा विविध कर हे उत्पन्नाचे प्रमुख साधन बनले.

३.७.१ जकात व प्रवासी कर :

कोणत्याही नगरपरिषदेच्या उत्पन्नातील 'जकात उत्पन्न' हे प्रमुख उत्पन्नाचे साधन आहे. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या स्थापनेपासून सन १९१० ते सन १९५० पर्यंत जकात आकारणी केली जात नव्हती. सन १९५१ पासून शहरात येणाऱ्या वाहतूकीवर व मालावर जकात बसविली जावू लागली. तरीही जकातीपासून मिळणारे उत्पन्न हे मर्यादित असल्याने या शहराला आवश्यक गरजेपलीकडे जाऊन वेगळी विकासाची कामे फारशी करता आली नाहीत. इ. स. १९८० नंतर महाबळेश्वर व पागचणी या दोन्ही ठिकाणच्या नगरपरिषदांना प्रवासी व इतर कराच्या माध्यमातून उत्पन्नाचे मोठे साधन निर्माण होऊ लागले. त्याबरोबरच शहरातील वसाहत, व्यापार, उद्योग यातही वाढ होत गेल्याने जकात उत्पन्न वाढत गेले. हा महसूल प्रवासी, प्रदुषण व पार्किंग कर या रूपात गोळा केला जातो.

तक्ता क्र. १

जकात–प्रवासी कर उत्पन्न

साल	उत्पन्न रुपये (लाखात)
२००१–०२	३०,७०,०००
२००२–०३	३२,६०,०००
२००३–०४	४५,४०,२५०
२००४–०५	५८,६०,५००
२००५–०६	६२,०८,९१५
२००६–०७	७०,०२,०००
२००७–०८	७४,१८,२६०
२००८–०९	७६,२०,०००
२००९–१०	७९,८०,०००

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, वार्षिक अंदाजपत्रके)

केवळ प्रवासी कराचा विचार करता कर उत्पन्न वाढ सुमारे ५१% इतकी दिसते कारण २००१–२००२ या सालात ४०,००,०००/– प्रवासी कर जमा झाला आहे. २०१०–२०११ साली हा कर ७८,००,०००/– इतका जमा झाला.[६१]

प्रदूषण कर :

महाबळेश्वर पाचगणी तसेच पुढे कोकणात जाणाऱ्या गाड्या यांच्या रूपाने या पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या प्रवासी वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण निर्माण होते व येथील निसर्गाला हानी पोहचते. येथे अत्यंत शुद्ध असणारी हवा या वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात अशुद्ध होते. तसेच पर्यटकांच्या माध्यमातून प्लॅस्टीक व इतर स्वरूपाचा कचराही मोठ्या प्रमाणात साठतो. त्यामुळे शहरी प्रदूषणात वाढ होते. या प्रदूषणाचे निवारण करण्यासाठी काही यंत्रणा नगरपालिकेला राबवावी लागते. त्यासाठी प्रदुषण कर वसूल केला जातो. २०१० मध्ये तर पश्चिम घाट संरक्षित करण्यात आला आहे. त्यामुळे ही पर्यटन स्थळे इको सेन्सेटीव्ह झोन म्हणून ओळखला जाऊ लागला.

तक्ता क्र. २

प्रदुषण कर उत्पन्न

इ. स.	उत्पन्न (रुपये)
२००५–०६	५,२०,०००
२००६–०७	८,८२,०००
२००७–०८	१०,००,०००
२००८–०९	१५,००,०००
२००९–१०	१६,४२,०००
२०१०–११	१८,१३,०००
२०११–१२	२०,००,०००

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, प्रवासी कर अंदाजपत्रके)[६३]

३.७.२ घरपट्टी (घर फाळा) :

जकात वसूल करण्यापूर्वी नगरपालिकेचे सुरूवातीपासूनचे ठराविक उत्पन्नाचे साधन म्हणजे घरफाळा किंवा घरपट्टी होय. घरपट्टीपासून मिळणारे उत्पन्न हे स्थिर स्वरूपाचे मानले

जाते. काही वर्षांकरिता निश्चित केलेली घरपट्टी नगरपरिषदेकडे येत राहते. सन १९६० ते १९८० पर्यंत घरपट्टी पासून मिळणाऱ्या उत्पन्नात फारशी वाढ नव्हती, कारण शहराचा विस्तार मर्यादित स्वरूपाचाच होता. इ. स. १९८० नंतर येथील निवासी व्यवस्थेत वाढ होऊ लागली व कराचा दरही वाढला गेला. इ. स. १९८२–८३ मध्ये घरपट्टी दर २४८ रुपये इतकी, इ. स. १९८५–८६ मध्ये २७८ रुपये, इ. स. १९९०–९१ मध्ये ३७२ रुपये जमा झाल्याची नोंद आहे. पाचगणी नगरपरिषद स्थापनेवेळी एका घरापासूनची घरपट्टी किमान ०.५० पैसे व कमाल ६ रुपये होती ती सध्या प्रत्येक घर किमान ५८० रुपये ते कमाल ३ हजार रुपये पर्यंत आहे.[६४]

३.७.३ शैक्षणिक कर :

पाचगणी नगरपालिकेला तिसरे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन म्हणजे शिक्षण कर होय. पाचगणीमध्ये ब्रिटिश काळापासून इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळा सुरू करण्यात आल्या. इसवी सन २००० साली अशा शाळांची संख्या २४ होती. ती इ. स. २०१० साली ३२ इतकी झाली.

तक्ता क्र. ३

शाळांपासून नगरपालिकेला मिळणाऱ्या कराचे उत्पन्न (उत्पन्न / पाच वर्षे)

इ. स.	उत्पन्न
२००१–०२	१४ लाख २४ हजार
२००५–०६	१८ लाख २० हजार
२००९–१०	२४ लाख ०८ हजार १८५ रुपये
२०११–१२	३५ लाख ७० हजार रुपये

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शैक्षणिक कर अंदाजपत्रके)

३.७.४ जाहिरात कर :

पाचगणी नगरपरिषदेसाठी जाहिरात कर हा उत्पन्नाचा मोठा स्त्रोत आहे. नगरपालिकेला जाहिरात कराच्या रूपाने ५ हजार ते २५ हजार रुपयापर्यंत कर मिळतो. जाहिरातीवरील कर हा नगरपालिकेच्या हद्दीत लावल्या जाणाऱ्या जाहिरातींवर आकारला जातो. पाचगणी हे पर्यटन स्थळ व शैक्षणिक केंद्र या दोन्ही दृष्टीने महत्त्वाचे असल्याने इथे

पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात हॉटेल्स व पर्यटन स्थळांची जाहिरात केली जाते. तसेच येथे अनेक इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांच्या जाहिरातीही मोठ्या प्रमाणात केल्या जातात. या जाहिरातीशिवाय पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी मॅप्रो, मालाज यांसारख्या कंपन्यांच्या जाहिराती, टॅक्सी चालक संघाच्या जाहिराती असतात. या माध्यमातून नगरपालिकेला उत्पन्न मिळते.[६४]

तक्ता क्र. ४

जाहीरात उत्पन्न

इ. स.	उत्पन्न (रुपये)
२००८–०९	५ हजार ते २५ हजार
२००९–१०	३७,३६०
२०१०–११	४५,८९२
२०११–१२	५८,६४५

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, उत्पन्न व खर्च अहवाल)

३.७.५ पाणीपुरवठा कर :

नगरपालिकेला संपूर्ण शहराला पाणीपुरवठा करावा लागतो. पूर्वी पाचगणीला पाणीपुरवठा सार्वजनिक विहिरीतून केला जात होता. परंतु लोकवस्ती जशी वाढू लागली तसे शहराला विहिरीचे पाणी अपुरे पडू लागले. यासाठी 'कृष्णा–वाई' योजना, धोम योजना, वेण्णा योजना राबविण्यात आल्या. या सर्व योजना खर्चिक असल्याने पाचगणी येथे पूर्वीपासूनच पाचगणी पाणीपुरवठा कर जास्त आहे. नागरिकांकडून वार्षिक पाणीपट्टी आकारली जाते. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.जी.ई.एन. ०९/ सी.आर./१९८/९८ नवी दि. ०१ एप्रिल १९९७ पासून आदर्श उपविधीप्रमाणे पाण्याचा कर असा आहे. ½" एका नळास बंद पाणी वार्षिक १२० रुपये. ½" एक नळास, २४ तास वार्षिक ३९० रुपये. ¾" एका नळास बंद पाणी वार्षिक ४४० रुपये. ¾" एका नळास २४ तास वार्षिक ११८० रुपये.[६५]

इमारत भाडे :

पाचगणी नगरपालिका हद्दीत असणारे पालिकेच्या आरक्षणमधील दुकान गाळे त्यामध्ये नगरपालिकेसमोर असणारे गाळे, नगरपालिकेच्या पाठीमागे वाई–पाचगणी रोडवर असणारे पाचगणी नगरपालिका शॉपिंग सेंटर येथील ४० गाळे आहेत. तर मटण मार्केटमधील ७ गाळे, भाजी मंडई येथील १८ गाळे, एस. टी. स्टॅण्डच्या समोर असणारे ५ गाळे यांच्याकडून नगरपालिकेला भाडे मिळते. नगरपालिकेच्या मालकीच्या इमारती खालीलप्रमाणे –

नगरपालिका शिक्षण मंडळ, पाचगणी गिरिस्थान मुलांची शाळा क्र.१, पाचगणी गिरिस्थान प्राथमिक मुलींची शाळा क्र.२, महात्मा फुले विद्यामंदिर हायस्कूल इमारत, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शॉपिंग सेंटर, टाऊन हॉल, सार्वजनिक ग्रंथालय इमारत, एम.सी.व्ही.सी. कॉलेज बिल्डींग, एम.टी.डी.सी. इमारत, सिद्धार्थनगर सार्वजनिक हॉल इत्यादी. यामध्ये शॉपिंग सेंटरचे गाळे भाडे रुपये ७५,०१३/–, भाजीमार्केट, मटण मार्केट येथील गाळ्याचे रु.५,६७,६१०/–, याशिवाय हायस्कूल, कॉलेज, टाऊन हॉल व इतर इमारत भाडे रुपये १५,६८,२३२/– दरवर्षी नगरपालिकेला मिळते.[६६]

३.७.८ इतर कर उत्पन्न :

पाचगणी नगरपालिकेला वरील सर्व उत्पन्नाशिवाय इतरही गोष्टीतून उत्पन्न मिळते.

पाचगणी हे पर्यटन स्थळ असल्याने या शहराचा विकास करण्यासाठी 'विकास कर' वसूल केला जातो. तो साधारण दरवर्षी ३,४०,६००/– रुपये असतो. नगरपालिकेची रिकामी जमीन एखाद्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिली जाते. त्याचे भाडे म्हणून साधारण १५ हजार रुपये मिळतात. गांडूळ खत प्रकल्पाद्वारे ५० हजार रुपये उत्पन्न मिळते. शेतसारा हा १,५०,०००/– रुपये मिळतो. वाचनालय वार्षिक देणगी, रोडरोलर भाडे, बॅडमिंटन हॉल भाडे, बाजार कर, कत्तलखाना फी, वॉटर टँकर भाडे, अग्नीशामक भाडे, इमारत परवाना फी, नळजोडणी फी, नोटीस फी, घोडा कर, घोडागाडी कर, वॉटर फी, दंड, गाडी भाडे यातून ७४,३२,९००/– रुपये इतके उत्पन्न २०११–१२ यावर्षी मिळाले होते.

३.८ अनुदाने–अंशदाने :

उल्लेखित उत्पन्न साधनाशिवाय पालिकेस सरकारकडून काही अनुदाने मिळतात. यामध्ये जकात भरपाई अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान, महागाई भत्ता अनुदान ही अनुदाने मिळतात. त्याशिवाय शासनाकडून सध्या नवीन काही अनुदाने मिळतात.

तक्ता क्र. ५

शासकीय अनुदाने

अ. क्र.	अनुदानाचे शीर्षक	रुपये
१	सु. ज. म. बा. वि. गट	८०,०००
२	सु. ज. सा. संरचना	१०,०००
३	सु. ज. मु. सोयीनुसार	१०,०००
४	पर्यटन अनुदान	८,००,०००
५	महागाई भत्ता	३५,८८,०००
६	रस्ता अनुदान	२२,९७,४७६
७	सुवर्ण जयंती स्वयंरोजगार	२,५०,०००
८	सुवर्ण जयंती प्रशिक्षण	८०,०००
९	सर्वसाधारण अनुदान	२४,७५,०००

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शासकिय अनुदान पत्रके २०१०–११)

थोडक्यात पाचगणीला वरील विविध मार्गाने उत्पन्न मिळत असले तरी पाचगणीचे मुख्य उत्पन्नाचे साधन म्हणजे येथील निवासी इंग्रजी माध्यमांच्या शाळा व त्यावर आधरित विविध व्यवसाय. कारण या शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी ४०% लोकसंख्या ही शाळेच्या विद्यार्थ्यांची असते. शिवाय पर्यटक व इतर लोक म्हणजेच सतत बदलत राहणारी लोकसंख्या यांच्या माध्यमातून उत्पन्न मिळते.[६७]

अर्थसंकल्पीय विवेचन :

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची अर्थसंकल्पाची माहिती सन १९८०–१९८१ ते २०११–१२ पर्यंतची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.[६८]

तक्ता क्र. ६
जकातीमुळे मिळणारे उत्पन्न व खर्च

सन	अंदाजपत्रकीय जमा	अंदाजपत्रकीय खर्च	एकूण शिल्लक
१९८०–१९८१	१९,७३,१९५	१८,३७,१४०	१,३६,०५५
१९८१–१९८२	२१,५८,४४०	२०,७४,१६५	९४,२७५
१९८२–१९८३	२५,८०,५५०	२४,८८,१३०	९२,४५०
१९८३–१९८४	२६,४३,४९८	२४,५८,६९२	८४,८०६
१९८४–१९८५	२७,६२,२३६	२६,४४,३९१	१,१८,८४५
१९८५–१९८६	२९,०६,९६५	२६,९६,१२०	१०,८४५
१९८६–१९८७	४३,३६,१२७	४१,६२,०२५	७४,१०२
१९८७–१९८८	३७,६६,९६६	३०,३१,७८९	७,३५,१७७
१९८८–१९८९	५१,३६,२६९	४९,५१,४४३	१,८४,८२६
१९८९–१९९०	७४,९०,६०७	७३,०९,७०७	१,८०,९००
१९९०–१९९१		८६,९०,१२२	
१९९१–१९९२			
१९९२–१९९३	१,१०,७६,८२५	१,१०,६०,६७५	७७,२७२
१९९३–१९९४	१,४०,३१,५३८	१,३९,७०,९५०	६०,५८८
१९९४–१९९५	१,२५,२५,६६३	१,२५,०१,१२०	२८,५४३
१९९५–१९९६	१,७२,७५,५७५	१,५६,५३,०७५	५३,४९८
१९९६–१९९७	२,३७,५१,७११	८९,७६,९७२	१,४७,७४,७३९
१९९७–१९९८	२,७६,७०,९०६	१,१६,७७,४८८	१,५९,९३,७५८
१९९८–१९९९	३,१३,७६,४३९	१,६३,०२,३२५	१,५०,७४,११७
१९९९–२०००	३,१५,२२,०१२	१,६३,६६,१४७	१,५१,५५,८६४
२०००–२००१	४,०३,१३,१३४	१,८७,२१,४२१	२,१५,९१,७१३
२००१–२००२	४,६८,७७,२७६	२,६८,६७,०२३	२,००,१०,२५३
२००२–२००३	४,२९,०६,४३४	२,५७,७४,९३४	१,७१,३१,५००
२००३–२००४	४,९२,५६,६६९	३,६७,८३,५०९	१,२७,७३,१६०
२००४–२००५	५,०४,२४,३३५	३,८०,३६,९१३	१,२३,८७,३२२
२००५–२००६	६,३३,४३,९६२	३,९२,९०,०९४	२,४०,५३,८६८
२००६–२००७	७,८६,८९,८४८	४,७०,८९,४४८	३,१६,००,४००
२००७–२००८	१०,९३,४७,९४२	६,३४,५९,४८२	४,५८,८८,४६०
२००८–२००९	१३,६८,१०,७६६	१०,८३,२१,२५३	३,२४,८९,५१३
२००९–२०१०	१४,६०,२०,५३४	१२,४८,१८,५३४	२,१२,०२,०००
२०१०–२०११	१६,९३,७४,२४९	१५,१८,३०,२३२	१,७५,७४,०१७
२०११–२०१२	१८,५९,७९,८६६	१८,०९,२७,८२०	५९,५२,०००

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद वार्षिक लेख्यांचा सारांश जमा नमुना नं. २८)

३.९ गिरिस्थान नगरपरिषद खर्च :

नगरपालिकेला विविध मार्गाने उत्पन्न मिळते. ते उत्पन्न शहराच्या विकासासाठी, आरोग्यासाठी, सोयीसुविधा, आपत्ती व्यवस्थापन, पाणीपुरवठा, दिवाबत्ती अशा अनेक गोष्टींवर खर्च करावे लागते. पाचगणी नगरपालिकेचा २००८–०९ ते २०११–१२ चा खर्च तपशिल पुढीलप्रमाणे –

तक्ता क्र. ७

गिरिस्थान नगरपरिषद खर्च

अ. क्र.	तपशील	२००८–०९	२००९–१०	२०१०–११	२०११–१२
१	प्रशासन	२६,५८,५१४	३०,५२,४१२	३२,८०,६७८	३६,२२,२००
२	कर वसुली	२५,८४,७१८			
३	रस्ता दिवाबत्ती	४,०४,४८६	---	---	८,१२,८००
४	रस्ता दिवाबत्ती देखभाल	३,१२,०००	---	---	४,१०,०००
५	आरोग्य सोयी	१,२६,१२,६९९	---	---	१,६०,७०,०००
६	जल निस्सारण	१,७१,५५,६७३	---	---	१,५७,००,०००
७	कचरा निर्मूलन	३०,०२,६८०	---	---	२६,२२,८७९
८	रूग्णालय	४,१३,१८२	---	---	६,१८,२४०
९	सार्वजनिक उद्याने	४,८४,५५५	---	---	७,९०,०००
१०	वृक्ष संवर्धन	५,७२,७५०	---	---	५,४०,०००
११	बांधकाम	८,४३,५३८	---	---	२,७५,००,०००
१२	दुर्बल घटक विकास योजना	९,६७,४२२	---	---	४०,०००
१३	शिक्षण	४,०४,७०७	---	---	८,०६,५६०
१४	महिला व बाल विभाग	८०,०००	१,००,०००	१,२०,०००	२,१०,०००
१५	पर्यटन	४,१५,८२६	२,५०,६३०	४,१६,५४०	५,७०,४९५
१६	शिक्षण कर	१७,४६,०००	---	---	
१७	पाणीपुरवठा	३,४८,५७६	---	---	४०,००,०००
१८	रस्ते बांधणी	१०,६६,८९४	---	---	३,३९,५०,०००
१९	विकास योजना	३,५१,७५६	---	---	१,५७,००,०००
२०	सुवर्ण जयंती नागरी रोजगार योजना	४०,०००	---	---	६०,०००
२१	इमारत बांधणी	१,९१,१५,१६७	---	---	२,५०,००,०००

(संदर्भ : पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद वार्षिक लेख्यांचा सारांश)

अशा प्रकारे नगरपालिका एकूण खर्च २००८–०९ मध्ये १०,४३,२१,२५३ रुपये इतका झाला. तर २०११–१२ मध्ये हा खर्च १८ कोटी ९ लाख, २७ हजार ८२० रुपये इतका खर्च झाला आहे.[६९]

२०११–१२ चा अर्थसंकल्प :

उत्पन्न	:	१८ कोटी ५९ लाख ७९ हजार ८६६ रुपये.
खर्च	:	१८ कोटी ०९ लाख २७ हजार ८२० रुपये.
शिल्लक	:	५० लाख ५२ हजार रुपये.

ब्रिटीशांनी त्याच्या गरजेतून भारतातील कडक उन्हापासून संरक्षण मिळविण्यासाठी पर्वतीय प्रदेशामध्ये थंड हवेच्या ठिकाणांचा शोध घेतला व काही शहरे वसविली. त्यातील महाबळेश्वर, पाचगणी ही वसवलेली शहरे अत्यंत महत्त्वाची आहेत. इ. स. १८५४ मध्ये जॉन चेसन याने आपल्या पारशी मित्रांच्या सहकार्याने महाबळेश्वर नंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांना विश्रांतीसाठी व राहण्यासाठी पाचगणी हे शहर वसविले.

आज पाचगणी हे जागतिक किर्तीचे शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यटन स्थळ म्हणून उदयाला आले आहे. पाचगणीला हे महत्त्व प्राप्त होण्यासाठी येथील गिरिस्थान नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेचा व स्थानिक राज्यकर्त्यांचा मोलाचा वाटा आहे. अशा या पाचगणी शहराचा कारभार सन १८५२ ते १९१० पर्यंत म्हणजे नगरपासलिका स्थापन होण्यापूर्वी महाबळेश्वर स्टेशन फंडातून चालविला जात होता. हा स्टेशन फंड स्टेशनच्या अधिक्षकांच्या नियंत्रणाखाली चालत असे. पुढे शहरातील लोकसंख्या वाढू लागली तशी जबाबदाऱ्या वाढल्या. तेव्हा पाचगणीचा कारभार पाहण्यासाठी जॉन चेसनने नगरपालिकेची मागणी केली. त्यावेळी ब्रिटिश सरकारने खास बाब म्हणून पाचगणीला १ एप्रिल १९१० रोजी नगरपालिकेचा दर्जा दिला. यावेळी या शहराची लोकसंख्या अवधी दोन हजार होती. शहराचे उत्पन्न ४,५४१ रुपये इतके होते. आज ही नगरपरिषद सातारा जिल्यातील श्रीमंत नगरपरिषद म्हणून ओळखली जाते. सन १९१० ते २०१० या शंभर वर्षांच्या काळात नगरपालिकेने अनेक विकासाभिमुख कामे करून या शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून

देण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी नगरपालिका प्रशासनाबरोबर स्थानिक कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यामध्ये माजी आमदार भि. दा. भिलारे गुरूजी, ह. भ. प. दत्तात्रय कळंबे महाराज व माजी नगराध्यक्ष नानासाहेब कासुर्डे, बाळासाहेब भिलारे व सध्याच्या नगराध्यक्षा सौ. कांचनमाला कऱ्हाडकर या लोकांचे योगदान मोठे आहे.

प्रत्येक गावाचा, शहराचा विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडून आलेले लोकप्रतिनिधी व त्यांची काम करण्याची इच्छाशक्ती आणि त्याला समाजाचा पाठिंबा मिळाला तर ते गाव, शहर सर्व दृष्टीने प्रगतीपथावर येण्यास वेळ लागत नाही. हे पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने आपल्या शंभर वर्षाच्या कारकिर्दीतून दाखवून दिले आहे.

संदर्भ सूची :

१) Sharma M. P., Local Self Government in India, Kitab Mahal, Allahabad, 1967, P. No. 6.

२) Nigam S. R., Local Government, S. Chand Company Ltd., New Delhi, 1968, P. No. 173.

३) डॉ. पाटील वा. भा., स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. २००९, पृ. ४.

४) डॉ. भोगले शांताराम कृष्णराव, भारतातील स्थानिक स्वशासन, शारदा प्रकाशन, नांदेड, पृ. २०.

५) कित्ता, पृ. २२.

६) Jha, Chetakar – Indian Local Self Government, Novelty Publication, Patana 1969, P. No. 32.

७) डॉ. पाटील वा. भा., स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. २००९, पृ. २२.

८) घोडके ह. म., महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्र. आ. २०००, पृ. ६०.

९) सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई प्रकाशित २००६, पृ. ७.

१०) कित्ता, पृ. ७.

११) कित्ता, पृ. ७.

१२) Irina Chelysheva, The Blue Mountain of Panchgani, Published by Nirman Impress Pvt., Ltd., Bombay 2001, P. No. 40.

१३) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद रेकॉर्ड.

१४) कित्ता.

१५) Maharashtra State Gazetter, Satara District (Revised Edition), 1963, P. NO. 863.

१६) दै. सकाळ, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शताब्दी वर्ष पुरवणी अंक, १ एप्रिल २०१०.

१७) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, नगराध्यक्ष कारकिर्द रेकॉर्ड रजिस्टर, २०१०.

१८) कित्ता.

१९) दै. सकाळ, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शताब्दी वर्ष पुरवणी अंक, १ एप्रिल २०१०.

२०) कित्ता.

२१) कित्ता.

२२) पागचणी गिरिस्थान नगरपरिषद निवडणुक अहवाल २०११.

२३) नानासाहेब कासुर्डे (मुलाखत) माजी नगराध्यक्ष, पाचगणी, २२ ऑगस्ट २०१२.

२४) दै. सकाळ – एप्रिल, २०१२.

२५) आशा राऊत (मुलाखत), पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, मुख्याधिकारी, ८ मार्च २०११.

२६) Dr. Bhogal S. K., Local Government and Administration in India, Aurangabad, 2009. P. No. 1.

२७) प्रा. बंग के. आर., महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्र. आ. २००९, पृ. २१३.

२८) कित्ता, पृ. २१३.

२९) दै. जरंडेश्वर समाचार, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेचा सोनियाचा दिन, रविवार, दि. ७ जून २००९.

३०) उपरोक्त, प्रा. बंग के. आर., पृ. २०१४.

३१) दै. सकाळ, ७ एप्रिल २०१२.

३२) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्रोसिडींग रेकॉर्ड फाईल २०११.

३३) दै. पुण्यनगरी, ७ जून २००९.

३४) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद स्थायी समिती अहवाल २०११–१२.

३५) मुलाखत – सचिन भिलारे, मुख्य लिपीक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद कार्यालय, ११ मार्च २०१२.

३६) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, माहितीपत्रक.

३७) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, महिला व बालकल्याण अहवाल २०१०–११.

३८) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, बांधकाम विभाग समिती अहवाल फाईल २००७.

३९) कित्ता – २०१०.

४०) कित्ता – २०१०.

४१) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद अहवाल २०११–१२.

४२) नगरपरिषद जी. बी. प्रोसिडींग बुक.

४३) नगरपालिका शासकीय रूग्णालय, शिलालेख.

४४) शिंदे जगन्नाथ (संपा.) जिव्हाळा ज्येष्ठ नागरिक संघ, वार्षिक अंक २०१२.

४५) पाणी पुरवठा विभाग समिती जी. बी. प्रोसिडींग बुक.

४६) A. D. T. P. Satara यांचे नुतनीकरण केलेले पत्र न. प. क्षेत्र/पाचगणी/ १८५८ दि. ७/९/१९९५.

४७) डॉ. पाठक अरूणचंद्र शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर, सातारा जिल्हा, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २०१२, द्वि. आ. २०१२, पृ. २७०.

४८) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद पाणी पुरवठा विभाग प्रोसिडींग बुक २००७.

४९) कित्ता.

५०) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शिक्षण समिती विभाग, अहवाल २०११–१२.

५१) मुलाखत – सौ. शिंदे सुशिला जगन्नाथ, मुख्याध्यापिका, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलींची शाळा क्र. २, २ एप्रिल २०११.

५२) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलींची शाळा क्र. २, नोंदवही २०११–१२.

५३) पाचगणी गिरिस्थान नगरपरिद, जी. बी. प्रोसिडींग.

५४) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद टाऊन प्लॅनिंग व्हॅल्युएशन विभाग.

५५) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद ए. डी. टी. पी. सातारा यांचे पत्र न. प. क्षेत्र / पाचगणी / १८५८ दि. ७/९/१९९५.

५६) Urban Develpment Plan – 1983 रेकॉर्ड.

५७) डॉ. पाठक अरूणचंद्र शं. (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटियर सातारा जिल्हा, दार्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई २०१२, द्वितीय आवृत्ती.

५८) उपरोक्त, गॅझेटियर (R. E.) १९६३, पृ. ८६०.

५९) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद महसुल विभाग अहवाल.

६०) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सातारा जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, गोखले इन्स्टिट्यूट, पुणे.

६१) उपरोक्त, महसुल विभाग.

६२) कित्ता.

६३) मुलाखत – चंद्रकांत कासुर्डे, वसुली विभाग पथक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, १० एप्रिल २०१२.

६४) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, वसुली विभाग रेकॉर्ड.

६५) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद पाणी पुरवठा विभाग, जी. बी. प्रोसिडींग.

६६) कित्ता.

६७) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, वार्षिक अंदाजपत्रके.

६८) कित्ता.

६९) कित्ता.

प्रकरण ४ थे

पाचगणी :
एक शैक्षणिक केंद्र

प्रकरण ४ थे

पाचगणी : एक शैक्षणिक केंद्र

४.१ भारतीय शैक्षणिक परंपरा

४.२ सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक परंपरा

४.३ पाचगणी येथे शाळा काढण्याचा उद्देश

४.४ पाचगणी शहरातील काही नामवंत शाळा

४.४.१ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. १ (इ. स. १८८०)

४.४.२ सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल (इ. स. १८९५)

४.४.३ किमिन्स हायस्कूल पाचगणी (इ. स. १८९८)

४.४.४ सेंट पिटर्स हायस्कूल (इ. स. १९०३)

४.४.५ बिलिमोरिया हायस्कूल (इ. स. १९०८)

४.४.६ अंजुमन–ए–इस्लाम पब्लिक स्कूल (इ. स. १९२०)

४.४.७ हिन्दू हायस्कूल/संजीवन विद्यालय (इ. स. १९२२)

४.४.८ एस. एम. बाथा हायस्कूल पाचगणी (इ. स. १९२२)

४.४.९ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. २ (इ.स. १९३५)

४.४.१० न्यू इरा हायस्कूल (इ. स. १९४५)

४.४.११ महात्मा फुले विद्यामंदिर (इ. स. १९६०)

४.४.१२ डॉन ॲकॅडमी स्कूल (इ. स. १९८३)

संदर्भ सूची

प्रकरण ४ थे

पाचगणी : एक शैक्षणिक केंद्र

शिक्षण ही प्रक्रिया अत्यंत व्यापक आहे. या प्रक्रियेतून व्यक्ती, समाज, राष्ट्र व संपूर्ण विश्व यांची प्रगती करणे शक्य असते. ही व्यक्तिगत जीवनाला पर्यायाने सामाजिक जीवनाला व्यापून टाकणारी प्रक्रिया आहे. शिक्षण तज्ज्ञांनी मांडलेल्या उद्दिष्टांचा एकत्रितपणे अभ्यास केल्यास असे दिसून येते की, शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आमुलाग्र परिवर्तन घडवून आणणे आणि त्याला भावी काळातील सुजाण, सुसंस्कृत आणि स्वावलंबी असा उत्तम नागरिक बनविणे हे शिक्षणाचे काम आहे.

भारतीय शिक्षणाची परंपरा दीर्घ आणि उच्च कोटीची आहे. प्राचीन काळी नालंदा, विक्रमशील, तक्षशिला, वाराणसी, बनारस यासारखी शिक्षणाची विकसित केंद्रे होती. ही प्राचीन विद्यापीठे त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे जगभरात प्रसिद्ध होती. येथील गुरूकुल शिक्षण पद्धती ही जगभरातील शिक्षण तज्ज्ञांसाठी कुतूहलचा विषय होता. गुरूगृही राहून विद्यार्थ्याने शिक्षण मिळविणे व आपल्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्वाला आकार देणे ही प्राचीन परंपरा आधुनिक काळात पब्लिक स्कूल्स (निवासी शाळा) च्या संकल्पनेतून साकार झालेली असून आज भारतात डेहराडून, पाचगणी यासारखी केंद्रे या पब्लिक स्कूल्ससाठी प्रसिद्धीला आलेली आहेत. ही पब्लिक स्कूल्सची परंपरा अठराव्या शतकात ब्रिटीश कालखंडात सुरू झाली. तसेच ब्रिटीशांच्या धोरणामुळे भारतात सर्वसामान्यांसाठी शिक्षण व्यवस्था खुली झाली. त्यासाठी ब्रिटीश उदारमतवादी लॉर्ड मॅकेलो, विल्यम बेटिंग, चार्लस् वूड यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. ब्रिटीशांच्या शिक्षण प्रक्रियेतून देशात शिक्षणाला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाच्या प्रसार व प्रचाराला वेग आला. एकविसाव्या शतकाचे नेतृत्व भारताकडे असेल असा दुर्दम्य आत्मविश्वास दाखविणारे डॉ. रघुनाथ माशेलकर आणि २०२० साली 'भारत महासत्ता' बनेल अशी स्वप्नवत वाटणारी पण कृतिशील विचाराने वास्तवाच्या जवळ जाऊ लागलेली भूमिका पेरत, रूजवत असलेले राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे.

अब्दुल कलाम आणि या आवाहनाला प्रतिसाद देत ग्लोबल वातावरण उभारू पाहणारे भारतीय तरुण हे आजचे चित्र आनंददायी आहे. या साऱ्याचा प्रारंभ मात्र छोट्या शहरामधून होतो. वैश्विक (ग्लोबल)विचार करताना स्थानिक स्तरावर म्हणजेच पाचगणी शहरासारख्या छोट्या शहरामध्ये ब्रिटीश काळात शिक्षण केंद्रांचा झालेला विकास, त्यांची गुणवत्ता, केंब्रिज विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या शाळा, कडक शिस्त, उच्च नैतिक मूल्ये जपणारी, पब्लिक स्कूल्स आजही आपली परंपरा जपत आंतरराष्ट्रीय दर्जा टिकवून ठेवला आहे. पाचगणी परिसरातील विविध परिवर्तने, विविध विकासाचे संदर्भ येथील शिक्षणामुळेच झाले. पाचगणी शहराचा अभ्यास करीत असताना या शहरात असणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांचा अभ्यस होणे आवश्यक आहे. पाचगणी शहराच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणारी ही शैक्षणिक केंद्रे या शहराचा अविभाज्य घटक ठरतो. त्यामुळेच प्रस्तुत प्रकरणात पाचगणी शहरातील काही महत्त्वाच्या शाळांचा आढावा घेतला आहे. या प्रकरणासाठी अभ्यास करीत असताना प्रत्यक्ष शाळांना भेटी, संबंधित व्यक्तिंच्या मुलाखती, शाळांचे अहवाल, प्रॉस्पेक्ट, वार्षिक अंक, शालेय रजिस्टर, नोंदी इ. साधनांचा उपयोग प्रस्तुत प्रकरणासाठी केला आहे.

४.१ शिक्षण – पारंपारिक आणि आधुनिक :

शिक्षण संकल्पना :

'शिक्षण' ही एक अव्याहत चालणारी प्रक्रिया आहे. मानवाला मिळालेल्या 'विचार करण्याच्या सामर्थ्यां' बरोबरच ही प्रक्रिया सुरू झाली. जगाच्या विविध भागातील मानवी समूहात शिक्षणाची ही परंपरा, पद्धती वेगवेगळी आहे. जीवन सुसह्यपणे जगणे, त्यासाठी आवश्यक गोष्टींची निर्मिती करणे, त्यासाठी निसर्गाचे ज्ञान प्राप्त करीत रहाणे ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. हे शिक्षणाविषयीचे विचार सर्वसाधारणपणे सर्वच विचारवंतांच्या विचारातून प्रकट होतात. भारतीय विचारवंतांच्या प्रतिपादनात सर्वांगीण मानवी विकासाबरोबरच तत्कालिन परिस्थितीचा प्रभाव जाणवतो. महात्मा गांधींच्या मते, ''शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन आणि आत्मा या त्रयींमध्ये जे सुप्त अवस्था आहे त्याचा सर्वांगिण विकास घडवून आणणे.''[१] लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या विचारानुसार, ''देशाची तरुण पिढी देशाचे राजकीय,

औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशाप्रकारे त्यास शिक्षण देणे आवश्यक आहे. हेच खरे राष्ट्रीय शिक्षण होय.''[२] डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात की, ''व्यक्तीच्या आत्म्याला मुक्तपणे विकसित होऊ देणे व त्यासाठी मदत करणे हा शिक्षणाचा खरा हेतू आहे.''[३] तर महात्मा जोतिबा फुलेंच्या मते, ''समाज परिवर्तनाचे हुकमी हत्यार म्हणजे शिक्षण होय.''[६]

भारतीय परंपरेनुसार कुटूंब हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र होय. त्यामध्ये आईवडील हे बालकांचे पहिले गुरू होत. पुढे गुरूगृही जाऊन मुखोद्‌गत पद्धतीने शिक्षण ही पुढची पायरी होय. भारतीय समाज साचेबंद थिजलेल्या स्वरूपात फारसा कधी राहू शकला नाही. सतत वैविध्यपूर्ण विचारांची उपज, नवनवीन विचारप्रवाह आणि त्यातून अंतिम सत्याचा शोध हा सातत्यपूर्ण होताना दिसतो. म्हणूनच बौद्ध-जैन विचारांची उत्पत्ती व उपासना येथे झाली नवव्या शतकात आद्य शंकराचार्यांनी वैदिक धर्माच्या पुनरूज्जीवनासाठी भारताच्या चारी दिशांना चार मठ स्थापन करून त्यांना शिक्षण केंद्रे बनविली. त्यामुळे वैदिक अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासाला चालना मिळाली.[५]

आधुनिक काळातील शिक्षणाचे दोन टप्पे पडतात. एक ब्रिटिशकालीन शिक्षण व दुसरा स्वातंत्र्यानंतरचे शिक्षण. भारतात आधुनिक कालखंड हा ब्रिटिशांच्या आगमनापासून मानला जातो. भारतात ब्रिटिशांच्या आगमनाने इंग्रजी शिक्षणाला प्रारंभ झाल्यामुळे पाश्चात्य विचार, आधुनिक तत्वज्ञान, वैज्ञानिक प्रगती यांची जाणीव झाली.[६]

महाराष्ट्रातील शैक्षणिक वाटचाल :

महाराष्ट्रातील शिक्षणाला निश्चित दिशा देण्यासाठी १८४० साली मुंबई येथे 'बोर्ड ऑफ एज्युकेशन', हे मंडळ स्थापन करण्यात आले. मंडळावर शाळा सुरू करणे, अभ्यासक्रम तयार करणे, भारतीय भाषांना उत्तेजन मिळावे म्हणून मराठी व गुजराती भाषेतून ग्रंथ निर्मिती करण्याची जबाबदारी सोपविली गेली.[७]

अशा प्रकारे ब्रिटिशांच्या शैक्षणिक धोरणाने भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आला. महाराष्ट्रात नवशिक्षितांची पिढी तयार झाली. त्यातूनच जगन्नाथ शंकर शेठ,

डॉ. आत्माराम पांडुरंग, डॉ. भाऊ दाजी लाड, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, भांडारकर, महात्मा फुले, महर्षी कर्वे असे समाजसुधारक निर्माण झाले व महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळीला गती प्राप्त झाली.

४.२ सातारा जिल्ह्यातील शैक्षणिक परंपरा :

सातारा जिल्ह्याची शैक्षणिक परंपरा फार प्राचीन आहे. वाईच्या उत्तरेकडील पांडवलेणी व कऱ्हाडमधील आगाशिवची बौद्ध लेणी, यामध्ये मगध विश्वविद्यालयाची शाखा होती. म्हणजेच इ. स. पूर्वपासून या जिल्ह्यात शैक्षणिक प्रक्रियेची सुरूवात झाली होते.[८] मध्ययुगीन भक्तिसंप्रदायात नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय यांनी ज्ञानदानाचे कार्य या भागात चालू ठेवले होते. दासपंथीय समर्थ रामदासांनी चाफळ, मसूर, सज्जनगड येथे आपले कार्य चालू ठेवले होते, तर वाई, कराड, सातारा येथे संस्कृत पंडिताच्या 'संस्कृत पाठशाला', मधून शैक्षणिक कार्य चालविल्याची माहिती मिळते.

साताराचे छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे शैक्षणिक कार्य :

समाजसुधारणेचे प्रणेते व बंगालचे थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांच्या (सन १७७३–१८३३) अलौकिक कार्याने प्रेरित झालेल्या सातारच्या छत्रपती प्रतापसिंह महाराजांनी बहुजन समाज व स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे जिल्ह्यातील पहिली मराठी पाठशाळा शाहुच्या राण्यांचा राणीवसा म्हणून बांधलेल्या 'रंगमहाल' या वाड्यात सन १८२९ मध्ये सुरू केली. या शाळेत संस्कृत, पर्शियन, मराठी, इंग्रजी, ज्योतिष व व्यायामाबाबतचे शिक्षण देण्याची सोय केली. ही शाळा डॉ. मिटन व त्यांचे तीन मिशनरी शिक्षक सहकाऱ्यांमार्फत चालविली जात असे.[९] छत्रपती प्रतापसिंह महाराजांच्या प्रेरणेतून पुढे नाना शंकर शेठ, महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सातारा जिल्ह्यात शैक्षणिक कार्याला सुरूवात केली.

४.३ पाचगणी येथे शाळा काढण्याचा उद्देश :

ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीय उन्हाळा सुसह्य करण्यासाठी उंच पर्वतीय प्रदेशातील थंड हवेच्या ठिकाणांचा शोध लावला आणि तेथे वसाहती निर्माण केल्या. प्रथम पाचगणी हे

निवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्याचे निवासाचे ठिकाण बनले. मुंबई इलाख्यात राहणारे इंग्रज अधिकारी व त्यांची मुले साथीच्या रोगाने दगावू लागली. त्यामुळे मुलांना स्वच्छ, आल्हाददायक वातावरणात राहता यावे तसेच त्यांची शैक्षणिक गरजही पूर्ण व्हावी यासाठी पाचगणी या थंड हवेच्या प्रदेशात शाळा सुरू करण्यात आल्या. सुरूवातीला युरोपियन मुलांसाठी सुरू केलेल्या या शाळा पुढे राजेरजवाडे, जहागीरदार, संस्थानिक यांच्या मुलांसाठीही खुल्या झाल्या.[१०] सन १९४५ नंतर या शाळेतून श्रीमंतच परंतु सर्व वर्गातील मुलांना प्रवेश दिला जाऊ लागला. सुरूवातीला केवळ सात शाळा होत्या. पुढे सन १९५० पर्यंत त्यांची संख्या अठरा झाली. सन १९५० नंतर या शाळांची संख्या झपाट्याने वाढली, आज इथे वेगवेगळ्या समाजाच्या ३८ निवासी शाळा आहेत.[११]

४.३.१ गुणवत्तापूर्ण व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांची निर्मिती :

वसाहतीमध्ये असणाऱ्या मुलांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे शिवाय सदरच्या शैक्षणिक संस्था दर्जेदार कशा होतील याकडे ब्रिटीश अधिकाऱ्यांनी व जॉन चेसनने विशेष लक्ष दिल्याने युरोपियन मुला-मुलींसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निवासी शाळा निर्माण करण्यात आल्या. सदर शाळेतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व, त्याची मानसिकता, त्याचे कौशल्ये, त्याची आवड जपण्याचा प्रयत्न केला. निसर्ग सान्निध्यात, सर्व सोयी सुविधांनी युक्त विस्तृत परिसर, विद्यार्थ्यांच्या राहण्या-खाण्यापासून ते आरोग्यापर्यंतच्या अत्यूच्च दर्जेदार सोयी त्यामुळे येथील शाळांमधून शिकणारा विद्यार्थी Once been once a part of one of these schools[१२] व्यक्तिमत्त्वाचा बनत असल्याने पालकांना कोणतीही काळजी राहिली नाही.

येथे निवासी व बिगर निवासी असे शाळांचे प्रकार आहेत. निवासी शाळेमध्ये जेवणाखाण्याची, राहण्याची सोय असते. ही मुले पूर्णपणे शाळेच्या बंधनात असतात. त्यामुळे प्राचीन कालीन 'गुरूकुल पद्धतीची जाणीव', होते. त्यामुळेच पाचगणीला 'बालग्राम विद्यार्थी गाव', असे म्हटले जाते.

४.३.२ पाचगणी येथे शाळांची सुरूवात :

पाचगणीत युरोपियनांचे आगमन १८५४ साली झाले. परंतु येथे शाळा सुरू होण्यास पंचवीस वर्षाचा कालावधी जावा लागला. सर्वात प्रथम पाचगणीत सन १८८० मध्ये लोकल बोर्डाने सुरू केलेली मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू झाली.[१३] १८९५ साली सेंट जोसेफ कॉन्व्हेंट गर्लस् स्कूल सुरू झाली.[१४] ही शाळा रोमन कॅथॉलिक पंथियांनी सुरू केली. त्यानंतर इ. स. १८९८ मध्ये 'किमिन्स हायस्कूल' ही शाळा सुरू झाली.[१५] यानंतर सन १९०२ मध्ये या शाळेचे विभाजन होऊन मुलांची व मुलींची शाळा वेगळी झाली. अशा प्रकारे सन १८९० ते १९०२ पर्यंत केवळ तीन शाळा सुरू झाल्या होत्या. या शाळा त्या काळातील 'रोल मॉडेल्स' होत्या. या शाळा त्या काळात इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाशी संलग्न होत्या.

४.४ पाचगणी शहरातील शाळा :

४.४.१ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. १ (इ. स. १८८०) :

पाचगणी येथे मराठी माध्यमाची शाळा सुरू होण्यापूर्वी सातारा जिल्ह्यात साताऱ्यामध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी इ. स. १८२९ मध्ये 'रंगमहाल' (शाहूंच्या राण्यांचा राणीवसा म्हणून बांधलेला वाडा) या वाड्यात मराठी पाठशाळा सुरू केली होती.[१६] त्यानंतर पाचगणीमध्ये शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी ७० वर्षानंतर १६ ऑगस्ट १८८० मध्ये पहिली मराठी माध्यमाची लोकल बोर्डाकडून शाळा सुरू झाली.[१७] ही शाळा जिल्हा लोकल बोर्डामार्फत चालविली जात होती. यासाठी कंपनीकडून सरकारी अनुदान मिळत होते.

सन १९७९ नंतर पाचगणीची प्राथमिक शाळा सातारा जिल्हा परिषदेकडील नियंत्रणातून पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली व तेव्हापासून ही शाळा 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलांची शाळा क्रं. १', या नावाने ओळखली जाऊ लागली आणि त्याच वेळी या शाळेसाठी 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे ब्रीदवाक्यही अंगिकारण्यात आले. महाराष्ट्र शासनातर्फे गिरिस्थान पाचगणी नगरपरिषद शिक्षण मंडळाची स्थापना होऊन या शाळांची देखभाल व नियंत्रणासाठी प्रशासकीय अधिकारी नेमले जाऊ लागले.[१८] आज ही शाळा पूर्णत: पाचगणी नगरपरिषदेतर्फे चालविली जाते.

पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. १

- **पाचगणी शाळेतील पहिली पिढी :**

पाचगणी परिसरातील शिक्षितांची पहिली पिढी घडविण्याचे कार्य सध्याच्या 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या शाळा क्र.१' या शाळेने केले. याच शाळेतून जावळी भागाचे आमदार भिलारे गुरूजी, पाचगणीतील जंगम गुरूजी, डॉ. सावंत, तात्यासाहेब बगाडे, कै. भाऊसाहेब भिलारे, सदाशिवराव गाडेकर, अण्णासाहेब कासुर्डे, शारंगधर महाडीक, कै. बाबुराव ओंबळे, बेलोशे गुरूजी, वासुदेव वालाजी पुरोहित, दत्तोबा गाडेकर, वच्छराजभाई दोशी, ह. भ. प. दत्तात्रय कळंबे महाराज, बी. जी. पाटील, विनायकराव देशपांडे, यासिन मुल्ला गुरूजी असे अनेक स्वातंत्र्यसैनिक निर्माण झाले.[१९] याच पिढीने पुढे पाचगणीच्या संपूर्ण भागाचे नेतृत्व केले व या शहराला विकासाच्या टप्प्यावर आणून ठेवले.

- **शाळेचे स्थान व विस्तार :**

लोकल बोर्डातर्फे सुरू झालेली ही शाळा सध्या टेबललँड नाका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चौकात आहे. इ. स. १८८० मध्ये याच जागेवर जॉन चेसन व त्याच्या मित्रांनी बांधलेल्या घरापैकी एका घरात प्रथम ही शाळा सुरू झाली. इ. स. १८८० ते १९३४ पर्यंत या शाळेत इयत्ता पाचवीपर्यंतचे शिक्षण मिळत होते. पुढील सहावी व सातवीच्या शिक्षणासाठी महाबळेश्वरला जावे लागे. त्यामुळे सन १९३४ मध्ये महाबळेश्वरच्या कलेक्टरने पाचगणी येथे सहावी व सातवीच्या वर्गासाठी ब्रिटिश सरकारकडून परवानगी आणली. त्यामुळे सन १९३४ नंतर पाचगणीच्या शाळेत इयत्ता सातवीपर्यंतचे शिक्षण सुरू झाले. इ.स. १९३४ मध्ये पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेने काही पारशी व ख्रिश्चन देणगीदारांच्या मदतीने आठ खोल्यांची इमारत बांधली. आजही ही इमारत व्यवस्थित आहे व त्याच इमारतीत शाळा भरते. नगरपालिकेने वेळोवेळी त्याची देखभाल व रंगरंगोटी करून त्याला आधुनिकतेची जोड दिली आहे. इ. स. १९९० मध्ये या शाळेवर दुसरा मजला बांधला. तेथे मुलांसाठी स्वतंत्र ड्रॉईंग रूम, कॉम्प्युटर रूम, स्टोअर रूम तयार केले गेले आहेत.[२०]

- **शाळेतील शिक्षक वर्ग :**

जेव्हा १६ ऑगस्ट १८८० रोजी मराठी शाळा सुरू झाली तेव्हा प्रारंभी या शाळेत शिकविण्यासाठी सातारच्या छत्रपतींच्या राजवाड्यातून शिक्षकांची नेमणूक झाली होती. त्यानंतर सन १९२८ मध्ये महाबळेश्वरचे श्री. शामराव देशपांडे यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर सध्या इ.स.२००९ पासून श्री. रामचंद्र भिमाना कांबळे हे काम पहात असून येथे मुख्याध्यापकासहीत सात शिक्षक आणि एक शिक्षकेतर सेवक कार्यरत आहे.

- **गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम :**

प्राथमिक मराठी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पाचगणीत असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसारखे शिक्षण मिळावे ही अपेक्षा अलीकडे जागरूक पालकांमध्ये वाढीस लागली आहे. त्यामुळे या शाळेलाही आपली गुणवत्ता व दर्जा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठीच इथे गुणवत्ता विकास प्रकल्प, बाह्य परीक्षा प्रकल्प, संगणक ज्ञान, इंग्रजी उजळणी वर्ग इत्यादी. या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत. पाचगणी हे कबड्डी व फुटबॉलसाठी राज्यस्तरीय पातळीवर प्रसिद्ध आहे. इथल्या प्रत्येक शाळेत मुलांना क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविण्यासाठी इनडोअर व आऊटडोअर गेम्ससाठी भव्य मैदाने व सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. नगरपालिका शाळांना हे शक्य नसते. तरीही पाचगणी गिरिस्थानने या प्राथमिक शाळेसाठी काही सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे या शाळेत 'पाचगणीचा वार्षिक कबड्डी महोत्सव' राज्यस्तरीय स्वरूपात भरविला जातो. त्यात लहान गटात या शाळेच्या विद्यार्थ्यांनी इ. स. २००६ ते २०१२ या सहा वर्षात सलग विजेतेपद मिळविले आहे.[२१]

या शाळेचे एक वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्र शासनाचा 'शालेय पोषण आहार' उपक्रम पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेच्या या शाळेत यशस्वी होताना दिसतो कारण पाचगणी नगरपालिका स्वत: ५०% खर्चाचा वाटा उचलते व या अभियानांतर्गत या शाळेतील विद्यार्थ्यांना केवळ खिचडी न देता त्यांना वेगवेगळी कडधान्ये, फळे, उकडलेली अंडी, भाज्यांचे सूप असे पोषक आहार उपलब्ध करून दिले जातात. या शाळेनेही थोडी कल्पकता

दाखवून मुलांना आवडेल अशा प्रकारे हे पदार्थ तयार करून दिले जातात. त्यासाठी स्वतंत्र तीन व्यक्तींची नेमणूक केली आहे. या अभियानाला 'महाराष्ट्र शासनाचा आदर्श पोषक आहार पुरस्कार' इ. स. २०१० व इ. स. २०१२ मध्ये प्राप्त झाला आहे.[२२]

इ. स. १८८० ला सुरू झालेली मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा इ. स. १९९० पर्यंत अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरू होती. परंतु इ. स. १९९० नंतर पाचगणीतील इंग्रजी शाळेतून स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू लागला. पालकही जागृत झाले व इंग्रजी माध्यमाला अती महत्त्व प्राप्त झाल्याने समाजातील सर्वसामान्य लोकांचाही ओढा इंग्रजी या माध्यमाकडे वाढल्याने मराठी माध्यमाच्या विद्यार्थी संख्येवर त्याचा परिणाम होऊ लागला. इ. स. २००९ पर्यंत या शाळेतील विद्यार्थी संख्या ही ६५० ते ७५० या दरम्यान होती. परंतु २०१० साली ही संख्या एकदम ५५० वर आली. २०१२ साली ही संख्या ४०० वर आली आहे.[२३] त्यामुळे याच प्रमाणात विद्यार्थी संख्या घटत राहिली तर ह्या शाळा टिकतील का हा प्रश्न आहे.

आज वैज्ञानिक व इंटरनेटच्या युगात इंग्रजी भाषेला महत्त्व असले तरी मातृभाषेतील शिक्षणातून जो विद्यार्थी घडतो त्याला विषय ज्या चांगल्या पद्धतीने समजू शकतो तो परकीय भाषेतून समजू शकत नाही. शिवाय शासनानेही इंग्रजीचे महत्त्व जाणून प्राथमिक स्तरापासून इंग्रजी हा एक विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करून सेमी इंग्लिश शाळा सुरू केल्या आहेत. त्यामुळे मातृभाषेबरोबर इंग्रजीचे ज्ञान मिळू लागले आहे. असे असले तरी प्राथमिक मराठी शाळांची अवस्था फारशी समाधानकारक नाही. याची कारणे केवळ शासनाने शोधून चालत नाही तर समाजातील विचारवंतांनी, अभ्यासकांनी अभ्यास करून तो जनमानसात समजवावा. तरच मराठी शाळा टिकू शकतील अन्यथा गरीबांना शिक्षण घेणे अवघड होईल.

४.४.२ सेंट जोसेफ कान्व्हेंट स्कूल, पाचगणी (इ. स. १८९५) :

सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल म्हणजे पाचगणीतील पहिली निवासी शाळा. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी पाचगणीत युरोपियन मुलांसाठी सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळेपैकी पहिली शाळा होय. सुरूवातीपासूनच अतिशय कडक शिस्त, नैतिक मूल्यांची व गुणवत्तेची जोपासना करणारी शाळा म्हणून प्रसिद्धीला आलेली आहे. ही शाळा फक्त मुलींसाठी असल्याने देशभरातील मुली येथे शिक्षणासाठी येत असतात.

सेंट पिटर्स हायस्कूल (इ. स. १९०३)

➢ **शाळेची स्थापना व ध्येय :**

सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची स्थापना १ ऑक्टोबर १८९५ रोजी झाली. ही शाळा सुरू करण्यासाठी कॅथॉलिक एज्युकेशन सोसायटीच्या नन (Daughters of the cross) यांनी पुढाकार घेतला व त्यांनी मुलींच्यासाठी ही शाळा सुरू केली. सुरूवातीला केवळ आठ मुली पुणे, मुंबई येथून घेऊन येऊन ही निवासी शाळा पाचगणी येथे सुरू केली.[२५] ही शाळा सुरू करताना केवळ युरोपियन मुलींच्यासाठी असे बंधन घातले नाही. युरोपियन मुलींच्याबरोबर इतर समाजातील मुलींनाही प्रवेश घेण्याची सवलत होती. ही शाळा ॲग्लो इंडियन शाळा म्हणूनही ओळखली जात होती. त्यामुळे १८९६ सालापासून या शाळेतील विद्यार्थिनींची संख्या वाढलेली दिसते.

ही शाळा कट्टर पंथीय कॅथॉलिकांची असली तरी मुलींच्या शिक्षणासाठी या काळात मोठे धाडसी पाऊल उचलले होते. इथले शिक्षण केवळ परंपरावादी शिक्षण नव्हते तर मुलींनीही प्रत्येक क्षेत्रात भरारी घेतली पाहिजे अशा विचारसरणीवर ही शाळा सुरू केली होती. त्यामुळे या शाळेचे ब्रीदवाक्यही ' Ever Higher', असे निवडले आहे.[२६]

सध्या ही शाळा 'सेंट जोसेफ एज्युकेशन ॲण्ड मेडिकल रिलिफ सोसायटी' या संस्थेमार्फत चालविली जाते. या शाळेत प्रवेश इयत्ता तिसरीपासून दिला जातो. इ. स. १९९० नंतर ज्युनिअर के. जी. चा वर्ग सुरू केला. त्यानंतर सिनिअर के. जी., इयत्ता पहिली व दुसरीचे वर्गही सुरू केले. त्यामुळे या शाळेत के. जी. ते इयत्ता दहावीपर्यंतचे वर्ग भरतात.

➢ **शाळेचा विस्तार :**

सेंट जोसेफ स्कूल सुरूवातीच्या पाचगणीच्या कॅथॉलिक चर्चमध्ये सुरू झाली. १९०२ साली टेबल लँडच्या पायथ्याशी वीस एकर जागा खरेदी केली व त्या जागेवर १९०७ साली भव्य दोन मजली इमारत बांधली. सध्या या इमारतीत शाळेचे वर्ग, सायन्सच्या स्वतंत्र तीन लॅब, कॉम्प्युटर लॅब, होम सायन्स लॅब, ग्रंथालय आहे.[२८] या शाळेच्या इमारती शेजारी साधारण दोनशे मुली राहू शकतील असे सुसज्ज वसतीगृह बांधले आहे. या वसतीगृहात निवासाबरोबर, सुसज्ज ग्रंथालय, जिमखाना, नृत्य शाळा, संगीत हॉल, चित्रकला

दालन, शिलाई मशिन रूम, वैद्यकीय रूम असल्याने मुलींना शाळेनंतर इथे आपला वेळ व्यतीत करता येतो व आपल्या कलेलाही वाव देता येईल. याच हेतूने वसतीगृहाची निर्मिती कल्पकतेने केली आहे.

केंब्रीज विद्यापीठाच्या धर्तीवर अभ्यासक्रम :

सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल ही पाचगणीतील एक अग्रगण्य शाळा म्हणून ओळखली जाते ती इथे शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमामुळे. इथला अभ्यासक्रम जो आहे तो केंब्रिज विद्यापीठाच्या धर्तीवर आहे. जेव्हा इ. स. १८९५ ला ही शाळा सुरू झाली तेव्हा या शाळेचा अभ्यासक्रम इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाशी संलग्न असणारा होता. या शाळेची परीक्षाही त्याच विद्यापीठाकडून घेतली जाई. त्या काळात बोटीने डिसेंबर महिन्यात प्रश्नपत्रिका येत असत. त्यानंतर परीक्षा घेऊन त्या उत्तरपत्रिका बोटीने परत इंग्लंडला तपासण्यासाठी पाठविल्या जात व जूनमध्ये त्याचा निकाल लागे. म्हणजे ही शाळा पूर्णतहा केंब्रिज विद्यापीठाशी निगडीत होती.[२९] आजही या शाळेचा अभ्यासक्रम केंब्रिज विद्यापीठाच्या धर्तीवर शिकविला जातो. म्हणजेच या शाळेत आय. सी. एस. ई. (Indian Certificate of Secondary Education) बोर्डाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. त्याचबरोबर स्त्री ही कुटूंबाचा आधारस्तंभ, त्यामुळे मुलगी शिक्षणाबरोबर इतरही गोष्टीत निपुण बनली पाहिजे, याचीही काळजी घेतली जाते. त्यासाठी इथे इयत्ता आठवी ते दहावीच्या मुलींच्यासाठी गृहशास्त्र विभाग चालविला जातो. मुली तंत्रज्ञानातही मागे रहाता कामा नये यासाठी संगणकीय शिक्षणाबरोबर त्याची देखभाल व दुरुस्ती याचेही प्रशिक्षण दिले जाते. शिक्षणाबरोबर मुलींच्या आरोग्यासाठी विविध क्रीडा प्रकारही शिकविले जातात. त्यामध्ये या शाळेचा राष्ट्रीय स्तरावर हॉकी यात प्राविण्य सातत्याने टिकवून ठेवले आहे. एवढेच नव्हे तर कबड्डी व क्रिकेटमध्येही या शाळेने अनेक राज्यस्तरीय बक्षीसे मिळविली आहेत. एकंदर ह्या शाळेचा अभ्यासक्रम उच्च आंतरराष्ट्रीय दर्जाचा आहे. शिवाय विद्यार्थिनींच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीनेही इतरही पूरक गोष्टीकडे लक्ष दिलेले आहे.

➢ **गुणवत्तेवर आधारित प्रवेश :**

सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल ही कॅथॉलिक बिशपनी सुरू केली असली तरी या शाळेने त्या काळात निघालेल्या इतर इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांइतके कडक धोरण अवलंबिले नव्हते. या शाळेत युरोपियन मुलींच्याबरोबर इतर जातीधर्माच्या मुलींनाही प्रवेश खुला होता. त्यामुळे या शाळेची फी इतर शाळांच्या मानाने अत्यंत माफक होती. प्रवेश घेताना निवासी विद्यार्थिनींसाठी एका वर्षाची फी ही नव्वद हजार रुपये इतकी आहे. यामध्ये प्रवेश प्रक्रिया ते निवास व्यवस्था यांचा समावेश होतो. अनिवासी विद्यार्थिनींच्यासाठी दरमहा ५५० रुपये फी आकारली जाई. इ. स. २००५ पासून ही फी दरमहा के. जी. ते पाचवीपर्यंत ४५० रुपये व सहावी ते दहावीच्या मुलींना १२०० रुपये फी आकारली जाते.[३०] या शाळेत प्रवेश घेण्यासाठी प्रथम पालक व विद्यार्थिनीची आय. क्यू. टेस्ट घेतली जाते व त्यातून गुणवत्ता यादी तयार केली जाते व गुणवत्तेवर आधारित प्रवेश दिला जातो.

➢ **शाळेतील विविध उपक्रम :**

या शाळेमध्ये अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर अनेक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये को–करिक्युलर ॲक्टिव्हीटी, शारीरिक शिक्षण, मैदानी खेळ, गायन, नाटक, पारंपारिक नृत्यकला, सामाजिक कार्य व एखाद्या विषयावर प्रोजेक्ट तयार करणे असे उपक्रम घेतले जातात. दरवर्षी २६ जानेवारीला साजरा केल्या जाणाऱ्या प्रजासत्ताक दिनाला पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेतर्फे शिवाजी चौकात ध्वजवंदनाचा भव्य कार्यक्रम आयोजित केला जातो. त्यामध्ये राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्याची जी परडे होते त्यामध्ये सर्वात अव्वल दर्जाचे संचलन (परेड) सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूलचे असते.[३१] या शाळेत शिकविणाऱ्या नन्स् आपली सेवा मोफत देतात.

विद्यार्थी व पालक या दोघांनीही शाळेच्या नियमांचे पालन केले पाहिजे. ही कडक शिस्त इथे आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थी यांच्याकडून नियमांचे उल्लंघन होत नाही. या कडक शिस्तीवरून ब्रिटिशांच्या प्राचीन परंपरेचे दर्शन होते. शिवाय नियमांचे काटेकोर पालन, त्यासाठी अंगी नम्रता, कष्ट करण्याची तयारी, चपळता याचे दर्शन शाळेच्या इमारतीपासून विद्यार्थिनी, शिक्षक, कर्मचारी यांच्यापर्यंत दिसून येते. या शाळेतून शिक्षण घेतलेल्या झीनत

अमान, काजल मुखर्जी, राणी मुखर्जी, ट्विंकल खन्ना, पहिल्या महिला पोलिस ऑफीसर किरण बेदी, मीरा बोरवणकर, पाचगणीच्या नगराध्यक्षा लक्ष्मी कराडकर यांच्या आपापल्या क्षेत्रातील कार्यातून या शाळेचे महत्त्व लक्षात येईल.

४.४.३ किमिन्स हायस्कूल पाचगणी (इ. स. १८९८) :

पाचगणीमधील जुनी, नावाजलेली आणि मिशनऱ्यांनी सुरू केलेली ही दुसरी शाळा होय. ही शाळा प्रथम को एज्युकेशन होती. सन १९०२ मध्ये या शाळेतून मुलांची शाळा वेगळी काढून तिला 'बॉईज हायस्कूल' हे नाव दिले. आज या दोन्ही शाळा पाचगणीतील दर्जेदार शाळा म्हणून ओळखल्या जातात.

➢ **शाळेची स्थापना व उद्देश :**

किमिन्स हायस्कूलची स्थापना इ. स. १८९८ साली पाचगणी माता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कु. अलाईस इमिली किमिन्स यांनी केली.[३२] ही शाळा जनाना बायबल आणि वैद्यकीय मिशनरी सोसायटी या ख्रिश्चन मिशनतर्फे सुरू करण्यात आली. भारतात त्या प्रथम मुंबई इलाख्यातील गिरगाव येथे झेनान मिशन हायस्कूलमध्ये काम करू लागल्या तेव्हा त्यांना पाचगणी येथे युरोपियन मुलांना घेऊन जाऊन शाळा काढण्यास सुचविले गेले. त्यानुसार इ. स. १८९८ मध्ये त्या पाचगणीत आल्या.[३३] परंतु या युरोपियन मुले मुंबईतील उष्ण व दमट हवामान सहन करू शकत नव्हते. तसेच मुंबई ईलाख्यात प्लेगच्या साथीने ही मुले दगावत होती. अशा परिस्थितीत या मुलांच्या संगोपनासाठी व शिक्षणासाठी थंड हवामानाच्या प्रदेशाचा शोध घेतला गेला व पाचगणी येथे अल्हाददाय वातावरणात शाळा काढण्याचा निर्णय घेतला. त्याच उद्देशाने ही शाळा काढली गेली.

➢ **शाळेचा इतिहास :**

मिस किमिन्स या काही मोजक्या मुलांना घेऊन पाचगणीत आल्या. तेव्हा याच दरम्यान पाचगणीत श्रीमती हव्हान्स या एक छोटीसी प्रोटेस्टंट पंथीय अनिवासी शाळा पाचगणीतील ब्रिटिश मुलांच्यासाठी चालवित होत्या.[३४] पुढे ही शाळा बंद झाली. मिस किमिन्स पाचगणीत आल्यानंतर प्रथम त्यांनी मुलांच्या राहण्याची सोय 'द आर्क' या घरात केली. तर मुलींना व नोकर मंडळींना घेऊन त्या अमेरिकन मिशन बंगल्यात राहिल्या. पुढे हा बंगला

'लिटल हाऊस' म्हणून ओळखला जाऊ लागला.[३५] पुढे याच बंगल्यात प्रथम युरोपयिन मुलां–मुलींसाठी निवासी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू झाली.

सदर शाळेस इ. स. १९०३ पासून शासकिय अनुदान मिळू लागले. तोपर्यंत मिस किमिन्स यांनी स्थानिक ब्रिटिश लोकांची मदत घेऊन शाळेसाठी मदत गोळा केली व इमारत उभी केली. प्रथम शासनाने १९०३ साली या शाळेची प्रगती पाहून १२,२२० रुपये सरकारी अनुदान दिले. त्यानंतर १९१० साली शासनाने परत १०,००० रुपये अनुदान दिले. त्यातूनकाही इमारतीचे बांधकाम झाले.[३६] १९१३ साली इंग्लंड दरबारने या शाळेला खास अनुदान जाहीर केले. परंतु १९१४ ला पहिले महायुद्ध सुरू झाले व हे अनुदान थांबविले गेले. मिस किमिन्स यांनी शासनाच्या अनुदानाची वाट न पाहता त्या काळात शाळेच्या वेगवेगळ्या इमारती उभ्या करून या शाळेला मोठे केले व ब्रिटिश शासनाला पुढे या शाळेची खास दखल घ्यावी लागली.

➢ **शाळेचा अभ्यासक्रम :**

युरोपियन मुलांसाठी पाचगणीत मिशनऱ्यांनी शाळा सुरू केली असली तरी या शाळेचा अभ्यासक्रम पूर्णत: इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाच्या धर्तीवरच ठेवला होता. या शाळेत मुलींच्यासाठी खास गृहअर्थशास्त्र व मानसशास्त्र हे विषय सुरू करण्यात आले. चित्रकला, नृत्य, संगीत, खेळ या विषयांनाही प्राधान्य देण्यात आले. या शाळेची परीक्षा ही इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाकडून घेतली जाई. तेथून बोटीने प्रश्नपत्रिका पाठवत. परीक्षा घेऊन उत्तर–पत्रिका तपासण्यासाठी परत इंग्लंडला पाठवित. तेथूनच या शाळेचा रिझल्ट लागत असे.[३७]

सन १९४४ मध्ये या शाळेच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आला. त्यामध्ये गृहअर्थशास्त्र हा विषय बंद करून आरोग्यशास्त्र व वनस्पतीशास्त्र हे विषय सुरू करण्यात आले. १९४६ साली ही शाळा मुंबई विद्यापीठाशी जोडली गेली व मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर अभ्यासक्रम शिकविला जाऊ लागला. सध्या या शाळेत केंद्र शासनाचा सी. बी. एस. सी. व महाराष्ट्र शासनाचा एस. एस. सी. पॅटर्न राबविला जातो.[३८] थोडक्यात शाळेने आपल्या अभ्यासक्रमात काळानुसार बदल घडवून आणल्याचे दिसते.

किमिन्स हायस्कूल पाचगणी (इ. स. १८९८)



➢ **शाळेचा विस्तार :**

किमिन्स हायस्कूल हे पाचगणी, महाबळेश्वर रोडवर पाचगणी एस. टी. स्टँडपासून दोनशे मीटर अंतरावर आहे. या शाळेला सुरूवातीपासून चांगले प्राचार्य लाभल्याने या शाळेचा विकास झपाट्याने घडून आला. इ. स. १९०० मध्ये मिस ॲशलिन यांच्या मदतीने एक बंगला बांधला. १९०५ साली दुसरी जागा खरेदी करून काही वर्ग, संगीत हॉल, वसतीगृह आणि शाळेच्या स्टाफसाठी निवास व्यवस्था व शाळेत येणारा रस्ता तयार करून घेतला. १९२६ साली किमिन्स मेमोरियल हॉस्पिटल सुरू केले.[३९] १९२७ साली या शाळेला स्वतंत्र लाईट व्यवस्था करण्यात आली. १९३४ साली कला व संगीत यासाठी स्वतंत्र हॉल बांधले गेले व ग्रंथालयाची उभारणी केली. १९ जून १९३४ रोजी श्री. वीरणी यांनी किमिन्स शाळेच्या प्रथम प्राचार्या व संस्थापिका मिस किमिन्स यांचा अर्धपुतळा शाळेस भेट म्हणून दिला.[४०] सध्या तो शाळेच्या प्रार्थना हॉलमध्ये बसविण्यात आला आहे. अशा प्रकारे या शाळेचे विस्तारीकरण काळानुरूप होत जाऊन मुला मुलींसाठी स्वतंत्र शाळा निर्माण झाल्या. स्वतंत्र वसतीगृह, क्रीडांगणे, व इतर सुविधा निर्माण करण्यात आल्या. आज या शाळेच्या एकूण १४ इमारती आहेत. अत्यंत खडतर परिस्थितीत सुरू झालेली शाळा आज पाचगणीतील एक दर्जेदार शाळा म्हणून ओळखली जाते.

➢ **शाळेतील विद्यार्थी संख्या :**

सन १८९० मध्ये केवळ सात मुलामुलींच्या संख्येवर या शाळेची सुरूवात झाली. पुढे ही संख्या वाढत गेलेली दिसते.

किमिन्स हायस्कूल : संख्यात्मक वाढ[४१]

वर्ष	विद्यार्थी संख्या
१८९८	७
१९१३	९४
१९१६	१०३
१९१७	१४०
१९३५	१६४

१९४७	८०
१९५०	४८
१९५१	२३०
१९७०	२५०
१९९०	४५०
२०१०	५३२

संदर्भ : किमिन्स हायस्कूल रेकार्ड

शाळेच्या संख्येवरून असे दिसते की गेल्या शंभर वर्षाच्या काळात उत्तरोत्तर प्रगतीच केली आहे. केवळ १९१३–१४ या पहिल्या महायुद्धच्या काळात या शाळेच्या विद्यार्थी संख्येवर परिणाम झाला आणि त्यानंतर सन १९४७ ते १९५० या कालावधीत भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर युरोपियन मुले शाळा सोडून आपल्या मायदेशी परत गेली. त्यामुळे त्या काळात ही शाळा बंद पडते की काय अशी अवस्था निर्माण झाली होती.[४२] परंतु इ. स. १९५० नंतर भारतीय मुलींनी मोठ्या संख्येने प्रवेश घेतल्याने ही शाळा सुरू राहिली व आज ती एक नामांकित शाळा म्हणून भारतात प्रसिद्ध आहे.

➢ **किमिन्स स्कूलच्या उभारणीत मुख्याध्यापकांचे योगदान :**

मिस किमिन्स यांनी इ. स. १८९८ ते इ. स. १९२१ पर्यंत प्राचार्य म्हणून अत्यंत कठीण परिस्थितीत या शाळेला आकार दिला. १९२१ साली त्या मायदेशी परत गेल्या. त्यानंतर १९२१ साली मिस पिअरसल यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली. पुढे १९३२ साली मिस पिअरसन या परत प्राचार्या म्हणून आल्या व भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत राहिल्या.[४३] इ. स. १९४७ नंतर या शाळेत भारतीय महिलांची प्राचार्यपदी नियुक्ती झाली. परंतु ही शाळा इंग्लंडच्या मिशनऱ्यांच्या ताब्यात राहिली. सध्या या शाळेच्या प्राचार्या मिस इनायत या काम पहात आहे. ही शाळा आज पाचगणी चर्चच्या ताब्यात आहे.

➢ **हिरक महोत्सवी वर्षातील कामगिरी :**

किमिन्स हायस्कूलला १९६५ साली ७५ वर्षे पूर्ण झाली. या काळात त्यांनी अनेक नवे उपक्रम राबविले. त्यामध्ये सर्वात स्तुत्य उपक्रम म्हणजे १९६३ साली तिबेट सरकारने हद्दपार केलेल्या मुली हिमाचल प्रदेशात शिकत होत्या. त्या मुलींना शिक्षण विभागाने पाचगणी

येथील किमिन्स स्कूलमध्ये पाठवून दिले. त्या मुलींच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी उचलली. १९६७ साली झालेल्या कोयना भूकंपात या शाळेचे मोठे नुकसान झाले. त्यातूनही शाळा परत उभारली गेली.[४४] सन १९७० च्या कालखंडात ह्या शाळेचा नावलौकिक संपूर्ण भारतात झाला होता. त्यामुळे या शाळेच्या विद्यार्थी संख्येत वाढ झाली. सन १९७२ मध्ये इंडियन सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट (आय. सी. एस. सी.) बोर्डाची परीक्षा सुरू झाली. १९७५ साली शिक्षण क्षेत्राचा आकृतीबंध बदलला गेला. १० + २ + ३ या स्तरानुसार या शाळेत दहावी नंतर ज्युनिअर कॉलेजचे आर्टस, कॉमर्स, सायन्स या तिनही शाखा सुरू झाल्या. १९७५ साली ११ वी च्या वर्गात ११ मुलींनी प्रवेश घेतला.[४५] त्यावेळी संपूर्ण पाचगणीत ३७ मुलांनी ११ वीत प्रवेश घेतला होता. अशाप्रकारे या शाळेने येणारा बदल स्विकारात आपली प्रगती साधली आहे.

थोडक्यात शाळेने बदलते सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक संदर्भ अंगिकारिले, तंत्रज्ञानाचा स्विकार केला. मात्र नितिमूल्यामध्ये व संस्कारामध्ये बदल केला नाही. कडक शिस्तीमध्ये ही शाळा आजही सुरू आहे. मुलींच्यावर असणारी काही बंधने कटाक्षाने पाळली जातात. त्यामध्ये संध्याकाळी हॉस्टेलबाहेर न राहणे, मोबाईलचा वापर नाही, फॅशनेबल कपडे वापरण्यास बंदी असे नियम पाळले जातात. स्वातंत्र्यापूर्वी ख्रिश्चन धर्माचे पालन केले जात होते. स्वातंत्र्यानंतर सर्व जातीधर्माच्या मुली येथे शिकत असल्याने सर्वसमावेशक नितिमूल्य जपली जातात. तसेच या मुलींना सामाजिकतेचे भान राहण्यासाठी गरीब व श्रीमंतांच्या घरी भेटी देऊन समाज जीवनावरील तफावत जाणून घेण्यास लावतात. याशिवाय भारतीय परंपरा, मूल्ये, बौद्धिक विकास, सकारात्मक विचारसरणी याही गोष्टी शिकविल्या जातात. किमिन्स शाळा ही इंग्रजी धर्तीवर सुरू केली असली तरी भारतीय नितिमूल्ये जपण्याचा प्रयत्न केला जातो.

४.४.४ सेंट पिटर्स हायस्कूल (इ. स. १९०३) :

सेंट पिटर्स हायस्कूल या शाळेची स्थापना इ. स. १९०३ मध्ये ब्रिटिश आणि युरोपियन चर्च यांच्या सहकार्याने झाली. सुरूवातीला ही शाळा किमिन्स स्कूलच्या इमारतीत

भरत होती. १९०४ मध्ये ती स्वत:च्या मालकीच्या इमारतीत स्थलांतरीत झाली.[४६] या शाळेतून युरोपियनांच्या मुलांना इंग्रजी भाषेतून शिक्षण दिले जाई, म्हणूनच या शाळेस 'युरोपियन बॉईज स्कूल' असेही म्हटले जाई.. इ. स. १८९८ मध्ये मिस इमिली किमिन्स यांनी किमिन्स हायस्कूलची स्थापना केली. सुरूवातीला ही शाळा मुली व मुलांची एकत्रित होती. इ. स. १९०४ मध्ये या किमिन्स हायस्कूलमधून मुलांची स्वतंत्र शाळा स्थापन केली. तीच शाळा म्हणजे सेंट पिटर्स हायस्कूल होय. कलोनिअल ॲण्ड कॉन्टिनेंटल चर्च या सोसायटीला पाचगणी येथे शाळा सुरू करायची होती व त्याची जबाबदारी मुंबईच्या मॅनजेमेंट कमिटीवर सोपविली. त्यानुसार ही शाळा सुरूवातीला सेंट पिटर्स चर्च येथे भरत होती. तर मुले इनफिल्ड अल्बर्ट हाऊसमध्ये रहात होती.[४७] १९०४ मध्ये ही शाळा स्वतंत्र मुलांची म्हणून सुरू झाल्यावर त्याचे उद्घाटन रेव्ह. आर. एस. हायवूड, मोबांसाचे धर्मगुरू यांच्या हस्ते झाले.[४८]

➢ **शाळेचा विस्तार :**

सेंट पिटर्स शाळेचा विस्तार प्रथमपासूनच विस्तीर्ण असल्याचे दिसते. शाळेच्या मैदानाचा प्रारंभीचा विस्तार हा १६ एकराचा होता. त्यामध्ये क्रिकेट, फूटबॉल, हॉकी आणि दोन टेनिस कोर्ट मैदानाचा समावेश होता. प्रथम शाळेची इमारत आर. एस. हायवूड या मोबांसाच्या बिशप यांच्या मदतीने उभी राहिली. सन १९११ मध्ये शाळेचे सभागृह, सन १९१९ ते १९२९ या कालावधीत मध्यवर्ती वसतीगृह, सन १९५३ मध्ये ससून द्रविड ट्रस्ट आर्थिक मदतीतून नवीन स्वयंपाकगृह, सन १९५८ मध्ये अल्बर्ट हाऊस इस्टेट बांधण्यात आले. सन १९६७ मध्ये झालेल्या कोयना भूकंपाने झालेल्या नुकसानीमध्ये या शाळेलाही फटका बसला. परंतु सन १९६९ मध्ये त्याची पुर्नबांधणी करण्यात आली. आज या शाळेचा विस्तार जवळजवळ ५८ एकरमध्ये झालेला दिसून येतो.

➢ **सेंट पीटर शाळेचे ब्रीदवाक्य :**

शाळेच्या जडणघडणीमध्येच शाळेचे ब्रीदवाक्य सामावलेले आहे. शाळेने आपले प्रतिक चिन्ह म्हणून फिनिक्स पक्षी ठेवला आहे.[४९] फिनिक्स पक्षी ज्याप्रमाणे राखेतून पुन्हा जन्म घेतो व आकाशात उंच भरारी मारतो त्याप्रमाणे या शाळेनेही अल्पावधीत भरारी मारली आहे.

- **शाळेची वैशिष्ट्ये :**

या शाळेची प्रामुख्याने काही वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यामध्ये या शाळेत शिस्तीला महत्त्व आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांचा संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास करण्यासाठी अभ्यासाबरोबर सहल, सामाजिक जाणिवेसाठी काही समाजासाठी काम केले जाते. विविध विचारांना चालना देणे. मुल्य शिक्षणाची जोपासना. चांगल्या सवयी व जीवन कौशल्य आत्मसात करणे. सर्वांगिण व परिपूर्ण चारित्र्य घडविण्याचा प्रयत्न. सामंजस्य व सहिष्णूता जोपासणे. विविध सण, धर्म, संस्कृती यांचे ज्ञान देणे. नेतृत्व गुणांची जोपासना. सुदृढ वाढीसाठी सुयोग्य, समतोल आहार, व्यायाम, खेळ यांच्या सुविधा. गिर्यारोहण व निसर्ग सहलींचे आयोजन. चित्रकला, रंगकाम या द्वारे कलागुणांची जोपासना करून इथला विद्यार्थी हा सर्व दृष्टीने सक्षम बनविण्याचा प्रयत्न केला जातो.

- **शाळेची प्रवेश पद्धती :**

पाचगणीतील इतर शाळेपेक्षा या शाळेतील प्रवेश पद्धती वेगळ्या स्वरूपाची आहे. या शाळेत प्रथम प्रवेश परीक्षासंबंधी वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाते. त्यानंतर शाळेची प्रवेश परीक्षा जानेवारीमध्ये शाळेमार्फत घेतली जाते. इयत्ता ३ री ते ५ वी यांना गणित व इंग्रजी, इयत्ता ६ वी ते ८ वी यांना गणित, इंग्रजी, हिंदी या विषयाची परीक्षा घेतली जाते. या दोन्ही परीक्षांची गुणवत्ता यादी दहा दिवसाच्या आत लावण्यात येते. या यादीमध्ये ज्या विद्यार्थ्यांची नावे येतात त्यांना प्रथम शाळा सुरू झाली तेव्हा घेतली जाणारी फी व सध्या घेतली जाणारी फी यामध्ये मोठा फरक दिसून येतो. मात्र कालपरत्वे त्यात बदल होणे स्वाभाविक आहे. निवासी विद्यार्थ्यांसाठी ९४,८०० रुपये फी तर अनिवासी विद्यार्थ्यांसाठी २४,२३० रुपये एवढी फी आकारली जाते.[५०]

सेंट पिटर्स ही शाळा युरोपियन मुलांची वसतीगृह शाळा म्हणून स्थापन झाली. थोड्या कालावधीत या शाळेने विकासाचे शिखर गाठले. या विकासामध्ये या शाळेतील शिक्षकांचा मोठा वाटा आहे. प्रारंभी येथील शिक्षक वर्ग हा बहुतांश इंग्लंडमधील होता. आणि तो लंडन विद्यापीठातील हुशार पदवीधरांचा होता. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात युरोपियनांप्रमाणे भारतीय

शिक्षकांची निवड होऊ लागली. प्रारंभी येथे ब्रिटिश व युरोपियन चर्च सोसायटीने धार्मिक शिक्षण देण्याची सोय केली. प्रामुख्याने प्रोटेस्टंट पंथीय तत्त्वज्ञान येथे शिकविले जात होते.

➢ **सरकारी अनुदान :**

सेंट पिटर्स या शाळेला १९६० साली सरकारी अनुदान मिळाले. इ. स. १९६१ साली कॉमनवेल्थ ॲण्ड कॉन्टिनेंटल चर्च सोसायटीने या शाळेचे व्यवस्थापन बॉम्बे जईसन सोसायटीकडे सोपविले. पुढे १९६७ साली बॉम्बे डायसन असोसिएशनने या शाळेचे व्यवस्थापन सेंट पिटर्स स्कूल सोसायटीकडे हस्तांतरीत केले. या शाळेचे प्राचार्यपदी नेमणूक ही चर्चकडूनच होत असे व हे प्राचार्य धर्मप्रसारकाचे कार्य करणारे होते. आजही येथील प्राचार्य हे भारतीय नाहीत. इ. स. २००८–२००९ या शैक्षणिक वर्षात या शाळेची विद्यार्थी संख्या ३७२ होती. त्यापैकी ३२२ विद्यार्थी हे निवासी तर केवळ ५० विद्यार्थी हे अनिवासी होत. आजही निवासी विद्यार्थ्यांची संख्या जास्तच आहे.

या शाळेत फक्त Indian Certification for Secondary Eduction (I. C. S. E.) दिल्ली बोर्डाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. शाळेच्या निकालाची परंपरा चांगली आहे. गेली सहा वर्षे शाळेचा निकाल सातत्याने १००% लागला आहे. या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले काही विद्यार्थी आज उच्च पदावर किंवा स्वतचे एक वेगळे विश्व निर्माण केलेले दिसतात. फ्रेडी मर्क्युरी (पॉप सिंगर), फरीद अमिरी (भारतीय चित्रपट सृष्टीतील अभिनेता), भारत मूलचंदानी (उद्योजक) आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट १३ वे वंशज श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले (खासदार) इत्यादी.[५१]

आज या शाळेने काळाची पावले ओळखून जुन्या तत्त्वांना सांभाळत बदलत्या काळानुसार नव्या धोरणांचा अवलंब केला आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तानंतर नवभारताच्या निर्मितीतनंतरही या शाळेने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

सेंट जोसेफ कान्व्हेंट स्कूल, पाचगणी (इ. स. १८९५)

बिलिमोरिया हायस्कूल (इ. स. १९०८)

४.४.५ बिलिमोरिया हायस्कूल (इ. स. १९०८) :

बिलिमोरिया हायस्कूल टेबल लँडच्या पायथ्याशी निसर्गरम्य अशा घनदाट झाडीने व्यापलेल्या प्रदेशात आहे. ही शाळा पाचगणी–वाई रस्त्यालगत व जकात नाक्याशेजारी ब्रिटिश काळात स्थापन झालेली एक नामांकित शाळा म्हणून ओळखली जाते.

➢ **स्थापना व विस्तार :**

या शाळेची स्थापना मी. नौरोजी आर. बिलिमोरिया आणि प्रिंसेस दिनबाई बिलिमोरिया यांनी प्रथम निवासी मुलांची शाळा ८ विद्यार्थ्यांना घेऊन जून १९०८ मध्ये सुरू केली.[५२] या शाळेचे नाव पारसी बॉईज हायस्कूल असे होते. सुरूवातीला ही शाळा हॉलिवूड बंगला या छोट्याशा जागेत भरू लागली. इ. स. १९२२ मध्ये सध्या असलेली काळ्या दगडातील सुबक इमारतीत स्थलांतरित झाली. ही इमारत एकाच काळ्या दगडात बांधलेली दुमजली इमारत 'गोथीक कलेचा' एक उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखली जाते. त्या इमारतीचे वास्तूतज्ज्ञ श्री. पालमजी होते. म्हणून या इमारतीला पालमजी बिल्डींग म्हणून ओळखले जाते.[५३] सुरूवातीला बेल एअरच्या आवारामध्ये भाडे तत्त्वावर सुरू झालेल्या या शाळेने आज २२ एकरच्या परिसरात आपला विस्तार केला आहे.[५४]

➢ **शाळेचे व्यवस्थापन :**

द पारशी हायस्कूल बिलिमोरिया यांनी सुरूवातीला केवळ पारशी मुलांच्यासाठी म्हणून ही शाळा सुरू केली. सुरूवातीला केवळ पारशी मुलांच्यासाठी सुरू केली. सन १९३८ पासून पारशी धर्माच्या मुलांना दिला जाणारा प्रवेश प्रक्रियेत बदल करून सन १९४० पासून सर्व जातीधर्माच्या मुलांना प्रवेश दिला जाऊ लागला. इ. स. १९९५ मध्ये या शाळेच्या व्यवस्थापनात बदल झाला. प्राचार्य दरायस बिलिमोरिया याच्या काळात ही शाळा आदिती एज्युकेशन सोसायटीने चालविण्यात घेतली. मि. अरूण गोरडीया यांच्या नेतृत्वाखाली आज ही शाळा सुरू आहे. मि. गोरडीया यांनीच या शाळेत मुलांच्याबरोबर मुलींनाही सन १९९५ पासून प्रवेश देण्यास सुरूवात केली. आणि ही शाळा मुलां–मुलींची एकत्र शाळा म्हणून सुरू झाली.[५५]

➢ **शाळेचा अभ्यासक्रम :**

या शाळेमध्ये सध्या पहिली ते दहावी पर्यंत माध्यमिक स्तर व ११ वी, १२ वी उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण दिले जाते. पूर्वी ह्या शाळेचा अभ्यासक्रम एस. एस.सी., सेकंडरी स्कूल सर्टिफिकेटशी संलग्न होता. नंतर मात्र १९८४ पासून ही शाळा सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (सी. बी. एस. सी.) नवी दिल्लीशी संलग्न बनले. या शाळेमध्ये सध्या ज्युनिअर विभागासाठी सायन्स व कॉमर्सचे अभ्यासक्रम शिकविले जातात.[५६]

➢ **शाळेतील विविध विभाग :**

शाळेचे कामकाजासाठी मुख्य इमारतीमध्ये कार्यालय आहे. त्यामध्ये वर्ग खोल्या, स्टाफरूम, व्यवस्थापक रूम, परीक्षा आणि दृकश्राव्य विभाग इ. स्वतंत्र विभाग आहेत. या शाळेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या शाळेत मुलांच्यासाठी स्वतंत्र संगणक कक्ष निर्माण केला आहे. तसेच यामध्ये इंटरनेट सुविधाही उपलब्ध करून दिली आहे. या संगणक कक्षामध्ये संगणकीय ज्ञानाबरोबर सॉफ्ट वेअर ट्रेनिंग देण्याचीही सुविधा आहे. त्यामुळे येथील अध्यापन प्रोजेक्टर द्वारे शिकविले जाते.

जिमखाना विभाग :

आधुनिक स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान उपयोगी पडत नाही. त्याबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेता आला पाहिजे, त्यासाठी तन, मन तंदुरूस्त असणे गरजेचे आहे. खेळामुळे खिलाडू वृत्ती निमाण होते. त्यामध्ये परस्परांशी सहकार्य, समजुतदारपणा, सहनशीलता, यश, अपयश पचविण्याची ताकद निर्माण होते. त्यासाठी या शाळेमध्ये १५ एकर जमीन ही विविध खेळाच्या मैदानासाठी राखीव ठेवली आहे. त्यामध्ये ५ एकर जमीन ही नौरोजी स्टेडियम म्हणून ओळखली जाते. या स्टेडियमवर फूटबॉल ग्राऊंड आहे. ही मॅच पहाण्याठी १५ हजर प्रेक्षकवर्ग एकाच वेळी बसू शकतील अशी व्यवस्था आहे. याशिवाय २०० मिटर्सचा ॲथलॅटिक ट्रॅक आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर येथील विद्यार्थी विविध खेळात सहभागी होतात.[५७]

➢ **शाळेतील सुविधा :**

शाळेतील ठिकाणी विद्यथ्यांच्या निकोप वाढीसाठी त्यांच्या शिक्षणाबरोबर शारीरिक वाढीचीही काळजी विद्याथ्यांच्या घरासारखी इथे घेतली जाते. त्यामध्ये त्यांच्या भोजनाची व्यवस्था, विद्याथ्यांना आठवडाभरात पूरक आहार मिळण्यासाठी त्यात विविधता असते. त्यासाठी येथे पौष्टिक आहार तयार करणारे खास आचारी वर्ग नेमला आहे.

या शाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे शिक्षणा व्यतिरिक्त काही अभ्यासपूरक उपक्रमही राबविले जातात. त्यामध्ये पुस्तक बांधणी, टाईपरायटिंग, शॉर्ट हॅण्ड कोर्स आणि संगीत शिक्षण देण्याची सोय प्रारंभीपासून या शाळेत केली गेली आहे. विद्याथ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून गायन, प्रश्नमंजूषा, नाटक याचाही समावेश करण्यात आला. त्यासाठी स्वतंत्र आर्ट गॅलरी या शाळेत आहे.[५८] या सर्व गोष्टींमुळे विद्याथ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.

➢ **शाळेचे माजी विद्यार्थी :**

बिलिमोरिया ही शाळा पाचगणीतील एक जुनी व दर्जेदार शिक्षण देणारी शाळा म्हणून प्रसिद्ध असल्याने या शाळेत शिकलेले अनेक विद्यार्थी आज अनेक क्षेत्रात चमकत असलले दिसतात. त्यामध्ये राजकीय क्षेत्रामध्ये वाशी महानगरपालिका येथे सल्लागार म्हणून गौरव मांडवी काम करीत आहेत तर वैद्यकीय क्षेत्रात जहांगीर नर्सिंग होम येथे रतन एडिबाम हे सर्जन म्हणून काम करत आहेत. कला क्षेत्रामध्ये काम करणारा साहील कपूर, न्यूयॉर्क येथे पब्लिक हेल्थ रिसर्चमध्ये काम करणारे जुबेन दस्तूर, लातूर जिल्ह्याचे डेप्युटी कलेक्टर म्हणून नियुक्ती झालेले एस. डी. पाटील अशा अनेक विविध मोठमोठ्या पदावर काम करणाऱ्या व्यक्ती या शाळेचे विद्यार्थी होत. अजिंक्य पीयाल याने New South Wales University Australia ने आयोजित केलेल्या कॉम्प्युटर अभ्यास परीक्षेत भारत, नेपाळ, अरब राष्ट्र या देशातून या परीक्षेत बसणाऱ्या ९ हजार विद्याथ्यांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला. गोल्ड मेडल मिळविले. साध्या तो भारतीय सैन्यदलात डेहराडून येथे आहे. मनिष बचकनीवाला सन १९८९-९० चा विद्यार्थी, सूरत येथे केमिकल इंजिनिअर आहे. नीशा

मॉरवा ही बिलिमोरियातील पहिली महिला कॅप्टन (१९९९) म्हणून निवडली गेली. सध्या ती दिल्ली येथे Indus Valley या फर्ममध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम पाहते. आज या शाळेने शिक्षणाबरोबर क्रिडा क्षेत्रातही राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव मिळविले आहे.

४.४.६ अंजुमन–ए–इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी (इ. स. १९२०) :

पाचगणीमधील जुन्या इंग्रजी शाळापैकी अंजुमन–ए–इस्लाम पब्लिक स्कूल ही एक शाळा होय. पाचगणी–महाबळेश्वर रोडवर पाचगणीपासून ५ कि. मी. अंतरावर विस्तीर्ण अशा डोंगरकपारीतलगत ही शाळा आहे. या शाळेचा परिसर एकंदरीत १६५ एकर एवढा विस्तीर्ण आहे.[५९] ही जगभरातील मुस्लिम बांधवांसाठी एक आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते.

➢ **शाळेची स्थापना :**

हुसेन भॉय लालजी आणि इतर उच्चपदस्थ व्यक्ती यांच्या प्रयत्नाने दारूल–उलूस ट्रस्टची इ. स. १९२० मध्ये स्थापना करण्यात आली. या ट्रस्टमार्फत एक शाळा सुरू केली. सुरूवातीला या शाळेचे नाव दारूल–उलूस मुस्लिम हायस्कूल असे होते. त्याची स्थापना पाचगणी येथे केली.[६०] ही शाळा प्रथम पसरणीचे नबाब यांच्या पाचगणी येथील बंगल्यात सुरू करण्यात आली. सुरूवातीला फक्त ३० विद्यार्थी होते.[६१] पुढे १९२२ मध्ये ही शाळा स्वतंत्र जागेत स्थलांतरित करण्यात आली.[६२] आज या भव्य परिसरत या शाळेचे कामकाज चालते. स्वातंत्र्यानंतर म्हणजे इ. स. १९५८ मध्ये दारूल–उलूस ट्रस्टचे रूपांतर अंजुमन–ए–इस्लाम या मुंबई येथील संस्थेमध्ये झाले. अंजुमन–ए–इस्लामचे सुरूवातीचे चार अभ्यासक होते. त्यामध्ये मि. अकबर पीरभॉय यांनी पाचगणीच्या शाळेची मुख्य सूत्रे हाती घेऊन शाळेचा विकास केला. तर पुढे त्यांची पत्नी होमाई पीरभॉय यांनी आपल्या मातृतुल्य प्रेमाने शाळेची वाढ व विकास केला तो आतापर्यंत वाढवला आहे.[६३] आजही मुलामुलींना एकत्र शिक्षण देणारी जगातील एक नामांकित संस्था म्हणून ओळखली जाते.

➢ **संस्थेची पार्श्वभूमी :**

मुस्लिम समाजाचा नैतिक, सामाजिक व शैक्षणिक विकास घडवून त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी काही मुस्लिम लोकांनी अंजुमन–ए–इस्लाम या नावाची इस्लामी लोकांची

परिषद इ. स. १८७५ साली स्थापन केली. शिक्षणाच्या अभावामुळे मुस्लिम समाज गरीब आणि मागासलेला राहिला होता. या समाजाची प्रगती करण्यासाठी व शिक्षण देण्यासाठी म्हणून त्या काळात ब्रिटिश सरकारकडून मुस्लिम विद्यार्थ्यांसाठी अस्तित्वात असलेल्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी काही विशेष सवलती अंजुमन–ए–इस्लामने मिळविल्या होत्या. परंतु या सवलतीचा फारसा उपयोग होत नाही हे पाहून स्वत: शाळा काढून चालविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रथम इ. स. १९८० साली बाबूला टँकरोड, मुंबई येथे पहिली शाळा सुरू केली. वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे संस्थेने इ. स. १८९३ साली सरकारकडून डॉ. दादाभाई नौरोजी रोड, मुंबई येथे जमीन मिळवून तेथे इमारत उभी केली. त्यानंतर या संस्थेने अनेक शाळा, महाविद्यालये सुरू केली.[६४] अशा प्रकारे या संस्थेमार्फत शैक्षणिक कार्याला प्रथम मुंबईत सुरूवात झाली. ट्रस्टमार्फत दारूल–उलूस मुस्लिम हायस्कूलची स्थापना पाचगणी येथे केली. पाचगणी येथे सुरू झालेल्या शाळा या केवळ युरोपियन मुलांच्यासाठीच होत्या. तेव्हा मुस्लिम समाजातील मुलांनाही इंग्रजी माध्यमातून शिक्षण मिळावे म्हणून ही शाळा सुरू करण्यात आली.

➢ **शाळेतील वर्ग व अभ्यासक्रम :**

या शाळेमध्ये छोटा शिशू गट ते १० वी पर्यंतचे शिक्षण दिले जाते. सुरूवातीला केवळ ३० विद्यार्थी संख्या असलेल्या या शाळेत आज ४५० च्यावर विद्यार्थी संख्या आहे. आज या शाळेत केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात.

शाळेच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये ५ ते १२ वर्षाच्या मुलांना प्रवेश दिला जातो. प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते. तसेच प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश दिला जातो.

ही शाळा सुरूवातीला एस. एस. सी. बोर्ड, पुणे व सध्या कोल्हापूर बोर्डशी संलग्न आहे. महाराष्ट्र शासनाने ठरविलेला अभ्यासक्रम इथे शिकविला जातो. ही शाळा इंडियन पब्लिक स्कूल, कॉन्फरन्सची सदस्य आहे.

अंजुमन–ए–इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी (इ. स. १९२०)

➢ **शाळेचा परिसर :**

या शाळेचा परिसर हा डोंगरकपारीत अतिशय निसर्गरम्य अशा ठिकाणी आहे. जवळ जवळ १६५ एकरच्या परिसरामध्ये मुख्य इमारत धरून ७ वसतीगृहे, दवाखाना, आधुनिक पद्धतीचे भोजनगृह, स्वयंपाकगृह, सभागृह, जिमखाना, प्रयोगशाळा, स्केटींग ग्राऊंड, अभ्यासिका, अकबर पीरभॉय स्टेडियम, प्रार्थनागृह, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या स्वतंत्र इमारती आहेत. तसेच स्वतंत्र ग्रंथालय, विस्तीर्ण असे खेळाचे मैदान याचा समावेश होतो.[६५] या शाळेमध्ये स्वतंत्र जिमखाना विभाग आहे. तसेच शाळेतील प्रत्येक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी खेळाच्या प्रकारानुसार स्वतंत्र मैदान आहे. त्यासाठी प्रशिक्षकाची स्वतंत्र नेमणूक केली जाते. खेळाशिवाय जिमनॅस्टिकस, योगासने, कराटे यांचेही शिक्षण देण्याची सोय आहे.[६६]

➢ **इतर अभ्यासपूरक उपक्रम :**

इतर शाळेप्रमाणे याही शाळेत अभ्यासपूरक इतर उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून सामाजिक परंपरांचे जतन करणारे ऐतिहासिक नाटक बसविली जातात. तसेच कला, हस्तकला, हस्तव्यवसाय, दैनंदिन घडामोडींची माहिती समाजसेवा, स्काऊट गाईड इत्यादी उपक्रमही राबविले जातात. धार्मिक शिक्षणसुद्धा दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या अनेक वस्तू विक्रीसाठी स्वतंत्र दालनात ठेवल्या जातात. ज्यावेळी विद्यार्थ्यांचे नातेवाईक व पर्यटक शाळेला भेट देतात तेव्हा हे लोक या वस्तूंची खरेदी करतात. या शाळेत केवळ भारतातूनच नव्हे तर इतर देशांतूनही विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. त्यामध्ये पूर्व आफ्रिका, दक्षिण पूर्व आशिया, इंग्लंड, कॅनडा, इराण या देशातून विद्यार्थी येतात.[६७]

➢ **प्रवेश प्रक्रिया :**

या शाळेमध्ये ५ ते १२ वर्षाच्या मुला, मुलींना प्रवेश दिला जातो. त्यासाठी पात्रता परीक्षा घेतली जाते. विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्यांच्याकडून वार्षिक फी आकारली जाते. त्यामध्ये भारतीय विद्यार्थ्यांकडून प्राथमिक स्तरावर १० हजार रुपये सुरक्षा

ठेव व ५१ हजार रुपये एवढी फी आकारली जाते. तर माध्यमिक स्तरासाठी १० हजार रुपये सुरक्षा ठेव व ५३,५०० रुपये फी अकारली जाते. तर परदेशी विद्यार्थ्यांच्याकडून २० हजार रुपये सुरक्षा ठेव व ५१ हजार रुपये प्राथमिक स्तरावर तर माध्यमिक स्तरासाठी २० हजार रुपये सुरक्षा ठेव व ५५ हजार रुपये फी आकारण्यात येत असे.

➢ **शाळेचे माजी विद्यार्थी :**

या शाळेची माजी विद्यार्थी संघटना अतिशय कार्यक्षम आहे. या शाळेच्या प्रत्यक्ष भेटीवेळी इ. स. १९५७ ते १९६१ या कालावधीत शिकत असलेले शमशुद्दीन शेख हे टोरांटो येथे स्थायिक झालेले उद्योजक भेटले. केवळ आपण ज्या शाळेल शिकलो त्या शाळेला भेट द्यावी म्हणून सर्व कुटूंबासहीत ते पाचगणी येथे आले होते. मध्य आफ्रिकेत त्यांचा व्यवसाय होता. नंतर ३५ वर्षे कॅनडा येथे व्यवसाय केला. त्यांची मुले सध्या कॅनडातच असतात. त्यांनी आपल्या शाळात प्राचार्य व शिक्षकांच्यामुळे मी घडलो असे सांगितले.[६८] याशिवाय फिरोज नाडियाडवाला हे या शाळेचे माजी विद्यार्थी. श्री. युसूफ आय. उकरी हे इ. स. १९६० ते १९६९ या काळातील विद्यार्थी सध्या इंटेरिअर डेकोरेटर म्हणून इंग्लंडमध्ये स्थायिक झाले आहेत. मिस सलिमा हसन शेख इ. स. १९९४ मध्ये बोर्डात ४५ वी आलेली विद्यार्थिनी सेंट झेविअर्स कॉलेज, मुंबई येथे रसायनशास्त्राची प्राध्यापिक आहे. डॉ. अस्लम अन्सारी इ. स. १९९२ चा विद्यार्थी आज अमेरिकेत आहे. त्यांनी एम. एस. ऑर्थो केले आहे. याशिवाय पाचगणीतच ज्यांनी आपल्या शाळा सुरू केल्या आहेत त्यापैकी डॉन ॲकॅडमीचे संस्थापक, हॅपी अवर्सचे संचालक, ग्रीन व्हॅलीचे संस्थापक हे सुद्धा याच शाळेचे माजी विद्यार्थी आहेत.

४.४.७ हिंदू हायस्कूल (इ. स. १९२२) / संजीवन विद्यालय पाचगणी :

संजीवन विद्यालय ही शाळा पाचगणीतील एक नामांकित विद्यालय म्हणून ओळखले जाते. या शाळेत इंग्रजी व मराठी अशा दोन्ही माध्यमाचा वापर केला जातो. पाचगणीमध्ये ख्रिश्चन मिशनरींनी सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा असताना हिंदूच्यासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा काढण्याचे धाडस पंडित बंधूंनी केले. आज शाळेला केंद्रिय गुणवत्ता

शिष्यवृत्तीही प्राप्त झाली आहे. शिवाय संपूर्ण भारतातून क्रीडा प्रशिक्षणासाठी विद्यार्थी येथे पाठविले जातात. अशी ही एक आदर्श शाळा आहे.

➢ **हिंदू हायस्कूलची स्थापना :**

या शाळेची स्थापना दि. ३ जुलै १९२२ रोजी एका झोपडीत हिंदू हायस्कूल या नावाने निवासी शाळा सुरू केली.[६९] ही शाळा बडोदा येथील सुसंस्कृत कुटूंबात जन्माला आलेले श्री. रावसाहेब काका म्हणजे श्री. महादेव विनायक पंडित व कृष्णराव विनायक पंडित या दोन बंधूंनी पाचगणीसारख्या ठिकाणी केवळ तीन विद्यार्थ्यांना घेऊन सुरू केली. 'सा विद्या या विमुक्ते' हे ब्रीदवाक्य घेऊन १९२२ मध्ये स्थापन झालेले संजीवन विद्यालय हे महाराष्ट्रातील नव्हे तर भारताती एक आदर्श निवासी विद्यालय म्हणून परिचित आहे.[७०]

तसेच या विद्यालयाला एक धर्मादाय व सेवाभावी संस्था म्हणूनही ओळखले जाते. ही शाळा सुरू केली तेव्हाचा काळ हा पारतंत्र्याचा होता. अशा काळात पाचगणी सारख्या ठिकाणी हिंदूंच्यासाठी शाळा सुरू करणे सोपे नव्हते. पाचगणीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू झालेल्या होत्या. त्या शाळा आर्थिक दृष्ट्या व इतरही दृष्टिकोनातून संपन्न होत्या. अशा परिस्थितीत बडोदा येथून येऊन पाचगणीसारख्या ठिकाणी शाळा सुरू करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. परंतु पाचगणी येथे हिंदू हायस्कूल सुरू करण्यापाठीमागे या बंधूंचा एकच उद्देश होता तो म्हणजे भारतीय संस्कृतीचे संरक्षण व्हावे, संवर्धन व्हावे.[७१] परंतु त्याचबरोबर भारतीय विद्यार्थ्यांना मातृभाषेबरोबर आधुनिक शिक्षणही घेता यावे या हेतूने इंग्रजी माध्यमाचाही स्वीकार केला. या शाळेत इयत्ता तिसरी पासून इंग्रजी माध्यमाची शाळा व इयत्ता आठवीपासून मराठी माध्यमाची शाळा सुरू केली. सुरूवातीला इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंतचे शिक्षण एस. एस. सी. बोर्डाच्या अभ्यासक्रमानुसार शिकविले जात होते. १९९९ पासून या शाळेला सी. बी. एस. ई. बोर्डाची मान्यता मिळाली व तेव्हापासून सी. बी. एस. ई. अभ्यासक्रम शिकवला जातो.[७२]

➢ **हिंदू हायस्कूलचे नामकरण संजीवन विद्यालय :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ. स. १९४८ मध्ये महात्मा गांधींची हत्या झाली. तेव्हा संपूर्ण भारतामध्ये मोठी दंगल उसळली. त्या दंगलीमध्ये ब्राह्मण कुटूंबियांचे मोठे नुकसान झाले होते. त्याच दंगलीमध्ये या हिंदू हायस्कूलचेही मोठे नुकसान करण्यात आले होते. शाळेची इमारत नष्ट झाली. अशा परिस्थितीत पंडित बंधूंनी हे हायस्कूल पुन्हा नव्याने सुरू केले. परंतु या हायस्कूलचे नाव पूर्वीचेच हिंदू हायस्कूल असे न ठेवता या हायस्कूलचे नाव बदलून संजीवन विद्यालय असे नामांतरण केले.[७३] तेव्हापासून हिंदू हायस्कूल हे संजीवन विद्यालय पाचगणी या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यानंतर या शाळेच्या व्यवस्थापनासाठी ट्रस्ट निर्माण करण्यात आला. हा ट्रस्ट बॉम्बे चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार इ. स. १९५६ साली संजीवन विद्यालय ट्रस्टची स्थापना करण्यात आली. त्यावेळी त्यातील सदस्य पुढीलप्रमाणे होते : १) श्री. जे .जी. बोधे २) श्री. जे के. मुन्शी ३) डॉ. निलकंठ कल्याणी ४) श्री. प्रताप भोगीलाल. आज ही शाळा या ट्रस्टमार्फत चालविली जाते.

➢ **शाळेचा विस्तार :**

इ. स. १९५६ साली संजीवन विद्यालय ट्रस्टची स्थापना झाल्यानंतर त्याचवर्षी श्री. शरद पंडित यांनी प्राचार्य म्हणून संजीवन विद्यालयाचा पदभार स्विकारला. त्यांनी १९५६ ते १९८३ पर्यंत या शाळेची धुरा सांभाळली. त्यांच्याच कारकिर्दीत या शाळेची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. शाळा नावारूपाला आली. या ट्रस्टने १९६० मध्ये फुला लॉज व परिसराची वीस एकर जागा खरेदी केली. १९६१ साली या जागेवर शाळेची मुख्य इमारत बांधली. सन १९५६ मध्ये ११ खोल्यांची इमारत उभी राहिली. सन १९८७ साली लिव्हिग ॲण्ड लर्निंग कॉम्प्लेक्स I बांधला. सन १९८८ मध्ये स्विमिंग पूल व आणखी दहा खोल्या, बहुउद्देशीय हॉल बांधला गेला. त्यानंतर सायन्स हॉल व लायब्ररी पूर्ण झाली. पुढे सन १९६४ साली केंद्रिय गुणवत्ता शिष्यवृत्ती समितीने पहाणी करून संजीवन विद्यालय हे शिष्यवृत्तीस पात्र आहे असा अभिप्राय दिला.[७४] इ. स. १९६५ साली या विद्यालयाला भारत सरकारचे भारतातील चांगली निवासी शाळा म्हणून इमारत बांधणीसाठी अनुदान मिळाले. १९६६ साली केंद्रशासन,

महाराष्ट्र शासन यांच्या अनुदानातून व माजी विद्यार्थी, हितचिंतक, देणगीदार यांच्या मदतीतून शाळेचे डायनिंग हॉल, फाईन आर्टस, कॉम्प्लेक्स, मल्टीमेडिया, क्राफ्ट सेक्शन, टेनिस कोर्ट, बास्केट बॉल कोर्ट इत्यादी बांधण्यात आले.

➢ **क्रीडा क्षेत्रातील प्रगती :**

या शाळेने शिक्षणातील गुणवत्तेप्रमाणेच क्रीडा क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील प्रगतीमुळे स्पोर्टर्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया (एस. ए. आय.) या केंद्र शासनाच्या क्रीडा विभागाने क्रीडा विकासासाठी ही शाळा दत्तक घेतली. त्यामुळे केंद्रशासन देशभरातून येथे क्रीडा प्रशिक्षणासाठी विद्यार्थी पाठविते. त्यासाठी केंद्रशासन पुरस्कृत प्रशिक्षकाची नेमणूक येथे केलेली असते.[७५]

➢ **ग्रामीण शैक्षणिक अभ्यास व विकास केंद्रामार्फत चालविले जाणारे उपक्रम :**

सन १९९२ साली या विद्यालयात सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने ग्रामीण शैक्षणिक अभ्यास व विकास केंद्राची स्थापना करण्यात आली व इ. स. १९९६ मध्ये या केंद्रासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. या केंद्रातर्फे पुढील विविध उपक्रम राबविले जातात.

➢ **लोकोपयोगी कार्य :**

★ या केंद्रामार्फत पाचगणीच्या आसपास असणाऱ्या महाबळेश्वर व जावळी तालुक्यातील गावे दत्तक घेतलेली आहेत. या केंद्राद्वारे सध्या सात गावांमध्ये बालवाडी चालविली जाते.

★ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून खेड्यातून लायब्ररी चालविली जाते. यासाठी पुण्याचे डॉ. अजय जोशी व बीना जोशी हे सामाजिक कार्यकर्ते मदत करीत असतात. पुस्तके उपलब्ध करून देतात.

★ ग्रामीण भागात शिलाई मशीन क्लास घेतले जातात. गरजू महिलांना उपजिविकेचे साधन निर्माण व्हावे यासाठी हे कार्य केले जाते.

श्री. कृष्णराव विनायक पंडित

श्री. महादेव विनायक पंडित

संजीवन विद्यालय

★ या केंद्रामार्फत माता, बालक पोषण केंद्र चालविले जाते. हे केंद्र आसपासच्या सात खेड्यात चालविले जाते.

★ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणक साक्षरता व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाचा एम. एस. सी. आय. टी. कोर्स चालविला जातो. त्यासाठी या केंद्रात शंभर संगणक संच बसविले आहेत.

★ पाचगणी व परिसरातील ज्या विद्यार्थ्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे अशा विद्यार्थ्यांच्यासाठी नॅशनल ओपन स्कूल दिल्ली यांच्यामार्फत चालविला जाणारा मान्यताप्राप्त १० वी, १२ वीचा अभ्यासक्रम शिकविला जातो. त्याला १९९५ मध्ये मान्यता मिळाली.

★ ग्रामीण शेतकऱ्यांसाठीही विविध उपक्रम राबविले जातात. १) केंद्रीय खत निर्मिती प्रकल्प, २) वणवा लागू नये म्हणून जागृती, ३) पाणी अडवा, पाणी जिरवा ही शासकीय मोहिम, ४) घनकचरा नियोजन, मार्गदर्शन व प्रात्यक्षिक, ५) फास्ट फूडचे दुष्परिणाम समाजाच्या दृष्टिपथात आणणे इत्यादी.

याशिवाय सामाजिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जातो. त्यामध्ये एड्स संबंधी जनजागरण, दातांचे आरोग्य, डोळ्यांचे आरोग्य, सर्पदंश समज, गैरसमज, प्राथमिक उपचार इत्यादी. शेतकऱ्यांना गांडूळ खताची निर्मिती कशी कली जाते याचेही प्रात्यक्षिक दाखविले जाते. तसेच प्रशिक्षण देऊन गांडूळ खत निर्मितीसाठी प्रोत्साहीतही केले जाते.

➢ **शाळेतील विद्यार्थी संख्या व प्रवेश प्रक्रिया :**

३ जुलै १९२२ रोजी अवघ्या तीन विद्यार्थी संख्येवर सुरू झालेली ही शाळा आज संपूर्ण भारतात एक अव्वल स्थानवर असलेली शाळा म्हणून ओळखली जाते. १९५६ मध्ये या शाळेची विद्यार्थी संख्या १८० तर १९८९ मध्ये ६९० विद्यार्थी संख्या झाली. २००८–०९ मध्ये ८७९ पर्यंत संख्या वाढली. त्यापैकी ५२९ विद्यार्थी निवासी होते तर ३५० विद्यार्थी अनिवासी होते. (Dat Scholar) आज म्हणजे २०११–१२ मध्ये या शाळेची विद्यार्थी संख्या ९४५ आहे.[७६] पाचगणीतील इतर शाळांची विद्यार्थी संख्या पाहता या शाळेतील

विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस वाढत असलेली दिसते. तसेच विद्यार्थी संख्येच्या दृष्टीने ही शाळा आघाडीवर आहे.

संजीवन विद्यालय सुरू करताना केवळ श्रीमंत व मध्यमवर्गीय मुलांनाच शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली नाही तर सामान्य कुटुंबातील गरीब, कष्टकऱ्यांच्या मुलांनाही कमीत कमी फी मध्ये शिक्षण दिले. सुरूवातीपासूनच एक सेवाभावी संस्था म्हणून या शाळेने काम केले आहे. सुरूवातीच्या काळात या शाळेची फी गरीब विद्यार्थ्यांसाठी तीन ते सात रुपये इतकी कमी होती. सन १९८२ नंतर या शाळेची फी १४,००० रुपये ते २०,००० रुपये झाली. आज ती लाखाच्या घरात जाऊन पोहचली आहे. ही फी निवासी विद्यार्थ्यांसाठी आहे. परगावहून येऊन जाऊन करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या नियमानुसार जी फी असेल तेवढीच फी आकारली जाते.[७७]

➢ **शाळेतील इतर सुविधा :**

पाचगणी येथे शिक्षणासाठी येणारा निवासी विद्यार्थी हा सर्वसामान्य कुटुंबातील नसतो. येथे येणारी मुले ही मोठ्या म्हणजे श्रीमंत घरातील, संस्थानिक, उद्योगपती, व्यापारी, मोठे सरकारी अधिकारी, सिनेजगतातील मोठ्या कलावंतांची मुले असतात. तसेच हे विद्यार्थी वेगवेगळ्या प्रांतातील असतात. त्यामुळे त्यांच्या निवासाची सोय खास पद्धतीने करावी लागते. आज या शाळेत एकूण सहा वसतीगृहे आहेत.[७८] त्यामध्ये मुलांच्यासाठी तीन वसतीगृहे व मुलींच्यासाठी तीन वसतीगृहे आहेत. प्रत्येक वसतीगृहात अद्ययावत सुविधा दिल्या आहेत. परंतु विद्यार्थ्यांना वैयक्तिक फोन किंवा मोबाईल वापरास बंदी आहे. नातेवाईकांशी संपर्क हा पत्रव्यवहाराद्वारेच केला जातो.

➢ **जिमखाना विभाग :**

प्रत्येक शाळेमध्ये जिमखाना हा एक स्वतंत्र विभाग असतो. १९८७ मध्ये स्वतंत्र जिमखाना इमारत बांधली. त्यामध्ये अत्याधुनिक व्यायाम प्रकारची साधने, टेबल टेनिस, कॅरम, लॉन टेनिस, बॅडमिंटन इत्यादी खेळाचे साहित्य आहे. शाळेच्या २० एकर जागेपैकी नऊ एकर जमीन खेळाच्या मैदानासाठी वापरण्यात येते. त्यामध्ये हॉकी, फुटबॉल,

बास्केटबॉल, ॲथलेटिक्स इत्यादीसाठी स्वतंत्र मैदाने आहेत. डिस्ट्रीक्ट स्पोर्टस ॲथॉरिटी, सातारा यांनी हे विद्यालय खेळाच्या सर्व स्पर्धेमध्ये भाग घेते व बऱ्याच खेळात प्राविण्य मिळविते म्हणून २००६-०७ सालासाठी बेस्ट स्पोर्टस स्कूल म्हणून निवड केली. फुटबॉलमध्ये इंटर झोनल, झोनलपर्यंत संघाची निवड, स्विमिंगमध्ये राष्ट्रीय स्तरावर, टेबल टेनिस राज्य पातळीपर्यंत येथील विद्यार्थी मजल मारीत असतात. यासाठी केंद्रशासनाचा प्रशिक्षक नेमला आहे.[७९]

➢ **शाळेचा अभ्यासक्रम व इतर पूरक विभाग :**

या शाळेमध्ये महाराष्ट्र राज्याचे सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट (S.S.C.) व दिल्ली बोर्डाची म्हणजे सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (C.B.S.C.) यांचे अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जाते. या शाळेच्या निकालाची परंपराही उत्कृष्ट आहे. सन १९७१ पासून आजतागायत या शाळेचा निकाल पाहिला तर दरवर्षी ९५% ते १००% निकाल असतो.

या शाळेमध्ये शालेय अभ्यासक्रमाबरोबर स्पर्धा परीक्षा केंद्रही चालविले जाते. त्यामध्ये UNO, Asset Test, स्कॉलरशीप, N.T.S., M.T.S या स्पर्धा परीक्षांचीही तयारी करून घेतली जाते. याशिवाय मूल्य शिक्षणही दिले जाते. तांत्रिक शिक्षणात इयत्ता तिसरीपासून संगणकाचे शिक्षक सक्तीचे आहे. याशिवाय बांबू क्राफ्ट, मल्टिमिडिया, आर्ट म्युझिक, इत्यादी शिक्षण दिले जाते.

➢ **शाळेतील माजी विद्यार्थी :**

संजीवन विद्यालयाच्या मराठी माध्यमातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी आज सन्मानाच्या विविध पदावर आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध उद्योगपती निलकंठ कल्याणी १९४० सालचे विद्यार्थी, याशिवाय पुढे इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणारे विद्यार्थी त्यामध्ये राजेंद्र जगताप, आय. एस. अधिकारी पटवर्धन, समीर पायलट, सातारचे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मदन भोसले, फलटणचे संजीवराजे निंबाळकर, वेदांतिकाराजे भोसले, खासदार प्रतिक पाटील, यासारखे राजकारणी मंडळींबरोबर सांस्कृतिक क्षेत्राम चमकणारे जतीन ललित संगीतकार, डॉ. मुतालिक नाटककार असे अनेक नामवंत विद्यार्थी या शाळेतून घडले आहेत.[८०]

संजीवन विद्यालय नावारूपाला आणण्यामध्ये या शाळेचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा वाटा मोलाचा आहे. या शाळेची स्थापना झाली तेव्हा श्री. एम. व्ही. पंडित व श्री. के. व्ही. पंडित हे दोघेच शिक्षक, प्रशासन व इतर गोष्टी पहात होते. सध्या श्री. आर. एस. देशमुख हे प्राचार्य म्हणून काम पहात आहेत.[८१]

➢ **शाळेच्या विकासासाठी प्रयत्न :**

संजीवन विद्यालय या शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून एका वेगळ्या पद्धतीने मानवाची सेवा करणे हे संजीवन विद्यालय ट्रस्टचे ध्येय आहे. ही संस्था वेगवेगळ्या शिक्षण मंडळाचे कोर्स चालविते. त्यामध्ये एस.एस.सी. – सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट, सी.बी.एस.ई. – सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र, केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळ), एन. आय. ओ. एस., तसेच या शाळेत गुणवत्ता वाढीसाठी स्कॉलरशीप परीक्षा, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, गणित ऑलिंपियाड आंतरराष्ट्रीय परीक्षा, ऑस्ट्रेलिया युनव्हर्सिटी परीक्षा, IIT, PMY परीक्षा या सर्व परीक्षांसंबंधी मार्गदर्शन केले जाते. याशिवाय शैक्षणिक गुणवत्ता, मानवी मूल्ये, एकात्मिक शिक्षण यामध्ये ही शाळा अत्युत्कृष्ट असेल या ध्येयाने जगाचा उत्तम नागरिक निर्माण होईल. परंतु त्याचे पाय जमिनीवर असतील, गुणवत्तेच्या माध्यमातून अखंडपणे शैक्षणिक दृष्ट्या अवलोकन, सुधारणा, व प्रगती करणे हे संस्थेचे ध्येय आहे. अशाप्रकारे संजीवन विद्यालयाचे शिक्षणविषयक कार्य चालू आहे. या संजीवन विद्यालयाने इ. स. १९९८ पासून मराठी माध्यमाचे आठवी ते दहावीचे वर्ग पूर्ण बंद करून सध्या फक्त इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू आहे.[८२] अशा प्रकारे संजीवन विद्यालयाने पाचगणी येथील इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आपला वेगळा ठसा ऊठविला आहे.

४.४.८ एस. एम. बाथा हायस्कूल पाचगणी (१९२२) :

पाचगणीतील बाथा हायस्कूल ही पारशी व गुजराती मुलामुलींच्यासाठी काढलेली पहिली शाळा होय. एस. एम. बाथा यांनी शैक्षणिक कार्याबरोबर पाचगणीच्या विकासासाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. त्यामध्ये पाचगणीत पहिली बँक त्यांनीच सुरू केली. पाचगणीचे नगराध्यक्ष म्हणून काही वर्षे काम केले. असे हे एस. एम. बाथा यांचेच नाव शाळेला देऊन या शाळेच्या ट्रस्टने त्यांचे कार्य पाचगणीकरांच्या सदैव स्मरणात कोरून ठेवले

आहे. या हायस्कूलचे एक ऐतिहासिक महत्त्व म्हणजे या शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधीनी अनेक वेळा भेट दिली आहे. याच शाळेमध्ये म.गांधीजींची प्रार्थना व बैठका होत. याच शाळेच्या मैदानावर म. गांधीजींच्यावर नथूराम गोडसे व त्याच्या साथीदारांनी चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. या शाळेला अनेक स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांनीही भेटी दिल्याने ही शाळा भारतीय लोकांच्या दृष्टीने आदराचे, पूजनीय स्थान म्हणून ओळखले जाते.

➢ **शाळेची स्थापना :**

या शाळेची स्थापना श्री. व सौ. एस. एम. बाथा या पारशी व्यक्तीने १९२२ साली पारशी स्कूल या नावाने केली.[८३] पारशी समाज हा मुळचा इराणमधील. परंतु तेथील कट्टर मुस्लिमांच्याकडून या समाजाला कायम विरोध होत आला आहे. तेव्हा हा समाज इराणमधून अत्याचाराला कंटाळून गुजरातमध्ये येऊन स्थायिक झाला. त्यानंतर हा समाज इंग्रजांच्यामुळे महाराष्ट्रात आला. पाचगणीचा संस्थापक जॉन चेसन याच्याबरोबर येणारा पहिला गृहस्थ हा पारशी होता. त्यामुळे पाचगणीत पारशी समाज मोठ्या प्रमाणात आलेला दिसतो. या पारशी समाजाच्या मुलांच्यासाठी ही शाळा प्रथम सुरू केली. सध्या ही शाळा बाथा एज्युकेशन ट्रस्ट पाचगणी यांच्यामार्फत चालविली जाते. या ट्रस्टचे संचालक सध्या श्री. कांगा हे आहेत.[८४]

बाथा हायस्कूल ही प्रथम पाचगणीत राहणाऱ्या पारशी समाजातील मुलांच्यासाठी सुरू केली. ही शाळा प्रथम एस. एम. बाथा यांच्या बंगल्यातच भरत होती. या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या सुरूवातीला ६० होती.[८५] त्यानंतर ही संख्या वाढत गेली. सध्या या शाळेत देशभरातील पारशी विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. १९४० साली या शाळेत पारशी विद्यार्थ्यांच्या बरोबर गुजराती मुलांनाही प्रवेश देण्यास सुरूवात केली.[८६] या शाळेला सुरूवातीला पारशी बॉईज स्कूल या नावाने ओळखले जात होते. १९३८ साली या शाळेला नाव दिले. ते या शाळेचे पहिले प्राचार्य, संस्थापक एस. एम. बाथा यांचे नाव. तेव्हापासून ही शाळा एस. एम. बाथा हायस्कूल या नावाने ओळखले जाते.[८७] सध्या ही शाळा पाच एकर परिसरात आहे. पारशी समाजात अग्निदेवता महत्त्वाची असल्याने या शाळेतील भोजनगृह हे एखाद्या मंदिरासारखे आहे. इतके पवित्र, स्वच्छ व प्रसन्न असते. त्यामुळे या शाळेत महात्मा गांधीजी येत असावेत.

एस. एम. बाथा हायस्कूल पाचगणी (१९२२)

महात्मा गांधींजींचे बाथा हायस्कूल मधील प्रार्थना स्थळ

➢ **शाळेचा अभ्यासक्रम :**

एस. एम. बाथा स्कूल ही १९२२ साली सुरू झाली. याच वर्षी पाचगणीत हिंदू मुलांच्यासाठी हिंदू हायस्कूल सुरु झाले. या दोन्ही शाळांनी स्वत:चा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार केला. १९२३ साली लोकल बोर्डाची स्थापना झाल्याने या शाळा लोकल बोर्डाशी जोडल्या गेल्या तरी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धर्तीवर शाळेचा अभ्यासक्रम ठेवला नाही. तर स्वतंत्र आपल्या धर्माशी निगडीत अभ्यासक्रम सुरू केला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही शाळा सी.बी.एस.ई. बोर्डाशी संलग्न अभ्यासक्रम सुरू केला. १९७० नंतर ही शाळा पुणे बोर्ड एस. एस. सी.शी जोडले गेले व त्याप्रमाणे आपला अभ्यासक्रम ठरविला गेला.[८८]

➢ **शाळेची प्रवेश प्रक्रिया व सत्र नियोजन :**

बाथा हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्यासाठी या शाळेची असणारी प्रवेश परीक्षा द्यावी लागते. मुलाखतीत त्याची मानसिकता व आरोग्य पाहिले जाते. प्रवेश घेऊ इच्छिणारा मुलगा किंवा मुलगी शारीरिक व मानसिकदृष्ट्या तंदुरूस्त आहे असा वैद्यकीय दाखला द्यावा लागतो.[८९] प्रवेश निश्चित झाल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रुपये २०,००० सुरक्षा ठेव म्हणून घेतली जाते. त्यानंतर शाळेची इतर फी आकारली जाते. अनिवासी विद्यार्थ्यांसाठी मात्र प्रत्येक महिन्याला ५०० रुपये फी आकारली जाते. ही फी आकारली जात असताना एखादा गरीब विद्यार्थी गुणवत्ता यादीत असेल तर त्याला फीमध्ये सवलत दिली जाते.

पाचगणीतील प्रत्येक शाळेचे सत्र हे ठरलेले आहे. शाळेच्या प्रवेश प्रक्रिया या फेब्रुवारी व मार्च महिन्यात सुरू होतात. एप्रिलमध्ये प्रथम सत्र सुरू होते. १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पावसाची सुट्टी असते.[९०] त्यानंतर डिसेंबरमध्ये नाताळची सुट्टी असते. ऑगस्ट ते सप्टेंबर येथे प्रचंड पाऊस असतो. त्यामुळे ही सुट्टी द्यावीच लागते. अलिकडे गेल्या दहा वर्षात पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे शाळेच्या सत्रामध्येही बदल करण्यात आले आहेत. तरीही बऱ्याच शाळेत वरीलप्रमाणे सत्र चालते.

एस. एम. बाथा हायस्कूलमध्ये शिस्तीला फार महत्त्व आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना नातेवाईकांशी बोलण्यासाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या टेलिफोनवरच संपर्क साधणे किंवा निरोप ठेवणे. पालकांना भेटण्यासाठी केवळ रविवार किंवा इतर सुट्टीच्या कालावधीत भेटणे. याशिवाय शिस्तीबरोबर स्वच्छता यालाही फार महत्त्व आहे. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचा बेशिस्तपणा चालत नाही. कपडे, बूट, बॅग पासून इतर साऱ्या गोष्टींच्या स्वच्छतेकडे कटाक्षाने लक्ष द्यावे लागते. वेळेचे बंधनही काटेकोरपणे पाळावे लागते.[९१] या शाळेतील ही शिस्त पाहूनच म. गांधी पाचगणीत आलेले असताना वास्तव्यासाठी, प्रार्थनेसाठी या शाळेची निवड केलेली होती. यावरूनच या शाळेत शिस्तीचे महत्त्व किती आहे हे लक्षात येते.

➢ **शाळेतील उपक्रम :**

या शाळेतील विद्यार्थ्याला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सहलीचे आयोजन केले जाते व सहलीवर आधारित प्रोजेक्ट तयार केले जातात. तसेच विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला वाव मिळावा यासाठी विविध विषयांच्या स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. परीक्षांमध्ये या शाळेने जी प्रगती साधली आहे. त्याचा आढावा घेऊन प्रितीसंगम कऱ्हाडतर्फे २००९ साली एक आदर्श शाळा म्हणून सन्मान करण्यात आला आहे.[९२] बाथा हायस्कूलमध्ये स्वतंत्र व सुसज्ज असा जिमखाना विभाग आहे. मात्र या शाळेत फुटबॉल हा खेळ खेळला जात नाही जो पाचगणीच्या इतर निवासी शाळांची एक खासियत आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात एस. एम. बाथा यांनी पारशी व गुजराती मुलांच्यासाठी काढलेली ही निवासी शाळा आज मात्र काळाबरोबर प्रगती करू शकलेली नाही. १९३४–३५ साली या शाळेत बालवाडी ते दहावी व १९४७–४८ पासून ज्युनिअर सायन्स कॉलेज सुरू केले. परंतु सध्या या शाळेची निवासी विद्यार्थी संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. कारण या शाळेने इतर निवासी शाळांप्रमाणे अद्ययावत सोयीसुविधा देऊ केल्या नाहीत. त्यामुळे या

शाळेत प्रवेश घेणाऱ्या पारशी व गुजराती किंवा इतर विद्यार्थ्यांचा प्रवेश प्रक्रिया ही मर्यादित झाली आहे. तरीही ही पाचगणीतील एक जुनी, नामांकित, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची शाळा म्हणून काही पालक या शाळेत आपल्या मुलांचा प्रवेश घेत असतात. त्यामुळे सध्या या शाळेची विद्यार्थी संख्या ही २४५ ते ३०० पर्यंत असते. पाचगणीतील एस. एम. बाथा ही एकमेव जूनी शाळा आज बंद पडण्याचा मार्गावर आली आहे.[९३]

➢ **बाथा हायस्कूल व महात्मा गांधी यांचा संबंध :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटिशांना स्वत:हून देश सोडून जाण्यास भाग पाडणारे मोहनदास करमचंद गांधी जे जगभर अहिंसेचे पुजारी म्हणून ओळखले जातात. त्या महात्मा गांधीजींचे व पाचगणी येथील बाथा हायस्कूलचे अगदी जवळचे सबंध होते. महात्मा गांधी विश्रांतीसाठी प्रथम इ. स. १९४२ साली पाचगणीत आले. तेव्हा ते पाचगणीमध्ये एडनवाला बंगला येथे मुक्काम केला.[९४] त्यानंतर १९४७ पर्यंत त्यांनी अनेकवेळा पाचगणीला भेट दिली. तेव्हा ते एडनवाला बंगला किंवा बाथा हायस्कूलच्या गेस्ट हाऊसमध्ये मुक्काम करत असत. तेव्हा त्यांची सायंकाळची प्रार्थना ही बाथा हायस्कूलच्या मैदानावर होत असे. याच बाथा हायस्कूलच्या ग्राऊंडवर सायंकाळच्या प्रार्थनेच्यावेळी नथूराम गोडसे व त्याच्या सहकाऱ्यांनी म. गांधींवर चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.[९५] यावेळी महात्मा गांधींबरोबर कस्तुरबा गांधी, खान अब्दुल गफार खान, महादेव भाई, मौलाना आझाद, सरदार पटेल, राजगोपालचारी, मणिशंकर पुरोहित व इतर मंडळी उपस्थित होती. तेव्हा हा हल्ला राष्ट्रीय सेवादलाच्या कार्यकर्त्यांनी परतवून लावला होता. ज्याची नोंद मात्र पाचगणी पोलिस स्टेशनला नाही. कारण महात्मा गांधींनी त्यांना शिक्षा न करता भेटीला बोलविले होते. परंतु गोडसे त्यांना न भेटता निघून गेला होता. म्हणजेच म. गांधींच्यावर हल्ला करण्याचा उद्देश हा वेगळा होता, हे लक्षात येते. आज हे बाथा हायस्कूल म. गांधीजींच्या वास्तव्याने पवित्र झालेली शाळा म्हणून ओळखली जाते.

एडनवाला बंगला हा पूर्वी एका पारशी गृहस्थाचा होता. पुढे तो बहाई ट्रस्टने खरेदी केला. त्यामुळे त्या बंगल्याचे नाव दिलखूष बंगला असे ठेवण्यात आले. याच बंगल्यात महात्मा गांधी मुक्काम करीत. अनेक काँग्रेस नेत्यांशी गुप्त बैठकाही याच बंगल्यात होत असत.[९६] कधी कधी प्रार्थनाही याच बंगल्यात होत असे. आज हा बंगला बहाई समाजाच्या ट्रस्टच्या मालकीचा आहे. वास्तविक पाहता पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने ही जागा ऐतिहासिक स्मारक म्हणून जतन करून ठेवणे आवश्यक होते.

➢ **महात्मा गांधीजींचे बाथा हायस्कूलला आभाराचे पत्र :**

महात्मा गांधीजी १९४२ सालापासून पाचगणीत येत होते. १९४४ साली बाथा हायस्कूलच्या ग्राऊंडवर व प्रार्थना हॉलमध्ये महात्मा गांधीजींची प्रार्थना होऊ लागली. तेव्हा त्यावर्षी बाथा हायस्कूलच्या मुख्याध्यापकांना म. गांधींनी स्वत:च्या हस्ताक्षरातील आभाराचे पत्र या शाळेला दिलेले उपलब्ध आहे. हे पत्र शाळेने उपलब्ध करून दिलेल्या मैदानाबद्दल आहे. म. गांधीजींनी दि. ३१ जुलै १९४४ या दिवशी श्री. एस. एम. बाथा यांना आपण चौक/ मैदान वापरण्यास दिल्याबद्दल गुजराती भाषेत आभाराचे पत्र दिले.[९७] ते खालीलप्रमाणे,

पाचगणी

३१ जुलै, १९४४

भाईश्री,

तमाशे माने तये बधानो जटलो अभार मानु तेटलो ओच्छो. सध्या हे पत्र ट्रस्टी श्री. बाथा यांच्याकडे उपलब्ध आहे.[९८]



महात्मा गांधीजींचे बाथा हायस्कूलला आभाराचे पत्र

अशाप्रकारे बाथा हायस्कूल हे एक ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची शाळा आहे. त्याचे जतन व संवर्धन होणे आवश्यक आहे.

४.४.९ पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्रं. २ (इ. स. १९३५) :

पाचगणी या गावात इ. स. १८८० मध्ये प्रथम लोकल बोर्डामार्फत स्थानिक व परिसरातील मुलांच्यासाठी मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली होती.[९९] परंतु इ. स. १८८० च्या काळात मुलांबरोबर मुलींना शाळेत पाठविण्याइतका समाज प्रगल्भ व प्रगतही नव्हता. त्यामुळे या शाळेत येणाऱ्या मुलींची संख्या ही नगण्य होती. म्हणजे जवळजवळ एकही मुलगी शाळेत येत नव्हती. त्यामुळे स्थानिक मुलींच्या शिक्षणाची सोय स्वतंत्र व्हावी व समाजातील जास्तीत जास्त मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून लोकल बोर्डाची शाळा क्र. २ ही शाळा सुरू करण्यात आली.[१००]

➢ **लोकल बोर्डाची शाळेची जबाबदारी :**

सप्टेंबर १९३५ ला मुलींची शाळा ही प्रथम जिल्हा लोकल बोर्डाच्या नियंत्रणाखाली सुरू केली. महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम इ. स. १९६१ नुसार, जिल्हा परिषदेकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी इ. स. १९६२ नंतर पाचगणीची मुलींची शाळा सातारा जिल्हा परिषदेच्या व्यवस्थापनाखाली काम करू लागली.[१०१] मुलींची शाळा जिल्हा परिषद शाळा क्र. २ (मुलींची) या नावाने ओळखली जाऊ लागली. त्यानंतर जवळजवळ १७ वर्षांनी या प्राथमिक शाळांसाठी दिनांक १/११/१९७९ रोजी गिरिस्थान नगरपालिका शिक्षण मंडळ पाचगणी स्थापन झाली. तेव्हापासून या शाळेला 'पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र.२ (मुलींची)' असे नामकरण करण्यात आले.[१०२] सन १९८६ मध्ये या शाळेचे नाव श्री घाटजाई विद्यामंदिरी असे बदलले गेले. अशा प्रकारे या शाळेचे व्यवस्थापन व शाळेची नावे यामध्ये वेळोवेळी शासकीय नियमानुसार बदल झालेला दिसतात.

➢ **शाळा उभारणीत स्थानिकांचे योगदान :**

पाचगणी, महाबळेश्वरमध्ये युरोपियन लोकांच्या सानिध्यात आलेल्या लोकांना शिक्षणाची जाणीव होऊ लागली. त्यातूनच १९३५ साली मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय

व्हावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. त्यामध्ये रामचंद्र भिलारे, तात्यासाहेब कासुर्डे पाटील व इतर अनेक लोकांच्या प्रयत्नामुळे सप्टेंबर १९३५ मध्ये दुसरी मराठी शाळा सुरू करण्याची परवानगी जिल्हा लोकल बोर्डाने दिली.[१०३] त्यानुसार ही दुसरी शाळा म्हणजे जिल्हा लोकल बोर्ड शाळा क्र. २ स्थापन झाली.

➢ **शाळेचा परिसर विस्तार :**

ही शाळा प्रथम पाचगणी गावात रश्मी चौकमधील एका बंगल्यात सुरू झाली. इ. स. १९६० मध्ये ही शाळा रश्मी चौकातून सध्याचे पाचगणी वाई रोडवर जे शॉपिंग सेंटर उभे आहे त्या ठिकाणी एक जुनी इमारत होती. त्या इमारतीत स्थलांतरित झाली. इ. स. १९८६ मध्ये मुलींच्या शाळेसाठी दोन मजली अशी भव्य इमारत तत्कालीन नगराध्यक्ष नानासाहेब कासुर्डे यांच्या प्रयत्नाने बांधून मिळाली.[१०४] त्यामुळे आज पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. २ ही शाळा अत्यंत प्रशस्त, मुलींच्या दृष्टीने सर्वसोयींनीयुक्त व भव्य पटांगणासहीत ही शाळा उभी आहे. या शाळेचा विस्तार एक एकर परिसरात आहे. या इमारतीमध्ये मोठा प्रार्थना हॉल बांधलेला आहे. ज्यामध्ये एकावेळी ४०० मुली बसू शकतात. प्रार्थना हॉल बांधण्याचे कारण म्हणजे पाचगणी येथे जून ते सप्टेंबर दरम्यान खूप पाऊस पडतो. आक्टोबर ते जानेवारीपर्यंत थंडीचे प्रमाणही जास्त असते. तेव्हा पाऊस व थंडीच्या त्रासापासून मुलींना संरक्षण मिळावे म्हणून बंदिस्त प्रार्थना हॉल बांधला आहे.[१०५]

श्री घाटजाई विद्यामंदिर, पाचगणी

या शाळेत १९३५ साली प्रथम इयत्ता पहिलीचा वर्ग सुरू झाला. त्यानंतर १९४० पर्यंत चौथीपर्यंतचे वर्ग टप्प्याटप्प्याने सुरू झाले. १९७९ नंतर इथे पाचवी, सहावी व सातवीची वर्ग सुरू झाले.[१०६] या शाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका सौ. आशा मेहंदळे ह्या होत्या.

➢ **शाळेच्या प्रगतीसाठी प्रयोगशील उपक्रम :**

पाचगणीतील इंग्रजी माध्यमाच्या शाळेबरोबर आपले अस्तित्व टिकविण्यासाठी या प्राथमिक शाळेतून अनेक उपक्रम राबविले जातात. येथे येणारा विद्यार्थी हा मूलत: सर्वसामान्य, कष्टकरी, गरीब कुटुबातील असतो. त्यामुळे सर्वात प्रथम त्याची बौद्धिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावे लागतात. त्यामागे गुणवत्ता वाढीसाठी वैयक्तिक मार्गदर्शन, अप्रगत विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र मार्गदर्शन, माध्यमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना तज्ज्ञ मार्गदर्शकाकडून मार्गदर्शन व जादा तास, मोफत संगणक प्रशिक्षण, इच्छुक मुलींच्यासाठी शिलाई मशीन प्रशिक्षण वर्ग, नृत्य व संगीत प्रशिक्षण व विविध क्रीडा प्रशिक्षण मोफत देऊन विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेपर्यंत पोहचविले जाते.

महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळेसाठी सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रम राबविण्याचा निर्णय २६/४/२००७ रोजी घेतला आहे. त्या शासन निर्णयानुसार पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शाळा क्र. १ व शाळा क्र. २ या दोघांनी १२/९/२००८ पासून करण्यास सुरूवात केली आहे. ६ ते १६ वयोगटातील एकही मुल शिक्षणापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतली जाते. शाळेच्या आसपास राहणाऱ्या मुलांचे सर्वेक्षण, नोंदणी करून शाळेत प्रवेश दिला जातो व मुलामुलींची १००% पट नोंदणी केली जाते.

हा उपक्रम अत्यंत यशस्वीरित्या राबविला आहे. त्यामुळेच पाचगणी शहराचे साक्षरतेचे प्रमाण हे ८२% इतके आहे.[१०७] या अभियानांतर्गत या शाळेतील शिक्षकांनी एक वेगळी योजना आखली ती म्हणजे जे विकलांग मुले असतात. शाळेपर्यंत पोहचू शकत नाहीत या मुलांच्या घरापर्यंत स्वत: शिक्षक जातात व या शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांना शिक्षण प्रवाहात सामील करून घेतात. म्हणजे त्या मुलांना आठवड्यातून तीन दिवस त्यांच्या घरी जाऊन

शिकवतात. ही सातारा जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे जी अशा प्रकारचा उपक्रम राबवते.[१०८] यामध्ये सामील झालेली विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे –

साल	संख्या (अपंग विद्यार्थी)
२००८–०९	०२
२००९–१०	०६
२०१०–११	०४
२०११–१२	०३

संदर्भ : (गिरिस्थान नगरपालिका शिक्षण विभाग)

पाचगणी हे इंग्रजी माध्यमांच्या शाळेचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. शाळा सर्वसामान्यांना परवडणाऱ्या नाहीत. पाचगणीची संस्कृती, सामाजिक स्थिती यावर निश्चित परिणाम जाणवतो. अशा परिस्थितीत कष्टकरी, कामगार वर्गाच्या मुलांना शिक्षण देण्याचे काम व येणाऱ्या नवीन आव्हानांना सामोरे जाण्याचे मूल्य शिक्षण, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळेतून केले जाते. हे मोठे कठीण काम आहे. या दोन शाळेतील विविध योजनेमुळे या शहराला 'बालग्राम योजनेचे शहर'[१०९] म्हणूनही ओळखले जाते. या शाळेचे वेगळेपण म्हणजे ह्या शाळा स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक अडचणीवर मात करून उभ्या राहिलेल्या आहेत. या शाळेतून स्वातंत्र्यसैनिकांची फळी निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे स्वरूप बदलले. शिक्षणाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविले गेले. राष्ट्र एकसंघ बनले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रमुख साधन आहे. बदलत्या सामाजिक गरजांना समर्थपणे तोंड देऊ शकणाऱ्या शिक्षणाचा उदय भारतामध्ये झाला. हीच उद्दिष्टे पाचगणीच्या या प्राथमिक शाळेमधून राबविले जातात. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीचा कितीही उदोउदो झाला तरी मूळ भारतीय संस्कृती भक्कम पायावर या शाळांच्या रूपाने उभी असलेली दिसून येते.

४.४.१० न्यू इरा हायस्कूल (इ. स. १९४५) :

न्यू इरा हायस्कूल ही पाचगणीतील भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला सुरू झालेली एक शाळा आहे. आज ही पाचगणीतील सर्वात लोकप्रिय व आयएसओ मानांकन प्राप्त शाळा

म्हणून ओळखली जाते. केवळ १६ विद्यार्थ्यांवर सुरू झालेली ही शाळा आज विद्यार्थी संख्येनेही सर्वात मोठी शाळा म्हणून ओळखली जाते.

➢ **शाळेची स्थापना :**

न्यू इरा हायस्कूलची स्थापना इ. स. १९४५ मध्ये बहाई समाजाच्या विश्वस्ताकडून करण्यात आली. ही शाळा पाचगणीत सुरू करण्यासाठी श्रीमती रिझववान माबेद झादेह व श्रीमती सालिसा कीरमानी या दोघींना पुण्याहून पाठविण्यात आले.[११०] त्या पाच ते आठ या वयोगटातील १६ मुलामुलींना घेऊन पाचगणीत आल्या व १ ऑगस्ट १९४५ साली ॲना कॉटेज नावाच्या एका छोट्या भाडोत्री बंगल्यात प्रथम होस्टेल सुरू केले व तिथेच शाळाही सुरू केली. सन १९४५ साली त्याला 'बहाई बोर्डींग स्कूल' म्हणून ओळखले जाऊ लागले. १९५८ साली माध्यमिक विभागाला महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली. शाळेचे नामकरण झाले 'न्यू इरा हायस्कूल.'[१११]

➢ **शाळेचा विस्तार :**

न्यू इरा हायस्कूल प्रथम १९४५ साली ॲना कॉटेज या बंगल्यात, १९४६ साली मनिव्हिला बंगला भाड्याने घेतला. १९५३ साली वूडलॅन्ड ही ३० एकर परिसराची प्रॉपर्टी खरेदी केली. प्रथम या जागेत शाळेच्या वर्ग खोल्या बांधल्या. ज्यांना 'हेडिया' म्हणून ओळखले जाई.

➢ **शाळेचा उद्देश :**

पाचगणी येथे १९४५ पूर्वी ख्रिश्चन, पारशी, हिंदू, मुस्लिम इत्यादी धर्माच्या शाळा सुरू झाल्या होत्या. त्या शाळेत त्या त्या धर्माच्या मुलांनाच प्रवेश मिळत असे. त्यामुळे पाचगणीतील काही बहाई समाजाच्या लोकांनाही आपल्या समाजाची शाळा असावी असा विचार मनात आला. त्यानुसार शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव बर्मा (म्यानमार) व भारतातील National Sprittual Assembly या बहाई संस्थेकडे पाठविला.[११२] या प्रस्तावाला मान्यता मिळाली. त्यानुसार १९४५ साली स्थानिक बहाई समाजाचा उद्देश पूर्ण केला. न्यू इरा स्कूल १९४५ साली श्रीमती रिझवान माबेदझादेह व सालेसा किरमाणी यांनी या शाळेचे कामकाज पाहिले. १९५३ साली या शाळेला प्रथम प्राचार्य म्हणून Mrs. P. Sumption यांची नियुक्ती करण्यात आली.[११३] इ. स. २००४ पासून गणेश मुर्ती हे शाळेचे प्राचार्य म्हणून

काम पहात आहेत. त्यामध्ये इ. स. १९७१ ते १९८२ या काळात डॉ. रॉय जॉनसन या अमेरिकन शिक्षण तज्ज्ञाला बहाई संस्थेने आमंत्रित केले. त्यांच्या काळात न्यू इरा हायस्कूल आंतरराष्ट्रीय स्तरावर जावून पोहचली.[११४] इतर सर्व प्राचार्यांनीही या शाळेसाठी नि:स्वार्थ भावनेने काम केले व शाळेच्या भरभराटीला हातभार लावला. हे सर्व प्राचार्य वेगवेगळ्या देशातून आमंत्रित केलेले होते.

➢ **शाळेचे वेगळेपण (ISO मानांकन प्राप्त शाळा) :**

१ ऑगस्ट १९४५ साली सुरू झालेली न्यू इरा हायस्कूल ही बहाई समाजाच्या शैक्षणिक प्रकल्पातील भारतातील पहिली शाळा होय.[११५] त्यामुळे इथे केवळ भारतातूनच नव्हे तर संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. जगभरातील २३ देशातील विद्यार्थी व भारतातील ११ राज्यातील विद्यार्थ्यांनी इथे प्रवेश घेतला आहे. पाचगणीतील इतर कोणत्याही शाळेत इतक्या मोठ्या प्रमाणात बाहेरील देशातील विद्यार्थी नाहीत. त्यामुळे न्यू इराचे आंतरराष्ट्रीयत्व हे एक मोठे वैशिष्ट्य आहे.

ही शाळा आंतरराष्ट्रीय शाळा असल्याने या शाळेत विविध देशाचे अभ्यासक्रम राबविले जातात. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना त्या त्या देशाची परीक्षा देऊन त्या देशातील विद्यापीठाचे सर्टिफिकेट प्राप्त करू शकतात. या शाळेतील पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिल्ली बोर्डाच्या C.B.S.E. पॅटर्नप्रमाणे अभ्यासक्रम आहे. ज्यांना हा अभ्यासक्रम नको असेल त्यांच्यासाठी इयत्ता नववीनंतर जनरल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन (G.C.S.) प्रोग्रॅम 'O' लेव्हल हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. किंवा International General Certificate of Secondary Education (I.G.C.S.E.) ही केंद्रिय विद्यापीठाची परीक्षा देऊ शकतात.[११६] याशिवाय इयत्ता पाचवी ते नववीचे विद्यार्थी तांत्रिक शिक्षण व अतांत्रिक व्यवसायिक शिक्षण घेऊ शकतात. या शाळेने विविध अभ्यासक्रम राबवून आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त केला आहे. त्यामुळे या शाळेला ISO 9001-2000 गुणवत्ता मिळाली आहे.[११७] या शाळेत विविध अभ्यासक्रमाशिवाय फ्रेंच, जर्मन, रशियन, पारशी, मराठी, संस्कृत या भाषा शिकविल्या जातात. अशा प्रकारे ही शाळा म्हणजे अनेक देशातील अभ्यासक्रम शिकविणारे जागतिक विद्यापीठच म्हणावे लागेल.

न्यू इरा हायस्कूल (इ. स. १९४५) आय. एस. ओ.मानांकन

➢ **जॉन चेसनचे वास्तव्य :**

आज न्यू इरा हायस्कूल जिथे आहे तिथे काही जुन्या इमारती आहेत. त्यापैकी क्लिपटन वसतीगृह म्हणून ओळखली जाणारी ही इमारत सर्वात जुनी इमारत आहे. याच इमारतीमध्ये जॉन चेसन त्याच्या मृत्यूपर्यंत रहात होता. त्यामुळे पूर्वी ही इमारत चेसन हाऊस म्हणून ओळखली जात होती.[११८] पाचगणीचा संस्थापक जॉन चेसन याने हे घर बांधले. तिथे त्याचे काही काळ वास्तव्य होते. अशी ही इमारत आज न्यू इरा हायस्कूलचे सर्वात पहिले म्हणजे एक नंबरचे होस्टेल म्हणून ओळखले जाते.

➢ **शाळेतील विविध विभाग :**

या शाळेतील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर व्यावसायिक शिक्षणही दिले जाते. यातून विद्यार्थी स्वावलंबी बनावा हा हेतू असतो. शाळेच्या वैशिष्ट्यापैकी एक वैशिष्ट्य म्हणजे न्यू इरा कॅडेट कोर हा विभाग होय. या विभागातर्फे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारचे साहसी शिक्षण दिले जाते. हे शिक्षण मुले आणि मुली यांना दिले जाते. यामध्ये ट्रेकिंग, माऊंटनिंग (गिर्यारोहण), पॅराग्लायडींग, रायफलिंग, हॉर्स रायडिंग इत्यादीचा समावेश आहे.

या शाळेत शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्याला सामाजिकतेचीही जाणीव व्हावी यासाठी ग्रामीण भागाची निवड करून त्या गावाचा सर्व्हे केला जातो. त्यातून त्या गावातील अडचणी जाणून घेऊन त्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न हे विद्यार्थी करतात. उदा. रस्ता तयार करणे, पाणी अडवा पाणी जिरावा प्रकल्प, स्मशानभूमी स्वच्छता, गावाची स्वच्छता, आरोग्य प्रबोधन केले जाते. गणपती उत्सवात समाजाला पथनाट्य, संगीत या माध्यमातून प्रबोधन केले जाते. यातून विद्यार्थ्यांना सामाजिकतेची जाणीव होते.

या शाळेत दोन सुसज्ज ग्रंथालये आहेत त्यापैकी जॉय मुनसन लायब्ररी इथे अनेक दुर्मिळ ग्रंथांचा संग्रह आहे. या ग्रंथालयात अठरा हजार ग्रंथ आहेत. पाच हजार प्रत्येक क्षेत्रातील सी. डी. आहेत. या शाळेत पाश्चिमात्य ते पारंपारिक नृत्य प्रकार शिकविले जातात. कारण या शाळेत नृत्य केवळ एक कला म्हणून नाही तर नृत्यामुळे व्यक्तीचा सर्वांगिण विकास होतो. या शाळेच्या डान्सिंग क्लासमध्ये डान्सचा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे. Dance eduation trains the students in the skills of creativity, problem solving, higher thninking of risk taking.[११९]

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६२ मध्ये या शाळेला भेट दिली

➢ **शाळेला महनीय व्यक्तीची भेट :**

न्यू इरा हायस्कूलची ख्याती व त्याचे कार्य ऐकून अनेक नामवंत व्यक्तिंनी शाळेला भेटी दिल्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६२ मध्ये या शाळेला भेट देऊन शाळेचे कौतुक केले होते.[१२०] २०१० साली मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जी. अब्दुल कलाम यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी हितगुज केले.[१२१] याशिवाय या शाळेला भेट देणारे आशा भोसले, मुख्यमंत्री विलासराव देशमुख आदी मान्यवरांनी भेट दिली आहे.

➢ **व्यक्तिमत्त्व विकासासाठी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम :**

ही शाळा केवळ अभ्यासक्रम पूर्ण करून गुणवत्तायादीत झळकणे यासाठीच प्रयत्न करी नाही तर शिक्षणाबरोबर व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडले पाहिजे व स्वत:चे जीवन सुंदर जगता आले पाहिजे यासाठी स्वत:साठी वेळ द्या हा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबविला जातो. आयुष्य हे हसतखेळत प्रत्येक गोष्टीचा आस्वाद घेत जगायचे असते हे शिकविले जाते. त्यासाठी खेळासाठी वेळ द्या, स्वप्न पाहण्यासाठी वेळ द्या, हसण्यासाठी वेळ द्या, मैत्रीसाठी वेळ द्या, वाचण्यासाठी वेळ द्या, सभोवताली पाहण्यासाठी वेळ द्या, विश्रांतीसाठी वेळ द्या, प्रार्थनेसाठी वेळ द्या म्हणजे आयुष्य आपोआप सुंदर होईल. याशिवाय आयुष्यातील प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. त्यामुळे त्याचा योग्य वापर करा, गरजूंना मदत करा, वेळ सत्कारणी लावा, वस्तुस्थितीची जाणीव ठेवा. यातून स्वत:ला घडवा असा सुंदर उपक्रम राबविला जातो. त्यामुळे इथे शिक्षण घेणारा विद्यार्थी हा यशस्वी झाला आहे.

न्यू इरा हायस्कूल ही एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील आयएसओ मानांकित शाळा असल्याने या शाळेत शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी हा त्याच्या आवडीच्या क्षेत्रात चमकल्याशिवाय रहात नाही. त्यापैकीच काही माजी विद्यार्थी जे वेगवेगळ्या पदावर आहेत त्यांची थोडक्यात माहिती – रिशी सुरतानी हा अमेरिकेमध्ये Instructional System Designer आहे. अमिशा खान बडोदा येथे Graphic Designer आहे. विनोदकुमार Regional Director of Marketing VISA International मध्ये आहे. दिग्विजय कऱ्हाडकर Businessman in Panchgani, मौलिक आझाद हा न्यू जर्सी इथे Physical

Therapist, Lua Pillay – Seychelles, Student Welfare Officer, Ministry of Education असे प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक देशात न्यू इराचे विद्यार्थी पहायला मिळतात.[१२२]

४.४.११ महात्मा फुले विद्यामंदिर, पाचगणी (इ. स. १९६०) :

इंग्रजी माध्यमांच्या अनेक शाळा पाचगणीत असताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे महात्मा फुले विद्यामंदिर हे मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा प्रथम सुरू केली. पाचगणीमध्ये असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा नावलौकिक संपूर्ण भारतात आहे. परंतु याच शहरात स्थानिक मुलांच्यासाठी मराठी भाषेतील व सर्वसामान्यांना परवडेल असे शिक्षण देणारी एकही संस्था किंवा शाळा काढण्याचा प्रयत्न इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढणाऱ्या संचालकांनी केला नव्हता. हीच गोष्ट शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी ओळखून जावली व पाचगणीसारख्या दुर्गम भागात राहाणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा काढण्याचा निर्णय घेतला.

➢ **शाळेची स्थापना व विस्तार :**

पाचगणीमध्ये इ. स. १८८५ साली मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा सुरू झाली. त्याचा विस्तार सन १९६० पर्यंत सातवीपर्यंत झाला. सातवीनंतर या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी वाईला जावे लागे. तेव्हा या विद्यार्थ्यांच्यासाठी इ. स. १९६० साली डॉ. बापूजी साळुंखे यांनी महात्मा फुले विद्यामंदिर या मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा सुरू केली.[१२३] ही शाळा प्रथम रश्मी चौकातील एक घरात सुरू केली. त्याच जागेवर इ. स. १९६० ते १९६२ सालापर्यंत शाळा सुरू होती. त्यानंतर या शाळेला नगरपालिकेने जागा व इमारत उपलब्ध करून दिली.

महात्मा फुले विद्यामंदिर (पाचगणीतील मराठी माध्यमाचे एकमेव हायस्कूल)



शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे

➢ **शाळेचा इतिहास :**

पाचगणीतील युरोपियन मुलांच्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू झाल्या. परंतु याच शाळेत सेवाचाकरी करणाऱ्या स्थानिक रहिवाशांच्या मुलांसाठी मात्र त्यांना परवडेल व देशी भाषेतून शिक्षण देणारी एकही शाळा नव्हती. ही परिस्थिती जाणून प्रथम स्थानिक लोकांच्या आग्रहावरून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची एक शाळा पाचगणीत सुरू केली. परंतु स्थानिक आर्थिक मदतीअभावी ही शाळा बंद करावी लागली.[१२४] इ. स. १९५४ सालापासून डॉ. बापूजी साळुंखेंनी सातारा जिल्ह्यात शाळा काढण्यास सुरूवात केली होती. त्यांनी वाई येथे अथक प्रयत्नाने सयाजीराव शिंदे हायस्कूल सुरू केले होते. ही किर्ती ऐकून पाचगणीचे ग्रामस्थ बापूजी साळुंखे यांच्याकडे गेले व बापूजींना पाचगणी येथे माध्यमिक शाळा सुरू करण्याचा आग्रह धरला. त्यानुसार डॉ. बापूजी साळुंखेंनी पाचगणीत माध्यमिक शाळा काढण्याचा निर्णय घेतला. ही शाळा सुरू करताना पाचगणीतील श्रीमंत वर्गातील लोकांचा फार मोठा विरोध पत्करावा लागला. इथे असणाऱ्या उच्चभ्रू समाजाच्या शाळेच्या संस्थापकांना, स्थानिक मुलांच्यासाठी अल्प मोबदल्यात शिक्षण देणारी संस्था परवडणारी नव्हती. त्यामुळे बापूजींच्या या कार्याला प्रचंड विरोध झाला. तरीही बापूजी डगमगले नाहीत. त्यांनी पाचगणीत शाळा सुरू करण्याचा ध्यास घेतला व ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे, आमदार भिलारे गुरूजी व इतर स्थानिक कार्यकर्त्यांची मदत घेऊन इ. स. १९६० साली केवळ तीन विद्यार्थ्यांवर इयत्ता आठवीचा वर्ग सुरू केला.[१२५] या शाळेसाठी इतका विरोध झाला की शेवटी पाचगणीच्या एस. टी. स्टॅण्डवर टेबल खुर्ची टाकून प्रवेश प्रक्रिया सुरू करावी लागली.[१२६] आज हीच शाळा पाचगणी व आसपासच्या परिसरात एक नामांकित शाळा म्हणून ओळखली जाते.

शाळेचे संस्थापक शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे :

पाचगणी येथे अत्यंत कडक विरोधाला सामोरे जात जिद्दीने व कष्टाने महात्मा फुले विद्यामंदिर हे हायस्कूल सुरू करणारे बापूजी साळुंखे हे एक शिक्षण क्षेत्रातील तेजस्वी व प्रखर व्यक्तिमत्त्व. अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा जन्म सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील

रामापूर या गावी एका गरीब मराठा कुटुंबात ९ जून १९१९ रोजी झाला.[१२७] अत्यंत खडतर परिस्थितीतून १९ ऑक्टोबर १९५४ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.[१२८]

बापूजी साळुंखेंनी आपली शैक्षणिक केंद्रे ही शहर, उच्चभ्रू वर्गात सुरू केली नाही तर ती ज्या ठिकाणी शिक्षण पोहचले नव्हते अशा दूर, दुर्गम, डोंगराळ भागात सुरू करून वाड्या वस्तीवर राहणाऱ्या गोरगरीब जनतेच्या मुलांसाठी शाळा सुरू केली. आज या संस्थेचा वटवृक्ष झाला आहे. महाराष्ट्र व कर्नाटकात आज या संस्थेची ३७६ केंद्रे आहेत. अशा या संस्थेतील महात्मा फुले विद्यामंदिर ही एक ही पाचगणी येथील शाखा होय.

ऑगस्ट इ. स. १९६० साली अवघ्या तीन विद्यार्थ्यांवर पाचगणी येथे माध्यमिक शाळा सुरू झाली. १९६१ साली या शाळेची विद्यार्थी संख्या २८ वर गेली. आठवी व नववीचा वर्ग सुरू झाला. पाचगणीत ज्या शाळा अगोदरच प्रस्थापित झाल्या होत्या, त्यांचा नावलौकिक होता अशा शाळेशी या मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेला मुकाबला करावयाचा होता. परंतु हा मुकाबला आर्थिक दृष्टीने नव्हता तर बौद्धिक गुणात्मक दर्जासाठी होता. बापूजींनी हे लक्षात घेऊन या शाळेत तज्ज्ञ व निष्णात शिक्षकांच्या नेमणूका केल्या. त्यामुळे अत्यंत खडतर परिस्थितीत ही शाळा तग धरून राहू शकली व प्रत्येक वर्षी शाळेचा विस्तार करत आज ज्युनिअर कॉलेज पर्यंत म्हणजे उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणाची व्यवस्था इथे निर्माण झाली आहे.

नगरपरिषदेनेही बापूजींच्या विधायक कामाला पाठिंबा दिला व टेबललँडच्या जकात नाक्याजवळ म्हणजे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी या शाळेसाठी नगरपालिकेची इमारत भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली.[१२९] आज याच जागेत शाळेची दोन मजली मोठी भव्य इमारत आहे. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे वर्ग आहेत. सध्या या शाळेत ७५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[१३०] पाचगणी येथील महात्मा फुले विद्यामंदिर सुरू झाले तेव्हा सुरूवातीला मुख्याध्यापक म्हणून के. आर. व्यंकट सुब्रहमण्यम होते.[१३१]

➢ **शाळेतील विविध उपक्रम :**

शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात तरबेज करण्यासाठी पाचगणीतील सर्वात आवडीचे जे खेळ खेळले जातात ते म्हणजे फूटबॉल व कबड्डी. या खेळासाठी विशेष मेहनत घेतली जाते. टेबललँडच्या ग्राऊंडवर फुटबॉलचे धडे दिले जातात. त्यामुळे या शाळेने राज्यस्तरीयपर्यंत धडक मारली आहे. शिवाय कबड्डी स्पर्धा ज्या दरवर्षी राज्यस्तरीय भरविल्या जाता त्यात लहान गटात या शाळेचा पहिल्या तीनमध्ये नंबर असतो.

महात्मा फुले विद्यामंदिर हे पूर्णत: शासकीय अनुदानावर चालणारी माध्यमिक शाळा आहे. शासनाच्या तुटपुंज्या अनुदानातूनही या शाळेने आपला दर्जा व गुणवत्ता टिकवली आहे. हे सर्व साध्य होते ते उत्तम प्रशासनामुळे. त्यामुळेच १९८०–८१ साली या शाळेची उत्कृष्ट शालेय प्रशासनासाठी महाराष्ट्र शासनाने निवड करून त्याला विशेष अनुदानासाठी निवड केली.[१३२] त्यामुळे या शाळेने आपली चांगली प्रगती साधली आहे.

अशा प्रकारे पाचगणीत अत्यंत कष्टाने उभी केलेली बहुजन समाजासाठी सुरू केलेली महात्मा फुले विद्यामंदिर ही शाळा आज सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करून यशस्वी वाटचाल करीत आहे.

➢ **कांताबेन महेता ज्युनिअर महाविद्यालय :**

महात्मा फुले विद्यामंदिर येथे दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षणासाठी वाई, सातारा शिवाय पर्याय नव्हता. ही अडचणही दूर करण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव मा. अभयकुमारजी साळुंखे यांनी १९७६ साली ज्युनिअर कॉलेज काढण्याचा निर्णय घेतला.[१३३] त्यानुसार जून १९७६ ला पाचगणी येथे महात्मा फुले विद्यामंदीरला जोडून ११ वी कॉमर्स सुरू केले. पुढे इ. स. १९८५ साली आर्टस फॅकल्टी सुरू केली.[१३४] इ. स. १९७६ पर्यंत आठवी ते अकरावी असा माध्यमिक शाळेचा आकृतीबंध होता. इ. स. १९७३ पर्यंत जुनी अकरावी होती. इ. स. १९७४ साली १० + २ + ३ हा आकृतीबंध आला. त्यामुळे १९७६ साली ज्युनिअर कॉलेज सुरू केले.[१३५] आज ही शाळा व

ज्युनिअर कॉलेज इंग्रजी माध्यमांच्या शाळांना यशस्वीपणे सामोरे जात पाचगणी व आसपासच्या परिसरातील स्थानिक मुलांना ज्ञानदानाचे कार्य करीत आहे.

४.४.१२ डॉन ॲकॅडमी स्कूल (इ. स. १९८३) :

पाचगणीतील अनेक इंग्रजी शाळांपैकी डॉन ॲकॅडमी ही एक अगदी अलिकडे स्थापन झालेली एक इंग्रजी माध्यमाची शाळा होय. ही शाळा पाचगणी वाई रोडवर नगरपरिषद जकात नाक्याजवळ आहे. शाळेच्या समोर धोम धरणाचे अथांग पाणी व पाठीमागे टेबल लँडचा कडा अशा निसर्गरम्य ठिकाणी ही शाळा आहे. डॉन ॲकॅडमीची स्थापना इ. स. १९८३ मध्ये हमीदा एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेने केली.[१३६] याची स्थापना शेख कुटुंबिय व काही शिक्षणप्रेमींनी केली. या शाळेच्या स्थापनेच्या वेळी पाचगणीमध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढलेली होती. त्यामुळे केवळ २० विद्यार्थी संख्येवर या हायस्कूलची स्थापना झाली. परंतु पुढे ही विद्यार्थी संख्या वाढत जाऊन ती आज ४०० पर्यंत पोहचली आहे. या शाळेत छोटा शिशू गट ते दहावीपर्यंतच्या मुलामुलींना एकत्र शिक्षण दिले जाते. शाळेत देशाच्या कानाकोपऱ्यातून मुले येतात.

या शाळेचे पहिले मुख्याध्यापक म्हणून श्री. लियाकत जब्बार शेख यांनी सूत्रे हाती घेतली. त्यांनी शाळेच्या प्रगतीसाठी अत्यंत कष्ट घेतले. स्वकर्तृत्वाने या शाळेला नावारूपाला आणले. त्यांच्या या कार्याबद्दल पॅरेंट रिसर्च असोसिएशन नवी दिल्लीचा पुरस्कार प्राप्त झाला.[१३७] पाचगणी स्पोर्टस असोसिएशनचे ते चेअरमन झाले.

या शाळेचे बांधकाम आधुनिक पद्धतीने केले आहे. डॉन ॲकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे व शरीर स्वास्थ्य चांगले रहाणे यासाठी वेगवेगळे व्यायाम प्रकार व खेळांचे शिक्षण देण्याची व्यवस्था आहे. यासाठी स्वतंत्र शिक्षकाची नेमणूक केली आहे. शाळेला राष्ट्रीय निरमन रतन ॲवार्ड, गेम ऑफ इंडिया ॲवार्ड, नवी दिल्ली यांच्यामार्फत खेळाची पारितोषिके मिळाली आहेत.[१३८]

डॉन ॲकॅडमी ही शाळा जेव्हा सुरू करण्यात आली तेव्हा केवळ २० विद्यार्थी होते. व ही शाळा पत्र्याच्या शेडमध्ये भरवली जाई. त्यानंतर पाचगणी–वाई रस्त्यावर शाळेसाठी चार एकर जमीन खरेदी केली व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी अत्याधुनिक पद्धतीने चार

वसतीगृहे बांधली. या शाळेची निवासी विद्यार्थ्यांसाठी वार्षिक फी एक लाख पाच हजार आहे. तर अनिवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा दोन हजार रुपये आहे.[१३९]

थोड्याच कालावधीत शाळेचा विकास व लोकप्रियता यामध्ये प्रचंड वाढ केलेली दिसून येते. यामुळेच या शाळेला अनेक प्रतिथयश मान्यवरांनी भेट देऊन या शाळेचे कौतुक केले आहे. त्यामध्ये शिक्षण मंत्री सलिम झकारिया, फलटणचे आमदार रामराजे निंबाळकर, सातारचे छत्रपती व खासदार उदयनराजे भोसले, अभिनेता, निर्माता, दिग्दर्शक शशी कपूर, संगीत दिग्दर्शक पद्मश्री नौशाद अली, हिऱ्याचे व्यापारी गोविंदभाई ढोलकिया, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ पी. जी. पाटील, राष्ट्रपती के. आर. नारायणन, अभिनेते दिलीपकुमार इत्यादींनी भेटी दिल्या.[१४०]

थोडक्यात, पाचगणी हे त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळे आणि ब्रिटीशांच्या विशेष प्रयत्नामुळे एक प्रमुख शिक्षण केंद्र म्हणून विकसित होऊ शकले. सुरूवातीच्या काळात येथील शैक्षणिक संस्था ब्रिटीश विद्यापीठांशी संलग्न होत्या. नंतर स्वातंत्र्योत्तर काळात या शाळांमधून भारतीय बोर्ड व संस्थांचे अभ्यासक्रम लागू करण्यात आले. असे असले तरी येथील शिक्षण संस्था आपला आंतरराष्ट्रीय दर्जा टिकावा यासाठी प्रयत्न करताना दिसतात. त्याचबरोबर दोन प्राथमिक मराठी माध्यमाच्या शाळा व एक मराठी माध्यमिक शाळा यांनीही स्थानिक मुलांसाठी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन या शहरातील सर्वसामान्यांना सुशिक्षित व सुसंस्कृत बनविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. या शाळांच्यामुळेच या शहराचे साक्षरतेचे प्रमाण ८२% इतके आहे.जे देशातील साक्षरतेपेक्षा जास्त आहे. तसेच येथील प्रत्येक शाळेचे वैशिष्ट्ये वेगळी आहेत. त्यामध्ये काही शाळा आय. एस. ओ. नामांकन प्राप्त आहेत. तर काही शाळा क्रीडा क्षेत्रात अग्रेसर आहेत. परंतु काही शाळा अशा आहेत जिथे फक्त अभ्यासक्रमच शिकविला जात नाही तर शिक्षणाबरोबर व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडले पाहिजे व स्वत:चे जीवन सुंदर जगता आले पाहीजे यासाठी स्वत:साठी वेळ द्या, हे मौलिक शिक्षण इथे दिले जाते. त्याचबरोबर समाजातील सर्वसामान्यांमध्ये मिसळून काम करताना उत्तुंग भरारीही मारता आली पाहिजे असे सर्वांगीण शिक्षण या शैक्षणिक केंद्रातून मिळत असल्यानेच आजही या शाळा आपले नावलौकिक टिकवून आहेत.

कांताबेन महेता ज्युनिअर महाविद्यालय

डॉन ॲकॅडमी स्कूल (इ. स. १९८३)

संदर्भ सूची :

१) डॉ. करंदीकर सुरेश, मंगरूळकर मीना, उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्र. आ. २००२, पृ. क्र. १०.

२) कित्ता.

३) कित्ता.

४) कित्ता, पृ. क्र. ११.

५) प्रा. बोकील वि. पा., शिक्षणाचे तत्त्वज्ञान, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९६०, पृ. क्र. १७.

६) सरदार गं. बा. (संपा.), महाराष्ट्र जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९६०, पृ. क्र. २२.

७) ओक प्रसाद, एलफिन्स्टन, राजहंस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९०, पृ. क्र. २०९.

८) डॉ. चव्हाण शिवाजीराव – 'परिवर्तन'.

९) कोष्टी प्रभाकर, शैक्षणिक वाटचाल, सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा, रौप्य महोत्सवी विशेषांक १९६२–१९८५.

१०) Bharucha Perin – Mahabaleshwar the Club 1881-1981, Published by Homi R. Khusrokhan, The Club, Mahabaleshwar Edition 2nd 2006, P. No. 35.

११) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शिक्षण विभाग अहवाल २०१०–११.

१२) यह है संजिवन, संजिवन विद्यालय, ९० वर्ष पूर्ण अंक.

१३) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलांची प्राथमिक शाळा शिलालेख.

१४) Sent Josep Convent Schook Booklet – 2010-11.

१५) Miss Pearsall informal report by the Principal, Kimmins High School 1898 to 1998.

१६) कोष्टी प्रभाकर, उपरोक्त.

१७) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळा रेकॉर्ड.

१८) पाचगणी शिक्षण मंडळ रेकॉर्ड.

१९) पाटणे संभाजीराव (संपा.), लोकमित्र, देशभक्त भि. दा. भिलारे गुरूजी गौरव ग्रंथ, सार्थ मुद्रण (ऑफसेट प्रिंटर्स), पृ. क्र. ३८६.

२०) मुलाखत – कांबळे आर. बी., मुख्याध्यापक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळा क्र. १, दि. ७ ऑगस्ट २०११.

२१) कित्ता.

२२) मुलाखत – जगन्नाथ शिंदे गुरूजी (पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक), ५ ऑगस्ट २०११.

२३) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण विभाग अहवाल २०१२–१३.

२४) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण विभाग अहवाल २०१२–१३.

२५) सेंट जोसेफ कॉनव्हेंट स्कूल, पाचगणी प्रॉस्पेक्ट २०१०–११.

२६) सेंट जोसेफ कॉनव्हेंट स्कूल बोर्ड (फलकावरील लिखाण)

२७) सेंट जोसेफ कॉनव्हेंट स्कूल रेकॉर्ड.

२८) jascon @ pch . intouch . co . in.

२९) सेंट जोसेफ कॉनव्हेंट स्कूल ॲन्युअल मॅगेझीन १९६०–६१.

३०) सेंट जोसेफ कॉनव्हेंट स्कूल रेकॉर्ड बुक.

३१) मुलाखत मिस रिता नन्स, शिक्षिका सेंट जोसेफ स्कूल.

३२) किमिन्स हायस्कूल शिलालेख.

३३) Kimeen's School Broucher – 2008.

३४) Kimeen's School Panchgani Cantenary Celebration 1898 to 1998, P. No. 5.

३५) कित्ता.

३६) Kimeen's School Office Record File.

३७) Interview – Principal, Kimeen's School Panchgani, 2nd April 2011.

३८) कित्ता.

३९) Kimeen's School Record.

४०) किमीन्स स्कूल – शिलालेख.

४१) किमीन्स स्कूल विद्यार्थी संख्या वाढ फलक.

४२) किमीन्स स्कूल रेकॉर्ड फाईल.

४३) किमीन्स स्कूल वेबसाईट.

४४) किमीन्स स्कूल हिरकमहोत्सवी स्मरणिका १९६५–६६.

४५) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण विभाग अहवाल १९७५–७६.

४६) सेंट पीटर्स हायस्कूल प्रॉस्पेक्ट २०१०–११.

४७) सेंट पीटर्स हायस्कूल सुवर्ण महोत्सवी अंक १९०४ ते १९६४.

४८) सेंट पीटर्स हायस्कूल, शिलालेख.

४९) सेंट पीटर्स हायस्कूल सुवर्ण महोत्सवी अंक १९०४ ते १९६४.

५०) Internet – http :/ en, wikipedia . org / wiki / st. peter's school.

५१) सेंट पीटर्स हायस्कूल माजी विद्यार्थी संघ यादी २०१०–११.

५२) The Clarion, Centerary Issue, Billimoria High School, CB 2009-10, P. No. 7.

५३) कित्ता.

५४) Billimoria High School, Panchgani Prospect 2010-11.

५५) The Clarion, Centerary Issue, Billimoria High School, 2009-10, P. No. 7.

५६) Internet – www . billimoriahighschool . org.

५७) Billimoria High School, Panchgani Record Book 2011-14

५८) मुलाखत – सौ. अरूणा कांबळे (आर्ट ॲण्ड क्राफ्ट विभाग बिलीमोरीया हायस्कूल पाचगणी) २ ऑगस्ट २०११.

५९) Anjuman –I – Islam School Prospects, Anjuman – I – Islam Adabai Printing Press, Mumbai 2010-11.

६०) कित्ता.

६१) अंजुमन – ए – इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी, शिलालेख.

६२) Anjuman – I – Islam Schools Prospects 2010-11.

६३) कित्ता.

६४) Anjuman – I – Islam, 111 year of Dedicated Service, 1986, P. No. 14, 15.

६५) Anjuman – I – Islam Schook Booklet – 2011-12.

६६) मुलाखत – आयुब शेख (क्रीडा शिक्षक अंजुमन – ए – इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी) ३ एप्रिल २०११.

६७) अंजुमन – ए – स्कूल पब्लिक स्कूल पाचगणी, ऑफीस रेकॉर्ड.

६८) मुलाखत – शमशुद्दीन शेख (टोरांटो माजी विद्यार्थी २००८) अंजुमन – ए – इस्लाम पब्लिक स्कूल पाचगणी ३ एप्रिल २०११.

६९) यह संजीवन, प्लॅटिनम ज्युबिली अंक १९९८, (संजीवन विद्यालय, पाचगणी) पृ. क्र. ७.

७०) लांजेकर जगदीश, महाबळेश्वर सहल, विद्यादीप प्रकाशन, वाई, मार्च २०००, पृ. क्र. ३१.

७१) कित्ता, पृ. क्र.११.

७२) मुलाखत – देशमुख आर. एस. (प्राचार्य संजीवन विद्यालय, पाचगणी) ५ एप्रिल २०११.

७३) कित्ता.

७४) गॅझेटीयर – सातारा जिल्हा, पृ. क्र. ६७८.

७५) कित्ता, पृ. क्र. ६७८.

७६) संजीवन विद्यालय, विद्यार्थी संख्या रेकॉर्ड २०१२.

७७) संजीवन विद्यालय, माहितीपत्रक २०१०–११.

७८) कित्ता.

७९) मुलाखत – शिंदे पी. एन., (क्रीडा शिक्षक, संजीवन विद्यालय) ५ एप्रिल २०११.

८०) उपरोक्त – 'यह संजीवन',

८१) संजीवन विद्यालय स्टाफ रजिस्टर २०११–१२.

८२) मुलाखत – प्रा. देशमुख आर. एस., ५ एप्रिल २०११.

८३) एस. एम. बाथा हायस्कूल, प्रॉस्पेक्ट २००८–२००९.

८४) बाथा एज्युकेशन ट्रस्ट, पाचगणी वार्षिक अहवाल इ. स. २००८–२००९.

८५) एस. एम. बाथा हायस्कूल, प्रॉस्पेक्ट २००८–२००९.

८६) बाथा एज्युकेशन ट्रस्ट पाचगणी अहवाल २००९–१०.

८७) एस. एम. बाथा हायस्कूल स्मरणिका १९७२, पृ. क्र. २४.

८८) कित्ता.

८९) बाथा एज्युकेशन ट्रस्ट, पाचगणी वार्षिक अहवाल सन २००१–०२.

९०) एस. एम. बाथा हायस्कूल, स्मरणिका १९७२, पृ. क्र. २४.

९१) मुलाखत – प्राचार्या सौ. चंपाबेन एन. पटेल, २ जानेवारी, २०११.

९२) कित्ता.

९३) एस. एम. बाथा एज्युकेशन ट्रस्ट, पाचगणी अहवाल सन २००९–१०.

९४) मुलाखत – प्राचार्या सौ. चंपाबेन एन. पटेल, २ जानेवारी २०११.

९५) कित्ता.

९६) बहाई ट्रस्ट, पाचगणी खरेदी साठे खत नोंद, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, बांधकाम विभाग, १९६०–६१.

९७) पाटणे संभाजीराव (संपा.) लोकमित्र, भिलारे गुररूजी गौरव ग्रंथ, पृ. क्र. २४.

९८) मुलाखत – श्री. कांगा (एस. एम. बाथा हायस्कूल ट्रस्टी) २ जानेवारी, २०११.

९९) सातारा जिल्हा गॅझेटियर १९६२, पृ. क्र. ६०३.

१००) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शिक्षण विभाग अहवाल. इ. स. १९७९.

१०१) पाचगणी गिरिस्थान शिक्षण मंडळ रेकॉर्ड.

१०२) कित्ता.

१०३) पाटणे संभाजीराव (संपा.), लोकमित्र, भि. दा. भिलारे गुरूजी गौरव ग्रंथ.

१०४) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद बांधकाम विभाग अहवाल सन १९८६–८७.

१०५) मुलाखत, मुख्याध्यापिका सौ. कुसूम जगन्नाथ शिंदे, ४ फेब्रुवारी २०१२.

१०६) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण विभाग अहवाल १९८०–८१.

१०७) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण विभाग जनरल बॉडी प्रोसिडींग.

१०८) मुलाखत – सौ. कुसूम जगन्नाथ शिंदे, मुख्याध्यापिका, ४ फेब्रुवारी २०१२.

१०९) पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शिक्षण समिती जनरल बॉडी प्रोसिडींग बुक.

११०) For the Betterment and the World Celebrating 60 years, 2005 स्मरणिका, New Era School, P. No. 4.

१११) New Era School Record Book 1958, P. No. 6.

११२) उपरोक्त, स्मरणिका २००५.

११३) New Era School, Principal Record File No. 7, 2010-11.

११४) कित्ता.

११५) New Era Highschool Register File No. 3.

११६) New Era Highschool Prospect 2010-11.

११७) कित्ता.

११८) न्यू इरा हायस्कूल, क्लिप्टन वसतीगृह, शिलालेख.

११९) न्यू इरा हायस्कूल डान्स क्लास रूममधील बोर्ड.

१२०) New Era High School Prospect 2010-11.

१२१) New Era High School, Dr. A. P. G. Abdul Kalam Visit Booklet 2010.

१२२) For the Betterment of the World Celebrating 60 years, 2005 स्मरणिका.

१२३) डॉ. सुर्वे गजानन, डॉ. बापूजी साळुंखे : व्यक्ती आणि कार्य, मुबारी मुद्रणालय, कोल्हापूर, प्र. आ. १९८१, पृ. क्र. १३३.

१२४) पाटील बाबासाहेब दत्तात्रय, डॉ. बापूजी साळुंखे व्यक्ती कार्य आणि आठवणी, सुपर प्रिंटर्स, बेळगाव, प्र. आ. १९८६, पृ. क्र. ४०.

१२५) मुलाखत : माजी मुख्याध्यापक आर. आर. चव्हाण, महात्मा फुले विद्यामंदिर पाचगणी, रा. ना. प्रतिष्ठानचे संस्थापक, वाई, दि. १२ जानेवारी २०११.

१२६) कित्ता.

१२७) साळुंखे प्रकाश रामचंद्र (संपा.), ज्ञानेय, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आठवणी, साधना प्रेस, पुणे.

१२८) डॉ. सुर्वे गजानन, उपरोक्त, पृ. क्र. ९९.

१२९) मुलाखत : आर. आर. चव्हाण, उपरोक्त.

१३०) महात्मा फुले विद्यामंदिर, पाचगणी, विद्यालयीन पटसंख्या रेकॉर्ड, २०११.

१३१) श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, मुख्य कार्यालय, शाखानिहाय रेकॉर्ड फाईल, सातारा जिल्हा, १९६० ते १९८५.

१३२) मुलाखत : आर. आर. चव्हाण, उपरोक्त.

१३३) डॉ. सुर्वे गजानन, डॉ. बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य, उपरोक्त, पृ. क्र. ९७.

१३४) महात्मा फुले विद्यामंदिर, वार्षिक अहवाल १९८५.

१३५) सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. २२४.

१३६) Down AcademyBrochure, 2011-12.

१३७) कित्ता.

१३९) Down Academy, Sports Annual Function Report, 2009-10.

१४०) डॉन ॲकॅडमी प्रवेश माहिती पत्रक २०११–१२.

प्रकरण ५ वे

पाचगणी :
एक आर्थिक क्षेत्र

प्रकरण ५ वे

पाचगणी : एक आर्थिक क्षेत्र

५.१ प्राथमिक व्यवसाय

५.१.१ स्ट्रॉबेरी शेती

५.१.२ स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग

५.१.३ स्ट्रॉबेरी महोत्सव

५.१.४ पेटंट प्राप्त स्ट्रॉबेरी

५.१.५ ऑल इंडिया स्ट्रॉबेरी ग्रोव्हर्स असोसिएशन स्थापन व कार्य

५.२ स्ट्रॉबेरीवर आधारित मोठे उद्योग

५.२.१ मालाज फ्रुट प्रोडक्टस् प्रा. लि.

५.२.२ मॅप्रो फूडस प्रा. लि.

५.२.३ मनमा फर्मस् ॲण्ड फूड

५.३ शेती व वनविभागाशी निगडीत व्यवसाय

५.३.१ रेशीम उद्योग केंद्र

५.४ पाचगणी येथील हॉटेल व्यवसाय

५.४.१ पाचगणीतील पहिले हॉटेल

५.४.२ हॉटेल व्यवसायाची सद्यस्थिती

५.५ पाचगणीतील पतपुरवठा करणाऱ्या संस्था

५.५.१ पाचगणी येथील बँक व्यवसायाची सुरूवात

५.५.२ पाचगणीतील काही महत्त्वाच्या बँका व पतसंस्था

५.६ पाचगणीतील टॅक्सी व्यवसायिक संघटना

५.७ पाचगणीतील इतर व्यवसाय

संदर्भ सूची

प्रकरण ५ वे

पाचगणी : एक आर्थिक क्षेत्र

कोणत्याही वसाहतीचा आर्थिक विकास हा तिचा अंगभूत भाग असतो. चार लोक एकत्रित राहू लागले की त्यांच्या गरजांच्या अनुषंगाने तेथे विविध उद्योग व्यवसायांची निर्मिती होते. याउलट प्रथम उद्योग व्यवसाय आणि नंतर वसाहतीची स्थापना असेही होते. यासाठी नैसर्गिक अनुकूलता आणि मानवी प्रयत्न या दोन्ही गोष्टी एकत्रित आल्या तर त्या विशिष्ट भागाचा उत्कर्ष झपाट्याने होतो. पाचगणी या अभ्यास क्षेत्रातील सध्याचा आर्थिक विकास हा याचे उत्तम उदाहरण आहे. महाराष्ट्रातील पाचगणी व त्याला लागूनच असणारे महाबळेश्वर ही दोन थंड हवेची ठिकाणे सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर वसली आहेत. हा प्रदेश अत्यंत दुर्गम असला तरी भौगोलिकदृष्ट्या निसर्ग संपन्न असणाऱ्या या प्रदेशात ईस्ट इंडिया कंपनीचा निवृत्त अधिकारी जॉन चेसन याने प्रथम वसाहत निर्माण केली. या वसाहतीचे प्रारंभी उत्पन्नासाठी शेती हाच घटक होता. जॉन चेसननी येथील स्थानिक हवामानाचा विचार करून प्रथम चहा व कॉफीची लागवड करण्यास सुरूवात केली. त्यानंतर या प्रदेशात पिकल्या जाणाऱ्या स्ट्रॉबेरीची चव आणि रंग याने येथील फळाला उत्तम प्रतिचा आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला आहे. पाचगणीच्या परिसरात मनमा, मालाज, मॅप्रो यासारख्या कंपन्यांनी स्ट्रॉबेरी, उजबेरी, मलबेरी, तुती या फळांवर प्रक्रिया करून जाम, जेली, विविध सरबते यासारखी उत्पादने तयार करणारे उद्योग स्थापिले आहेत.

पाचगणीला शैक्षणिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाल्याने या शहराला भेट देणाऱ्या विदेशी पर्यटकांची वर्दळ वाढली. या येणाऱ्या पर्यटकांच्या निवास व भोजन व्यवस्थेसाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट यासारख्या व्यवसायाला चालना मिळाली. त्यातून स्थानिक लोकांना एक आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळाले. पाचगणीला भेट देणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी इथे अनेक छोटे-छोटे व्यवसाय निर्माण झाले. आज त्याच व्यवसायांनी मोठे रूप धारण केल्याने या शहराला व्यापारीदृष्ट्याही महत्त्व निर्माण झाले आहे.

या शहरात असणारे व्यावसायिक, शेतकरी व स्थानिक नागरिकांना पतपुरवठा करण्यासाठी प्रथम बिटिश काळात बँकिंग व्यवसायाला सुरूवात झाली. आज या शहराच्या आर्थिक उलाढालीसाठी राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, व्यापारी बँका, पतसंस्था निर्माण झाल्या. या संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार चालू आहेत.

एकंदरीत पाचगणीच्या आर्थिक विकासाला कारणीभूत ठरणाऱ्या सर्व घटकांचा सर्वांगिण दृष्टीने महत्त्व प्रस्तुत प्रकरणात विषद करीत आहे. या प्रकरणाच्या आर्थिक घटकांच्या संशोधनासाठी मुंबई ऑर्कालॉजीमधील सातारा संस्थानाची कागदपत्रे, बॉम्बे प्रेसिडेन्सी कालीन गॅझेटियर, स्ट्रॉबेरी महोत्सव स्मरणिका, बँकांचे आर्थिक ताळेबंद – अहवाल – ठराव – नियमावली, प्रत्यक्ष क्षेत्र भेट, विषयाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती या साधनांच्या आधारे मांडणी केली आहे. प्रस्तुत प्रकरणात पाचगणीच्या आर्थिक विकास प्रक्रियेला आधारभूत ठरलेल्या काही महत्त्वाच्या घटकांचा आढावा घेतला आहे.

५.१ प्राथमिक व्यवसाय :

५.१.१ स्ट्रॉबेरी शेती :

स्ट्रॉबेरी हे अत्यंत मधूर, रसाळ व आकर्षक लाल रंगाचे नाजूक फळ आहे. अशा या युरोपियन फळाची लागवड प्रथम महाबळेश्वर व पाचगणी परिसरात विसाव्या शतकाच्या सुरूवातीस करण्यास सुरूवात झाली.[१] आज ह्या फळाने आपली बाजारपेठ भारताबरोबर युरोपियन देशात निर्माण केली आहे. तसेच या फळाने आपल्या वैशिष्ट्यापूर्ण चवीमुळे पेटंट मिळवून या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचे साधन प्राप्त करून दिले आहे.

ब्रिटिशांनी या परिसरातील डोंगर उतारावर प्रथम चहा व कॉफीची लागवड करण्यास सुरूवात केली.[२] परंतु त्याला फारसे यश आले नाही. त्यानंतर १९३५ साली महाबळेश्वर परिसरात स्ट्रॉबेरीची लागवड ब्रिटिशांनी केली.[३] तेव्हा त्याचे स्वरूप मर्यादित होते. खऱ्या अर्थाने व्यापक स्ट्रॉबेरी शेती सन १९६५ पासून सुरू झाली.[४] सुरूवातीला एक युरोपियन फळ, पर्यटकाला आकर्षित करण्यासाठी व येथील हवामानाला अनुकूल असणारे फळ म्हणून त्याची शेती केली जाऊ लागली. इ. स. १९८० च्या दशकात पर्यटकांची संख्या वाढली.

स्ट्रॉबेरीपासून जाम, जेलीसारखे टिकाऊ पदार्थ तयार होऊ लागले. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध झाली व या फळाला चांगला भावही मिळू लागल्याने स्ट्रॉबेरी उत्पादनाकडे व त्याच्या संशोधनाकडे तरुण शेतकरी वळला.

स्ट्रॉबेरीची लागवड :

स्ट्रॉबेरी हे फळ मुळचे युरोपियन फळ या फळाला थंड हवामान व पाण्याचा निचरा होणारी जमीन लागते. ती अनुकूलता महाबळेश्वर, पाचगणी परिसरात असल्याने या फळाच्या लागवडीला सुरूवात झाली. स्ट्रॉबेरी हे अत्यंत नाजूक व नाशवंत फळ आहे. ही वनस्पती जमिनीलगत पसरते व त्याला फळे गुच्छ स्वरूपात लागतात. या पिकाला खूप जपावे लागते. स्ट्रॉबेरी रोपांची लावण केल्यानंतर त्याला फुले यावयास सुरूवात झाली की जमिनीलगत पॉलिथिन कागद पसरावा लागतो. जमिन अत्यंत स्वच्छ ठेवावी लागते व पाणी ठिबक सिंचनाने द्यावे लागते. हे फळ मातीला – जमिनीला लागणार नाही, त्याला किड–रोगांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. या पिकाची लागवड केल्यानंतर साधारण अडीच महिन्यांनी म्हणजे सत्तर दिवसात फळे येण्यास सुरूवात होते. एकरी ३०० ते ४५० ग्रॅम फळे एक रोपाला मिळतात.[५] सुरूवातीला या एका फळाचे वजन ३० ते ३५ ग्रॅम वजनाचे असते. त्यामुळे स्ट्रॉबेरीचा हंगाम सुरू झाला की डिसेंबरमध्ये या फळाला भाव प्रति किलो ३५० ते ४५० रुपये मिळतो. नंतर एप्रिल, मे महिन्यात याचा भाव कमी होऊन प्रति किलो ६० रुपये इतका भाव मिळतो.[६]

स्ट्रॉबेरी फळ

स्ट्रॉबेरी लागवडीखालील क्षेत्र :

ब्रिटिशांनी प्रथम प्रायोगिक तत्वावर स्ट्रॉबेरीची लागवड महाबळेश्वरमध्ये करण्यास सुरूवात केली. त्यानंतर याची लागवड भिलार, पाचगणी, मेटगुताड या भागात सुरू झाली.[७] प्रथम सन १९६५ मध्ये साधारण वीस एकर परिसरात लागवड करण्यात आली. १९९२ सालापर्यंत ही शेती पारंपारिक पद्धतीने केली जात होती. १९९२ नंतर या फळाला कृषी मंत्रालय व पणन महामंडळाने सहकार्य केल्यामुळे स्ट्रॉबेरी पिकाचे चित्र बदलले व १९९२–९३ साली १३५ हेक्टर क्षेत्रात स्ट्रॉबेरीची लागवड करण्यात आली. इ. स. २००२ पर्यंत लागवडीचे क्षेत्र १५०० हेक्टर इतके झाले. २०१० साली १८०० हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आले. सन २०१२ मध्ये २५ हजार एकर परिसरात या पिकाची लागवड केली गेली.[८] यावरून या पिकाने अवघ्या पन्नास वर्षात मोठे क्षेत्र व्यापले आहे. या पिकांचे वैशिष्ट्य म्हणजे हे पीक केवळ संपूर्ण महाबळेश्वर परिसर, पाचगणी, भिलार, दांडेघर, गोडवली, खिंगर, राजपूरी, कासवंड, आखेगणी, भोसे, अवकळी या भागात घेतले जाते.

स्ट्रॉबेरीचे उत्पादन :

स्ट्रॉबेरी या फळाचे उत्पन्न हेक्टरी दहा ते बारा टन घेतले जाते. त्यापैकी ८५% उत्पादन हे इतर प्रक्रियेसाठी वापरले जाते. तर केवळ १५% उत्पादन हे खाण्यासाठी (फ्रेश फूड) म्हणून वापरले जाते.[९] स्ट्रॉबेरी हे लो कॅलरी फळ असल्याने यामध्ये लोह, स्फुरद, कॅल्शियमचे प्रमाण असते. तसेच या फळातून अ, ब, क ही जीवनसत्वे मिळतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी हे फळ उपयुक्त मानले जाते. सन १९९० च्या काळात केवळ दोन हजार टन स्ट्रॉबेरी उत्पादित होत होते. आज आधुनिक तंत्रज्ञान, नवीन जाती यामुळे हेक्टरी उत्पादन अठरा ते वीस हजार टन घेतले जात आहे.[१०]

स्ट्रॉबेरीचे प्रकार :

स्ट्रॉबेरी या पिकाचे विविध प्रकार असून सुरूवातीच्या काळात ऑस्ट्रेलिया, बेंगलोर, निग्रो या जातीचे फळ पिक घेतले जात असे. १९९३ साली त्यामध्ये काही नवीन जाती आल्या. त्यामध्ये स्वीट चार्ली व यग्लंडर या जातीची रोपे युरोपातून आयात केली गेली.

अलिकडे या पिकात दहा ते बारा नव्या जाती आल्या आहेत. त्यापैकी पाचगणी महाबळेश्वर परिसरात स्वीट चार्ली, यग्लंडर, कामाराजे, हंटर हाऊन, शेलवा जातीची लागवड केली जाते.

बाजारपेठ :

स्ट्रॉबेरी फळ हे तोडणीनंतर केवळ चार ते पाच दिवस टिकते. त्यामुळे या फळाला स्थानिक बाजारपेठेबरोबर पुणे, मुंबई, हैद्राबाद, बेंगलोर, गोवा, दिल्ली, मंगळूर, हुबळी या बाजारपेठेत पाठविली जाते. साधारणपणे सातशे टन स्ट्रॉबेरी परदेशातही निर्यात केली जाते. महाबळेश्वर तालुक्यातील स्ट्रॉबेरीला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मागणी असल्याने या फळाची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामध्ये फ्रान्स, बोल्जियम या युरोपियन देशात व सौदी अरेबिया, कुवेत, बहरीन, येमेन, मलेशिया या देशांना माल निर्यात होतो.[११]

स्ट्रॉबेरी हंगामात या भागातून साधारण ६० हजार टन फळ निर्यात केले जाते. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरीमुळे चांगले उत्पन्न मिळू लागले आहे. त्यातून या भागाचा मोठा आर्थिक विकास घडून आला आहे. या भागातील तरुण पूर्वी कामधंद्यासाठी पुणे, मुंबईला जात असे. मात्र सध्या तो स्ट्रॉबेरी शेतीत गुंतला आहे.

स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध :

स्ट्रॉबेरीच्या उत्पादनामुळे शेतकरी व व्यापारी यांचा जसा फायदा झाला आहे तसा तो स्थानिक बेरोजगारांनाही झाला आहे. कारण या स्ट्रॉबेरीसाठी वेगवेगळ्या प्रक्रिया माध्यमातून काम करावे लागते. त्यामुळे स्ट्रॉबेरीची लागवड, त्याची देखभाल करणे, फळतोड, विक्री, वाहतुक, पॅकिंग, जाहिरात, मालाची निवड, त्यावर प्रक्रिया अशा कारणासाठी शेकडो कामगारांची गरज लागते. त्यामुळे स्थानिक लोकांना सहज रोजगार उपलब्ध झाला आहे. सुमारे ४०% लोक स्ट्रॉबेरी व त्यावर प्रक्रिया या उत्पादनात आहेत.

स्ट्रॉबेरीचे वेगळेपण :

स्ट्रॉबेरी हे युरोपियन फळ असले तरी पाचगणी महाबळेश्वर परिसरातील लोहयुक्त जमिनीचा स्थानिक वेगळेपणा यात आल्याने या फळाला वैशिष्ट्यपूर्ण चव प्राप्त झाली आहे. त्यामुळे या फळाला युरोपियन व अरब राष्ट्रात मोठी मागणी आहे. या फळाचे वेगळेपण म्हणजे

फळाचा लाल देखणा रंग त्या २०% पाणी, १० ते २०% ग्लुकोजचे प्रमाण, फळावर पांढरे ठिपके यामुळे फळात असणारे प्रथिने, व्हिटॅमिन, लोह यांचे अधिक प्रमाण असल्याने हे फळ आरोग्यदायी समजले जाते.[१२]

५.१.२ स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग :

पाचगणी परिसरातील स्ट्रॉबेरी संपूर्ण देशातील बाजारपेठेत पाठवूनही स्थानिक बाजारपेठेत शिल्लक राहते. हे फळ नाजूक व नाशवंत असल्याने तीन ते चार दिवसापेक्षा जास्त दिवस टिकू शकत नाही. त्यामुळे उत्पादक शेतकरी हा स्वत:च स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योगाकडे वळला आहे. स्ट्रॉबेरीपासून जाम, जेली, चॉकलेट, क्रश, सरबत, आईस्क्रीम, सिरप अशी विविध उत्पादने तयार करतात. शेतकरी अतिरिक्त उत्पादनापासून वर्षभर टिकणारा स्ट्रॉबेरी मनूका तयार करू लागला आहे. स्ट्रॉबेरीमध्ये पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि शर्करेचे प्रमाण कमी असते. त्यामुळे मनूका तयार करण्यास वेळ लागतो. परंतु ही प्रक्रिया रसायनविरहीत आहे. साडेतीन किलो स्ट्रॉबेरीपासून साधारण एक किलो मनुका तयार होतो. याशिवाय शेतकरी स्ट्रॉबेरी बर्फी, ज्युस, स्ट्रॉबेरी पकोडा, स्ट्रॉबेरी कोल्हापूरी मसाला असे पदार्थ तयार करून विकू लागला आहे.

५.१.३ स्ट्रॉबेरी महोत्सव :

आजचे युग हे जाहिरातीचे युग असल्याने शेतकऱ्यानाही आपल्या मालाची जाहिरात करणे आवश्यक झाले आहे. यासाठी इ. स. एप्रिल २००६ पासून 'स्ट्रॉबेरी महोत्सव' सुरू करण्यात आला आहे. हा महोत्सव पाचगणी, महाबळेश्वर या दोन शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या भिलार या गावातील शेतामध्ये आयोजित केला जातो.[१३]

स्ट्रॉबेरी महोत्सव म्हणजे स्ट्रॉबेरीच्या शेतात जाऊन स्वत:च्या हातांनी फळे तोडून, तजेलदार, चवदार, ताजी स्ट्रॉबेरी खाणे होय तेही मनसोक्त व फुकट. या महोत्सवामुळे शहरी भागातील पर्यटकांना स्ट्रॉबेरी पीक कसे घेतले जाते, त्याची जोपासना किती कष्टपूर्वक करावी लागते हे समजते. त्याशिवाय शहरी पर्यटकांना भारतीय ग्रामीण संस्कृतीचे व जीवनाचे दर्शन होते. यातून पर्यटक व शेतकरी यांच्यातील नातेही वृद्धिंगत होते.

हा महोत्सव साधारण एप्रिल महिन्यातील पहिल्या आठवड्यात आयोजित केला जातो. या महोत्सवाचे आयोजन 'स्ट्रॉबेरी ग्रोव्हर्स असोसिएशन ऑफ इंडिया', नवी दिल्ली आणि पाचगणी–महाबळेश्वर–भिलार भागातील शेतकरी यांच्यावतीने आयोजित केले जाते.[१४] या महोत्सवाला संपूर्ण भारतातून लोक येतात. या महोत्सवाची संकल्पना प्रथम श्री. बाळासाहेब भिलारे यांनी मांडली. सुरूवातीला दर दिवशी सहा हजार पर्यटक सदर महोत्सवास येत असत. सध्या हेच प्रमाण पंधरा ते वीस हजार पर्यटकांपर्यंत पोहोचले आहे. या महोत्सवामुळे स्थानिक बाजारपेठेला महत्त्व प्राप्त होते.

५.१.४ पेटंट प्राप्त स्ट्रॉबेरी :

स्ट्रॉबेरीला केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाचे पेटंट मिळाले आहे. महाबळेश्वर तालुक्यात पिकणाऱ्या स्ट्रॉबेरीला योग्य भाव मिळावा, तिची ओळख जपली जावी आणि लोकांची होणारी फसवणूक टाळावी यासाठी 'Geographical Identity' तयार करण्यासाठी चेन्नई येथील 'ऑल इंडिया रजिस्ट्री'कडे 'जी. आय.' मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार महाबळेश्वर तालुक्यातील स्ट्रॉबेरीचा अभ्यास करून त्याला कायदेशीर संरक्षण दिले गेले आहे आणि त्याला 'G I–१५४' या नोंद क्रमांक प्राप्त झाला आहे.[१५] त्यामुळेच येथील स्ट्रॉबेरीच्या नावाखाली कमी दर्जाच्या खपविण्यात येणाऱ्या स्ट्रॉबेरींना प्रतिबंध करता येणे शक्य झाले आहे.

५.१.५ ऑल इंडिया स्ट्रॉबेरी ग्रोव्हर्स असोसिएशनची स्थापना व कार्य :

All India Strawberries Growers Association (AISGA) :

महाबळेश्वर तालुक्यात सन १९९४ पासून मोठ्या प्रमाणात स्ट्रॉबेरीचे उत्पादन घेतले जाऊ लागले आहे. ही उत्पादित स्ट्रॉबेरी योग्य बाजारपेठेत पोहचून त्याला योग्य तो भाव मिळावा व शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळावे, त्याचा मोबदला त्यालाच मिळावा यासाठी या भागात स्ट्रॉबेरी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रथम संघटीत करणे आवश्यक होते. त्यासाठी या भागातील श्री. बाळासाहेब भिलारे, श्री. मयुर व्होरा, सातारा जिल्हा बाजार समितीचे सभापती श्री. राजेंद्र भिलारे व जावळी भागाचे नेते माजी आमदार श्री. भि. दा.

भिलारे गुरूजी यांनी एकत्र येऊन या भागातील शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रथम भिलार येथे 'श्रीराम फ्रुट प्रोससिंग संघटना' स्थापन केली.[१६] त्यानंतर १९९३ साली या संघटनेतील सर्व सभासद शेतकरी हे राष्ट्रीय पातळीवरील 'AISGA' मध्ये सहभागी झाले. AISGA सदस्यांची संख्या १८०० तर लागवडीखालील क्षेत्र २००० एकर होते. या राष्ट्रीय पातळीवरील संघटनेमुळे या भागाचे अर्थकारणच बदलून गेले आहे. या संस्थेच्या माध्यमातून विविध कार्य हाती घेतले आहे. त्यामध्ये

- ★ उत्पादित होणाऱ्या स्ट्रॉबेरीवर केवळ प्रक्रियेवर न थांबता स्ट्रॉबेरीची निर्यात करण्यास सुरूवात केली.
- ★ 'स्ट्रॉबेरीला पेटंट' मिळाल्यामुळे १५३ देशातून या स्ट्रॉबेरीची निर्यात होऊ लागली.
- ★ इस्त्राईल देशाच्या सहकार्याने भिलार व पाचगणी येथे 'स्ट्रॉबेरी संशोधन केंद्र' उभारून स्थानिक हवामानास योग्य जातीची पैदास केली जाऊ लागली.
- ★ महाबळेश्वर तालुक्यातील महिला बचत गटांना स्ट्रॉबेरीपासून मनुका बनविणे, बर्फी बनविणे याचे प्रशिक्षण दिले जाते.
- ★ शेतकरी मेळावे, परिषदांचे आयोजन करणे असे उपक्रम या संस्थेकडून राबविले जातात.[१]

पाचगणी, महाबळेश्वर भागातील शेतकऱ्यांना प्रथम स्थानिक पातळीवर आर्थिक मदत सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केली. सदर बँकेने अल्प दरात व वेळेत कर्जपुरवठा करून मदतीचा हातभार लावला. शिवाय बागवानी बोर्डानेही शेतकऱ्यांना अनुदान देऊन मोठी मदत केली आहे. त्यामुळे स्थानिक स्ट्रॉबेरी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत होऊन उत्पादन वाढीस प्रोत्साहन मिळाले आहे.

Mala's Fruit Products Pvt. Ltd.

मालाज फ्रुट प्रोडक्टस् प्रा. लि.ची उत्पादने

Mapro Foods Pvt. Ltd.

मॅप्रो फूड प्रा. लि. लि.ची उत्पादने

५.२ स्ट्रॉबेरीवर आधारित मोठे उद्योग :

पाचगणी–महाबळेश्वर परिसरातील स्ट्रॉबेरी शेती या प्राथमिक श्रेणी व्यवसायावर आधारित दुय्यम श्रेणीचे व्यवसायही विकसित झाले. त्यात जाम, जेली, सिरप तयार करणाऱ्या उद्योग कंपन्या महत्त्वाच्या आहेत.

५.२.१ मालाज फ्रुट प्रोडक्टस् प्रा. लि.: Mala's Fruit Products Pvt. Ltd. :

मालाज फ्रुटची उत्पादने बाजारपेठेत एक उत्तम दर्जाची उत्पादने म्हणून ओळखली जातात. त्यामुळे मालाज कंपनीला एक ब्रॅड मिळाला आहे. या कंपनीतर्फे जाम, स्कॉश, सिरप, क्रश आणि कॉरडीलस अशी उत्पादने घेतली जातात. ही कंपनी श्री. तायाब मालाज यांनी इ. स. १९५८ मध्ये पाचगणी जवळ भोसे येथे सुरू केली.[१८] अतिशय कष्टाने व निष्ठापूर्वक उभी केलेली ही कंपनी आज आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:ची गुणवत्ता धारण करणारी कंपनी म्हणून नावलौकिक मिळविला आहे.

उत्पादनाचे विस्तारीकरण :

मालाज कंपनीने प्रारंभी केवळ दरवर्षी अर्धा टन जाम बनविण्यास सुरूवात केली. त्याच कंपनीने सध्या दरवर्षी पाचशे टन केवळ जामचे उत्पादन तयार करते. कंपनीच्या वतीने जामशिवाय वेगवेगळ्या दहा प्रकारची उत्पादने व विविध फळांचा रस तयार केले जातात. मालाज कंपनीने पॅकिंगसाठीही अनेक वेगवेगळे नाविन्यपूर्ण उपक्रम शोधून काढले आहेत. त्यामध्ये मालाज ही भारतातील पहिली कंपनी आहे जिने प्रत्येक पॅकिंगला सहजासहजी दिसणार नाहीत असे धातूचे बूच (Lug Caps) तयार केले.[१९] L & T चे हे पहिले संशोधन होय. मालाज कंपनी Refill Pack तयार करण्यात अग्रेसर ठरली. त्यात रिकाम्या बाटल्या किंवा डबे पुन्हा निर्जंतुक करून भरले जातात. ही प्रक्रिया पर्यावरणपूरक आहे. मालाजच्या उत्पादनासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व यंत्रसामुग्रीचीही व्यवस्था केली आहे.

उत्पादनाला राष्ट्रीय दर्जा :

मालाज कंपनीचे जाम ही आज भारतातील नंबर एकचे उत्पादन म्हणून प्रसिद्धीस आले आहे. या कंपनीचे NABL कडून स्वतंत्रपणे मूल्यांकन करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय

दर्जाप्रमाणे IS-5861 : 1993 हा दर्जा मालाजने प्राप्त केला आहे. हे सर्व अन्न भेसळ निवारण कायदा १९५६ नुसार FRO ने मालाज कंपनीच्या जामला नंबर एकचे जाम म्हणून घोषित केले आहे.[२०] सदरचा अहवाल असा आहे की, "The Good Buy's Mala's the little advertised brand from Maharashtra gets the top position and score of 86.53 Mala's pection content is low which is good sign, and it also, has the least amount of preservatives benzoic acid. It is cheaper to terms ofits costs, than some other brand."[21]

कंपनीचे व्यवस्थापन :

श्री. मालाज यांनी १९५८ ला केवळ स्ट्रॉबेरीपासून तयार होणारा जाम घरगुती पद्धतीने तयार करण्यास सुरूवात केली. सन १९८० पर्यंत जाम, जेली वापरणारा ठराविक वर्ग होता. १९९० च्या दशकात ग्राहकांची संख्या वाढू लागली. इ. स. १९८८ मध्ये सर्व स्वयंचलित यंत्रे आली.[२३] मनुष्यबळाची गरज कमी झाली तरी कामाचा विस्तार वाढल्यामुळे सर्व विभागात एकूण कामगार वर्ग २६८ इतका आहे. मॅनेजर, खरेदी विक्री करणारे, जनसंपर्क अधिकारी, जाहीरात अधिकारी, फूड टेक्निशियन्स, क्लार्क, शिपाई असा स्टाफ आहे.

मालाची आयात निर्यात :

कंपनीच्या उत्पादनासाठी लागणारी स्ट्रॉबेरी, मलबेरी इत्यादी स्थानिक बाजारपेठेतच उपलब्ध असल्याने हा माल विपुल प्रमाणात व स्वस्त उपलब्ध होतो. शिवाय संत्री, मोसंबी, सफरचंद व इतर फळे ही सुरूवातीला सिमला, काश्मिर, पुणे, मुंबई येथून मागविली जात. कच्चा माल इस्त्राईल, कोरिया, ऑस्ट्रेलिया येथून मागविला जातो. उत्पादित माल पुणे, मुंबई, लोणावळा, माथेरान व संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होतो. सन १९९० नंतर या मालाचे वितरण बेंगलोर, दिल्ली, अहमदाबाद, चेन्नई अशा भारतातील सर्व महत्त्वाच्या शहरात केले जाते. सध्या मालाज जाम अरब राष्ट्रातही लोकप्रिय बनला आहे.

५.२.२ मॅप्रो फूड प्रा. लि. : Mapro Foods Pvt. Ltd. :

स्ट्रॉबेरी व इतर फळापासून जाम, जेली तयार करणारी पाचगणीमधील दुसरी मोठी कंपनी म्हणजे मॅप्रो कंपनी होय. मालाज कंपनीनंतर लगेच दुसऱ्या वर्षी म्हणजे १५ नोव्हेंबर

१९५९ रोजी श्री. किशोर व्होरा यांनी ही कंपनी पाचगणी येथे प्रथम आपल्या घरी सुरू केली. सध्या त्यांनी महाराष्ट्र, गुजरात येथील मार्केटवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. जॅम व इतर पदार्थाबरोबर पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी स्ट्रॉबेरी महोत्सव व मॅप्रो गार्डन यासारख्या कल्पकता त्यांनी राबविली आहे. त्यामुळे आज ही भारतातील जलद गतीने विस्तार होणारी कंपनी म्हणून ओळखली जाते.

मॅप्रो कंपनीतील उत्पादने :

प्रथम श्री. किशोर व्होरा यांनी आपल्या घरात एका पत्र्याच्या खोलीत स्ट्रॉबेरी जॅम तयार करण्यास सुरूवात केली. त्यानंतर रासबेरी जॅम तयार केला जाऊ लागला. या दोन फळावरील प्रक्रिया यशस्वी झाल्यानंतर आंबा, अननस, संत्री व यासारखी लिंबू वर्गात मोडणाऱ्या फळापासून जॅम तयार केला जाऊ लागला. शिवाय काही विविध उत्पादनेही इथे सुरू झाली.

जॅम नंतर Fruit Crush मध्ये :- Alphonso mango, ब्लॅक Currant, बटर स्कॉच, कस्टर्ड ॲपल, किवी, लिची, मँगो, ऑरेंज इ. पदार्थ.

Peach of Aprkot मध्ये :- पायनापल, स्ट्रॉबेरी, होल स्ट्रॉबेरी.

Restorebeverage Concentrutes मध्ये :- कोकम क्रश, लेमन bueley water, Gingerale squash, लेमन जिंजर squash

सरबतमध्ये :- खुश, महाकुल, पायनापल, कच्ची कैरी, स्ट्रॉबेरी, रासबेरी उत्पादने.

याशिवाय जेली स्वीटस्, फ्रुट क्युबस्, फ्रुट ज्युसपासून रोज सीलर ते बदाम, काजूवर लेअर चढवून चॉकलेट, कच्च्या कैरीचा स्वाद देणारे फलेरो चॉकलेट असे अनेक अत्याधुनिक पद्धतीच्या उत्पादनास सुरूवात केली आहे.

इ. स. १९८३ मध्ये श्री. किशोर व्होरा यांनी त्यांचे पुतणे श्री. मयूर व्होरा यांना भागीदारीत घेतले. मार्केटमधील स्पर्धा लक्षात घेऊन त्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी अत्याधुनिक ज्ञानाचा व तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे होते. श्री. मयूर व्होरा हे बेंगलोरहून IIM झाले होते व Voltas कंपनीतील दोन वर्ष कामाचा अनुभवही होता. त्यांनी या

कंपनीमध्ये अधिक पैसा गुंतविला. मॅप्रो कंपनीने किरकोळ विक्रेत्यांना संधी देऊन प्रथम संपूर्ण भारतभर बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न केला.

कंपनीचे विस्तारीकरण :

मॅप्रो कंपनीचा विस्तार होऊन त्याचे तीन नवीन युनिटस् सातारा जिल्ह्यामध्ये शेंदूरजणे, पुणे आणि पंजाबमध्ये पठाणकोट येथे सुरू करण्यात आली. मात्र त्यांना कच्चा माल पाचगणीतूनच पुरविला जातो. मॅप्रो कंपनीने जॅम आणि फळांची पेय या उत्पादनानंतर २००५ मध्ये मिठाई उद्योग व चॉकलेट उद्योग यांची सुरूवात केली. पुढे इ.स. २००८ साली फळातील गरापासून चघळण्याची गोळी तयार करण्याचा नवीन विभाग सुरू करण्यात आला. त्यामध्ये अगदी थोड्या कालावधीत बाजारपेठ काबीज करणारी Falero ही कच्ची कैरी व स्ट्रॉबेरीपासून तयार केली. इ. स. २००८ मधील या कंपनीची Falero Fruit Chews and Mazaana ही चॉकलेट खूप प्रसिद्ध झाली.[२३]

मॅप्रो कंपनीस ISO मानांकन :

मॅप्रो Food Product Company ला त्याच्या उत्कृष्ट उत्पादनासाठी अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाकडून व सरकारकडून प्रमाणपत्र मिळाले आहे. शिवाय ISO 9001-2008 हे मानांकर इ. स. २००८ मध्ये मिळाले आहे. ISO – 2200-2005 असे सर्टिफिकेट BVQI कडून मिळाले आहे.[२४]

मॅप्रोची उलाढाल :

सन १९५९ मध्ये दर दिवशी दहा किलो जॅमचे उत्पादन करणारी मॅप्रो कंपनी सध्या दिवसाला १०० टन जॅमचे उत्पादन करते.[२५] आधुनिक तंत्रज्ञान सल्लागारामुळे केवळ पेय विभागात दरवर्षी ७० करोडची उलाढाल होते. यामध्ये दरवर्षी १०% ने वाढ होत आहे. चॉकलेट उद्योगात ५ हजार करोडची उलाढाल दरवर्षी होत आहे. यामध्ये दर तीन वर्षांनी दुप्पट वाढ होत आहे. तर फलेरो चॉकलेट जे केवळ एक रुपयाने विकले जाते त्यामध्ये ५०% फायदा आहे.

मॅप्रो कंपनीची सन २००६-०८ मध्ये आर्थिक एकूण उत्पन्न २५ करोड होते तर सन २०१०-११ मध्ये १०० करोड उत्पन्न झाले. म्हणजेच ही वार्षिक वाढ ३२% इतकी आहे. यावरून या कंपनीची प्रगती लक्षात येते. थोडक्यात कंपनीने उत्पादन गुणवत्ता व व्यवस्थापन यांची चांगली सांगड घातल्याचे दिसते.

५.२.३ मनमा फर्मस् ॲण्ड फूड : Manama Farms and Food :

मनमा ही कंपनी पाचगणीपासून ४ कि. मी. अंतरावर असणाऱ्या भोसे या गावी इ. स. १९९४ मध्ये सुरू झाली. या कंपनीने आपल्या उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी स्वच्छ, शुद्ध हवेचे अन्न उत्पादनासाठी उपयुक्त असणारे विशिष्ट स्थान निवडले आहे. या कंपनीची स्थापना श्री. मोमीन माला यांनी केली.[२६]

या कंपनीने Cordials जे भारतीय बाजारपेठेत प्रथमच आणले. याशिवाय या कंपनीकडून Syrups and Dessert toppings, Irish Coffee, Ice tea ही उत्पादने भारतीय बाजारपेठेसाठी बनविण्यात आली.[२७]

थोडक्यात मनमा या कंपनीची नाविन्यपूर्ण उत्पादने म्हणजे-१) Chocolate Toppings, २) Fruit Toppings, ३) Fruit Twist (New), ४) Ice Teas, ५) Jam, ६) Cordials, ७) Syrup etc. होय.

कंपनीचे व्यवस्थापन :

मनमा ही कंपनी नवीन आहे. त्यात संपूर्ण आधुनिकता आहे. त्यामुळे इथला माल हा जास्तीत जास्त आधुनिक यंत्रसामुग्रीवर बनतो. येथे काम करणाऱ्या कामगार वर्गाची संख्या ४२ आणि व्यवस्थापनातील टेक्निशियन, फूड टेस्ट ऑफिसर, लॅब असिस्टंट असे १८ कर्मचारी आहेत. वेतन अधिकाऱ्याच्या येथील वेतनप्रमाण दर्जानुसार किमान सहा हजार पासून कमाल १ लाख २० हजार रुपयांपर्यंत आहे. या कंपनीची वार्षिक उलाढाल ही दीड हजार कोटी ते साडेतीन हजार कोटीपर्यंत होते.[२८] मनमाची उत्पादने ही देशातील सर्व मोठ्या शहरात पाठविली जातात.

पाचगणीतील शेती उत्पादनांची किरकोळ विक्री :

१) **स्ट्रॉबेरी** :– स्ट्रॉबेरीची किरकोळ विक्री ही स्थानिक बाजारपेठेत केली जाते. शेतकऱ्यांकडून रोजच्या बाजारातील विक्री ही एक ते दीड लाख रुपयांपर्यंत होते. डिसेंबर ते जानेवारीमध्ये स्ट्रॉबेरीचा दर प्रति किलो ३५०/– रुपये असतो. हंगाम संपेपर्यंत हा दर ६० रुपयांपर्यंत खाली येतो. येथील शेतकऱ्याचे स्ट्रॉबेरी हे नगदी पीक आहे. तो दररोज किरकोळ विक्री दिवसाकाठी २५ ते ४० किलो ग्रॅम इतकी करतो.

२) **बेरी प्रकारातील फळे** :– स्ट्रॉबेरीशिवाय या परिसरात उपलब्ध होणारी बेरी या प्रकारातील फळे म्हणजे मलबेरी, राजबेरी, काळी तुती शिवाय करवंद, जांभळे व इतर जंगली फळे मार्च–एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात मिळतात. या फळांची विक्री हा स्थानिक लोकांच्याकडून होते. साधारण ही फळे दिवसाकाठी दोन ते अडीच हजार रुपयापर्यंत विकली जातात. त्यामुळे डोंगराळ भागात रहाणाऱ्या लोकांना या फळापासून उत्पन्न मिळते.

३) **भाजीपाला** :– येथे विविध प्रकारच्या पालेभाज्या मिळतात. त्यातील एक वेगळी पालेभाजी म्हणजे सॅलेड. ही इतरत्र कुठेही मिळत नाही. या सॅलेडची पाने मुळ्याच्या पानासारखी असतात. याचा उपयोग कोशींबीर व फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये डिशेस सजविण्यासाठी केला जातो. याला मोठ्या शहरातून मागणी आहे. या परिसरातील जमिन लोहयुक्त व तांबडी असल्याने वैशिष्ट्यपूर्ण लाल गाजर व बीट येथे तयार होते. याला शहरातून मोठी मागणी आहे.

४) **बटाटा** :– पाचगणीच्या परिसरातील बटाट्याला संपूर्ण देशातून मोठी मागणी आहे, कारण इथला बटाटा हा तांबूस रंगाचा, चवीला गोडसर व आकाराने लहान आहे. हे पिक इथल्या तांबड्या लोहयुक्त जमिनीत घेतले जात असल्याने व कोणत्याही रासायनिक खताचा वापर होत नसल्याने या बटाट्याची चव वेगळी आहे. त्यामुळे हा बटाटा पुणे, मुंबई व तेथून गुजरात, मध्यप्रदेश येथे पाठविला जातो. तसेच हॉटेल व्यवसायात इथल्या बटाट्याला जास्त मागणी आहे. स्थानिक शेतकऱ्यांला या बटाट्यापासून चांगला दर मिळतो. याला प्रती टन ९०० रुपये ते १७०० रुपये भाव मिळतो.[२९] याची वार्षिक उलाढाल ६५ ते ७० लाख रुपयांची आहे. थोडक्यात शेती व शेतीवर आधारित उद्योग व्यवसायामुळे स्थानिक शेतकरी,

जंगलात राहणारे कष्टकरी यांना आर्थिक फायदा होऊ लागल्याने आर्थिक सबलता निर्माण झाली आहे.

५.३ शेती व वनविभागाशी निगडित व्यवसाय :

५.३.१ रेशीम उद्योग केंद्र :

निसर्गनिर्मित धाग्यामध्ये रेशीम धाग्याला त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मामुळे वस्त्रप्रावरणांत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. म्हणूनच त्याला "Silk is a queen of all natural fibres" असे म्हटले जाते. जगात उत्पादित होणाऱ्या नैसर्गिक धाग्यामध्ये केवळ ०.३% रेशीमचा सहभाग आहे.[३०] रेशीमचा उपयोग आज सर्व स्तरावर केला जातो. त्यामध्ये फॅशनेबल कपडे असोत, फ्लोरिंगकरीता म्हणजे कारपेटसाठी, घर सजावटीपासून ते धार्मिक कार्यात याला महत्त्वाचे स्थान आहे. रेशीम हे मुलायम, आकर्षक व संवेदनशील वस्त्र म्हणून प्रसिद्ध आहे. अशा या रेशीम धाग्याच्या निर्मितीला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे सुरूवात झाली. आज हे केंद्र महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली सुरू असून या केंद्राला पर्यटन हंगामात दोन ते तीन हजार पर्यटक, शेतकरी, विद्यार्थी भेट देतात.

रेशीम केंद्रांची स्थापना :

पाचगणी येथे रेशीम केंद्रांची स्थापना इ. स. १९५८ साली डॉ. देवडीकर यांनी केली.[३१] हे महाराष्ट्रातील सर्वात प्रथम सुरू झालेले केंद्र होय. हे केंद्र प्रथम पाचगणी येथील न्यू इरा हायस्कूलच्या एका इमारतीत सुरू झाले.[३२] हा व्यवसाय सुरू करण्यासाठी तुतीची लागवड करणे व रेशीम किड्यांची पैदास करणे हे महत्त्वाचे असते. त्यासाठी डॉ. देवडीकर यांनी पाचगणीपासून ६ कि. मी. अंतरावर असणाऱ्या गुरेघर येथे वन विभागाची दहा एकर जागा भाडे तत्वावर घेऊन तुतीची लागवड केली. यासाठी देवडीकरांनी पाचगणी व आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांना या व्यवसायात सामिल करून घेतले. इ. स. १९६२ मध्ये महाराष्ट्र शासनाने खादी ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करून, शेतकऱ्यांना जोडधंदा करण्यासाठी रेशीम उद्योगाला प्रोत्साहन दिले.[३३]

रेशीम केंद्रांचा उद्देश :

डॉ. देवडीकरांनी पाचगणी सारख्या ठिकाणी रेशीम केंद्र काढण्याचा मुख्य उद्देश होता, तो म्हणजे रेशीम किडा पैदासीसाठी योग्य हवामान येथे होते. तुतीच्या लागवडीसाठी पोषक जमीन उपलब्ध असल्याने व स्थानिक शेतकऱ्यांना एक व्यवसाय निर्माण करून देण्याच्या उद्देशाने या केंद्राला सुरूवात झाली. भारतातील कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल व जम्मू कश्मीर ही पारंपारिक रेशीम उद्योग करणारी राज्ये म्हणून ओळखली जातात. महाराष्ट्रात जेथे जेथे सदर उद्योगासाठी भौगोलिक अनुकूलता असेल तेथे तेथे हा उद्योग सुरू व्हावा या उद्देशाने सर्वात प्रथम रेशीम उत्पादन केंद्र सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे सुरू झाले.[३४] पाचगणीचे रेशीम केंद्र हे 'जिल्हा रेशीम केंद्र' म्हणून ओळखले जाते. येथे रेशीम प्रशिक्षण, रेशीम कोश खरेदी, अंडी पुंज निर्मिती हे विभागही आहेत.

तुतीची शेती :

रेशीम आळी पैदास करण्यासाठी तुतीचा पाला हे त्याचे प्रमुख खाद्य असल्याने तुतीची लागवड करणे हे या व्यवसायात महत्त्वाचे ठरते. सुरूवातीस तुतीची शेती पाचगणीच्या आसपास गुरेघर, पसरणी, वाई, आम्रळ या भागात केली जात असे.[३५] परंतु स्ट्रॉबेरी व्यवसायाला महत्त्व आल्याने व या व्यवसायात जागेवर पैसा मिळत असल्याने या भागात तुतीऐवजी स्ट्रॉबेरीची शेती शेतकरी मोठ्या प्रमाणात करू लागले. त्यामुळे इ. स. २००० पासून या केंद्राला कराड–सातारा तालुक्यातील गावे, परळी खोरे, खंडाळा या भागातून रेशीम कोष मिळत आहेत. हे केंद्र सातारा जिल्ह्यात शेतकऱ्यांना रेशीम शेती करण्यासाठी प्रोत्साहित करते व शासनामार्फत विविध सवलतीही दिल्या जातात. रोजगार हमी योजनेमार्फत एकरी २०,००० रुपये अनुदान अशा विविध माध्यमातून रेशीम उद्योगाला प्रोत्साहन दिले जात आहे. आज हा व्यवसाय केवळ सरकारी अनुदानावर तग धरून आहे.

५.४ पाचगणी – हॉटेल व्यवसाय :

५.४.१ हॉटेल व्यवसायाचा इतिहास :

भारतात प्रवाशांच्या निवासाची सोय प्राचीन काळापासून आहे. अशा निवास व्यवस्थेला धर्मशाळा, सराई, विहार, मुशाफीरखाना म्हणत असत.[३६] २० व्या शतकात याच सराईचे रूपांतर हॉटेल्समध्ये झालेले दिसते. आधुनिक काळात ब्रिटिश अधिकारी व युरोपियन लोकांच्या निवासासाठी भारतात प्रथम हॉटेल्स निघाली. त्यामध्ये १८४० मध्ये मुंबई येथे पहिले हॉटेल निघाले त्याचे नाव होते 'ब्रिटिश हॉटेल'. हे हॉटेल बांधले ते Pallangee Pestongee याने म्हणून त्याला भारतीय हॉटेलचा जनक म्हणून ओळखले जाते.[३७] त्यानंतर भारतीय लोकांना ब्रिटिशांच्या वंशभेदाला अनेक वेळी बळी पडावे लागले आहे. त्यामध्ये जमशेदजी टाटा यांना या ब्रिटिश हॉटेलमध्ये प्रवेश नाकारला तेव्हा या हॉटेलच्या तोडीस तोड हॉटेल ताजमहाल पॅलेस इ. स. १९०३ मध्ये मुंबईमध्ये उभे केले.[३८] त्यानंतर भारतात हॉटेल व्यवसायाला सुरूवात झाली.

५.४.२ Hotel Prospect - पाचगणीतील पहिले हॉटेल :

पाचगणीतील निवासी इंग्रजी शाळांच्यामुळे बाहेरून येणाऱ्या विद्यार्थी व पालकांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होऊ लागला. त्यातूनच इ. स. १९१४ साली Shahram Javanmardi या इराणी गृहस्थाने टेबललँडच्या पायथ्याशी निसर्गरम्य ठिकाणी एक हॉटेल सुरू केले त्याचे नाव होते Hotel Prospect.[३९] सध्या हे हॉटेल २८ एकरच्या परिसरात आहे. या हॉटेलला Heritage Hotel चा दर्जा मिळाला आहे. Prospect Hotel हे आपले जुने वैभव टिकवून त्याला आधुनिक सुविधांची जोड दिली आहे. या हॉटेलमध्ये सध्या २२ खोल्या, भोजनगृह, विश्रांती कक्ष, सभागृह, ग्रंथालय, बंदिस्त टेबल टेनिस कोर्ट आहे. या प्रत्येकाला सुंदर कलात्मकतेची जोड दिली आहे. संपूर्ण इमारत सागवानी व सीसम लाकडाची आहे. त्यामुळे येथे काष्ट शिल्प पाहण्यास मिळते. ही इमारत म्हणजे ब्रिटिश व हिंदू स्थापत्य कलेचा नमूना आहे. या होटेलमध्ये दररोज साधारण ९० ते १०० लोकांची सोय होऊ शकते. शिवाय सर्व सोयीसुविधाही उपलब्ध आहेत.

Hotel Prospect

पाचगणीतील पहिले हॉटेल

हनुमान हिन्दू हॉटेल :

सन १९३५ नंतर पाचगणीत युरोपियन लोकांच्या बरोबर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील लोकांची वर्दळ वाढली. सत्यशोधक समाजाचे कार्य चालू झाले. या स्वातंत्र्य चळवळीतील कार्यकर्त्यांना बसण्यासाठी व नाष्ट्यासाठी म्हणून सत्यशोधक समाजाचा कार्यकर्ता असणारे श्री. मारूती भिलारे यांनी हे छोटेसे हॉटेल सुरू केले.[४०] याची स्थापना इ. स. १९३८ मध्ये हनुमान रोड भागात झाली. या ठिकाणी फक्त हिंदू व इतर समाजातील लोक एकत्र जमत. हे हॉटेल इ. स. १९५० पर्यंत चालू होते.[४१] त्यानंतर ते बंद झाले. हे हॉटेल स्वातंत्र्य सेनानीचा आधार होते.

लकी रेस्टॉरंट :

लकी रेस्टॉरंट हे आजचे पाचगणीतील प्रसिद्ध रेस्टॉरंट असून ते सिटी पोस्टाजवळ ब्रिटिशकालीन इमारतीत इ. स. १९४२ मध्ये सुरू झाले. पाचगणीत इराणमधून येऊन स्थायिक झालेले मि. रूस्तम सोहाली यांनी पाचगणीत बहाई लोक स्थायिक व्हावेत व त्यांना एखाद्या उद्योगात गुंतवावे म्हणून पाचगणी येथे हे रेस्टॉरंट सुरू केले.[४२]

गुजरात लॉज :

सन १९४७ मध्ये पाचगण येथे वासुदेव बालाजी पुरोहित यांनी गुजरात लॉज नावाचे प्रथम छोटे लॉजिंग बोर्डींग चालू केले. या हॉटेलचे वैशिष्ट्य म्हणजे येथे उद्योगपती मा. बाबुभाई चानालाई, नीलकंठराव कल्याणी, राष्ट्रपिता महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल, पंडित मदन मोहन मालवीयजी, मा. यशवंतराव चव्हाण यांनी वास्तव्य केले.

५.४.३ पाचगणीतील हॉटेल व्यवसायाची सद्यस्थिती :

पाचगणी, महाबळेश्वरला येणाऱ्या पर्यटकांची संख्या १९८० च्या काळात वाढली. त्यामुळे या दोन्ही शहरांना निवास व्यवस्थेची खरी गरज १९८० नंतर निर्माण झाली. इ. स. २००५ नंतर पर्यटक हा केवळ ठराविक हंगामात न येता प्रत्येक आठवड्याच्या शेवटी

येऊ लागला. त्यामुळे बाराही महिने पर्यटकांची वर्दळ वाढली. त्यातून हॉटेल व्यवसायाने जोर धरला व आज या दोन शहरातील हॉटेल व्यवसाय हा अत्यंत भरभराटीला आलेला व्यवसाय ठरला आहे. आज पाचगणीमध्ये सर्व प्रकारची हॉटेल्स मिळून ३७ हॉटेल्स आहेत.[४३] त्यापैकी अत्यंत नावाजलेल्या व स्टार हॉटेल्सची संख्या २० आहे. त्यापैकी काही स्टार हॉटेल्सची नावे पुढीलप्रमाणे –

Four Star Hotel's : १) एव्हर गार्डन ए कीज रिसॉर्ट , २) समर प्लाझा रिसॉर्ट

Three Star Hotel's : १) दी धनहील्स २) हॉटेल रवीने ३) माऊंट व्हिव
४) सूर्या स्ट्रीट ५) लॉर्डस पाचगणी क्लब

Two Star Hotels : १) द सीग्रेचर २) हॉटेल टीपटॉप ३) क्लाऊड ग्रीन

One Star Hotel's : १) हॉटेल माऊँट व्युह हेरिटेज २) फाईव्ह हील्स रेसॉर्ट
३) हॉटेल वढाव इन रेसॉर्ट

पाचगणीतील हॉटेल्सची संख्या :

अ. क्र.	हॉटेल तपशिल	संख्या
१	हेरिटेज हॉटेल	०१
२	हेरिटेज रेस्टॉरंट	०१
३	स्टार हॉटेल्स	२०
४	इतर हॉटेल्स	०९
५	एम. टी. डी. सी.	०१
६	रेस्टॉरंट	०६
७	धर्मशाळा	०३
८	खाजगी बंगले	०९

संदर्भ :– पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद रेकॉर्ड.

Three Star Hotel

हॉटेल रवीने

हॉटेल्सची संख्या व निवासाची सोय

अ. क्र.	वर्ष	लॉज	रूमस्	पर्यटक
१	१९१४	०१	०४	१७
२	१९४२	०३	१०	४८
३	१९८०	०७	२२	८२
४	२०००	१६	२०४	५६४
५	२०१०	३७	२४३	७४७

संदर्भ :– पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद रेकॉर्ड.

पाचगणीत येणाऱ्या पर्यटकाची संख्या वर्षाला सरासरी ७ ते १० लाखांपर्यंत पोहचली आहे. दिवसाकाठी १५ ते २० हजार पर्यटक येथे भेट देतात. त्यामुळे या शहराची रोजची उलाढाल कोटीमध्ये आहे. पाचगणीच्या हॉटेल व्यवसायामुळे या शहराला खूप मोठा आर्थिक फायदा होतो. येणारे पर्यटक व हॉटेल कर व त्यावर आधारित इतर व्यवसायकराच्या रूपाने नगरपरिषदेला खूप मोठा फायदा होतो. त्यामुळे पाचणगी, महाबळेश्वरच्या नगरपालिका 'क' वर्ग नगरपालिका असल्या तरी या सातारा जिल्ह्यातील सर्वात श्रीमंत नगरपालिका म्हणून ओळखल्या जातात. पाचगणीत येणारा पर्यटक हा उद्योगपती, सिनेकलावंत व इतर क्षेत्रातील मोठी मंडळी असल्याने या सांस्कृतिक दृष्ट्याही महत्त्व प्राप्त झाले आहे.

५.५ पाचगणीतील पतपुरवठा करणाऱ्या संस्था :

आधुनिक काळात बँका या अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या आहेत. या बँका अर्थव्यवस्थेला गतिमान करीत असतात. या बँकामध्ये सहकारी बँकांचे योगदान मोलाचे आहे. ''पैशावर विश्वास ठेवण्यापेक्षा विश्वासावर पैसे ठेवित चला'' हा मुलमंत्र सहकारी बँकांचा आहे.[४४] त्यामुळे पाचगणीसारख्या अवघ्या दहा, बारा हजार लोकसंख्येच्या शहरात बँकेचे जाळे चांगल्या प्रकारे पसरले आहे. या शहराची लोकसंख्या कमी असली तरी या शहराला भेट देणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. शहरातील छोट्या मोठ्या व्यवहारासाठी पतपुरवठा करण्यासाठी, विदेशी विनिमय चलन उपलब्ध करून देण्यासाठी व लोकांना बचतीचा मंत्र देण्यासाठी या शहरात १९३५ च्या काळात बँकिंग व्यवसायाला सुरूवात झाली.

त्यानंतर या शहरात १९६६ पासून सहकारी बँका स्थापना झाल्या. १९९८ नंतर राष्ट्रीयकृत बँका येथे स्थापन झाल्या. शिवाय पतपेढ्याही निर्माण झाल्या आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात बँका निर्माण होण्याचे कारण म्हणजे पर्यटन हंगामात इथे रोजची उलाढाल दोन ते तीन कोटींची असते.

आज या शहरात तीन राष्ट्रीयीकृत बँका, आठ सहकारी बँका, तीन पतसंस्था इतक्या मोठ्या संख्येने पतपुरवठा करणाऱ्या संस्था उपलब्ध आहेत. त्यापैकी काही पतपुरवठा करणाऱ्या बँकांचा आढावा घेतला आहे.

राष्ट्रीयीकृत बँका – १) दि बँक ऑफ महाराष्ट्र, २) स्टेट बँक ऑफ इंडिया, ३) आय. डी. बी. आय. बँक

सहकारी बँका – १) दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि., २) मराठा सहकारी बँक, ३) भारती सहकारी बँक, ४)वाई अर्बन बँक, ५) जनसेवा सहकारी बँक, ६) पश्चिम महाराष्ट्र सहकारी बँक, ७) सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक.

पतसंस्था – १) कृष्णाई सहकारी पतसंस्था, २) संभाजी महाराज पतसंस्था, ३) घाटजाई पतसंस्था.

५.५.२ पाचगणीतील काही महत्त्वाच्या बँका व पतसंस्था :

➢ **दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी :**

स्थापना : – दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी ही पाचगणी शहरातील पहिली पतपुरवठा करणारी बँक होय. आज या शहरात अनेक बँकांचे जाळे पसरले असले तरी या बँकेने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी याची स्थापना स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजे दि. १६ मे १९३६ साली करण्यात आली होती. या बँकेचा नोंदणी क्र. ७५०० असा आहे. या बँकेचे घोषवाक्य ''एकमेका सहाय्य करू। अवघे धरून सुपंथ।।''[४५] या संस्थेची स्थापना कै. एस. एम. बाथा यांनी केली होती. त्यांनीच पाचगणीत बाथा हायस्कूलचीही स्थापना केली होती.

उद्देश : – सन १९१० नंतर पाचगणीतील लोकवस्ती वाढू लागली. ब्रिटिश अधिकाऱ्यांची सेवा करणारे सर्वसामान्य भारतीय नागरिक पाचगणीच्या आसपासच्या भागातूनही येथे कामासाठी येऊन स्थायिक होऊ लागला. अशा स्थानिक, सर्वसामान्य जनतेला आपली पैशाची गरज भागविण्यासाठी सावकाराकडून कर्ज काढावे लागे. ही सावकार मंडळी चक्रवाढ व्याजाने सर्वसामान्यांचे सर्वस्व लुटत असत. तेव्हा अशा गोरगरीब सामान्य जनतेला सावकराकडे जावे लागू नये म्हणून मानवतेच्या दृष्टीने एस. एम. बाथा यांनी दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी या संस्थेची स्थापना केली.

दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी या संबंधीची स्वातंत्र्यपूर्व काळातील कोणतेही रेकॉर्ड बँकेकडे नसल्याने १९३६ च्या काळातीली त्यांचा इतिहास, त्यावेळची सभासद संख्या, व्यवहार यासंबंधी कोणतीही माहिती उपलब्ध होत नाही. सध्या ही बँक केवळ पाचगणीतील एक ब्रिटिशकालीन बँक म्हणून ओळखली जाते. या बँकेने आधुनिक पद्धतीने कोणतेही रेकॉर्ड ठेवलेले नाही. संगणक प्रणाली सुद्धा बँकेत कार्यरत नाही. तसेच पाचगणीसारख्या ठिकाणी अनेक राष्ट्रीयकृत बँका व इतर को–ऑपरेटिव्ह बँकांनी उत्तम सेवा उपलब्ध करून दिल्याने या बँकेकडे फारसे ग्राहक फिरकतही नाहीत. त्यामुळे येथील भागभांडवल, ठेवी, कर्ज यामध्ये वाढ न होता घटच झालेली दिसते. या बँकेचे एक वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर अनेक सहकारी संस्था उदयास आल्या व बंदही पडल्या. अनेक सहकारी संस्था संस्थाचालकांनीच संपविल्या. अशा परिस्थितीत ही बँक मात्र अद्यापही सुस्थितीत चालू आहे.[४६]

सभासद संख्या :

अ. क्र.	वर्ष	सभासद संख्या
१	३१ मार्च २००७	१८७८
२	३१ मार्च २००८	१४७६
३	३१ मार्च २००९	१४९२
४	३१ मार्च २०१०	१५२०
५	३१ मार्च २०११	१५५४
६	३१ मार्च २०१२	१५९९

संदर्भ : बँक सभासद रेकॉर्ड

सभासद संख्या २००७ रोजी १८७८ होती तर तीच संख्या २००८ मध्ये १४७६ वर आली. यावरून केवळ एका वर्षात ४०२ सभासद कमी झालेले दिसतात. मात्र २००९ पासून पुन्हा ही सभासद संख्या वाढविण्याचा प्रयत्न संचालक मंडळाने केला आहे. त्यामुळे २०१२ रोजी सभासद संख्या १५९९ पर्यंत पोहचली आहे. तरीही २०११ च्या वर्षी असणाऱ्या सभदासदांपैकी १२ सभासद कमी झाले आहेत.[४७]

भाग भांडवल :[४८]

अ. क्र.	वर्ष	भाग भांडवल
१	३१ मार्च २००७	५,००,०००
२	३१ मार्च २००८	३,२०,०००
३	३१ मार्च २००९	३,४०,०००
४	३१ मार्च २०१०	३४,१८,५६०
५	३१ मार्च २०११	३६,७१,२०५
६	३१ मार्च २०१२	४०,२१,७०५

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु.५० लाख आहे.

संस्थेकडील ठेवी : ही बँक नावापुरती अस्तित्वात असली तरी येथील ठेवीत मात्र फरक पडलेला नाही.[४९]

अ. क्र.	वर्ष	ठेवी
१	२००९–१०	७२,८६,६३७
२	२०१०–११	१,६९,४१,८५१
३	२०११–१२	८८,६३,८०७

या संस्थेचे प्रत्येक वर्षी लेखा परीक्षण करून घेतले जाते. त्यामध्ये २०११–१२ मध्ये एस. एस. चौधरी (प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था, सातारा) यांनी केले आहे व लेखा परीक्षणाचा वर्ग 'ब' देण्यात आला आहे.

➢ **दि वाई अर्बन को–ऑप. बँक. लि. वाई :**

स्थापना :– सातारा जिल्ह्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात शेतकऱ्यांच्या मूलभूत आर्थिक गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या भागात कृषी पतसंस्था स्थापन झाल्या. त्यामध्ये सातारा जिल्ह्यात सर्वात प्रथम इ. स. १९०७ मध्ये पहिली कृषी पतसंस्था बोधे, ता. माण येथे स्थापन झाली.[५०] इ. स. १९२१ मध्ये वाई तालुका को–ऑप. क्रेडीट सोसायटीची स्थापना वाई येथे झाली. या पतसंस्थेचे संस्थापक खंडेराव वाकडे, चुनीलाल गांधी व कोंडो गणेश दामले यांनी केली.[५१] या पतसंस्थेची उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढल्याने अवघ्या दहा वर्षात म्हणजे इ. स. १९३१ मध्ये या पतसंस्थेचे रूपांतर वाई अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक या नागरी सहकारी बँकेत झाले.[५२]

अशा नागरी सहकारी बँकेची एक शाखा पाचगणी येथे इ. स. १९६६ मध्ये सुरू करण्यात आली.[५३] पाचगणीमध्ये अनेक शाळा असल्यासने या शाळांचे व्यवहार मोठ्या प्रमाणात चालतात. परंतु पाचगणी शहर तसे लोकसंख्येने छोटे शहर असल्यामुळे १९६० पर्यंत फार मोठे आर्थिक व्यवहार येथून होत नव्हते. त्यामुळे या काळात पाचगणीत दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी शिवाय इतर कोणत्याही मोठ्या बँका नव्हत्या.

अशा परिस्थितीत पाचगणी येथे दि वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई यांनी स्थानिक नागरिकांसाठी या बँकेची शाखा सुरू करण्याचा निर्णय घेतला.[५४] याचे मुख्य कार्यालय ५९१, गणपती आळी, वाई, जि. सातारा येथे आहे. या बँकेचा रजिस्ट्रेशन नं. ३४६९/०७ दि.०६/०८/१९३० आहे. या बँकेचे कार्यक्षेत्र सातारा, पुणे, सांगली, रायगड व रत्नागिरी येथे आहे. या बँकेच्या एकूण १७ शाखा आहेत.

बँकेतील सुविधा :– बँकिंग क्षेत्रात वाढत असणारा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व त्या अनुषंगाने बँकांनी ग्राहक सेवेत आणलेल्या वेगवेगळ्या नवनवीन सेवा या शाखेने पाचगणीत उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे ही बँक अल्पावधीत लोकप्रिय ठरली आहे. पाचगणी शाखेतील सभासद संख्या २००९–१० पर्यंत ८६० इतकी होती. या बँकेच्या गुंतवणुकीतही २०% वाढ झाली आहे.[५५]

सुविधा :

या बँकेने नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून संगणकीकरण, ज्येष्ठ नागरिक सुविधा कक्ष, एटीएम, एसएमएस सुविधा, विमा योजना, ज्ञानदा शैक्षणिक कर्ज योजना, घरकर्ज आदि सुविधा दिल्या जातात. त्याचबरोबर ग्राहक मेळावे, वैद्यकीय व्यावसायिकांसाठी धन्वंतरी योजना या वेगळ्या योजना राबविल्या आहेत. अशा प्रकारे या बँकेने अल्पावधीत अनेक सेवा पाचगणीकरांना उपलब्ध करून दिल्या आहेत. या बँकेच्या उत्कृष्ट कामकाजाचा आढावा बँक्स असोसिएशनने घेतला आहे. या बँकेच्या मुख्य शाखेला इ. स. २००८–०९ चा उत्कृष्ट कामकाजाबद्दल ''महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन, मुंबई'' यांच्या वतीने पश्चिम महाराष्ट्रातील प्रोत्साहनपर पुरस्कार मिळाला आहे.[५६]

त्यामुळे बँकिंग क्षेत्रात सातारा जिल्ह्यातील या बँकेचे स्थान महत्त्वाचे ठरले आहे. या बँकेला इ. स. २००८–०९ पासून लेखा परीक्षणात 'अ' वर्ग मिळाला आहे. अशा प्रकारे एक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी व 'जिथं जिव्हाळ्याला जोपासंल जाते' या ब्रीदवाक्याचे तंतोतंत पालन करणारी ही शाखा आहे.

➢ **युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा / आय. डी. बी. आय. बँक :**

सन १९६० च्या दशकात पाचगणी शहरातील व्यापारी, नागरिक, इंग्रजी शाळेतील विद्यार्थी व पर्यटक यांना आर्थिक व्यवहार बँकेच्या माध्यमातून करता यावा म्हणून पाचगणीत युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा या बँकेची एक शाखा सुरू करण्यात यावी यासाठी अरूण गोडबोले, ह. भ. प. कळंबे महाराज, भि. दा. भिलारे गुरूजी व इतर मंडळींनी प्रयत्न केला व त्याला यश आले.[५७] ही बँक सुरू होण्यापूर्वी पाचगणीत ब्रिटिशकालीन दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी ही एकमेव बँक होती. त्यामुळे पाचगणीतील आर्थिक व्यवहार हे पोस्टामार्फत चालत. ही अडचण दूर करण्यासाठी युनायटेड वेस्टर्न बँक लि. ही पुढे आली.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. ची स्थापना : – दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. या बँकेची एक शाखा पाचगणीमध्ये २६ जानेवारी १९६७ साली सुरू करण्यात आली.[५८] ही बँक पाचगणी

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शिवाजी चौकात सुरू झाली व ४० वर्षे याच शाखेतून या बँकेचे कामकाज चालत होते. इ. स. २००७ साली ही बँक नव्या जागेत स्थलांतरित झाली.

बँकेची शाखा सुरू करण्याचा उद्देश :– पाचगणी हे जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र असल्याने इथे सन १९६० पर्यंत प्रत्येक समाजाची एक शाळा स्थापन झाली होती. या शाळांची एकूण संख्या १८ होती. या खाजगी निवासी शाळांचे ऑडीट प्रत्येक वर्षी केले जाई. हे काम साताऱ्यातील सी. ए. अरूण गोडबोले करीत असत.[५९] हे ऑडीट करीत असताना त्यांच्या लक्षात एक गोष्ट आली की, पाचगणीत स्थानिक नागरिकांपेक्षा इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे व त्यांचे आर्थिक व्यवहारही मोठे आहेत. त्यामध्ये शालेय फी, होस्टेल फी व इतर फी यांचा समावेश होता. हा सर्व आर्थिक व्यवहार करण्यासाठी पाचगणीत मोठ्या बँकेची सोय नव्हती. हा सर्व व्यवहार पोस्टाच्या माध्यमातून चाले. अरूण गोडबोले यांनी ही बाब सातारा शहरातील युनायटेड वेस्टर्न बँकेच्या संचालकांच्या निदर्शनास आणून दिली.[६०] त्यानुसार संचालकांनी पाचगणीचा अभ्यास करून येथे एक आपली शाखा काढण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार सन १९६७ मध्ये पाचगणीत युनायटेड वेस्टर्न बँक लि. सुरू झाली.

युनायटेड वेस्टर्न बँक लि. शाखा पाचगणी :– युनायटेड वेस्टर्न बँक लि. ही सातारा जिल्ह्यातील एक अग्रगण्य व्यापारी बँक म्हणून ओळखली जात होती. असा नावलौकिक असलेल्या बँकेची एक शाखा पाचगणीत सुरू झाल्यामुळे इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक, स्थानिक व्यापारी यांना आपला आर्थिक व्यवहार करण्यास या बँकेमुळे मदत झाली. शिवाय खातेदारांची संख्या ७५० पर्यंत पोहोचली.[६१] या बँकेवरील विश्वासामुळे पाचगणीत ही बँक नावारूपाला आली. १९६७ साली बँकेचे मॅनेजर म्हणून बी. जी. शेठ यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत या बँकेत अनेक सोयी व योजना राबविल्या. पुढे हे बी. जी. शेठ आपल्या कर्तृत्वाने डी. आय. जी. पदापर्यंत पोहोचले.[६२] याच प्रकारचे अधिकारी पुढेही या बँकेला लाभल्यामुळे या बँकेतील सभासद संख्या व खातेदारांची संख्या वाढली. यामध्ये युरोपियन खातेदारांचाही समावेश आहे. या बँकेमुळे पाचगणीतील नागरिकांना संपूर्ण

भारतातून व्यवहार करणे सुलभ झाले. सध्या या बँकेत एक अधिकारी, एक ॲग्रीकल्चर ऑफीसर, ११ विविध खाती सांभाळणारे कर्मचारी व दोन सेवक आहेत.[६३]

युनायटेड वेस्टर्न बँक लि. चे रूपांतर आय. डी. बी. आय. या राष्ट्रीयकृत बँकेत :

युनायटेड वेस्टर्न बँक लि. ही खाजगी क्षेत्रातील एक व्यापारी बँक म्हणून १९३६ साली साताऱ्यात स्थापन झाली. त्यानंतर याच्या अनेक शाखा महाराष्ट्रात सुरू झाल्या. १९५६ मध्ये दि युनायटेड बँक ऑफ कोल्हापूर आणि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक विलीन झाल्या. १९७४ साली या बँकेने हिरक महोत्सवी वर्ष सादर केले.[६४] या बँकेतील तीन हजार कर्मचारी भारतीय मजदूर संघाचे सभासद होते. या बँकेचे भाग भांडवल, ठेवीदार व इतर सर्व आर्थिक व्यवहार सुरळीत सुरू असताना संचालकामध्ये असणाऱ्या दोन गटामुळे ही बँक अडचणीत आली. इ. स. २००१ पासून बँक आर्थिक दृष्ट्या तोट्यात येऊ लागली. त्यामध्ये २००४–०५ ते २००६–०७ या वर्षात या बँकेला आपली पत सांभाळता आली नाही. त्यामुळे जवळ–जवळ २१९ शाखा असणाऱ्या या बँकेला रिझर्व्ह बँकेने आय. डी. बी. आय. बँकेत १६ सप्टेंबर २००६ साली विलीन करून टाकले.[६५] तेव्हापासून युनायटेड वेस्टर्न बँक लि. चे रूपांतर आय. डी. बी. आय. बँकेत झाले. आज ही बँक आय. डी. बी. आय. राष्ट्रीयकृत बँक म्हणून ओळखली जाते.

बँकेच्या सुविधा :– या बँकेने १९६७ पासूनच पाचगणीच्या नागरिकांना अनेक सुविधा निर्माण करून दिल्या होत्या. त्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांना बँकेमार्फत शालेय फी जमा करणे, संपूर्ण भारतातून शालेय विद्यार्थ्यांच्या खात्यावर त्यांच्या पालकांनी पैसे जमा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. अलिकडे इंटरनेटच्या माध्यमातून हे काम सुलभ झाले आहे. परंतु १९८० च्या दशकात ही सोय या बँकेने उपलब्ध करून दिली होती. आज पाचगणीकरांना ही बँक महत्त्वाची ठरली आहे.

बँकेचे इतर कार्य : – या बँकेने सरकारी योजनांतर्गत सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांना ज्या–ज्या सवलतींच्या दराने कर्जपुरवठा करणाऱ्या योजना आहेत. त्या उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

१) पाचगणीच्या परिसरातील खिंगर, आम्रळ, गोडवली व राजपूरी ही गावे दत्तक घेतली आहेत. तसेच या गावातील शेतकऱ्यांना कृषी कर्जांतर्गत गाई खरेदी करणे, ताल बांधणे, पीक कर्जाचे वाटप केले आहे. पंतप्रधान रोजगार योजने अंतर्गत ही सर्व कर्जे दिली जातात.

२) ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत कापड व्यवसाय, सुशिक्षित बेकार व छोट्या व्यवसायासाठी कर्जपुरवठा केला जातो.

३) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पाठ्यपुस्तके, गणवेश यांचे वापट करून त्यांच्या शिक्षणाला मदत केली जाते. यासाठी या बँकेतील सर्वात सिनिअर ऑफिसर दत्तात्रय महाडीक यांचे योगदान मोलाचे आहे. ते या बँकेत १९८१ पासून कार्यरत आहेत व युनायटेड वेस्टर्न बँकेचे आय. डी. बी. आय. बँकेत रूपांतर होतानाचे साक्षीदार आहे.[६६]

या बँकेला सर्वात जास्त फायदा हा पाचगणीतील शाळांमुळे होतो. पाचगणीतील सात शाळांचे व्यवहारही या बँकेमार्फत चालतात. शिवाय पंचतारांकित हॉटेल्सचे व्यवहार इथून चालतात. १९६७ ते १९८० च्या काळात न्यू इरा हायस्कूलमधील इराणी लोकांची बँक खाती इथे होती. त्यानंतर युरोपियन किंवा अन्य देशातील लोकांची बँक खाती नाहीत. आज या बँकेमार्फत कोअर बँकिंगची सोय आहे. सर्वात पहिली ए. टी. एम. ची सुविधा याच बँकेने पाचगणीत सुरू केली. ई–बँकिंगच्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत. परकीय चलन भारतीय रुपयात परिवर्तन करण्याची सुविधा या बँकेत आहे. अशा प्रकारे पूर्वीची युनायटेड वेस्टर्न बँक आजची आय. डी. बी. आय. बँकेमुळे पाचगणीच्या आर्थिक व्यवहाराला एक नवा आयाम मिळाला आहे.

➢ **दि जावली सहकारी बँक लि. मुंबई :**

मुंबईतील नागरी सहकारी बँकात आघाडीवर असणारी दि जावली सहकारी बँक लि. मुंबई ही अनेक कष्टकरी कामगार वर्गाची, उद्योजकांची कामधेनू व समर्थ अर्थव्यवस्था म्हणून उभी आहे.

स्थापना :– जावली भागाचे भाग्यविधाते ह. भ. प. दत्तात्रय महाराज कळंबे यांनी प्रथम १९५५ साली जावली सहकारी पतपेढी सुरू केली.[६७] त्यानंतर जावली तालुक्याचा सर्वांगिण विकास होण्यासाठी प्रथम आर्थिक विकास होणे गरजेचे आहे हे ओळखून सहकारी तत्वावर बँक सुरू करण्याचा निर्णय घेतला व आवश्यक ते भागभांडवल जमा करून १९ जुलै १९७३ रोजी दि जावली सहकारी बँक लि. शासनाकडे रजिस्टर केली.[६८] बँकेचे कायदेशीर नोंदणीपत्र नं. BOM/BNK/१२७/१९७३ मिळाले. ही बँक प्रथम सॅम्युल स्ट्रीट, मस्जिद बंदर, मांडवी चेंबर्समधील तिसऱ्या मजल्यावरील जागा दरमहा १०० रुपये भाड्याच्या खोलीत सुरू केली. त्यानंतर या बँकेचा शाखा विस्तार वाढत गेला. त्यापैकी एक शाखा भि. दा. भिलारे गुरूजींनी व स्थानिक नेत्यांनी पाचगणीत सुरू करावी यासाठी प्रयत्न केले. त्यानुसार १९९८ साली ही शाखा सुरू झाली.[६८]

उद्देश :– सातारा जिल्ह्यातील जावळी खोरे, कुडाळ खोरे, महाबळेश्वर, वाई तालुक्यात डोंगराळ भागात शेतीचे उत्पादन चरितार्थ चालविण्यापुरतेही होत नाही. त्यामुळे या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील घरटी एक माणूस कामधंद्याच्या निमित्ताने मुंबईत जातो. तिथे मिळेल ते काम करून अत्यंत काटकसरीचे जीवन जगत गावाकडे पैसे पाठवित. परंतु तुटपूंज्या उत्पन्नामुळे गावाकडील यात्रा, लग्नकार्य व इतर कामासाठी या कामगारांना मारवाडी, पठाणी, खाजगी सावकार यांच्याकडून कर्ज काढावे लागे. या कर्जाला १ रुपयाला १ महिन्याला २ आणा म्हणजे द. शा. द. शे. ७५ रुपये दराने कर्जाची परतफेड करावी लागे. अशा सावकारी पाशातून कामगारांना मुक्त करण्यासाठी कळंबे महाराजांनी बँक काढण्याचा निर्णय घेतला.[७०]

बँक निर्मितीचा इतिहास :– जावली भागातील जे लोक उदरनिर्वाहासाठी मुंबईत येऊन रहात होते त्या लोकांनी आपली आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी फंड सिस्टीम सुरू केली. या फंडातून अडचणीच्या वेळी एकमेकाला मदत होऊ लागली. हळूहळू यामध्ये समाविष्ट लोकांची संख्या व फंडाची रक्कम मोठ्या प्रमाणावर वाढली व त्याला सार्वजनिक रूप प्राप्त झाले. त्यातून एक बँक काढण्याचा विचार पुढे आला. या विचाराला मूर्त स्वरूप दिले ते ह. भ. प.

दत्तात्रय कळंबे महाराज यांनी.[७१] या सहकारी बँकेसाठी कळंबे महाराज व त्यांचे सहकारी भि. दा. भिलारे गुरूजी, नामदेवराव कदम, श्री. काकासाहेब थोरात, गुलाबराव खोपडे व इतर कार्यकर्त्यांच्या मदतीने भाग भांडवल गोळा केले. यांनी एका महिन्यात १२०० लोकांकडून एक लाख पंचवीस हजार रुपये जमा केले. परंतु हा पैसा व्यापारी, उद्योगपती यांच्याकडून जमा न करता जावली, वाई, कोरेगांव, महाबळेश्वर या भागातील सर्वसामान्य जनतेकडून गोळा केला. त्यानुसार या बँकेचे सभासद हे कष्टकरी कामगार वर्गच बनला. अशा प्रकारे जावली बँक मुंबईत सुरू केली तरी या बँकेच्या अर्थपुरवठ्याच्या नाड्या जावली, महाबळेश्वर तालुक्याच्या दऱ्याखोऱ्यापर्यंत पोहोचविल्या.

दि जावली सहकारी बँक लि. पाचगणी शाखा :

या बँकेची एक शाखा जावली खोऱ्यात असावी असे कळंबे महाराजांना वाटत होते. त्यातूनच जावली बॅकेच्या रौप्य महोत्सवी वर्षातच म्हणजे ०२ आक्टोबर १९९८ साली पाचगणी येथे शाखा सुरू केली.[७२] ही शाखा महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी या शहरात काढण्याचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे पाचगणीला महाबळेश्वर तालुका, जावळी खोऱ्यातील कामासाठी येणाऱ्या कामगारांची संख्या जास्त असल्याने या कामगारांना बचत करण्यासाठी व त्यांना गरज पडेल तिथे कर्ज उपलब्ध करून देणे तसेच होतकरू गरीब उद्योजकांना, छोट्या व्यावसायिकांना सहज आर्थिक मदत उपलब्ध व्हावी यासाठी ही शाखा काढली. कळंबे महाराजांनी सर्वसाधारण माणूस हा देशाच्या एकूण व्यवस्थेतील सर्वात महत्त्वाचा घटक, आधारस्तंभ आहे. अशा माणसांच्या समस्यांची सोडवणूक करण्याठी जावळी बँकेचा विस्तार महाबळेश्वर तालुक्यात केला आहे. त्यामुळे या बँकेच्या माध्यमातून दुर्गम, डोंगराळ, भौगोलिकदृष्ट्या निसर्गसंपन्न प्रदेशातील कष्टकरी वर्गाला दिलासा दिला आहे.

बँकेचा विस्तार :

या बँकेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे, सातारा, पुणे आणि रायगड जिल्हा येथे आहे. या बँकेच्या सातारा जिल्ह्यात पाचगणी,मेढा व सातारा येथे शाखा आहेत. या सर्व शाखेतून अत्याधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध आहेत.

पाचगणी शाखेचे भाग भांडवल :

पाचगणी शाखा ही १९९८ साली सुरू झाली. तरी या बँकेने अवघ्या पंधरा वर्षात आपल्या शाखेचे भाग भांडवल ७८,४४,७५० इतके वाढविले आहे.

सभासद संख्या :

अ. क्र.	वर्ष	सभासद संख्या
१	२००५–०६	३३,७३०
२	२००६–०७	३४,५५८
३	२००७–०८	३५,५४२
४	२००८–०९	३६,५०७
५	२००९–१०	३७,६२६

संदर्भ : दि जावली सहकारी बँक लि. पाचगणी सभासद नोंदणी रेकॉर्ड

गुंतवणूक :[७३]

अ. क्र.	वर्ष	जमा रक्कम
१	२००५–०६	९,२३३.७२
२	२००६–०७	९,८४८.२४
३	२००७–०८	१०,०२४.१२
४	२००८–०९	९,९९८.५१
५	२००९–१०	११,८५६४.५८

संदर्भ : दि जावली सहकारी बँक लि. पाचगणी अहवाल २००५–०६ ते २००९–१०

या बँकेतर्फे सभासद व कर्मचारी वर्गाच्या पाल्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते. तसेच पाचगणी शाखेस २००१–०२ या सालाचे सर्वोत्कृष्ट शाखा पुरस्कार प्राप्त झाला आहे. या बँकेचे एक वैशिष्ट्य म्हणजे या बँकेचे संस्थापक ह. भ. प. दत्तात्रय कळंबे महाराज स्वत: रोज येऊन या बँकेच्या कामकाजाकडे लक्ष देत असत. त्यामुळे पाचगणीतील अनेक बँका या काळात सुरू झालेल्या असताना महाराजांच्या श्रद्धेखातर हजारो लोक या शाखेचे सभासद झाले.

बँकेचे नामांतर :– इ. स. १९७३ ते २००४ पर्यंत ही बँक जावली सहकारी बँक म्हणूनच ओळखली जात होती. परंतु या बँकेचे आधारस्तंभ, ज्यांनी ही बँक सुरू केली ते या बँकेचे संस्थापक, संचालक व जावली खोऱ्यातील दैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे यांच्या निधनानंतर या बँकेचे सभासद, खातेदार, हितचिंतक व ग्रामस्थ यांनी बँकेचे नामकरण 'दत्तात्रय महाराज कळंबे, जावली सहकारी बँक लि.' असे करण्याचा निर्णय इ. स. २००५ मध्ये घेतला व तेव्हापासून ही बँक ''दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.'' या नावाने ओळखली जावू लागली आहे.[७४]

➢ **भारती सहकारी बँक लि. पुणे – ३० मल्टीस्टेट – शेड्युल्ड बँक**

पाचगणी या शहरात भारती बँकेची ११ वी शाखा हनुमान रोड, पाचगणी येथे स्वतःच्या इमारतीत १६ डिसेंबर २००१ मध्ये सुरू झाली.[७५] या शाखेचे खातेदार संख्या सहा हजार इतकी आहे. या बँकेचे सध्याचे ब्रँच मॅनेजर श्री. बबन बी. गवळी हे असून या बँकेत एक अधिकारी, दोन क्लार्क व एक शिपाई अशी संख्या आहे. या बँकेत इतर सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

भारती सहकारी बँक लि. पुणे या बँकेची स्थापना मा. आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी ८ सप्टेंबर १९७१ रोजी प्रथम पुण्यामध्ये डेक्कन कॉर्नर चौक, भारती भवन येथे सुरू केली. त्यानंतर त्यांच्या अन्यत्र शाखा निघालेल्या आहेत. या बँकेचे मुख्य कार्यालय भारती विद्यापीठ भवन, १ ला मजला, १३ सदाशिव पेठ, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे येथे आहे. या बँकेचा नोंदणी क्रमांक PNA/BNK/१८७/ दि.०८/०९/१९७१ असा आहे. या बँकेचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, रायगड, ठाणे, नवी मुंबई व नवी दिल्ली येथे आहेत.

पाचगणी शाखा काढण्याचा हेतू :

पाचगणीत भारती विद्यापीठाच्या दोन शाळा आहेत. एक मराठी व दुसरी इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा तर एक ज्युनिअर सायन्स कॉलेज आहे. त्यामुळे या शाळेत शिकणारे विद्यार्थी व शाळेत काम करणारे अधिकारी वर्ग, शिक्षक, कर्मचारी वर्ग यांचे पगार

तसेच विविध प्रकारची फी, या स्वरूपात मोठा आर्थिक व्यवहार होतो. त्यामुळे या शैक्षणिक शाखेसाठी ही बँक पाचगणीत काढण्यात आली. याशिवाय स्थानिक नागरिकांनाही याचा लाभ मिळतो. भारती सहकारी बँक लि. पुणे (मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँक) या बँकेचा ऑडीट वर्ग हा इ. स. २००२ ते २००३ पर्यंत 'ए' होता. परंतु २००३ पासून ऑडीट क्लास संबंधी अहवालात असे म्हटले आहे की, Being Multi-state scheduled co-operative Bank not applicable. २०१०-११ या अहवालात तरीही २०११-१२ च्या अहवालात इ. स. २००० ते २०११-१२ या सर्व वर्षी 'ए' वर्ग ऑडीट मिळाला आहे.[७६] अशा प्रकारे पाचगणीच्या बँकिंग क्षेत्रात भारती बँकेने आपले नाव मोठे केले आहे.

श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पाचगणी :

पाचगणीमध्ये अनेक राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका असताना पाचगणी आणि परिसरातील शेतकरी, छोटे व्यावसायिक, सर्वसामान्य नागरिक यांना सहजतेने कर्ज उपलब्ध व्हावे. सरकारी बँकातील अटींची पूर्तता करताना सर्वसामान्य नागरिकांना ज्या अडचणी येतात त्या येऊ न देता व्यवहार करता यावा या उद्देशाने पाचगणीचे माजी नगराध्यक्ष नानासाहेब कासुर्डे यांच्या प्रयत्नामुळे श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पाचगणी या पतसंस्थेची स्थापना दि. १८ एप्रिल २००६ रोजी करण्यात आली.[७७]

श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्थेचे स्वतंत्र कामकाज :

श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था ही पूर्वी पद्मभूषण वसंतदादा पतसंस्था सातारा या पतपेढीची एक शाखा होती. ही पतपेढी तोट्यात चालल्याने ठेवीदार, सभासद हे अडचणीत आले होते. अशा परिस्थितीत पाचगणीसारख्या दुर्गम भागात राहणाऱ्या कष्टकरी जनतेला त्यांनी काडी-काडी गोळा करून ठेवलेली पुंजी सुरक्षित परत मिळावी या हेतूने वसंतदादा पतसंस्थेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला व श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था या नावाने स्वतंत्र पतसंस्था पाचगणीत सुरू केली.[७८]

पतसंस्थेच्या उभारणीला संचालकांची मदत :

तोट्यात चाललेल्या पतपेढीतून बाहेर पडून स्वतंत्र नव्याने अस्तित्व निर्माण करणे तसे खूप कठीण असताना अवघ्या एका वर्षात या पतसंस्थेच्या संचालकांनी अत्यंत

काटकसरीने कोणतेही मानधन, भत्ता न घेता काम केले. तसेच या पतसंस्थेतील दैनंदिन धनलक्ष्मी गोळा करणाऱ्या प्रतिनिधींनी स्वत:हून एक टक्का कमी कमिशन घेऊन या पतसंस्थेला मदत केली.[७९] त्यामुळे या पतसंस्थेला पहिल्याच वर्षी स्वत:ची जागा मिळविता आली व सुरळीत कामकाज सुरू झाले. तसेच सभासद संख्या व भागभांडवल यातही वाढ झाली ती खालील संख्येवरून लक्षात येते.

सभासद संख्या :

अ. क्र.	वर्ष	सभासद संख्या
१	१८/०४/२००६	४५२
२	२००६–०७	४७६
३	२००७–०८	५११
४	२००८–०९	५२९
५	२००९–१०	५४८
६	२०१०–११	६२४
७	२०११–१२	७३५

संदर्भ :श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था सभासद रजिस्टर.[८०]

पतसंस्थेचे भाग भांडवल :

अ. क्र.	वर्ष	तपशिल	जमा रक्कम
१		अधिकृत भाग भांडवल	१०,००,०००
२	२००६–०७	वसुल भाग भांडवल	८,७३,६५०
३	२००७–०८	वसुल भाग भांडवल	११,१८,६५०
४	२००८–०९	वसुल भाग भांडवल	१२,०८,७५०
५	२००९–१०	वसुल भाग भांडवल	१५,०९,८३०
६	२०१०–११	वसुल भाग भांडवल	१६,१२,२२८
७	२०११–१२	वसुल भाग भांडवल	१८,१६,८२४

संदर्भ : श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था, वार्षिक अहवाल २००६–०७ ते २०११–१२[८१]



एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

दि पांचगणी को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., पांचगणी

ता. महाबळेश्वर जि. सातारा

फोन नं. २४०८३६

नोंदणी क्रमांक ७५०० दिनांक : १६-५-१९३६

॥ घाटजाई प्रसन्न ॥

७६ वा वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रक

सन २०११-२०१२

1



॥ श्री घाटजाईप्रसन्न ॥

श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पांचगणी.

ता. महाबळेश्वर जि. सातारा

फोन नं. (०२१६८) २४२१९३ , २४०३७४

R. No. SAT / MWR /RSR (CR)-699-06-07-Dt.18-4-06

॥ दिव्यत्वाची जेथे प्रचिती । तेथे कर आमचे जुळती ॥

॥ सद् विचार, खरा सहकार, मोठा उध्दार ॥

१ ला वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रक

सन २००६-२००७

1

पतसंस्थेतील उपलब्ध सोयी :

श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था ही लहान असली तरी या पतसंस्थेत विविध ठेव योजना व त्याला आकर्षक व्याजदर दिले जातात. याशिवाय इथे दामदुप्पट ठेव योजना, रिकरिंग ठेव योजना, सेव्हिंग ठेव योजना, धनलक्ष्मी ठेव योजना, पेन्शन ठेव योजना, सोने तारण कर्ज योजना, लखपती ठेव योजना, अशा विविध योजना उपलब्ध असल्याने[८२] सर्वसामान्यांना वरील सर्व योजनेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

इ. स. २००६–०७ साली सुररू झालेल्या या पतसंस्थेने आपले कार्यक्षेत्र केवळ महाबळेश्वर एवढे मर्यादित ठेऊन गेल्या पाच ते सात वर्षात आर्थिक क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. 'सदा विचार खरा सहकार, मोठा उद्धार' हा विचार घेऊन[८३] या पतसंस्थेच्या संचालकांनी शेतकरी, छोटे व्यावसायिक, सर्वसामान्य नागरिक यांच्या सर्वांगिण विकासासाठी स्वत: कोणतेही मानधन न घेता केवळ समाजसेवा म्हणून काम करतात. त्यामुळे केवळ पाच वर्षात पतसंस्थेच्या सभासदांना ४% लाभांश देण्याइतकी प्रगती या संस्थेने केली आहे. सहकार खात्याने २००५–०६ या आर्थिक वर्षापासून पतसंस्थांसाठी एन. पी. ए. लागू केल्यामुळे पतसंस्थेतील हप्ते भरले जाऊ लागले. त्यामुळे जप्ती, दंड, लिलाव यासारख्या गोष्टींना नियंत्रण ठेवण्यात या पतसंस्थेला यश आल्याने अगदी कमी कालावधीत ऑडीट वर्ग 'अ' मिळाला आहे व त्यामध्ये सातत्य राखले आहे.[८४] त्यामुळे पाचगणी शहरातील एक नामांकित पतसंस्था म्हणून ही संस्था ओळखली जाते. पाचगणी येथे वित्त पुरवठा करणाऱ्या या संस्था काही खास उद्देशाने व वेगवेगळ्या सामाजिक घटकासाठी निर्माण झाल्या व शहरातील नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

५.६ पाचगणी टॅक्सी व्यावसायिक संघटना :

Panchgani Proper Taxi Business Men's Association Panchagani

आधुनिक काळात वाहतूक व्यवस्था व व्यवसायाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यातच एखाद्या शहराच्या ठिकाणी विशेषत: पर्यटन स्थळी वाहतूक व्यवस्थेला फार महत्त्व असते. कारण लांबून येणाऱ्या पर्यटकाला स्टेशनवर उतरल्यानंतर इच्छूक स्थळी साहित्यासह

पोहचणे, पर्यटन स्थळांना भेटी देणे यासाठी त्या शहरातील सरकारी वा खाजगी वाहनांची गरज असते. याच गरजेतून पाचगणीत टॅक्सी संघटनेची स्थापना झाली. पाचगणी हे पर्यटन स्थळ शिवाय जागतिक दर्जाचे शैक्षणिक केंद्र असल्यामुळे आपल्या मुलांना भेटण्यास येणाऱ्या पालकांची, मित्रमंडळींची वर्दळ असते. त्यांनाही या खाजगी वाहनांची गरज लागते.

टॅक्सी व्यवसायाची सुरूवात :

पाचगणीत १८५४ साली जॉन चेसन आला व युरोपियनांची वसाहत हळूहळू वाढत गेली. शहरातील वर्दळ वाढली परंतु या काळात प्रवास हा घोड्यावरून किंवा घोडागाडी यामधून हे युरोपियन करत. पाचगणीत मोटार प्रथम नेमकी कधी आली हे सांगता येत नाही. परंतु १९३० ते १९४० या दरम्यान मोटर वाहतुकीला सुरूवात झाली असावी असे म्हटले जाते. त्यामुळे याच काळात टॅक्सी व्यवसायालाही सुरूवात झाली असे म्हणतात. या काळात केवळ दोन जुन्या ब्रिटिशांच्या गाड्या होत्या.[८५] त्या गाड्यांच्या माध्यमातून पाचगणी, महाबळेश्वर व पाचगणी ते वाठार स्टेशन अशी प्रवासी वाहतूक सुरू झाली. टॅक्सी वाहतुकीला सुरूवात झाली ती म्हणजे १९४० च्या दरम्यान कारण या काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अनेक नेते मंडळी पाचगणीला विश्रांतीसाठी येत असत. त्यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, खान अब्दुल गफार खान, पंडीत नेहरू, सरोजिनी नायडू इ. त्यांच्यासोबत इतर मंडळीही असत. या लोकांसाठी टॅक्सी लागत असे.[८६] असे पाचगणीतील स्वातंत्र्यसैनिक राजपुरोहित ज्यांनी म. गांधीजींची सेवा केली ते सांगतात.

पाचगणीतून टॅक्सी व्यवसाय म्हणूनही संघटना पुढे आली ती १९८० च्या काळात.[८७] याच काळात पाचगणी, महाबळेश्वरला येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली. या काळात येणारा पर्यटक दोन ते तीन दिवसासाठी थांबत असे व संपूर्ण पाचगणी, महाबळेश्वर, प्रतापगड पर्यंत फिरण्यासाठी टॅक्सीचा वापर करीत असत. त्यामुळे टॅक्सी व्यवसायाला हे दिवस चांगले होते.

टॅक्सी युनियनची स्थापना :

इ. स. १९८२ साली पाचगणीतील टॅक्सी चालक व मालक यांनी एकत्र येऊन टॅक्सी संघटना तयार केली व त्याला नाव दिले, 'पाचगणी टॅक्सी युनियन'.[८८] नंतर या संघटनेला

आर. टी. ओ. ची कायदेशीर मान्यता घेतली ती दि. १६ ऑगस्ट २००६ मध्ये व त्याला नाव दिले 'Panchgani Proper Taxi Business Men's Association Panchgani'. त्यामुळे ही टॅक्सी संघटना Govt. Recog. Union and RTO Approval असणारी आहे. त्याचा Reg. No. ३७२९ असा आहे.[८९] सध्या या संघटनेची सभासद संख्या ७२ इतकी आहे. ही संघटना कोणत्याही एका विशिष्ट वर्गाची नाही. यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक सभासद आहेत.

टॅक्सी संघटनेच्या गाड्या :

पाचगणीतील टॅक्सी संघटना ही ब्रिटिशकालीन आहे. त्यामुळे या काळात गाड्याही ब्रिटिश अधिकारी वापरत त्याच पद्धतीच्या होत्या. यामध्ये सर्वात आवडती व जास्त चालणारी The Scarlet Car ही गाडी होती.[९०] याशिवाय टॉज, ॲम्बेसिडर, क्लायमेट, स्कोडा, डिसोटा, फोर्ड ह्या जुन्या पद्धतीच्या युरोपीयन गाड्या या रस्त्यावर धावत असत. वाई ते महाबळेश्वर चालणारी स्टेशन व्हेगन ही गाडी प्रसिद्ध (१९६९ साल) होती. त्यालाच Estate Wagon असेही म्हटले जाई. इ. स. २००० नंतर टॅक्सीमध्ये अनेक नवनव्या गाड्या दाखल झालेल्या दिसतात. कारण सध्याचा पर्यटक हा चोखंदळ, लक्झुरियससाठी आग्रह धरणारा असल्याने आधुनिक महागड्या गाड्यांचा वापर केला जातो. इ. स. २००९ पर्यंत हा व्यवसाय ठराविक हंगामापुरता चालणारा व्यवसाय होता. दिवाळीच्या सुट्ट्या – ऑक्टोबर मधील १५ दिवस. ख्रिसमस–नाताळ सुट्टी – डिसेंबर १० दिवस. उन्हाळी सुट्टी – एप्रिल व मे ६० दिवस.[९१]

या कालावधीतच याचा चांगला व्यवसाय चालत असे. उरलेल्या वेळी या टॅक्सी चालकांना दुसरा व्यवसाय शोधावा लागे. अलीकडे पुणे, मुंबईतील नोकरदार वर्ग आठवडाभर काम करून आठवड्याच्या शेवटी दोन दिवस विश्रांतीसाठी पाचगणी, महाबळेश्वरला येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली आहे. तसेच पावसाळा, उन्हाळा, हिवाळा या तीनही ऋतुमध्ये पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे टॅक्सी चालकांना वर्षभर व्यवसाय उपलब्ध झाला आहे. आधुनिकतेचा एक फटका टॅक्सी व्यवसायिकांना बसला आहे. तो म्हणजे जवळचा

पर्यटक स्वत:चे वाहन आणत असलत्याने टॅक्सीचा वापर करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. तरीही हा व्यवसाय सध्या वर्षभर चालतो. पाचगणी महाबळेश्वरमध्ये टॅक्सी व्यवसाय चालण्याचे आणखी एक कारण म्हणजे इथे ॲटो रिक्षांना परवानगी नाही. अशा प्रकारे ब्रिटीश काळापासून चालत आलेला टॅक्सी व्यवसाय आजच्या आधुनिकतेच्या सोयीसुविधा व स्वत:ची मोटार असणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली असली तरी हा व्यवसाय टिकून आहे.

टॅक्सी संघटनेचे उपक्रम :

पाचगणी टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष २०११–१२ मध्ये सुनिल दगडू पार्टे हे आहेत.[९२] त्यांचे गाव तायघाट हे आहे. ते स्वत: ग्रामपंचायत सदस्य आहेत. या संघटनेमार्फत एस. टी. स्टँडवर साईबाबा मंदिर बांधले आहे. इथे मकर संक्रांतीला महापूजा व अन्नदान कार्यक्रम असतो. संघटनेतर्फे गरजू, गरीब विद्यार्थ्यांना पुस्तक, वह्या वाटप, गरीब रूग्णांना मोफत सेवा, अडचणीत असणाऱ्या पर्यटकांना मदत इ. सामाजिक कामेही या संघटनेकडून केली जातात. तसेच या व्यवसायात प्रामाणिकपणा व विश्वास याला फार महत्त्व आहे. यामध्ये येणाऱ्या पर्यटकांना योग्य मार्गदर्शन करणे, त्यांना त्यांच्या इच्छित स्थळी सोडणे, पर्यटकांची एखादी वस्तू गाडीत राहिली असेल तर ती वस्तू टॅक्सी संघटनेच्या ऑफीसमध्ये जमा करणे व त्या पर्यटकाला ती पोहच करणे. एखाद्याला आर्थिक अडचण असेल तर ती सोडविणे. यामुळे या टॅक्सी व्यवसायिकांचा पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेतर्फे २६ जानेवारीला सत्कार केला जातो. पर्यटकांच्यामुळे टॅक्सी चालकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे त्यांच्या प्रामाणिक व्यवसायामुळे ब्रिटीश काळापासून ते आजतागायत हा व्यवसाय उत्तम चालला आहे.



पाचगणीतील चना (फुटाणा) व्यवसायिक

५.७ पाचगणीतील इतर व्यवसाय :

चना (फुटाणा) व्यवसाय :

पाचगणी येथे १९ व्या शतकापासून लोकांची वर्दळ वाढली असली तरी पर्यटकांच्या पसंतीनुसार काही उद्योग २० व्या शतकात सुरू झाले. त्यापैकीचा चना उद्योग मात्र स्वातंत्र्यानंतर म्हणजे सन १९७० च्या काळात सुरूवात झाली.[९३] कारण भारतीय पर्यटक याच काळात खऱ्या अर्थाने पर्यटनासाठी बाहेर पडू लागला. पश्चिम महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढू लागली. तसे येथील काही व्यवसायही सुरू झाले. त्यापैकीच एक व्यवसाय म्हणजे चना तयार करणे व विक्री व्यवसाय होय. या व्यवसायाची सुरूवात करणारे पहिले व्यापारी विठ्ठल मारूती परदेशी होय.[९४]

चना व्यवसायात वाढ :

चना ही थंड हवेच्या ठिकाणी शरीराला उब मिळविण्यासाठी व शक्ती मिळविण्यासाठी, खाण्यासाठी वापरले जात असले तरी त्याचा उपयोग इतर भागातही सर्दी, खोकला, डायबेटीस पेशंटसाठीही केला जातो. त्यामुळे चना हा सर्व ठिकाणाच्या बाजारात दिसतो. परंतु पाचगणी, महाबळेश्वरच्या चन्याची चव ही वेगळी असल्याने येथील भाजलेल्या चन्याला प्रचंड मागणी आहे. हा माल पुणे, मुंबईला पाठविला जातो. त्याशिवाय आज हा माल परदेशातही मोठ्या प्रमाणात जातो. त्यामुळे स्थानिक बाजारपेठत या मालाची उलाढाल दोन अडीच लाखाची असते. तर संपूर्ण मालाची वार्षिक उलाढाल १५ ते १६ लाख इतकी असते.

पाचगणी : चना व्यवसाय

चना व्यवसाय व्यापारी संख्या	०३
दिवसाची उलाढाल	२० ते २४,००० रुपये
महिन्याची उलाढाल	२ ते २.५० लाख रुपये
वार्षिक उलाढाल	१५ ते १६ लाख रुपये
क्षेत्र	महाराष्ट्रातील सर्व पर्यटन स्थळे, गुजरात, पंजाब, इंग्लंड, इराण इ. देशात.

संदर्भ : पाचगणी, महाबळेश्वर चना व्यवसाय संघटना.[९५]

१) **चिक्की व्यवसाय :**

पाचगणीतील चिक्की व्यवसायाने संपूर्ण महाराष्ट्राची बाजारपेठ काबीज केली आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक पर्यटनस्थळी पाचगणी, महाबळेश्वरच्या चिक्कीला मोठी मागणी आहे. खरे तर चिक्की तयार करण्यासाठी लागणारे शेंगदाणे, गूळ, डाळ, खोबरे, काजू, बदाम हे घटक आवश्यक असताना यातील एकही घटक येथे पिकत नाही. तरीही ही चिक्की येथे तयार होते. त्याला एकच कारण म्हणजे इथले हवामान होय.[९६] पाचगणीत चिक्की उद्योगाची उलाढाल ही वार्षिक दोन ते अडीच कोटीची आहे. आज चिक्की ही केवळ शेंगदाण्यापासून न बनविता काजू, बदाम, तीळ, चॉकलेट, डाळ इ. घटकापासूनही बनविली जाते. पाचगणीत चिक्की व्यवसायात धनंजय चना सेंटरचे मालक विठ्ठल मारूती परदेशी हे आघाडीवर आहेत. हा व्यवसाय पूर्ण मानवी कौशल्यावर अवलंबून आहे.

२) **आकर्षक काठी उद्योग :**

पाचगणी येथे 'आकर्षक नक्षीदार काठी' मोठे आकर्षण असते. ती घरातील शोभिवंत वस्तू म्हणून आठवण म्हणून विशेषत्वाने खरेदी करण्याची प्रथा आहे. ही काठी पांढरीच्या लाकडापासून तयार केली जाते. या काठी उद्योगाची सुरूवात सन १९६० मध्ये झाली.[९७] या काळात हा घरगुती व्यवसाय होता. यामध्ये ४० कारागीर काम करीत होत. ही काठी पाचगणी व महाबळेश्वर परिसरात असणाऱ्या गुरेघर या गावात तयार केली जाते. याला लागणारे विशिष्ट प्रकारचे लाकूड हे फक्त महाबळेश्वरच्या जंगलात मिळते. या काठीसाठी लोखंडी, चिमठ अथवा आपटी या नावाचे झाडाचेचे लाकूड लागते. या लाकडावर सुंदर नक्षीकाम करून त्याला पॉलिश करून विक्रीसाठी आणले जाते. सन १९६० ते १९९० पर्यंत या उद्योगाला चांगली बाजारपेठ होती. परंतु अलिकडे स्टील, ॲल्युमिनियम व प्लॅस्टिकमध्ये काठ्या उपलब्ध असल्याने या काठी उद्योगाला मागणी कमी झाली आहे. तरीही आजही पाचगणी महाबळेश्वरच्या बाजारात एका काठीची किंमत ६० रुपये ते १८० रुपये इतकी आहे. याची वार्षिक उलाढाल केवळ १ ते १.५० लाख इतकीच आहे. असे असले तरी कच्चा माल सहज जंगलात उपलब्ध होत असल्याने हा एक छोटा घरगुती व्यवसाय म्हणून चालतो.

३) पाचगणीतील सिने व्यवसाय :

पाचगणीचा परिसर निसर्गत: सौंदर्याने युक्त असल्याने येथे प्रथम १९४९ साली 'बरसात' या चित्रपटाचे शुटिंग येथे झाले आणि त्यानंतर येथे चित्रपट, टी. व्ही. मालिका, जाहिराती यांचे शुटिंग सुरू झाले. पाचगणी येथे इ.स. १९६० मध्ये देवआनंदचा 'काला बाजार' इ. स. १९७१ मधील धर्मेंद्रचा 'रखवाला', इ. स. १९७५ मध्ये फिरोजखानचा 'धर्मात्मा', इ. स. १९७० मध्ये राजेश खन्ना व विनोद खन्ना यांचा 'आन मिलो सजना', इ. स. १९७६ मध्ये राजेश खन्ना व हेमामालिनी यांचा 'मेहबूब' या सिनेमाचे शुटींग झाले आहे.[९८] पाचगणीतील फिल्म शुटींगमुळे स्थानिक लोकांना विविध व्यवसायाच्या निमित्ताने रोजगाराची संधी मिळते. सर्वात महत्त्वाचे फिल्म इंडस्ट्रीची भुरळ ही सर्वांना असल्याने ते शुटींग पाहणे यातून पर्यटकांची गर्दी वाढते. स्थानिक घोडा, घोडागाडीवाले यांना व्यवसाय मिळतो. हॉटेल व्यवसायाला संधी मिळते. सर्वात महत्त्वाचे नगरपालिकेला कर रूपाने चांगले उत्पन्न मिळते.

४) घोडा व घोडागाडी व्यवसाय :

पाचगणीमध्ये असणाऱ्या टेबललँडचे पठार हे आशिया खंडातील दोन नंबरचे पठार आहे. महाबळेश्वरला जाणारा पर्यटक पाचगणीच्या या पठाराला भेट दिल्याशिवाय पुढे जात नाही. त्यामुळे या पठारावर येणाऱ्या पर्यटकांची संख्याही जास्त असते. त्यामुळे या पठारावर अनेक छोटे मोठे व्यवसाय चालतात. त्यामध्ये पर्यटकांच्या दृष्टीने सर्वात आवडती गोष्ट म्हणजे घोड्यावरून रपेट मारणे किंवा कुटुंबासहीत संपूर्ण टेबल लँडची घोडागाडीने फेरफटका मारणे. हा घोडागाडी व्यवसाय सन १९७० पासून सुरू झाला आहे.[९९] या व्यवसायात साधारणत: पाचगणीतील संपूर्ण मागासवर्गीय अशिक्षित समाज गुंतला आहे. त्यांचे कुटुंबाचा चरितार्थ पूर्णत: याच व्यवसायावर अवलंबून आहे. गेली चाळीस, बेचाळीस वर्षे हा व्यवसाय येथे केला जातो.

घोडागाडी व्यवसायाचे व्यवस्थापन :

घोडागाडी व्यवसायामध्ये १९७८ साली ४३ सभासद होते. २०१० मध्येही ४३ सभासद आहेत. म्हणजे हा व्यवसाय परंपरेने चालतो. त्यात नवीन सभासदांना प्रवेश नाही. १९७८ मध्ये घोड्यांची संख्या ६२ होती. ती वाढत आज २०१० मध्ये १२० झाली आहे. तसेच या घोडागाडीसाठी नंबर दिलेले आहेत. त्यामुळे संघटनेच्या माध्यमातूनच नंबरने गाड्या सोडल्या जातात. पर्यटकांकडून जमा होणारी रक्कमही संघटनेच्या ऑफीसमध्ये जमा होते. त्यातून दिवसभरात जमलेली रक्कम सर्वांना वाटली जाते. त्यामुळे घोडागाडी व्यावसायिक आपल्या व्यवसायात निश्चिंत आहेत.

घोडागाडी व्यवसायाला कायदेशीर स्थगिती :

इ. स. २०१२ साली घोडागाडीतून रपेटे मारताना गाडी दरीत कोसल्याने एका मुलीचा मृत्यु व अन्य चार जण जखमी झाले होते. त्यामुळे कायद्याने या व्यवसायावर स्थगिती आणली होती. तसेच टेबललँडवरील जैवविविधतेचा ऱ्हास होतो हेही कारण पुढे केले गेले होते. सध्या नगरपरिषदेने ही बंदी उठवली आहे.

घोडागाडी व्यवसायाची उलाढाल :

पठारावर घोडागाडीचा व्यवसाय करणारे ४३ सभासद आहेत. सिझनच्या काळात व सुट्टीच्या कालावधीत या संपूर्ण गाड्यांना पर्यटक मिळतात. त्यामुळे दिवसाचा व्यापार ३५ ते ४० हजाराचा होतो. तोच सिझन नसेल तेव्हा २ ते ३ हजाराचाही व्यवसाय होतो. अशा प्रकारे टेबललँडवरील हा एक व्यवसाय पाचगणीकरांना उत्पन्नाचे साधन बनले आहे.

व्यवसायाची सद्यस्थिती :

पूर्वी पाचगणीत येणारा पर्यटक ठराविक हंगामात येत होता. त्यामुळे उत्पन्न मर्यादित होते. आज राष्ट्रीय महामार्ग झाल्यामुळे व दळणवळणाची सुविधा वाढल्यामुळे पर्यटक वर्षभर येतात. त्यामुळे या छोट्या व्यावसायिकांना वर्षभर उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले आहे.

आर्थिक घटक मूल्यमापन :

भारतात शेती ही प्रामुख्याने उपजिविकेचे साधन मानले जाते. या अनुषंगाने पाचगणीतील शेती ही डोंगर उतारावरील व कमी क्षेत्रफळ असणारी आहे. त्यामुळे या भागातील लोकांना उपजिविकेचे साधन म्हणून शेती करता येत नव्हती. या लोकांना शेतीशिवाय इतर कामाचा शोध घ्यावा लागे. मात्र येथे स्ट्रॉबेरीची लागवड सुरू झाली व इथल्या स्ट्रॉबेरीने पेटंट मिळविला. या स्ट्रॉबेरीपासून तयार होणाऱ्या इतर उत्पादनालाही भारतीय बाजारपेठ मिळाली. त्यामुळे या भागाचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली.

पाचगणी हे पर्यटन स्थळ असल्याने येणाऱ्या पर्यटकासाठी निवास व भोजन व्यवस्था ही महत्त्वाची असते. त्यावर आधारित पाचगणीतील हॉटेल व्यवसायाने तर आर्थिक उलाढालीबाबत उत्तुंग शिखर गाठले आहे. या भागातील लोकांना पतपुरवठा करणाऱ्या बँकचे योगदानही महत्त्वपूर्ण असल्याचे निदर्शनास येते. तसेच पाचगणीतील इतर छोट्या मोठ्या व्यवसायाने घरातील महिला, बेरोजगार, अशिक्षित तरुण यांनाही उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले. यावरून असे निदर्शनास येते की, मोठ्या शहरांच्या आर्थिक स्थितीच्या तुलनेने, कार्यक्षेत्राने मर्यादित असलेल्या पाचगणीच्या आर्थिक स्थितीचा विचार करता, येथील विविध घटकांमुळे ही शहरे किती आर्थिक क्षेत्रात उच्च स्तरापर्यंत पोहोचू शकतात हे प्रकर्षाने जाणवते. महाराष्ट्रातील अशा अनेक कार्यक्षेत असणाऱ्या शहरांचा अभ्यास संशोधनात्मक पद्धतीने केल्यास स्थानिक इतिहासाला उजाळा मिळेल.

संदर्भ सूची :

१. मुलाखत : मा. बाळासाहेब भिलारे, स्ट्रॉबेरी ग्रोव्हर्स असोसिएशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली, अध्यक्ष, १२ फेब्रुवारी २०१०.

२. दै. सकाळ, मंगळवार दि. ३० नोव्हेंबर २०१०.

३. दै. लोकमत, सिंहावलोकन, रविवार दि. २० जून २०१०.

४. मुलाखत : अमरीश करवत, प्रयोगशील शेतकरी, पाचगणी, दि. २९ जून २०११.

५. कित्ता.

६. मुलाखत : मा. बाळासाहेब भिलारे, १२ फेब्रुवारी २०१०.

७. दै. लोकमत, रविवार दि.२० जून २०१०.

८. स्ट्रॉबेरी महोत्सव स्मरणिका २००७–०८.

९. श्रीराम फुड प्रोसेसींग कंपनी, भिलार अहवाल २०११–१२.

१०. कित्ता.

११. कित्ता.

१२. दै. सकाळ, दि. ३० नोव्हेंबर २०१०.

१३. मुलाखत : बाळासाहेब भिलारे, श्रीराम फुड प्रोसेसींग कंपनीचे संचालक व अध्यक्ष, १२ फेब्रुवारी २०१०.

१४. कित्ता.

१५. श्रीराम फुड प्रोसेसींग स्ट्रॉबेरी कंपनी, भिलार, रजिस्टर.

१६. कित्ता.

१७. कित्ता.

१८. मालाज फ्रुट प्रोडक्टस कंपनी (भोसे) पाचगणी रजिस्टर फाईल १९६०–६१.

१९. प्रोजेक्ट : मंडीवाला अब्दुल कादीर अब्देली, Allana Institute of Management Sciences, Pune, पृ. ४, २००९–१०.

२०. मालाज फ्रुट प्रोडक्टस कंपनी, ऑफीस बोर्डवरून.

२१. प्रोजेक्ट : मंडीवाला अब्दुल कादीर अब्देली, पृ. २४.

२२. मालाज फ्रूट प्रोडक्टस कंपनी व्यवस्थापन अहवाल २०१०–११.

२३. मुलाखत : मयुर व्होरा, डायरेक्टर मालाज फ्रुट प्रोडक्टस कंपनी प्रा. लि., दि. २० फेब्रुवारी २०११.

२४. कित्ता.

२५. मालाज फ्रुट प्रोडक्टस कंपनी, भोसे कार्यालय अहवाल २०१०–११.

२६. मनमा फूड प्रोडक्ट, कार्यालय रजिस्टर, १९९५–९६.

२७. मनमा फूड प्रोडक्ट, उत्पादन विभाग अहवाल २०१०–११.

२८. कित्ता.

२९. मुलाखत : किशोर कासुर्डे, पाचगणी बटाटा खरेदी–विक्री दलाल, १५ मार्च २०११.

३०. न्यू इरा हायस्कूल रेकॉर्ड १९६५.

३१. जिल्हा रेशीम कार्यालय, वाई–पाचगणी रोड, जि. सातारा.

३२. मुलाखत : श्री. आर. पी. भोसले, रेशीम विकास अधिकारी, जिल्हा रेशीम कार्यालय, पसरणी, १७ ऑगस्ट २०११.

३३. कित्ता.

३४. जिल्हा रेशीम कार्यालय(पसरणी), वाई–पाचगणी रोड, वार्षिक अहवाल २०११–१२.

३५. शेतकरी,मासिक, फेब्रुवारी, मार्च २०१२, पृ. ७५, लेख – रेशीम धागा निर्मिती, लेखक – श्री. बी. डी. डेंगळे.

३६. Raina A. K., Lodha R. C., Fundamental of Tourism System, Kanishka Publishers, New Delhi, 2004, P. No. 160.

३७. कित्ता.

३८. कित्ता, पृ. क्र. १६१.

३९. Hotel Prospect, Heritage Hotel, Panchgani Report 2010-11.

४०. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाचगणी, जुन्या इमारती रेकॉर्ड फाईल.

४१. मुलाखत : भि. दा. भिलारे गुरूजी, माजी आमदार जावली विभाग, ११ मार्च २०११.

४२. मुलाखत : मिसेस सोहली, लकी रेस्टॉरंटचे मालकीण, दि. १० जून २०११.

४३. पाचगणी हॉटेल व्यावसायिक संघ, अहवाल २०११–१२.

४४. वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई कार्यालय बोर्ड.

४५. दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी, अहवाल २००६–०७.

४६. मुलाखत : नानासाहेब कासुर्डे, माजी नगराध्यक्ष, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाचगणी, दि. १२ एप्रिल २०११.

४७. दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी, अहवाल २०११–१२.

४८. दि पाचगणी को–ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. पाचगणी, वार्षिक अहवाल व ताळेबंद २००६–०७, २००७–०८, २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

४९. कित्ता.

५०. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ४६७.

५१. दि वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई, मुख्य शाखा रजिस्टर.

५२. कित्ता.

५३. कित्ता.

५४. दि वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई, पाचगणी शाखा, सभासद रेकॉर्ड.

५५. दि. वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई, वार्षिक अहवाल २००८–०९.

५६. दि. वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई, माहितीपत्रक २००८–०९.

५७. मुलाखत : मा. संदेश जाधव, आय. डी. बी. आय. बँक, पाचगणी शाखा ब्रँच मॅनेजर, १४ जून २०१२.

५८. मुलाखत : श्री. दत्तात्रेय महाडीक आय. डी. बी. आय. बँक. ऑफीसर, पाचगणी शाखा, १४ जून २०१२.

५९. दि युनायटेड वेस्टर्न बँक वार्षिक अहवाल, १९६८–६९.

६०. मुलाखत : श्री. दत्तात्रेय महाडीक, दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., पाचगणी शाखा, अकौंटंट, १४ जून २०१२.

६१. दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., शाखा पाचगणी, वार्षिक अहवाल १९७०–७१.

६२. कित्ता.

६३. आय. डी. बी. आय. बँक, पागचणी शाखा रजिस्टर.

६४. युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा, हिरकमहोत्सवी अंक १९७४–७५.

६५. दै. लोकसत्ता, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. ऐक्य, १७ सप्टेंबर २००६.

६६. मुलाखत : दत्तात्रेय महाडीक, आय. डी. बी. आय. बँक, पाचगणी शाखा ऑफीसर, १४ जून २०१२.

६७. दि जावली सहकारी बँक लि. मुंबई, पाचगणी शाखा, स्मरणिका.

६८. धर्माधिकारी भा. वी., 'कर्मयोगी महाराज', ह. भ. प. दत्तात्रेय कळंबे महाराज जीवन चरित्र, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, पृ. क्र. ९९.

६९. दि जावली सहकारी बँक लि. मुंबई, रौप्य महोत्सवी वर्ष स्मरणिका १९९८.

७०. मुलाखत : श्री. अजय कळंबे, दि जावली सहकारी बँक लि. पाचगणी शाखा, दि. २६ मार्च २०११.

७१. कित्ता.

७२. दि जावली सहकारी बँक लि. वार्षिक अहवाल २०११–१२.

७३. दि जावली सहकरी बँक लि. वार्षिक अहवाल २००५–०६, २००६–०७, २००७–०८, २००८–०९, २००९–१०.

७४. दत्तात्रय महाराज कळंबे, जावली सहकारी बँक लि. मुंबई, पाचगणी शाखा रजिस्टर.

७५. मुलाखत : श्री. बबन गवळी, दि भारती सहकारी बँक लि. पुणे, पाचगणी शाखा मॅनेजर, दि. १५ जून २०११.

७६. ४० वा वार्षिक अहवाल २०१०–११, भारती सहकारी बँक लि. पुणे ३०.

७७. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पाचगणी, रेकॉर्ड नोंद पत्र २००६.

७८. मुलाखत : नानासाहेब कासुर्डे, विद्यमान संचालक, श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पाचगणी.

७९. कित्ता.

८०. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था वार्षिक अविल व ताळेबंर पत्रक २००६–०७ ते २०११–१२.

८१. कित्ता.

८२. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था, पाचगणी विविध ठेव योजना रेकॉर्ड.

८३. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था, पाचगणी बोर्ड.

८४. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था, पाचगणी वार्षिक अहवाल २०११–१२.

८५. मुलाखत : दगडू पार्टे, माजी टॅक्सी युनियन अध्यक्ष, १२ जानेवारी २०१२, पाचगणी टॅक्सी संघटना.

८६. मुलाखत : सदाशिवभाऊ राजपुरोहित, स्वातंत्र्यसैनिक, राजपुरोहित लंच होम पाचगणीचे मालक, १९ फेब्रुवारी २०१२.

८७. मुलाखत : दगडू पार्टे, १२ जानेवारी २०१२.

८८. पाचगणी टॅक्सी युनियन रजिस्टर बुक १९८२–८३.

८९. टॅक्सी युनियन संघटना ऑफीस रजिस्टर नोंदणी पत्र.

९०. मुलाखत : दगडू पार्टे.

९१. मुलाखत : अशोक कासुर्डे, टॅक्सी युनियन सदस्य, १२ जानेवारी २०१२.

९२. टॅक्सी संघटना कार्यालय बोर्ड.

९३. मुलाखत : नंदकुमार विठ्ठल परदेशी, १० ऑगस्ट २०१२.

९४. पाचगणी–महाबळेश्वर चना व्यवसाय संघटना सदस्यांची मुलाखत.

९५. मुलाखत : नंदकुमार विठ्ठल परदेशी, १० ऑगस्ट २०१२.

९६. मुलाखत : संदीप चिकणे, व्यावसायिक, १६ ऑगस्ट २०१२.

९७. दीपक चिकणे – सदाबहार पाचगणी पुस्तिका.

९८. कित्ता.

९९. मुलाखत – दिलीप कांबळे, टेबल लँड व्यापारी असोसिऐशन, सेक्रेटरी.

प्रकरण ६ वे

पाचगणी :
सांस्कृतिक विकास

प्रकरण ६ वे
पाचगणी : सांस्कृतिक विकास

अ) पर्यटन क्षेत्र

६.१ पर्यटनाचा इतिहास

६.२ पर्यटनासाठी उपलब्ध घटक

निवास व्यवस्था , वाहतुक व्यवस्था

६.३ पाचगणीतील पर्यटन स्थळे

६.४ पाचगणीच्या सभोवतालची पर्यटन स्थळे

६.५ पर्यटनामुळे होणारे फायदे–तोटे

ब) बेल एअर सॅनिटोरियम

६.६ बेल एअरची स्थापना

६.७ संस्थापक डॉ. बिलिमोरिया

६.८ बेल एअरच्या सुरूवातीच्या कालखंडातील अडचणी

६.९ उपचार पद्धती

६.१० उपचार पद्धतीतील वेगळेपण

६.११ बेल एअरचे व्यवस्थापन

६.१२ बेल एअरचे बदलते स्वरूप

६.१३ बेल एअरचे देणगीदार

क) नैतिक पुनरूत्थान केंद्र (Moral Rearament Center)

६.१४ एम. आर. ए. चा इतिहास

६.१४.१ पाचगणी येथील सेंटर

६.१५ एम. आर. ए. चे व्यवस्थापन

६.१६ एम. आर. ए. मधील उपक्रम

६.१७ एम. आर. ए. ची रचना, क्षेत्र, विस्तार

६.१८ ग्रामपरी (ग्रामीण आणि पर्यटन केंद्र)

ड) सामाजिक व सांस्कृतिक संस्था

६.१९ द् पाचगणी क्लब ग्रंथालय, जिमखाना

६.२० सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ

६.२१ पाचगणी व्यायाम मंडळ

६.२२ निर्भिड प्रतिष्ठान मंडळ

संदर्भ सूची

प्रकरण ६ वे

पाचगणी : सांस्कृतिक विकास

अ) पर्यटन क्षेत्र ब) बेल एअर सॅनिटोरियम

क) नैतिक पुनरूत्थान केंद्र ड) सांस्कृतिक मंडळे

प्रस्तावना :

मानवाने अनेक प्रकारच्या संघर्ष प्रक्रियेतून आपले अस्तित्व केवळ दृढच केले नाही तर त्यात सातत्याने वाढ केली. आज मानवी अस्तित्वाच्या पाऊलखुणा नाहीत असा एकही प्रदेश नाही. ही सर्व प्रगती मानवाच्या विचार करण्याच्या आणि निवड करण्याच्या सामर्थ्यामुळे होऊ शकली. माणसाने विचारपूर्वक निसर्गातील निसर्गतत्वांचा अभ्यास करून ती निगर्सतत्वे आपणास कशी अनुकूल होतील याचा विचार केले. जेथे शक्य नसेल तेथे मानवाने निसर्गतत्वानुसार स्वत:मध्ये बदल केले आणि आपले अस्तित्व टिकविले. या सर्व संघर्ष प्रक्रियेतून जी मानवाने विविध तंत्रांची, साधनांची निर्मिती केली आणि आपले जीवन सुखी–समृद्ध बनविले त्याला सांस्कृतिक प्रगती असे म्हणतात. पाचगणीसारख्या घनदाट जंगलांच्या आणि दुर्गम डोंगरांच्या प्रदेशात मानव येतो आणि प्रयत्नपूर्वक एक सुंदर वसाहत निर्माण करतो. त्याचेच पुढे सुंदर शहर बनते आणि सर्व लोकांच्या आकर्षणाचे केंद्र बनते, ही मानवी सांस्कृतिक प्रगती आहे. पाचगणीच्या हवामानाचा विचार करून मानवी वरदान ठरलेली आरोग्य केंद्रे, विचारांची जडणघडण करून नैतिक मूल्यांची पायाभरणा करणारी केंद्रे येथे निर्माण झाली. ती केंद्रेच आज आदर्श व सशक्त समाज घडविण्यासाठी कार्यरत आहेत. या सर्वांचा आढावा प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात आला आहे. प्रस्तुत प्रकरणासाठी ज्या संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला आहे त्यामध्ये प्रत्यक्ष क्षेत्र भेटी, मुलाखती, संदर्भ ग्रंथ, पर्यटनावर प्रसिद्ध केली जाणारी मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, अहवाल, स्मरणिका इंटरनेट इ. चा वापर केला आहे.

अ) पर्यटन क्षेत्र :

महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हा हा राजकीय व सामाजिक चळवळीबरोबरच पर्यटन क्षेत्रातही आघाडीवर आहे. महाराष्ट्राचे काश्मीर म्हणून प्रसिद्ध असलेले पाचगणी–महाबळेश्वर ही शहरे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक केंद्रांबरोबर नैसर्गिक सृष्टीसौंदर्यामुळे पर्यटकांना आकर्षित करणारी ही ठिकाणे महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे म्हणून विकसित झाली आहेत. त्यामुळे या शहरांना दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. य६ा पर्यटनस्थळाचा विकास हा ब्रिटीश काळात झाला तर या शहरांना पर्यटनाचा दर्जा मिळाला तो १९८० च्या दशकात.

पाचगणी, महाबळेश्वरला येणारा पर्यटक हा इथल्या भूलोकीचा जणू स्वर्ग असणाऱ्या निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी येतो. इथे असणाऱ्या घनदाट झाडींनी युक्त सह्याद्रीच्या रांगा, धडकी भरवणाऱ्या खोल, कातळ दऱ्या, या दरीतून वर येणारे ढगांचे पुंजके, कोसळणारे पांढरे शुभ्र धबधबे, जैवविविधतेने भरलेले सृष्टीसौंदर्य अनुभवण्यासाठी तर येतोच शिवाय हा संपूर्ण परिसर छत्रपती शिवाजी राजांच्या पदस्पर्शाने पावन झालेला आहे. त्यामुळे जावळीसारख्या दुर्गम भागात इतिहासाची साक्ष देणाऱ्या अनेक किल्ले, मंदिरे, लेण्या, पठारे जे आहेत ते पाहण्यासाठीही पर्यटक आवर्जुन येतो.

महाराष्ट्र राज्यातील पर्यटन स्थळे दर्शविणारा नकाशा

६.१ पर्यटनचा इतिहास :

मानवामध्ये प्रवासाची आवड प्रत्येक कालखंडात दिसून येते. प्रवास हा मानवाचा स्थायीभाव आहे. प्राचीन काळी प्रवासाच्या कल्पना ह्या वेगळ्या होत्या. या काळात प्रवासाचा मुख्य उद्देश व्यापार होता. नवीन प्रदेशाचा शोध घेणे, नवीन स्थळांना भेट देणे, धार्मिक स्थळांना भेटी देणे इत्यादीसाठी मानव प्रवास करीत होता. त्यानंतर ज्ञानाजर्नासाठी प्रवास हा दुसरा टप्पा होता. मध्ययुगीन काळात धार्मिक कारणासाठी प्रवास सुरू झाला. आधुनिक काळात मनोरंजनासाठी प्रवास ही संकल्पना प्राचीनकाळी रोमन साम्राज्यात अस्तित्वात आली.[१] १९ व्या शतकात युरोपात तांत्रिक क्षेत्रात प्रगती झाली. वाहतुक साधनांचा विकास झाला. सागरी वहातुकीची प्रगती झाली. त्यामुळे जागतिक आंतरखंडीय पर्यटनास सुरुवात झाली. तसेच औद्योगिकरणाने समाजाकडे पैसा आला. त्यातून आनंद व मनोरंजन यासाठी प्रवास ही समाजाची गरज बनली. पहिल्या महायुद्धानंतर पर्यटनाला युरोपात चांगला वाव मिळाला. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर यात खंड पडला कारण जागतिक आर्थिक व्यवस्था उध्वस्त झाली होती. आज २१ व्या शतकात पर्यटनाचा विकास होण्यास आर्थिक, सामाजिक व तांत्रिक क्षेत्रातील प्रगती कारणीभूत झाली. व पर्यटनाला चालना मिळाली आहे.

भारताचे आकर्षण प्राचीन काळापासून आहे. भारत एक विविधतेचा देश म्हणून त्याचे वर्णन केले जाते. नैसर्गिक, सांस्कृतिक, पर्यावरणातील भारताच्या विविधतेचे अनुभव, आनंद व भारतीयांनी त्यातून साधलेली एकता पाहण्यासाठी परदेशी पर्यटक येत असतात. महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय हा प्रगतीप्रथावर असणारा व्यवसाय आहे. महाराष्ट्र राज्याला प्राकृतिक दृष्ट्या विविधता लाभली आहे. महाराष्ट्र राज्यात पर्यटन विकासाची मुहूर्तमेढ सन १९६९ साली रोवण्यात आली.[२] १९७५ साली महाराष्ट्रातील पर्यटन विकासाची जबाबदारी महाराष्ट्र विकास महामंडळावर सोपविण्यात आली व मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, अमरावती या ठिकाणी पर्यटन विकासाची केंद्र स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी ही ब्रिटीशकालीन शहरे पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत.

तसेच पाचगणी, महाबळेश्वरला सर्व बाजूंनी पोहचता येते. पश्चिम घाटातील ही पर्यटन स्थळे पुण्यापासून ११५ कि. मी., मुंबईपासून २४५ कि. मी., साताऱ्यापासून ५० कि. मी. अंतरावर आहेत. जवळचे रेल्वे स्टेशन वाठार, पुणे आहे. ब्रिटीशकाळापासून महाराष्ट्राचे उन्हाळ्याचे राजधानीचे ठिकाण म्हणून महाबळेश्वर ओळखले जाते.[३] आजही उन्हाळ्यात राज्यपाल महाबळेश्वरला येतात. अशी ही पर्यटन स्थळे विकसित झाली ती सन १९८० च्या दशकात. तेव्हापासून ही पर्यटन स्थळे संपूर्ण भारतभर प्रसिद्धीस आली आहेत. सन २००६ पासून येणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी स्ट्रॉबेरी महोत्सव सुरू झाला व लाखोंच्या संख्येत पर्यटकांची गर्दी या काळात वाढू लागली.[४] आज आठवड्यातील पाच दिवस काम करून विकएंडला ताणतणाव घालविण्यासाठी व विरंगुळ्यासाठी पर्यटक पाचगणी, महाबळेश्वरला आवर्जून भेट देतात. पर्यटकांचा वाढता आलेख पुढील संख्येवरून लक्षात येईल.

इ. स.	पर्यटकांची संख्या
१९७३–७४	१,३८,३२०
१९८२–८३	३,७३,१७०
१९९२–९३	५,९५,२००
२००३–०४	६,३२,०००
२००४–०५	७,००,०००
२००५–०६	७,८०,०००
२००६–०७	८,००,०००
२००७–०८	६,९७,९००
२००८–०९	६,६३,४००
२००९–१०	८,८३,५४१
२०१०–११	९,७९,८००
२०११–१२	१०,१६,३००

(पाचगणी पर्यटन सेन्सेस रेकॉर्ड, नगरपालिका)

पाचगणीला भेट देणाऱ्या पर्यटकाच्या संख्येवरून या पर्यटन स्थळाचे महत्त्व लक्षात येते. अशा या शहरात पर्यटकांना आकर्षित करणारे अनेक घटक उपलब्ध आहेत. त्यामध्ये हवामानाच्या दृष्टीने पाचगणी हे अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. कारण आल्हाददायक वातावरण, शुद्ध व स्वच्छ हवा, दमेकरी लोकांना उपयुक्त असे हे हवामान असल्याने अनेक लोक खास विश्रांतीसाठी येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात पंडित नेहरू, त्यांची पत्नी कमला नेहरू, महात्मा गांधी, कस्तुरबा गांधी, खान अब्दुल गफार खान, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, अशा अनेक नेत्यांनी पाचगणीत काही काळ वास्तव्य केले होते.[१७] स्वातंत्र्यानंतरही उद्योगपती, सिनेकलावंत, गायक, क्रीडापटू व इतरही अनेक मान्यवर व्यक्ती विश्रांतीसाठी येतात. पर्यटकांना आकर्षित करणारे आशिया खयंडातील दोन नंबरचे पठार टेबल लँड हे एक महत्त्वाचे ठिकाण आहे. पाचगणीतील विविध पर्यटन स्थळांची माहिती पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडण्यात आली आहे.

६.२ पाचगणीच्या पर्यटनासाठी उपलब्ध घटक :

मानवी सुख–समाधान–आनंद–विरंगुळा या जाणिवेतून सह्याद्रीच्या पर्वतरांगांवर वसलेले पाचगणी हे ठिकाण महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून विकसीत झाले आहे. पाचगणी हे समुद्रसपाटीपासून १२५० मीटर उंचीवर आहे. त्यामुळे येथील हवामान बाराही महिने उत्साहवर्धक व आरोग्यदायी असते. पाचगणीच्या या पठारावरून एका बाजूला कृष्णेचे खोरे, कमळगड, केंजळगड, मांढरदेवीचा डोंगर, दुसऱ्या बाजूला पांडवगड, वैराटगड ही ऐतिहासिक ठिकाणे आहेत. इथल्या दऱ्याखोऱ्यातून फुलणारी विविध रंगी फुले, त्यामध्ये काही वनस्पती सात वर्षांनी एकदा फुलतात. त्यामध्ये कारवीची फुले, जांभळ, फिकट गुलाबी रंगांनी हे पठार भरून जाते. पाचगणी हे नैसर्गिक सृष्टीसौंदर्याचा आत्मा आहे. त्यामुळे पर्यटक या मनमोहक सृष्टीसौंदर्य अनुभवायला येतात. अशा पर्यटनस्थळी निवास व्यवस्था ही एक महत्त्वाची असते.

निवास व्यवस्था : (Accomodation)

पर्यटकांना राहण्यासाठी अनेक प्रकारच्या निवास व्यवस्था उपलब्ध असतात. त्यामध्ये हॉटेल्स, मोटेल्स, पथिकाश्रम, सराई, धर्मशाळा, सरकारी निवासगृहे, युवा वसतीगृहे, कुटिरे, राहुट्या, रेल यात्री भवन, हाऊस बोट, खाजगी बंगले इ. भारतात पुरातन काळापासून गावात, नगरात येणाऱ्या व्यापाऱ्याला, भक्ताला, पाहुण्यांना निवास उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे प्राचीन काळी व्यापारी मार्गावर ठिकठिकाणी धर्मशाळा, रस्त्याच्या दुतर्फा झाडी व पाणी पिण्यासाठी विहीरी बांधल्याचा उल्लेख आढळतो. युरोपमध्ये निवासाचे प्रकार खालील प्रमाणे होते.

भारतात हॉटेल व्यवसायाला सुरूवात ब्रिटिश राजवटीत झाली. इ. स. १९३० मध्ये जमशेटजी टाटा यांनी मुंबईत ताजमहाल हॉटेल सुरू केले.[५] सन १९५० नंतर पर्यटकांसाठी विविध तारांकित हॉटेल्स व्यवसायाला चालना दिली. सरकारी क्षेत्रातील पहिले हॉटेल १९५६ साली दिल्ली येथे सुरू झाले. त्याचे नाव हॉटेल अशोक हे होय.[६]

पाचगणीमध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या निवासाची, जेवणाची, चहा, नाष्ट्याची सोय व्हवी यासाठी अगदी सुरुवातीच्या काळापासून व्यवस्था केली होती. इ. स. १८५४ मध्ये ब्रिटिशांनी पाचगणीत वसाहत निर्माण केली तेव्हा पाचगणीत राहण्यासाठी बंगले बांधण्यामध्ये अग्रेसर होते ते पारशी लोक. या लोकांनी बांधलेल्या आलिशान बंगल्यामध्ये इंग्रज अधिकारी रहात. त्यानंतर १९१० ला नगरपालिका स्थापन झाल्यानंतर येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढली. त्यामध्ये पब्लिक स्कूलमध्ये येणाऱ्या पालकांची संख्या जास्त असे. यांना राहाण्यासाठी पाचगणीत पहिले हॉटेल सुरू झाले ते इ. स. १९१४ मध्ये, त्याचे नाव आहे, Hotel Prospect.[७] त्याची स्थापना Shahram Javanmardi या पारशी व्यक्तीने केली. आज हे होटेल २८ एकर परिसरात उभे आजे. आज त्याला हेरिटेज हॉटेलचा दर्जा मिळाला आहे.

त्यानंतर आज पाचगणीत येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी स्टार हॉटेल्सपासून ते उपहारगृहे, धर्मशाळा, एम. टी. डी. सी., खाजगी बंगले उपलब्ध आहेत. त्यामध्ये One Star to Three Star Hotel's ची संख्या २० आहे. स्टार दर्जा नसणारे परंतु योग्य त्या सेवा

सुविधा पुरविणारा १७ हॉटेल्स आहेत. एक एम. टी. डी. सी. हॉटेल आहे. गुजराती व जैन मारवाडी समाजाच्या दोन भव्य धर्मशाळा आहेत.[८] ११ उपहारगृहे आहेत. ४ आईस्क्रीम पार्लर, २ टी स्टॉल, त्यामध्ये १९०१ साली सुरू झालेले केवळ चहा व केकसाठी प्रसिद्ध असणारे लकी रेस्टॉरंट आजही ख्रिश्चन समाजाकडून चालविले जाते. अशा प्रकारे पाचगणीत निवासाची उत्तम सोय आहे. पाचगणीत येणाऱ्या पर्यटकांना निवासाची कोणतीही अडचण येणार नाही यासाठी गिरिस्थान नगरपरिषद सदैव तयार असते.

वाहतूक व्यवस्था :–

पर्यटन आणि वाहतूक यांचा निकटचा संबंध आहे.. आधुनिक पर्यटनाला सुरूवात खऱ्या अर्थाने वाहतुकीतील आधुनिकतेमुळे झाली आहे. इंग्लंडमध्ये रेल्वेचा विकास इ. स. १९३० मध्ये झाला व थॉमस कुक याने याच रेल्वेच्या माध्यमातून सामुदायिक पर्यटनाला सुरूवात केली.[९] आज भारतातही रेल्वे हे एक प्रमुख वाहतुकीचे साधन बनले आहे. अशा रेल्वेची सुरूवात भारतात प्रथम इ. स. १८५३ मध्ये बोरीबंदर ते ठाणे अशी झाली. त्यानंतर संपूर्ण भारतात रेल्वेचे जाळे पसरले आहे. कौटुंबिक पर्यटनाची संकल्पना ही मोटार वाहतुकीमुळे निर्माण झाली. मोटारीमुळे कुटूंब एकत्रितपणे जवळपासच्या पर्यटन स्थळाला भेट देऊ शकते. त्यामुळे इ. स. २००१ नंतर मोटार वाहतुकीमुळे पर्यटकांची संख्या वाढलेली दिसते.

आंतरराष्ट्रीय पर्यटनाला वाव हवाई वाहतुकीच्या विकासामुळे मिळाली. दुसऱ्या महायुद्धानंतर जगभर हवाई वाहतुकीत झपाट्याने वाढ झाली व आंतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना मिळाली. ब्रिटिश आमदनीपासून पाचगणी महाबळेश्वरला वाहतुक सुरू झाली. सुरूवातीला वाहतुकीसाठी घोडे, घोडागाडी, पालखी किंवा पायी प्रवास केला जाई. महाबळेश्वरचा शोध लागल्यानंतर इ. स. १८२६ मध्ये सातारचा रेसिडेंट कर्नल ब्रिग्ज याने घोडागाडी जाऊ शकेल असा रस्ता सातारच्या छत्रपतींकडून तयार करवून घेतला.[१०] पाचगणीस येण्यास जवळचा रेल्वेमार्ग म्हणून वाठार स्टेशन येथून ४९ कि. मी. चा प्रवास हा घोडागाडीने केला जाई. इ. स. १८६३ मध्ये पाचगणीस जाण्यास पसरणी घाटाचा रस्ता तयार झाला.[११] इ. स. १९२५ पासून मोटार वाहतुकीला सुरूवात झाली. आज पाचगणी

महाबळेश्वरला जाण्यासाठी सर्व बाजूंनी रस्ते असल्यासने सहजासहजी या ठिकाणी पर्यटकांना पोहचता येते. पाचगणीला जवळचे विमानतळ पुणे व मुंबई आहे. जवळचे रेल्वे स्टेशन पुणे येथून ९८ कि. मी. बसनी किंवा खाजगी वाहनाने प्रवास करता येतो. त्यामुळे पाचगणी महाबळेश्वरला दळणवळणाची अत्यंत चांगली सोय असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने या ठिकाणाला भेटी देत असतो.

६.३ पाचगणीतील पर्यटन स्थळे :

टेबललँड :– पाचगणीतील सर्वाधिक पसंतीचे 'टेबललँड' हे आकर्षण केंद्र आहे. हे टेबललँड आशिया खंडातील दोन नंबरचे पठार म्हणून ओळखले जाते.[१२] या टेबललँडची समुद्रसपाटीपासून उंची ४४५० फूट आहे. म्हणजेच १३३४.४२ मीटर्स इतकी आहे.[१३] या टेबललँडचा विस्तार ४४.५ हेक्टर किंवा ९२ एकर क्षेत्रात आहे.[१४] हे ठिकाण पाचगणी शहरापेक्षा ६१ मीटर उंचीवर असल्याने पुर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांना अडविले गेल्याने येथील हवामान वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे.[१५] टेबललँडचे पठार हे लाल जांभा दगडाच्याा लोहयुक्त खडकाचा असून चारी बाजूंना ३० ते ४० फूट तुटलेला कडा आहे. या कड्यामध्ये वेगवेगळ्या आकाराच्या गुहा आहेत. त्यामुळे हा टेबललँड भौगोलिक व वनस्पतीशास्त्राच्या अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला आहे. या टेबललँडवर अनेक पॉईन्टस आहेत. त्यामध्ये –

१) **शुटींग पॉईन्ट** हे ठिकाण चित्रपट निर्मात्यांचे आवडते ठिकाण आहे. या ठिकाणी अनेक चित्रपटांचे शुटींग वर्षभर सुरू असतात. २) **टेबललँडमधील गुहा** टेबललँडच्या दक्षिण टोकाला पुढे आलेल्या खडकात एक मोठे विवर आहे. त्याला डेव्हिलस किचन असेही म्हणतात. सध्या या गुहेत 'रेस्टॉरंट इन द केव्ह' हे छोटेसे हॉटेल सुरू आहे.[१६] हे हॉटेल श्री. गोविंद बोडस या रिटायर्ड आर्मी ऑफिसरने इ. स. १९८१ साली सुरू केले आहे. ३) **वन ट्री पॉईंट हे** टेबललँडच्या पुर्व कड्यावर अर्ध्या सुपारीचे एकमेव झाड आहे. संपूर्ण टेबललँडवर एकही झाड नाही. या प्राचीन झाडाला 'वन मॅन आर्मी' म्हटले जाते.[१७] ४) **व्ही पॉईन्ट** हा टेबललँडला जोडून गोडवली भागात सलग पठाराचा भाग खंडीत होऊन त्याला इंग्रजी 'V' आकार प्राप्त झाला आहे. त्याला 'व्ही पॉईन्ट' म्हणतात.

पाचगणीतील प्रसिध्द टेबललँड

टेबललँडमधील गुहा

पाचगणी पठाराचे संशोधकांसाठी महत्त्व :

पाचगणीचे पठार पश्चिम घाटाच्या पर्वत रांगेच्या प्रदेशात असल्याने हा भूभाग जैविक संपदेचे भांडार म्हणून ओळखले जातो. पश्चिम घाटातील ही पठारे ही लॅटराईट या प्रकारच्या खजिन संपन्न दगडांनी बनलेले आहे. या दगडाचा गुणधर्म स्पंजासारखा असतो. त्यामुळे पावसाळ्यात दगड पाणी शोषून घेतात. नंतर हे अंतर्गत जलस्त्रोताद्वारे विभागले जाते. त्यामुळे पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत व झरे विपुल प्रमाणात आढळतात. परिणामी या भागात विपुल वनस्पती, झाडे, प्राणी, पक्षी, किटक आढळतात. त्यामुळे हे पठार वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र, भौगोलिक तज्ज्ञांसाठी अभ्यासासाठी महत्त्वाचे आहे.

पाचगणीचे टेबललँड हे पश्चिम घाटाच्या पर्वतरांगेच्या प्रदेशात येते. येथे अनेक दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे हा भूप्रदेश पर्यावरण व जैवविविधतेच्या दृष्टीने अतिसंवेदनशील (Ecological Sensitive Zone) मानला जातो.[१८] त्याचा समावेश जगातील 'हॉट स्पॉट रिजनमध्ये' होतो. त्यामुळे हे पठार जैविक संपदेचे आश्रयस्थान (Region of Indemisum) व नवीन प्रजाती निर्मिती केंद्र (Region of Speciations) म्हणून ओळखले जाते.[१९] या पठारावर गवताच्या अनेक प्रजाती व कंदवर्गीय वनस्पती आढळतात. या वनस्पती पश्चिम घाटात वास्तव्य करणाऱ्या शाकाहारी प्राण्याचे प्रमुख अन्न आहे. या पठारावर गेल्या तीस, चाळीस वर्षात वनस्पतीच्या बारा नव्या प्रजातीचा शोध लागला आहे. मात्र या अल्पजिवी वनस्पती असतात. त्या विशिष्ट हंगामातच उगवतात.

टेबललँडवरील वैशिष्ट्यपूर्ण फुलोरा :

पावसाळ्याच्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये टेबललँड येथे अनेकविध प्रकारची रानफुले नैसर्गिकरित्या उगवतात. त्यामध्ये कौला किंवा बरका म्हणजे स्मिथियाची सोनपिवळी फुलं, केनीची निळसर फुलं, रानतेरड्याची जांभळी फुले, ड्रासेरा या जातीची गुलाबी रंगांची फुले, सन ड्यू प्लॉंट किंवा दवबिंदू किंवा विंचवाच गवत म्हणून ओळखली जाणारी ही किटकभक्षी वनस्पती, याच पठारावर दुसऱ्या झाडावर उगवणारी किटकभक्षी वनस्पती म्हणजे युट्रिक्यूलारिया स्ट्रायट्युला, जमिनीवर उगवणाऱ्या किटकभक्षी वनस्पतीमध्ये युट्रिक्यूलारिया

परपरेसीन्स, कुमूदिनी (निम्फोइंडस इंडियन) टूथब्रश ऑर्कीड फुले, हाबोनारीया, ग्रँडीफ्लोरा ही पांढरी फुले यांचे ताटवेच्या ताटवे निर्माण होतात. शिवाय महाराष्ट्राचे राज्यफूल म्हणून मान्यता असलेले जारूळ (लॅगरस्ट्रोमिया रेजिनी) ही वनस्पती या पठारावर आढळते.[२०] या फुलाला ताह्याण किंवा मोन बोंद्रा म्हणूनही ओळखले जाते. तसेच बाक्रा (भूई कारवी किंवा टोपली कारवी) ही वनस्पती येथे मोठ्या प्रमाणात पहायला मिळते. परंतु सध्या या पठारावर येणाऱ्या पर्यटकांची प्रचंड गर्दी, घोडागाडीचा मोठ्या प्रमाणात वापर, शिवाय दुचाकी व चारचाकी गाड्या यामुळे दुर्मिळ वनस्पती व त्यावर अवलंबून असणारे किटक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

सिडने पॉईंट :– पाचगणीच्या सौंदर्यामध्ये भर घालणाऱ्या अनेक घटकांपैकी सिडने पॉईंट हा एक घटक आहे. वाई पाचगणी रस्त्यावर जकात नाक्याच्या उत्तरेला एक उंची टेकडी आहे. ही टेकडी म्हणजे सिडने पॉईंट होय. मुंबईचा ब्रिटिश काळातील गव्हर्नर व कमांडर इन चीफ सर थॉमस सिडने बेकविथ याच्या स्मृतिप्रित्यर्थ या टेकडीला सिडने पॉईंट असे नाव दिले. पूर्वी याला 'लॉंडविक पॉईंट' म्हणतात.[२०]

हॅरीसन व्हॅली (थापा) :– पाचगणी–वाई रोडवर पाचगणीपासून ४ कि. मी. अंतरावर छोटा आडवा डोंगर पसरलेला आहे. त्यालाच स्थानिक लोक 'थापा' असे म्हणतात. या थाप्यावर स्वातंत्र्यपूर्व काळात हॅरिसन या ब्रिटिश व्यक्तीने बंगला बांधण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथे पाण्याची कोणतीच सोय होऊ शकली नाही. तसेच दरीतून येणारा वारा प्रचंड वेगाने वहात असल्याने बंगला जास्त दिवस टिकू शकला नाही.[२१] या पॉईंटवरून संपूर्ण पाचगणीचा परिसर दिसतो. त्याशिवाय सिडने पॉईंट, कमळगड, पांडवगड, कृष्णा खोरे, धोम धरणाचा काही भाग, पसरणी घाट व वरच्या बाजूला आम्रळ राजपुरीचा टेबललँड दिसतो. येथे ग्लायडिंग, बलूनिंग यांचे प्रशिक्षण दिले जाते. म्हणून याला 'ग्लायडिंग स्पॉट' असेही म्हणतात.

काचबावरी पॉईंट : – हा पॉईंट पाचगणी महाबळेश्वर रस्त्यावर पाचगणीपासून दीड कि. मी. अंतरावर आहे. येथून सुंदर खोल दरी व कृष्णा नदी दिसते. या पॉईंटवर गारगोटीसारखे बारीक दगड आढळतात म्हणून याला 'काचबावरी पॉईंट'[२२] असे नाव दिले आहे.

पारसी पॉईंट :– पाचगणी शहराच्या पश्चिमेला महाबळेश्वरच्या रस्त्यावर दीड कि.मी. अंतरावर व काचबावरी पॉईंटपासून पश्चिमेला ४०० मीटर अंतरावर पारसी पॉईंट आहे. पाचगणी शहराचा संस्थापक जॉन चेसन सोबत त्यांचे मित्र मेहबानजी मोठाभाई मिस्त्रि होते. त्यांचे पाचगणी वसविण्यातील योगदान लक्षात घेऊन सदरचे नाव देण्यात आले आहे.

पंपिंग पॉईंट :– वाई–पाचगणी रस्त्यावर सिडने पॉईंटच्या खालच्या बाजूस धोम धरणाकडे जाताना हा पंपिंग पॉईंट आहे. या पॉईंटवरून पाचगणीला धोम धरणातून पाणी वर चढविण्यासाठी जे पंपिंग स्टेशन निर्माण केले. त्यावरून या पॉईंटला पंपिंग पॉईंट असे नाव पडले आहे. या पॉईंटला ॲपेक्स पॉईंट किंवा यशवंतराव चव्हाण पॉईंट म्हणूनही ओळखले जाते.

बेबी पॉईंट : नेहरू पार्क :– हा पॉईंट महाबळेश्वर रस्त्याला जॉन चेसन मार्गावर आहे. पूर्वी या ठिकाणी जुनी लायब्ररीची इमारत होती. त्याच्याच शेजारी हा पॉईंट आहे. या पॉईंटवर लहान मुलांच्यासाठी खास खेळणी बसविली आहेत. त्यामुळे पालक मोठ्या प्रमाणात आपल्या लहान मुलांना या पॉईंटवर घेऊन येतात. त्यामुळेच या पॉईंटला 'बेबी पॉईंट किंवा नेहरू पार्क.' म्हणतात.

दोसी पॉईंट :– पाचगणीतील चेसन मार्ग व वाई मार्गाच्या चौरस्त्यावर पारशी लोकांची अग्यारी आहे. त्याच्याच समोर दोसी पॉईंट आहे. येथे पारशी लोक प्रार्थनेनंतर थांबत. त्यांच्या सोयीसाठी रूस्तमजी दोसी या गृहस्थाने बसण्याची व पिण्याच्या पाण्याची सोय केली. म्हणून या पॉईंटला दोसी पॉईंट किंवा डोसी पॉईंट म्हटले जाऊ लागले.[२३]

ग्रुव्हज पॉईंट :– पाचगणीच्या आसपास न आढळणारा भला मोठा आम्रवृक्ष असणारा पॉईंट आहे म्हणून याला ग्रुव्हज हे नाव देण्यात आले आहे.

डब्ल्यू पॉईंट :– पाचगणीतील काही पॉईंटला इंग्रजी मुळाक्षरांची नावे दिली आहेत. त्यापैकी डब्ल्यू पॉईंट एक होय. हा पॉईंट W ह्या इंग्रजी अक्षराप्रमाणे दिसणारी डोंगर रांग आहे. डोंगर क्षेत्र महाबळेश्वरच्या डोंगरांच्या खाली उतरलेला एक कडा आहे. याच्या पलिकडील बाजूकडून

कमळगड किल्ल्याची रांग आणि मध्येच एक छोटी टेकडी म्हणजे 'डब्ल्यू पॉईंट' होय. या भागालाच ढवळ्या घाट असेही म्हटले जाते. याचमार्गे पूर्वी लमाणांचे तांडे, देशावरून तेल, गुळ, तंबाखू व मिरची या वस्तू घेऊन कोकणात जात असत. हा घाट पूर्णपणे खडकामध्ये खोदून तयार केला आहे.[२४]

मॅप्रो गार्डन :– पाचगणीपासून ४ कि. मी. अंतरावर मॅप्रो फ्रुटस अँड प्रॉडक्टस् गार्डन म्हणून मॅप्रो कंपनीने विकसित केलेला हा पॉईंट आहे. येथे लोटस पॉईंट म्हणून असणाऱ्या तळ्यात विविध जातीची व रंगांची अनेक कमळे आलेली दिसतात. रोझ गार्डनमध्ये देशी, विदेशी अनेक प्रकारची व रंगांची गुलाबाची फुले आहेत. इथे ग्रीन हाऊसमध्ये नवीन जातीची संकरित मिरची, वांगी, पालेभाज्या घेतल्या जातात. याशिवाय पॉन सिरीया नावाची फुले उत्पादीत केली जातात.[२५]

इथे एक कृत्रिम धबधबा तयार करून येथेच wishing point म्हणून सामाजिक बांधिलकी जपणारा point तयार केला आहे. या ठिकाणी एक छोटासा खड्डा काढून तो पाण्याने पूर्ण भरला असून त्यामध्ये एक लोखंडी तबकडी ठेवली आहे. या ठिकाणी येणारे पर्यटक आपल्या परीने पैसे टाकतात. यामध्ये जमा होणारा पैसा अंध, अपंग, गरीब लोकांना दान केला जातो.

मेहेरबाबा गुहा :– पाचगणी परिसराला संतश्रेष्ठींची परंपरा आहे. त्याचा एक नमुना म्हणजे इथे असणारी मेहेरबाबा गुहा होय. हे मेहेरबाबा पाचगणीमध्ये इ. स. १९२९ मध्ये आल्याचा उल्लेख सापडतो.[२६] पाचगणी कुडाळ रस्त्यावर टायगर व्हॅली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात एक छोटीशी गुहा आहे. त्याच गुहेत हे मेहेरबाबा यांनी काही काळ एकांतवास व ध्यानधारणेसाठी वास्तव्य केले. ही गुहा आज मेहेरबाबा गुहा म्हणून ओळखली जाते. या मेहेरबाबांचे शिष्य संपूर्ण महाराष्ट्रात आहेत.

६.४ पाचगणीच्या सभोवतालची पर्यटन स्थळे :

राजपूरी लेण्या :– याठिकाणी सहा छोट्या लेण्या आहेत. येथे दहाव्या व अकराव्या शतकातील सोमनाथ देवाच्या मराठी देवनागरीतील शिलालेख आहे.[२७] हा लेख प्रजापती संवत्सरातील असला तरी या ठिकाणी सवंत्सर वा शक उल्तलेख नाही. परंतु सोमनाथ मंदिराचा उल्लेख दोन ओळीत कोरला आहे. पाचगणीपासून ५ कि. मी. अंतरावर राजपूरी लेण्या आहेत. ह्या लेण्या प्राथमिक अवस्थेतील आहेत. ही प्रथम बौद्ध लेणी असावीत. नंतर त्याचे रूपांतर ब्राह्मणी लेणीत करण्यात आली असावीत. येथील मोठ्या गुहेत साधे चार स्तंभ आहेत. त्यालगतच्या गुहेत शिवलिंगाची स्थापना करण्यात आली. ह्या लेण्या त्या काळातील व्यापारी रस्त्यांना जोडलेले असावीत व घाटमाथ्यावर येता जाता भिक्षूकांची सोय व्हावी हा हेतू असावा.

पांडवगड :– हा किल्ला पाचगणी जवळ शंभू महादेवाच्या डोंगरावर आहे. हा किल्ला पन्हाळगडाच्या दुसऱ्या भोजराजाने इ. स. ११७८ ते ११९३ च्या सुमारास बांधला. १६४८ साली हा किल्ला आदिलशाही सरदार मोकासरदार याच्याकडे होता. १६७३ साली हा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला. १७०१ साली हा किल्ला औरंगजेबाच्या ताब्यात गेला. १८१७ साली हा मराठ्यांच्या ताब्यात आला व पुन्हा १८१८ साली मेजर थँचर या इंग्रज अधिकाऱ्याने ताब्यात घेतला.[२८] या पांडवगडाजवळ धावडी गावच्या बाजूस डोंगराच्या कड्यावर काही लेण्या आहेत. त्या लेण्यांना 'पांडवगड लेणी' म्हणून ओळखले जाते. हा किल्ला इतिहासप्रेमी पाहण्यासाठी जातात.



पाचगणीच्या सभोवतालची पर्यटन स्थळे दर्शविणारा नकाशा

वैराटगड :– पाचगणीपासून जवळ पाचवड गावच्या पाठीमागे वैराटगड हा किल्ला आहे. या किल्ल्यावर जाण्यासाठी पाचवड–वाई रस्त्यावर व्याजवाडी–जांभुळणे गावाकडे जावून तेथून खडा चढ चढून किल्ल्यावर जाता येते. हा किल्लाही पन्हाळ्याच्या दुसऱ्या भोज राजाने इ. स. ११७८ ते ११९३ या काळात बांधला.[२९] हा किल्लाही प्रथम आदिलशहा व नंतर मुघलांच्या ताब्यात होता. पुढे हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

कमळगड :– कमळगड हा महाबळेश्वरच्या उंचीचा आहे. हा किल्ला कोल्हेश्वरच्या पठारावर आहे. या किल्ल्याचा वापर टेहाळणीसाठी केला जात होता. या किल्ल्यावर जाण्यासाठी मार्ग वाईमधून मेणवली धोममार्गे जाता येते. पाचगणीच्या टेबललँडवरून समोरच असणारा हा किल्ला सहजपणे नजरेत भरतो. हा किल्ला प्रसिद्ध आहे तो येथील कावेच्या विहीरीमुळे होय. पूर्वी किल्ल्यांना रंगरंगोटी करण्यासाठी याच विहीरीतून काव नेली जात होती. काव म्हणजे तांबुस रंगाचा रंग होय. ही विहीर साधारण ३० मीटर लांब व २ मीटर रूंद आहे व २५ मीटर खोल आहे. याचा आकार तलवारीच्या आकारासारखा आहे.[३०]

६.५ पर्यटनामुळे होणारे फायदे :

पर्यटनामुळे देशाला परकीय चलन प्राप्त होते. विकसित देशांकडून आर्थिक ओघ विकसनशील देशाकडे वळल्याने या देशांना विकासाच्या वाटा खुल्या करता येतात. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. पर्यटनामुळे निव्वळ नफाच होतो कारण उत्पादनावर खर्च कमी असतो. हा अदृश्य निर्यात उद्योग असल्याने, देशाच्या आयात निर्यातीच्या ताळेबंदातला असमतोल कमी करता येतो. पर्यटनामुळे त्या ठिकाणी पायाभूत सुविधांचा विकास झाल्याने इतर आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय उद्योगांना प्रेरणा व चालना मिळते. देशातील भांडवली गुंतवणूक वाढते. इतर दुय्यम सेवा व उद्योगांचा विकास होतो. आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्मण होऊन जागतिक ऐक्य व शांतता निर्माण होते. राजकीय ताणतणाव कमी होऊन, राष्ट्रीय एकात्मकता, बंधुभाव व सलोखा वाढीस लागतो. सामाजिक आचार, विचार, रूढी परंपरा व संस्कृतीची देवाणघेवाण होते. शहर व ग्रामीण भाग यातील संपत्तीचा असमतोल नष्ट करता येतो. स्थानिक लोकांना नोकऱ्या व रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावते. छोट्या व्यवसायांची वाढ होते.

कुशल, अकुशल व्यक्तींनाही अर्थाजनाचा मार्ग उपलब्ध होतो. स्थानिक लोकांना पायाभूत सुविधा उपलब्ध होतात.

महाराष्ट्राला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला असल्याने या राज्याला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रात माथेरान, लोणावळा, खंडाळा, चिखलदरा, भंडारदरा यासारखी थंड हवेची ठिकाणे पर्यटनासाठी उपलब्ध आहेत. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी हे तर महाराष्ट्राचे काश्मीर मानले जाते. त्यामुळे या दोन शहरांना सर्वाधिक पर्यटक भेट देत असतात. पाचगणी हे सह्याद्रीच्या पर्वतरांगांवरील एक थंड हवेचे ठिकाण. शिवाय एक शैक्षणिक केंद्र म्हणून परिचित आहे. त्यामुळे या शहराला दरवर्षी लाखो पर्यटक विविध कारणांनी भेट देत असतात. यातूनच पाचगणी हे एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे. या पर्यटनामुळे या शहराचा आर्थिकदृष्ट्या कायापालट घडून आला आहे. परंतु त्याचबरोबर काही समस्याही निर्माण झालेल्या दिसतात. त्यामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास ही एक गंभीर समस्या बनली आहे. दररोज येणाऱ्या हजारो पर्यटकांच्या वाहनांमुळे ध्वनी प्रदुषण, हवेचे प्रदुषण व घन कचऱ्याचा प्रश्न निर्माण होतो. वाढत्या पर्यटकांमुळे त्यांना सुविधा पुरविणाऱ्या हॉटेल, निवास व्यवस्था यामुळे जंगलतोड होऊन सिमेंट कॉंक्रीटची जंगले उभारली जाऊ लागल्याने वातावरणावर परिणाम जाणवू लागला आहे. नैसर्गिक सौंदर्याला पूर्णपणे बाधा आणल्याचे चित्र दिसते आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्थानिक संस्कृतीचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. उच्चभ्रू पर्यटकांमुळे त्यांची वेशभूषा, खानपान, मद्यपान, धुम्रपान याचा अवलंब स्थानिक तरुणांनी केल्यामुळे भावी पिढीवर त्याचे परिणाम झालेले पहायला मिळतात. एकंदर पर्यटनामुळे फायदा–तोटा झाला असला तरी या भागाचा सर्वांगिण विकास झाला आहे .

ब) बेल एअर सॅनिटोरियम (Bel-Air Sanatorium) :

भारतात सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून क्षयरोग हा एक महत्त्वाचा आजार मानला जातो.[३१] समाजातील क्रियाशील व उत्पादक वयोगटाच्या व्यक्तींना हा आजार होत असल्याने देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीस खीळ बसते. त्यामुळे क्षयरोगाने आजारी व

मृत्युमुखी पडण्याचे प्रमाण कमी करणे व क्षयरोगाचा समाजातील संसर्ग थांबविणे, क्षयरोगी शोधून काढणे, त्याला पूर्ण बरा करणे यासाठी देशात सुधारित क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम अलिकडे राबविले जात आहे. पाचगणी येथे हेच काम डॉ. रूस्तुमजी बिलिमोरिया यांनी इ. स. १९१४ मध्येच क्षयरोगाचे गांभीर्य ओळखून सुरू केले होते. आज बिलिमोरिया यांनी सुरू केलेल्या कार्याला शंभर वर्ष पूर्ण झाली असली तरी हे काम सेवाभावी वृत्तीने व मोठ्या विस्ताराने सुरू आहे.

पाचगणीचे हवामान बाराही महिने आल्हाददायक, उत्साहवर्धक, स्वच्छ असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांचा थकवा निघून जातो व इथल्या वातावरणात प्रकृती उत्तम बनते. पाचगणीतील तिन्ही ऋतूतील हवामान कोरडे असल्याने ही हवा दमेकरी लोकांना अत्यंत उपयुक्त समजली जाते. याच हवामानाचा उपयोग, इथले निसर्गसौंदर्य, शांत, स्वच्छ वातावरण क्षय रूग्णासाठी योग्य असल्याने ओळखून डॉ. रूस्तुमजी बोमनजी बिलिमोरिया यांनी इ. स. १९१४ मध्ये आपले बेल–एअर सॅनिटोरियम सुरू केले.[३२]

महाराष्ट्रात प्रामुख्याने प्राकृतिक दृष्टिकोनातून विचार करीता क्षयरूग्णासाठी उपचार केंद्र आज निरनिराळ्या ठिकाणी सुरू आहेत. परंतु पाचगणीतील क्षयरूग्णांसाठी सुरू केलेले उपाचार केंद्राचे वैशिष्ट्य हे वेगळे आहे. ही एक सेवाभावी संस्था म्हणून आज काम करीत आहे. आज हे हॉस्पिटल आपल्या कर्तृत्वाने व सेवाभावी वृत्तीमुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे. सुरुवातीला एक खाजगी संस्था असणारी नंतर ट्रस्टमध्ये रूपांतर झाली व १९६५ पासून इंडियन रेड क्रॉस सोसायटी महाराष्ट्र राज्य शाखचा, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली चालविली जाते.

६.६ बेल एअरची स्थापना :

बेल एअर ही क्षयरोगासंबंधी कार्य करणारी सॅनिटोरियम आहे. या सॅनिटोरियमची स्थापना प्रथम पुणे येथे एका छोट्याशा बंगल्यात इ. स. १९१२ मध्ये करण्यात आली. याचे संस्थापक डॉ. रूस्तमजी बोमानजी बिलिमोरिया हे होते.[३३] त्यांनी प्रथम सुरू केले. त्यानंतर हे

सॅनिटोरियम त्यांनी इ. स. १९१४ मध्ये पाचगणीत स्थलांतरित केले तेव्हापासून आजपर्यंत हे केंद्र उत्तम प्रकारे आपले कार्य करीत आहे.

इतिहास :

स्वातंत्र्यपूर्व काळात क्षयरोगासारख्या साथीचा रोग भारतात मोठ्या प्रमाणात पसरला होता. अशा परिस्थितीत डॉ. बिलिमोरिया हे एक हृदयरोगतज्ज्ञ म्हणून परिचित होते. परंतु घरातीलच एक क्षयरोगी बरा करण्यासाठी या इलाजाकडे वळले व ते पुढे क्षयरोगतज्ज्ञ म्हणून नावारूपाला आले.

पाश्चात्य देशाच्या धर्तीवर क्षयरोगासाठी सॅनिटोरियम हे आल्हाददायक व आरोग्यदायी वातावरणात असावे ही कल्पना त्यांनी मांडली. त्यानुसार बेल एअर ही सॅनिटोरियम पाचगणीसारख्या स्वच्छ, आल्हाददायक वातावरणात हलविण्याचे ठरविले. तेव्हा डॉ. बिलिमोरिया यांना सर दोराबजी टाटा यांच्या मालकीची डालकेट इस्टेट.[३४] ही विस्तीर्ण असे ४४ एकर जागा डॉ. बिलिमोरिया यांच्या महान सामाजिक कार्यासाठी देणगी म्हणून देऊन टाकली.[३५] त्या जागेत बेल एअर २ डिसेंबर १९१४ मध्ये स्थलांतरित झाली. अशा प्रकारे बेल एअर हे क्षयरूग्णांसाठी काम करणारी मुंबई ईलाख्यातील पहिली व भारतातील दुसरे सॅनिटोरियम होते. (सॅनिटोरियम म्हणजे फुफुसाचे विकार असणाऱ्या लोकांच्यासाठी उत्तम हवेच्या ठिकाणी असणारे रूग्णालय). पाचगणीत ज्या जुन्या इमारती होत्या त्यापैकी डालकेटची बिल्डिंग पाचगणीतील एक जुनी इमारत म्हणून ओळखली जाते.[३६] ही जागा शहराच्या एका टोकाला आहे. टेबललँडच्या उत्तर पूर्व तर शहराच्या दक्षिण पूर्व दिशेला ही जागा असून दुसऱ्या दोन बाजूपैकी एका बाजूला खोल दरी तर दुसऱ्या बाजूला उंच डोंगर, त्यामुळे आपोआपच गार वारा आणि धुळीपासून याचे निसर्गतहा रक्षण होते. अशा अत्यंत योग्य ठिकाणी बेल–एअरची उभारणी झाली आहे.

६.७ संस्थापक डॉ. बिलिमोरिया :

बेल एअर सॅनिटोरियमचे संस्थापक डॉ. रूस्तुमजी बोमानजी बिलिमोरिया यांचा जन्म १३ मे १८८२ ला मुंबई येथे एका पारशी कुटुंबात झाला. रूस्तुमजींचे पिता हे Bombay

Daying & Manufacturing Company मध्ये सेक्रेटरी होते. रूस्तुमजी लहानपणापासूनच अतिशय बुद्धिमान व हुशार होते. मुंबई येथील ग्रँट मेडिकल कॉलेजमधून एम. डी. ची डिग्री घेतली. त्यानंतर त्यांनी हृदयरोग तज्ज्ञ म्हणून कामाला सुरुवात केली. हे काम करत असताना त्यांनी अनेक क्षयरुग्णांवर उपचार केले. त्यात त्यांना चांगले यश मिळाले. त्यामुळे ते नंतर टी. बी. स्पेशालिस्ट म्हणून ओळखले जाऊ लागले.[३७] त्यांचे मुख्य ध्येय होते देशातील वेगाने पसरणाऱ्या या रोगाला रोखणे. त्यांच्या संशोधनाने त्यांना या रोगावर इलाज नक्की होऊ शकतो ही खात्री होती. ती त्यांनी साध्य करून दाखवली. त्यांच्या या कार्याला १९३६ मध्ये Kaiser-I-Hind या सुवर्णपदकाने सन्मानित केले.[३८] देशातील क्षयरोगावर नियंत्रण मिळविल्याबद्दल त्यांना ब्रिटीश गव्हर्नमेंटकडून MBE हा सन्मान मिळाला आणि १९६१ मध्ये भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मभूषण हा सन्मानही मिळाला.[३९]

६.८ बेल एअरच्या सुरूवातीच्या कालखंडातील अडचणी :

बेल एअर सॅनिटोरियम इ. स. १९१४ मध्ये पाचगणी येथील 'डालकेट इस्टेट' मध्ये स्थलांतरित केले. परंतु येथे सुरूवातीला फार मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. त्यामध्ये पाचगणीमध्ये स्थायिक झालेले ॲग्लो इंडियन व आसपासच्या लोकांनी याला तीव्र विरोध केला. कारण क्षयरोगी पाचगणीत आले तर या रोगाचा प्रसार पाचगणीत व आसपासच्या परिसरामध्ये होईल ही भिती त्यांना वाटत होती. तेव्हा सरकारने लंडन स्थित हॉफकीन इन्स्टीट्युटचे मेजर लिटन यांना बेल एअरची परिस्थिती पाहून अहवाल सादर करण्यास सांगितले.[४०] अहवाल दिला की सरकारने या क्षयरोग नियंत्रण कार्यासाठी परवानगी द्यावी. पुढे ॲग्लो इंडियन लोकांचा असणारा विरोध मावळला व हे सॅनिटोरियम सुरळीतपणे सुरू राहिले.

६.९ उपचार पद्धती :

केंद्रशासनाने १९६२ साली राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू केला.[४१] महाराष्ट्रात १९९७ पासून टप्याटप्याने हा कार्यक्रम राबविण्यास सुरूवात केली. देशात दररोज १००० पेक्षा जास्त म्हणजे दर मिनिटाला दोन व्यक्तीचा मृत्यू क्षयरोगाने होतो.[४२] आज ही भयानक

परिस्थिती आहे तर १९१२ मधील परिस्थिती काय असेल. अशा वेळी बेल एअरने क्षयरोगावर उपचार करण्यासाठी पुढाकार घेतला.

क्षयरूग्णांसाठी लागणारी उपचार पद्धती सुरूवातीच्या काळात वैद्यकीय उपचाराबरोबर त्याला लागणारी विश्रांती, त्याचा योग्य व समतोल आहार, त्याचा दैनंदिन जीवनक्रम यासंबंधीही काळजी घेतली जात होती. बेल–एअरमध्ये १९३२ मध्येच X-Ray Plant निदानासाठी उपलब्ध होता.[४३] याशिवाय आवश्यक वाटल्यास Ultra-Violet Rasys and Ultra-Short Wave Diathermy वापर केला जाई. तसेच गरज पडल्यास Operation Theatre मध्ये Artificial Pneumo – Thorax and Phrenic Nerve Operations केली जात.

क्षयरोगाच्या निदानासाठी बेल एअरची स्वत:ची लॅबोरेटरी आहे. १९१२ ते १९३७ या काळात या लॅबमधून वर्षाला पंधरा हजार रोग तपासणीचे रिपोर्ट पाठविले जात. म्हणजेच संपूर्ण महाराष्ट्रात क्षयरूग्णांसाठी कार्य करणारी ही एकमेव संस्था होती. बेल एअरमध्ये १९१६ मध्ये Artificial Penumothorax Treatment सुरू केली होती. जी केवळ भारतातच नव्हे तर पूर्वेकडील देशामध्येही ही Treatment वापरली जात नव्हती. त्यावेळी बेल एअरमध्ये ही उपचार पद्धती सुरू केली होती.[४४]

आज महाराष्ट्र सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या क्षयरोग उपचारासाठी आवश्यकतेप्रमाणे व उपचारपद्धतीनुसार जी प्रक्रिया राबविली जाते ती इ. स. १९३० पासून बेल एअरने अंमलात आणून क्षयरूग्णास जगण्याचा एक नवा मार्ग दाखवून दिला.

सर्व जातीधर्मासाठी खुले :

बेल एअर हॉस्पिटल हे पारशी व्यक्तीने सुरू केलेले असले तरी या हॉस्पिटमध्ये सर्व जातीजमातीच्या व धर्माच्या लोकांवर उपचार केले जातात. यामध्ये पारशी, ख्रिश्चन, हिंदू, मुस्लिम, युरोपियन, जपानीज, ज्यू, अरब, आफ्रिकन, इराणी, रशियन, जर्मन वंशीय लोकांवरही उपचार केले आहेत. म्हणजे केवळ हे हॉस्पिटल महाराष्ट्रापुरते किंवा भारतापुरते

मर्यादित राहिले नाही तर जागतिक स्तरावरील उपचार केंद्र म्हणून ओळखले जाते. या आरोग्यधाममध्ये १९६२ मध्ये उपचार करून घेणाऱ्या रूग्णांची संख्या खालीलप्रमाणे होती.[४५]

विविध धर्मीय लोक	रूग्णांची संख्या
हिंदू	१७२
मुस्लिम	१६
पारशी	२३
ख्रिश्चन	१९
ज्यू	२

(बेल एअर हॉस्पिटल रेकॉर्ड १९६२)

या हॉस्पिटलला ९५% पारशी लोकांनी मदत केली आहे. तरीही यामध्ये ६५% लोकांना अल्प मोबदल्यात सेवा दिली जाते तर ३५% लोकांना पूर्णत: मोफत सेवा दिली जाते.

६.१० उपचार पद्धतीतील वेगळेपण :

१. उपचारानंतरही रूग्णाला प्रशिक्षण :

बेल एअर आरोग्यधाम मधील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे इथे उपचारासाठी आलेल्या रूग्णांना दिले जाणारे प्रशिक्षण. यामध्ये सर्वात प्रथम टी. बी. हा रोग होण्याची कारणे, त्याची काळजी व रोगाची माहिती सांगितली जाते. यासाठी सुसज्ज ग्रंथालय, शरीररचनाशास्त्र, मानसशास्त्र आणि आरोग्यशास्त्र या विषयावर व्याख्याने आयोजित केली जातात. त्यासंबंधी होणाऱ्या आजाराची माहिती दिली जाते. त्याच्याशी संबंधित मलेरिया, प्लेग, चिकनगुन्या, याविषयी माहिती सांगितली जाते. या आरोग्यविषयक एक जरनलही काढले जाते. त्याचे नाव आहे 'The Spark' हे इंग्लिश, मराठी, हिंदी या तिनही भाषेतून प्रकाशित होते.[४६]

२. अद्यावत ग्रंथालय :

बेल एअर आरोग्याधाममध्ये येणाऱ्या रूग्णाला केवळ आजाराची चिंता करत न बसता त्याने आपल्या आजारासंबंधी माहिती जाणून घ्यावी, त्यासंबंधी विपुल वाचन करून मनात असणारी भिती दूर करावी. तसेच आपला रिकामा वेळ सत्कारणी लावावा यासाठी या

परिसरात सुसज्ज ग्रंथालयाची निर्मिती केली आहे. या ग्रंथालयात विज्ञानाधिष्ठीत व इतर स्वरूपाची पुस्तके आहेत.

३. रूग्णाला मिळणारा आत्मविश्वास :

इथे येणाऱ्या रूग्णांनी केवळ उपचार म्हणून विश्रांती घेण्यासाठी येणे किंवा झालेल्या आजाराबद्दल पश्चाताप करत बसणे एवढी मर्यादित विचारसरणी न ठेवता मिळालेले आयुष्य आनंदात व मजेत जगावे. तसेच या रोगामुळे आयुष्यात आपण काही करू शकणार नाही असा विचार न करता या आजारातून आपण पूर्ण बरे होणार आहोत व इतरांप्रमाणे सर्वसामान्य आयुष्य तर जगणार आहोत. शिवाय जे स्वप्न, इच्छा आकांक्षा बाळगल्या होत्या त्या जिद्दीने पूर्ण करता येतात. हे येथून बरे होऊन बाहेर पडलेल्या रूग्णांनी दाखवून दिलेले आहे. त्यामध्ये एका रूग्णाने ICS परीक्षा उत्तीर्ण झाला. दोन महायुद्धात सहभागी होणारा IMS मध्ये भरती झालेला व देशासाठी वैभवशाली कामगिरी करणारा मिलेटरी ऑफिसर याच सॅनिटोरियममधून उपचार घेऊन बाहेर पडला होता. याशिवाय मेडिकल, इंजिनिअरिंग, कॉमर्स व विविध कोर्स करून मोठमोठ्या पदावर काम करून रिटायर झालेले लोकही पहायला मिळतात.[४७]

४. करमणूक केंद्र :

इथल्या पेशंटला केवळ खोलीत डांबून न ठेवता त्यासाठी करमणुकीचे कार्यक्रम, नाटके, सिनेमा, छोट्या सहलींचेही आयोजन केले जाते. एवढेच नव्हे तर या पेशंटसाठी छोटे व्होकेशनल कोर्सेस चालविले जातात. त्यामध्ये जाळीचे नक्षीचे काम, फोटोग्राफी, कशिदा, टेलरिंग, भरतकाम व इतरही कामे शिकविली जातात. जेणेकरून पेशंट रिकामा राहणार नाही. यासाठी रूग्णाला कामाबरोबर मनोरंजनात वेळ जाईल याचीही तजविज इथे केली जाते.

५. निसर्गाचा आनंद घेत उपचार :

बेल एअर परिसरात सुंदर बगीचा फुलविला आहे. या बागेतील फुलझाडे, वेगवेगळ्या वेली, त्यावर बागडणारी फुलपाखरे, पक्षी, विविधरंगी फुले पाहिली की पेशंटचे मन प्रसन्न होते. हे लक्षात घेऊन इथे पेशंटला मोकळ्या जागेत फिरावे, निसर्गाचा, स्वच्छ सुंदर हवेचा

आनंद घ्यावा यासाठी पेशंटला बागेत पाठविले जाते. त्यामुळे इथला पेशंट निसर्गाच्या सानिध्यात ठणठणीत बरा होतो. संपूर्ण भारतभरातून रूग्ण इथली वेगळ्या उपचाराची पद्धत ऐकून इथे येऊन उपचार घेऊ लागले आहेत.

६. आहाराची काळजी :

इथे येणारा पेशंट हा वेगवेगळ्या समाजातील, संस्कृतीतील असल्याने प्रत्येकाची खाण्यापिण्याच्या पद्धती, चव, पदार्थ, यांच्यात भिन्नता असते. तरीही बेल एअर हॉस्पिटलच्या मेसमध्ये या सर्व गोष्टींची जाणीव ठेऊन जेवण तयार केले जाते व प्रत्येक पेशंटच्या आवडीनुसार अतिशय स्वच्छ व आरोग्यपूर्ण असे जेवण दिले जाते. अन्न विभागावर देखरेख करण्यासाठी खास न्यूट्रीशियन (Nutrition) म्हणून हैद्राबादचे Dr. M. B. Daver यांची नियुक्ती केली आहे.[४८]

७. क्षयरूग्णांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास :

आरोग्य विभागाने महाराष्ट्र शासनाकडून एक महत्त्वपूर्ण बदल करून घेतला. गुलेस्तान बिलिमोरिया यांनी शासनाला सतत पाठपुरावा करून क्षयरोग विभागात सर्वात महत्त्वाचे उपकरण म्हणजे थुंकी तपासणी यंत्र हे स्टेनलेस स्टीलमध्ये असणारे साधन घेऊन त्यासाठी स्वतंत्र बिल्डींगची सोय केली. ज्यामध्ये आज एकावेळी चारशे थुंकी नमुने तपासले जाऊ शकतात अशी व्यवस्था केली. हा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी केंद्रशासनाची मदत घेतली.

अ) The Salarium : सूर्यकिरणात बसण्यासाठी केलेली काचेची खोली :

क्षयरूग्णासाठी शक्तीवर्धक ठरणारी नैसर्गिक उपचार पद्धती म्हणजे कोवळे उन किंवा सूर्यप्रकाश. त्यासाठी खास सूर्यकिरणे आत येऊ शकतील अशा विशिष्ट पद्धतीची काचेची खोली असणे गरजेचे असते. अशी खोली या हॉस्पिटलमधे १९३५ मध्येच उपलब्ध होती.[४९] आजही ही उपचार पद्धती इथे सुरू आहे.

ब) The X-ray Plant क्ष–किरण विभाग :

इ. स. १९१६ पूर्वी रूग्णावर उपचारासाठी हवेचा दाब असलेल्या यंत्राचा वापर करावा लागत होता. परंतु १९३९ मध्ये X-ray मशीनमुळे तसेच Ultra Violet किरणांचा

वापर करून पेशंटला उपचार करण्याची पद्धत प्रथम इथे सुरू झाली. हे केवळ भारतात नव्हे तर संपूर्ण पूर्वेकडील देशामधील एकमेव केंद्र होते.[५०] सध्या या विभागात 500 M. A. च्या X - ray मशीन बरोबरच Roentge-nographic 5 x 4 चे युनिटही बसविले आहे. शिवाय दोन Screening machines आणि छोटे X - ray मशीनही बसविले आहे. ज्याचा वापर अचानक उद्‌भवणाऱ्या प्रसंगात ताबडतोब करता येईल. यादृष्टीने शस्त्रक्रिया विभागातच याची सोय केली आहे.

क) प्रयोगशाळा :

या हॉस्पीटलमध्ये क्षयरोग निदानासाठी प्रयोगशाळाही उपलब्ध आहे. इथे दरवर्षी सुमारे १५,००० थुंकीचे नमुने तपासले जातात. शिवाय Blood, Sputum, Urea, Farces याचीही तपासणी या प्रयोगशाळेत केली जाते. त्यावरून रूग्णाची उपचार पद्धती ठरविली जाते. त्यामुळे या प्रयोगशाळेतून शास्त्रीय निरनिराळे प्रयोग करून अनेक नवे शोध या आजारासंबंधी लावले आहेत व त्यावर योग्य ते उपचार व औषधेही तयार केली आहेत. हे सर्व साध्य झाले इथे असणाऱ्या वेगवेगळ्या साधनामुळे ज्यामध्ये Spirometer, Basal Metaboliometer, electrophotometer, biophotometer, falling drop densiometer, flame photometer, gas analysis इ. अशा पद्धतीची महाराष्ट्रातील ही एकमेव प्रयोगशाळा आहे. या प्रयोगशाळेत २०१२ या शताब्दी वर्षात रक्ताचे व इतर नमुने तपासले. त्याची आकडेवारी पुढीलप्रमाणे –

रक्ताचे नमुने	संख्या
Sedimentations	१,००२
तपासणी	१,८७५
रक्तगट	११०
साखर	२३
थुंकीचे नमुने	१५,०००
क्षय रूग्ण तपासणी	३,००६
केंद्रीकरण पद्धत	६५
युरीन टेस्ट	६,४३४
इतर टेस्ट	१,६१२

(संदर्भ – २०१२ शताब्दी स्मरणिका)[५१]

म्हणजेच या रूग्णालयात कोणत्याही शासकीय रूग्णालयापेक्षा जास्त तपासणी केली जाते व प्रयोगशाळाही सुसज्ज असलेली दिसते.

बेल एअरचे महत्त्व :

भारत सरकार क्षयरोग नियंत्रणासाठी युद्ध पातळीवर काम करीत आहे. हेच काम स्वातंत्र्यपूर्व काळात कोणत्याही सोयीसुविधा नसताना डॉ. बिलिमोरिया यांनी क्षयरोगावर नियंत्रण आणण्यासाठी १९१२ पासून बेल एअरच्या रूपाने सुरूवात केली. १९३७ पर्यंत बेल एअर हे मुंबई परगण्यातील एकमेव व देशातील दुसरे सॅनिटोरियम होते. आज अनेक नवीन नवीन शोधामुळे क्षयरोग निदानाच्या ज्या पद्धती वापरल्या जातात त्या पद्धती बेल एअरमध्ये १९१४ ते १९३७ पर्यंत वापरल्या जात होत्या.

सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम १९९३ पासून सर्वच पातळीवर राबविण्यात येत आहे. परंतु क्षयरूग्ण हा औषधासाठी, त्याच्या उपचारासाठी पाहिजे तेवढा प्रतिसाद देत नाही. अशावेळी स्वयंसेवी संस्था समाजातील तळागाळाच्या व्यक्ती–वस्तीपर्यंत जाऊन पोहचतात व सेवा पुरवितात. परंतु बेल एअरमध्ये या गोष्टी पन्नास वर्षापूर्वीच केल्या जात होत्या. आज सरकारच्या विविध योजना आहेत. त्यासाठी अनुदान आहे. परंतु बेल एअरने या सर्व गोष्टींसाठी सरकारी अनुदानाची वाट पाहिली नाही. तर देणगीदारांच्या देणगीवर बेल एअर भारतभर प्रसिद्धीस आले होते.

शिवाय अलिकडे भारताला भेडसावणारा एड्स हा रोग होय. एच. आय. व्ही. बाधित रूग्णांमध्ये क्षयरोगाची बाधा लवकर होऊ शकते. अशा रूग्णांवरही २००१ पासून बेल एअरमध्ये उपचार केले जातात. या रूग्णांसाठी स्वतंत्र सोय करण्यात आली आहे. जे रूग्ण कॅट–१ व कॅट–२ या औषधोपचाराचा दाद देत नाहीत अशा रूग्णांना एम. डी. आर. टी. बी. रूग्ण म्हणून ओळखले जाते. या रोगाच्या निदानासाठी महाराष्ट्रात सध्या एस. टी. डी. सी. नागपूर, हिंदूजा हॉस्पिटल मुंबई, जे. जे. हॉस्पिटल मुंबई, व एस. टी. डी. सी. पुणे या चार ठिकाणी या मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आहेत. अशी प्रयोगशाळा १९८० पूर्वीच बेल एअरमध्ये उभी केली होती व उपचार केले जात होते.[५२]

शेवटच्या टप्प्यावर असणाऱ्या क्षयरूग्णाला डॉटस प्लस म्हणून ओळखले जाते. या रूग्णावर महाराष्ट्रात केवळ पुढील सहा ठिकाणी उपचार केले जातात. नागपूर, अकोला,

औरंगाबाद, मुंबई, पुणे आणि नाशिक येथे. बेल एअरमध्ये अशाही रूग्णांवर उपचार केले जातात.[५३] म्हणजेच स्वातंत्र्यानंतर शासन आज जे उपाययोजना राबवत आहे त्या उपाययोजना बेल एअरमध्ये इ. स. १९१४ पासून राबविल्या जात होत्या. यावरून हे रूग्णालय काळाच्या पुढे होते हे लक्षात येते.

६.११ बेल–एअरचे व्यवस्थापन :

बेल–एअर हे हॉस्पिटल प्रथम डॉ. बिलिमोरिया यांनी इ. स. १९१२ साली सुरू केले. इ. स. १९१४ मध्ये हे पुण्यावरून पाचगणी येथे स्थलांतरित केले. इ. स. १९१२ ते इ. स. १९२६ पर्यंत काही डॉक्टर्सच्या मदतीने हे हॉस्पिटल खाजगी व्यवस्थापनेतून सुरू ठेवले. जसे याची आर्थिक व इतर दृष्टिकोनातून परिस्थिती सौम्य बनली तसे ह्या हॉस्पिटलनेच व्यवस्थापन ट्रस्टकडे सुपूर्त करण्याचा विचार घेतला.

इ. स. १९२६ साली हॉस्पिटलची पूर्ण जबाबदारी बोर्ड ऑफ ट्रस्टकडे कायमस्वरूपी सोपविण्यात आली. पहिले चेअरमन म्हणून Sir Jamsetjee Jeejeebhay 3rd Bart, K. C. S. I. यांची नियुक्ती केली. शिवाय सात लोकांचे सल्लागार मंडळ स्थापन केले. या हॉस्पिटलच्या खर्चासाठी Bai Jerbai Nowroji N. Wadia यांच्याकडून देणगीच्या स्वरूपात फंड उपलब्ध झाला व इतरही देणगी मिळू लागली. सन १९६५ पर्यंत या ट्रस्टकडून या हॉस्पिटलचे व्यवस्थापन पाहिले जात होते.[५४] त्यानंतर या हौंस्पिटलचे व्यवस्थापन इंडियन रेडक्रॉस सोसायटीकडे इ. स. १९६५ मध्ये सुपूर्त केले. कारण येथे येणाऱ्या रूग्णांना कमीत कमी किंमतीत व मोफत उपचार मिळावेत यासाठी याला शासनाची मदत मिळाली तर मोठ्या संख्येने येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार करता येतील ही त्यांची अपेक्षा होती.

इ. स. १९६५ ते १९८० या काळात हॉस्पिटलने अत्यंत वेगवान प्रगती केली. येथील बेडस्ची संख्या १३५ वरून २५० पर्यंत वाढविली.[५५] १९८० नंतर या हॉस्पिटलच्या आर्थिक परिस्थितीला उतरती कळा लागली. अनेक अडचणी समोर आल्या. त्यामुळे I. R. C. S. यांना हॉस्पिटल पूर्वपदावर आणणे अशक्य वाटू लागले.[५६] अशा परिस्थितीत इ. स. १९९४ साली फादर टॉमी पाचगणीत एक पर्यटक म्हणून आलेले असताना या हॉस्पिटलची दुरावस्था त्यांना पाहवली नाही व त्यांनी याची जबाबदारी स्विकारण्याची तयारी दाखविली.

Billimoria Block
(Office)

Missionary Congregation of the Blessed Sacrament (M. C. B. S.) 1994 :

M. C. B. S. चे सदस्य असणारे फादर टॉमी यांनी Indian Red Cross Scoiety च्या नियंत्रणाखाली राहून त्यांच्या सोसायटीतर्फे या हॉस्पिटलची परिस्थिती बदलण्याचा करार केला व त्यांनी अत्यंत मेहनतीने ह्या हॉस्पिटलची पुर्नउभारणी केली व इ. स. २००१ मध्ये ह्याचे व्यवस्थापन पुन्हा इंडियन रेडक्रॉस सोसायटीकडे सोपविण्यात आले. परंतु या हॉस्पिटलचे डायरेक्टर म्हणून फादर टॉमी हेच काम पहात आहेत.[५७]

व्यवस्थापनात कितीही बदल झाला तरी या हॉस्पिटलची सेवाभावी वृत्तीत फरक पडला नाही. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात मुंबई इलाख्यातील एकमेव हॉस्पिटल होते. आज संपूर्ण भारतातील एकमेव सुसज्ज हॉस्पिटल म्हणून याची ख्याती कायम टिकून आहे.

६.१२ बेल एअरचे बदलते स्वरूप :

आज बेल एअर ही एक सुसज्ज जनरल हॉस्पिटल म्हणून संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे. येथे २५० कॉटची सोय आहे. त्याचबरोबर General Medicine, Orthopedics, Pediaterics, Gynaecology, TB & HIV Medicine इ. विभाग तर आहेतच. याशिवाय आठवड्यातून काही दिवस चालणारे Clinics आहेत.त्यामध्ये Optholmology, Skin of VD, Dental Clinic, ICU विभाग, Operation Theatre जे संपूर्ण जिल्ह्यातील उत्कृष्ट विभाग आहेत. तसेच बेल एअरमध्ये उत्तम दर्जाचे Pathological Lab, X-ray, ECG and Sonography सेंटर आहे. या सर्व विभागासाठी चोवीस तास सेवा देणारा मेडिकल स्टाफ उपलब्ध आहे. बेल एअर हे सॅनिटोरियम व हॉस्पिटल यांच्यामधील दुवा आहे.

बेल एअरचे उपविभाग :

अ) Bel-Air Wai, Annexe : - पाचगणी येथील बेल–एअर हॉस्पिटलचे दुसरे उपकेंद्र वाई येथे इ. स. १९२६ मध्ये सुरू करण्यात आले.[५८] कारण त्याकाळात सिरियस पेशंटला एवढ्या उंच प्रदेशावर आणणे सहज शक्य नव्हते. तसेच पाचगणीतील पावसाळ्यात

हवा दमट होत असल्याने किंवा रूग्णांसाठी योग्य नसल्याने रूग्णांना पाचगणीपासून १००० फूट खाली असणाऱ्या वाई या ठिकाणी हलवावे लागे. इथला पाऊसही सरासरी २० इंच पडत होता. डॉ. बिलिमोरिया यांनी त्या काळात रूग्णांना होणारा त्रास कमी करण्यासाठी वाई उपकेंद्र सुरू केले.

ब) HIV/AIDS Health Care Centre :- पाचगणी येथील बेल एअर हॉस्पिटलमध्ये सुरू झालेले HIV/AIDS and Community Care Centre हे सेंटर आज हजारो HIV बाधितांना आधारस्तंभ ठरले आहे. संसर्गितांना मोफत सेवा देणारे हे केंद्र संपूर्ण भारतातील पहिले व आशिया खंडातील दुसरे केंद्र ठरले आहे.

नर्सिंग कॉलेज : –वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावी कार्य करणाऱ्या नर्सची मोठी गरज असते. त्या नर्स प्रशिक्षित असणेही महत्त्वाचे असते. हे ओळखून बेल एअरने Indian Red Cross Society आणि UTC College of Nursing & Global Health Leadership's Office at Chicago, USA यांच्या सहकार्याने नर्सिंग कॉलेज सुरू केले आहे. Univeristy of Illimois, Chicago. हे कॉलेज भारतातील पहिले कॉलेज आहे जे अमेरिकन विद्यापीठाशी संलग्न आहे.[५९]

६.१३ बेल एअरचे देणगीदार :

बेल एअर हॉस्पिटलच्या उभारणीसाठी समाजातील अनेक घटकांनी हातभार लावला आहे. आजही या हॉस्पिटलला थोर देणगीदार, ट्रस्ट व इथे बरे होऊन बाहेर पडणाऱ्या पेशंटकडून मोठी आर्थिक मदत मिळत असते. या हॉस्पिटलला सर्वात जास्त देणगी पारशी समाजाकडून दिली गेली आहे. इ. स. १९१४ ते इ. स. १९३७ या कालावधीत बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये एक, दोन इमारती सोडता बाकीच्या सर्व इमारती पारशी लोकांनी आपल्या प्रियजनांच्या स्मरणार्थ देणगी म्हणून दिल्या आहेत. इतर समाजातील केवळ ५% लोकांनी थोडीफार मदत केली आहे. काही रूग्ण त्यांना उपचार मिळाल्यांतर येथे सेवाभावी वृत्तीने जे काम चालते ते पाहून आपल्याकडूनही थोडीफार मदत व्हावी असे वाटते त्यातून काही रूग्णांनी इथून बाहेर पडताना पुढीलप्रकारे मदत केली आहे.

बेल एअर मधील रूग्ण केवळ देगणी देऊन थांबले नाहीत तर प्रसंगी सामाजिक कार्यालाही हातभार लावला आहे. इ. स. १९४४ मध्ये दुसऱ्या महायुद्धात हिरोशिमा व नागासाकी येथील बॉम्ब हल्ल्यात जखमी झालेल्या लोकांसाठी या हॉस्पिटलमधील गरीब रूग्णांनी आपल्या जवळ असणारे पैसे या लोकांच्या मदतीसाठी, त्यावेळचे गव्हर्नर Sir John Colville यांच्याकडे दिले. तो निधी तीन हजार रुपये इतका होता.याशिवाय महापूर व इतर सामाजिक कार्याच्यावेळीही इथल्या रूग्णांनी मदत केली आहे. यासंबंधी Holy Koran म्हणतात, "Prayer carries us half way to God, fasting brings us to the door of His Palace, and alms- giving procures us admission". प्रार्थना आपल्या देवाच्या दारी जाण्यासाठी निम्मा मार्ग दाखविते, उपाय त्याच्या दरवाज्यापर्यंत पोहचविते तर धर्मदाय गोष्टीने त्याच्या जगात प्रवेश मिळतो.[६०]

सरकारकडून मिळणारे अनुदान :

बेल एअर हॉस्पिटल हे खाजगी ट्रस्टकडून चालविले जात असल्याने सुरूवातीला या हॉस्पिटलसाठी कोणतेही सरकारी अनुदान किंवा मदत मिळत नव्हती. तरीही इथे काम करणारे डॉक्टर्स व ट्रस्टी यांच्या प्रयत्नांमुळे सरकारकडून काही स्वरूपात मदत मिळाली. त्यामध्ये १९६५ मध्ये डॉ. बोमी बिलिमोरिया यांनी केंद्र शासनाकडून काही रक्कम अनुदान म्हणून मंजूर करून घेतली.

इ. स. १९९३ पासून शासनाचे सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सर्व पातळीवर राबविले जाऊ लागले. त्यासाठी शासनाकडून जे अनुदान जाहीर केले आहेत ते सर्व अनुदान सध्या बेल एअरला मिळत आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाच्या Public Health Care Funding च्या माध्यमातूनही अनुदान प्राप्त होते.

महाराष्ट्र शासनाकडून मिळणारे अनुदान

Maharashtra State Anti T. B. Association यांच्याकडून प्राप्त झालेले अनुदान[६१]

साल	रक्कम रुपये
१९९७	२,००,०००
१९९८	३,००,०००
२०००	८,०२,७३१
२००५	१०,००,०००
२००६	५,००,०००
२००८	२,००,०००
२०१०	१०,००,०००
२०१२	१२,००,०००

(संदर्भ : बेल एअर हॉस्पिटल अनुदान रजिस्टर)

या हॉस्पिटलने अतिशय प्रतिकुल परिस्थितीतून आज आपला नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचविला आहे. याची प्रगती झाली आहे ती भरभरून दान देणाऱ्या पारशी समाजामुळे. प्रत्येक अडचणीच्या वेळी ते मदतीला धावले आहेत. याशिवाय यात सहभागी होणाऱ्या काही संस्था – Industrial Development Bank of India , Care & Share USA. , Johnson & Johnson Ltd., Karnataka Health Promotion Trust, Tata Education Trust, Kotal Mahindra Bank Ltd याशिवाय कॉलेज फंड व हॉस्पिटल फंडातूनही या बेल एअर येथे अनेक कामे केली आहेत.

वैद्यकीय पर्यटकांना सुविधा :

बेल एअर हे देशविदेशातील पर्यटकांसाठीही आकर्षणाचे केंद्र बनले आहे. कारण बेल एअरमधील अद्यावत वैद्यकीय सेवा, उत्तम दर्जाचे हॉस्पिटल, कुशल डॉक्टर्स व कमी खर्चिक सेवा यामुळे येथे वैद्यकीय उपचारासाठी येत असतात. भारतात केवळ आधुनिक वैद्यकीय उपचार नव्हे तर पर्यायी उपचार पद्धती ही प्राचीन परंपरा आहे. आयुर्वेद, मसाज, योग, ध्यानधारणा याकडे परदेशी पर्यटकांना आकर्षण आहे. देशांतर्गत पर्यटनामध्ये अशा

उपचारासाठी पर्यटनाचे आकर्षण वाढले आहे. त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यान, शांत ठिकाणी पर्यटक जात असलेला दिसतो. बेल एअरने हेच लक्षात घेऊन पाचगणीत येणारा पर्यटक बेल एअरच्या केरला आयुर्वेदिक सेंटरला भेट द्यावी म्हणून येथे आयुर्वेदिक सेंटर, योगा सेंटर, मसाज सेंटर, सुरू केले आहेत.

इ. स. १९१२ मध्ये डॉ. बिलिमोरिया यांनी घरातील क्षयरूग्णाला उपचार करण्यासाठी सुरू केलेले एक छोटेसे सॅनिटोरियमने आज स्वत:च्या कर्तृत्वाने, समाजातील उदार देणगीदार, पूर्ण बरा होऊन बाहेर पडणारा रूग्ण, सामाजिक संस्था व सरकारी अनुदान या सर्वांच्या सहकार्यातून एक जागतिक किर्तीचे उपचार केंद्र बनले आहे. अनेक संकटांवर मात करत, आधुनिकतेची कास धरत, निसर्गातील नव्या आव्हानांना सामोरे जात या केंद्राने शंभर वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केली आहे. आज या केंद्राला अनेक मान–सन्मान मिळाले असले तरी आपले समाजसेवेचे व्रत जपत आपले कार्य अधिक व्यापक बनवून समाजातील गोरगरीब रूग्णांला दिलासा देण्याचे महान कार्य करीत आहे.

क) नैतिक पुनर्रुत्थान केंद्र – एक सामाजिक चळवळ :

Moral Rearmament Center – A Social Movement

शिक्षणाने माणसाला ज्ञान मिळते, ज्ञानामुळे त्याचा विकास होतो तर नैतिक शिक्षणामुळे मानवाचे जीवनमान उंचावते. या विचारसरणीतून निर्माण झालेले एम. आर. ए. (Moral Rearmament Center) सेंटर हे पाचगणीतील शैक्षणिक केंद्रांबरोबर नैतिक शिक्षण देणारे एक आंतरराष्ट्रीय संघटनेचे केंद्र आहे. मानवी मुल्यांमध्ये जसे स्वातंत्र्य, समता, बंधुत्वाची गरज असते तसेच चांगल्या समाजासाठी, देशासाठी सक्षम लोकशाही असणे गरजेचे असते. ही लोकशाही निर्माण करण्यासाठी प्रथमत: व्यक्तीमध्ये परिवर्तन होणे अत्यंत महत्त्वाचे असते. याच व्यक्तिगत बदलाद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य करू शकतो. आज जगभरातील विविध देशातून काम करीत आहे.

६.१४ एम. आर. ए. चा इतिहास :

एम. आर. ए. म्हणजे Moral Re-Aramament, ही संकल्पना प्रथम Frank Buchman या अमेरिकन नागरिकाने मांडली.[६२] मानवाची घसरत चाललेली नैतिक मूल्ये शाबूत ठेवण्यासाठी नैतिक पुनरूत्थान करणे महत्त्वाचे आहे. त्यातून फ्रँक बुचमन याला एक गोष्ट लक्षात आली, दुसऱ्याला उपदेश करून बदल घडविता येत नाही तर प्रथम स्वत:मध्ये बदल घडवून आणले तर समाज बदलेल. समाज बदलला की जग बदलेल. त्यासाठी नैतिकतेला आध्यात्मिकतेची जोड देऊन परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्याने काही मित्रांची संघटना तयार केली. तिच संघटना म्हणजे Oxford Group होय.[६३] ही संघटना इंग्लंडमध्ये निर्माण झाली. इ. स. १९३८ च्या काळात जग दुसऱ्या महायुद्धाच्या तणावाखाली वावरू लागले होते. जे तरुण या महायुद्धात सहभागी झाले ते सतत युद्धाच्या तणावाखाली राहू लागले. तसेच हा तरुण युद्धशस्त्रांनी सज्ज राहू लागला, तेव्हा अशा युद्धशस्त्रांनी सज्ज असलेल्या तरुणांना या काळात re-arm हा शब्द वापरला जाऊ लागला.[६४] बुचमनने युद्धाच्या मानसिकतेत अडकलेल्या तरुणांना नैतिक व आध्यात्मिकदृष्ट्या पुनर्वसन करण्यासाठी या समाजाला द्वेषमुक्त, भितीमुक्त, लोभमुक्त बनविणे गरजेचे आहे. हे जाणून कार्याला सुरूवात केली. व या कार्याला नाव दिले Moral Re-armament. म्हणजेच शस्त्रसज्ज असणाऱ्यांना नैतिक पाठबळ देणे होय व त्यांच्या मनातील इतरांच्याबद्दल असणारी कटुता संपविणे व स्वत:ला मानसिक शांतता मिळविणे.

इ. स. १९३० साली Frank Buchman याने MRA हे नामकरण "As European national re-arm for war, Buchman calls for moral and spiritual re-armament as the way to build a hate free, greed free, feer free world".[६५] या पद्धतीने केले. हेच काम इंग्लंडमधील Oxford Group च्या वतीने केले जाऊ लागले. पुढे या कार्याला संघटीत रूप देण्यात आले व त्याचे मुख्य ठिकाण बनले स्वित्झर्लँडमधील कॉकस (Caux). आज येथूनच नैतिक पुनरूत्थानाचे काम जगभरात चालते. येथे जे युरोपियन देश दुसऱ्या महायुद्धात होरपळून निघाले होते त्या देशाच्या नेत्यांना आपल्या देशात शांतता व सलोखा निर्माण करण्यासाठी भेटण्याचे व तोडगा काढण्याचे हे ठिकाण बनले.

या Caux सेंटरमध्ये German Chancellar Adenauer आणि French Foreign Minister, Robert Schuman यांनीही भेट देऊन दोन देशातील तणाव निवळण्यासाठी विचारविनिमय केला.[६६] त्यानंतर या सेंटरमध्ये जगातील अनेक अशांत देशाच्या नेत्यांना आमंत्रित करून त्यांच्या देशातील अशांतता, संघर्ष मिटविण्यासाठी प्रयत्न केले गेले.

एम. आर. ए. सेंटरचा विस्तार (इ. स. १९५० नंतर) :

१९५० नंतर Moral Re-armament ची विचारधारा जगातील बहुतांश देशापर्यंत जाऊन पोहचली. आज MRA च्या शाखा लॅटीन अमेरिका, भारत, जपान, आफ्रिका खंडातील अनेक देश, युरोप, ऑस्ट्रेलिया या देशात सुरू झाल्या आहेत. जगातील ४० देशातून ६० केंद्राद्वारे या सेंटरचे काम चालते.[६७] एम. आर. ए. ची विचारधारा जगभर पोहचविण्याऱ्या Frank Buchman याचा मृत्यू १९६१ मध्ये झाला. त्याच्यानंतर हे कार्य इंग्लंडमधील राजकीय वार्ताहार असणारा Peter Howard याने स्विकारले.[६८] त्यानंतर या चळवळीच्या कार्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन सदस्य मंडळाची निर्मिती करण्यात आली. ज्या पद्धतीने जगामध्ये युनोची संघटना काम करते त्याच धर्तीवर काम करण्यासाठी कायदेशीर सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली. त्याचे पहिले अध्यक्ष म्हणून

Cornelio Sommaruga यांची निवड झाली ते Red Cross या आंतरराष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष होते. ज्यांनी UN Secretary General Kofi Annan यांच्याबरोबर काम केले होते.[६९] त्यानंतर या संघटनेचे अध्यक्ष म्हणून प्रोफेसर राजमोहन गांधी यांनी तीन वेळा हे पद भूषविले. सध्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून Mrs. Omni Marzoula या संघटनेचे काम पाहत आहेत.

Moral Re-armament चे नामांतरण I of C मध्ये :

२० व्या शतकातील जगाची समस्या २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर बदलली गेली. कारण जगातील अनेक देशांपुढे देशादेशातील युद्धजन्य परिस्थिती ही समस्या आता राहिली नव्हती तर काळ बदलला, परिस्थिती बदलली व सामाजिक समस्याही बदलल्या. जग जागतिकीकरणाने जवळ आले. परंतु यातून तीव्र आर्थिक स्पर्धा सुरू झाली. २१ व्या शतकात प्रत्येक देशासमोर आज वेगवेगळ्या क्षेत्रातील स्पर्धांना सामोरे जावे लागत आहे. आजच्या तरुण पिढीला ज्या मानसिक ताणतणावातून जावे लागते त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी या संघटनेने आपल्या कामाच्या स्वरुपात बदल घडवून आणला.

आताच्या तरुण पिढीसाठी I of C म्हणजे Initiatives of Change असे नामकरण करण्यात आले. I of C म्हणजे पाऊल परिवर्तनाचे, तसेच ''जगाला विघटनापासून वाचविण्यासाठी नातेसंबंधावर विश्वास ठेवणे'' असा होय.[७०] हे नामकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर इ. स. २००१ मध्ये करण्यात आले. तेव्हापासून ही संघटना Moral Rearmament Center ऐवजी Initiatives of Change या नावाने ओळखली जाते.

६.१४.१ पाचगणी येथील कार्याची सुरुवात :

या कार्याची सुरुवात सेंटरने १९५०-६० च्या दशकात केली होती. आशिया खंडातील अनेक राष्ट्रे पारतंत्र्यातून मुक्त झाली होती व या देशापुढील अनेक गंभीर समस्या उभ्या राहिल्या होत्या. याच समस्यांचा अभ्यास करण्यासाठी Frank Buchman यांनी १९५२ रोजी भारताला भेट दिली व त्यावेळचे पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांची भेट घेतली होती.[७१] त्यानंतर भारतात या संघटनेच्या कार्याचा व विचारांचा प्रसार देवदास गांधी

यांनी १९५६ पासून पाहण्यास सुरूवात केली होती. त्यांचेच काम पुढे त्यांचे पुत्र राजमोहन गांधी व त्यांचे नातेवाईक असणारे राजगोपालचारी यांनी हाती घेतले व एम. आर. ए. ही चळवळ भारतात रूजविण्याचा प्रयत्न सुरू केला.[७२]

नैतिक पुनरूत्थान केंद्र भारतात स्थापन करण्यासाठी राजमोहन गांधी व राजगोपालाचारी या दोन व्यक्ती व त्यांचे काही मित्र यांनी १९६३ साली दिल्ली ते कन्याकुमारी अशा चार हजार मैलाची भ्रमण यात्रा काढली. भारत एक स्वच्छ, सशक्त आणि एकात्म बनविण्यासाठी देशाला हाक दिली. त्याच्या या हाकेला उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे त्यांनी भारताच्या ठिकठिकाणी काही प्रशिक्षण शिबीरे घेतली.

त्यानंतर आधुनिक शहरीकरणाच्या, प्रदूषण, गोंगाटापासूनही दूर असलेला पाचगणीचा प्रदेश, अत्यंत रमणीय व शांत असल्याने, आध्यात्मिक बैठकीसाठी जसे ठिकाण लागते ते ठिकाण इथे असल्याने त्यांनी हे सेंटर स्थापन करण्यासाठी पाचगणीची निवड केली.

राजमोहन गांधी यांनी प्रथम १९६५ मध्ये पाचगणी येथील हिंदू हायस्कूल (संजीवन हायस्कूल). त्याच्या मैदानावर एक शिबीर आयोजित केले व त्यामध्ये नैतिक पुनरूत्थानासंबंधी मार्गदर्शन केले.[७३] १९६५ साली पाचगणी येथे प्रथम हिंदू हायस्कूलच्या इमारतीत हे सेंटर सुरू करण्यात आले.[७४] त्यानंतर या सेंटरच्या कामासाठी स्वतंत्र जागा पाचगणी वाई रस्त्यावर इ. स. १९६६ साली टेबल लँडच्या पायथ्याशी जागा खरेदी केली. या जागेला Asia Platu असे नाव दिले.[७५] याच जागेवर आज भारतातील नैतिक पुनरूत्थानाचे कार्य करणारे सेंटर उभे आहे.

६.१४.२ एम. आर. ए. ची तत्वे :

Moral Re-armament म्हणजेच नैतिक पुनरूत्थान, हे नैतिक पुनरूत्थान समाजसाठी असेल. समाज बदलला की देश बदलतो. त्यासाठी देशामध्ये असणाऱ्या समाजाला खऱ्या लोकशाहीची पारख जोपर्यंत करता येत नाही तोपर्यंत ते राष्ट्र लोकशाही राष्ट्र म्हणता येत नाही. ज्या लोकशाहीत लोकांच्या मतांचा विचार केला जातो तेथे खऱ्या अर्थाने लोकशाही रूजली आहे असे म्हणता येईल. त्यासाठी त्यांनी चार सिद्धांत सांगितले आहेत. हे

सिद्धांत जगातील सर्व धर्मांची जी मूलतत्त्वे आहेत त्याच प्रकारचे आहेत. १) संपूर्ण प्रामाणिकपणा, २) संपूर्ण पावित्र्य, ३) संपूर्ण नि:स्वार्थ, ४) संपूर्ण प्रेम. याच सिद्धांतावर या सेंटरचे काम चालते.[७६]

एम. आर. ए. चा उद्देश :

Development of character of a value based society are its objects.[७७] Moral Re-armament सेंटर भारतातील पाचगणी येथे स्थापन करण्या पाठीमागचा मुख्य उद्देश म्हणजे स्वच्छ, शांत, सुबक, जगाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाला प्रोत्साहन देणे होय. कारण हे जग सुंदर करण्यासाठी प्रत्येकाची गरज आहे व त्यादृष्टीने प्रत्येकाने प्रयत्न करायला हवे. त्यासाठीच या केंद्रात प्रत्येकाला आपल्या जीवनाचे प्रामाणिकपणे व सूक्ष्मपणे निरीक्षण करण्याची संधी दिली जाते व स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यास प्रोत्साहित केले जाते. हे सेंटर प्रत्येक व्यक्तीला संवेदनशील बनवून त्याचा अंतर्नाद ऐकण्यासाठी तयार करते व त्यातून प्रत्येकाची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होते व मानवी मनातील ताणाचा निचरा होतो. देशाच्या उभारणीसाठी काही मुठभर लोकांची गरज असते असे नाही तर प्रत्येक व्यक्तीची गरज असते तरच ते राष्ट्र सक्षमपणे उभे राहू शकते. कृतिशीलता, संघटन, आपुलकी, सद्सद् विवेकबुद्धी ह्या गुणांची जोपासना होणे गरजेचे आहे. तरच मानवी मन विकसित होते. हेच विचार या सेंटरच्या उद्देशामध्ये दिसून येतात.

एम. आर. ए. चे सभासदत्व :

Moral Re-Armament या सेंटरचे उद्देशाने प्रभावित होऊन ज्या व्यक्तीला स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्यास आवडेल त्या व्यक्तीला या सेंटरचे सभासद होता येते. इ. स. १९६८ ला सुरूवातीला केवळ ६२ सभासद असणारी संस्था १९८०-९० च्या दशकात दोन हजारापर्यंत पोहोचली व सध्या याची सभासद संख्या लाखोंच्या घरात पोहोचली आहे.[७८] यात सैन्यदलातील अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, उद्योगपती, व्यवस्थापन क्षेत्रातील मंडळी, विद्यार्थी, पालक, शेतकरी ते गृहिणीपर्यंत कोणीही यात सहभागी होऊ शकतात आणि दरवर्षी हजारो सभासदांचा नव्याने समावेश होत आहे.

६.१५ एम. आर. ए. चे व्यवस्थापन :

पाचगणी येथील एशिया प्लाटूमध्ये असणारे Moral Re-Armamemt Centre या आंतरराष्ट्रीय सेंटरचे कामकाज उत्तम रितीने पार पाडणे हे अत्यंत जबाबदारीचे व महत्त्वाचे असते. त्यासाठी येथील संपूर्ण व्यवस्थापन सांभाळण्यासाठी कोणत्याही शैक्षणिक गुणवत्तेची अट नाही तर केवळ तत्वांचे पालन व केंद्राशी निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तीची गरज असते. त्यामुळे केवळ औपचारिकता म्हणून व जबाबदारी कुणावर तरी सोपविणे आवश्यक असते. म्हणून काही पदाधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात येते. सध्या या सेंटरची व्यवस्था पाहण्यासाठी नऊ ऑफीसर व तीस कामगार आहेत.[७९]

दिशा मासिक :

दिशा या मासिकात एम. आर. ए. पाचगणी सेंटरमधून देशभरात घडणाऱ्या घटनांचा आढावा घेतला जातो. केवळ बातमी प्रसिद्ध करणे एवढाच मर्यादित उद्देश या त्रैमासिकाचा नसून या सेंटरमध्ये होणाऱ्या कार्यक्रमातून सामाजिक दृष्टिकोन बदलणे, समाजाशी बांधिलकी विकसीत करणे व MRA ची तत्वे, विचार समाजापर्यंत पोहचविणे हा उद्देश ठेऊन हे मासिक प्रकाशित केले जाते. याची सदस्य संख्या सध्या लाखोंच्या पटीत आहे. हे त्रैमासिक Moral Re-Armament मित्र परिवाराकडून चालविले जाते. या त्रैमासिकाची सुरूवात १९९७ पासून झाली.[८०]

सुरूवातीला हे मासिक संस्कृत, हिंदी, इंग्रजी या भाषेतून प्रकाशित होत असे. परंतु इ. स. २००० पासून हे त्रैमासिक फक्त इंग्रजीतूनच प्रकाशित होत आहे. या त्रैमासिकाची जबाबदारी ही Trust M/s S. B. Billimoria and Company Asia Plateau यांच्याकडे होती. त्यानंतर सध्या ही जबाबदारी Deloittee Haskins and Sells Asia Plateau, Panchgani यांच्याकडे आहे.[८१]

६.१६ एम. आर. ए. मधील उपक्रम :

राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी योजना आखणारी अनेक केंद्रे अस्तित्वात आहेत. परंतु मानवाची फुटीर वृत्ती व भ्रष्टाचार यामुळे चांगल्या योजना सुद्धा संपुष्टात येतात.

प्रामाणिकपणा व जबाबदारी यांचे शिक्षण स्त्री–पुरुषांना देण्यास महत्त्व दिले पाहिजे. अशा प्रकारची गरज पूर्ण करण्याचे कार्य हे MRA सेंटर करते.

त्यासाठी या सेंटरमध्ये समाजातील विविध स्तरातील लोकांसाठी वेगवेगळ्या विषयावर अनेक शिबीरे, परिषदा, कार्यशाळा भरविल्या जातात. त्यामध्ये आज काळानुसार ज्याची गरज आहे त्या तरुणांच्यासाठीही उपक्रम राबविले जातात. या तरुणांच्यामध्ये असणाऱ्या उत्साहाला योग्य दिशा इथे दाखविली जाते. याशिवाय समाजातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांपासून, उद्योगक्षेत्रातील पदाधिकाऱ्यांपासून ते सर्वसामान्य लोकांसाठी उपक्रम राबविले जातात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे येथे दरवर्षी आंतरराष्ट्रीय परिषद भरविली जाते. यामध्ये जगातील विविध समस्यांवर चर्चा व त्यावर तोडगा काढला जातो. त्यापैकी काही उपक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे –

National Youth Conference :

एशिया प्लाटूमध्ये देशातील तरुणांच्यासाठी दरवर्षी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये खास तरुणांसाठी 'Let's make a Difference' हा उपक्रम दरवर्षी १ जूनला सुरू होतो व ८ जूनला संपतो.[८२] या उपक्रमात देशभरातील शेकडो तरुण सहभागी होतात. त्यामध्ये १७ वर्षापासून ते ३० वर्षापर्यंतचे मुले, मुली असतात.

या कॉन्फरन्सचा उद्देश प्रामुख्याने तरुणांच्यामध्ये असणारा उत्साह जागृत करणे, स्वत:कडे प्रथम प्रामाणिकपणे पहावयास शिका व जीवनाचा खरा उद्देश समाजवून घ्या. आपली ताकद चांगल्या कार्यासाठी खर्ची करा व देशाला सक्षम बनवा. तसेच तरुणांमध्ये असणारे punctuality, discipline, perfectionism, care, concern and love ही उच्च प्रतीची तत्वे शिकविली जातात. या उपक्रमामुळे या विद्यार्थ्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल होतो. **"Effective Living and Leadership"** असा हा उपक्रम असतो. या उपक्रमासंबंधी डॉ. चोप्रा यांनी खालील उद्‌गार काढले आहेत.

"The management students get the best of professional training. But the education in human values is often missing. That is any I have

been taking all my students to Asia Plateau for training courses, which have benefited students immensely." – Dr. B. K. Chopra, Former[८३]

Director of Management Institute.

महाविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील सामाजिक स्थितीशी जाणीव व्हावी, ग्रामीण समाजामध्ये या तरुणांनी आपल्या आव्हानात्मक कामाद्वारे बदल घडवून आणावा या उद्देशाने या विद्यार्थ्यांच्यावर काही कामगिरी सोपविली जाते.

यामध्ये ग्रामीण भागात सर्वात मोठा उपक्रम म्हणजे स्वच्छता. त्यामध्ये प्रत्येक घरटी स्वच्छतागृह असावे ही जनजागरण मोहिम राबविणे. यामध्ये पुणे येथील सिंम्बॉयसीस महाविद्यालयाचे चारशे विद्यार्थी दरवर्षी पाचगणीच्या आसपास असणारे एक खेडे दत्तक घेतात व त्या गावात लोकांच्या सहकार्याने स्वच्छतागृह बांधण्याचे काम स्विकारतात. गेल्या दहा वर्षात २३ गावातून त्यांनी ही मोहिम राबविली आहे.[८४] विद्यार्थ्यांनी घेतलेले विषय – १) काम करताना वेळाचे बंधन पाळू नका. २) दुसऱ्याशी तुलना करू नका. ३) समाजाशी काम करण्याची जास्तीतजास्त संधी शोधा. ४) गप्पा मारण्यासाठी मित्र गोळा करू नका. ५) पाणी आणि अन्नाची नासाडी करू नका. ६) मनाने मोकळे व्हा. याशिवाय पाणी अडवा पाणी जिरवा, सौर उर्जेचा वापर, टीपीटॉप द्वारे शालेय विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व सांगितले जाते. एकंदर या उपक्रमातून महाविद्यालयीन तरुणांना जागृत करून त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते.

Ethical Leadership :

उद्योगधंद्यातील नैतिकता या विषयावरही दरवर्षी कार्यशाळा आयोजित केल्या जातात. त्यामध्ये सर्वसामान्य विक्रेत्यापासून एखाद्या उद्योगसमूहाच्या डायरेक्टरपर्यंत सर्वांना उपयुक्त पडेल असे काही नियम प्रत्येकांनी स्वत:पासून पाळले तर आपला व्यवसाय प्रामाणिकपणावर चालण्यास मदत होते व त्यातून व्यावसायिक व ग्राहक, उद्योगपती व त्यांचे कामगार यांच्यातील ताणतणाव कमी होण्यास मदत होईल असे मौल्यवान मार्गदर्शन केले जाते. या कार्यशाळेत एकावेळी ८० ते १०० लोकांना सामावून घेतले जाते. यासाठी

व्यवस्थापन व कायदा क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींना आमंत्रित केले जाते. हा उपक्रम साधारण आक्टोबर ते नोव्हेंबर या महिन्यात आयोजित केला जातो. यातून मालक व कामगार व्यावसायिक व ग्राहक यांच्यातील सुसंवाद आणण्याचा प्रयत्न केला जातो.

India I Care :

या उपक्रमांतर्गत प्रत्येक भारतीय नागरिकाने काळजी घेतली तर हा देश स्वच्छ, सुबक व बलशाली होण्यास वेळ लागणार नाही. प्रत्येकाला मी भारतीय आहे याचा अभिमान बाळगून काम करता आले पाहिजे. तसेच कामाची सुरूवात जर स्वत:पासून केली, मी रस्त्यावर कचरा टाकणार नाही, माझा परिसर स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न करीन तर या देशाला बदलण्यास वेळ लागणार नाही. हा उपक्रम देशभरातील इच्छुक नागरिकांसाठी व ग्रामीण भागासाठी आयोजित केला जातो. या उपक्रमात हरियाणा, राजस्थान, उत्तरांचल व महाराष्ट्रातील काही गावे सहभागी झाली आहेत.

Leadership Training for Industry :

"Creative Leadership for Industry and National Development." हा उपक्रम १९७० पासून येथे घेतला जातो. उद्योग क्षेत्रातील ताणतणाव कमी करण्यासाठी व उद्योगक्षेत्रातील उच्चपदस्थ व्यक्ती, कामगार यांच्यातील नातेसंबंध यात बदल झाला तर उत्पादनातही बदल होऊ शकतो. Heart of Effective Leadership मध्ये कंपनीचे उच्चपदस्थ व्यक्ती सहभागी होतात. महेंद्र बाबा, केमिकल इंजिनिअर म्हणून आय. आय. टी. दिल्ली येथून शिकले व Thermax कंपनीत गेली २४ वर्षे काम पाहतात ते १९९१ पासून पाचगणीच्या एम. आर. ए. शी जोडले गेले आहेत.[८५]

Ethics and Governance :

I of C सेंटरमधून IAS अधिकाऱ्यांसाठी २००५ पासून उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. समाजातील प्रत्येक घटक हा अपयशाचे खापर सरकारवर फोडत असतो. परंतु प्रत्येक जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांनी आपआपली नैतिक मूल्य सांभाळून काम केले तर कोणतेही सामाजिक काम होण्यास विलंब लागणार नाही. यासाठीच या केंद्रात

प्रत्येक राज्यकर्ते, पदाधिकारी यांनी स्वत:ची जबाबदारी व्यवस्थित सांभाळली तर प्रत्येक काम सहज पूर्ण होईल. त्यासाठी राज्यकर्त्यांनी कशा पद्धतीने काम करावे यासाठी उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये भारतीय रेल्वे पदाधिकारी, भारतीय पोलिस अधिकारीही सहभागी होतात. या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी देशाच्या विविध भागात ३१ केंद्रे चालविली जातात. ज्यामध्ये Inspiration, Integration, Innovation याचे मार्गदर्शन केले जाते.

INI – National Integration for Army :

ऐशिया प्लाटूमध्ये जून २००० पासून सैन्यदलातील पदाधिकारी व सैनिक यांच्यासाठी आध्यात्मिक व धार्मिक एकात्मतेसाठी उपक्रम सुरू केला. या सैन्यदलात काम करणारे सैनिक अनेक जाती, धर्माचे असतात. या सर्वांमध्ये एकात्मता निर्माण व्हावी व सर्व धर्माचे तत्वज्ञान हे समान आहे. त्यामुळे मी गुरखा, मी शीख, मी मराठा असा भेदभाव न बाळगता मी देशाचा ही भावना निर्माण व्हावी यासाठी या सेंटरमध्ये सैनिक व त्यांच्या पदाधिकाऱ्यांसाठी उपक्रम सुरू केला. एशिया प्लाटूला सैन्य दलातील Lt. General Vijay Oberoi, Chief of the Army Training Command यांनीही भेट दिली होती. Lt. General Niranjan Singh Cheema हे तर सातत्याने MRA सेंटरला भेट देतात व मार्गदर्शन करतात.[८६]

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषद :

या सेंटरमध्ये सातत्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले जाते. यामध्ये पहिली राष्ट्रीय परिषद इ. स. १९६९ साली आयोजित केली होती. त्यामध्ये विषय होता देशापुढील समस्या व त्यावर उपाययोजना. या परिषदेसाठी देशभरातून ४२ पदाधिकारी व काही राजकीय नेतेमंडळी उपस्थित होती. यानंतर १९८० नंतर या सेंटरमध्ये वेगवेगळ्या विषयावर राष्ट्रीय परिसंवाद आयोजित केले जाऊ लागले. यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रातील विषयावर चर्चा ही केली जाऊ लागली. त्यापैकी काही परिषदा –

१) Making Democracy Real – a Ddialogue – Jan. 2012.

२) Democracy and Development.

३) The Egyptian Revolution : Challenges and Aspirations.

४) Busines Corruption – Avoiding the Cancer.

५) Caus Initiatives for Business – Making Growth Sustainable – Balancing Economic Growth and Human Responsibility – 19 - 23 Nov. 2011.

या सेंटरमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय विषयावरही परिषदा आयोजित केल्या जातात. यामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक प्रश्नावर चर्चा होते. ऐशिया प्लाटूमध्ये इ. स. १९८० साली पहिली आंतरराष्ट्रीय परिषद झाली. त्यानंतर प्रत्येक पाच वर्षांनी एक आंतरराष्ट्रीय परिषद भरविली जाते. २०११ साली ''खरी लोकशाही मूल्ये कोणती?'' या परिषदेसाठी ३९ देशातील १८० लोक सहभागी झाले होते. त्यामध्ये दक्षिण सुदान, इजिप्त, लेबनॉन, सिरिया या देशातील प्रश्नांवर चर्चा झाली. २५ जानेवारी २०११ मध्ये इजिप्तमध्ये झालेली क्रांती व त्यावर तोडगा काढण्यासाठी परिषद आयाजित केली होती. नोव्हेंबर २०१२ मध्ये व्यवसाय जगताशी निगडीत परिषद पाचगणीत आयोजित केली होती. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे सहयोगी आयोजक जपान हा देश होता.

अशा प्रकारे या सेंटरमध्ये वर्षभर विविध उच्चस्तरीय उपक्रमांचे आयोजन केले जात असते व या कार्यक्रमात जगभरातील व भारतातील लोक सहभागी होऊन इथल्या विचारांची अंमलबजावणी आपआपल्या ठिकाणी करीत असतात.

६.१७ एम. आर. ए. ची रचना, क्षेत्र व विस्तार :

पाचगणीतील MRA सेंटर हे स्थापत्य कलेचा अजब नमुना आहे. येथील प्रत्येक इमारतीचे वेगळे वैशिष्ट्य आहे. इथल्या इमारती ह्या राजवाड्याप्रमाणे फार भव्य दिव्य नाहीत. परंतु प्रत्येक वास्तू ही आरोग्यसंपन्न, हवेशीर, साधे, आकर्षक व वास्तूरचनेचा पूर्ण अभ्यास करून निर्माण केल्या आहेत. या इमारतीमध्ये भारतीय व पाश्चात्य स्थापत्य कलेचे मिश्रण पाहण्यास मिळते. तसेच ह्या इमारतींना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करताना त्याला पारंपारिक व नैसर्गिक घटकांचाही जोड दिला आहे. त्यामुळे ह्या इमारती विसाव्या शतकात

बांधल्या असल्या तरी त्याला २१ व्या शतकातील आधुनिकतेची जोड दिलेली पहायला मिळते. म्हणजेच काळाच्या पुढे जाऊन ह्या इमारती बांधल्या गेल्या आहेत.

आशिया प्लाटू. ही जागा मिळविण्यासाठी मदत झाली ती स्थानिक बांधकाम व्यवसायिक गणपत खरात यांची.[८७] आज एकूण आडुसष्ठ एकर परिसरात हे सेंटर उभे आहे.

एम. आर. ए. सेंटरच्या निर्मितीवेळी अतिशय विचारपूर्वक रचना केली गेली आहे. या सेंटरचा आराखडा, त्याची संपूर्ण रचना ही ऑस्ट्रेलियाचे वास्तूविशारद (Architect) Gordon Bron यांनी मोफत करून दिली होती.[८८] त्यानंतर ह्या इमारतीचे बांधकाम दि न्यू ट्रीओ बिल्डर्स, कराड यांनी केले.[८९]

व्हॅली व्ह्यू :

एम. आर. ए. सेंटरची पाचगणी येथील पहिली इमारत म्हणजे व्हॅली व्ह्यू. या इमारतीचे बांधकाम १९६८ मध्ये पूर्ण झाले. या इमारतीमधून समोरील कृष्णा खोऱ्याचे दर्शन होत असल्याने या इमारतीला व्हॅली व्ह्यू असे नाव दिले आहे. २० जानेवारी १९६९ रोजी या इमारतीचे उद्घाटन Oxford Grpoup चे युनायटेड किंगडमचे सेक्रेटरी Roland Wilson यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांच्यासोबत महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे अध्यक्ष Mrs. Thrity R. Irani हेही होते.[९०]

मुख्य इमारत :

सर्वात भव्य, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व या एकाच इमारतीमध्ये अनेक विभागांची रचना करण्यात आलेली इमारत म्हणजे मुख्य इमारत होय. या इमारतीचे बांधकाम १९७० साली सुरू झाले व अवघ्या चार वर्षात बांधून पूर्ण झाली. अशा ही इमारत MRAच्या सौंदर्यात भर घालणारी इमारत ठरली आहे.

प्रेक्षागृह / थिएटर :

एम. आर. ए. सेंटरमधील प्रेक्षागृह म्हणजे २० व्या शतकातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अजोड नमूनाच म्हणावा लागेल कारण आज २१ व्या शतकात भारतात आधुनिक

तंत्रज्ञानाचा झपाट्याने विकास झाला आहे. परंतु १९७० च्या दशकात महाराष्ट्रातील पाचगणी सारख्या एका छोट्या शहरात जागतिक स्तरावरील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जे प्रेक्षागृह बांधले गेले आहे. ते पाहिल्यानंतर स्थापत्य कलेचा एक वेगळा नमुना पाहण्यास मिळाल्याचा आनंद होतो.

या सभागृहात एकाच वेळी ४५० लोक बसू शकतील अशी व्यवस्था आहे. जर वरील संख्येपेक्षा सभागृहातील लोकांची संख्या वाढली तर या सभागृहातील पुढील बाजूचा प्लॅटफॉर्म वर उचलता येतो व जादा लोकांची व्यवस्था करता येते. सभागृहातील स्टेजवर एकाचवेळी १२० लोक बसतील अशी व्यवस्था आहे. तसेच हे स्टेजही अपुरे पडले तर हे स्टेजही वाढवू शकतात. तसेच या स्टेजचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या स्टेजवरील कार्यक्रम मागील लोकांना व्यवस्थित दिसत नसेल तर हे स्टेज पाच फूट खाली नेता येते व मागील प्रेक्षकांना कार्यक्रम व्यवस्थित पाहता येते असे तंत्रज्ञान येथे वापरले आहे.[९१] या प्रेक्षागृहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रेक्षागृहाची खालची जागा ही अंडरग्राऊंड पाणी साठविण्यासाठी केली आहे. ही टाकी प्रत्येक खुर्चीच्या खाली उघडता येते. या पाण्याचा उपयोग पिण्यासाठी केला जातो. हे पाणी रेन हार्वेस्टिंगच्या माध्यमातून साठविले जाते.

सभागृह (Conference Hall) :

मुख्य इमारतीमध्ये भव्य प्रेक्षागृह असतानाही एक स्वतंत्र कॉन्फरन्स हॉलही येथे निर्माण केला आहे. या हॉलचा उपयोग खास आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या परिषदा घेण्यासाठी केला जातो. या सभागृहात एकावेळी शंभर लोक बसू शकतील अशी व्यवस्था आहे. इ. स. २००५ मध्ये येथे अत्याधुनिक व्हीडीओ कॉन्फरन्सींगची सोय केलेली आहे. या हॉलमध्ये अत्याधुनिक वातानुकूल व ध्वनिक्षेपकही आहे. या सभागृहाचा वापर केवळ आंतरराष्ट्रीय परिषदेसाठीच केला जातो. पाचगणी येथील याच आंतरराष्ट्रीय सभागृहातून एका मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नाची उकल केली गेली. २५ जानेवारी २०११ मध्ये इजिप्तमध्ये झालेली क्रांती. इजिप्त मधील लोकांनी भ्रष्ट शासन उलथून टाकण्यासाठी सशस्त्र क्रांती केली. त्यावेळी या देशाला शांत करणे व तेथे पुन्हा निवडणूका घेऊन एक शासन (स्थिर)

निर्माण करण्याची जबाबदारी एम. आर. ए. ने घेतली. त्यामध्ये राजमोहन गांधी यांचा पुढाकार मोठा होता.[९२] अशा अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नावर चर्चा व त्यातून मार्ग या सभागृहात काढले जातात. इथून अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असल्याने या सभागृहातील चर्चा किंवा विषय हे गुप्त ठेवल्या जातात.

एशिया प्लाटूचे नंदनवन :

एम. आर. ए. सेंटरची जी आडुसष्ठ एकरची जागा होती ती संपूर्ण खडकाळ होती. इ. स. १९६४ च्या दरम्यान हा संपूर्ण भाग वृक्षविरहीत असा होता. या खडकाळ जमिनीमध्ये आज नंदनवन फुलविले आहे. पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाचे पाणी रेन हार्वेस्टींगच्या पद्धतीने साठवून त्या पाण्याचा वापर वर्षभरासाठी केला जातो. पाणी साठविण्याही ही प्रक्रिया भारतात साधारण २००५ नंतर अंमलात आणली . परंतु या सेंटरमध्ये रेन हार्वेस्टींग ही पद्धत १९६६ मध्येच अंमलात आणली गेली होती.

या सेंटरमध्ये पाणी अडवा पाणी जिरवा ही मोहीम १९६८ मध्येच राबवली गेली व या खडकाळ भागावर लाखो वृक्षांची लागवड करून ती जीवापाड जोपासली गेली आहे. त्यामुळे जिथे गवत उगवणे मुश्किल होते त्या खडकाळ भागावर विविध प्रकारची हजारो झाडे लावली गेली व ती जगवली गेली. आज येथे सिल्व्हर ओक, जांभूळ, बेहडा, उंबर, बॉटलब्रश, आंबा, पिंपळ, चिंच, बाभूळ, ख्रिसमस ट्री पासून हजारो प्रकारची फुलझाडे, फळझाडे येथे पहायला मिळतात. त्याचबरोबर या झाडावर उपजीविका करणारे पशु पक्षी यांचाही वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पहाटे व संध्याकाळी पक्ष्यांचे संमेलन भरलेले पहायला मिळते. या जंगलामध्ये जवळजवळ ८५ प्रकारचे पक्षी निवास करतात. या सर्व पक्ष्यांचा अभ्यास युनायटेड किंगडमचे पक्षी अभ्यासक John Chidell यांनी केला आहे व त्यांनी ही संपूर्ण माहिती एकत्रित करून त्याचे फोटोग्राफ्सही काढले आहेत.[९३] शिवाय कष्टाची व मनाची तयारी असेल तर दगडातूनही सोने पिकवू शकतो याची प्रचिती दिली आहे.

६.१८ ग्रामपरी (Grampari) :

ग्रामीण आणि पर्यावरण केंद्र (Rural and Ecology Center of I of C) :

MRA Centre मार्फत चालविला जाणारा ग्रामपरी हा एक स्वतंत्र उपक्रम आहे. याची सुरूवात इ. स. २००८ मध्ये बेंगलोरच्या स्वयंसेविका जयश्री राव यांनी केली. हा उपक्रम ग्रामीण विकासासाठी समर्पित केलेला आहे. या ग्रामपरी मार्फत पाचगणीच्या आसपास असणाऱ्या खेड्यापाड्यातून अनेक उपक्रम राबविले जातात. ग्रामपरीचे ठरविलेले उद्दिष्टे हे एका विशिष्ट वर्गासाठी असतात. ग्रामपरीचे उपक्रमासाठी I of C शी जोडलेल्या लोकांनाही सहभागी होण्यासाठी विनंती केली जाते. त्यामुळे आज या योजनेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्वयंसेवकही सहभागी झाले आहेत.

ग्रामपरीचा जन्म :

श्रीमती जयश्री राव २००८ साली बेंगलोरमध्ये सकाळी पेपर वाचताना त्यांच्या दृष्टीला एक लेख पडला. तो लेख (Article) बिहारमधील महिला सरपंच यांच्यावर होता. जिने सरकारी योजनांचा आपल्या गावासाठी उपयोग करून त्या गावाला सक्षम बनवून टाकले आहे. त्या लेखाचा प्रभाव जयश्री राव यांच्यावर पडला व त्यांनी एक महिला सरपंच गावाचा चेहरामोहरा दलू शकते तर आपणही ग्रामीण लोकांसाठी काहीतरी करू शकतो असे वाटले.

हाच उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्यासाठी त्या एशिया प्लाटू येथे असणाऱ्या एम. आर. ए. सेंटरशी जोडल्या गेल्या. पाचगणीतील एम. आर. ए. ह्या सेंटरचा उपयोग राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील लोकांसाठी होत असताना पाचगणीच्या आसपासच्या ग्रामीण परिसरात राहणाऱ्या व स्थानिक लोकांना या सेंटरचा उपयोग होत नव्हता. ग्रामीण भागातील लोकांना या सेंटरचा उपयोग व्हावा ह्यासाठी सौ. जयश्री राव यांनी ग्रामपरी ही संकल्पना प्रत्यक्षात आणली.

ग्रामपरीची सुरूवात :

जयश्री राव यांनी २००८ मध्ये ग्रामपरी हा विभाग पाचगणीतील एम. आर. ए. सेंटरच्या कुक्कुटपालन शेडमध्ये सुरू केला. प्रथम त्यांनी बारामती भागातील अनाथ

मुलांच्यासाठी काही दिवसाचा उपक्रम राबविला.[९४] ग्रामपरी ग्रामीण व पर्यावरण केंद्र हा I of C पाऊले परिवर्तनाची या ग्रामीण विकासासाठी समर्पित उपक्रम असून या मार्फत पाणी, स्वच्छता व आरोग्य, पाणलोट क्षेत्र, नेतृत्व व प्रशिक्षण, स्वावलंबी उपजिविकेसाठी विविध प्रशिक्षणे व उपक्रम हे कार्यक्रम घेतले जातात.

१) **Livelihoods Training Programme** :- या उपक्रमातर्गत विविध कौशल्याचे मार्गदर्शन व स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यामध्ये ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना शिवणकाम शिकविले जाते. मुले आणि मुलींच्यासाठी मोबाईल दुरुस्ती प्रशिक्षण केंद्र चालविले जाते. सौरकंदिल तयार करणे, संगणक प्रशिक्षण दिले जाते. तसेच ग्रामीण भागातील महिलांना बचतगटामार्फत गोधड्या तयार करणे, कापडी पिशव्या तयार करणे, टाकाऊ वस्तूपासून टिकावू वस्तू तयार करणे याचेही प्रशिक्षण दिले जाते. त्यांनी तयार केलेल्या वस्तू ह्या MRA सेंटरमध्ये येणारे लोकच खरेदी करतात. त्यामुळे या महिलांना स्वत:चा व्यवसाय मिळाला आहे.

२) **Governance Programme :-** या उपक्रमांतर्गत स्थानिक संस्थेतील लोक ग्रामपंचायत सदस्य यांना त्यांच्या कामामध्ये सामर्थ्यवान बनविण्यासाठी दरवर्षी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले जाते. यामध्ये ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट आणि ग्रामीण भागातील तरुण यांना सामील करून घेतले जाते.

३) **Health and Environment Programme : -** आरोग्य आणि पर्यावरण : यामार्फत गावातील शालेय विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व पटवून देताना स्वत:ची स्वच्छता, स्वच्छ व शुद्ध पाण्याचा वापर, पोषक आहार याचे महत्त्व सांगितले जाते. त्याचबरोबर गावातील महिलांना आरोग्य संपन्न परिसरासाठी प्रशिक्षण देणे, आरोग्याचे महत्त्व राखण्यासाठी मदत करणे, साथीच्या रोगापासून बचाव करण्यासाठी पर्यावरणाची काळजी कशी घेतली पाहिजे याचेही मार्गदर्शन केले जाते.


grampari
An Initiative of Moral Re-armament (India)
Grameen Va Pariyaavaren Kendra

वरील सर्व उपक्रम केवळ शिबीरे, प्रशिक्षण, सभा घेऊन थांबत नाही तर सहभागी होणाऱ्या लोकांनी त्याचे प्रात्यक्षिक आपल्या गावात सुरू करणे व आपल्या गावाचा विकास व बदल करणे क्रमप्राप्त ठरते. कारण या MRA सेंटरचे जे मूळ तत्त्व आहे स्वत: बदला, समाज बदलेल. याच तत्त्वावर ग्रामपरीच्या योजना राबविल्या जातात व गेल्या पाच वर्षात पाचगणीच्या आसपासच्या खेड्यात मोठा बदल घडून आलेला दिसून येतो.

या उपक्रमातून साध्य झालेल्या गोष्टी :

त्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र हे सध्या २३ गावातून सुरू आहेत. आरोग्यविषयक व पाणी वाचवा मोहिम. पाचगणीच्या परिसरात असणाऱ्या आखेगणी, दानवली, पिराचीवाडी, अभयसपुरी, पाचपुतेवाडी या गावातून उपक्रम राबविले जातात. अभयपुरी गावच्या तीन वाड्यातून २५ स्वच्छतागृह बांधले गेले. पाचगणी जवळ असणाऱ्या पाचपुतेवाडी मध्ये ९९% घरांमध्ये ग्रामपरी योजनेतून स्वच्छतागृह बांधले गेले. सहा महिन्याच्या कालावधीत १३ गावातून ८०० विद्यार्थ्यांना हात धुण्यासाठी प्रेरणा व पाणी बचत याचे प्रशिक्षण दिले. त्यातून या गावातू १३० tippy taps विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा व घरातून बसविले व गावातील लोकांनाही स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. मोबाईल रिपेअरींग व शिवण क्लास हे तर ग्रामपरी योजनेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक गावात सुरू झाले आहेत. सौर उर्जा कंदील तयार करणे याचेही प्रशिक्षण ग्रामपरीमार्फत दिले जाते. यामध्येही अनेक विद्यार्थी सहभागी होतात. व आपल्या गावात या कंदीलचा वापर करण्यास लोकांना प्रोत्साहित केले आहे. या कंदिलचा वापर घरात व शेतातही करता येतो. ग्रामीण भागात असणारी विज कपातीमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर जो परिणाम होतो तो या सौर कंदिलामुळे बराचसा कमी झाला आहे. हे कंदिल सहा तास चालते. त्याचा डोळ्यावरही कोणताही परिणाम होत नाही. हातांनी साबण तयार करणे याचेही प्रशिक्षण प्रत्येक गावागावातून दिले जाते. त्यामुळे महिलांना हा एक चांगल उद्योग मिळाला आहे.

ग्रामपरी योजनेमुळे झालेले परिवर्तन :

ग्रामपरी हे व्यक्तिगत बदलासाठी I of C ज्या सिद्धांतावर काम करते ते सिद्धांत म्हणजे संपूर्ण प्रेम, पवित्रता, निस्वार्थीपणा व प्रामाणिकता हेच सिद्धांत ग्रामपरीचेही अविभाज्य घटक आहेत. याच सिद्धांताचा वापर ग्रामपरीने पाचगणीच्या आसपासच्या ग्रामीण भागातून करण्यास सुरूवात केल्यानंतर त्या उपक्रमांना अवघ्या चार वर्षात भरभरून प्रतिसाद या ग्रामीण भागातून मिळू लागला आहे. त्यामध्ये पाचगणीच्या आसपास असणाऱ्या आखेगणी, दानवली, पीराची वाडी, अभयपुरी, पाचपुतेवाडी या गावातून १००% महाराष्ट्र शासनाची जी योजना आहे घर तेथे शौचालय हा उपक्रम ग्रामपरीच्या स्वयंसेवकांनी व ग्रामस्थांनी मिळून यशस्वीपणे राबविला आहे. अभयपुरी, इगतपुरी, आम्रळ, खिंगर या गावातून शेतीसाठी पूर्णत: सेंद्रिय खताचा वापर केला जात आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे गावातील लोकांना व्यसनापासून मुक्त करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. त्यामध्ये ग्रामपरी पाचगणी येथील सेंटरमध्ये सहभागी झालेले अशोक मोरे यांचे उदाहरण बोलके आहे.

अशा प्रकारे ही ग्रामपरी, ग्रामीण विकासाठी समर्पित उपक्रम राबवित आहे. त्यामध्ये खास करून मुलींसाठी ज्यांना शिकण्याची आवड आहे परंतु संधी मिळत नाही, अशा मुलींसाठी स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी होण्यासाठी अगदी मोफत व्यवसाय प्रशिक्षण दिले जात आहे.

पाचगणी येथील MRA किंवा I of C हे आंतरराष्ट्रीय नैतिक पुनरूत्थान केंद्र हे संपूर्ण भारतातील एकमेव केंद्र आहे. महात्मा गांधीजींच्या विचाराने संपूर्ण जग प्रभावित झालेले असताना त्यांच्या घराण्यातील व्यक्ती समाजाच्या कल्याणासाठी मागे राहणे शक्यच नाही. गांधीजींचा वारसा एका कणा इतका मला पुढे चालविता आला तर ते मी माझे भाग्य समजेन असे विनम्रपणे सांगणारे त्यांचे नातू राजमोहन गांधी व त्यांचे आजोबा डॉ. राजगोपालाचारी यांनी, MRA ची संकल्पना प्रथम मांडणारे Frank Buchman यांच्या विचाराची प्रेरणा घेऊन आपल्या कार्याला सुरूवात केली. १९४७ ला भारत स्वतंत्र देश झाल्यानंतर ज्या अनेक समस्यांना या देशाला सामोरे जावे लागत होते, त्यामध्ये चीनचे आक्रमण, स्वतंत्र

बांगलादेशाची निर्मिती, पाकिस्तानशी युद्ध अशा अनेक संकटांनी भारतीय समाज घेरलेला असताना या देशात शांतात, सलोखा व चांगली लोकशाही मुल्ये रूजविण्यासाठी MRA च्या विचारांची गरज आहे. हे ओळखून या सेंटरची स्थापना केली. यामुळे पाचगणी शहराला एक आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले. तसेच शिक्षणाबरोबर या शहराला एक वैचारिक बैठक असणारे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. तसेच ग्रामपरीमुळे पाचगणीच्या आसपासच्या गावातही परिवर्तन घडून आले. यातून दुर्गम भागातील स्त्रिया, मुली या सक्षम बनल्या आहेत.

ड) पाचगणीतील सामाजिक व सांस्कृतिक संस्था :

६.१९ द् पाचगणी क्लब ग्रंथालय जिमखाना (इ. स. १८८३) :

द् पाचगणी क्लब हा ब्रिटीश अधिकाऱ्यांसाठी प्रथम सुरू करण्यात आला होता. त्यानंतर या क्लबमध्ये पारशी लोक व समाजातील प्रतिष्ठित मंडळींनाही सामावुन घेतले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेला हा क्लब आजही सुरू आहे. आज या क्लबमध्ये पाचगणी शहरातील उद्योगपती, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे ट्रस्टी व प्रतिष्ठित मंडळी यांचा सहभाग असतो.

द् पाचगणी क्लबची स्थापना : – या क्लबची स्थापना इ. स. १८८३ मध्ये पाचगणी महाबळेश्वर रोडवर, सेंट पिटर्स चर्चच्या समोरील बाजूस करण्यात आली.[९५] या क्लबची स्थापना या काळात राहाणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन केली होती. हा क्लब स्थापण्या पाठीमागचा उद्देश म्हणजे पाचगणीतील सर्व इंग्रज अधिकारी एकत्र यावेत व गप्पागोष्टीसोबत वाचन, व्यायाम करता यावा यासाठी या क्लबमध्ये ग्रंथालय व जिमखाना यांचीही निर्मिती करण्यात आली होती. त्यामुळे या क्लबला ग्रंथालय जिमखाना या नावानेही ओळखले जाते. या क्लबचा विस्तार हा साधारण एक एकर परिसरात आहे.

द् पाचगणी क्लब इमारत :– द् पाचगणी क्लबची इमारत ही ब्रिटीशकालीन स्थापत्य कलेचा एक नमुना आहे. मुख्य इमारतीचे क्षेत्र हे ४५ x ४० चे असून तिचे बांधकाम जांभा दगड व चुन्यामध्ये केले आहे.[९६] इमारतीच्या छतासाठी लोखंडी पत्रा वापरला आहे. खोलीमध्ये प्रकाश यावा यासाठी पत्र्यामध्येच काचा बसवून प्रकाश व्यवस्था केली आहे. शिवाय खोलीमध्ये

आतील बाजूस छतालाच लहान लहान विजेचे दिवे बसविले आहेत. या इमारतीच्या बाहेरील बाजूस भिंतीवर बसविलेले घड्याळ शंभर वर्षापूर्वीचे असूनही उन, वारा, पाऊस यामधून ते आजही कार्यक्षमतेने चालू आहे. ही इमारत बांधण्यासाठी त्या काळात १४०० रुपये खर्च आला होता. ही रक्कम सार्वजनिक स्वरूपात जमा करण्यात आली होती.[९७]

ब्रिटीशकालीन व्यवस्थापन व सद्यस्थिती : – द् पाचगणी क्लब ही सुरूवातीला ग्रंथालय म्हणून सुरू झाली. या ग्रंथालयाची व्यवस्था पाहण्यासाठी प्रारंभी सहा सदस्यांची एक कमिटी स्थापन करण्यात आली. त्यांची निवड एक वर्षासाठी असे. त्यामध्ये एक सेक्रेटरी व कोषाध्यक्ष असे. या क्लबच्या सदस्यांमध्ये पाचगणीचा संस्थापक जॉन चेसन व त्याचा भाऊ यांचा समावेश होता. या ग्रंथालयाची देखभाल करणे, सदस्य संख्या वाढविणे व इंग्लंडवरून ग्रंथ मागवुन घेणे व ती वाचकांसाठी उपलब्ध करून देणे. प्रारंभी या ग्रंथालयामध्ये ग्रंथ मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती. त्याची संख्या साधारणपणे १३६१ इतकी होती.[९८] पुढे यामध्ये अनेक ग्रंथांची भर पडली. १८९० च्या काळातील अत्यंत दुर्मिळ ग्रंथ आजही इथे पहावयास मिळतात.

आज हा क्लब पाचगणीतील उद्योगपती, मॅप्रो कंपनीचे संचालक मयूर व्होरा यांच्या नियंत्रणाखाली आहे.[९९] सध्या या क्लबची व्यवस्था पाहण्यासाठी सात लोकांचे संचालक मंडळ आहे. क्लबतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.

या क्लबमध्ये इ. स. १८९० मध्ये हौजी हा खेळ सुरू करण्यात आला व त्याचेच रूपांतर टेनिस कोर्टमध्ये झाले. यामध्ये इंग्रज अधिकारी सकाळी व संध्याकाळी टेनिस खेळण्यासाठी येत असत. या टेनिस कोर्टाची मेंबरशीप स्विकारल्यानंतरच इथे खेळण्याची परवानगी असे. आजही तिच परंपरा चालू आहे.

द् पाचगणी क्लबमधे आल्यानंतर खेळ व वाचन ह्या दोन्ही गोष्टी साध्य होत. म्हणजेच शारीरिक व बौद्धिक खाद्य इथल्या सदस्यांना मिळत असे. टेनिस व गोल्फ खेळून दमल्यानंतर विश्रांती व ग्रंथ चाळणे यातून लोकांना करमणूक मिळत असे.

ग्रंथालय सदस्यत्व : – या ग्रंथालय जिमखान्याचे प्रारंभी तीन प्रकारचे सदस्यत्व होते. त्यामध्ये आजीव सभासद, निवासी सभासद व भेट देणारे सभासद, त्याकाळात आजीव सभासदासाठी रु. ५ इतकी फी होती. महिन्याची वर्गणी रु. २ व टेनिस व इतर खेळासाठी रु. १ इतकी वर्गणी होती.[१००] हे ग्रंथालय सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असे. अलिकडे हे ग्रंथालय केवळ संध्याकाळी चार ते आठ वाजेपर्यंत सुरू असते.

या क्लबची व्यवस्था पाहण्यासाठी जसे संचालक मंडळ असे त्याची सेवा करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या ठिकाणीएक व्यक्ती केअरटेकर म्हणून होती. ही जबाबदारी सखाराम बंदीसोडे या घराण्यातील व्यक्तीकडे होती. आजही त्याच घरातील व्यक्ती या क्लबची संपूर्ण जबाबदारी पाहात आहेत. बंदीसोडे घराण्यातील दादा बंदीसोडे हे काम पाहात आहेत.[१०१]

द् पाचगणी क्लबची सद्यस्थिती : – द् पाचगणी क्लबची जबाबदारी सध्या पाचगणीतील प्रतिष्ठित मंडळींकडे आहे. या क्लबमध्ये आजही टेनिस कोर्ट व इतर इनडोअर गेम्स खेळल्या जातात. तसेच या क्लबतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये पाचगणीत येणाऱ्या पर्यटकांना पर्यावरण जागृती संबंधी जागृत करणे, प्लॅस्टीक वापरावर पूर्ण बंदी, वाहनांच्या ध्वनी प्रदुषण व हवा प्रदुषण होणार नाही याची काळजी घेणे. यासाठी पोष्टर प्रदर्शनातून मार्गदर्शन केले जाते. शिवाय पाचगणीच्या विकासासाठी भरीव कार्यही या क्लबतर्फे केले जाते.परंतु इथे असणाऱ्या ब्रिटीशकालीन दुर्मिळ ग्रंथांची देखभाल झालेली दिसत नाही. कारण या क्लबच्या सदस्यांनी पुस्तके परत केली नसल्याने अनेक दुर्मिळ ग्रंथ पाहायला मिळत नाहीत. पुढील पिढीला व हे ग्रंथ उपलब्ध झाले तर अभ्यासकांना इंग्रजी साहित्याची माहिती होण्यास मदत होईल. तसेच ब्रिटीशांनी पाचगणी संबंधी केलेल्या लिखाणाची माहिती मिळून या शहरासंबंधी माहिती अभ्यासकांना मिळविता येईल.

६.२० सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ :

पाचगणी हे ब्रिटीशांनी वसविलेले गाव. इथे स्थानिक लोकसंख्या अत्यल्प होती. तरीही इथे सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व व पारतंत्र्याची जाणीव

लोकशिक्षणातून सुरू झाले होते. याच चळवळीतून पाचगणीत इ. स. १९३२ साली सार्वजनिक गणपती उत्सवाला सुरूवात झाली.[१०२] या सार्वजनिक गणपती उत्सवात पाचगणीच्या आसपास असणाऱ्या दांडेघर, गोडवली, खिंगर, आम्रळ, भिलार, अशी आठ ते दहा गावे एकत्र आली व या सर्व गावातील कार्यकर्त्यांनी गणपती उत्सवाला सुरूवात केली.[१०३]

गणपती उत्सवाचे स्वरूप :–

सन १९३२ ला पाचगणीत गणपती उत्सवाला सुरूवात झाल्यानंतर कुंभारवाड्यातून वाजतगाजत श्रीच्या मुर्तीची मिरवणुकीने शिवाजी चौकात प्रतिष्ठापना करण्यात आली. या गणपती उत्सवात पहिली काही वर्षे केवळ पुजाअर्चा होत असे. १९३५ नंतर या उत्सवात मेळ्याचे कार्यक्रम सुरू झाले. या मेळ्यामध्ये राष्ट्रीय जागृतीचे गाणी गायली जात असत व स्थानिक लोकांना राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यास प्रोत्साहित करीत. याच राष्ट्रीय मेळ्यातून भिलारे गुरूजीसारखे स्वातंत्र्यसेनानी घडले. त्याचबरोबर डॉ. सावंत, भाऊसाहेब भिलारे, बाबूराव अंब्राळे, परबतराव राजपुरे, बापूसो उंबरकर, लक्ष्मण तात्या बगाडे हेही स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाले.[१०४] पत्री सरकारच्या भूमिगत कार्यकर्त्यांना मदत करत. या काळात सार्वजनिक गणपतीत राष्ट्रीय जागृतीचे काम मोठ्या प्रमाणात चालत असे. या काळात लोकमान्य टिळकांनी घालून दिलेला पायंडा म्हणजे सार्वजनिक गणपती उत्सव हा मनोरंजनासाठी नसून समाजात ऐक्य निर्माण करून लोकजागृती करणे. हाच वसा या सार्वजनिक गणपाती उत्सवाने जपला होता. या उत्सवाला या भागाचे भिलारे गुरूजी व कळंबे महाराज यांनी पुढे नावारूपाला आणले.

आधुनिक स्वरूप :

पाचगणीत १९३२ साली सुरू केलेली सार्वजनिक गणपती उत्सवाची परंपरा आजही चालू आहे. आज या गणपती उत्सव मंडळाचे नाव 'सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ' असे ठेवण्यात आले आहे. आजही या गणपती उत्सवामध्ये राष्ट्रभक्तीवर गीते व स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारकाचे कार्य सादर केले जाते. शिवाय वर्षभर या मंडळातर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळातील सार्वजनिक गणपती उत्सव

व आधुनिक काळातील उत्सव यात खूप मोठी तफावत दिसते. आजच्या काळात उत्सव हे करमणूक व चंगळवादाचे माध्यम बनले आहे.

पूर्वी कोणताही उत्सव हा पंचक्रोशीतील लोक एकत्र येऊन एका ठिकाणी साजरा करीत. पाचगणीतील गणपती उत्सवातही आसपासच्या आठ–दहा गावचे लोक सहभागी होत. १९८० नंतर ही पद्धत बंद झाली व प्रत्येक गावागावात गणपती उत्सव साजरा केला जाऊ लागला. आज पाचगणीत ५ स्वतंत्र छोटी–मोठी मंडळे आहेत. म्हणजे सार्वजनिक उत्सवही आता प्रत्येक गल्लीपुरते मर्यादित झालेले दिसतात.

६.२१ पाचगणी व्यायाम मंडळ :

पाचगणी परिसर हा कबड्डी खेळाचा शौकीन असल्याने या भागाचे दैवत म्हणून ओळखले जाणारे ह. भ. प. दत्तात्रेय कळंबे महाराज यांनी कबड्डीचे सामने भरविण्यासाठी पाचगणी व्यायाम मंडळाची स्थापना केली. या मंडळाची स्थापना भि. दा. भिलारे गुरूजी व दत्तात्रेय कळंबे महाराज यांनी एकत्र येऊन १९५८ साली केली.[१०५]

पाचगणी परिसरात भिलारे गुरूजींनी मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कबड्डी स्पर्धा सुरू केल्या होत्या. पुढे या कबड्डी स्पर्धा व्यायाम मंडळातर्फे भरविल्या जाऊ लागल्या. आजही प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यात कबड्डीच्या राज्यस्तरीय स्पर्धा भरविल्या जातात. त्यामध्ये राज्यातील दीडशेहून अधिक संघ सहभागी होतात.[१०६] या राज्यातील पुरुष व महिलांचे मान्यवर संघ येतात, खेळ पाहण्यासाठी जत्रेसारखी गर्दी होते. या मंडळातर्फे अनेक सामाजिक, वनीकरण, उपक्रम राबविले जातात.

६.२२ निर्भिड प्रतिष्ठान मंडळ :

निर्भिड प्रतिष्ठान मंडळ हे पाचगणीत अगदी अलिकडे उदयास आलेले मंडळ असले तरी या मंडळाचे काम गेल्या २५ वर्षापासून सुरू असल्याचे दिसते. या मंडळाचे कार्यकर्ते प्रथम गणेश मित्र मंडळ व दुर्गा अष्टमी मंडळ यांच्या मंडळातून सामाजिक काम करत असत. परंतु या मंडळातून काम करीत असताना मनासारखे व जोखमीची कामे करण्यास अडचणी

येत असत. त्यामुळे या सर्व कार्यकर्त्यांनी निर्णय घेतला की स्वत:चे एक स्वतंत्र मंडळ असावे. त्यानुसार इ. स. २००८ मध्ये निर्भिड प्रतिष्ठान मंडळाची स्थापना केली.[१०७] या मंडळाचे संस्थापक मुकुंद भि. मगर हे आहेत. तेच मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही काम पहात आहेत.[१०८]

निर्भिड प्रतिष्ठान मंडळाचे कार्य :

वैकुंठ स्मशानभूमी विकसित करणे. बेवारसाचे अंत्यविधी करणे. विशेषत: एड्सग्रस्त मृत स्त्री किंवा पुरुष यांचा अंत्यविधी करणे. अपघातग्रस्तांना तातडीची मदत पोहचविणे. समाजातील कोणत्याही घटकाला दिवस असो की रात्र मदत मागताच कार्यकर्ते मदतीसाठी हजर राहतात.

या मंडळाचे कार्य पाहता अगदी अल्पावधीत या प्रतिष्ठानने पाचगणीत आपला नावलौकिक मिळविला आहे. त्याचीच पोचपावती म्हणजे शहरातील संकल्प ग्रुप, शुभचिंतक नाट्य मंडळ आणि ज्येष्ठ नागरिक संघ यांनी या मंडळाला सन्मान चिन्ह देऊन सन्मानित केले आहे.[१०९] या मंडळाचे कार्यालय हनुमान रोड, पाचगणी येथे आहे. या मंडळाचा रजिस्टर नंबर महाराष्ट्र राज्य/ई–१४०६/सातारा आहे. या मंडळाच्या कार्यासाठी देणगी देणाऱ्यांना ८० जी कलमाखाली इन्कम टॅक्स माफ आहे. अशा प्रकारे पाचगणीच्या सामाजिक कार्यात या मंडळाने एक वेगळेपणा जपला आहे. सहजासहजी जे लोक काम करायला टाळतात किंवा ज्याच्याशी आपला काही संबंध नाही, नगरपालिकेचे ते कर्तव्य आहे, असे समजले जाते ते काम नावाप्रमाणेच निर्भिडपणे करत असल्याने[११०] बेवारस लोकांना या मंडळामुळे आपलेपणा मिळाला आहे.

सारांश :

भारतातील बरीचशी पर्यटन केंद्रे ही त्याच्या सांस्कृतिक महत्त्वामुळे विकसित होतात. महाबळेश्वर, पाचगणी ही दोन शहरे पर्यटनाच्या दृष्टीने नंदनवन म्हणून ओळखली जातात. त्यापैकी पाचगणी हे त्याच्या सृष्टीसौंदर्याबरोबर टेबललँड, आशिया खंडातील दोन नंबरचे पठार यासाठी प्रसिद्ध आहे. याच पठारामुळे पाचगणीचे हवामान वर्षभर अल्हाददायक व

आरोग्यासाठी उपयुक्त असणारे असते. पाचगणीचा संपूर्ण परिसर हा अनेक ऐतिहासिक घटकांसाठी प्रसिद्ध आहे. प्रतापगड, जावळीचे खोरे हे छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारी भूमी, दुसऱ्या बाजूला पांडवगड, कमळगड, केंजळगड, वैराटगड हे गडकोट किल्ले पर्यटकांना आकर्षित करतात. शिवाय लालचुटूक, रसाळ, अवीट गोडीच्या स्ट्रॉबेरीचा आस्वाद घेण्यासाठीही लाखो पर्यटक या परिसराला भेट देतात.

पाचगणी हे पर्यटनस्थळाबरोबर ब्रिटीश काळात प्रसिद्धीला आले ते आरोग्यधाम म्हणून. पाचगणीचे हवामान दमेकरी लोकांसाठी उपयुक्त असल्याने डॉ. बिलिमोरिया यांनी बेल एअर हे चव्वेचाळीस एकर परिसरातील भव्य क्षयरूग्णालय निर्माण केले व इ. स. १९१४ च्या दशकात संपूर्ण मुंबई इलाख्यातील एकमेव हे सॅनिटोरियम म्हणून प्रसिद्धीला आले. आजही भारतातील एक नामवंत हॉस्पिटल म्हणून ओळखले जाते. जगभरातील अनेक रूग्ण उपचारासाठी येथे येतात. सेवाभावी वृत्तीने चालविल्या जाणाऱ्या या हॉस्पिटलने आपली शताब्दी साजरी केली आहे.

पाचगणीला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व आले ते राजमोहन गांधी यांनी स्थापन केलेल्या नैतिक पुनरूत्थान केंद्रामुळे. या केंद्रामुळे संपूर्ण जगभरात शांतता, सलोखा, सद्भाव ठेवण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यावर चर्चा होतात व मार्ग काढले जातात. शिवाय जग बदलण्यासाठी प्रथम स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणा, म्हणजे स्वत: बदलाल, समाज बदलेल व जग बदलेल. याचबरोबर आधुनिक काळात निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी ही अनेक उपक्रम राबविले जातात. ग्रामपरीच्या माध्यमातून स्थानिक गोरगरीब लोकांपर्यंत पोहचून त्यांच्या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो. यामुळे या केंद्रात जगभरातून लोक वेगवेगळ्या कारणांसाठी येत असतात.

या सामाजिक केंद्रांबरोबर स्थानिक पातळीवरील काही सामाजिक संस्था, मंडळे आपली समाजप्रती असणारे दायित्व निभावताना दिसतात. एकंदर पाचगणी ही जगाची छोटी प्रतिकृती म्हणून ओळखली जात असली तरी या शहराने आपला सांस्कृतिक वारसाही अत्यंत सक्षमपणे निर्माण केलेला दिसून येतो.

संदर्भ सूची :

१. Raina A. K., Lodha R.C., Fundamentals of Tourism System, Kanishka Publishers & Distributors, New Delhi, F. P. 2004, P. no. 8.

२. डॉ. भोळे ए. एस., प्रा. भाटेवाल डी. पी., पर्यटन व पर्यावरण भूगोल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, दुसरी आवृत्ती, २०१०, पृ. क्र. ९५.

४. डॉ. पाठक अरूणचंद्र शंकर, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, 'सातारा जिल्हा', प्रतिररूप पुनर्मुद्रण, मुंबई २०१२, पृ. क्र. ६७३.

५. Shina R. K., Meaning and Nature of Tourism Growth Development of Modern Tourism, Domanant Publishers and Distributors, Delhi 1999, P. no. 282.

६. Seth Pran Nath, Successful Tourism, Vol. II, Sterling Publishers Pvt. Ltd., New Delhi, Fifth Re. Ed. 2008, P. no. 283.

७. 'Hotel Prospect', Panchgani, Prospectuss.

८. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, शहर नियोजन समिती, बांधकाम विभाग रेकॉर्ड फाईल २०१०.

९. Raina A. K., Lodha R.C., Fundamentals of Tourism System, Kanishka Publishers & Distributors, New Delhi, F. P. 2004, P. no. 16.

१०. Sumitra Kulkarni, The Stara Raj, Mittal Publications, New Delhi, 1995. P. no. 175.

११. उपरोक्त.

१२. चिकणे दीपक, सदाबहार पाचगणी, प्रकृती प्रिंटर्स, सातारा १९९४, पृ. क्र. २४.

१३. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र. ७९१.

१४. कित्ता.

१५. कित्ता.

१६. मुलाखत : श्री. गोविंद परशुराम बोडस, निवृत्त नौदल अधिकारी, पाचगणी, रेस्टॉरंट इन द केव्हचे मालक, दि. १६ जून २०११.

१७. मुलाखत : सोडनवार संदीप, घोडागाडी व्यावसायिक, पाचगणी, दि. १६ जून २०११.

१८. डॉ. श्रोत्री संदीप, पुष्प पठार कास, प्रिंट ओम ऑफसेट, सातारा, तिसरी आवृत्ती २०१०, पृ. क्र. ११.

१९. Prof. Mohite Shekhar, Flowers of Kass Plateau, National Offset Printers, Satara 2014, P. no. 9.

२०. प्र. के. घाणेकर, प्रतापगड महाबळेश्वर परिसर दर्शन, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती. २००३, पृ. क्र. ८९.

२१. सातारा जिल्हा गॅझेटियर, पृ. क्र.

२२. कित्ता.

२३. दोसी पॉईंट बोर्ड (माहिती फलक).

२४. 'पाचगणी शहर', माहितीपत्रक २००८–०९.

२५. मॅप्रो गार्डन, माहितीपत्रक २०१०–११.

२६. खंडागळे अण्णा, 'चंदनाची काया दिव्य प्रेमाचा सुगंध', अवतार मेहरबाबा जीवन चरित्र, अवतार मेहेरबाबा केंद्र राऊतवाडी प्रकाशन, अकोला, २००५, पृ. क्र. ५.

२७. डॉ. दळवी दाऊद, लेणी महाराष्ट्राची, ग्रंथाली प्रकाशन, क्रं. ३१४, मुंबई, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. २८१.

२८. फडके आदित्य, सातारच्या मुलखात, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९, पृ. क्र. १६.

२९. घाणेकर प्र. के., प्रतापगड महाबळेश्वर परिसर दर्शन, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००३, पृ. क्र. १२५.

३०. कित्ता, पृ. क्र. १२६.

३१. Deshpande Vilas Rajaram (Editor) on behalf of Public Health Department Government of Maharashtra, (महाराष्ट्र आरोग्य पत्रिका)

Printed at Government Photozince Press, Pune, March 2012, P. no. 14.

३२. Bel – Air Sanatorium – Silver Jubilee – 1912 to 1937 – Souvenir made and printed in England by Hood & Co. Ltd., Sanbride Press Middlesbrough – 1937 – P. no. 2.

३३. कित्ता, पृ. क्र. ४.

३४. Bel – Air Hospital Record File – 1990-91.

३५. कित्ता.

३६. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, बांधकाम विभाग अहवाल, २०११–१२.

३७. Bel – Air Sanatorium – Diamond Jubilee, 1912 to 1987, Souvenir, 1987, P. no. 8.

३८. कित्ता, पृ. क्र. ८.

३९. कित्ता.

४०. Silver Jubilee – 1912 to 1937, Souvenir.

४१. देशपांडे विलास राजाराम (संपा.), महाराष्ट्र आरोग्य पत्रिका, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, मार्च २०१२, पृ. क्र. ७.

४२. क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रूग्णालय, क्षयरोग विकास अहवाल २०१०–११.

४३. बेल–एअर हॉस्पिटल, एक्स–रे विभाग बोर्ड.

४४. Diamond Jubilee 1912 to 1987, Souvenir – 1987.

४५. बेल एअर हॉस्पिटल रेकॉर्ड विभाग १९८०–८१.

४६. The Spark – त्रैमासिक माहितीपत्रक, जून ते ऑगस्ट २०११.

४७. मुलाखत : फादर टॉमी, ट्रस्टी बेल एअर हॉस्पिटल, १२ फेब्रुवारी २०११.

४८. मुलाखत : Dr. M. B. Daver, बेल एअर हॉस्पिटल, डायट व न्युट्रीशीयन विभाग, २६ फेब्रुवारी २०११.

४९. बेल एअर हॉस्पिटल, आरोग्य विभाग अहवाल पत्रक २०११–१२.

५०. Diamond Jubliee – 1912 to 1987, Souvenir 1987, P. no. 32.

५१. शताब्दी वर्ष स्मरणिका २०१२, Homi N. Modi, Harvest of A Century, published by I.R.C.S. Maharashtra State Branch 2012, P. no.23.

५२. देशपांडे विलास (संपा.), महाराष्ट्र आरोग्य पत्रिका, मार्च २०१२, पृ. क्र. १२.

५३. कित्ता.

५४. Bel Air Hospital – Silver Jubilee 1912 to 1937, Made and printed in England, Hood &Co., Ltd.,Sanbride Press, 1927, P. no. 31.

५५. Bel Air Hospital – Diamond Jubilee – 1912 to 1987, Souvenir, 1987, P. no. 26.

५६. कित्ता.

५७. Bel Air Hospital, Board of Trusty 2000-2001, Board, 2010-11.

५८. Bel Air, Wai Annexe, Record Book 2011-12.

५९. बेल एअर हॉस्पिटल नर्सिंग कॉलेज अहवाल २०११–१२.

६०. Golden Jubilee – 1912 to 1962, Donars List, P. no. 22.

६१. बेल एअर हॉस्पिटल कार्यालय अनुदान रजिस्टर फाईल २०१०–११, २०११–१२.

६२. मुलाखत –डॉ. यशवंत कुलकर्णी, MRA चे Marketing Officer, २३ मार्च २०११.

६३. कित्ता.

६४. Kale Bhanu : (Edited and publishers) – Reflection from Disha – Oct 2006. (quartarly magazine), P. No.6.

६५. Internet : http: // www . in . iofc . org / abt / history.

६६. Kale Bhanu : (Edited and publishers) – Disha Magazine Article by Lean Garth, P. No. 82 (Oct to Dec. 2006)

६७. Panchgani MRA Center – Record File, 2008.

६८. Information about MRA – Booklet – 2008.

६९. Internet – Initiatives of Change – An Overview http // www . iofc . org / en / abt.

७०. Reflection from Disha – Oct. 2006. . No. 6

७१. कित्ता.

७२. MRA Center, Panchganim Library Board.

७३. संजीवन हायस्कूल, पाचगणी, रजिस्टर फाईल नं. ८४, १९७०.

७४. कित्ता.

७५. मुलाखत श्री. अनिल देशपांडे, व्यवस्थपकीय सल्लागार, एम. आर. ए. सेंटर, पाचगणी, २६ मार्च २०१३.

७६. एम. आर. ए. सेंटर, पाचगणी – ग्रामपरी विभाग – माहिती पत्रक.

७७. एम. आर. ए. सेंटर, पाचगणी – Objectives of the Center - Board.

७८. मुलाखत – सुनिल कांबळे, व्यवस्थापकीय सल्लागार, एम. आर. ए. सेंटर, पाचगणी, २० मार्च २०१३.

७९. एम. आर. ए. सेंटर, स्टाफ रेकॉर्ड रजिस्टर २०१२–१३.

८०. मुलाखत – संजगिरी प्रमोद, एम. आर. ए. सेंटर ऑफीस स्टाफ, १६ मार्च २०१३.

८१. Disha Vol. 15, No. 2, January to March 2012, P. no. 18.

८२. कित्ता.

८३. MRA Center Panchgani Programme List 2012-13.

८४. Disha – A glimpse of its outreach, Vol. 15, No. 3, April to June, 2012. P. No. 7.

८५. कित्ता.

८६. मुलाखत, डॉ. ए. एस. रवींद्र राव, (संपादक) 'दिशा त्रैमासिक', एम. आर. ए. सेंटर, पाचगणी, २४ मार्च २०१२.

८७. MRA Center Visit Book Record, 2011-12.

८८. Reflection from Disha October to December 2006, P. No. 13.

८९. कित्ता, पान नं. १४.

९०. कित्ता, पान नं. १४.

९१. MRA Center, Panchgani, Valu View Building - Board.

९२. मुलाखत – संजय भांबरे (एम. आर. ए. सेंटर तांत्रिक सल्लागार कर्मचारी) दि. १६ मार्च २०१३.

९३. Disha Magazine Dialogue for Democracy, Vol. 15, No. 2, (January to March 2012).

९४. Disha Magazine, Reflection, Oct. to Dec. 2006, P. no. 24.

९५. Panchgani – The Crown Electric Printing Press, Parsee Bazar, Steet Fort Bombay, P. no. 32.

९६. मुलाखत : दादा बंदीसोड, द् पाचगणी क्लबचे केअर टेकर, २० फेब्रुवारी २०१२.

९७. Panchgani – The Crown Electric Printing Press, P. no. 33.

९८. द् पाचगणी क्लब रजिस्टर १९५०.

९९. द् पाचगणी क्लब अहवाल २०११–१२.

१००. द् पाचगणी क्लब रजिस्टर नुतनीकरण १९६७.

१०१. मुलाखत : रांजणे अशोक, द् पाचगणी क्लबचे अकौंटंट, २० फेब्रुवारी २०१२.

१०२. संभाजीराव पाटणे (संपा.), लोकमित्र देशभक्त भि. दा. भिलारे गुरूजी गौरव ग्रंथ, सार्थ मुद्रण, सातारा, १९९९, पृ. क्र. २३७.

१०३. कित्ता.

१०४. कित्ता.

१०५. पाचगणी व्यायाम मंडळ अहवाल २०१०–११.

१०६. कित्ता.

१०७. निर्भिड प्रतिष्ठान मंडळ, वार्षिक अहवाल, २००९–१०.

१०८. मुलाखत : मुकुंद मगर, निर्भिड प्रतिष्ठान मंडळ पाचगणीचे अध्यक्ष, १५ फेब्रुवारी २०११.

१०९. निर्भिड प्रतिष्ठान मंडळ, वार्षिक अहवाल २०११–१२.

११०. ज्येष्ठ नागरिक संघ, पाचगणी अहवाल २०११–१२.

प्रकरण ७ वे

उपसंहार

प्रकरण ७ वे

उपसंहार

भारतासारख्या वैविध्यपूर्ण आणि विस्ताराने मोठ्या असणाऱ्या देशात विविध नगरे, शहरे व गावे अस्तित्वात आली आणि ती शहरे, नगरे, गावे यांनी स्वत:ची एक वेगळी ओळख, इतिहास निर्माण केला. त्यांच्या या विशिष्ट गुणवैशिष्ट्यामुळे नावारूपाला आलेल्या ठिकाणांचा इतिहास हा विविध अंगांनी अभ्यासता त्यांना ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक परंपरा लाभलेली दिसून येते. महाराष्ट्राच्या भूमीत सह्याद्रीच्या पायथ्याला इतिहास घडविणारा जिल्हा म्हणजे 'सातारा' जिल्हा होय. याच सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाचगणी ही थंड हवेची ठिकाणे संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. अशा या सातारा जिल्ह्यातील पाचगणी शहरास विशिष्ट अशा भौगोलिक स्थानाने महत्त्व प्राप्त करून दिलेले आहे. पाचगणी हे एक असे अनोखे ठिकाणी की, स्वत:च्या नैसर्गिक सृष्टीसौंदर्याने, महाराष्ट्राबरोबरच भारताच्या कानाकोपऱ्यात, जगाच्या इतिहासात फिरस्त्याबरोबर सर्वांनाच आकर्षित करणाऱ्या या शहराची नैसर्गिक व ऐतिहासिकदृष्ट्या खरी ओळख झाली ती ब्रिटीश काळात. ईस्ट इंडिया कंपनीचा वॉरंट ऑफीसर जॉन चेसन याने इ. स. १८५४ मध्ये पाचगणी या प्रदेशाचा शोध लावला. या शहराच्या विकासात लक्ष घातले व या शहराला ब्रिटीश आमदनीत नावारूपाला आणले. त्याला साथ मिळाली त्यावेळचा गव्हर्नर सर ब्राटेल फ्रायर यांची.

त्यामुळे पाचगणी शहराचा विकास झपाट्याने झाला. पाचगणीच्या विकासात या शहरातील प्रशासकीय केंद्रे, शैक्षणिक संस्था, आर्थिक घटक व सांस्कृतिक केंद्रे महत्त्वपूर्ण ठरली आहेत. परंतु सुमारे दीडशे वर्षाचा इतिहास असणारी पाचगणी हे ठिकाण युरोपियन लोकांच्या निवासासाठी थंड हवामानाच्या पर्वतीय प्रदेशाचा शोध घेऊन त्या प्रदेशाचा मानवी वसाहतीसाठी विकास घडवून आणला जातो. पुढे त्या प्रदेशाचा विकास व विस्तार आंतरराष्ट्रीय किर्तीच्या शहरामध्ये झालेला दिसून येतो.

पाचगणीचा शोध ब्रिटीशकाळातील असला तरी या प्रदेशाचे प्राचीनत्व थेट पांडव काळाशी जोडला जातो, (महाभारत) सांगीतल्या जाणाऱ्या दंतकथा, आख्यायिका, पुराणे यावरून पाचगणी शहराची प्राचीनता लक्षात येते. असे असले तरी पाचगणी शहराचा इतिहास हा आधुनिक कालखंडात सुरू होतो. थंड हवामानाच्या प्रदेशाच्या शोधार्थ सर्वांगिण दृष्टीने योग्य असलेल्या ठिकाणांची पाहणी करून जॉन चेसनने इ. स. १८५० मध्ये प्रथम या प्रदेशाला भेट दिली. त्यानंतर इ. स. १८५४ मध्ये पाच टेकड्यांच्यामध्ये वसलेल्या या प्रदेशाला नाव दिले पाचगणी. महाबळेश्वर हे युरोपियन लोकांचे मुक्कामाचे ठिकाण होते. परंतु पावसाळ्यात इथे प्रचंड पाऊस पडत असल्याने हे ठिकाण या काळात राहाण्यास अयोग्य ठरत असे. त्यामुळे पश्चिम घाटातच दुसरी जागा शोधण्याची जबाबदारी जॉन चेसनवर सोपविली. इ. स. १८६० मध्ये जॉन चेसनने युरोपियन लोकांच्या वसाहतीसाठी पहिली सहा घरे बांधली व चोवीस युरोपियन लोक राहावयास आले. या गावाचा कारभार पाहण्यासाठी जॉन चेसनला सुपरिटेंड मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्त केले. चेसन हा युरोपियन लोकांच्या सहकार्याने व स्थानिक लोकांच्या मदतीने शेती लागवडीच्या माध्यमातून युरोपियन लोकांच्या गरजांची पूर्तता करू लागला.

पाचगणीचे हवामान हे अत्यंत आल्हाददायक, उत्साहवर्धक व आरोग्यदायी आहे. या भौगोलिक वैशिष्ट्यामुळेच ब्रिटीशांनी पाचगणी हे शहर मुंबई प्रांतातील आरोग्यधाम व राहण्यासाठी तीन नंबरचे शहर म्हणून मान्यता दिली. एकंदर पाचगणीच्या वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेशामुळे इथला निसर्ग ऋतुपरत्वे बदलत असतो. त्यामुळे मानवी जीवनाला आवश्यक असणारे वातावरण, हवामान व सृष्टीसौंदर्य पाचगणीला लाभल्याने ती मानवाला मिळालेली एक नैसर्गिक देणगीच म्हणावी लागेल.

पाचगणी हे पश्चिम घाटाच्या पर्वतरांगेच्या प्रदेशात असल्याने हा भूभाग जैविक संपदेचे भांडार म्हणून ओळखले जाते. हा प्रदेश पर्यावरण व जैव वैविधतेच्या दृष्टीने अतिसंवेदनशील मानला जातो. तसेच जगातील हॉटस्पॉट रिजनमध्येही त्याचा समावेश होतो. अशा या पश्चिम घाटातील पाचगणीचा प्रदेश हा जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र व भौगोलिक

तज्ज्ञांना अभ्यास क्षेत्र संशोधनासाठी आव्हानात्मक आहे. पाचगणी हे शहर जगाची छोटी प्रतिकृती म्हणून ओळखली जाते. प्राचीन काळापासून सह्याद्रीच्या डोंगरकपारीत राहणारा मुळचा समाज हा अत्यंत खडतर जीवन जगत होता. महाबळेश्वर व पाचगणी ही शहरे वसविण्यासाठी ब्रिटीशांनी केलेल्या प्रयत्नामुळेच आज ही शहरे नावारूपाला आली आहेत.

पाचगणीत ब्रिटीशांची वस्ती वाढली तेव्हा केवळ या गोऱ्या लोकांची सेवाचाकरी करणे हाच एक स्थानिक लोकांचा व्यवसाय बनला. स्वातंत्र्यानंतर पाचगणीतील समाजाचे चित्र बदललेले दिसते. आज पाचगणीतील समाज अत्यंत प्रगत व सुशिक्षित असलेला दिसतो. सर्व जाती धर्माचे लोक इथे आपआपला व्यवसाय सांभाळत या शहराचा सर्वांगिण विकास घडवून आणत आहेत. यापैकी पाचगणीच्या पायथ्याशी असणाऱ्या पसरणी भागातील चर्मकार समाजाने ब्रिटीशकाळात आपल्या व्यवसायात मोठी प्रतिष्ठा मिळविली होती. विशेषत: सांबर कातडीचे बूट ब्रिटीश अधिकाऱ्यांत अत्यंत प्रिय होते. त्यात गणू चांभार नावाच्या व्यक्तीला महाबळेश्वरच्या ब्रिटीश अधिकाऱ्याने त्याच्या कामावर खुश होऊन महाबळेश्वरमध्ये राहाण्यासाठी जमीन व पिस्तूल व त्याचा परवाना दिला होता. ब्रिटीश भारत सोडून गेले तरी त्यांच्याकडूनच शिवलेले बूट लंडनला जात होते. यावरून ब्रिटीश कालखंडात चर्मकार व्यवसायाला महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते. आजही हा समाज आपल्या व्यवसायामुळे श्रीमंत वर्गात मोडतो.

ब्रिटीश कालखंडात पाचगणीत येणाऱ्या विविध जातीधर्मीय लोकांमध्ये ख्रिश्चन, पारशी, बहाई, इराणी, मुस्लिम, फ्रेंच, जैन, बौद्ध, हिंदू, मंगोलियन, नेपाळी इ. लोकांचा समावेश होतो. ब्रिटीशांच्या बरोबर येणारा पारशी समाज हा मोठा होता. या समाजाने पाचगणीच्या विकासात फार मोठे योगदान दिलेले दिसते. बेल एअर हॉस्पिटलची स्थापना इ. स. १९१२, दि पाचगणी को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी लि. पाचगणी ही बँक स्थापना इ. स. १९३६, या समाजाने या शहराच्या आर्थिक विकासात फार मोठे मोलाचे योगदान दिले आहे. पाचगणीतील सामाजिक स्थिती पाहता येथे सुरूवातीला एकत्र कुटूंब पद्धतीला महत्त्व

देणाऱ्या व्यक्ती कालानुरूप बदलत गेल्या. समाजात असणारी बालविवाह पद्धत, देज देण्याची पद्धती बंद केल्या व आधुनिकतेचा स्विकार केला.

पाचगणी हे पर्वतीय प्रदेशावर वसलेले आहे. त्यामुळे या भागातील घरे ही उतरत्या छपराची दिसून येतात. ब्रिटीशांची घरे ही वेगळ्या पद्धतीची दिसतात. आजही ब्रिटीशकालीन घरे सुस्थितीत पहायला मिळतात. आज या घरबांधणी पद्धतीतही बदल झालेला दिसतो. पाचगणीतील स्थानिक समाजाने पाश्चात्य विचारसरणीचा स्विकार करत स्वत:च्या रूढी, परंपरा व प्रथा, सण, उत्सवातून टिकवून ठेवल्या आहेत.

पाचगणीच्या ऐतिहासिक व सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्या अनेक व्यक्ती होऊन गेल्या त्यापैकी पाचगणीबरोबर संपूर्ण जावळी विभागाचा विकास घडवून आणणाऱ्या दोन व्यक्तींचे कार्य महान ठरते. त्यामध्ये ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे व भि. दा. भिलारे गुरूजी. त्यांच्याबरोबरच आधुनिक पिढीही शहराच्या विकासात पुढे आहे. परंतु विकासाबरोबर भारतीय परंपरा नष्ट होणार नाहीत याचेही स्मरण ठेवणे गरजेचे आहे. सन १९१० साली गिरिस्थान नगरपालिकेचा दर्जा मिळवून देण्यात जॉन चेसनचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद ही भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था रचनेचा एक अविभाज्य भाग आहे. इ. स. १९६५ च्या नगरपालिका कायद्याने पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेस 'क' वर्ग दर्जा मिळाला व या नगरपरिषदेत शहराच्या विकासासाठी सर्व पायाभूत सुविधांची उपलब्धता करून दिले आहे.

नगरपालिका प्रशासन हा शहर विकासातील प्रभावी घटक असतो. स्थानिक लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक व शारीरिक विकासाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेची गुरूकिल्ली असते. त्यादृष्टीने पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेतील कामकाज पाहणारे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष तसेच कामकाज पाहणाऱ्या विविध समित्या कार्यरत आहेत.

नगरपरिषदेच्या इमारतीबाबत एक उत्कृष्ट स्थापत्यकलेचा नमूना म्हणून उल्लेख करणे यथार्थ ठरते. पाचगणी नगरपरिषदेच्या मार्फत योजलेल्या विकास प्रकल्पांपैकी

पाणीपुरवठा प्रकल्प हा अतिशय महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प महाराष्ट्रातील सर्वात खर्चिक प्रकल्प असून, पाचगणी शहराला पाणीपुरवठा करणारा प्रकल्प आहे. हे पाणी धोम धरणातून लिफ्टने वर चढविले आहे. परंतु वाढती वसाहत व लोकसंख्या पाहता हा पाणीपुरवठा पुरेसा पडत नाही. त्यासाठी नगरपरिषदेस भविष्यासाठी काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

गिरिस्थान नगरपरिषदेत नियोजन विकास समितीमार्फत शहराची नियोजनबद्ध विकासाचा आराखडा व भविष्यासाठी तरतुद विचारात घेऊन ब्रिटीशांनी इ. स. १९१४ मध्ये या विभागाची सुरूवात केली. अलिकडे पाचगणीतील एकूण उपयोगात आणलेल्या भूभागापैकी स्थानिक रहिवाशांपेक्षा येथे असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा, हॉटेल्स, अनेक एकर परिसरातील धनिकांचे बंगले यांच्या वाढत्या संख्येमुळे समितीने शहर विकासाच्या दृष्टीने व उपलब्ध मर्यादित जागेचा विचार करून इ. स. १९८३ च्या शहर विकास योजने अंतर्गत पाचगणीच्या परिसराचाही विकास करण्याचे आदेश दिले आहेत.

नगरपालिकेला मिळणाऱ्या उत्पन्नातून शहराचा विकासही होते व स्थानिक नागरिकांबरोबर बाहेरून येणाऱ्या पर्यटकांनाही अत्याधुनिक सोयीसुविधा पुरविण्यास नगरपरिषद आघाडीवर असते. तसेच पर्यटनाच्या दृष्टीने शहर महत्त्वाचे असल्याने शासनही या शहराच्या विकासासाठी विविध अनुदान देते. त्यामुळे पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद ही लोकसंख्येच्या दृष्टीने 'क' वर्ग नगरपरिषदेत मोडत असली तरी उत्पन्नाच्या बाबतीत ही नगरपरिषद श्रीमंत नगरपरिषद म्हणून ओळखली जाते. असे असले तरी या गिरिस्थान नगरपरिषदेला स्थानिक नागरिक व येणाऱ्या पर्यटकांच्यासाठी त्याच्या सोयीसुविधा देणे व पर्यावरण समतोल राखणेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

पाचगणी हे महाराष्ट्रातील एक इंग्रजी माध्यमाचे शाळांचे शैक्षणिक केंद्र म्हणून ओळखले जाते. या शैक्षणिक केंद्राला स्विझरलँड व महाराष्ट्राचे डेहराडून म्हणून संबोधले जाते. यावरून या शहरातील शैक्षणिक केंद्राची गुणवत्ता व दर्जा किती उच्च प्रतिचा आहे हे लक्षात येते.

पाचगणीतील या पब्लिक स्कूलमधून प्राचीन भारतीय गुरूकुल पद्धतीची जाणीव होते. त्यामुळे पाचगणीला 'बालग्राम' विद्यार्थी गाव म्हटले जाते. इ. स. १८९० ते इ. स. १९०२ पर्यंत पाचगणीत रोमन कॅथॉलिक पंथियांनी सुरू केलेल्या शाळा त्याकाळातील 'Role Models' म्हणून मुंबई इलाख्याबरोबर संपूर्ण भारतात प्रसिद्धीस आल्या. सुरुवातीला केवळ युरोपियन मुलांच्यासाठी असणाऱ्या या शाळा इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठाशी संलग्न होत्या. इ. स. १९३० नंतर ब्रिटीशांच्या बरोबरीने आलेले पारशी, गुजराती, मुस्लिम, हिंदू, जैन, बहाई या प्रत्येक समाजाने आपआपल्या समाजाच्या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करून आपली संस्कृती व मुल्ये जपत आंतरराष्ट्रीय दर्जा टिकविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. त्यामुळेच या शाळा विश्वासाला पात्र ठरल्या व लोकप्रिय बनल्या.

या शाळांच्यामुळे पाचगणीच्या आर्थिक क्षेत्रात मात्र दरवर्षी करोडो रुपयांची उलाढाल होताना दिसते. तसेच देशाला मिळणाऱ्या परकीय चलनातही वाढ झालेली दिसून येते. शिवाय या शाळांसाठी अनेक छोट्या–मोठ्या व्यवसायाला व रोजगाराला संधी उपलब्ध झाल्याने स्थानिक लोकांना आर्थिक उत्पन्नाचे साधन प्राप्त झाले आहे. या शहराचे साक्षरतेचे प्रमाण ८२% इतके आहे. देशातील साक्षरतेपेक्षा जास्त आहे. एकंदर या शाळांच्यापुढे पाचगणी व आसपासच्या परिसरावर शिक्षणाचा, त्याच्या आचारविचाराचा, भाषेचा पगडा तर दिसून येतो शिवाय आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्याही हा भाग समृद्ध बनला आहे.

शहराचा आर्थिक विकास हा भांडवलाची योग्य प्रकारे गुंतवणूक करण्यावर अवलंबून असतो. या गुंतवणुकीमुळे लोकांना रोजगाराची संधी मिळते. तसेच शासनालाही चांगला महसूल उपलब्ध होतो. यादृष्टीने पाचगणी आर्थिक क्षेत्रात आघाडीवर असणारे शहर आहे.

पाचगणी परिसरातील डोंगर उतारावरील शेतीतून प्रथम चहा, कॉफीची लागवड त्याचबरोबर स्ट्रॉबेरीची लागवड यामुळे या पिकाने भारताबरोबर युरोपियन देशातही एक चांगल्या प्रतिची बाजारपेठ निर्माण करून दिली. त्यामुळे या भागातील स्ट्रॉबेरीची निर्यात वाढली, त्यातून स्थानिक शेतकऱ्यांना मोठे उत्पादन मिळू लागले. त्यातून पाचगणी व परिसराचा मोठा आर्थिक विकास घडून आला.

महाराष्ट्रात सर्वात प्रथम रेशीम उत्पादन केंद्र सातारा जिल्ह्यातील पाचगणी येथे सुरू झाले. हे केंद्र महाराष्ट्रातील एक आदर्श केंद्र म्हणून ओळखले जाते. सध्या याचे केंद्र पाचगणीच्या पायथ्याशी पसरणी येथे सुरू आहे. डॉ. देवडीकर यांनी सुरू केलेले हे केंद्र संपूर्ण राज्याला मार्गदर्शक ठरले आहे.

पाचगणीत अस्तित्वात असलेल्या अनेक व्यवसायिक घटकांपैकी पर्यटनामुळे आर्थिक उत्पादनाचे साधन म्हणून हॉटेल व्यवसायाला महत्त्व प्राप्त झाले आहे. आज पाचगणीत एकूण पस्तीस हॉटेल्स आहेत. त्यापैकी वीस हॉटेल्स ही स्टार हॉटेल्स आहेत. अशा या हॉटेलपैकी पहिले हॉटेल हे 'दि प्रॉस्पेक्ट हॉटेल' असून त्याला हेरिटेज हॉटेलच्या दर्जा मिळाला आहे. त्यानंतर हिंदू हॉटेल, पुरोहित हॉटेल, लकी रेस्टॉरंटही ब्रिटीशकालीन हॉटेल्स आजही सुरू आहेत. परंतु काळाच्या ओघात या हॉटेल्सच्या संख्येत वाढ होणे आवश्यक आहे. तसेच ते सर्वसामान्यांनाही परवडणारी असणे गरजेचे आहे.

पाचगणी शहराची लोकसंख्या ही अवघी चौदा हजाराच्या आसपास परंतु या शहराला भेट देणाऱ्यांची संख्या हजारोंच्या पटीत, शिवाय शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या पाच ते साडेपाच हजार. त्यांना भेटावयास येणाऱ्या पालकांची संख्या वेगळी. त्यातून रोजची होणारी आर्थिक उलाढालही मोठी आहे. शिवाय शेतीशी निगडीत उत्पादने, त्यावर आधारित कंपन्या व पर्यटनामुळे अनेक छोटे–मोठे व्यवसाय या सर्व लोकांच्या व्यवहारासाठी पतपुरवठा करणाऱ्या बँकिंग व्यवसायाला सुरूवात झाली. आज या शहरात तीन राष्ट्रीयकृत बँका, आठ सहकारी बँका, तीन पतसंस्था इतक्या मोठ्या संख्येने बँका उपलब्ध आहेत. सहकारी बँकांपैकी दि पाचगणी को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पाचगणी ही सर्वात पहिली व जुनी बँक म्हणून ओळखली जाते. ही बँक एस. एम. बाथा या पारशी गृहस्थाने इ. स. १९३६ साली सुरू केली. ह्या सर्व पतपुरवठा करणाऱ्या संस्था या पाचगणीतील शाळा, हॉटेल्स, छोटे–मोठे व्यवसाय, स्थानिक नागरिक व व्यापारी, प्रवासी, पर्यटक यांच्या व्यवहारावर अवलंबून आहेत. पाचगणीत रोजची आर्थिक उलाढालही कोट्यावधी रुपयांची असते. यासाठी या संस्था महत्त्वाच्या ठरतात.

पाचगणीत जसे अनेक मोठे उद्योग व्यवसाय चालतात त्यापैकी पर्यटनावर अवलंबून असणारा एक व्यवसाय म्हणजे वाहतुक व्यवसाय. पाचगणीत ब्रिटीशांनी टॅक्सी व्यवसायाला चालना दिली. या काळात ब्रिटीशांना आवडणारी व जास्त चालणारी मोटारगाडी शॉरलेट ही होती. काळानुरूप गाड्यामध्ये बदल होत गेले. परंतु टॅक्सी व्यवसाय हा पर्यटनाच्या ठिकाणी एक महत्त्वाचा व्यवसाय म्हणून चालतो. परंतु अलिकडे प्रत्येकाकडे स्वत:ची गाडी असल्याने या व्यवसायात समाधान राहीले नाही. तरीही नगरपरिषदेने प्रवाशांची गैरसोय होणार नाही याकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

पाचगणी व महाबळेश्वरमध्ये जे छोटे व्यवसाय चालतात त्यामध्ये चना उद्योग, चिक्मकी व्यवसाय व नक्षीदार काठी तयार करणे, घोडागाडी व चित्रीकरण हे व्यवसायही मोठ्या प्रमाणात चालतात.

पाचगणी शहराच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून आर्थिक घटकाला प्राधान्य दिले जाते, त्यात शेती व्यवसायातून निरनिराळे छोटे–मोठे उद्योगधंदे, त्या अनुषंगाने निर्माण झालेली बाजारपेठ, देशी–विदेशी मागणीस पात्र ठरलेली उत्पादने, स्ट्रॉबेरीने मिळविलेले पेटंट या सर्व बाबी या भागाचा आर्थिक विकास घडवून आणण्यास महत्त्वाच्या ठरल्या आहेत. शिवाय इतर व्यवसायासाठी नगरपालिकेने दिलेल्या सोयी सवलती, नागरिकांचे सहकार्य यामुळे पाचगणी शहर व परिसर आर्थिकदृष्ट्या भरभराटीला आलेले शहर म्हणून ओळखले जाते. असे असले तरी शंभर टक्के गरीबी संपुष्टात आलेली नाही. काहींच्या अकुशलता, व्यसनाधीनता व चंगळवाद यामुळे काही कुटुंबे ही आर्थिकदृष्ट्या अजुनही दुर्बल राहीली आहेत.

पाचगणीतील पर्यटन स्थळांमध्ये अनेक निसर्गनिर्मित व मानवनिर्मित ठिकाणे आहेत. त्यापैकी पाचगणीचे मुख्य आकर्षण म्हणजे टेबललँडचे पठार. त्यानंतर सिडने पॉईंट, हॅरिसन व्हॅली, काचबावरी पॉईंट, पारशी पॉईंट, बेबी पॉईंट, दोसी पॉईंट, मॅप्रो गार्डन, मेहेर बाबाची गुफा, राजपुरी लेण्या, पाचगणीच्या परिसरातील किल्ले इत्यादी.

टेबललँडचा भूभाग हा जैविक संपदेचे भांडार म्हणून ओळखला जातो. येथे अनेक दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे हा प्रदेश पर्यावरण व जैव विविधतेच्या दृष्टीने अतिसंवेदशनशील (Ecological Sensitive Zone) मानला जातो. त्यामुळे त्याचा समावेश जगातील हॉट स्पॉट रिजनमध्ये केला आहे. हे पठार जैविक संपदेचे आश्रयस्थान व नविन प्रजाती निर्मिती केंद्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राचे राज्य फूल म्हणून जारूळ (लॅगरस्ट्रोमिया रेजिनी) ही वनस्पती या पठारावर आढळते. याशिवाय काही किटकभक्षी वनस्पतीही या पठारावर आढळतात. हे पठार वनस्पतीशास्त्र, जीवशास्त्र व भौगोलिक तज्ज्ञांना अभ्यासासाठी उपयुक्त आहे.

पाचगणीच्या आसपास असणाऱ्या पर्यटन स्थळामध्ये एक स्थळ म्हणजे राजपुरी लेणी, प्रतापगड, चंदन–वंदन, वैराटगड, कमळगड, पांडवगड, केंजळगड हे किल्ले पर्यटकांच्या दृष्टीने आस्थेची ठिकाणे बनली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रीयन पर्यटक या गड, कोट, किल्ल्याना आवर्जून भेट देतो.

एकंदर पाचगणीचा पर्यटनामुळे चांगला विकास घडून येण्यास मदत झाली आहे. पर्यटनामुळे दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांच्या उपजीविकेचे साधन निर्माण झाले आहे. लोकांना रोजगार प्राप्त होऊन त्यांचे जीवनमान सुधारले आहे. पर्यटनात जो पैशाचा एक रुपया खर्च होतो तो सबंध अर्थव्यवस्थेत फिरत राहतो. यासाठी गरज आहे योग्य व्यवस्थापनाची व सुविधांची. त्यासाठी शासकिय पातळीबरोबरच सामाजिक संघटनांचे योगदान महत्त्वाचे ठरते. पर्यटनातून जसा एखाद्या शहराचा विकास होतो तसा याच पर्यटकांच्यामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत असलेला दिसून येतो. पाचगणी–महाबळेश्वर ही सृष्टीसौंदर्यासाठी व थंड हवामानासाठी प्रसिद्धीला आलेली शहरे, परंतु आज व्यावसायिकी–करणामुळे सृष्टीसौंदर्य लोप पावत चालले आहे. प्रचंड प्रदुषणामुळे हवामानातही बदल झालेला दिसून येतो. शिवाय हा प्रदेश जैविक वैविधतेचे भांडार म्हणून ओळखले जाते. परंतु पर्यटकांच्या वाढत्या वाहनामुळे या जैव विविधतेचा ऱ्हास होत चालला आहे. त्यामुळे पाचगणी

महाबळेश्वरचे सृष्टीसौंदर्य व दुर्मिळ वनस्पती, प्राणी यांचे रक्षण करण्यासाठी शासनाला विशेषत: गिरिस्थान नगरपालिकाना दक्ष राहावे लागेल.

सक्षम देश व समाजासाठी लोकशाही निर्माण करणे आवश्यक आहे. या विचारसरणीतून व्यक्तीमध्ये परिवर्तन होण्याच्या दृष्टीने व्यक्तिगत बदलाद्वारे सामाजिक परिवर्तन घडविण्याच्या उद्देशाने M. R. A. म्हणजे Moral Re-armament Center व सध्याचे I of C Initiatives of Change ने पाचगणीत जे कार्य करीत आहे ते अनन्यसाधारण आहे. मानवाकडून ऱ्हास होणाऱ्या नैतिक मुल्याची जोपासना करण्यसाठी अमेरिकनस्थित फ्रँक बुचमन यांनी जगाला बदलवण्यापूर्वी प्रथम स्वत:मध्ये बदल घडवून आणण्याच्या जाणिवेतून नैतिक पुनरूत्थानाचे कार्य हाती घेतले.

भारतात ही नैतिक पुनरूत्थान चळवळ रूजविण्याचा प्रयत्न केला गेला तो देवदास गांधी यांच्याकडून. सध्या त्यांचे हे कार्य त्यांचे पुत्र राजमोहन गांधी व त्यांचे नातेवाईक राजगोपालाचार्य यांनी चालविले आहे. या सेंटरमार्फत आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रश्नापासून ते अगदी स्थानिक गावपातळीवरील समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

या एम. आर. ए. सेंटरमार्फत आणखी एक उपकेंद्र चालविले जाते ते म्हणजे ग्रामीण विकास व पर्यावरण संवर्धनासाठी ग्रामपरी हा एक स्वतंत्र उपक्रम राबवून पाचगणीच्या आसपासच्या परिसरातील दुर्गम भागातील खेड्यापाड्यांना सक्षम बनविण्याचे काम केले जाते. पाचगणीतील या केंद्रामुळे आजुबाजूच्या दुर्गम भागात व समाजात परिवर्तन घडून आले आहे. यामध्ये शासनानेही सहभागी होऊन हा चांगला उपक्रम जिल्हा पातळीवर राबविण्यास मदत करावी. तरच अविकसित भागाचा विकास घडून येईल.

वैद्यकीय क्षेत्रात कितीही प्रगती झाली तरी काही आजारांचे गांभिर्य अजूनही कमी झालेले नाही. अशा या गंभीर आजारावर इ. स. १९१२ मध्येच डॉ. रूस्तुमजी बिलिमोरिया यांनी क्षयरूग्णांवर इलाज करण्यासाठी बेल एअर सॅनिटोरियमची स्थापना प्रथम पुण्यात व इ. स. १९१४ मध्ये हे सॅनिटोरियम पाचगणी येथे हलविण्यात आले. क्षयरूग्णांसाठी लागणारे

आल्हाददायक वातावरण, स्वच्छ कोरडी हवा ही पाचगणीत असल्याने डालकेट या चव्वेचाळीस एकरच्या भव्य परिसरात या सॅनिटोरियमची उभारणी करण्यात आली. डॉ. रूस्तुमजी बोमनजी बिलिमोरिया या पारशी गृहस्थांनी सुरू केलेले हे सेंटर एक सेवाभावी संस्था म्हणून आज काम करीत आहे. त्या काळात हे सॅनिटोरियम मुंबई इलाख्यातील पहिले व भारतातील दुसरे केंद्र होते.

आज या सॅनिटोरियमचा विस्तार प्रचंड वाढला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील विविध विभाग येथे सुरू केले आहेत. आज हे हॉस्पिटल इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या नियंत्रणाखाली चालत असले तरी याची संपूर्ण व्यवस्था फादर टॉमी पाहतात. फादर टॉमी हे Missionary Congergation of the Blessed Sacrament चे सदस्य आहेत. इ. स. १९९८ पासून HIV रूग्णांसाठी स्वतंत्र विभाग सुरू झाला आहे. अशी ही सेवाभावी संस्था संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहे.

कोणत्याही समाजाची जडणघडण ही तिथल्या संस्कृती, मूल्यांवर अवलंबून असते. पाचगणी हे शहर वसले आहे ते नितांत सुंदर अशा सह्याद्रीच्या डोंगरकपारीत. याच डोंगर कपारीतील माणूसही तेवढाच सुंदर व विशाल दृष्टिकोनाचा असल्याने गावावर ब्रिटीशांचा पगडा असली तरी त्यांच्याकडीली काही चांगल्या गोष्टी या गावकऱ्यांनी स्विकारल्या. त्यापैकीच ग्रंथालय, व्यायाम मंडळ, ज्येष्ठ नागरिक संघ, निर्भिड मंडळ, द् पाचगणी क्लब ग्रंथालय, गणेश उत्सव मंडळ अशा विविध सांस्कृतिक मंडळातर्फे या गावचा विकास व समाजाला संस्कारक्षम बनविताना सेवाभावी दृष्टी, शारीरिक संवधर्णनाबरोबर मनोरंजन, अनाथांना मदत अशा अनेक सामाजिक उपक्रम या विविध सांस्कृतिक मंडळातर्फे पाचगणीकर राबवित असतात व शेती, व्यापार, व्यवसायाबरोबर सामाजिक बांधिलकीची जपणुकही केली जात असते.

सारांश, पाचगणी हे ब्रिटीशांनी वसविलेले शहर त्याच्या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे त्याला महाराष्ट्राचे मिनी काश्मिर, इटालिय आल्प्स पर्वत, स्वित्झर्लंडची उपमा दिली जात असली तरी या शहराचे स्वत:चे एक वेगळेपण आहे. महाराष्ट्राच्या पश्चिम भागात सह्याद्रीच्या

घाटमाथ्यावर वसलेल्या पाचगणी या शहराचा दीडशे वर्षांचा आढावा घेताना या शहराचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक प्रगतीचा आलेख, विकास, वाढ ठळकपणे नजरेसमोर येते. या शहराचा अभ्यास करत असताना निसर्गाची अद्‌भुतता, त्यावर मानवाने मिळविलेला विजय, निर्माण केलेला इतिहास, याबरोबरच ब्रिटीशांच्या आगमनाने या शहराला मिळालेले महत्त्व, शहरातील नागरिकांनी शहराच्या विकासामध्ये दिलेले योगदान, गिरिस्थान नगरपालिकेचे उल्लेखनीय कार्य, आंतरराष्ट्रीय किर्तीच्या शाळा, नैतिक पुनरूत्थान केंद्र व बेल एअर सॅनिटोरियमसारख्या संस्थांनी दिलेले योगदान अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिवाय पाचगणीला ओळख मिळाली ती इथल्या अविट गोडीच्या, नाजूक असणाऱ्या स्ट्रॉबेरीमुळे. या उत्पादनाने व पर्यटनाने दुर्गम भागाचा झालेला कायापालट व आर्थिक विकास हेही उल्लेखनीय ठरते. हा विकास, बदल घडवून आणण्यामध्ये जॉन चेसन ते पाचगणीचे पहिले नगराध्यक्ष थॉमस रेवरंड ते सध्याच्या नगराध्यक्ष लक्ष्मीताई कऱ्हाडकर यांचे उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अनेक मंडळींचे कार्य शहराच्या विकासासाठी व समृद्धीसाठी महत्त्वाचे ठरले आहे. असे असले तरी आज एकविसाव्या शतकात सामाजिक गतिशीलतेमुळे, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे व सर्वांत महत्त्वाचे मानवी हव्यासामुळे ही निगर्ससुंदर शहरे काळाच्या ओघात आपले सौंदर्य हरवून बसतात की काय असा प्रश्न निर्माण झालेला दिसतो. पाचगणी शहरापुढे आज पुढील समस्या निर्माण झाल्या आहेत.

१. पाचगणीचे क्षेत्रफळ मर्यादित असताना मानवी वसाहतीमुळे नैसर्गिक सौंदर्य लोप पावत चालले आहे व जंगले समूळ नष्ट झाली आहेत.

२. पर्यटन हंगामात वाढणाऱ्या पर्यटक संख्येला पाणीपुरवठा करणे व सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे दोन प्रश्न गिरिस्थान नगरपालिकेपुढे उग्र रूप धारण केले आहे.

३. विघटन न होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढल्याने पर्यावरणाची मोठी हानी होत आहे.

४. वाढत्या वाहतुकीमुळे प्रदुषणाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. शिवायस कर्णकर्कश्य आवाजामुळे जंगलातील पशुपक्षांच्या अस्तित्वावर परिणाम झालेला दिसून येतो.

५. सह्याद्रीच्या पर्वतरांगांवरील काही प्रदेश हा वर्ल्ड हेरिटेज म्हणून घोषित केला आहे. परंतु पर्यटकांच्या प्रचंड गर्दीमुळे दुर्मिळ वनस्पती, प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. उदा. टेबललँडवरील अनेक दुर्मिळ प्रजाती आज नष्ट झालेल्या दिसतात.

६. सर्वात मोठा परिणाम स्थानिक संस्कृतीवर झालेला दिसून येतो. पर्यटक चार दिवस हौस मौज करण्यासाठी येत असतात. चंगळवादी प्रवृत्तीमुळे पोशाख, आहार–विहार, वर्तन यामध्ये बेतालपणा दिसून येतो. त्याचे अनुकरण स्थानिक तरूण करू लागल्याने कष्टापेक्षा सुखासिनतेकडे वळू लागल्याने व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढून तरुण पिढी बरबादीकडे चाललेली दिसून येते.

आज अशा अनेक समस्या पाचगणीमध्ये निर्माण झालेल्या आहेत. यासाठी गिरिस्थान नगरपालिका व स्थानिक नागरिकांनी खालील काही उपायोजनांची अंमलबजावणी केली तर शहराचे महत्त्व अबाधित राहील असे वाटते.

प्रशासनाने वाढत्या जंगलतोड व इमारत बांधकामावर वेळीच नियंत्रण ठेवण्यासाठी कडक कायद्याची अंमलबजावणी गरजेचे आहे. पाचगणी शहराला पाणीपुरवठा करणारी स्वत:चे स्त्रोत उलपब्ध नसल्याने त्याला वाई शहराजवळील धोम धरणातील पाणी लिफ्टने उचलून वर घ्यावे लागते व ही अत्यंत खर्चिक बाब असल्याने नगरपालिकेने शासनाच्या मदतीने ठोस उपाय करणे गरजेचे आहे. त्यासाठी हॉटेल व्यावसायिकांच्या अतिरेकी पाणी वापरावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. सांडपाण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन राज्यकर्त्यांनी त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. प्लास्टिक वापरावर पूर्णबंदी, टेबललँडचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखण्यासाठी विक्रेत्यांच्या संख्येवर मर्यादा घालणे, वाहतुक व्यवस्थेत सुधारणा करणे आवश्यक आहे. स्थानिक संस्कृती टिकविण्यासाठी सामाजिक नेतृत्व पुढे येणे व त्यावर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. दोन दिवसाची मजा म्हणजे आयुष्य नाही याची जाणीव करून देणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाचगणी महाबळेश्वर ही पर्यटन स्थळे म्हणून नावारूपाला आलेली असली तरी इथे मराठाकालीन दैदिप्यमान इतिहासाची साक्ष देणारे अनेक गडकोट,

जुने शिवकालीन रस्ते, खिंडी, मंदिरे, इमारती आहेत. यांची देखभाल व दुरुस्तीकडेही लक्ष देणे गरजेचे आहे. पाचगणीचा संस्थापक जॉन चेसन व त्याच्या समकालीन असणाऱ्या युरोपियन लोकांची माहिती, त्यांची कागदपत्रे, त्यांनी केलेली कामे, इमारती याची माहिती संकलित होणे शहराच्या इतिहासाचा उलगडा करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

पाचगणी शहराच्या विकासातील उपरोक्त अडचणी दूर केल्यास शहराचा विकास घडून आणण्यास मदत होईल. तसेच अभ्यासक, संशोधक यांना स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले तर शहराचा इतिहास, भौगोलिक व जैवविविधतेवर प्रचंड संशोधन होण्यास मदत होईल व या प्रदेशाचे महत्त्व जगाच्या नजरेत येण्यास मदत होईल. त्यासाठी प्रशासनाने संशोधन केंद्रांची निर्मिती करून संशोधकांना वाव दिला तर जैवविविधतेच्या दृष्टीने अतिसंवेदनशील असणाऱ्या या प्रदेशाचे रक्षण होईल. यासाठी येथील शाळा, एम. आर. ए. सेंटर, बेल एअर सॅनिटोरियम व इतर सामाजिक संस्थांना सामिल करून घेणे आवश्यक आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

संदर्भ ग्रंथ सूची

१) प्राथमिक साधने

१. अप्रकाशित साधने

२. प्रकाशित साधने

२) दुय्यम संदर्भ साधने

१. इंग्रजी साधने

२. मराठी साधने

कोश

मासिके

वर्तमानपत्रे

शिलालेख

अहवाल

स्मरणिका

प्रोजेक्ट रिपोर्ट

अप्रकाशित एम. फिल. व पीएच. डी. प्रबंध

मुलाखती

वेब–साईटस्

Broucher / Report / Booklet of the Schools

संदर्भ ग्रंथ सूची

प्राथमिक साधने :

अ) अप्रकाशीत साधने :

१. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्रशासकीय अहवाल १९८० ते २०१०.

२. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद जनरल कमिटी इतिवृत्ते (सन २००५ ते २०१२)

३. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद घरपट्टी रजिस्टर (सन २०१०–२०१२)

४. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शिक्षण मंडळ रेकॉर्ड (सन १९६७ ते२०१०)

५. वार्षिक हिशोब पत्रके (सन २००१ ते २०१२)

६. Panchgani Hill Station Municipal Council modified as per letter No. न. प. क्षेत्र / पाचगणी / 1858 Date 7/9/1995 of ADTP, Satara.

७. Public Works Department report to Bombay Presidency, Vol. No. 34, File No. S. Y. 47/1862, Bombay Archaeology Dept.

८. बाथा हायस्कूल रेकॉर्ड फाईल १९४५.

९. Bel Air Sanatorium Record File 1980.

१०. M. R. A. Center Panchgani Office File 2011-12.

११. Prospect Hotel Record Book 1950-51.

१२. दि पाचगणी को–ऑप. क्रेडीट सोसायटी बँक लि. स्थापना फाईल १९३६.

१३. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, जी. बी. प्रोसिडींग बुक, सर्व विभाग.

१४. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, वार्षिक लेख्यांचा सासरांश, जमा नमुना नं. २८.

१५. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, रेकॉर्ड नमुना नं. २५, फाईल नं. २२.

१६. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी तक्ता क्र. कलम ४ (१) ब (XVI)

१७. पाचगणी शासकीय रूग्णालय रेकॉर्ड बुक २०१०–११.

१८. महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद कार्यालयीन रेकॉर्ड.

१९. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद वार्षिक अंदाजपत्रके १९८०–८१,

२०. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, आर्थिक अंदाजपत्रक १९८१–८२ ते २०११–१२.

२१. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद निवडणुक अहवाल २०११.

२२. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अहवाल १९९१–९२.

२३. कोयना एज्युकेशन सोसायटी, तळदेव हायस्कूल रजिस्टर फाईल, २०१०–११.

२४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सातारा जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, स्थानिक स्वराज्य संस्थानाचे उत्पन्मन व खर्च तक्ता क्र. ५.२, २००२–२००३ ते २००९–१०.

२५. पाचगणी पर्यटन सेन्सेक्स रेकॉर्ड, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद २०१०–११ ते २०११–१२.

२६. बेल एअर हॉस्पिटल, पाचगणी कार्यालय, रेकॉर्ड विभाग १९८०–८१.

२७. एम. आर. ए. सेंटर, रेकॉर्ड फाईल २००८–०९.

२८. संजीवन हायस्कूल, पाचगणी रजिस्टर फाईल नं. ४ – १९७०–७१.

ब) कार्यालयीन प्रकाशने (मराठी साधने)

१. सातारा शहर नगरपालिका शतसांवत्सरीक महोत्सवी अंक, १९५४.

२. सातारा जिल्हा परिषद गौरवगाथा रौप्यमहोत्सवी अंक, सातारा, १९८७.

३. सातारा शहर नगरपरिषद, स्मरणिका, १९८३.

४. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, महाबळेश्वर, रानफूल, २०१०–११.

५. आण्णासाहेब पाटील माथाडी कामगार सहकारी पतपेढी, रौप्यमहोत्सवी अंक, १९९५.

६. दि. जावली सहकारी बँक लि. रौप्यमहोत्सवी वर्ष, स्मरणिका, १९९८.

७. जिव्हाळा, ज्येष्ठ नागरिक संघ, पाचगणी, स्मरणिका, २०१०.

८. महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग आणि परंपरा, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे षष्ठ्यब्दीपूर्ती समिती प्रकाशन, कोल्हापूर, १९८०.

९. परिवर्तन, स्मरणिका, १९९०.

१०. स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा, १९९२.

११. दै. ऐक्य – वर्धापनदिन विशेष, औद्योगिक पर्यटन – तीर्थक्षेत्र विकास, १९ जानेवारी २०१०.

१२. जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ – १९६१, १९७१, १९८१, १९९१, २००१, २०११.

ब) कार्यालयीन प्रकाशने (इंग्रजी साधने)

१. Maharashtra State Gazetteers, Satara District (Revised Edition) of Volume XIX of the Original Gazetteer of the Bombay Presidency relating to Satara, Bombay Directorate of Government Printing, Stationary and Publications, Maharashtra State,1963.

२. Gazetteer of the Bombay Presidency (Fascisimile Reproduction) Satara District Volume XIX, Satara Bombay, Printed at the Government Central Press 1885, Printed at the Government Photozincographic Press, Pune 1989.

३. डॉ. पाठक अरुणचंद्र (संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, सातारा जिल्हा, मुंबई दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, १९९९, मुद्रक : व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथ भांडार, नागपूर.

४. Maharashtra Act No. XI of 1965

The Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965.

शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००६.

५. Panchayat Raj Potal.

६. Urban Development Plan Maharashtra Government, Satara District 1983, Panchgani Municipal Council Office.

७. Mahabaleshwar Hill Station Municipal Council, Urban Development Plan, 1983.

८. Bombay Legislative Assembly Debates, Vol. 31, Part II, 13th April 1956 – 2173 – 74, 2181 – 2183, 85

२. दुय्यम संदर्भ साधने (लिखित)

English Resources :

१. Bharucha Perin – Mahabaleshwar The Club, 1881 to 1981, Publishd by Homi R. Khusrokham, The Club Mahabalehwar, Edition 2nd 2006.

२. Bhatia A. K. – Tourism Development Principles and Practices, Sterling Publishers Private Ltd., New Delhi.

३. Bhatt Harish, Badan S. S. – Marketing Operations, Importance of Marketing in Tourism,Crescent Publishing Corporation, New Delhi, 2006.

४. Bhogal Dr. S. K. – Local Government of Administration in India, Sharda Prakashan, Nanded, 2009.

५. Dixit V. K. – Panchgani, Kamal Printing Press, Pune, 1989.

६. Gupta Sunil, S. P. Bansal – Tourism Towards 21st Centjury, Deep and Deep Publication Pvt. Ltd., New Delhi, 2001.

७. Irina Chelysheva – The Blue Mountains of Panchgani, Nirmal Empresse Pvt. Ltd., Mumbai, 2001.

८. Kaushik Dinesh – Financial Management of Travel & Tourism, Vishvabharati Publication, New Delhi, 2006.

९. Kulkarni Sumitra – The Satara Raj (1818-1848), Mittal Publications, New Delhi, 1995.

१०. Maheshwari S. R. – Local Government in India, Orient Longmans, New Delhi, 1971.

११. Mohite Shekhar – Flowers of Kass Plateau, National Offset Printers, Satara, 2014.

१२. Nigam S. R. – Local Government, S. Chand Company Ltd., New Delhi, 1968.

१३. Panchgani – The Crown Electric, Printing Press, Govt. Bombay.

१४. Raina A. K., Lodha R.C. - Fundamentals of Tourism System, Kanishka Publishers, Distributors, New Delhi, 2004.

१५. Rao Bahadur Parasnis D. B. – Mahabaleshwar (1870 – 1926), Laxmi Art Printing Works, Sankali Street, Byculla, Bombay, 1916.

16. Rawat P. H. – History of Indian Education, Published by Ramprasad and Sons, Agra 1970.

१७. S. Kumar Das – Research Methodology in Tourism, ABD Publishers, Jaipur, 2006.

१८. Satarawalla Kohiyar, Tehmurs, Tourists Guide to Mahabaleshwar and Its Environs, Published by New Book Co. Kitab Mahal, Hornby Road, Bombay, 2nd Edition 1954.

१९. Seth Pran Nath – Successful Tourism – Vol. II, Sterling Publishers Private Limited, New Delhi, Fifth Revised Edition 2008.

२०. Sharma K. K. - Tourism and Development, Sarup and Sons, New Delhi, 1st Edit.2005.

२१. Sharma M. P. – Local Self Government in India, Kitab Mahal, Allahabad, 1967.

२२. Sharma M. P. – Local Self Government in India, Kitab Mahal, Allahabad, 1967.

२३. Shina R. K. – Meaning and Nature of Tourism Growth and Development of Modern Tourism, Damanant Publishers and Distributors, Delhi, 1999.

२४. Za Chetakar – Indian Local Self Government, Novelty Publication, Patana, 1969.

२) मराठी साधने :

१. आकोलकर ग. वी. – माध्यमिक शिक्षण, समाज प्रबोधन, संस्था, पुणे, प्रथम आवृत्ती १९६५.

२. आकोलकर ग. वी. – लोकशाही आणि शिक्षण, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९५९.

३. डॉ. आगलावे प्रदीप – संशोधन पद्धती : शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २०००.

४. आठवले सदाशिव – इतिहासाचे तत्वज्ञान, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९६७.

५. श्री. आरेकर आर. डी., प्रा. डॉ. आहेर बी. अंकुश – व्यापारी भूगोल, अथर्व प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जून २०१३.

६. ओक प्रमोद – एलफिन्स्टन (चरित्र), राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९०.

७. डॉ. करंदीकर सुरेश – उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.

८. किर धनंजय, मालशे स. ग. – महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६९.

९. प्रा. कुलकर्णी पी. के. – ग्रामीण व नागरी समाजशास्त्र परिचय, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००६.

१०. प्रा. कुलकर्णी शिल्पा – महाराष्ट्रातील पर्यटन, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती २००९.

११. डॉ. कारेकर शोभा, डॉ. घोडके शरद – महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, अशुल पब्लिकेशन्स, नागपूर, प्रथम आवृत्ती २००६.

१२. कुंडले म. बा. – शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७३.

१३. कुंडले म. बा. – शैक्षणिक सिद्धांत, तात्विक व सामाजिक, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९६९.

१४. के. सागर – महाराष्ट्रातील ३१ जिल्हे, अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९८.

१५. कोपर्डेकर हे. द. – नगरांची व्यथा आणि कथा, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८४.

१६. कोठेकर शांता – इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००५.

१७. प्रा. खतीब के. ए. – भारताचा भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, २००५.

१८. प्रा. खतीब के. ए. – नागरी भूगोल, संजोग प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २०१२.

१९. गर्गे स. म. (संपा.) – सरदेसाई गोविंद सखाराम– मराठी रियासत खंड एक ते आठ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरे पुनर्मुद्रण २०११.

२०. गोर्व्हर बी. एल., अनुवादक कोल्हेकर एन. के. – आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी लि., नवी दिल्ली, २००३.

२१. डॉ. गठाळ एस. एस. – इतिहासाच्या शाखा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०११.

२२. घाणेकर प्र. के. – इथे महाराष्ट्र देशी, स्नेहल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती २००५.

२३. घाणेकर प्र. के.– डोळस भटकंती, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००८.

२४. चिकणे दीपक विठ्ठल – सदाबहार पाचगणी, प्रकृती प्रिंटर्स, शनिवार पेठ, सातारा, प्रथम आवृत्ती १९९८.

२५. डॉ. घारापुरे विठ्ठल – पर्यटन भूगोल, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २०१०.

२६. डॉ. घारापुरे विठ्ठल – भारताचा भूगोला, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २००६.

२७. डॉ. घारापुरे विठ्ठल – पर्यावरण शास्त्र, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती २००६.

२८. घोडके ह. म. – महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०००.

२९. ठाकरे के. सी. (प्रबोधनकार) – प्रतापसिंह आणि रंगो बापूजी म्हणजेच साताऱ्याच्या राज्यक्रांतीचा इतिहास, मुंबई, १९४८.

३०. प्रा. डांगे चंद्रकुमार – शैक्षणिक समस्या, प्रतिभा मुद्रणालय, पुणे, प्रथम आवृत्ती १९६३.

३१. डॉ. दळवी दाऊद – लेणी महाराष्ट्राची, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, क्र.३१४, प्रथम आवृत्ती २००४.

३२. दिक्षित दत्तात्रय कमलाकर – महाबळेश्वर, ज्ञानप्रकाश छापखाना, मुंबई १९०२, (मुंबई मराठी ग्रंथालय, दादर)

३३. देशपांडे महेश – साताऱ्याच्या परिसरात, लोकवृत्त प्रकाशन, सातारा, सुधारित आवृत्ती, २०११.

३४. प्रा. चोपडे वी. एन. – ग्रमीण शिक्षणाची मुलतत्वे, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, १९६७.

३५. देव प्रभाकर – इतिहास शास्त्र संशोधन, अध्यापन आणि लेखन परंपरा, ब्रेन टॉनिक प्रकाशन गृह, नाशिक, प्रथम आवृत्ती २००७.

३६. दर्शनकार अर्जुनराव – पंचायतराज व नागरी प्रशासन, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००८.

३७. धर्माधिकारी भा. वि. – कर्मयोगी महाराज, ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे जीवन चरित्र, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, १९९२.

३८. धारूरकर य. जा. – शैक्षणिक तत्वज्ञान, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७३.

३९. प्रा. नलावडे इंद्रजित – आपला सातारा जिल्हा, शाश्वत प्रकाशन, भोसरी, पुणे.

४०. नरवणे मीनल – भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नूतन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९९.

४१. प्रा. नाडगोंडे गुरूनाथ – सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८७.

४२. पाटणे संभाजीराव (संपा.) – लोकमित्र, देशभक्त भि. दा. भिलारे गुरूजी गौरव ग्रंथ, सार्थ मुद्रण, सातारा, १९९९.

४३. पारसनीस न. रा. – शिक्षणाची तात्विक व समाजशास्त्रीय भूमिका, नूतन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८७.

४४. डॉ. पाटील वा. भा. – स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती २००९.

४५. डॉ. पाटील वा. गा. – महाराष्ट्र शासन, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती २०१२.

४६. पाटील बाबासाहेब दत्तात्रय – डॉ. बापूजी साळुंखे व्यक्ती, कार्य आणि आठवणी, सूपर प्रिंटर्स, बेळगाव, १९८६.

४७. प्रा. बोकील वि. पा. – शिक्षणाचे तत्वज्ञान, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९६०.

४८. प्रा. पाटील बी. बी., प्रा. चव्हाण उर्मिला – भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४.

४९. भोसले यशोधरा – प्रवास पर्यटनाचे नवे पैलू, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती २००५.

५०. भंडारी चारूचंद्र – भूदान या समग्र दर्शन, परंधाम विद्यापीठ प्रकाशन, वर्धा, द्वितीय आवृत्ती १९५६.

५१. भावे वासुदेव कृष्ण – महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, वरद प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९८.

५२. भावे वासुदेव कृष्ण – पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवत्ती १९९८.

५३. राणे रघुनाथराव गोविंदराव – सत्यासाठी आत्माहुती देणारे छत्रपती प्रतापसिंह महाराज, वैशाली प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९२९, सुधारित आवृत्ती २०११.

५४. डॉ. भोगले शांताराम कृष्णराव – भारतातील स्थानिक स्वशासन, शारदा प्रकाशन, वजिराबाद, नांदेड, प्रथम आवृत्ती, १९७६.

५५. डॉ. भोळे ए. एस. – पर्यटन व पर्यावरण भूगोल, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, द्वितीय आवृत्ती २०१०.

५६. ह. भ. प.भोसले आबासाहेब महाराज (संपा.) – ओवाळू आरती माझ्या पंढरीनाथा, प्रकाशन कै. ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे विश्वस्त मंडळ, आळंदी, मोरया ऑफसेट प्रिंटर्स, रहिमतपूर, २००९.

५७. मानकीकर श्री. म. – शिक्षणशास्त्राची मुलतत्वे, ठोकळ प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९६२.

५८. प्रा. राऊत गणेश, प्रा. राऊत ज्योती – महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास १८१८ ते १९६०, डायमंड पब्लिकेशन, पुणे, तृतीय आवृत्ती २००७.

५९. लांजेकर जगदीश रामचंद्र – महाबळेश्वर सहल, विद्यापीठ प्रकाशन, वाई, २००७.

६०. लोटे रा. ज. – भारतीय राजकीय व्यवस्था, पिंपळमुरे ॲण्ड कं., पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती १९९८.

६१. डॉ. शिंदे एस. बी. – पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००६.

६२. प्रा. विराज एम. ए. – महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९७२.

६३. डॉ. वैद्य सुमन, डॉ. शांता कोठेकर – आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती १९९९.

६४. डॉ. व्हटकर अशोक – प्राचीन भारतीय लोकतांत्रिक शासनाचा इतिहास, मधूराज पब्लिकेशन्स प्रा. लि., पुणे, १९९५.

६५. डॉ. शिंदे आबासाहेब – सातारचे प्रति सरकार, उषा प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००३.

६६. सरदार गं. बा. (संपा.) – महाराष्ट्र जीवन परंपरा, प्रगती आणि समस्या, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९६०.

६७. डॉ. सुर्वे गजानन – डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्ती आणि कार्य), मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९८१.

६८. डॉ. संत दु. का. – संशोधन पद्धती, प्रक्रिया, अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९८, पुनर्मुद्रण, २००७.

६९. सवदी ए. बी. – सवदी ग्राफीज द मेया सिरीज, निराली प्रकाशन, पुणे, दहावी आवृत्ती, २००७.

७०. डॉ. सांगवे विलास – भारतातील सामाजिक समस्या, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९७९.

७१. डॉ. सरदेसाई बी. एन. – महाराष्ट्र शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९८६.

७२. डॉ. सरदेसाई बी. एन. – आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती २००४.

७३. साळुंखे गणपत – असा घडला सातारा, संजीवन पब्लिकेशन्स, २०१२.

७४. डॉ. श्रोत्री संदीप – पुष्पपठार कास, प्रिंट ओम ऑफसेट, सातारा, तृतीय आवृत्ती २०१०.

७५. प्रा. बंग के. आर. – महाराष्ट्र शासन व राजकारण, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००९.

७६. भोळे भास्कर लक्ष्मण, बेडकिहाळ किशोर (संपा.) – बदलता महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, द्वितीय आवृत्ती, २००३.

अ) विश्वकोश :

१. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपादक), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, मराठी विश्वकोश खंड ५, प्र. प्रकाशन १९८०.

२. तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, मराठी विश्वकोश खंड १३.

३. डॉ. वाड विजया (संपादक), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ २००७, खंड १७.

ब) समाजविज्ञान कोश :

१. श्री. गर्गे स. मा. – भारतीय समाजविज्ञान कोश, संचालक, समाज विज्ञान मंडळ, पुणे, १९९०, खंड ४.

क) भारतीय संस्कृती कोश :

१. महादेवशास्त्री जोशी (संपादक), भारतीय संस्कृती कोश, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, प्रथम आवृत्ती १९७६.

ड) सामाजिक ज्ञानकोश :

१. प्रा. जोशी बी. आर. (संपा.), डायमंड सामाजिक ज्ञानकोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणये, प्रथम आवृत्ती २००७, खंड १ व खंड २.

इ) महाराष्ट्र पर्यटन कोश :

१. साने र. य. (संपादक), विद्या विकास मंडळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९८.

फ) मराठी रियासत खंड

ज) सांस्कृतिक महाराष्ट्र कोश :

कर्णिक मधू मंगेश (संपा.), १९६० ते २०१०, भाग २, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, २०११.

मासिके :

१. उद्योजक – फेब्रुवारी २०११, 'पर्यटन उद्योग संधीचा खजिना !'

२. उद्योजक – आक्टोबर २०१३, 'रौप्यमहोत्सवी वाटचाल, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र – एक सिंहावलोकन'.

३. योजना – सप्टेंबर २०११, 'सेवाक्षेत्र'.

४. योजना – डिसेंबर २०१०, 'विशेषांक', 'ईशान्य भारत एक दृष्टिक्षेप'.

५. योजना– जानेवारी २०१३, 'चांगले प्रशासन'.

६. योजना– मे २०१०, 'पर्यटकांची पसंती' भारत.

७. लोकराज्य – एप्रिल २०११, 'फिरायला जाऊ महाराष्ट्र पाहू'.

८. लोकराज्य – आक्टोबर २००९, 'पर्यटन विशेष'.

९. लोकराज्य – जुलै २०१४, 'सर्वात पुढे महाराष्ट्र माझा'.

१०. साप्ताहिक सकाळ – १२ फेब्रुवारी २०११, 'पर्यटन विशेषांक'.

११. साप्ताहिक सकाळ – २६ जानेवारी २०१३, 'सफरनामा'.

१२. सकाळ विशेष अंक – आक्टोबर २००४, 'महाबळेश्वर', टुरिस्ट गाईड.

१३. 'पर्यटन' विशेष अंक – मे २०१०.

१४. महाराष्ट्र आरोग्य पत्रिका – मार्च २०१२, 'घाबरू नका क्षयरोग पूर्ण बरा होतो'.

१५. The Spark – Bel Air Hospital (Quarterly) March to May 2010-11, September to November 2009-10.

१६. Disha – Initiatives of Change Vol. 15 (Quarterly) April to June 2012, January to march 2012, Jully to September 2012, October to December 2006, January to March 2008.

दैनिक वर्तमानपत्रे :

१. दै. लोकसत्ता – ०५ जून, १९९९
०३ आक्टोबर, २०१२
०८ नोव्हेंबर, २०१२
२९ ऑगस्ट, २०१३
३० ऑगस्ट, २०१३

२. दै. ऐक्य – १९ जानेवारी, २०१० (वर्धापनदिन विशेषांक)
१० ऑगस्ट, २०१०.
०६ मार्च, २०१३.

३. दै. सकाळ – १७ नोव्हेंबर, २००३
२७ सप्टेंबर, २००८
३० आक्टोबर, २००८

			१ एप्रिल, २०१० (पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शताब्दी वर्ष पुरवणी अंक)
			२१ सप्टेंबर, २०१०.
			८ नोव्हेंबर, २०१२
			१ एप्रिल, २०१२
			७ एप्रिल, २०१२
			२० जानेवारी, २०१३
			१० एप्रिल, २०१३
४.	दै. सामना	–	२८ ऑगस्ट, २०१३
५.	दै. तरुण भारत	–	१६ नोव्हेंबर, २०११
६.	दै. लोकमत	–	९ ऑगस्ट, २००८.
७.	दै. पुढारी	–	९ एप्रिल, २०१०
			९ एप्रिल, २०१२
८.	दै. महाराष्ट्र टाईम्स	–	१३ फेब्रुवारी २०११.
९.	दै. पुण्यनगरी	–	७ जून २००९.
			२० फेब्रुवारी २०१३.
१०.	दै.जरंडेश्वर समाचार	–	७ जून २००९
			१० एप्रिल २०१०
			(पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद शताब्दी वर्ष अंक)

शिलालेख :

१. राजपुरी लेणे.

२. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद.

३. बेल एअर हॉस्पिटल.

४. बाथा हायस्कूल.

५. केदारेश्वर मंदिर, दांडेघर.

६. जॉन चेसन समाधी – १८७१.

७. पाचगणी शासकीय रूग्णालय शिलालेख.

८. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलांची शाळा क्र.१.

९. किमिन्स हायस्कूल.

१०. सेंट पिटर्स हायस्कूल.

११. न्यू इरा हायस्कूल, क्लिप्टन वसतीगृह.

१२. अंजुमन – ए– इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी.

१३. श्री घाटजाई मंदिर.

१४. एम. आर. ए. सेंटर, व्हॅल्यू व्ह्यू बिल्डींग शिलालेख.

अहवाल :

१. 'संस्कृती' श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर, वार्षिक अहवाल, १९६०–६१, १९७३–७४, १९९९–२०००, २००३–०४ ते २०१०–११.

२. 'रयत' रयत शिक्षण संस्था, सातारा वार्षिक अहवाल १९८०–८१, १९९०–९१.

३. भारती सहकारी बँक लि. पुणे, ३०, मल्टी स्टेट शेड्युल्ड बँक २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

४. दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि., मुंबई, वार्षिक अहवाल २००७–०८, २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

५. दि. वाई अर्बन को–ऑप. बँक लि. वाई, वार्षिक अहवाल २००९–१० २०१०–११, २०११–१२.

६. महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि. महाबळेश्वर, वार्षिक अहवाल व ताळेबद, २००७–०८, २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

७. बेल एअर सॅनिटोरियम व हॉस्पिटल वार्षिक अहवाल २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

८. जावली सहकारी पतपेढी, मुंबई, वार्षिक अहवाल २०११–१२.

९. सह्याद्री सहकारी बँक, वाशी मुंबई, वार्षिक अहवाल २००९–१०.

१०. पाचगणी व्यायाम मंडळ, पाचगणी वार्षिक अहवाल २००७–०८, २०११–१२.

११. श्रीराम फूड प्रोसेसिंग कंपनी लि. भिलार, वार्षिक अहवाल २०११–१२.

१२. मालाज फ्रूट प्रोडक्टस कंपनी, भोसे (पाचगणी) २०१०–११.

१३. मनमा फूड प्रोडक्टस भोसे (पाचगणी) २००९–१०.

१४. दि पाचगणी को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पाचगणी वार्षिक अहवाल २००६–०७, २००७–०८, २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

१५. दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा, वार्षिक अहवाल १९६८–६९, २००४–०५.

१६. श्री घाटजाई नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पाचगणी वार्षिक अहवाल व ताळेबंद २००६–०७, २००७–०८, २००८–०९, २००९–१०, २०१०–११, २०११–१२.

स्मरणिका (मराठी) :

१. दि जावली सहकारी बँक लि. मुंबई, स्मरणिका १९९८ (रौप्य महोत्सवी वर्ष).

२. 'जिव्हाळा', जिव्हाळा ज्येष्ठ नागरिक संघ, पाचगणी २०१२–१३ (प्रथम वर्ष स्मृती अंक)

३. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर, सुवर्ण महोत्सवी अंक २००४–०५.

४. 'स्ट्रॉबेरी महोत्सव', स्मरणिका, २००७.

५. युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा, हिरक महोत्सवी अंक १९७४–७५.

स्मरणिका (इंग्रजी) :

१. 'The Phoenix' – St. Peter's School Panchgani, 2004-05 – Souvenir.

२. 'For the Betterment of the World', New Era High School – Souvenir – 2005 – Celebrating 60 years.

३. 'यह संजीवन', Sanjeewan Vidyalaya Panchgani, Golden Jubilee year 1972.

४. 'Billimoria the 100', Billlimoria Highschool Panchgani, A Centenary year 2008.

५. '111 years Dedicated Service', Anjuman – I – Islam Bombay, Centenary Celebrations 1986.

६. '50th Golden year', Batha High School, Panchgani, The Golden Jubilee year,

७. "Souvenir" – Silver Jubilee of the Bel Air Sanatorium, 1912 to 1937. Made and Printed in England by Hood & Co. Ltd., Sanbridge Press, Middlesbrough 1937 London.

८. 'Bel-Air' Sanatorium 1912 to 1962 – Souvenir Golden Jubilee year 1962.

९. 'Bel-Air' Sanatorium and Hospital 1912 to 1987 Souvenir, Diamond Jubilee year 1987.

१०. "Harvest of A Century", Bel – Air Hospital Panchgani – 1912 to 2012. Hemi N. Modi (Edit.) Published by The Indian Red Cross Society Maharashtra State Branch Parmit Print, Vile-Parle (E) Mumbai – 2012.

प्रोजेक्ट रिपोर्ट :

१. Mandiwala Abdulqader Abdeali (M. C. E.). "A comparative study and Market Research of Mala's Fruit Products with Mapro and Kissan from Retailers and Consumers Perspective with Respect to Pune City." Society's Allana Institute of Management Sciences, Camp, Pune 2007-2009.

अप्रकाशित एम. फिल., पीएच. डी. प्रबंध :

अ) इंग्लिश पीएच. डी. प्रबंध

Smt. Patil Pushplata – "Geographical Study of Tourism Development in Mahabaleshwar and Panchgani Region", Shivaji University, Kolhapur, 1995.

ब) मराठी

१. श्रीमती दिसले नलिनी – ''सातारा शहराचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००५.

२. होमकर पद्मश्री प्रशांत – ''पाचगणी शहरातील इंग्रजी माध्यमातील सुवर्ण महोत्सवी विद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००७.

३. श्रीमती सरोदे स्वामी शामराव – ''ताराबाई मोडक : एक अग्रगण्य स्त्री–समाज सुधारक व शिक्षणतज्ज्ञ'', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००९.

४. प्रा. खुटाळे सतीश लक्ष्मण – ''विसाव्या शतकातील पाचगणीचा शैक्षणिक विकास : एक अभ्यास'', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, २००८.

मुलाखती :

१. भिलारे भि. दा., माजी आमदार (जावळी विभाग), सर्वोदय योजनेचे संचालक, भिलार, पाचगणी, १० मे २०११.

२. श्री. जोशी रामदास, विठ्ठल मंदिर, पुजारी, पाचगणी, १७ जून २०११.

३. श्री. पुरोहित वासुदेव, राजपुरोहित मालक, १० सप्टेंबर २०१२.

४. श्री. भिलारे सचिन, मुख्य लिपिक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाचगणी, १६ ऑगस्ट २०१२.

५. सौ. गुजर स्वाती रवींद्र, कनिष्ठ लिपिक, स्टोअर विभाग, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, १७ ऑगस्ट २०१२.

६. श्रीमती कऱ्हाडकर कांचनमाला, नगराध्यक्ष, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाचगणी, २२ सप्टेंबर २०१२.

७. सौ. राऊत आशा, चीफ ऑफिसर, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद, पाचगणी, ४ सप्टेंबर २०१२.

८. सौ. शिंदे सुशिला जगन्नाथ, मुख्याध्यापिका, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रं.२, ७ डिसेंबर २०१२.

९. श्री. शिंदे जगन्नाथ गुरूजी, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रं. १, १५ जानेवारी २०११.

१०. श्री. कांबळे सुनिल, सकाळ वार्ताहार, पाचगणी, २० एप्रिल २००९, १६ जून २०१०, १५ ऑगस्ट २०११.

११. श्री. अशोक मोरे, अभयपुरी गावचे ग्रामस्थ, एम.आर. ए. सेंटर पाचगणी, ग्रामपरी विभाग, २६ जानेवारी २०१३.

१२. सौ. जयश्री राव, एम. आर. ए. सेंटर पाचगणी, ग्रामपरी विभागाच्या संचालिका, २ ऑक्टोबर २०१२.

१३. श्री. संजय कांबळे, एम. आर. स. सेंटर पाचगणी, कर्मचारी, २० जानेवारी २०१२.

१४. डॉ. ए. एस. रवींद्र राव (संपादक), 'दिशा', त्रैमासिक, एम. आर. ए. सेंटर, पाचगणी.

१५. श्री. अनिल देशपांडे, एम. आर. ए. सेंटर, पाचगणी, व्यवस्थापकीय सल्लागार, २६ मार्च २०१३.

१६. Fr. Tomy Scaria Kariyilakulam,Bel Aair Hospital, Director, Panchgani, 20th January 2010.

१७. लक्ष्मी डिझूजा, लॅब टेक्निशियन, बेल एअर हॉस्पिटल प्रयोगशाळा, २९ मार्च २०१०.

१८. कांबळे आर. बी., मुख्याध्यापक, पाचगणी गिरिस्थान नगरपरिषद मुलांची शाळा क्रं.१, ७ ऑगस्ट २०११.

१९. Principal, Kimeen's School Panchgani, 2nd April 2011.

२०. मिस रीटा नन्स, शिक्षिका, सेंट जोसेफ स्कूल, पाचगणी, २ एप्रिल २०११.

२१. श्री. आयुवा शेख, क्रीडा शिक्षक, अंजुमन-ए-इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी, ३ एप्रिल २०११.

२२. शमशुद्दीन शेख, टोरांटो, अंजुमन-ए-इस्लाम पब्लिक स्कूल, पाचगणी (माजी विद्यार्थी , २००८), ३ एप्रिल २०११.

२३. श्री. देशमुख आर. एस., प्राचार्य, संजीवन विद्यालय, पाचगणी, ५ एप्रिल २०११.

२४. सौ. चंपाबेन एन. पटेल, प्राचार्या एस. एम. बाथा हायस्कूल, पाचगणी, २ जानेवारी २०११.

२५. मिसेस सोहली, लकी रेस्टॉरंटचे मालकीण, १० जून २०११.

२६. बटुकभाई पुरोहित, गुजरात लॉजचे मालक, १० मे २०१२.

२७. दत्तुबुवा बेलोशे, बेलोशे विठ्ठल मंदिराचे व्यवस्थापक व ह.भ. प. कळंबे महाराजांचे सहकारी, १९ फेब्रुवारी २०१३.

ब्रोशर्स / रिपोर्ट / बुकलेट :

१. Miss. Peursall informal report by the Principal Kimmins High-School Panchgani 1898 to 1998.

२. St. Josep Convent School Booklet 2010-11.

३. Kimmin's School Broucher 2008.

४. Kimmin's School Panchgani Cantenary Celebration 1898 to 1998.

५. St. Peeter's School Broucher 2010-11.

६. St. Josehf Convent School Prospect 2010-11.

७. St. Peeter's High School Prospect 2011-12.

८. Billimoria High School Panchgani Prospect 2011-12.

९. Anjuman – i – Islam Public School, Panchgani Prospectus 2011-12.

१०. Sanjeevan Public School, Panchgani, Prospect 2010-11.

११. S. M. Batha High School, Panchgani, Prospect 2011-12.

१२. New Era High School Prospect 2011-12.

१३. महात्मा फुले विद्यामंदिर हायस्कूल, पाचगणी २००९–१०.

१४. श्रीमती कांताबेन महेता ज्युनिअर कॉलेज, पाचगणी २०११–१२.

वेब साईटस् :

१. http : / / en . wikipedia . org / wiki / initiatives of change.

२. http : // www . iotc . org / en / abt / initiatives of change.

३. http : // idc . org / tags / initiatives of change.

४. www . cauxforum . net / initiatives of change.

५. http : // en . wikipedia . org / wiki ./ english education act . 1835.

६. http : // en . wikipedia . org / wiki /frank buchman.

७. http : / www . i of c . org / en / dot.

८. http // www . in . i of c . org / abt history

–––––

परिशिष्टे

परिशिष्ट

१) **जॉन चेसन** :– पाचगणीत येणारा पहिला युरोपियन. ईस्ट इंडिया कंपनीचा सेवानिवृत्त अधिकारी. इ. स. १८५४ मध्ये पाचगणीचा शोध व वसाहत. पाचगणी गिरिस्थानचा सुपरिटेंडंट व मॅजिस्ट्रेट म्हणून सर जॉन फ्रेअर शासनाकडून नियुक्ती. इ. स. १८८० मध्ये लोकल बोर्डाची शाळा सुरू. इ. स. १८९५ ला युरोपियन मुलांसाठी निवासी इंग्रजी शाळांची सुरूवात. इ. स. १९१० मध्ये गिरिस्थान नगरपालिकेची स्थापना. पाचगणीचा विकास, युरोपियन वृक्षांची लागवड, स्ट्रॉबेरीची लागवड. भव्य व प्रशस्त बंगल्याची निर्मिती.

२) **सर बार्टल एडवर्ड फ्रेअर** :– मुंबईचा प्रांताचा गव्हर्नर (इ. स. १८६२ ते १८६७), सातारा संस्थानचा ब्रिटीश अधिकारी म्हणून नेमणूक. त्याच्याच काळात महाबळेश्वर हा प्रदेश ब्रिटीशांच्या ताब्यात घेण्यात आला. त्यानंतर सातारा जिल्ह्याचे कमिशनर म्हणून नियुक्ती. पाचगणीला Hill Station Sanitorium चा दर्जा. महाबळेश्वर, पाचगणी पर्यटन स्थळे म्हणून घोषित.

३) **डॉ. रूस्तुमजी बी. बिलिमोरिया** (जन्म १३ मे १८८२, मृत्ये १९७१) :- मुंबई इलाख्यात सर्वात प्रथम क्षयरूग्णावर इलाज करण्यासाठी 'बेल एअर' या सॅनिटोरियमची इ. स. १९१२ मध्ये स्थापना. पाचगणी येथे डालकेट इस्टेट नावाने ओळखल्या जाणाऱ्या चाळीस एकर परिसरातील प्रकल्प आज बेल एअर हौंस्पिटल नावाने भारतात प्रसिद्ध. बिलिमोरिया यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून इ.स. १९३६ मध्ये कैसर-ए-हिंद हा किताब बहाल. इ. स. १९६१ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित.

४) **राजमोहन गांधी** (जन्म इ. स. १९३५) :- राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे नातू व चरित्रलेखक. University of Illinois, Urbana Champaign, USA येथे South Asian and Middle Estern Studies चे Professor. Moral Re-Aramament Central Institute of Change या International Association Mountain House Caus, Switzeraland चे Former President. भारतातील MRA/ I of C या Training Centre चे संस्थापक, राज्यसभेचे सदस्य. Human Rights Commission U. N. A. चे भारतीय प्रतिनिधीत्व (इ. स. १९९०), महत्त्वाचे पुस्तक - Mohandas : A True Story of Man, His people and an Empire.



५) **ह. भ. प. दत्तात्रेय महाराज कळंबे** (जन्म इ. स. १९१९, मृत्यू २००६) :– जावळी सारख्या दुर्गम भागाचे भाग्यविधाते, आध्यात्मिक संत, मंदिरे व शैक्षणिक संस्थांची उभारणी, जावळी भागातील गोरगरीब जनतेचे आश्रयदाते, माथाडी कामगारा प्रश्न, धोम धरण प्रकल्प, दि जावली सहकारी बँकेची स्थापना इ. महान कार्य. पाचगणी व्यायाम मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजक.

६) **भि. दा. भिलारे गुरूजी** (जन्म इ. स. १९१९) :– इ. स. १९३६ मध्ये शिक्षकी पेशाने सुरूवात, राष्ट्रसेवा दलाचे प्रमुख, प्रतिसरकारमधील भूमिगतांना मदत व आश्रय. भूदान चळवळीत स्वत:ची दीडशे एकर जमिन दान. पाचगणीत महात्मा गांधीजींवरील प्राणघातक हल्ल्यात गांधींचे प्राणरक्षण. सर्वोदय योजनेचे संचालक, विधानसभा व विधानपरिषद सदस्य. जावळी भागाचा विकास. स्वातंत्र्यसैनिक म्हणून मानधन न स्विकारणारे कार्यकर्ते.

७) **फ्रँक बुचमन** (जन्म १८७८, मृत्यू ७ ऑगस्ट १९६१) :– संस्थापक Oxford Group, हे सध्या Moral Re-Armament 1938 ते 2001 आणि Initiatives of change म्हणून ओळखले जाते. फ्रँक बुचमन यांनी जागतिक महायुद्धात होरपळलेल्या देशातील सैनिकांना मानसिक धक्क्यातून बाहेर काढणे व देशादेशामध्ये निर्माण झालेले ताणतणाव दूर करण्यासाठी या ग्रुपची निर्मिती. आज या सेंटरचे जगातील साठ देशातून काम चालते.

Blessings

from Kakasaheb & Kaku

Kr. V. PANDIT
TRUSTEE

SANJEEWAN VIDYALAYA
PANCHGANI

श्री

पंडित बंधूंनी इतक्या १८२२ सालीच लावलेल्या छोट्याशा रोपट्याचे आज अनेक मोठ्या वृक्षात आलेले रूपांतर बघून मला आनंदाने भरून आले आहे

देशाच्या काकांनी पांचगणीतील संस्थेचा ट्रस्ट केला व त्यि शरदचे लग्न सर्वस्व सोपविले. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अपार कष्ट करून शाळेची स्तुतीय प्रगती केली

भारत सरकारने शाळेला शिक्षणासाठी मेरिट स्कॉलर्स पाठवून व आर्थिक सहाय्यही दिले त्यांच्या प्रेमाने माजी व आजी विद्यार्थी व वेगळ्या हितचिंतकांनी संस्थेला बहुमोल सहाय्य दिले या सर्वांच्या संस्थेबद्दलच्या प्रेमाने कौतुक करावयास शब्द अपुरे आहेत

त्यांनाही हे सर्व बघावयास कै. रावसाहेब व त्यांच्या दिवंगत पत्नी आज आपल्यात नाहीत त्यांनाही हे बघून फार समाधान झाले असते

आज शाळेचा हीरक महोत्सव व शताब्दी सोहळा आहे. ही आपल्या अभिमानाच्या दृष्टीने सर्वोच्च आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे

संस्थेची भरभराट अशीच भरभराट होवो व ही संस्था सर्व सद्गुणांचे मुशीची व समाजाचे वैचारिक भुकेली घडवून आणण्याचे मोठे साधन होवो हीच ईश्वरास प्रार्थना

फ्रं वि. पंडित
कमला बाई पंडित

GAZETTEER

OF THE

BOMBAY PRESIDENCY

VOLUME XIX.

SÁTÁRA.

Under Government Orders.

Bombay:
PRINTED AT THE
GOVERNMENT CENTRAL PRESS.
1885

३५९

THE names of contributors are given in the body of the book. Special acknowledgments are due to Mr. J. W. P. Muir-Mackenzie, C.S. whose valuable contributions form the bulk of the Volume.

Much help was also received from Messrs. J. King, C. S. Collector, H. R. Cooke, C. S., Surgeon-Major W. McConaghy, and the Deputy Collectors Ráv Bahádur Báláji Gangádhar Sáthe and Mr. E. T. Richardson.

JAMES M. CAMPBELL.

October 1884.

Chapter XIV.
Places.

work of improvement was a general superintendence of the village cleanliness and sanitation and repair of the chief street.

PÁL.
History.

In Marátha times Pál was a *kasba* or market town of some note on the main road from Sátára to Karád. Pál village and temple are closely connected with a celebrated exploit of Chitursing in February 1799 in revenge for the defeat of his brother Sháhu the Sátára Rája. He had heard that Rástia was encamped near Sátára fort with a force of 2000 or 3000 men on behalf of the Peshwa. He accordingly led 600 infantry through the hills and valleys till opposite Pál where he remained concealed till night. He then repaired to the celebrated temple, performed the usual worship, and the whole party having solemnly invoked the deity, stained their clothes with yellow dye, rubbed their hands and faces with turmeric in token of a vow to win or die, and issued forth to the attack. The enemy was not unprepared but had only time to fire a few rounds when they were furiously charged sword in hand, their guns taken, and the whole body dispersed in a few minutes. Chitursing then retreated to Kolhápur so quickly that he could not be overtaken.[1]

PALSHI.

Palshi, a small village to the north of the Karád-Bijápur road seven miles south-east of Khánápur, has to the extreme east a curious fort called Kuldrug about one hundred and ten acres in area. The fort lies on a plateau between two streams descending down a steep rocky hill into the Mán valley which lies about 700 feet below. There are remains of a wall and four bastions on the south-west side; all the rest has no defences except the great natural steepness of the hill side. Inside are the plinths of several buildings and the whole is said to be of great antiquity, the work of a Koli Rája who endeavoured to head an insurrection against the Bhoj Rája of Panhála. In 1827 Captain Clunes notices Palshi as a small village on the Vásna with twenty-five houses.[2]

PÁLUS.

Pa'lus is a large village of 4771 inhabitants on the Karád-Tásgaon road about ten miles north-west of Tásgaon. The village consists of one broad market street and a few small lanes. The Krishna Canal ends in the lands of this village. The soil is rich and sugarcane is abundantly grown in irrigated and a good deal of cotton in the unirrigated soils. The village has a vernacular school.

PÁNCHGANI.
Description.

Pa'nchgani[3] in Wái, about ten miles west of Wái and about eleven miles east of Mahábaleshvar, is a small health-resort on the Surul-Mahábaleshvar road 4378 feet above sea level. The village, which, according to the 1881 census, had a population of 636, lies with five others on a Sahyádri spur which juts out at Mahábaleshvar and terminates about a mile from Wái. Situated to the lee of Mahábaleshvar and about 200 feet lower, it escapes the heavy rain and fog of the outer range which are carried away into the valleys to the north and south. It is also happily shielded from the east wind by being built under a large extent of tableland. The magnificent

[1] Grant Duff's Maráthás, 546. [2] Itinerary, 32.
[3] Contributed by the Bev. Mr. Burgess, Headmaster Pánchgani High School.

Chapter XIV.
Places.
PÁNCHGANI.
Description.

scenery of the Krishna valley extending for many miles from east to west with its numerous hamlets, highly cultivated fields, and picturesque river, can be seen along the whole northern ridge of the mountain. Though less extensive, the southern aspect is even more beautiful. The geological formation of Pánchgani is volcanic as is the rest of the Deccan. While all along the road up the hills from Wái to Dhándheghar two miles from Pánchgani trap is found, the soil on the hill top has a large admixture of oxide of iron which reddens the stratum into laterite. At the base of the scarp of the tableland are to be found bubbles thrown up in the rapid cooling of molten rock of preadamite days. The water-supply is from springs on the south-west of the hill all of which except three are on private grounds. Of the three public springs the most important and the chief source of the station water-supply lies on the north of the village and much below it in elevation. It has been built round and is known as the Marátha well. It has been very recently improved by Government at a cost of £35 6*s*. (Rs. 353).

Climate.

Considered as a sanitarium, Pánchgani stands almost unrivalled. With a temperature like that of Mahábaleshvar it has the eminent advantage over that charming health resort of being comfortably habitable throughout the year. The climate is cool salubrious and comparatively dry. It is excellently adapted for both adults and children but for children especially it is unsurpassed in India. The average rainfall is fifty-six inches[1] or about a fifth of that of Mahábaleshvar. The temperature varied in 1883-84 from 55° at 6 A.M. in December 1883 to 96° at 2 P.M. in March 1884. The mean temperature at noon is 71° and the mean daily range only 6°.

The European settlement was founded by private enterprise, chiefly through the energy and zeal of the late Mr. John Chesson, who, in 1854, began farming here on a small scale. After careful observations extending over many years,[2] Mr. Chesson was satisfied that the climate and soil of Pánchgani were suitable for the cultivation of most of the fruits of the temperate zone, besides making it a cheap health resort for Europeans. By 1862 there were six substantial houses built by Europeans and a yearly grant of £200 (Rs. 2000) was made to the station by Government in that year. Mr. Chesson was appointed Honorary Superintendent and Magistrate by Sir Bartle Frere. The great drawback to Pánchgani is its isolation; but the opening in 1886 of the West Deccan Railway will greatly benefit the station. If, as is probable, a branch line will be carried to Wái, this would bring Pánchgani within ten miles of the line of rail.

Management.

The 1881 census showed a population of 636 of whom 555 were Natives and eighty-one Europeans. The number of Europeans varies from 140 in the summer to about seventy-five through the rest of the year. The station is managed by a Superintendent with second class magisterial powers, and has, besides his office, a well-appointed travellers' bungalow, a rest-house, a post office, a market, a Government

[1] The rainfall in 1883 during the five rainy months June to October was 58 inches 11 cents. [2] Chesson and Woodhall's Bombay Miscellany, IV. 336

Chapter XIV.
Places.

PÁNCHGANI.

High School.

vernacular school for natives and an aided high school for Europeans and Eurasians, a dispensary, and thirty residences three of them belonging to Government. The travellers' bungalow, which is about sixty-four feet long and 33½ feet broad, has a cook-house, servant's and messman's rooms, and stables. It is much used by visitors on their way to Mahábaleshvar. The high school, which is managed by a committee in connection with the Diocesan Board of Education, was originally opened in 1876 and reopened in 1880 by the Bishop of Bombay. In 1884 it had an average of thirty-two pupils including day scholars and boarders. A neat and substantial school room (40′ × 18′) was added in 1884 at a cost of £260 (Rs. 2600). It is used for church services on Sundays. This school is the only one of its sort permanently located in the hills for European boarders and offers special advantages to those parents who, unable or unwilling to send their children to Europe, are yet anxious to remove them early from the injurious effects of the climate and surroundings of a life on the plains. In 1883-84 the dispensary treated 5163 out-patients. This is an increase in numbers not due to increased sickness in the neighbourhood, but to the continued presence of skilled medical officers who attract natives even from considerable distances, from as far as Mahád in Kolába and Pandharpur in Sholápur. The station funds, including a yearly Government contribution of £200 (Rs. 2000), amounted in 1883-84 to £334 14*s.* (Rs. 3347) and the expenditure to £195 2*s.* (Rs. 1951). Nurseries are attached to the station where experiments have been made in planting exotic and other trees and shrubs and in cultivating English potatoes, which with peaches, the pear, and the blackberry thrive in the mild climate. The coffee of Pánchgani has been favourably reported on by London brokers. Here too the sweet heliotrope and myrtle grow in wild profusion. The sweet briar, so rarely met with in India, flowers here; and the eye of the traveller from the dusty plains below is gladdened with the sight of lanes bordered with hedge-roses which festoon overhead entwined with honeysuckle. A single cluster of sixty or seventy roses is not an unusual sight. Pánchgani, always beautiful, is at its best in August and September when the fairy pimpernel the buttercup and the wild sweetpea cover the hillside while the springy turf of the tablelands is thickly carpeted with the velvety bluebonnet and the more delicate stargrass.

Nurseries.

PÁNDAVVÁDI.

Pa′ndavva′di, a hamlet of Bhogaon village about three miles west of Wái, is apparently named like Pándavgad from the legendary Pándav princes. It is celebrated as the place where in 1673 died the great Marátha poet Váman Pandit a contemporary of Shiváji Tukárám and Rámdás. Váman was a Rigvedi Deshasth Bráhman originally an astrologer of Koregaon. He studied the Shástras at Benares. His two great works are in the *ovi* metre a commentary on the Bhagvadgita and a metaphysical work called the Nigamsár.[1]

PÁNDAVGAD FORT.

Pa′ndavgad or **Pa′ndugad Fort,** 4177 feet above sea level, lies four miles north-west of Wái. The fort is conspicuous over a low spur branching east from its southern angle. A path to the

[1] Navanita (New Edition), 80-81.

Chapter XIV.

Places.

PÁNDAVGAD FORT.

hamlet of Shelárvádi leads on to a small break in the above mentioned spur and from this break the path continues by a shoulder of the hill, on which are a few huts belonging to Kolis formerly connected with the fort and now charged with attendance on the temples remaining there. The ascent from the Koli huts is steepish and for the last two hundred yards is in steps roughly cut in the sides of the hill. The fort is about six acres in extent and nearly square. Its defences consist of a scarp generally from forty to sixty feet high, more than usually precipitous and in many places actually overhanging and surmounted by a wall with masonry ramparts. The original materials of enormous blocks of dry stone have nearly all disappeared and except the northern end where the gateway and wall are of the huge masonry of the old forts, what remains is very light work. On the south is a modern bastion in tolerable repair. The entrance consisted of a single archway with apparently no door. On the top which is nearly level is a large pond one hundred feet by sixty now quite empty and silted up. The water apparently was first let out by blowing up the scarp and wall which form the outer side. The fort has fourteen other ponds and cisterns almost all empty and useless except two still used by the Kolis, and two small temples of Pandjái Devi and Máruti. The fort is completely commanded from the Yreuli plateau about two thousand yards distant and led up to by easy bullock paths from the north by Ving and Mándhardev or from the south from Wái. The Wái path, however, would be commanded from the fort.

History.

The fort is said to have been built by the Kolhápur Siláhára chief Bhoja II. (1178 - 1193) of Panhála. About 1648 it is mentioned as being in the charge of a Bijápur *mokásádár* stationed at Wái.[1] In 1673 it was taken by Shiváji.[2] In 1701 Pándavgad surrendered with Chandan Vandan to Aurangzeb's officers.[3] In 1713 during his flight from Chandrasen Jádhav the Marátha captain or Senápati, Báláji Vishvanáth afterwards the first Peshwa, being refused shelter by the Sachiv's agent at Sásvad attempted to cross to Pándavgad in the opposite valley. Closely pursued he contrived to conceal himself until two Maráthás Piláji Jádhav and Dhumál then common cavaliers in his service, gathered a small troop of horse and carried him with great difficulty to Pándavgad where he was protected by Sháhu's orders. Chandrasen demanded that Báláji should be given up and in case of refusal threatened to renounce his allegiance. Sháhu refused to give up Báláji and sent orders to Haibatráv Nimbálkar Sarlashkar then at Ahmadnagar to march on at once to Sátára. Meanwhile Báláji was in Pándavgad surrounded by Chandrasen's troops. But hearing of Haibatráv's arrival at Phaltan about forty miles east, Chandrasen quitted Pándavgad and marched to Deur about fifteen miles to the south-east.[4] During Trimbakji Denglia's insurrection in 1817 Pándavgad was taken by the insurgents. It surrendered in April 1818 to a detachment of the 9th Native Infantry Regiment under Major Thatcher.[5]

---

[1] Grant Duff's Maráthás, 62. [2] Grant Duff's Maráthás, 116.
[3] Grant Duff's Maráthás, 177. [4] Grant Duff's Maráthás, 189-190.
[5] Bombay Courier, 18th April 1818.

No. 1457 of 1862.

Public Works Department.

From the Revenue Commissioner, Southern Division.

To the Secretary to Government, Bombay.

Sir,—I have the honour to forward, for the consideration of Government, the accompanying very interesting letter addressed to me by Lieutenant Colonel Phayre, Quartermaster General of the Army, describing his survey and the cutting of trial-paths along the alternative lines surveyed by him, with a view of bringing the Sanitaria of Malcolm Peth and Paunchgunny into easier communication with the great military station of Poona.

2. Neither of the lines* A, B, C, D, *viâ* the Korul Khind, or A, G, C, D, *viâ* the Ambur Khind, would be of much use in a commercial point of view, or as means of exit for the produce of our own districts; for even if it should be found that the mountain range which separates the valleys of the Krishna and the Neera could be crossed as easily at the Ambur Khind as at the Kamatkhee Ghaut, and that it would be as cheap and as direct to bring the Poona and Sattara road over the Ambur Khind through *Waee*, instead of, as intended, over the Kamatkhee Ghaut through *Bhoinj* to Sattara, still almost all the country opened out by doing so would be one that belongs to the Punt Suchew, and not, as in the other case, to our Government.

* *Vide* Sketch Map annexed to Colonel Phayre's letter.

3. But it will be observed that the chief advantage contemplated by Lieutenant Colonel Phayre, in the construction of a road by the Ambur Khind, is one which cannot be judged of as a question directly affecting the revenue, and there is no doubt that it would render more easily accessible the highland at Mandur Dew, which he describes as apparently well calculated for a permanent residence for Europeans.

4. In his 27th paragraph Lieutenant Colonel Phayre shows that he has expended Rupees 4,647-9-4, of which Rupees 1,500 were received as a donation from the Punt Suchew, who however, from what is stated at the close of Colonel Phayre's 19th paragraph, will probably wish to retract his gift. Under any circumstances, I have little doubt that Government will take care that Lieutenant Colonel Phayre is not allowed to suffer pecuniary loss in consequence of having undertaken and carried out the survey and the work, the result of which he reports in this letter. I beg the attention of Government to this matter, as the reimbursement of Lieutenant Colonel Phayre will require their particular sanction.

I have the honour to be, &c.

W. HART,
Revenue Commissioner, S. D.

Poona, 24*th June* 1862.

1 *a*

P. S.—Since writing the above, I have received from Lieutenant Colonel Phayre the plan and description of the Mundur Dew table-land, promised in paragraph 22 of his letter, and beg to forward them along with it.

A Minute by His Excellency the Commander in Chief, containing remarks on Lieutenant Colonel Phayre's letter, is herewith forwarded.

W. HART,
Revenue Commissioner S. D.

No. 985.

From Lieutenant Colonel R. PHAYRE,
Quartermaster General of the Army,

To W. HART, Esq.,
Revenue Commissioner, Southern Division.

SIR,—Amongst the many Indian questions that occupied the attention of the Local and Home Governments some three or four years ago, none excited more interest than that which treated of the sanitary tracts of country in each presidency, their undoubted utility, and the state of their communications.

2. So far back as February 1860 the views of the Government of India upon this subject were summarised in several circular letters from Major Atkinson, Officiating Secretary in the Military Department, from one of which (No. 952 B), to the address of the Secretary to Government, Military Department, Bombay, I would quote one or two short sentences, as bearing upon the question I have now the honour to submit for your consideration—

> *Paragraph* 5. "I am desired to observe that the object of the measure sanctioned is one of humanity, as regards our European soldiers."

3. The measure here referred to is thus explained in paragraph 3 of the same letter, viz :—

> "The possibility of making greater use of those Sanitaria which are already partially and occasionally occupied."
>
> Again, paragraph 10—
>
> "It must not be forgotten that this is not by any means a purely medical question. Unless it can be made easily accessible, the best climate is of little value as a military sanitarium, and there are many circumstances, such as character of the scenery, and the means of obtaining occupation and amusement, which, in the case of men no less than officers, may materially affect the health of the troops."

4. The Bombay Government resolution No. 4064 of August 1859, in paragraph 10, refers to the stations of Paunchgunny and Mahableshwur, as noticed by Dr. Morehead in his report referred to.

5. In the 11th paragraph of that report Dr. Morehead says—

Paunchgunny.

"Malcolm Peth is rendered uninhabitable from the middle of June to the end of September by incessant rain and fog, consequent on its position on the western side of the mountain; but it is to this position also that are due a greater coolness and softness of the climate in March, April, and May. There are localities on the eastern side of Mahableshwur which possess a climate nearly resembling that of Poorundhur, in which the temperature is about three degrees higher than that of Malcolm Peth, the fog less constant during the rainy season, and the rain-fall about 50 inches. Paunchgunny (distant 14 miles from Malcolm Peth, overlooking the valley of Waee, at an elevation of 4,000 feet) is the locality on the eastern side of which the character of the climate is best known. Notes on the monsoon climate of Paunchgunny have been published in the 3rd number of the Transactions of the Medical and Physical Society of Bombay."

6. In his 33rd paragraph, Dr. Morehead speaks as follows:—

Dr. Morehead's proposal to look for a new permanent Sanitarium inhabitable throughout the year.

"Should, however, the distance to Mahableshwur be found inconvenient to regiments in the Southern Maratha Country or in Khandeish, or, after the railway lines are completed, to those in Central India, then other hill stations may be sought for north and south of Mahableshwur on the ghaut range itself, or on the spurs that project inland from its easterly side,—it being borne in mind that if the sanitarium is for the hot season *alone*, then a westerly position on the ghaut range is very important; but that if the rainy season is to be included, then a situation on the eastern side of the ghauts, *or* more inland *on the projecting spurs*, must be sought for, and the full advantages of the Deccan hills in the hot season be in some measure sacrificed."

7. I trust that these extracts, establishing the value of Paunchgunny and Mahableshwur (or Malcolm Peth) as sanitaria, and the resolution of Government as to the necessity of ascertaining our resources in regard to the sanitary tracts of this presidency, and their communications, may prove a favourable introduction to the subject of this letter.

8. It seems to be generally acknowledged that the sphere comprised within the accompanying sketch, extending from Poona on the north to Sattara on the south, and the Syadree range on the west, is, from its geographical position, climate, soil, and water, the most likely to prove of use to Government in furthering any projects that they may now or hereafter entertain in regard to the temporary or permanent settlement of such Europeans as may be desirous of finding either a temporary hot-weather retreat, or a home in this part of India.

9. In the northern portion of the tract under report (between Poona and the Bhore territory), we find the hill forts of Singhur and Poorundhur, both of which, so far as their extent and position (with reference to the sea) admit of, answer the sanitary objects for which they are at present used.

10. In the southern portion we meet with four extensive off-shoots from the Syadree range, stretching to the east and south-east for 20 and 30 miles, and maintaining an average height of about 4,000 feet above the level of the sea, though certain points on them are supposed to run as high as 4,500 feet, which is the average level of Mahableshwur, the highest point of which is 4,700 feet.

11. It is to these spurs that I wish to draw particular attention, as affording the most central, extensive, and generally capable sanitary area that we possess in the Bombay presidency. Their general character as to climate is, that at their western extremities on the Syadree they are not inhabitable, or rather not suited to European objects and mode of life, from the middle of June to the beginning of October, owing to the incessantly heavy rain-fall during that period, amounting, on an average, to nearly 250 inches annually.

12. Following their easterly course, however, this heavy rain-fall gradually diminishes, until a line of country is attained (as at Paunchgunny) where it is scarcely one-fourth of what falls on the Syadree, and hence quite adapted to the mode and habits of life of Europeans all the year round. It is therefore to the discovery of such spots, no less than to the several lines of communication connecting them with each other and our principal cantonment at Poona, that my leisure time has been directed for the last few months.

13. It will be seen from the sketch that the first of the four spurs of which I am speaking (branches from the main range at a point south of the Wurunda Ghaut and extending eastward for upwards of 30 miles) terminates near the Salpee Ghaut, on the old Neera and Sattara road. It is crossed at right angles and at certain intervals by the four passes as per margin, the approaches to which, in three instances, are well adapted for the construction of easy roads in the modern style.

Koorul Khind.
Ambur Khind.
Kamatkhee Khind.
Salpee Khind.

14. The second (and the least extensive of the four) branches from the Mahableshwur plateau, near the village of that name, and, extending about 20 miles to the eastward, terminates at a point south of the town of Waee. On the east side of this spur, at about twelve miles from Mahableshwur, is situated the new European settlement of Paunchgunny, which at present consists of eight or nine families, and affords, I beleive, a satisfactory example of the kind of settlements which the spurs of which I am speaking are capable of providing for. Without the least intention of under rating the value of this little station, I may mention what was told me by a late civil officer of the district, viz. that the agricultural capabilities of the place and its vicinity were too limited to allow of its ever affording